७७	चौधरी, श्रीमती मनिषा अशोक (दहिसर)	२०	०	१००%
७८	जगताप, श्री. शंकर पांडुरंग (चिंचवड)	१९	१	९५%
७९	जगताप, श्री. संग्राम अरुणकाका (अहमदनगर शहर)	१२	८	६०%
८०	जयस्वाल, ॲड. आशिष नंदकिशोर (रामटेक)	**मा. राज्यमंत्री**		
८१	जाधव, श्री. भास्कर भाऊराव (गुहागर)	१३	७	६५%
८२	जाधव (पाटील), श्री. मकरंद लक्ष्मणराव (वाई)	**मा. मंत्री**		
८३	जाधव, श्रीमती रंजनाताई (संजना) हर्षवर्धन (कन्नड)	१९	१	९५%
८४	जानकर, श्री. उत्तमराव शिवदास (माळशिरस)	१२	८	६०%
८५	जामसुतकर, श्री. मनोज पांडुरंग (भायखळा)	१९	१	९५%
८६	जावळे, श्री. अमोल हरिभाऊ (रावेर)	२०	०	१००%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
८७	जैस्वाल, श्री. प्रदीप शिवनारायण (औरंगाबाद मध्य)	८	१२	४०%
८८	जोरगेवार, श्री. किशोर गजानन (चंद्रपूर)	१२	८	६०%
८९	झनक, श्री. अमित सुभाषराव (रिसोड)	९	११	४५%
९०	झिरवाळ, श्री. नरहरी सिताराम (दिंडोरी)	**मा. मंत्री**		
९१	ठाकरे, श्री. आदित्य उध्दव (वरळी)	१७	३	८५%
९२	ठाकरे, श्री. विकास पांडुरंग (नागपूर पश्चिम)	१७	३	८५%
९३	ठाकूर, श्री. चरणसिंग बाबूलालजी (काटोल)	१९	१	९५%
९४	ठाकूर, श्री. प्रशांत रामशेठ (पनवेल)	१४	६	७०%
९५	ठाकूर, श्रीमती विद्या (गोरेगाव)	१९	१	९५%
९६	डहाके, श्रीमती सई प्रकाश (कारंजा)	१८	२	९०%
९७	ढिकले, ॲड. राहुल उत्तमराव (नाशिक पूर्व)	१६	४	८०%
९८	तटकरे, श्रीमती आदिती सुनिल (श्रीवर्धन)	**मा. मंत्री**		
९९	तरे, श्री. विलास सुकुर (बोईसर)	२०	०	१००%
१००	तापकीर, श्री. भिमराव (आण्णा) धोंडिबा (खडकवासला)	१८	२	९०%
१०१	तायडे, श्री. प्रविण वसंतराव (अचलपूर)	१८	२	९०%
१०२	तिडके, श्री. आनंद शंकर (नांदेड दक्षिण)	२०	०	१००%
१०३	तुपे, श्री. चेतन विठ्ठल (हडपसर)	२०	०	१००%
१०४	तोडसाम, श्री. राजू नारायण (आर्णी)	२०	०	१००%
१०५	थोरवे, श्री. महेंद्र सदाशिव (कर्जत)	१३	७	६५%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
१०६	दटके, श्री. प्रविण प्रभाकरराव (नागपूर मध्य)	१५	५	७५%
१०७	दरोडा, श्री. दौलत भिका (शहापूर)	१५	५	७५%
१०८	दळवी, श्री. महेंद्र हरी (अलिबाग)	१७	३	८५%
१०९	दाते, श्री. काशीनाथ महादु (पारनेर)	१८	२	९०%
११०	दानवे, श्री. संतोष रावसाहेब (भोकरदन)	१८	२	९०%
१११	दुबे पंडित, श्रीमती स्नेहा (वसई)	१६	४	८०%
११२	देरकर, श्री. संजय निळकंठराव (वणी)	१७	३	८५%
११३	देवतळे, श्री. करण संजय (वरोरा)	१३	७	६५%
११४	देशमुख, श्री. अमित विलासराव (लातूर शहर)	११	९	५५%
११५	देशमुख, डॉ. आशिषराव (सावनेर)	१५	५	७५%
११६	देशमुख, श्री. नितीन भिकनराव (बाळापूर)	१२	८	६०%
११७	देशमुख, डॉ. बाबासाहेब आण्णासाहेब (सांगोला)	१५	५	७५%
११८	देशमुख, श्री. विजय सिद्रामप्पा (सोलापूर शहर उत्तर)	१५	५	७५%
११९	देशमुख, श्री. सत्यजित शिवाजीराव (शिराळा)	१६	४	८०%
१२०	देशमुख, श्री. सुभाष सुरेशचंद्र (सोलापूर दक्षिण)	१९	१	९५%
१२१	देसाई, श्री. शंभूराज शिवाजीराव (पाटण)	**मा. मंत्री**		
१२२	धस, श्री. सुरेश रामचंद्र (आष्टी)	१७	३	८५%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
१२३	नर, श्री. अनंत (बाळा) भि. (जोगेश्वरी पूर्व)	१९	१	९५%
१२४	नरके, श्री. चंद्रदिप शशिकांत (करवीर)	२०	०	१००%
१२५	नरोटे, डॉ. मिलिंद रामजी (गडचिरोली)	१२	८	६०%
१२६	नवघरे, श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या रमाकांत (बसमत)	१८	२	९०%
१२७	नाईक, श्री. इंद्रनील मनोहर (पुसद)	**मा. राज्यमंत्री**		
१२८	नाईक, श्री. गणेश रामचंद्र (ऐरोली)	**मा. मंत्री**		
१२९	नाईक, श्री. राजन बाळकृष्ण (नालासोपारा)	१९	१	९५%
१३०	नाईक, श्री. शिरिषकुमार सुरुपसिंग (नवापूर)	१८	२	९०%
१३१	नार्वेकर, ॲड. राहुल सुरेश (कुलाबा)	**मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा**		
१३२	निकम, श्री. शेखर गोविंदराव (चिपळूण)	१७	३	८५%
१३३	निकोले, श्री. विनोद भिवा (डहाणू)	१७	३	८५%
१३४	निलंगेकर पाटील, श्री. संभाजीराव दिलीपराव (निलंगा)	१४	६	७०%
१३५	पटेल, श्री. अमिन (मुंबादेवी)	२०	०	१००%
१३६	पटेल, श्री. मुरजी (काका) (अंधेरी पूर्व)	१९	१	९५%
१३७	पटोले, श्री. नानाभाऊ फाल्गुनराव (साकोली)	१३	७	६५%
१३८	पठाण, श्री. साजिद खान (अकोला पश्चिम)	६	१४	३०%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
१३९	पठारे, श्री. बापूसाहेब तुकाराम (वडगाव शेरी)	१८	२	९०%
१४०	पडळकर, श्री. गोपीचंद कुंडलिक (जत)	१६	४	८०%
१४१	पवार, श्री. नितीनभाऊ अर्जुन (ए.टी.) (कळवण)	१६	४	८०%
१४२	पवार, श्री. अभिमन्यू दत्तात्रय (औसा)	१४	६	७०%
१४३	पवार, श्री. राजेश संभाजीराव (नायगाव)	१८	२	९०%
१४४	पवार, श्री. रोहित (कर्जत जामखेड)	८	१२	४०%
१४५	पाचपुते, श्री. विक्रम बबनराव (श्रीगोंदा)	१९	१	९५%
१४६	पाटील, श्री. अनिल भाईदास (अमळनेर)	१८	२	९०%
१४७	पाटील, श्री. अभिजीत धनंजय (माढा)	२०	०	१००%
१४८	पाटील, श्री. अमोल चिमणराव (एरंडोल)	१७	३	८५%
१४९	पाटील, श्री. अशोक धर्मराज (भांडुप पश्चिम)	१०	१०	५०%
१५०	पाटील, श्री. किशोर आप्पा (पाचोरा)	१६	४	८०%
१५१	पाटील, श्री. गुलाबराव रघुनाथ (जळगाव ग्रामीण)	**मा. मंत्री**		
१५२	पाटील, श्री. चंद्रकांत निंबा (मुक्ताईनगर)	११	९	५५%
१५३	पाटील, श्री. चंद्रकांत (दादा) बच्चु (कोथरुड)	**मा. मंत्री**		
१५४	पाटील, श्री. जयंत राजाराम (इस्लामपूर)	१७	३	८५%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
१५५	पाटील, श्री.नारायण (आबा) गोविंदराव (करमाळा)	१४	६	७०%
१५६	पाटील चिखलीकर, श्री. प्रतापराव गोविंदराव (लोहा)	१६	४	८०%
१५७	पाटील, श्री. बाबासाहेब मोहनराव (अहमदपुर)	**मा. मंत्री**		
१५८	पाटील, श्री. रविशेठ (पेण)	१६	४	८०%
१५९	पाटील, श्री. राघवेंद्र (रामदादा) मनोहर (धुळे ग्रामीण)	१९	१	९५%
१६०	पाटील (यड्रावकर), श्री. राजेंद्र शामगोंडा (शिरोळ)	९	११	४५%
१६१	पाटील, श्री. राणाजगजितसिंग पद्मसिंह (तुळजापुर)	११	९	५५%
१६२	पाटील, डॉ. राहुल वेदप्रकाश (परभणी)	१३	७	६५%
१६३	पाटील, श्री. रोहित सुमन आर.आर. आबा (तासगाव-कवठे महांकाळ)	१७	३	८५%
१६४	पाटील, श्री. सचिन (फलटण)	१५	५	७५%
१६५	पाटील, श्री. शिवाजी शट्टप्पा (चंदगड)	१९	१	९५%
१६६	पाडवी, श्री. आमश्या फुलजी (अक्कलकुवा)	१७	३	८५%
१६७	पाडवी, श्री. राजेश उदेसिंग (शहादा)	१३	७	६५%
१६८	पावरा, श्री. काशिराम वेचान (शिरपूर)	१४	६	७०%
१६९	पुराम, श्री. संजय (आमगाव)	८	१२	४०%
१७०	पोतनीस, श्री. संजय गोविंद (कलिना)	१९	१	९५%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
१७१	पंडित, श्री. विजयसिंह शिवाजीराव (गेवराई)	१४	६	७०%
१७२	पिंपळे, श्री. हरीश मारोतीअप्पा (मुर्तीजापूर)	१८	२	९०%
१७३	प्रभू, श्री. सुनिल वामन (दिंडोशी)	१९	१	९५%
१७४	फडणवीस, श्री. देवेंद्र गंगाधरराव (नागपूर दक्षिण पश्चिम)	**मा. मुख्यमंत्री**		
१७५	फरांदे, श्रीमती देवयानी सुहास (नाशिक मध्य)	१६	४	८०%
१७६	फुंडकर, श्री. आकाश पांडुरंग (खामगाव)	**मा. मंत्री**		
१७७	बकाने, श्री. राजेश भाऊराव (देवळी)	१४	६	७०%
१७८	बडोले, श्री. राजकुमार सुदाम (अर्जुनी-मोरगाव)	१८	२	९०%
१७९	बनकर, श्री. दिलीपराव शंकरराव (निफाड)	१५	१	७५%
१८०	बनसोडे, श्री. अण्णा दादू (पिंपरी)	**मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा**		
१८१	बनसोडे, श्री. संजय बाबुराव (उदगीर)	१९	१	९५%
१८२	बाबर, श्री. सुहास अनिलभाऊ (खानापूर)	१८	२	९०%
१८३	बालदी, श्री. महेश (उरण)	१७	३	८५%
१८४	बावनकुळे, श्री. चंद्रशेखर कृष्णराव (कामठी)	**मा. मंत्री**		
१८५	बोरनारे, श्री. रमेश नानासाहेब (वैजापुर)	१५	५	७५%
१८६	बोरसे, श्री. दिलीप मंगळू (बागलाण)	१७	३	८५%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
१८७	बंब, श्री. प्रशांत बन्सीलाल (गंगापूर)	१९	१	९५%
१८८	बांगर, श्री. संतोष लक्ष्मणराव (कळमनुरी)	२०	०	१००%
१८९	भरणे, श्री. दत्तात्रय विठोबा (इंदापूर)	**मा. मंत्री**		
१९०	भातखळकर, श्री. अतुल (कांदिवली पूर्व)	२०	०	१००%
१९१	भारसाकळे, श्री. प्रकाश गुणवंतराव (आकोट)	९	११	४५%
१९२	भुजबळ, श्री. छगन (येवला)	**मा. मंत्री**		
१९३	भुमरे, श्री. विलास संदिपानराव (पैठण)	१६	४	८०%
१९४	भुसे, श्री. दादाजी दगडू (मालेगाव बाह्य)	**मा. मंत्री**		
१९५	भोईर, श्री. विश्वनाथ आत्माराम (कल्याण पश्चिम)	०	२०	०%
१९६	भोयर, डॉ. पंकज राजेश (वर्धा)	**मा. राज्यमंत्री**		
१९७	भोये, श्री. हरिशचंद्र सखाराम (विक्रमगड)	१९	१	९५%
१९८	भोसले, डॉ. अतुलबाबा सुरेश (कराड दक्षिण)	१९	१	९५%
१९९	भोसले, श्री. शिवेंद्रराजे अभयसिंहराजे (सातारा)	**मा. मंत्री**		
२००	भोळे, श्री. सुरेश (राजू मामा) दामु (जळगाव शहर)	२०	०	१००%
२०१	भांगडिया, श्री. बंटी मितेश (चिमूर)	१२	८	६०%
२०२	भोंगळे, श्री. देवराव विठोबा (राजुरा)	२०	०	१००%
२०३	भोंडेकर, श्री. नरेंद्र भोजराज (भंडारा)	९	११	४५%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
२०४	मते, श्री. मोहन गोपाळराव (नागपूर दक्षिण)	१४	६	७०%
२०५	मलिक, सना (अणुशक्ती नगर)	२०	०	१००%
२०६	मसराम, श्री. रामदास मळूजी (आरमोरी)	१५	५	७५%
२०७	महाजन, श्री. गिरीश दत्तात्रय (जामनेर)	**मा. मंत्री**		
२०८	महाडीक, श्री. अमल महादेवराव (कोल्हापूर दक्षिण)	१२	८	६०%
२०९	महाले, श्रीमती श्वेता विद्याधर (चिखली)	२०	०	१००%
२१०	माने, दलितमित्र डॉ. अशोकराव (बापू) (हातकणंगले)	१५	५	७५%
२११	मिसाळ, श्रीमती माधुरी सतिश (पर्वती)	**मा. राज्यमंत्री**		
२१२	मुटकुळे, श्री. तान्हाजी सखारामजी (हिंगोली)	१८	२	९०%
२१३	मुंडे, श्री. धनंजय पंडितराव (परळी)	१२	८	६०%
२१४	मुंदडा, श्रीमती नमिता अक्षय (केज)	१९	१	९५%
२१५	मुनगंटीवार, श्री. सुधीर सच्चिदानंद (बल्लारपूर)	१४	६	७०%
२१६	खलिक, मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल (मालेगाव मध्य)	१४	६	७०%
२१७	मुश्रीफ, हसन मियालाल (कागल)	**मा. मंत्री**		
२१८	मेघे, श्री. समीर दत्तात्रय (हिंगणा)	१४	६	७०%
२१९	मेश्राम, श्री. संजय नारायणराव (उमरेड)	१६	४	८०%
२२०	मेहता, श्री. नरेंद्र (मिरा भाईंदर)	१५	५	७५%
२२१	मोरे, श्री. राजेश गोवर्धन (कल्याण ग्रामीण)	१२	८	६०%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
२२२	मोरे, श्री. शांताराम तुकाराम (भिंवडी ग्रामीण)	१९	१	९५%
२२३	म्हात्रे, श्रीमती मंदा विजय (बेलापूर)	१३	७	६५%
२२४	मांगुळकर, श्री. अनिल ऊर्फ बाळासाहेब शंकरराव (यवतमाळ)	१६	४	८०%
२२५	मांडेकर, श्री. शंकर हिरामण (भोर)	१९	१	९५%
२२६	यादव (लोणीकर), श्री. बबनराव दत्तात्रय (परतूर)	१९	१	९५%
२२७	यावलकर, श्री. उमेश ऊर्फ चंदू आत्मारामजी (मोर्शी)	१९	१	९५%
२२८	रहांगडाले, श्री. विजय भरतलाल (तिरोरा)	१६	४	८०%
२२९	राऊत, डॉ. नितीन काशिनाथ (नागपूर उत्तर)	१६	४	८०%
२३०	राऊत, श्री. सुनिल राजाराम (विक्रोळी)	२०	०	१००%
२३१	राजळे, श्रीमती मोनिका राजीव (शेवगाव)	१९	१	९५%
२३२	राठोड, श्री. तुषार गोविंदराव (मुखेड)	१९	१	९५%
२३३	राठोड, श्री. संजय दुलिचंद (दिग्रस)	**मा. मंत्री**		
२३४	राणा, श्री. रवि गंगाधरराव (बडनेरा)	१७	३	८५%
२३५	राणे, श्री. नितेश नारायण (कणकवली)	**मा. मंत्री**		
२३६	राणे, श्री. निलेश नारायण (कुडाळ)	१५	५	७५%
२३७	रावल, श्री. जयकुमार जितेंद्रसिंह (शिंदखेडा)	**मा. मंत्री**		
२३८	रासने, श्री. हेमंत नारायण (कसबा पेठ)	१९	१	९५%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
२३९	लवटे, श्री.गजानन मोतीराम (दर्यापूर)	१९	१	९५%
२४०	लहामटे, डॉ. किरण यमाजी (अकोले)	१६	४	८०%
२४१	लोढा, श्री. मंगलप्रभात गुमानमल (मलबार हिल)	**मा. मंत्री**		
२४२	लंघे, श्री. विठ्ठल वकिलराव (नेवासा)	२०	०	१००%
२४३	लांडगे, श्री. महेश (दादा) किसन (भोसरी)	१२	८	६०%
२४४	लांडे, श्री. दिलीप भाऊसाहेब (चांदिवली)	१३	७	६५%
२४५	वडेट्टीवार, श्री. विजय नामदेवराव (ब्रह्मपूरी)	१८	२	९०%
२४६	वळसे पाटील, श्री. दिलीप दत्तात्रय (आंबेगाव)	८	१२	४०%
२४७	वानखडे, श्री. राजेश श्रीरामजी (तिवसा)	१९	१	९५%
२४८	वानखेडे, श्री. किसन मारोती (उमरखेड)	२०	०	१००%
२४९	वानखेडे, श्री. सुमित (आर्वी)	१२	८	६०%
२५०	विखे पाटील, श्री. राधाकृष्ण एकनाथराव (शिर्डी)	**मा. मंत्री**		
२५१	विटेकर, श्री. राजेश उत्तमराव (पाथरी)	१५	५	७५%
२५२	वुईके, प्रा. डॉ. अशोक रामाजी (राळेगाव)	**मा. मंत्री**		
२५३	शाह, श्री. पराग (घाटकोपर पूर्व)	१०	१०	५०%
२५४	शिंदे, श्री. एकनाथ संभाजी (कोपरी-पाचपाखाडी)	**मा. उप मुख्यमंत्री**		

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
२५५	शिंदे, श्री. महेश संभाजीराजे (कोरेगाव)	१७	३	८५%
२५६	शिरसाट, श्री. संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम)	**मा. मंत्री**		
२५७	शिरोळे, श्री. सिध्दार्थ अनिल (शिवाजी नगर)	१२	८	६०%
२५८	शिवतारे, श्री. विजयबापू (पुरंदर)	२०	०	१००%
२५९	शेख, अस्लम रमजानअली (मालाड पश्चिम)	२०	०	१००%
२६०	शेख, रईस कासम (भिवंडी पूर्व)	१९	१	९५%
२६१	शेलार, ॲड. आशिष (वांद्रे पश्चिम)	**मा. मंत्री**		
२६२	शेळके, श्री. सुनिल शंकरराव (मावळ)	१९	१	९५%
२६३	सत्तार, अब्दुल (सिल्लोड)	१२	८	६०%
२६४	सरदेसाई, श्री. वरुण सतिश (वांद्रे पूर्व)	२०	०	१००%
२६५	सरनाईक, श्री. प्रताप बाबुराव (ओवळा-माजिवडा)	**मा. मंत्री**		
२६६	साकोरे-बोर्डिकर, श्रीमती मेघना दिपक (जिंतुर)	**मा. राज्यमंत्री**		
२६७	सागर, श्री. योगेश (चारकोप)	१९	१	९५%
२६८	साटम, श्री. अमित भास्कर (अंधेरी पश्चिम)	१९	१	९५%
२६९	सामंत, श्री. उदय रविंद्र (रत्नागिरी)	**मा. मंत्री**		
२७०	सामंत, श्री. किरण ऊर्फ भैय्या (राजापूर)	१६	४	८०%
२७१	सावकारे, श्री. संजय वामन (भुसावळ)	**मा. मंत्री**		
२७२	सावरकर, श्री. रणधीर प्रल्हादराव (अकोला पूर्व)	१९	१	९५%

अ.क्र.	नाव / सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
२७३	सावे, श्री. अतुल मोरेश्वर (औरंगाबाद पूर्व)	**मा. मंत्री**		
२७४	सावंत, डॉ. तानाजी जयवंत (परांडा)	९	११	४५%
२७५	सावंत, श्री. महेश बळीराम (माहिम)	१८	२	९०%
२७६	सुर्वे, श्री. प्रकाश (मागाठाणे)	१४	६	७०%
२७७	सेल्वन, कॅप्टन आर. तमील (सायन कोळीवाडा)	१७	३	८५%
२७८	सोनवणे, श्री. चंद्रकांत बळीराम (चोपडा)	१८	२	९०%
२७९	सोनवणे, श्री. शरददादा भिमाजी (जून्नर)	१५	५	७५%
२८०	सोपल, श्री. दिलीप गंगाधर (बार्शी)	१७	३	८५%
२८१	सोळंखे, श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव)	२०	०	१००%
२८२	संचेती, श्री. चैनसुख मदनलाल (मलकापूर)	१२	८	६०%
२८३	स्वामी, श्री. प्रविण विरभद्रया (उमरगा)	१८	२	९०%
२८४	हिरे, श्रीमती सीमा महेश (नाशिक पश्चिम)	१५	५	७५%
२८५	क्षिरसागर, श्री. राजेश विनायकराव (कोल्हापूर उत्तर)	१३	७	६५%
२८६	क्षिरसागर, श्री. संदिप रविंद्र (बीड)	१३	७	६५%
२८७	रिक्त			
२८८	रिक्त			

***

विवरण क्रमांक -७

सन २०२६ च्या विधानसभेच्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील (फेब्रुवारी-मार्च, २०२६) दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त वृतांत

सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६

सकाळी ११.०० वाजता दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर झालेले माननीय राज्यपालांचे अभिभाषण संपल्यावर २० मिनिटांच्या विश्रांतीनंतर विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात दुपारी १२.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या संपूर्ण गीताच्या समूह गायनाने झाला.

त्यानंतर राज्य गीताचे समूह गायन झाले.

१. मुख्यमंत्र्यांनी, श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांचा उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री म्हणून सभागृहास परिचय करून दिला.

२. मुख्यमंत्र्यांनी पुढील शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

"श्री. अजित अनंतराव पवार, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य; श्री.सुरुपसिंग हिऱ्या नाईक, माजी वि.स.स. व माजी मंत्री; डॉ.शालिनीताई वसंतराव पाटील, माजी वि.स.स. व माजी मंत्री; श्री.राज खंगारजी पुरोहित, माजी वि.स.स. व माजी राज्यमंत्री; सर्वश्री. गंगाधर महालप्पा पटने, नीळकंठ चिंतामण फालक, विश्वास रामचंद्र नांदेकर व श्रीमती रुपलेखा खंडेराव ढोरे, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते."

खालील सन्माननीय सदस्यांनी उपरोक्त शोक प्रस्तावावरील आपल्या भावना व्यक्त केल्या -

(१) श्री.भास्कर जाधव, वि.स.स.

(२) श्री.छगन भुजबळ, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

(३) विजय वडेट्टीवार, वि.स.स.

(४) श्री.गुलाबराव पाटील, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री.

(५) श्री.जयंत पाटील, वि.स.स.

(६) श्री.दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(७) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.

(८) श्री.सुनील प्रभू, वि.स.स.

(९) श्री.हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण मंत्री

(१०) डॉ.नितीन राऊत, वि.स.स.

(११) श्री.रोहित पवार, वि.स.स.

(१२) कु.अदिती तटकरे, महिला व बाल विकास मंत्री

(१३) श्री.विश्वजीत कदम, वि.स.स.

(१४) ॲड. आशिष शेलार, माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री

(१५) श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स.

माननीय अध्यक्षांनी देखील उपरोक्त शोक प्रस्तावावरील आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०५ वाजून २ मिनिटांनी, मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित.

मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (अ) (१) सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) दोन तारांकित प्रश्न सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाले.

(३) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सव्वीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. सचिव - १ यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली.

३. श्री. संजय कुटे वि.स.स. यांनी सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य, त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो."

श्री.अर्जुन खोतकर वि.स.स. यांनी उपरोक्त आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास अनुमोदन दिले.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आज मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी व बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी घेण्यात येईल. त्यास अनुसरुन सर्व विधानसभा सदस्यांना असे कळविण्यात येत आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांना आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा द्यावयाच्या असतील त्यांनी त्या GAIS या संगणक प्रणालीवर संपूर्णतः ऑनलाईन पद्धतीने आज मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत द्याव्यात. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या सूचना स्वीकारण्यात येणार नाहीत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.भास्कर जाधव वि.स.स. यांनी, माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावर नापसंती प्रस्ताव देण्याची वेळ वाढवून देण्यात यावी अशी विनंती केली.

नापसंती प्रस्ताव देण्यासाठी वेळ उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत वाढविण्यात येत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

४. (१) नगरविकास राज्यमंत्री यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १३ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५ सभागृहासमोर ठेवला.

(२) कृषी मंत्री यांनी :—

(अ) सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२६ व

(ब) सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२६ सभागृहासमोर ठेवले.

(३) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री यांनी, सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १४ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ सभागृहासमोर ठेवला.

५. मुख्यमंत्र्यांनी, सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर केल्या व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ खंड (३) खाली मिळालेल्या अधिकारात महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्याकरिता सन्माननीय सभागृहाला शिफारस केली.

६. दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या १६ विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी सचिव-१ (कार्यभार) यांनी सभागृहात वाचून दाखविली.

श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी विविध आयुधांद्वारे उपस्थित केलेल्या मुद्यांची उत्तरे संबंधित विभागाकडून वेळेत मिळत नसणे, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्री यांनी यासंदर्भात आढावा घेण्याच्या सूचना दिल्या.

यासंदर्भातील डिजिटलायझेशनचा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबवण्यात येत असून लवकरच तो गो-लाईव्ह झाल्यावर याबाबतची सर्व माहिती सदस्यांना प्राप्त होणार असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

७. माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८ (१) अन्वये खालील सन्माननीय सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित केले.

(१) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(२) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(३) श्री.दिलीप लांडे, वि.स.स.

(४) श्री.चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे, वि.स.स.

(५) श्री.सुनिल प्रभू, वि.स.स.

(६) श्री.राजु खरे, वि.स.स.

(७) श्री.अमित झनक, वि.स.स.

(८) श्री.समाधान अवताडे, वि.स.स.

८. (१) श्री. विजय वडेट्टीवार वि.स.स. यांनी, राज्यात दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४ रोजी अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने विदर्भ व मराठवाड्यातील ११ जिल्हे बाधित झाले असून त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असणे, इ. बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना सभागृहासमोर मांडली.

सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सूचना गंभीर स्वरुपाची असल्यामुळे शासनाने यासंबंधी योग्य निवेदन करावे अशी माननीय अध्यक्षांनी सूचना केली.

आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. विजय वडेट्टीवार वि.स.स. यांनी, शक्तीपीठ महामार्गाकरिता जमिनीची मोजणी सुरू असताना अलाईनमेंट बदलून नवीन टाकल्यामुळे त्याला शेतकऱ्यांनी विरोधी केलेला विरोध यासंदर्भात दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी घडलेली अत्यंत निंदनीय घटना, इ. बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना दिली.

उपरोक्त माहितीची शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

महसूल मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

माननीय अध्यक्षांनी पुढील घोषणा केली.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ पासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनात खालील नमूद मंत्री महोदय आपल्या मूळ विभागाचे कामकाज सांभाळून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विभागाचे विधीमंडळातील कामकाज पाहतील, असे मुख्यमंत्री महोदयांनी कळविलेले आहे.

ॲड. आशिष शेलार - सामान्य प्रशासन विभाग.

तसेच

दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ पासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशनात खालील माननीय उप मुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांनी त्यांच्याकडे कार्यभार असलेल्या विधीमंडळातील कामकाज आपल्या मूळ विभागाचे कामकाज सांभाळून त्या पुढे नेमून दिलेले मंत्री, संबंधित विभागांचे राज्यमंत्री यांच्यासोबत समन्वय ठेवून एकत्रितरित्या हाताळतील, असे प्रस्तावित करून त्याबाबतची परवानगी मागितली होती. माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे कार्यभार असलेल्या नमूद विभागांचे कामकाज नेमून दिलेले मंत्री संबंधीत विभागांच्या राज्यमंत्री यांच्याशी समन्वय ठेवून हाताळण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी अनुमती दिलेली आहे. त्यानुसार विभाग व मंत्री महोदयांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

श्री. दादाजी भुसे - सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

श्री. उदय सामंत – नगरविकास

श्री. शंभूराज देसाई – गृहनिर्माण

श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी सभागृहातील कामकाजाच्या कार्यपद्धतीबाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी उक्त मुद्याबाबत आपले मत मांडले.

सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी याबाबत खुलासा केला.

मा. अध्यक्षांनी भारताच्या संविधानातील अनुच्छेद १६४(२) अन्वये मंत्रिमंडळ सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार असल्याने संबंधित मंत्री, इतर मंत्री किंवा माननीय मुख्यमंत्री ते उत्तर देऊ शकतील. ही संपूर्ण मंत्रिमंडळाची जबाबदारी असल्याने सभागृहाच्या मान्यतेनंतर कोणताही मंत्री उत्तर देऊ शकेल असे स्पष्ट केले.

९. (१) श्री. धनंजय मुंडे वि.स.स. यांनी, "बीड जिल्ह्यातील माजलगाव, केज येथे अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरु करून शेतकऱ्यांना मदत देण्याची आवश्यकता." इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

महसूल मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

(२) श्री.अभिमन्यू पवार वि.स.स. यांनी, "सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी अवकाळी पावसामुळे निलंगा तालुक्यातील बामणी, धानोरा, मदनसुरी, यलमवाडी, भूतमुगळी, आनंदवाडी, लिंबाळा आणि भंगारचिंचोली या गावांमधील तसेच औसा तालुक्यातील किल्लारी, मातोळा आणि लामजना महसुली मंडळांमध्ये हलका आणि मध्यम स्वरुपाचा पाऊस होऊन पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

महसूल मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

(३) श्री.विजय वडेट्टीवार वि.स.स. यांनी, "दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य श्री.साजिद खान पठाण यांना लॉरेन्स बिश्नोई गँगच्या शुभम लोणकर याने आंतरराष्ट्रीय नंबरवरुन फोन करून १० कोटी रुपयांची मागणी करून जीवे मारण्याची धमकी दिलेली असणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी मांडलेली माहिती अत्यंत गंभीर स्वरुपाची असल्यामुळे शासनाने याची नोंद घेऊन उचित उपाययोजना करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(४) श्री.अस्लम शेख वि.स.स. यांनी, "दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ रोजी बदलापूर येथे स्त्री-बिजाची बेकायदेशीररित्या तस्करी करणाऱ्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झालेला असून एका घरातून चालविल्या जाणाऱ्या या काळ्या धंद्यामध्ये महिलांना धोकादायक इंजेक्शन देऊन डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय स्त्री-बिजावर विविध प्रयोग केले जात असणे, त्यामुळे या प्रकरणी संबंधित डॉक्टरचा परवाना रद्द करून इतर संबंधितांवर देखील कठोर कारवाई करण्याची आवश्यकता," इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

१०. (१) सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते, बबनराव यादव (लोणीकर), रामदास मसराम, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना :—

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राज्य शासनाच्या दिनांक २५ मार्च, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी २० हजार पर्यंत बोनस जाहीर करणे, धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर करून शासनाने आर्थिक संकटातून मुक्त करणे, सन २०२५ मधील सप्टेंबर व आक्टोंबर या महिन्यात अवकाळी पावसामुळे पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठे

आर्थिक नुकसान होणे, धान उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याने त्यांना बोनस जाहीर करणे अत्यंत आवश्यक असणे, नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करावा अशी राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांकडून मागणी होणे, माहे सप्टेंबर व आक्टोंबर, २०२५ दरम्यान अवकाळी पावसामुळे झालेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचा व आर्थिक संकटाचा विचार करून धान उत्पादन शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार बोनस जाहीर करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री.धनंजय मुंडे, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील महामार्गांवर चालविण्यात येत असलेल्या खाजगी स्लीपर कोच बसेसना वारंवार लागणारी भीषण आग व त्यामुळे निष्पाप प्रवाशांचे होरपळून होणारे मृत्यू, या कारणास्तव राज्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर झालेला असणे, दिनांक २ जानेवारी, २०२६ रोजी समृद्धी महामार्गावर मुंबईहून बुलढाण्याकडे जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सला आग लागून बस पूर्णतः जळून एका प्रवाशाचा मृत्यू होणे व बसमधील ३२ प्रवासी थोडक्यात बचावणे, यापूर्वी स्लीपर बसला आग लागून माहे जुलै २०२३ मध्ये सिंदखेडराजा येथे २५ प्रवाशांचा, माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये १२ प्रवाशांचा मृत्यूच्या घटना घडलेल्या असणे, अशा घटना वारंवार घडत असूनही ठोस सुरक्षा उपाययोजना झालेली नसणे, चीन-युरोपातील अनेक देशांमध्ये सुरक्षेच्या कारणास्तव स्लीपर कोचवर बंदी असताना महाराष्ट्र राज्यात मात्र निकृष्ट दर्जाची अंतर्गत वायरिंग, आपत्कालीन परिस्थिती बाहेर पडण्याच्या व्यवस्थेचा अभाव, तातडीचा इशारा देणारी यंत्रणा अपुरी असतानाही या बसेस राजरोसपणे चालविण्यात येत असणे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून बसेसच्या सुरक्षा मानकांबाबत होणारे अक्षम्य दुर्लक्ष, चालकांच्या बेफाम वेगामुळे प्रवाशांचे प्राण धोक्यात येत असूनही प्रशासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने या सर्व घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून बसेसच्या अंतर्गत संरचनेत बदल करण्याचे बंधनकारक नियम लागू करावेत आणि परदेशातील धर्तीवर

राज्यात स्लीपर कोचवर बंदी किंवा अत्यंत कठोर सुरक्षा मानके लागू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

परिवहन मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री सुनिल प्रभू, चेतन तुपे, राजकुमार बडोले, प्रतापराव पाटील चिखलीकर, अनिल पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. राजेश विटेकर, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री. शंकर मांडेकर, संजय केळकर, सुभाष देशमुख, वि.स.स. वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना :—

श्री. सुनिल प्रभू वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत गत वर्षी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ पासून राज्यव्यापी कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेअंतर्गत ३ कोटी ५ लाख नागरिकांची तपासणी केल्यानंतर त्यातून ४१ हजार १६९ संशयीत कर्करुग्णांची नोंद झालेली असणे, तसेच बायोप्सी झाल्यानंतर १६७७ जणांना कर्करोगाचे निदान झाले असून ४१६ रुग्णांवर सार्वजनिक आरोग्य संस्थांमार्फत उपचार करण्यात येत असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास येणे, मुंबई हे शहर फुफ्फुस कर्करोगाचे हॉटस्पॉट बनले असून केवळ धुम्रपान करणाऱ्यांपुरता हा रोग मर्यादित राहीला नसून शहरातील विषारी हवेमुळे नॉनस्मोकर्सही या रोगाला बळी पडले असणे, मुंबईतील आकडेवारीनूसार फुफ्फुस कर्करोगाच्या रुग्णांमध्ये ५७% ॲडेनोकार्सिनोमा, २८% स्क्वॅमस सेल कार्सिनोमा आणि १६% स्मॉल सेल कार्सिनोमा आढळून येणे, निदान झालेल्या कर्करुग्णांमध्ये मुख, गर्भाशय व स्तनाशी सबंधित सर्वाधिक रुग्णांची नोंद करण्यात येणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात वाढते कर्करोगाचे प्रमाण रोखण्यासाठी, शासनाने टाटा या खाजगी रुग्णालयसह शासकीय रुग्णालयांना देखील आवश्यक निधी तातडीने मंजूर करून औषधोपचार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक आरोग्य मंत्री व कुटुंब कल्याण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

११. माननीय अध्यक्षांनी, राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व त्यानंतर सदर प्रस्तावावर चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. संजय कुटे

चर्चा अपूर्ण..

श्री. रवि राणा, वि.स.स. यांनी, "धारणीतील मेळघाट भागामध्ये शिवझरी घाटामध्ये आदिवासी कुटुंब बाजार करायला जात असताना घाट कोसळल्यामुळे पाच जणांचा मृत्यू झालेला असून १५ जण जखमी झालेले असणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने सदर मुद्याबाबत नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री.अर्जुन खोतकर (३) श्री. चेतन तुपे

(४) श्री. भास्कर जाधव (५) श्री. विजय वडेट्टीवार (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण..)

१२. (क) पुरः स्थापनार्थ –

पर्यटन मंत्री यांनी पुढील विधेयके सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केली.

(१) सन २०२६ चे वि.स. वि. क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६.

(२) सन २०२६ चे वि.स. वि. क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६.

१३. सर्वश्री रणधीर सावरकर व इतर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव- श्री. रणधीर सावरकर वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले—

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक

स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri २०२६' ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. प्रविण स्वामी
(२) श्री. अनिल ऊर्फ बाळासाहेब मांगुळकर
(३) श्रीमती सुलभा खोडके
(४) डॉ. बाबासाहेब देशमुख
(५) श्री. राजेश बकाने
(६) श्री. अभिजित पाटील
(७) श्री. हेमंत ओगले

चर्चा अपूर्ण.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०७ वाजून ०७ मिनिटांनी बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) सहा तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नांच्या यादीतील पंचवीस हे प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा दिनांक ३१ मार्च, २०२४ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) कृषी राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. श्री. अर्जुन खोतकर, समिती प्रमुख यांनी, अंदाज समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर केला.

४. माननीय अध्यक्षांनी, आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे सांगितले.

माननीय अध्यक्षांनी, आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक २ पुढे ढकलण्यात येत असल्याचे सांगितले.

५. (१) सर्वश्री. अतुल भातखळकर, काशिनाथ दाते, सुधीर मुनगंटीवार, अबू आझमी, गोपिचंद पडळकर, सुरेश धस, वि.स.स., यांची लक्षवेधी सूचना,—

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याला खासगी सावकारांनी कर्जाच्या विळख्यात ओढून परदेशातील कंबोडियात जाऊन त्याची किडनी विकण्यास भाग पाडल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, संबंधित शेतकऱ्याने ब्रह्मपुरी येथील एका सावकाराकडून एक लाख रुपये व्याजाने घेतलेले असता संबंधित सावकाराने अवाजवी व्याज आकारल्याने १ लाखाची रक्कम ७४ लाखावर जाणे, मात्र नापीक जमीन असल्यामुळे कर्ज फेडणे शक्य न झाल्याने शेतकऱ्याने आपली जमीन

व मोटरसायकल विकूनही कर्ज न फिटल्याने शेवटी परदेशातील कंबोडियात जाऊन त्याची एक किडनी विकल्याचे वैद्यकीय अहवालातून उघडकीस येणे, चंद्रपूर आणि नागभीड परिसरातून निदर्शनास आलेल्या किडनी रॅकेट प्रकरणाचे संबंध दिल्ली, तामिळनाडू आणि पंजाबपर्यंत पसरले असल्याचे तसेच यामध्ये कंबोडियासारख्या परदेशातील रुग्णालयांचा सहभाग असल्याचे उघड होणे, राज्यात सहकारी संस्था, पतपेढ्या, राष्ट्रीय बँका यांची मोठया प्रमाणात सुविधा असतानाही खासगी परवानाधारक सावकारांच्या संख्येत वाढ झालेली असणे, या सावकारांविरुद्ध राज्य शासनाने सावकारी प्रतिबंधक कायदा, मानवी अवयव तस्करी प्रतिबंधक कायदा व इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता, राज्यातील ग्रामीण भागात फोफावलेली अवैध सावकारी मोडून काढण्यासाठी आणि गरीब शेतकऱ्यांना या किडनी रॅकेटपासून वाचवण्यासाठी विशेष तपास पथकांमार्फत (SIT) राज्यव्यापी कारवाई मोहीम राबवण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. हेमंत ओगले, अमित विलासराव देशमुख, रोहित पवार वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना,—

डॉ. जितेंद्र आव्हाड , वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले:-

"राज्यात मुलींच्या जन्मदरामध्ये वाढ व्हावी यासाठी लेक लाडकी, माझी कन्या भाग्यश्री, सुकन्या समृध्दी योजना यांसारख्या अनेक योजना असतानाही १ हजार पुरुषांमागे महिला जन्मदराचे प्रमाण ८७० ते ८९४ असल्याची बाब दिनांक ९ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास आलेली असणे, गर्भधारणापूर्व, प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा असतानाही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात मुलींच्या जन्माचे स्वागत होत नसल्याचे दिसून येणे, राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणामध्ये महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यांत लेक नकोशी असल्याची गंभीर माहिती उघडकीस येणे, मुलगी म्हणजे ओझे, जबाबदारी, घराण्याची अप्रतिष्ठा या पारंपरिक जोखडातून महाराष्ट्र अजूनही बाहेर पडलेला नसल्याची बाब राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात नोंदवलेल्या मुलींच्या घटत्या जननदरांवरुन दिसून येणे, गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा पारित करणारे महाराष्ट्र हे जगातील पहिले राज्य असतांनाही सदरचे कायदे डावलून शहरी, निमशहरी आणि महानगरांमध्ये गर्भलिंग निदान व गर्भपात केंद्रे प्रशासकीय व्यवस्थेच्या आशीर्वादाने राजरोसपणे सुरु असणे, महाराष्ट्रात ५४ हजारपेक्षा जास्त मुली गर्भातच मारल्या

जात असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून कार्यवाही करण्याची सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचेकडे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार मागणी करणे, या प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई व याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यात महिला जन्मदराचे प्रमाण चिंताजनक पातळीवर असल्याने या प्रकरणी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६. (अ) वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि.क्रमांक ३- महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(ब) (१) सन २०२६ चे वि.स.विधेयक क्रमांक १- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा)विधेयक, २०२६.

अध्यादेश नापसंत करण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

नगर विकास राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.विधेयक क्रमांक १- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, श्री. साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव अनुक्रमे मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

७. वित्त राज्यमंत्र्यांनी, "राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यामध्ये ३ टक्के वाढ देणे" इ.बाबत म.वि.स.नियम ४६ अन्वये निवेदन केले.

८. उपरोक्त प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. विजय वडेट्टीवार (भाषण पूर्ण) (२) डॉ. अतुलबाबा भोसले

(३) श्री. सुनिल प्रभू (४) श्री. जयंत पाटील

(५) श्री. निलेश राणे (६) श्री. अमिन पटेल

(७) श्री. शेखर निकम (८) डॉ. विनय कोरे

(चर्चा अपूर्ण)

(ब) सन २०२६ चे वि.स.विधेयक क्रमांक २- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६.

अध्यादेश नापसंत करण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

ग्रामविकास मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.विधेयक क्रमांक २- - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, श्री. साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव अनुक्रमे मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

उपरोक्त प्रस्ताव पुनः प्रस्तुत झाला—

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

९) श्रीमती नमिता मुंदडा
१०) श्री. दिलीप लांडे
११) श्री. वरूण सरदेसाई
१२) श्री. चंद्रकांत उर्फ राजूभैया नवघरे
१३) श्री.अभिजीत पाटील
१४) डॉ.नितीन राऊत
१५) श्री.अबु आझमी
१६) श्रीमती मनिषा चौधरी
१७) श्री.उमेश उर्फ चंदू यावलकर
१८) श्री.आनंद तिडके
१९) श्री.राजकुमार बडोले
२०) श्री.बापूसाहेब पठारे
२१) डॉ. बाबासाहेब देशमुख
२२) श्री. देवराव भोंगळे
२३) श्रीमती मंजुळा गावित
२४) श्री. हिरामण खोसकर
२५) श्री. महेश सावंत
२६) श्रीमती स्नेहा दुबे-पंडित
२७) श्री. आमश्या पाडवी
२८) श्री. संजय मेश्राम
२९) श्री. नारायण कुचे
३०) श्री. शिवाजी पाटील
३१) श्री. सिद्धार्थ खरात
३२) श्रीमती सीमा हिरे
३३) श्री. विश्वजीत कदम
३४) श्री. चरणसिंह ठाकूर
३५) श्री. प्रवीण स्वामी
३६) श्री. सिद्धार्थ शिरोळे
३७) श्री. हेमंत ओगले
३८) श्री. किसन वानखेडे
३९) श्री. रोहित पाटील
४०) श्रीमती सुलभा गायकवाड
४१) श्री. मनोज जामसुतकर
४२) श्री. संजय उपाध्याय
४३) डॉ.ज्योती गायकवाड
४४) श्री.नरेंद्र कोठे
४५) श्री. अनंत (बाळा) नर
४६) श्री. संजय देवकर
४७) श्री. गजानन लवटे
४८) श्री.बाबाजी काळे

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक रात्रौ ११ वाजून १० मिनिटींनी गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ च्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (अ) सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(ब) आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील सव्वीस तारांकित प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. समितीप्रमुख (श्री. चंद्रदीप नरके) यांनी, शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात मागील प्रलंबित अशासकीय विधेयक तसेच बॅलटमधील पारस्परिक प्राथम्यक्रमानुसार ठरविण्यात आलेल्या अशासकीय विधेयकांना वेळ नेमून देणारे अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले व ते संमत करावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

माननीय तालिका सभाध्यक्ष यांनी पुढील घोषणा केली,–

"दरवर्षी दिनांक २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन" म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. विद्यमान अर्थसंकल्पीय अधिवेशनात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून जावे विनोदाच्या गावा* या कार्यक्रमाचे शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते ११.४५ या वेळेत मध्यवर्ती सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. माननीय पीठासीन अधिकारी, माननीय मुख्यमंत्री, दोन्ही माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्य मंत्री, माननीय मराठी भाषा मंत्री, मराठी भाषा समितीचे समिती प्रमुख, माननीय मंत्री/माननीय राज्यमंत्री, दोन्ही सभागृहांचे सन्माननीय सदस्य व पत्रकार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे संपादित "लोकसेवेचा लोकजागर" या ग्रंथाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे."

३. (१) सर्वश्री हारून शेख व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. हारून खान, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"पुणे येथील शासकीय ससून रुग्णालयातून १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या पॉक्सो या गंभीर गुन्ह्यात अटकेत असलेल्या एका आरोपीने एमआयसीयू वार्डच्या बाथरूमची काच तोडून पलायन केल्याची घटना दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी उघडकीस

आली असणे, एमआयसीयू हा अतिसंवेदनशील विभाग असताना आरोपी पलायनाच्या वेळी तेथे तैनात पोलीस बंदोबस्त, सुरक्षा रक्षक व सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत नसल्यामुळे ही चूक घडल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, ससून रुग्णालयातून यापूर्वीही ड्रग्ज प्रकरण, मर्डर प्रकरण व इतर विविध गुन्ह्यातील आरोपींनी पलायन केल्याच्या पार्श्वभूमीवर ससून रुग्णालय हे आरोपींसाठी 'सेफ पॅसेज' ठरत असल्याची बाब समोर येणे, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून पॉक्सो सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीच्या पलायनास जबाबदार असलेल्या पोलीस व रुग्णालय प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ससूनसह राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये आरोपी रुग्णांसाठी स्वतंत्र उच्च सुरक्षा व्यवस्था लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत क्रमांक ३ वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांपैकी दुसरी व दुसरी लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आले असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

४. (अ) वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

५. वित्त राज्यमंत्र्यांनी, म.वि.स. नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला,–

"पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

६. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभागांच्या मागण्या म्हणजे एम-२, ओ-३, ओ-७, आर-१ चर्चेसाठी सभागृहाला सादर करण्यात आल्या.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

माननीय अध्यक्षांनी, अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व या मागण्यांवर कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहित धरून आता चर्चेला प्रारंभ होईल, असे सांगितले.

मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. नितीन राऊत (२) श्री. प्रवीण दटके

(३) श्री. अर्जुन खोतकर (४) श्री. जयंत पाटील

(चर्चा अपूर्ण)

७. राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (मुख्यमंत्र्यांचे उत्तर)

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी, "या अधिवेशनात अधिकाधिक लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आणण्याची आवश्यकता," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. जयंत पाटील, वि.स.स. यांनी, "राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य श्री. साजिद पठाण यांना बिष्णोई गँगच्या गुंडाकडून फोन येणे आणि १० कोटी रुपयांच्या खंडणीची केलेली मागणी," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांनी, सदर गुंड देशाबाहेर असून त्याला शोधण्याचे काम सुरू आहे, तसेच सदस्यांच्या सुरक्षिततेचे आदेश दिले असल्याचे सांगितले.

श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी, "जास्तीत जास्त लक्षेवधी सूचना आणि औचित्याचे मुद्दे घेणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, "गेल्या आठवड्यामध्ये डोंगरीपाडा, पाटलीपाडा या वस्त्यांना निष्कासित करण्याच्या नोटीस येणे, परिणामी तेथील नागरिक हतबल झाले असून याबाबत शासनाने लक्ष घालावे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(५) श्री. सुनील प्रभु (६) श्री. मुरजी (काका) पटेल

(७) श्रीमती सुलभा खोडके

(चर्चा अपूर्ण)

श्री. बाबाजी काळे, वि.स.स. यांनी, "भीमाशंकर या ज्योतिर्लिंगासोबत ता. खेड असा शासकीय कागदपत्रांमध्ये उल्लेख करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी, असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

नोंद घेण्यात आल्याचे आदिवासी विकास मंत्र्यांनी सांगितलं.

मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(८) श्री. बबनराव यादव (लोणीकर) (९) श्रीमती रंजनाताई जाधव

(१०) श्री. संदीप क्षीरसागर (११) श्री. विकास ठाकरे

(१२) श्री. अनंत (बाळा) नर (१३) डॉ. आशिष देशमुख

(१४) श्रीमती नमिता मुंदडा (१५) श्री. हिरामण खोसकर

(१६) श्री. चंद्रदीप नरके (१७) श्री. अबु आझमी

(१८) श्री. विठ्ठल लंघे (१९) श्री. अनुपभैय्या अग्रवाल

(२०) श्री. नीलेश राणे (२१) डॉ. बाबासाहेब देशमुख

(२२) श्री. संजय मेश्राम (२३) श्री. रईस शेख

(२४) श्रीमती मनिषा चौधरी (२५) श्री. विजयबापू शिवतारे

(२६) श्री. रामदास मसराम (२७) कॅप्टन तमील सेल्वन

(२८) श्री. बालाजी कल्याणकर (२९) श्री. अनिल उर्फ बाळासाहेब मांगुळकर

(३०) श्री. राजेश पवार (३१) श्री. अमोल खताळ

(३२) श्री. विनोद निकोले (३३) श्री. कैलास घाडगे-पाटील

(३४) श्री. हेमंत ओगले (३५) श्री. राजू तोडसाम

(चर्चा अपूर्ण)

(ब) गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी, सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ - महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२५ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(३६) श्री. सुधीर मुनगंटीवार
(३७) श्री. अमोल जावळे
(३८) श्री. करण देवतळे
(३९) श्री. बाबुराव कदम-कोहळीकर
(४०) श्री. सिद्धार्थ शिरोळे
(४१) श्रीमती श्वेता महाले
(४२) श्री. सत्यजीत देशमुख
(४३) श्री. प्रवीण स्वामी
(४४) श्री. विलास भुमरे
(४५) श्री. राजेश बकाने
(४६) श्री. देवराव भोंगळे
(४७) श्री. श्याम खोडे
(४८) श्री. गोपीचंद पडळकर
(४९) श्री. आमश्या पाडवी
(५०) श्री. किसन वानखेडे
(५१) श्री. अमित झनक
(५२) श्री. चरणसिंग ठाकूर
(५३) श्री. बाबाजी काळे
(५४) श्रीमती मंजुळा गावित
(५५) श्री. सिद्धार्थ खरात
(५६) श्री. विक्रम पाचपुते

वित्त व नियोजन राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण राज्यमंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविलेल्या क्र. ४, ५, ७ आणि ११ वरील अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

८. (१) श्री.सुनील प्रभु, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"मुंबईतील बोरिवली (पूर्व), संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेतील २५,१४४ आदिवासी व अतिक्रमित झोपडीधारकांचे पुनर्वसन करून अतिक्रमणे निष्कासित करण्याचे दि. ७-५-१९९७ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतानाही अद्याप याबाबत २८ वर्षे इतका कालावधी होऊनही २५,१४४ पैकी १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सदरहू झोपडीधारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत अवस्थेत असणे, एकूण पात्र झोपडीधारकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएस क्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेतील रु. ७०००/- शुल्क भरलेल्या पात्र झोपडीधारकांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, शासनाचे वन विभागाचे व एसआरए प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसनासाठी निश्चित केलेली आरे वसाहतीतील वन क्षेत्राची ९० एकर जागा ही संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने दि. ५-१२-२०१६ रोजी शासन निर्णय जारी केला असल्याची माहिती लपवून सदरहू ९० एकर जागेत झोपडीधारकांचे एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचा धक्कादायक निर्णय घेणे, संजय गांधी उद्यान हे मुंबईचे ऑक्सीजन स्त्रोत असून ते अतिक्रमण मुक्त करण्यास २८ वर्षे कालावाधी पूर्ण होऊनही ठोस कृती न झाल्याने शासनावर गंभीर ताशेरे ओढून उद्यान अतिक्रमण मुक्त करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दि. १४-१-२०२५ रोजी शासनास आदेश देणे, त्यानुसार शासनाने उर्वरित १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी कृती आराखडा तयार करून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. सत्यजीत देशमुख, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण/अभयारण्य परिक्षेत्रातील गावांचे पुनर्वसन सन १९७८ ते २००० या कालावधीत सांगली, कोल्हापूर या ठिकाणी करण्यात येऊनही प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही नागरी सोयी सुविधा उपलब्ध न केल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणाच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाण जमीन देण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात येणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना त्यांच्या मूळ गावातील घरांची आणि जमिनींची नुकसान भरपाई देऊन सरकारने जमीन व घरांचे संपादन

करून नुकसान भरपाई पोटी देण्यात आलेल्या रक्कमेतून शासनाने प्रकल्पग्रस्तांची मूळ जमीन संपादन करताना ६५ टक्के रक्कम कापून घेण्याबरोबरच पुनर्वसनासाठी पात्र होण्यासाठीची पुनर्वसन कायद्याची ११ ते १४ कलमे लागू करावी लागतात ती केलेली नसणे, प्रकल्पग्रस्त पुनर्वसनासाठी पात्रच होऊ न शकणे, प्रकल्पग्रस्तांनी वारंवार मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, वने मंत्री तसेच लोकप्रतिनिधीं, जिल्हाधिकारी कार्यालय व उप वन संरक्षक यांच्याकडे निवदने, आंदोलने करून सुध्दा त्यांना अद्यापी न्याय मिळालेला नसणे, उपरोक्त गंभीर प्रकारामुळे चांदोली धरणग्रस्त/अभयारण्य प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती प्रचंड नाराजी व असंतोषाची भावना निर्माण होणे, या गंभीर प्रकरणी चौकशी करुन, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायद्यातील कलम ११ ते १४ लागू करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देऊन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन, मोबदला व सर्व सोयी सुविधांची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

वने मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"बल्लारपूर शहर हे ऐतिहासिक, सांस्कृतिक तसेच वनसंपदा दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून, विशेषतः उच्च दर्जाच्या सागवानी लाकडासाठी संपूर्ण देशात सुप्रसिध्द असणे, पौराणिक मान्यतेनुसार प्रभू श्रीरामचंद्रांचे आजोळ बल्लारपूर येथे असल्याचे उल्लेख आढळणे, प्रभू श्रीरामचंद्राच्या मंदिरासाठी वापरण्यात आलेले अतिशय मौल्यवान सागवान लाकूड बल्लारपूर परिसरातूनच पुरविण्यात येणे, सन १९५८ मध्ये बल्लारपूर येथे कोसळलेल्या एका भव्य व दुर्मिळ सागवान वृक्षाचा बुंधा आजही जतन करून ठेवण्यात आलेला असून, त्या वृक्षास तत्कालीन काळात "राम-लक्ष्मण" असे नाव देण्यात येणे, या ऐतिहासिक वारशाच्या स्मरणार्थ बल्लारपूर येथे सध्या एक लघु वुड म्युझियम अस्तित्वात असणे तसेच बल्लारपूर टिंबर डेपो हा आशिया खंडातील सागवानाचा सर्वात मोठा टिंबर डेपो म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखला जात असणे, वरील ऐतिहासिक, औद्योगिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेता, बल्लारपूर टिंबर डेपो येथे महाराष्ट्रातील सर्वप्रथम व एकमेव असे "टिंबर म्युझियम व झायलरियम स्थापन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"नांदाफाटा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथे असलेल्या अल्ट्राटेक, माणिकगड सिमेंट कंपनीव्दारे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याची तक्रार नागरिकांनी शासनाकडे वारंवार करणे, सदर कंपनीच्या परिसरामध्ये प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या मशिनरी अकार्यक्षम असणे, प्रदूषण कमी करण्याबाबत या भागातील नागरिकांनी आंदोलने, मोर्चे काढून आपली तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा कोणतीही कारवाई न होणे, कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाने पर्यावरण प्रदूषण विषयक प्रकरणे पूर्णपणे दाबली जात असल्याची बाब समोर येणे, कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांना क्षयरोग, कर्करोग, श्वसनाचे रोग, चर्मरोग सारखे आजार झाले असल्याची बाब समोर येणे, या कारखान्यातून निघणारे सांडपाणी उघड्या मार्गाव्दारे विविध नदी व नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या समोर येणे, सदर कारखान्याच्या प्रदूषणाला दरवर्षी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाकडून प्रदूषण होत नसल्याची क्लिनचीट मिळत असणे, सदरहू बाब गंभीर असल्याने या कारखान्यांवर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले.,—

"दौंड (पुणे) तालुक्यातील श्री शंभो महादेव देवस्थान,राहू व श्री भानोबा मंदिर देवस्थान कुसेगाव यांना "ब" वर्ग देवस्थानाचा दर्जा मिळणे."

ग्रामविकास मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक रात्री ९ वाजून ३५ मिनिटांनी शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात दुपारी १२.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. माननीय अध्यक्षांनी सभागृहाला 'मराठी गौरव दिनाच्या' शुभेच्छा दिल्या.

१. (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सव्वीस तारांकित प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील एका अल्पभुधारक शेतकऱ्याला खासगी सावकाराने कर्जाच्या विळख्यात ओढून कंबोडियात जाऊन त्याची किडनी विकण्यास भाग पाडल्याबाबत लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी खोटी माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल करणे" या विषयाबाबत श्री.विजय वडेट्टीवार यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांना यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी उपरोक्त सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत विचार करून उचित निर्णय घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

३. (१) सर्वश्री. सुनिल कांबळे, भिमराव तापकीर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना,–

श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले :–

"पुणे शहरामध्ये वाढत्या लोकसंख्येच्या व रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर आयसीयू बेडची उपलब्धता अपुरी असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, शासकीय व खासगी रुग्णालयांमधील विद्यमान आयसीयू क्षमतेच्या तुलनेत गंभीर रुग्णांची संख्या अधिक असल्याने उपचारांसाठी प्रतीक्षा करावी लागण्याची स्थिती निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले असणे, सदर परिस्थितीमुळे आपत्कालीन उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना तातडीने आयसीयू सेवा उपलब्ध होण्यात अडथळे निर्माण होत असून रुग्णांचे नातेवाईकांना विविध रुग्णालयांमध्ये आयसीयू सेवा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावे लागणे, परिणामी आरोग्य व्यवस्थेवर अतिरिक्त ताण येत असून नागरिकांमध्ये अस्वस्थता व असुरक्षिततेची भावना निर्माण होत असणे, वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची क्षमता वाढवून शासकीय रुग्णालयांमध्ये

आयसीयू बेडची संख्या वाढविण्याची आवश्यकता, अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच आवश्यक मनुष्यबळ व वैद्यकीय उपकरणांची पूर्तता करण्याची आवश्यकता, सदरहू बाब विचारात घेऊन नागरिकांना वेळेवर व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनस्तरावर आवश्यक नियोजनात्मक व प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. मुरजी पटेल, रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना,—

श्री.मुरजी पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले :–

"मुंबईमधील अंधेरी पूर्व व अंधेरी पश्चिमला जोडणारा अंधेरी सबवे हा एकमेव मार्ग असून दर पावसाळ्यात सदरचा सबवे पाण्यात पूर्णपणे जात असणे, किंबहुना सबवेमध्ये पाणी साचत असणे, त्यामुळे अंधेरी पूर्व व अंधेरी पश्चिमेला जोडणारा एकमेव मार्ग बंद होत असल्याने प्रचंड प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असणे, अपघात होत असल्यामुळे नागरिकांची व प्रवाशांची सततची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असणे, सदरच्या गंभीर समस्यांबाबत प्रत्येक अधिवेशनात चर्चा होऊन त्यावर मार्ग काढण्यात येईल असेच आश्वासन मिळणे, परंतु आश्वासन पाळण्यात शासनाला येत असलेले अपयश, यामुळे जनमानसात तीव्र संतापाची निर्माण होत असलेली भावना, यामुळे अंधेरी सबवेबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याची नितांत असलेली आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री. विक्रम पाचपुते, प्रविण दटके, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना,—

श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील लग्नसमारंभ, धार्मिक कार्यक्रमांमध्ये कृत्रिम फुले, प्लास्टिक फुगे व कमी दर्जाच्या प्लास्टिक खेळण्यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असणे, नैसर्गिक फुलांचा तुटवडा असल्याने या वस्तूंना पर्यायी मागणी असून त्याचा मानव आरोग्य, पर्यावरण, प्राणी-पक्षी आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत असणे, रसायनांचे

वायू उन्हामुळे बाहेर पडून डोकेदुखी, त्वचाविकार, खाज, लालसरपणा, डोळ्यांची जळजळ, लहान मुलांमध्ये श्वसनाचे त्रास, प्लास्टिक व रंगातील दीर्घकालीन रसायनांमुळे कर्करोगासारख्या धोक्याची शक्यता संशोधनात अधोरेखित होत असणे, पशुधनावरील धोका, गाई, म्हशी व इतर पाळीव प्राण्यांच्या तोंडात कृत्रिम फुले/खेळणी गेल्यास आतड्याचे विकार, पचनसंस्था बंद पडणे, पर्यावरणीय हानी, डास-माशांचा प्रादुर्भाव वाढत असणे, कमी दर्जाच्या किंवा विषारी रसायनयुक्त प्लास्टिक फुले/फुगे/खेळण्यांवर तातडीने बंदी अथवा कठोर नियंत्रण घालण्याची आवश्यकता, पर्यावरण विभागाकडून गुणनियंत्रण तपासणी अनिवार्य करणे, लग्न व कार्यक्रमस्थळी वापरल्या जाणाऱ्या सजावटीच्या वस्तूंसाठी नॉन-टॉक्सिक प्रमाणपत्र सक्तीचे करणे, तपासणी व अंमलबजावणी करणे, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी बाजारातील अशा वस्तूंची नमूना तपासणी करणे, अनधिकृत उत्पादनांवर दरडोई दंड व जप्ती याची स्पष्ट कार्यवाही सूचना देणे, जनजागृती व पर्यायी प्रोत्साहन, नागरिकांना नैसर्गिक फुले, पुनर्वापर योग्य सजावट, फॅब्रिक डेकोरेशन यांचा वापर करण्यास प्रोत्साहन, नैसर्गिक फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन, अनुदान व बाजारपेठ उपलब्ध करणे, कार्यक्रमस्थळी व विवाह हॉलमध्ये प्लास्टिक सजावट वापरबंदीचे बोर्ड व दंडात्मक तरतुदी लागू करणे, वैज्ञानिक अहवाल व धोरण याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(चर्चा अपूर्ण)

श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, "माझ्या मतदारसंघातील जेबीसीएन इंटरनॅशनल स्कुल आणि विबग्योर हायस्कुल यांच्या प्रिन्सिपलला शाळेत बॉम्ब ठेवल्याचा मेल आलेला असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सदर बाबीची तपासणी केली जाईल आणि मेल पाठविणाऱ्यांना पकडण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सर्वश्री विक्रम पाचपुते व इतर वि.स.स. यांनी, "पर्यावरणास हानी पोहोचवणाऱ्या कमी दर्जाच्या किंवा विषारी रसायनयुक्त प्लास्टिक फुले/फुगे/खेळणी अशा साहित्यांवर तातडीने बंदी घालून नियमांची कठोर अंमलबजावणी करणे" या संबंधी दिलेली लक्षवेधी सूचना - चर्चा पुढे सुरु

(चर्चा पूर्ण)

(४) श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले,–

"नागपूर जिल्ह्यातील उमरेड-मोहपा मार्गावर दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी मुलीच्या बारावी परीक्षेसाठी दुचाकीवर निघालेल्या सुभाष भिवणकर व त्यांची मुलगी यांना ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू होणे, धुरखेडा ग्रामपंचायत अंतर्गत कुंभारी, मोहपा या परिसरात मोठ्या प्रमाणावर गिट्टी खदानी असल्याने या रस्त्यावर दिवसभर ट्रक, टिप्पर व ट्रॅक्टर इत्यादी अवजड वाहनांची वाहतूक सुरू असणे, अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे होणे, रस्त्यावरील उखडलेली गिट्टी व उडणारी धूळ यामुळे प्रवास जीवघेणा ठरत असून उमरेड-मोहपा हा मार्ग धोकादायक झालेला असणे, या मार्गावरील जड वाहतूक तात्काळ बंद करून या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी व अवैध वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याबाबत अनेक वर्षापासून स्थानिक नागरिक व ग्रामस्थानकडून होत असलेली मागणी, यासंदर्भात वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याने शासनाबाबत ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, "सीसीआयचा कापूस खरेदी हमीभाव प्रति क्विंटल ८ हजार ७० रूपये असताना व्यापाऱ्यांकडून कापूस खरेदी प्रति क्विंटल ७ हजार २०० रूपये दराने सुरू असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. अर्जून खोतकर, वि.स.स. यांनी, "कापूस पिकाप्रमाणेच मका पिकांची सुद्धा विक्री केंद्रे सूरू करण्याची आवश्यकता" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने उचित कार्यवाही करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त मुद्याची कृषि मंत्र्यांनी दखल घेतली.

(३) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. यांनी, "काल लोकशाही वृत्त वाहिनीवर मुंबईच्या मालवणी भागात गायींची कत्तल करून गोमांस विक्री केली जात असल्याचे प्रकरण उघड करण्यात आले असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी, "पिंपरी-चिंचवड येथील भोसरी भागात मागच्या महिन्यांपासून आंध्र धरणातून दुर्गंधीयुक्त आणि अस्वच्छ पाणीपुरवठा केला जात असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने उचित कार्यवाही करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

४. आता शालेय शिक्षण विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग आणि दिव्यांग कल्याण विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक (१) शालेय शिक्षण विभाग - अनुक्रमांक १६ (२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग – अनुक्रमांक ५१ व ५२ (३) दिव्यांग कल्याण विभाग – अनुक्रमांक ५८ चर्चेला घेण्यात येतील असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले व सदर चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.सुनील प्रभू (२) श्री.रमेश बोरनारे

(३) श्री.जयंत पाटील (४) श्री.अमिन पटेल (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

माननीय तालिका सभाध्यक्षांनी खालील घोषणा केली–

आज आपल्या सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी इस्त्रायल देशाचे मुंबईतील वाणिज्यदूत श्री. यानिव रेवाच हे विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित आहेत. आपण सर्वजण त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करुया.

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

श्री.अमिन पटेल, वि.स.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले.

(५) श्री.काशिनाथ दाते (६) श्री.प्रताप अडसड

(७) श्री.संजय देरकर (८) श्री.अमोल खताळ

(९) श्री.संदिप क्षिरसागर (१०) श्री.अबू आझमी

(११) श्रीमती मोनिका राजळे (१२) श्री.अर्जून खोतकर

(१३) श्रीमती सुलभा गायकवाड (१४) श्री.विलास भुमरे

(१५) श्री.बबनराव यादव (लोणीकर) (१६) श्री.संजय मेश्राम

(१७) श्रीमती नमिता मुंदडा (१८) श्री.दिलीप लांडे

उपरोक्त पुरवणी मागण्यांवरील चर्चेस पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री, शालेय शिक्षण मंत्री व दिव्यांग कल्याण मंत्री यांनी उत्तर दिले.

उपरोक्त विभागांच्या मागण्या वितरित केलेल्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

आता मी चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक – (१) सामान्य प्रशासन विभाग - अनुक्रमांक १, (२) गृह विभाग - अनुक्रमांक २ ते ४, (३) महसूल व वन विभाग - अनुक्रमांक ५ ते ११, (४) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग - अनुक्रमांक १२ व १५, (५) नगर विकास विभाग - अनुक्रमांक १७, (६) वित्त विभाग - अनुक्रमांक १८, (७) सार्वजनिक बांधकाम विभाग - अनुक्रमांक १९ ते २१, (८) जलसंपदा विभाग - अनुक्रमांक २२ व २३, (९) विधि व न्याय विभाग - अनुक्रमांक २४ व २५, (१०) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग - अनुक्रमांक २६ ते २९, (११) ग्राम विकास विभाग - अनुक्रमांक ३० व ३२, (१२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग - अनुक्रमांक ३४ व ३५, (१३) गृहनिर्माण विभाग - अनुक्रमांक ३८, (१४) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग - अनुक्रमांक ४० व ४१, (१५) आदिवासी विकास विभाग - अनुक्रमांक ४२ ते ४४, (१६) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग - अनुक्रमांक ४५ ते ४७, (१७) उच्च व तंत्र शिक्षण विभाग - अनुक्रमांक ४८ व ४९, (१८)महिला व बाल विकास विभाग - अनुक्रमांक ५०, (१९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग - अनुक्रमांक ५३, (२०) अल्पसंख्याक विकास विभाग - अनुक्रमांक ५४, (२१) इतर मागास बहुजन कल्याण विभाग - अनुक्रमांक ५५ व ५६, (२२) मृद व जलसंधारण विभाग - अनुक्रमांक ५७ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "माझ्या मतदार संघातील आवश्यक कामाबाबत चार कपात सूचना मांडल्या असून त्याबाबत मंत्रिमहोदयांनी बैठक आयोजित करावी व या सर्व कपात सूचना मंजूर कराव्यात" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन सदर प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील असे वित्त राज्यमंत्र्यांनी सांगितले.

५. वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२६ मांडले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे

महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे असे सांगितले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३, अनुसूची, विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपरोक्त विधेयक संमत झाले.

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेले अशासकीय कामकाज उद्या घेण्यात येईल तसेच सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार हे उद्या उपस्थित नसल्यास त्यांचा अशासकीय ठराव पुढील शुक्रवारच्या कामकाजात पहिल्या क्रमांकावर घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, म.वि.स. नियम २७३ अन्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव यांच्या विरुद्ध हक्कभंग मांडणार असल्याचे सांगितले व यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त विशेषाधिकारभंगाच्या सूचनेवर निर्णय देण्यापूर्वी शासनाची बाजू समजून घेणे आवश्यक आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र नगरपालिका व आणि नगरपंचायत विधेयक, २०२५ विधि व न्याय विभागाने अभिप्राय दिले नसल्यामुळे अद्याप पुरःस्थापनार्थ दर्शविण्यात न येणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

अशासकीय विधेयकासंदर्भात विधि व न्याय विभागाने अभिप्राय दिले नाहीत तरीही अध्यक्ष आपल्या अधिकारात ते विधेयक पुरःस्थापनार्थ सादर करण्याचे निदेश देऊ शकतील तसेच उर्वरित अशासकीय विधेयकांबाबतची पूर्ण माहिती घेऊन ती पुढील शुक्रवारच्या कामकाजात घेण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०५ वाजून ५१ मिनिटांनी शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (अ) (१) सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) चार तारांकित प्रश्न सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाले.

(३) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांनी, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

४. (१) सर्वश्री. महेश लांडगे व शंकर जगताप, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. महेश (दादा) लांडगे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"भोसरी विधानसभा मतदार क्षेत्रातील पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक आणि निवासी अशा दोन्ही पट्ट्यातील वीज ग्राहकांना नियमितपणे वीज समस्यांना सामोरे जावे लागणे, समाविष्ट गावात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढलेली असून त्या तुलनेत वीज यंत्रणा सक्षम करण्यात आली नसणे, त्यामुळे वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी काही विकासकामे तात्काळ मार्गी लावणे आवश्यक असणे, सफारी पार्क मोशी अतिउच्चदाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्र उभारण्यात येणार असणे, मोशी, डुडुळगांव, आकुर्डी, चिखली, तळवडे याभागातील औद्योगिक व निवासी पट्ट्यातील वीज पुरवठा सुरळीत होणार असणे, चऱ्होली अतिउच्चदाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्र उभारण्यात येणार असणे, त्यामुळे भोसरी, चहोली, दिघी, धानोरी याभागात पुरेशा दाबाने

वीजपुरवठा करणे सुलभ होणार असणे, भोसरी गावठाण येथील नवीन स्विचिंग उपकेंद्र भोसरी विधानसभा मतदारसंघांतर्गत ओव्हरहेड वीज वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रुपांतर करणे, सविस्तर योजना राबवणे, तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फिडर बे व भूमिगत काम तातडीने करण्याची योजना राबवत त्याला गती देण्याची नितांत आवश्यकता, भोसरी विभागांमधील वाढत्या शहरीकरणाचा विचार करून चहोली, मोशी येथे अतीउच्चदाब उपकेंद्राचे प्रस्ताव सादर करणे, तसेच मुख्य अभियंता, पुणे परिमंडल यांचे सूचनेप्रमाणे भोसरी येथील सेंच्युरी इंका या अतिउच्चदाब उपकेंद्रामध्ये दोन पावर ट्रान्सफर्मर बसविण्याचा प्रस्ताव असणे, यासह मध्यम दाब स्वीचिंग स्टेशनसाठीही प्रस्ताव सादर केला असणे, त्यामुळे रहिवासी भागात तसेच औद्योगिक ग्राहकांना विजेची चांगली सेवा देणे सोयीचे होणार असल्याने याबाबत शासनाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ऊर्जा राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"मुंबईतील चांदिवली विधानसभा मतदारसंघातील तसेच उपनगरातील महानगरपालिकेच्या उद्यानात गर्दुल्ले व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचा वावर वाढल्याने नागरिकांना अस्वच्छता व असुरक्षितता निर्माण झालेली असणे, मुंबई महानगरपालिकेकडून नागरिकांच्या आरोग्यवर्धनासाठी, सकस वातावरणात व्यायाम, चालणे व विरंगुळ्यासाठी महानगरपालिकेकडून उद्याने सुरू करण्यात आली असणे, मागील काही दिवसांपासून या उद्यानात गर्दुल्ले व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचा वावर वाढला असून त्यामुळे उद्यान परिसरात अस्वच्छता, काचेच्या बाटल्यांचे तुकडे, सिगारेटच्या तुकडयांचा खच पडलेला असणे, अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरणे, रात्रीच्या वेळी मद्यपान व धूम्रपान यामुळे उद्याने गर्दुल्यांचे अड्डे बनलेले असणे, या उद्यानात सकाळी व्यायामासाठी आणि फिरायला येणाऱ्या नागरिकांना त्रास व त्यांच्या जीवितास धोका निर्माण झालेला असणे, यास्तव या उद्यानातील अस्वच्छता व सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून पोलीस गस्त अथवा आवश्यक सुरक्षारक्षक नेमणे तसेच आवश्यक प्रकाशयोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यटन मंत्री यांनी (श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री. बापूसाहेब पठारे, विजय शिवतारे, ॲड. राहूल कुल, श्री. सिध्दार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. बापूसाहेब पठारे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"पुणे शहर हे शिक्षणाचे माहेरघर, आयटी हब म्हणून ओळखले जाणे, शिक्षण, नोकरी व कायमस्वरूपी वास्तव्यासाठी दरवर्षी लाखो नागरिक शहरात येत असल्यामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढणे, वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रस्ते व पायाभूत सुविधा अपुऱ्या पडणे, वडगावशेरी मतदारक्षेत्रासह शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरिवाल्यांमुळे वाहतूक कोंडी व गोंगाट होत असणे, दहावी, बारावी तसेच इतर परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना, नागरिकांना प्रचंड त्रास होत असणे, यासंदर्भात महानगरपालिका अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई न होणे, उलट आर्थिक तडजोडीतून अधिकाऱ्यांकडून तक्रारी करणाऱ्या नागरिकांची नावे संबंधित व्यवसायिकांना सांगितली जाणे, त्यामुळे नागरिक व व्यवसायिक यांच्यात वाद निर्माण होऊन कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, सदर बाबी गंभीर स्वरूपाच्या असून शासनाने याची तातडीने दखल घेणे आवश्यक असणे, शहरातील मुख्य व अंतर्गत रस्ते तात्काळ पथारीमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबविणे, यासह अनधिकृत पथारी व्यवसाय व ध्वनीप्रदूषणावर कारवाई करण्याची आवश्यकता, तक्रारदार नागरिकांची नावे गोपनीय ठेवण्याबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून निष्काळजीपणा आढळल्यास त्यांचेविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यटन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. वरुण सरदेसाई, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील मौजे कोले कल्याण भारतनगर या वसाहतीच्या म्हाडा अभिन्यासाच्या एकूण ३,०३,८१५.६० चौ. मी. म्हणजेच सुमारे ४४ एकर क्षेत्रफळापैकी सुमारे १,१३,१२२ चौ. मी. मोकळ्या भूखंडावर झोपडीधारकांनी स्वतः बांधकाम केलेले असणे, या झोपडीधारकांना सद्यस्थितीमध्ये सोयीसुविधा पुरविण्याचे काम म्हाडा मार्फत केले जात असणे, भारतनगर वसाहतीचा समूह पुनर्विकास होऊन रहिवाशांना उच्चतम दर्जाच्या सोयीसुविधा (Amenities), पायाभूत सुविधा (Infrastructure) मिळावे याकरिता म्हाडामार्फत

भारतनगर, सी.टी.एस. क्र. ७६४३ (पार्ट), वांद्रे (पूर्व) येथील पुनर्विकास म्हाडाच्या ३३/५ योजनेंतर्गत करण्याचा प्रस्ताव अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०२५ रोजी सादर केलेला असणे, सदर प्रस्तावास मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, सदर प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व शासनाची भूमिका."

पर्यटन मंत्री (माननीय उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचेकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री. चेतन तुपे, अमित साटम, धनंजय मुंडे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. सुनिल प्रभू, सुधीर मुनगंटीवार, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, अमीन पटेल, संजय मेश्राम, डॉ.ज्योती गायकवाड, सर्वश्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, अनिल पाटील, ज्ञानेश्वर कटके, राजेश विटेकर, विठ्ठल लंघे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. मुरजी पटेल, शंकर जगताप, मनोज कायंदे, मोहन मते, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.बाबाजी काळे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमित साटम वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ रोजी आडोशी बोगद्याजवळ प्रोपिलिन ज्वलनशील रसायन वायू वाहून नेणारा टँकर उलटला असणे, टँकरमधून सुरू असलेल्या वायू गळतीमुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव वाहतूक पूर्णतः बंद ठेवल्याने ३६ तास महामार्ग ठप्प असणे, हजारो प्रवासी, वाहनचालक, रुग्ण व विद्यार्थ्यांचे अन्न-पाण्याविना, मूलभूत सोयीसुविधांविना महामार्गावर अडकून पडून अतोनात शारीरिक व मानसिक हाल झालेले असणे, दोन्ही औद्योगिक महानगरांचे कोट्यवधी रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, अशा गंभीर आपत्कालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेमध्ये कमालीचा समन्वयाचा अभाव दिसून येणे, अडकलेल्या प्रवाशांना तातडीने माहिती देण्यासाठी व वाहतूक वळवण्यासाठी शासनाकडे कोणतीही सक्षम आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था सज्ज नसणे, या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करून कार्यवाही व उपाययोजना करण्याची सामाजिक संघटना, लोकप्रतिनीधी यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार तक्रारी केलेल्या असणे, वाहतूक कोंडीमुळे होणारा त्रास लक्षात घेऊन भविष्यात अशी घटना घडल्यास कोणत्या प्रकारची

सज्जता असावी याबाबत चौकशी करून शिफारशीसह सविस्तर अहवाल सादर करण्याचे मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री (सार्वजनिक उपक्रम) चौकशी करून शिफारशीसह सविस्तर अहवाल सादर करण्याचे मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांनी एमएमआरडीसी व संबंधीत विभागांना निदेश दिलेले असणे, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी ठाणे येथील दोन अपघातामुळे मुंबई-नाशिक महामार्गावर ४ ते ५ तास वाहतुक कोंडी झालेली असणे, राज्यातील मुंबई-पुणे, पुणे-नाशिक, पुणे-औरंगाबाद, मुंबई-नाशिक यासह इतर महत्वाच्या महामार्गावरील वाहतूक कायमस्वरुपी व्यवस्थीतरित्या होण्याकरिता तसेच आपत्कालीन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याबाबत शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

परिवहन मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. जयंत पाटील वि.स.स. यांनी, नगरपालिकेचे लोक फुलविक्रेते यांना व्यावसाय करण्यास मनाई करीत असणे व त्यामुळे जोपर्यंत आपल्याकडून काही पर्यायी व्यवस्था केली जात नाही तोपर्यंत त्यांना फुल विक्री करण्यास परवानगी देण्याची गरज असणे, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

मुख्यमंत्र्यांनी यासदर्भात उत्तर दिले.

नियम ४७ अन्वये निवेदन-

पणन मंत्र्यांनी, "कापूस खरेदीची मुदत वाढविणे" इ. बाबत निवेदन केले.

५. (१) श्री. तुकाराम काते वि.स.स. यांनी, चेंबूर येथील सुभाषनगर या वसाहतीमध्ये इमारत क्रमांक ३६ चे काम सुरु असताना ५ कामगार ८ व्या मजल्यावरुन खाली पडले असून दुर्दैवाने त्यातील २ कामगारांचा जागीच मृत्यू होणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री.कैलास घाडगे-पाटील वि.स.स. यांनी, ग्रामीण भागातील जुने मीटर चांगले असताना स्मार्ट मीटर लावण्यात आलेले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्री.अनंत (बाळा) नर वि.स.स. यांनी, मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून निराधार कुटुंब रस्त्यावर आलेले असून ते न्यायाच्या प्रतिक्षेत असणे,

शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(४) श्री. अबु आझमी वि.स.स. यांनी, (प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्वपदे रिक्त असल्याने हिंदी प्रतिवेदन उपलब्ध नाही.)

(५) श्री. महेश सावंत वि.स.स. यांनी, धारावी येथे अदाणी समुहाचे काम सुरु आहे, त्यामुळे येथे मोठया प्रमाणात धूळ होत असून तिची साफसफाई केली जात नसणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) डॉ. ज्योती गायकवाड वि.स.स. यांनी, धारावी मतदारसंघामध्ये शाहू नगरमध्ये जास्मीन मिल कंपाऊंड रस्त्यावरुन डंपींगचे ट्रक, मोठमोठे डंपर जाऊन मोठमोठ्या खड्डयांमुळे त्या रस्त्याची दुरवस्था झालेली असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने यावर उचित कारवाई करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(७) श्री.प्रविण स्वामी वि.स.स. यांनी, मतदारसंघात पवन चक्की व सौर ऊर्जा प्रकल्प मोठ्या प्रमाणात सुरु असून यामध्ये या कंपन्यांच्या मार्फत जे जमिनींचे अधिग्रहण केले जाते. त्यामध्ये अनेक वादविवाद झाल्याचे दिसून येणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(८) श्री.जयंत पाटील वि.स.स. यांनी, सन २०२६ चे शासकीय कार्यक्रमाचे परिपत्रक काढण्यसात आले त्यामध्ये माजी मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या जयंतीचा समावेश नसणे, तसेच राज्यातील ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना नवीन वेतनश्रेणी लागू करण्यासाठी शासनाकडून दि.२९.६.२०१७ रोजी अभय यावलकर समिती गठित गेली होती. सदर समितीने जून, २०१८ रोजी राज्य शासनाकडे वस्तुनिष्ठ अहवाल सादर केला आहे. परंतु, शासनाने या अहवालातील शिफारशी अद्याप लागू केलेल्या नसणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(९) श्री.आदित्य ठाकरे वि.स.स. यांनी, संपूर्ण महाराष्ट्रात जेथे जेथे भरती प्रक्रिया होते तेथे परीक्षेकरिता येणाऱ्या उमेदवारांची रात्री झोपण्याची व दिवसा राहण्या, खाण्याची व्यवस्था केल्यास या तरुण मुलामुलींची गैरसोय दूर होईल, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१०) श्री. हेमंत ओगले वि.स.स. यांनी, बीड जिल्ह्यातील दौला वाडगाव ता. आष्टी येथे दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी रात्रीच्या वेळी अनुसूचित जातीतील श्री.गोपीनाथ गंगाधर गाडे या तरुणाचे दुकान आणि घर जाळण्यात आले असून त्यामुळे सुमारे ५० लाखांचे नुकसान झालेले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने यावर उचित कार्यवाही करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

शासनाने नोंद घेतली असल्याचे सांगितले.

(११) श्री. मुरजी (काका) पटेल वि.स.स. यांनी, वाहतूक कोंडीमुळे मरोलपासून अंधेरी स्टेशनपर्यंत जाण्यासाठी दोन-दोन तास वेळ लागत आहे. त्यामुळे शासनाला आदेश देऊन ही वाहतूक कोंडी कमी करावी, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१२) श्री. करण देवताळे वि.स.स. यांनी, त्यांच्या मतदारसंघात दोन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे चणा, गहू, तूर आणि मिरची या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१३) श्री.प्रविण तायडे वि.स.स. यांनी, त्यांच्या मतदारसंघात कार्यरत झालेली एनटीसीची फिनले मिल अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असणे, तसेच रेती तस्करी आणि गो-तस्करी प्रचंड प्रमाणात सुरू असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१४) श्री.अभिमन्यू पवार वि.स.स. यांनी, औसा तालुक्यातील आधार नसलेल्या ३९४ विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यांची संख्या ग्राह्य धरूनच "संच मान्यतेसाठी" शिफारस करावी, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१५) श्री. रईस शेख वि.स.स. यांनी, (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी प्रतिवेदन उपलब्ध नाही.)

(१६) श्री. वरूण सरदेसाई वि.स.स. यांनी, वांद्रे पूर्व येथील पश्चिम द्रुतगती मार्गावरील ट्रॅफिक कमी होण्यासाठी लवरात लवकर उपाययोजना कराव्या व तेथील सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण हटवून त्यावर वन वे पार्किंग करण्यात यावे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१७) श्री. दिलीप लांडे वि.स.स. यांनी, त्यांच्या भागात ऑल इंडिया नावाची खाजगी शाळा असून या शाळेची इमारत धोकादायक असल्यामुळे मनपाने नोटीस देऊन ती पाडलेली आहे. परंतु आता या शाळेतील १ हजार ८०० ते २ हजार विद्यार्थी रस्त्यावर आलेले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१८) श्रीमती स्नेहा दुबे पंडित वि.स.स. यांनी, ३५-४० वर्षांपासून वसई-विरार या परिसरातील घरे पाण्यापासून वंचित असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१९) श्री. अस्लम शेख वि.स.स. यांनी, (प्रतिवेदन शाखेतील सर्व हिंदी प्रतिवेदकांची पदे रिक्त असल्यामुळे हिंदी प्रतिवेदन उपलब्ध नाही)

संसदीय कार्यमंत्र्यांनी यासंदर्भात खुलासा केला.

(२०) श्री. वरुण सरदेसाई वि.स.स. यांनी, विधान भवनच्या सीआर – २ मॉलच्या शेजारी असलेल्या फुटपाथवर सरकारी वाहने उभी असतात. त्यामुळे याबाबत आपण सूचना कराव्यात, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने याबाबतची नोंद घेतली असल्याचे सांगितले.

(२१) श्री. राजू तोडसाम वि.स.स. यांनी, आर्णी तालुक्यातील देवगाव प्रकल्पग्रस्ताने जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याने आत्महत्या केलेली असणे, सन २०२१ नंतर त्या शेतकऱ्याचा मुलगा हा मोबदला मिळावा याकरिता सातत्याने प्रयत्न करूनही त्याला त्या जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नसणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२२) श्री. गजानन लवटे वि.स.स. यांनी, नांदगाव पेठ, जि. अमरावती बस स्टँड परिसरात दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी रात्री एका दुचाकीचा किरकोळ धक्का लागल्याच्या रागात तीन लोकांनी त्यांच्या मतदारसंघातील दोन सख्ख्या भावांवर धारदार शस्त्राने गंभीर हल्ला केला असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२३) श्री. अनुपभैय्या अग्रवाल वि.स.स. यांनी, देवपूर येथे रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सुरु असून महानगरपालिकेची तेथे असलेली २ हजार चौ.मी. जागा श्री. पंडित पाटील, भूमापन अधिकाऱ्याने इतर दोन ते तीन सरकारी जागा खाजगी व्यक्तीच्या नावे केल्या असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२४) श्री. सिद्धार्थ खरात वि.स.स. यांनी, बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराच्या पाण्याची पातळी काही कारणांमुळे वाढत असून तेथे दहाव्या व आकराव्या शतकातील चालुक्य काळातील कमळजा माता मंदिर, सासू-सून विहीर, रामगया झरा अशी दहा ते बारा मंदिरे पाण्याखाली गेली असणे, त्यामुळे या भागात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

शासनाने यावर उचित कार्यवाही करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२५) श्री. किसन वानखेडे वि.स.स. यांनी, उमरेखड-महागाव मतदारसंघात पैनगंगा अभयारण्य असून तेथे मोठ्या प्रमाणात वन्य प्राणी आहेत. दगडथर येथील माजी सरपंच दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी शेतात जात असताना त्यांच्यावर वन्य प्राण्यांनी हल्ला केला आहे. त्या व्यक्तीला वन विभागाने मदत करवी तसेच दिनांक २३ व २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी त्यांच्या मतदारसंघात अतिवृष्टीमुळे गहू, हरभरा, कापूस, मका, इत्यादी पिके नष्ट झालेली असणे, त्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने शासनाला अहवाल सादर करावा, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२६) श्रीमती सुलभा गायकवाड वि.स.स. यांनी, कल्याण शहराची वाढती लोकसंख्या, तेथील वाहतूक कोंडी व प्रलंबित कामे यात शासनाने लक्ष घालावे व प्रलंबित कामे युद्ध पातळीवर पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२७) श्री.संजय उपाध्याय वि.स.स. यांनी, भारत सरकारच्या प्रोहिबिशन ऑफ इलेक्ट्रॉनिक सिगारेट ॲक्ट-२०१९ अंतर्गत ई-सिगारेटचे उत्पादन, आयात, विक्री, साठवणूक, वाहतूक व जाहीरात करणे पूर्ण प्रतिबंधित असतानाही मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात हे उत्पादन अवैधरित्या खुलेपणाने विकले जात असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२८) श्री. सुनिल कांबळे वि.स.स. यांनी, पुणे महापालिका क्षेत्रामध्ये पुणे कॅन्टोनमेंट बोर्ड असून पूर्वी जकात आणि एल.बी.टी. हे कॅन्टोनमेंट बोर्डाचे प्रमुख आर्थिक स्त्रोत होते. परंतु हे दोन्ही उत्पन्नाचे स्त्रोत बंद होऊन जी.एस.टी. करप्रणाली अस्तित्त्वात आलेली असल्याने महापालिका आणि शासनाकडून कॅन्टोनमेंट बोर्डाला सद्यःस्थितीत कोणतीही आर्थिक मदत मिळत नाही. त्यामुळे कॅन्टोनमेंट बोर्ड आर्थिक संकटात सापडले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२९) श्री.देवराव भोंगळे वि.स.स. यांनी, राजुरा मतदारसंघातील श्री क्षेत्र गंगामाता देवस्थान, मारई पाटण या देवस्थानाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन तेथे पाणी, निवास, इत्यादी आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३०) श्री.चरणसिंग ठाकूर वि.स.स. यांनी, नागपूर, अमरावती, वर्धा, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या भागातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना एक वर्ष होऊनही अद्यापपर्यंत अनुदान मिळालेले नसणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३१) श्री.सुनिल प्रभू वि.स.स. यांनी, मुंबईतील गोरेगाव पश्चिम, सिद्धार्थ नगर, पत्रा चाळ येथील पुनर्विकास प्रकल्पातील २७२ रहिवाशी कुटुंबांना शासनाने डिसेंबर, २०२२ च्या अधिवेशनात सोसायटीसोबत विकास करार (डी.ए.) आणि सभासदांसोबत वैयक्तिक करार (पी.ए.ए.) करण्याबाबत आश्वासन देऊनही अद्याप म्हाडाने करार न करता याकडे दुर्लक्ष केल्यामुळे या कुटुंबियांना नवीन इमारतीतील घरांचा ताबा मिळू शकलेला नसणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३२) श्री. विक्रम पाचपुते वि.स.स. यांनी, अहिल्यानगर तालुक्यात रुई छत्तीशी या गावातील लोकांनी त्यांच्या गावामध्ये अवैध धंदे सुरु असल्याने ते बंद करण्यासाठी सामूहिक उपोषण केलेले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३३) ॲड. राहुल कुल वि.स.स. यांनी, पश्चिम महाराष्ट्रामध्ये विशेषतः पुणे जिल्ह्याच्या परिसरातातील नागरिकांवर बिबट्याचे हल्ले प्रचंड प्रमाणात होत आहेत त्यामुळे तेथील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३४) श्री. अनिल मांगुळकर वि.स.स. यांनी, त्यांच्या मतदारसंघातील रेमण्ड इको जेनिअन या कंपनीतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मागण्यांसाठी उपोषणास बसले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३५) श्री. विलास भुमरे वि.स.स. यांनी, पैठण विधानसभा मतदारसंघातून जाणाया सुकणा व बेंबळा या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे या नद्यांचे पात्र अरुंद झालेले आहे. त्यामुळे याद दोन्ही नद्यांचे खोलीकरण करण्याची आवश्यकता, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३६) श्रीमती श्वेता महाले वि.स.स. यांनी, संपूर्ण महाराष्ट्रातील ग्राम रोजगार सेवक यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलनाच्या माध्यमातून मांडलेल्या मागण्या, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३७) श्री. शंकर जगताप वि.स.स. यांनी, हिंजवडी, पुणे येथे दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी आयटी कंपनीच्या एका मद्यधुंद वाहनचालकाने पदपथावरुन चालणाऱ्या ५ व्यक्तींना चिरडल्याने श्री. प्रसाद आणि त्यांच्या कुटुंबातील ५ जण मृत्यूमुखी पडले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३८) श्री. अमोल जावळे वि.स.स. यांनी, राज्यातील टोकरे कोळी, महादेव कोळी जातीचे आदिवासी समाजबांधव आझाद मैदान येथे गेल्या २-३ दिवसांपासून उपोषणाला बसलेले असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३९) श्री.बाबुराव कोहळीकर कदम वि.स.स. यांनी, सिंदखेडराजा, जि.बुलढाणा हे राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान असून तेथे १२ जानेवारी रोजी महाराष्ट्रासह देशातून अनेक शिवभक्त येत असतात. परंतु तेथे मोठया प्रमाणात सुविधांचा अभाव असून त्याला 'ब' किंवा 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करणे अत्यंत आवश्यक असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४०) डॉ.बाबासाहेब देशमुख वि.स.स. यांनी, शासनाने पीक पाहणीसाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत वाढवून द्यावी किंवा ऑफलाईन नोंदणी करण्यासाठीचा शासन निर्णय निर्गमित करावा, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४१) श्री.प्रताप अडसड वि.स.स. यांनी, माकडांच्या त्रासामुळे शेतीचे आणि सामान्य माणसांचेही नुकसान होत होते. एका माकडाला पकडण्यासाठी ६०० रुपये याप्रमाणे दर निश्चित

करण्यात आला असल्याने व त्यात १० हजार रुपयांची मर्यादा घातलेली असल्यामुळे माकडे पकडणाऱ्यांना ते परवडत नसणे, त्यामुळे १० हजार रुपयांची मर्यादा शासनाने काढून टाकावी, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४२) श्री.शंकर मांडेकर वि.स.स. यांनी, भोर, राजगड तालुक्यातील शेतकऱ्यांना महाबीजच्या वतीने देण्यात आलेले परभणी शक्ती हे ज्वारीचे वाण निकृष्ट दर्जाचे असणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४३) डॉ.अतुलबाबा भोसले वि.स.स. यांनी, उंडाळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सुरु करण्याचवी आवश्यकता, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४४) श्री. प्रविण दटके वि.स.स. यांनी, नागपूर सुतगिरणी कर्मचाऱ्यांना मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ५० कोटी रुपये मंजूर झालेले असूनही त्यानंतर २ अधिवेशने झाली तरी देखील पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून हे पैसे मिळालेले नसणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

अशासकीय कामकाज

(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

६. पुरःस्थापनार्थ–

श्री. अमित साटम वि.स.स. यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक ५ – महाराष्ट्र भविष्य कल्याण विधेयक, २०२६ सभागहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव-

"शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या पीक नुकसानीवर कायम स्वरुपी उपाययोजना करणे," इ. बाबत श्री. रणधीर सावरकर व इतर वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९३ अन्वये मांडलेला प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झालील.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.जयंत पाटील (२) श्री. सुरेश धस (भाषण अपूर्ण)

चर्चा अपूर्ण.

महसूल मंत्र्यांनी, "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीर अभियान (टप्पा क्र.१) बाबत" नियम ४७ अन्वये निवेदन केले.

"शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या पीक नुकसानीवर कायम स्वरुपी उपाययोजना करणे," इ. बाबत नियम २९३ अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री. सुरेश धस (भाषण पूर्ण)
(३) श्री. सिद्धार्थ खरात
(४) श्री. दिलीप लांडे
(५) श्री. शिवाजी पाटील
(६) श्री. संजय उपाध्याय
(७) श्री. सचिन पाटील
(८) श्री.राजू तोडसाम
(९) श्री. देवराव भोंगळे
(१०) डॉ. राहुल पाटील
(११) श्री. दिपक केसरकर
(१२) श्रीमती श्वेता महाले
(१३) श्रीमती सुलभा गायकवाड
(१४) श्री. गोपिचंद पडळकर
(१५) श्री.अभिमन्यू पवार

(चर्चा अपूर्ण..)

सभागृहाची बैठक संध्याकाळी ५ वाजून २० मिनिटांनी बुधवार, दिनांक ४ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

बुधवार, दिनांक ०४ मार्च, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नांच्या यादीतील चोवीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. ऊर्जा राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. रोजगार हमी मंत्र्यांनी, 'महाराष्ट्र विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक २५२८२ च्या अनुषंगाने मनरेगा योजनेंतर्गत अकौशल निधी देणे ' इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

४. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचना स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसत नसल्यामुळे त्यांना अनुमती नाकारत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले. परंतु विषयाचे गांभीर्य लक्षात घेता ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी आपल्या स्थगन प्रस्तावाच्या विषयासंदर्भात थोडक्यात निवेदन करावे, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, ' नागपूरमध्ये असलेल्या एसबीएल कंपनीमध्ये दिनांक १ मार्च, २०२६ रोजी दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये झालेल्या स्फोटामध्ये २० लोकांना मृत्यू होऊन जखमी झालेले १३ कामगार अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत असणे ' इ.बाबत स्थगन प्रस्तावाच्या सूचनेचा मुद्दा उपस्थित केला व याबाबत आपले म्हणणे मांडले.

ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी सभागृहात मांडलेली माहिती अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. या गंभीर विषयावर सगळ्यांनीच भाग घेणे आवश्यक असल्याने यासंबंधी येत्या शुक्रवारच्या आत लक्षवेधी सूचना किंवा इतर आयुधामार्फत ही चर्चा घडवून आणण्यात येईल, असे निदेश माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री.अस्लम शेख, वि.स.स.यांनी, ' मुंबई तहसील कार्यालयातून उत्पन्न दाखला, रहिवाशी दाखला व इतर शैक्षणिक दाखले देण्याकरिता होत असलेला भ्रष्टाचार व यातील दलालांवर करावयाची कठोर कारवाई ' इ.बाबत स्थगन प्रस्तावाच्या सूचनेचा मुद्दा उपस्थित केला व याबाबत आपले म्हणणे मांडले.

गृह विभाग आणि महसूल विभागाकडून याची स्वतंत्र चौकशी केली जाईल .तसेच जेवढे अर्ज प्राप्त झाले आहेत ते तातडीने निकाली काढण्यात येतील, असे महसूल मंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांनी, ' ज्ञानेश्वरी, भागवत, नामदेव महाराजांची गाथा आणि संत तुकाराम महाराजांची गाथा हे पण स्वतंत्र ग्रंथ नसून ते फक्त संकलन असल्याबाबतचे वादग्रस्त विधान स्वामी गोविंद देवगिरी, कोषाध्यक्ष अयोध्या यांनी पुणे येथील एका संमेलनात करणे' इ.बाबत स्थगन प्रस्तावाच्या सूचनेचा मुद्दा उपस्थित केला व याबाबत आपले म्हणणे मांडले.

५. (१) श्री.निलेश राणे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" सिंधुदुर्ग जिल्ह्यात जवळजवळ ४२२४२ हेक्टर क्षेत्रावर सन १९९६ साली वनसंज्ञा लादण्यात येणे, संपूर्ण राज्यात ६२ हजार क्षेत्र वनसंज्ञेखाली घेण्यात येणे, परंतु त्यावेळी फक्त एकटया सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४२ हजार क्षेत्र वनसंज्ञेखाली घेण्यात येणे, त्यामुळे जिल्ह्यातील अनेक गावे, बाजारपेठा, मंदिरे, शाळा, दवाखाने, शेत जमिनी, बागायती आदि वनसंज्ञेखाली दर्शविण्यात येणे, त्यामुळे जिल्ह्यातचा विकास खुंटला असणे, सर्व विकास कामे ठप्प झालेली असणे, जिल्ह्यात असलेल्या डोंगर द-यांमुळे विकास होईल असे जमीन क्षेत्र शिल्लक न राहणे, चुकीच्या पध्दतीने वनसंज्ञा /वन नोंद झाल्यामुळे सद्यस्थितीत जिल्ह्यातील ३०० पेक्षा जास्त गावे विकासापासून वंचित राहिलेली असणे, शेतक-यांच्या हक्काच्या जमिनी असूनही त्यांना लाभ घेता येत नसणे, अनेकदा शेतक-यांच्या जमिनी शासकीय कामाकरिता संपादित केल्या जाणे परंतु वन नोंदीमुळे त्याचा शेतक-यांना मोबदला न मिळणे, सदर मोबदला शासन जमा होणे, वनसंज्ञा व वन नोंदी झाल्यामुळे शेतक-यांची अवस्था जमिनी, ना शेती, ना मोबदला अशी होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शेतक-यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली चिड, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सिंधुदुर्ग जिल्ह्यात नव्याने सर्व्हेक्षण करून प्रत्यक्षातील वनक्षेत्र, खाजगी वनक्षेत्र व वनसंज्ञा यांची नव्याने नोंद करून शेतक-यांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. राजकुमार बडोले, चेतन तुपे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश विटेकर, विठ्ठल लंघे, राजु तोडसाम, मंगेश चव्हाण वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"ग्रामीण भागात जवळपास प्रत्येक घरांत एकेकाळी बांबूच्या वस्तु जसे की चाळण्या, टोपल्या, सूप, झाडू, चटई व धान्य साठवणूकीसाठी पेटया इ.वस्तु घरगुती वापरासाठी बाळगण्यात येत असणे, कालांतराने प्लॅस्टीकच्या वस्तुने बाजारपेठ काबीज केल्यामुळे ग्राहकांचा कल प्लॅस्टीककडे झुकला असल्याने बांबूच्या वस्तुंची मागणी मोठया प्रमाणात घटत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बांबू लागवडीवर भर देण्याबरोबरच बांबूच्या वस्तुंना शासनाने बाजारपेठ, दर, शासकीय खरेदी व प्रचार-प्रसाराची व्यवस्था करणे आवश्यक असणे, प्लॅस्टीकमुळे होणारे प्रदुषण व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचे धोके लक्षात घेऊन बांबू वस्तुंचा वापर वाढविणेबाबत अनेक तज्ञांनी वेळोवेळी आपापली मते व्यक्त केली असणे, यास्तव राज्य शासनाच्या वतीने बांबू लागवड वाढवून रोजगार निर्मिती व त्यावर अवलंबून असणाऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्यासाठी विशेष नियोजन करण्याचे शासनाकडून सांगण्यात येणे, मात्र शासनाने या योजनेबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बांबू व्यवसायिक तसेच बांबू कारागीरांचा प्रश्न आर्थिकदृष्टया ऐरणीवर आला असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, परिणामी प्लॅस्टीकमुळे पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम तसेच अनेकांना हा पारंपारीक व्यवसाय सोडावा लागल्याचे निदर्शनास येणे, बांबू व्यवसायिक व बांबू कारागीर यांचा विचार करून या बांबू व्यवसायास चालना देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी , 'बुरुड समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी बांबूपासून बनविण्यात येणाऱ्या वस्तुंची निर्यात जगपातळीवर करून बुरूड समाजातील तरूण पिढीला व्यवसायात सामावून घेणे.' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

५. (३) सर्वश्री. अभिमन्यू पवार, अमित साटम, काशिनाथ दाते, हारुन खान, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री चेतन तुपे, दौलत दरोडा, प्रतापराव पाटील चिखलीकर, अनिल पाटील, ज्ञानेश्वर कटके, राजेश विटेकर, शंकर मांडेकर, सुधीर मुनगंटीवार, डॉ. नितीन राऊत, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अस्लम शेख, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. विकास ठाकरे, संजय मेश्राम, तानाजी मुटकुळे, नारायण पाटील, अभिजीत पाटील, सुभाष देशमुख, विजय रहांगडाले, संजय पुराम, विनोद अग्रवाल, रोहित पाटील, राजेश मोरे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

श्री.अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"लातूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या १२६७ शाळांपैकी जवळपास ६२४ शाळा खोली असलेल्या इमारती मोडकळीस आलेल्या असणे, अनेक शाळांची दुरवस्था झाल्याने धोकादायक झालेल्या असणे, लातूर जिल्ह्यातील ११६ शाळांची वीज जोडणी थकीत बिलामुळे खंडित केलेली असणे, बहुतांश शाळांना संरक्षण भिंत / खेळाचे मैदान, मुला मुलींसाठी शौचालय नसणे, शिपाई व सफाई कर्मचारी नसल्याने शाळा व शौचालयांमध्ये स्वच्छता नसल्याने दुर्गंधी असणे, अनेक शाळेत किचन शेड नसणे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. (CCTV) यंत्रणा बसविलेली नसणे, शाळेत शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख आणि शिक्षकांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम झालेला असणे, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कला, क्रीडा व कार्यानुभव विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नियुक्त नसणे, लातूर जिल्ह्याप्रमाणे संपूर्ण राज्यात ९०% जिल्हा परिषद शाळांची स्थिती अशीच असणे, राज्यातील खाजगी संस्थांच्या शाळांमध्ये प्रशस्त इमारत व सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याने पालकांचा खाजगी शाळेत प्रवेशासाठी ओढा असणे, राज्यातील जिल्हा परिषद शाळांची पुनर्बांधणी करण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रत्येक शाळेत इंटरनेट सुविधा, खेळाचे मैदान, सौर प्रकल्प, सी.सी.टी.व्ही., शुद्ध पाणी, रिक्त पदांची भरती, सर्व शाळेत कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षक नियुक्ती, शाळेच्या स्वच्छतेसाठी प्रत्येक शाळेत शिपाई नियुक्ती करण्यासाठी मान्यता आणि विशेष निधी उपलब्ध करून देणे व शाळा पुनर्बांधणी योजना राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. रोहित पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणावर बेदाणा निर्मितीवर अवलंबून असणे, यावर्षी हवामानातील प्रतिकूल परिस्थिती, उत्पादनातील घट आणि वाढलेला खर्च यामुळे बेदाण्याचे एकूण उत्पादन कमी झालेले असणे, परिणामी बाजारात उपलब्धता मर्यादित असल्याने सध्या स्थानिक बेदाण्याला चांगला दर मिळत असला तरी बाहेरील अनेक देशांमधून कमी दराने तसेच काही ठिकाणी बेकायदेशीर मार्गाने बेदाणा महाराष्ट्रात येत असल्याच्या तक्रारी सातत्याने निदर्शनास येत असणे, अशा आयातीमुळे राज्यातील बाजारपेठेत दरावर दबाव निर्माण होत असणे व स्थानिक शेतकऱ्यांच्या उत्पादनाला अपेक्षित भाव मिळत नसणे, त्यामुळे द्राक्षातून बेदाणा तयार करणाऱ्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत परतावा कमी असल्याने बेकायदेशीर आयात रोखण्यासाठी सीमाशुल्क यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता, आयात होणाऱ्या बेदाण्यावर कडक गुणवत्ता तपासणी लागू करणे, आवश्यक असल्यास आयात शुल्कात वाढ करणे तसेच स्थानिक उत्पादकांच्या संरक्षणासाठी विशेष बाजार हस्तक्षेप धोरण राबविण्याबाबत भूमिका घेण्यासाठी राज्य शासनाने कार्यवाही करणे गरजेचे असणे, यासंदर्भात राज्यातील शेतकरी संघटना, लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा.कृषिमंत्री यांचेकडे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही व उपाययोजना केली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असणे, राज्यातील बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांचे हित सुरक्षित राहावे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

फलोत्पादन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

"अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये कामगार विभागाकडील नोंदणी असलेल्या कामगारांना गृहपयोगी साहित्य वाटप करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडीअडचणी येत असून त्यांची योग्यरीत्या नोंदणी करून त्यांना सदर साहित्य मिळत नसल्याची बाब दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास आली असणे, सदर योजनेंतर्गत एका दिवसामध्ये सुमारे ५०० कामगारांना साहित्यांचा वाटप होत असताना वाटप ठिकाण कमी असल्यामुळे व जिल्ह्याच्या ठिकाणी फक्त एक किंवा दोन सेंटर असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणी येत असणे,

जिल्ह्यातील सर्व कामगार त्या ठिकाणी पोचत असल्यामुळे साहित्यांचे वाटपामध्ये मोठी गैरसोय होत असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी व सर्व कामगारांकडून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सदर साहित्य वाटप केंद्र सुरू करण्याची मागणी होत असणे, याविषयी कामगार विभागामार्फत कोणती कार्यवाही न होणे उलट ज्या ठेकेदाराला संबंधित काम देण्यात आलेले आहे तो कामगारांची कोणतीही शहानिशा न करता प्रत्येक माणसाला साहित्य वाटप करत असल्याची बाब देखील समोर येत असणे, याविषयी शासनाच्या विभागाकडे व संबंधित जिल्हाधिकारी तसेच कामगार अधिकारी यांच्याकडे तक्रार होत असणे, त्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही न करणे, त्यामुळे या सर्व साहित्य वाटपाची चौकशी करून संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

कामगार राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६. (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक ६- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) ऊर्जा राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक,२०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

७. (१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, ' मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १५ मे, २०२२ च्या 'सर्वांसाठी पाणी' या धोरणानुसार झोपडपट्टया, बिगर झोपडपट्टी बांधकामे, तसेच गावठाण व कोळीवाडे भागातील वगळलेल्या रहिवाशांना मानवतावादी दृष्टीकोनातून पाणीपुरवठा मंजूर करणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. राजेश बकाने, वि.स.स. यांनी, ' होळीच्या पूर्वसंध्येला चंद्रपूर व वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या बांबरडा रेती घाटावर पुलगाव येथील रहिवाशी, भारतीय जनता पक्षाचा शहराचे महामंत्री यांना बोलावून त्यांच्यावर तलवारीने हल्ला करून पाण्यात बुडवून मारण्यात येणे ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. हारून खान, वि.स.स. यांनी, ' महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट एक्शन कमिटी, दहिसर, मुंबई आणि राज्यातील ट्रक,टेम्पो, टॅक्सी व ऑटो वाहतूकदारांनी मोटार वाहन विभाग व पोलीस विभाग यांच्यामार्फत राज्यात राबविण्यात येणारी ई-चलन सिस्टिम जनता व वाहनधारक यांच्यावर अन्याय

करणारी असून याव्दारे जनतेची व वाहनधारकांची नियमबाह्यरितीने लूट केली जात असल्याने संप करण्याचा निर्णय घेण्यात येणे. ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याप्रकरणी दखल घेऊन याबाबत तातडीने बैठक घेऊन मार्ग काढावा, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

(४) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी, ' मुंबई-पुणे मार्गावरील जकात नाक्यावर विनाकारण वाहने अडवून प्रवाशांचा वेळ वाया घालविणाऱ्या वाहतूक पोलिसांवर सक्त कारवाई करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री.गजानन लवटे, वि.स.स. यांनी ' बहुजन समाजाच्या प्रगतीकरिता मौल्यवान कामगिरी करणारे थोर सत्य संशोधक,समाजाचे अग्रदूत डॉ. संतुजी रामजी लाड यांची दिनांक ४ मार्च रोजी जयंती व दिनांक ८ ऑक्टोबर रोजी पुण्यतिथी राज्य शासनाने साजरी करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(६) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी ' राज्यातील ग्रामपंचायत डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचे बऱ्याच महिन्यांपासून थकीत मानधन अदा करू त्यांना सेवेत कायम करण्याबाबत राज्य शासनाने योग्य तो निर्णय घेणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. चरणसिंग ठाकूर, वि.स.स. यांनी ' रविवारी सकाळी ७.०० ते ७.३० च्या दरम्यान एस.बी.एल.एनर्जी लिमिटेड या स्फोटके निर्मिती कंपनीत मोठा स्फोट होऊन त्यात१९ मजुरांचा मृत्यू होऊन २३ जण रुग्णालयात दाखल असून ते मृत्युशी झुंज देत असणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी ' जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रात गोरेगाव-मुलुंड रस्त्याच्या कामामुळे तात्पुरत्या बाधित होणाऱ्या लोकांचे तात्पुरते पुनर्वसन करून द्यायचे ठरलेले असतानाही महापालिकेच्या श्री.जाधव या अधिकाऱ्याने बाधितांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्याविरोधात अमानुषपणे कारवाई करणे.' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. अभिजीत पाटील, वि.स.स. यांनी 'पंढरपूर शहरात येणारी अवजड वाहतूक रोखण्याच्या कामात वाहतूक पोलीस व पंढरपूर पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक श्री.दशरथ वाघमोडे यांनी लाच घेऊन वाहनचालकांकडून वसुली करणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांनी ' राज्यातील अनाथ मुला-मुलींना शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने निर्णय घेणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. हरीश पिंपळे, वि.स.स. यांनी 'इराण, इराक, अमेरिका, कतार येथे युद्धाची परिस्थिती असून आपल्या राज्यातील व देशातील बरेच विद्यार्थी नोकरीनिमित्त आणि पर्यटनासाठी गेलेले नागरिक तेथे अडकून पडणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी 'नाशिक जिल्ह्यातील नाईकवाडी या गावात गेल्या चार दिवसांपूर्वी शिरलेल्या बिबट्याने गायकर कुटुंबातील मुलावर सकाळी ११.०० वाजता हल्ला करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स. यांनी ' महाराष्ट्राच्या १३ जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील नियमित परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या आदिवासी उमेदवारांना ठरविलेल्या कोटयानुसार शासकीय नोकरीत सामावून घेऊन त्यांना कायम करणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री.अबु आझमी, वि.स.स. (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यानेहिंदी प्रतिवेदन प्रलंबित)

(१५) श्री. मंगलप्रभात लोढा , वि.स.स. (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यानेहिंदी प्रतिवेदन प्रलंबित)

(१६) श्री. रामदास मसराम,वि.स.स. यांनी, गडचिरोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे धानाचे रखडलेले चुकारे तातडीने देण्यासंबंधी शासनाने कार्यवाही शासनाने करणे तसेच आरमोरी विधानसभा मतदारसंघातील ई-पीक नोंदणी न करणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. अनिल मांगुळकर,वि.स.स. यांनी, यांनी ' यवतमाळ शहरात शासकीय जमिनीवरील १७९० व खासगी जमिनीवरील ७४७ कुटुंबांचे पट्टे अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. राजेश मोरे,वि.स.स. यांनी, यांनी ' कल्याण-डोंबिवली मतदारसंघामध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणावर झालेला असून लहान मुले, महिला आणि तरुण मंडळी या कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे भयभीत झालेले असणे.' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

८. (१) श्री. दिलीप सोपल ,वि.स.स. यांनी, यांनी ' कांदा पिकाचे भाव अतिशय पडल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन करून बाजार समितीचे कामकाज बंद करायला लावणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. सिद्धार्थ खरात,वि.स.स. यांनी, यांनी ' मतदारसंघातील कासारखेडा या गावामध्ये बिबट्याने गाय मारली असून बिबट्याने वारंवार जनावरांवर हल्ला करणे तसेच रोही प्राण्यांची संख्या वाढली असल्यामुळे ऊसाच्या व ज्वारीच्या शेतीचे नुकसान होणे ' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. विजय वडेट्टीवार,वि.स.स. यांनी, ' संभाजीनगर येथे पहाडसिंगपुरा परिसरातील बौद्ध लेण्या, प्राचीन बौद्ध वारसा लाभलेल्या परिसरातील टेकडया आणि संरक्षित गुंफा क्षेत्रात भूमाफिया मोठया प्रमाणात उत्खनन करून वाहतूक तस्करी करीत असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. सुनील प्रभू,वि.स.स. यांनी, ' मध्य वैतरणा, मोडकसागर या तलावातून मुंबई महानरपालिकेमध्ये जे पाणी आणले जाते त्याचे वितरण अनियमन पद्घतीने होत असल्यामुळे उपनगरामध्ये पी नॉर्थ आणि पी साऊथ मध्ये मोठया प्रमाणात पाण्याचे दुर्भिक्ष असणे.' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री.अमिन पटेल, वि.स.स (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यानेहिंदी प्रतिवेदन प्रलंबित)

(६) श्री. प्रवीण स्वामी,वि.स.स. यांनी, ' जलजीवन मिशन अंतर्गतच्या अनेक योजना विविध कारणांसाठी रखडलेल्या असून या योजनांतील तांत्रिक अडचणी लवकरात लवकर दूर करून मतदारसंघातील लोकांना या योजनांचा लाभ मिळवून देणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. राजू खरे, वि.स.स. यांनी, 'पंढरपूर शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून या वाहतुकीत अडकलेल्या लोकांकडून स्थानिक पोलीस व वाहतूक पोलीस लाच वसूल करत असणे ' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. चंद्रकांत उर्फ राजूभैय्या नवघरे , वि.स.स. यांनी, ' पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षक भरती प्रक्रियेत उमेदवारांना जास्तीत जास्त ५० प्राधान्यक्रम लॉक करण्याची जाचक अट रद्द करून अमर्याद प्राधान्यक्रम ठेवण्यात येणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) श्री. विजयसिंह पंडित, वि.स.स. यांनी, ' बीड जिल्ह्यातील अनेक पर्यटक, प्रवासी, विद्यार्थी आखाती देशात विशेष करून दुबईमध्ये अडकलेले असून अमेरिका व इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर आखाती देशातून भारत देशात येणाऱ्या विमान सेवा सध्या बंद असल्यामुळे या पर्यटकांना मायदेशी सुखरुप परत आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) डॉ.किरण लहामटे ,वि.स.स. यांनी, ' पेसा क्षेत्रात मानधन तत्वावर १७ संवर्गापैकी ९ संवर्गाची भरती झाली असून क्षेत्रात मानधन तत्वावरील नोकरदारांना नोकरीत कायम करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री.अमोल खताळ ,वि.स.स. यांनी, ' मागील २ वर्षांपासून कांदा उत्पादक शेतकरी विविध कारणांमुळे आर्थिक संकटात सापडला असल्याने शासनाने सदर प्रकरणी तातडीने हस्तक्षेप

करून कांद्याला हमी भाव देऊन निर्यात धोरणात स्थैर्य आणून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याची गरज असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री.विठ्ठल लंघे ,वि.स.स. यांनी, ' श्रावण बाळ संजय गांधी निराधर योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना, इंदिरा गांधी दिव्यांग पेन्शन योजना या योजनांच्या बहुतांश लाभार्थींचे अनुदान मिळणे माहे डिसेंबर, २०२४ पासून बंद झाले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री.मुरजी (काका) पटेल ,वि.स.स. यांनी, ' महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून ' आपला दवाखाना'ही अतिशय महत्त्वाकांक्षी योजना केली असून सद्यःस्थितीत येथे औषधे व डॉक्टर यांचा तुटवडा असल्याने 'आपला दवाखाना ' मध्ये मुबलक औषध साठा उपलब्ध करून देण्यास तत्काळ निर्देश देण्याची आवश्यकता असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री.बाबुराव कोहळीकर ,वि.स.स. यांनी, ' नागपूर, नांदेड, तुळजापूर व सोलापूर या महामार्गावर आतापर्यंत ५० पेक्षा अधिक लोकांचा अपघाती मृत्यू झाला असून हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने सदर ठिकाणी तत्काळ फ्लायओव्हर उभारण्याची आवश्यकता असणे ' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. यांनी, ' नायर रुग्णालयातील वसतिगृहांची अनेक दिवसांपासून नियमित स्वच्छता करण्यात आली नसून तेथे कचऱ्याचे ढीग साचून स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था झाली असल्याने दुर्गंधी पसरुन विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती निर्माण झाली असणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री. विक्रम पाचपुते,वि.स.स. यांनी, ' भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा संप सुरु असून सदरहू कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा संप लवकरात लवकर मिटविण्यासाठी शासनाने सदरहू कर्मचाऱ्यांची मागणी तत्काळ पूर्ण करणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. सिद्धार्थ शिरोळे ,वि.स.स. यांनी, ' केंद्र सरकारच्या आदेशानुसार ऑटोमॅटीक टेस्टींग स्टेशन फीटनेस प्रमाणपत्र देण्यासाठी अनिवार्य करण्यात आल्याने माहे फेब्रुवारी पासून पुणे आरटीओ कार्यालयाकडून रिक्षा, टॅक्सी, बस व ट्रकचे फीटनेस प्रमाणपत्र देणे पूर्णपणे बंद असणे ' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. सुनील प्रभू ,वि.स.स. यांनी, ' पश्चिम रेल्वे प्रशासनाने सफाळे येथील फाटक क्रमांक- ४२ सदर परिसरातील १ लाखांपेक्षा अधिक लोकांची रहदारीची गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने भुयारी मार्ग बांधाण्याची आवश्यकता असणे ' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

८. "शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या पीक नुकसानीवर कायम स्वरुपी उपाययोजना करणे"या विषयासंबंधी सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे, महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सांमत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम, विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु)-

उपरोक्त प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. हरीश पिंपळे
(२) श्री.नानाभाऊ पटोले
(३) श्री. प्रताप अडसड
(४) श्री.शरददादा सोनावणे
(५) श्री.चंद्रदीप नरके
(६) श्री.विजयसिंह पंडित
(७) श्री. प्रवीण तायडे
(८) श्री. रमेश बोरनारे (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

९. 'राज्यातील अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा तसेच शिक्षकांचे विविध प्रश्न प्रलंबित असणे' या विषयावर सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. यांचा प्रस्ताव.

श्री.सुनील प्रभू, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले,—

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला

असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. प्रताप अडसड
(२) श्री.जयंत पाटील
(३) डॉ.ज्योती गायकवाड
(४) श्री.रमेश बोरनारे
(५) श्री.हिरामण खोसकर
(६) श्री. सिध्दार्थ खरात
(७) डॉ.राजू तोडसाम
(८) श्री.विकास ठाकरे
(९) डॉ.बाबासाहेब देशमुख
(१०) श्री.शरददादा सोनवणे
(११)श्री. बापूसाहेब पठारे
(१२) श्री.बाबाजी काळे
(१३) श्री.विक्रम पाचपुते
(१४) श्री.नारायण पाटील
(१५) श्री.महेश सावंत
(१६) श्री. रणधीर सावरकर
(१७) श्री.हारून खान
(१८) श्री. प्रवीण स्वामी
(२०) श्री. संजय देरकर
(२०) श्री.मनोज जामसुतकर
(२१) श्री.अभिजीत पाटील

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक रात्री ०९ वाजून ५५ मिनिटांनी गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ च्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (अ) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(ब) आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अठ्ठावीस तारांकित प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी, "अधिवेशनात जास्तीत जास्त लक्षवेधी सूचना घेणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. गोपीचंद पडळकर, श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी उरोक्त मुद्याबाबत आपले मत व्यक्त केले.

माननीय अध्यक्षांनी सदर बाबतीत खुलासा केला.

जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत यांच्या भेटीसंदर्भात-

जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत श्री. यागी कोजी व अन्य अधिकारी विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

२. (१) वित्त राज्यमंत्र्यांनी, अ) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२०२६ हे प्रकाशन, तसेच ब) वस्तू व सेवा कर संस्था (GSTN) यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी, हाफकिन जीव - औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. म.वि.स. नियम ९७ अन्वये सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

४. (१) सर्वश्री काशिनाथ दाते व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. काशिनाथ दाते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीवरून कळवा येथे बारावीचा पहिलाच पेपर देण्यासाठी जात असताना मुंब्रा-कळवा स्टेशन दरम्यान गर्दीमुळे लोकलमधून पडून सोहम कटरे या विद्यार्थ्याचा

दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडलेली असणे, मुंबईत उपनगरीय रेल्वेत गर्दीमुळे झालेल्या वादात एका शिक्षकाची हत्या झाल्याची घटना ताजी असतानाच, कुर्ला रेल्वे स्थानकात सीएसएमटी टर्मिनसच्या दिशेने जाणाऱ्या धीमी लोकलमधुन शीव स्थानकाजवळ गर्दीच्या रेट्यामुळे सचिन विश्वकर्मा यांचेसह तीन प्रवासी रुळावर पडल्याची घटना दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी घडणे, तीघांपैकी अफझल चौधरी यांची प्रकृती चिंताजनक असणे तर उर्वरित दोघेजण जखमी होणे, मुंबईकरांची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी उपनगरीय लोकल अनेकांसाठी रोजचा जीवघेणा प्रवास ठरत असून वेळेची घाई, उशिराने धावणाऱ्या गाडया, क्षमतेपेक्षा जास्त गर्दी आणि अपुऱ्या सुविधांमुळे लोकल प्रवास कायमचाच धोकादायक ठरणे, सन २०२५ सालामध्ये मुंबई उपनगर रेल्वेवर ४८४१ अपघात घडलेले असून यामध्ये २८७ प्रवाशांचा मृत्यू झालेला असणे तर २२५४ प्रवासी जखमी झाल्याचे निदर्शनास येणे, अधिकृत आकडेवारीनुसार दररोज सरासरी १३ प्रवासी लोकल अपघाताचा बळी ठरत असणे, मुंबई उपनगरी रेल्वे गाड्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र राखीव डबा असावा म्हणून पालकांकडून व विद्यार्थ्यांकडून रेल्वे प्रशासनाला वारंवार निवेदन दिलेली असणे, अपघात टाळण्यासाठी तसेच वाढत्या गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी स्वयंचलित दरवाजे बसविणे व कार्यालयीन वेळेत बदल करण्याबाबत सभागृहात अनेक वेळा चर्चा होऊनही यावर ठोस उपाययोजना करण्याबाबत अद्याप शासनाकडून कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सर्वसामान्य प्रवासी जनता मृत्युमुखी पडणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

परिवहन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (नगरविकास) लक्ष वेधले,—

"नगरपंचायत, केज, जि. बीड येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (BLC) वितरित करण्यात आलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या अनुदान निधीच्या वापरासंदर्भात अत्यंत गंभीर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असणे, लेखापाल, वित्त नियंत्रक/प्राधिकरण कार्यालय, म्हाडा, मुंबई तसेच लेखा विभागाच्या तपासणी अहवालानुसार सुमारे ०३.६२ कोटी रुपयांचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग न करता अनधिकृत व नियमबाह्य कामांसाठी वापरण्यात आला असल्याचे निर्दशनास येणे, तसेच SNA- Zero Balance खात्यात जमा झालेल्या अनुदान व त्यावरील व्याजाची रक्कम

शासनाच्या स्पष्ट निर्देशांनुसार परत न करता इतर कामांवर खर्च केल्याचे आढळून आले असणे, यासंदर्भातील आवश्यक लेखा संचिका, देयके, व्हाऊचर्स व नोंदी उपलब्ध नसून संचिका गायब करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आलेला असणे, या प्रकरणामुळे प्रधानमंत्री आवास योजनेच्या विश्वासार्हतेला धक्का बसत असून सार्वजनिक निधीचा थेट गैरवापर झाला असणे, त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता विशेष समितीमार्फत तातडीने चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करून गैरवापर झालेली संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत क्रमांक ४ वर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(६) सर्वश्री अतुल भातखळकर व इतर वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील कळमेश्वर पोलीस ठाणे हद्दतील राऊळगाव येथील 'एसबीएल एनर्जी लिमिटेड' या स्फोटक निर्मिती करणाऱ्या कंपनीत रविवार, १ मार्च २०२६ रोजी सकाळी भीषण स्फोट झाल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, या भीषण स्फोटामध्ये १८ कामगारांचा मृत्यू झाला असून २४ जण गंभीर जखमी असल्याचे निदर्शनास येणे, सदर कंपनीमध्ये खाणकाम व पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वापरण्यात येणारे स्फोटक व डिटोनेटर तयार करण्यात येत असणे, स्फोटानंतर बचाव कार्यासाठी रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या गाड्यांना खराब रस्ते व दुर्गमतेमुळे पोहोचण्यास विलंब झाल्याने मोठी जीवितहानी झाली असणे, सदरहू कंपनी धोकादायक स्फोटके बनवत असताना सुरक्षिततेच्या नियमांचे उल्लंघन करत असल्याचे प्राथमिक चौकशीतून स्पष्ट होत असणे, या घटनेमुळे औद्योगिक सुरक्षेचे नियम, स्फोटक साठवणूक व हाताळणीसंबंधीचे प्रोटोकॉल तसेच कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेली उपाययोजना याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे, या परिसरातील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असून व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे ही भीषण दुर्घटना झाली असणे, त्यामुळे जिल्ह्यातील सर्व स्फोटक कारखान्यांचे तातडीने सेफ्टी ऑडिट करण्याची आवश्यकता, सदर दुर्घटनेची तात्काळ

उच्चस्तरीय व स्वतंत्र चौकशी करून या निष्काळजीपणाला जबाबदार असणाऱ्या व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता, या घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना व जखमी कामगारांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची व पुनर्वसनासाठी विशेष मदत देण्याची नितांत गरज असणे, तसेच भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी औद्योगिक सुरक्षा नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

कामगार राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) डॉ. विनय कोरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुका हा डोंगराळ व दुर्गम भाग असून शाहूवाडी तालुक्यातील ऐनवाडी-धनगरवाडी या गावातील विद्यार्थ्यांची सातवीपर्यंतची शिक्षणाची सोय असणे, ऐनवाडी-धनगरवाडी येथील लोकवस्तीचा विचार करता माध्यमिक शाळा आवश्यक असणे, तथापि ऐनवाडी- धनगरवाडी येथून ११ किलोमीटर पर्यंत माध्यमिक शाळा नसणे, तेथील बृहत आराखडा रद्द केल्यामुळे अनुदानित शाळा चालविणे कोणत्याही संस्थेला अशक्य झालेले असणे, त्यामुळे धनगरवाडी व आसपासच्या वाड्या-वस्त्यांवरील अनेक विद्यार्थ्यांचे कायमस्वरूपी शैक्षणिक नुकसान होण्याची निर्माण झालेली परिस्थिती, यास्तव विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, या प्रकरणात शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची आवश्यकता, या भागात माध्यमिक शाळा सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यटन मंत्र्यांनी, (शालेय शिक्षण मंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"चंद्रपूर जिल्ह्यातील नारंडा (ता.कोरपना) येथील दालमिया सिमेंट कंपनीमध्ये दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी सल्फ्युरिक ॲसिड टँकर अनलोडिंग प्रक्रियेदरम्यान गंभीर अपघात घडणे, या अपघातात दोन कंत्राटी कामगार रासायनिक द्रव्याने भाजल्यामुळे गंभीर जखमी झाले असून ते सध्या रुग्णालयात उपचार घेत मृत्युशी झुंज देत असणे, धोकादायक रसायन

हाताळताना आवश्यक सुरक्षा साधनांचा अभाव असल्यामुळे सदर अपघात घडणे, प्रमाणित मार्गदर्शक कार्यपध्दत (एस.ओ.पी.) व सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन न होणे, अपघाताची माहिती तात्काळ संबंधित यंत्रणांना देण्यात न येणे, अपघातात गंभीर जखमी झालेल्या कामगारांना व्यवस्थापनाने कोणतेही अर्थसहाय्य न देणे, या घटनेची सखोल चौकशी होऊन दोषींवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कामगारांमध्ये पसरलेला असंतोष, भविष्यात अशा दुर्घटना घडू नये म्हणून उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५. (१) सर्वश्री. आदित्य ठाकरे व इतर वि.स.स. यांचा पुढील म.वि.स. नियम २९३ अन्यवे प्रस्ताव,—

"माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, परिणामी राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद असणे, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, नियोजन विभागांतर्गत विविध योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, परिणामी राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या निकृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेंतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची

शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी भाग घेतला.

(चर्चा अपूर्ण)

(२) सर्वश्री. रणधीर सावरकर व इतर वि.स.स. यांचा पुढील म.वि.स. नियम २९३ अन्यवे प्रस्ताव. (चर्चा पुढे सुरू),—

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri २०२६' ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाअॅग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्य प्राण्यांच्या पीक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अब्दुल सत्तार (२) श्री. बापूसाहेब पठारे

(३) श्री. हेमंत ओगले (४) श्री. नारायण पाटील

(५) श्री. अबु आझमी (६) श्री. दिलीप लांडे

(७) श्री. अर्जुन खोतकर

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा संपली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

६. (अ) (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(ब) (१) (क) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम व अमित झनक, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्याविषयीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावरील चर्चा सुरू झाली.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. संजय मेश्राम (२) श्री. प्रवीण दटके

(३) श्री. विक्रम पाचपुते (४) श्री. सुधीर मुनगंटीवार

(५) श्री. नाना पटोले (६) ॲड. राहुल कुल

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंड २ ते २६ (दोन्ही सम्मिलित) विधेयकांचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंड २ ते २६ (दोन्ही सम्मिलित) विधेयकांचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) महसूल मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "भारत-इंग्लंडदरम्यान मुंबईत होणाऱ्या क्रिकेट सामन्याचे पास लोकप्रतिनिधींना मिळण्याची आवश्यकता," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

(२) (क) उर्जा राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद् वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६ आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, रामदास मसराम, हेमंत ओगले व अमित झनक, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्याविषयीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

उक्त प्रश्नावरील चर्चा सुरू झाली.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुधीर मुनगंटीवार (२) श्री. सिद्धार्थ शिरोळे

उर्जा राज्यमंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंड २ ते १८ (दोन्ही सम्मिलित) विधेयकांचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

७. (१) सर्वश्री. नानाभाऊ पटोले व इतर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्यवे प्रस्ताव.

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले,—

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २०२६ पासून 'मोफत उपचार' सेवा बंद होऊन केसपेपर व शस्त्रक्रियांसाठी शुल्क आकारणी सुरू झाल्याने गरीब रुग्णांचे हाल होत असणे, त्यातच औषधांचा, विशेषतः प्रतिजैविके आणि मनोरुग्णांच्या गोळ्यांचा १.५ वर्षांपासून असलेला तुटवडा चिंतेचा विषय असणे, १,४०० हून अधिक डॉक्टरांची रिक्त पदे आणि भूलतज्ज्ञांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना शेजारील राज्यांत उपचारार्थ जावे लागत असणे, अनेक ग्रामीण रुग्णालयांची गळकी छते, अस्वच्छता आणि फायर एनओसीचा अभाव यामुळे रुग्णांची सुरक्षा धोक्यात आली असणे, राज्यातील औषधी पुरवठ्यामध्ये होत असलेली अनियमितता, प्राथमिक आरोग्यकेंद्र, उपकेंद्र यांची झालेली बिकट परिस्थिती, काही ठराविक औषधांसाठी खरेदी होणे, १०८ वरील रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न होणे, पुण्यातील बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि मुंबईतील ग्रँट मेडीकल कॉलेज (जे.जे.रुग्णालय) या तीन शासकीय महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना दिलेल्या सूचना, यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने अद्यापपर्यंत समितीची स्थापना न करणे, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये शासनाच्या अखत्यारीत असून विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे व पदवी देण्याची जबाबदारी महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ (नाशिक) यांच्याकडे असणे, स्वायतत्ता दिल्यास दोन्ही बाबी एकाच यंत्रणेकडे राहणार असणे, फलटण (जि.सातारा) येथील शासकीय रुग्णालयातील एका महिला डॉक्टरनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये हॉटेलमध्ये गळफास घेऊन केलेली आत्महत्या, आत्महत्या करण्यापूर्वी महिला डॉक्टरांनी दोन आरोपींची उघड केलेली नावे, यासंदर्भात एसआयटी आणि न्यायिक चौकशी करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, दोन्ही चौकशी त्वरीत

पूर्ण करून आरोपीस कडक शिक्षा देण्याची आवश्यकता,राज्यात विशेषतः ग्रामीण भागातील महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने करावयाची उपाययोजना,तसेच राज्यातील रस्त्यांची स्थितीही दयनीय असणे, ग्रामीण भागातील रस्त्यांची निधी अभावी झालेली दुरवस्था, शहरी भागात काँक्रीटीकरणाच्या कामांमुळे वाहतूक कोंडी वाढली असून घोडबंदर रस्ता अपघातांचा सापळा बनला असणे, निकृष्ट डांबरीकरण, अवजड वाहतूक आणि विविध विभागांमधील समन्वयाअभावी नवीन रस्तेही लवकर खराब होत असणे, यामुळे नागरिकांना मणक्याचे आजार जडत असून इंधन आणि वाहनांच्या दुरुस्तीवर मोठा खर्च होत असणे, मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प होणे व अन्न-पाण्याविना नागरिकांचे अतोनात हाल होणे, राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अध्यापन कार्यावर परिणाम होत असणे, शासनाने कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेणे, याला शिक्षक संघटना व विविध संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, कंत्राटी भरतीमुळे शिक्षकांना नोकरीची हमी, वेतनातील समता व सेवा स्थैर्य मिळत नसणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसणे, गुणवत्ता पुर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्याऐवजी कायमस्वरुपी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. बाबासाहेब देशमुख (भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

८. १) श्री.महेश शिंदे, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"राज्यात खाद्य उद्योगांमध्ये पदार्थांचे आकर्षण ग्राहकांला होण्याकरिता वेगवेगळे खाद्य रंग वापरले जात असणे, नैसर्गिक रंग वनस्पती, प्राणि आणि खनिजांमधून मिळविले जात असणे, कृत्रिम रंग रासायनिक प्रक्रियेव्दारे तयार करण्यात येणे, सदरहू खाद्यरंग हे आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांना आयएस मानांकन दिले जात असणे, रासायनिक रंगामुळे खाद्यपदार्थाचे आकर्षण वाढविण्यासाठी सिंथेटिक पदार्थाचा वापर करण्यात आल्यामुळे ते मानवाच्या आरोग्यास अपायकारक असणे, यातील कित्येक रंगामुळे कॅन्सर व अन्य रोग उद्‌भवत असल्यामुळे मानवी आरोग्यास अपायकारक असणे, त्यामुळे अन्य देशांत असे रंग वापरण्यास बंदी घातलेली असतांना देखील आपल्या देशात सर्रासपणे त्याचा वापर होत असणे,

नैसर्गिक रंगाचा वापर खाद्यपदार्थांमध्ये करण्याची आवश्यकता, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असणे, या संदर्भात केंद्र शासनाचा आयएस स्टँडर्डचे मानांकन बदलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने खाद्यपदार्थामध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्य रंगाचे टॉक्सिक स्टडी करून त्यांच्या मानांकनामध्ये बदल करण्याबाबत कायदा करण्याची आवश्यकता, निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन उर्जा स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी क्वांटम फिजिक्स आणि बायोलॉजिकल अप्लाईड सायन्सचा वापर करून औद्योगिक क्षेत्रामध्ये लॅब आणि त्यावरती संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना इन्फ्रास्टक्चर उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

अर्धा-तास चर्चा संपली असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

९. (१) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी खालील अशासकीय ठराव क्रमांक १५ मांडला व भाषण केले,—

"देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर "भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

ठराव प्रस्तुत झाला.

ठरावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. विक्रम पाचपुते

राजशिष्टाचार मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी उपरोक्त ठराव मागे घेण्याची सभागृहाची अनुमती मागितली.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) – (पुढे सुरू)

(२) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"शासन आदेश दिनांक १९ मे, २०२५ नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत एका गावांतर्गत एका वेळी केवळ एकाच शेत रस्त्याचे काम करता येत असणे, शेत रस्त्याची कामे शक्यतो उन्हाळ्यात करावी लागत असणे, त्यामुळे गावातील इतर क्षेत्र रस्त्यांची कामे करण्यास पुरेसा कालावधी उपलब्ध होत नसणे, शेत रस्त्याच्या कामावरील मजुरांची ऑनलाइन हजेरी घेताना शेतात नेटवर्क कमजोर (वीक) असल्याने तांत्रिक समस्या येत असणे,ग्राम रोजगार सेवकांना उद्‌भवणाऱ्या तांत्रिक/ ऑनलाइन समस्या सोडवता याव्यात यासाठी त्यांना वेळोवेळी होणाऱ्या बदलाचे प्रशिक्षण देणे गरजेचे असणे, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामरोजगार सेवकांना दरमहा ८००० रुपये मानधन देण्यास मान्यता देणे, मात्र अद्याप या बाबीची अंमलबजावणी होत नसल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

रोजगार हमी योजना मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याचे शासनाचे धोरण असताना या धोरणाची अंमलबजावणी होत नसल्याचे प्रकर्षाने दिसून येणे, उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार मिळावा या मागणीसाठी राज्यभर सातत्याने आंदालने होत असल्याचे निदर्शनास येणे, मात्र यावर उपाययोजना होत नसल्याचे दिसून येणे, उद्योग व्यवस्थापनांचा उद्दामपणा दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे त्यांना शासनाचा कोणताही धाक उरलेला नसणे, परिणामी स्थानिक भूमीपूत्रांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, स्थानिक भुमीपुत्रांना उद्योगांमध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी चर्चेला उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक रात्री ०९ वाजून ३४ मिनिटांनी शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सव्वीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक १ च्या विषयाशी संबंधित मंत्री सभागृहात सध्या उपस्थित नसल्यामुळे पुढची लक्षवेधी सूचना चर्चेकरिता घेण्यात येईल तसेच लक्षवेधी सूचना क्रमांक १ व २ या एकाच विभागाशी संबंधित असल्यामुळे आता लक्षवेधी सूचना क्रमांक ३ चर्चेकरीता घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, "परभणी बँकेत भरती व अन्य बाबतीत तसेच भंडारा, गोंदिया या बँकांमध्ये झालेल्या घोटाळ्यासंदर्भात आमदारांची समिती नेमण्यासंदर्भात सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता अद्याप झालेली नसणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

ही गंभीर बाब असून हे अधिवेशन संपण्यापूर्वी आश्वासनपूर्ती झाली पाहिजे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

२. (३) कॅप्टन आर. सेल्वन, सर्वश्री. अबू आझमी, अनंत (बाळा) नर, श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्री.अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले –

"महाराष्ट्र राज्य शासनातर्फे अपात्र झोपडीधारकांना पात्र करून घेण्याकरीता अभय योजना राबवली जात असणे, सदर योजना एसआरए मार्फत योग्य पद्धतीने राबवली जात नसल्याने बहुतांश झोपडीधारकांना पात्र होण्याकरिता बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत असणे, याचा फायदा घेऊन विकासक जाणीवपूर्वक नव्याने खरेदी केलेल्या झोपडीधारकांचे नाव पुरवणी परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट न करणे, नवीन खरेदी केलेल्या झोपडीधारकांचे नाव पुरवणी परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करण्यापूर्वी प्रकल्प सुरू करण्यास परवानगी देण्यात येत असणे, त्याचबरोबर सायन येथील विविध प्रकल्पांचा पुनर्विकास रखडला असणे, यामध्ये साईसिटी संस्थेचा पुनर्विकास करण्याकरिता ४ वेळा निविदा काढून एकाही विकासकाने प्रक्रियेत

भाग न घेणे, या परिस्थितीत स्थानिक रहिवाशी यांना विकासक नेमण्याची परवानगी मिळत नसणे, निर्मलनगर संस्थेमधील पात्र झोपडीधारकांना ताबापत्र मिळूनही एसआरएमार्फत सदनिका सील केली असणे, सदर पात्र झोपडीधारकांच्या नावांची जाहिरात वर्तमानपत्रात जाहीर करूनही सदनिकेचा ताबा न मिळणे, निसर्ग संस्थेमधील विकासकाने १९ वर्षे होऊनही नियमांचे पालन न केल्याने इमारत पूर्ण असूनही भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) मिळत नसल्याने सदनिकेचा ताबा मिळण्यास अडचणी येत असणे, त्यामुळे हे सर्व प्रकल्प मार्गी लागण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्र्यांनी (श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक ४ च्या विषयाशी संबंधित मंत्री महोदयांनी विनंती केल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत असून आता लक्षवेधी सूचना क्रमांक १ चर्चेस घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) सर्वश्री. रईस शेख, अमीन पटेल, अस्लम शेख, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. संजय मेश्राम, अबू आझमी, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्री.रईस शेख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले –

"मुंबई शहरात पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथ विक्री अधिनियम २०१४) या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसणे, सदर कायदा लागू होऊन सुमारे १० वर्षे कालावधी झाल्यानंतरही एकसमान अंमलबजावणी अपूर्ण असणे, प्रभावीपणे मुंबई शहरात नगर विक्रेता समिती (Town Vending Committee) गठीत झालेली नसणे, तसेच कायद्याने बंधकारक असलेले प्रतिनिधी त्या समितीमध्ये नसणे, कलम ३ अंतर्गत अपेक्षित असलेले नियतकालिक सर्वेक्षण वेळेत व पारदर्शक पध्दतीने पूर्ण न करणे, मागील सर्वेक्षण व परवाना नोंदणी असूनही पात्र पथ विक्रेत्यांना विक्री परवाना प्रमाणपत्र (Certificates of Vending) जारी न करणे, कलम ३८ अंतर्गत आवश्यक असलेली वैधता सर्वसमावेशकपणे कार्यान्वित न करणे, या वैधानिक त्रुटी असतानाही मुंबईतील विविध भागांमध्ये निष्कासन मोहिमा, रात्री उशिरा टाकले जाणारे छापे, मालाची जप्ती आणि दंड आकारणी केली जात असल्याचे निदर्शनास येणे, कायद्याची पूर्ण अंमलबजावणी न होता प्रशासकीय कारवाया सुरू राहिल्यामुळे मुंबईतील पथविक्रेते व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये मोठ्या प्रमाणावर भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होणे, नियमानुसार नगर विक्रेता समिती कार्यान्वित केली नसणे,

सर्वेक्षण झालेल्या विक्रेता परवाना धारकांना विक्री प्रमाणपत्रे जारी न करणे, कलम ३८ अंतर्गत योजनेची अंमलबजावणी झालेली नसणे, पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथ विक्री अधिनियम २०१४) या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी (श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आता आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक २ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"नाशिक शहरात अतिक्रमण ही अत्यंत गंभीर समस्या झालेली असणे, सदर समस्या अधिक गंभीर करण्यामध्ये नाशिक महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचा मोठा सहभाग असणे, त्र्यंबक रोड, सातपूर कॉलनी परिसरात अनेक खाद्यपदार्थ विक्रेते, फळविक्रेते, भाजीपाला विक्रेते व चिकन विक्रेत्यांनी राजरोसपणे रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे व्यवसाय सुरु केलेला असणे, उटंवाडी-त्रिमूर्ती चौकात वाढत असलेले अतिक्रमण, याबाबत अनेक तक्रारी करुनही त्याकडे संबंधित विभागाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, अतिक्रमण विभागाकडून मनमानी पद्धतीने अतिक्रमण काढण्याची कारवाई होणे, अनेक प्रकरणात दोन नोटीसा होऊन देखील अतिक्रमण काढण्याची कारवाई केली न जाणे, अतिक्रमण काढण्यापूर्वी अतिक्रमण धारकांना पूर्वकल्पना दिली जाणे, त्यामुळे नागरिकांमध्ये अतिक्रमणाचे भय राहिलेले नसणे, अतिक्रमणाची कारवाई करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मागणी केली जाणे, काही खाजगी जागांवर नोटीसा न देता देखील कारवाई केली जाणे, यामुळे शहराला बकाल स्वरूप प्राप्त झाले असणे, यास्तव गेल्या दोन-तीन वर्षापासून अतिक्रमण विभागामार्फत केलेल्या कामकाजाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, विशेषतः प्रशासकीय कालावधीत केल्या गेलेल्या अतिक्रमणाची व प्रलंबित ठेवलेल्या अतिक्रमणांची चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाचे सदर बाबींकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर उच्चस्तरीय समिती स्थापन करून चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-४ पुढे ढकलण्यात येत आहे तसेच लक्षवेधी सूचना क्रमांक-५ शी संबंधित मंत्री महोदय सध्या विधान परिषदेत असल्यामुळे ती नंतर चर्चेला घेण्यात येईल आता लक्षवेधी सूचना क्रमांक ६ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(६) सर्वश्री. भास्कर जाधव, मोहन मते, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात तेरखेडा गावासह परिसरात फटाके बनविण्याचे कारखाने मोठ्या प्रमाणात असणे, या कारखान्यांमध्ये अधूनमधून स्फोटांच्या घटना घडत असून अनेक कामगारांना प्राण गमवावे लागले असणे, तर अनेकांना गंभीर जखमा होऊन अपंगत्व आलेले असणे, असे असतानाही सबंधित फटाका कारखाना मालकांकडून कामगारांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपकरणे पुरविण्यात येत नसल्याने होणाऱ्या स्फोटांमुळे कामगारांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, सदर फटाके कारखान्यांच्या गलथान कारभारामुळे दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास गोजवाडा शिवारातील गट क्र. ५६१ मध्ये बालाजी फायर वर्क या कारखान्यात कच्चा माल ठेवण्यात आलेल्या ठिकाणी स्फोट होऊन कारखान्याचे रोड पूर्णपणे उध्वस्त होणे, या ठिकाणी ४० किलो पेक्षा जास्त मिक्स केलेली स्फोटाची दारू आढळून येणे, स्फोट कशामुळे झाला हे अद्यापही स्पष्ट न होणे, विशेषतः तेरखेडा, खामकरवाडी शिवारात दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी फटाका कारखान्यात प्रचंड स्फोट झाला असतांना त्याचा अहवाल शासनाला देण्यात आलेला नसणे, सदर बाबतीत छोट्या-मोठ्या कारखानदारांनी कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपकरणे व साधनसामग्री खरेदी केलेली नसणे, संबंधित कामगारांना धोका निर्माण होत असल्याने याबाबत राज्य शासनाच्या अखत्यारीतील प्राधिकाऱ्यांना निवेदन देऊनही केवळ व्यवसायिकांचा बचाव करण्यासाठीच्या प्रयत्नामुळे सर्वसामान्य कामगार वर्गात निर्माण झालेली तीव्र चिडीची व संतापाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री. दीपक केसरकर, निलेश राणे, शेखर निकम, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. दीपक केसरकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू बागांमध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात मोहोर येणे, मात्र अवकाळी पाऊस, अचानक तापमानात झालेली घट, थंडीची लाट व बदलत्या हवामानामुळे मोहोर करपणे, फळधारणा न होणे व लहान फळांची मोठ्या प्रमाणात गळती होणे. या संदर्भात सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी मंत्रालयात बैठक घेऊन आंबा व काजू फळपिकांबाबत क्षेत्रीय पाहणी अहवाल सादर करण्यास निदेश दिले असणे, दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ ते २१ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान कृषी विभाग व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांच्या तज्ञांनी संयुक्त पाहणी करणे, त्यानुसार चालू हंगामात आंबा व काजू उत्पादनात सरासरीच्या तुलनेत जवळपास ८५ ते ९० टक्क्यांपेक्षा अधिक घट होण्याची शक्यता असणे, आंबा व काजू हे जिल्ह्यातील प्रमुख नगदी पीक असून हजारो शेतकरी कुटुंबांचे उपजीविकेचे मुख्य साधन असणे, उत्पादनात झालेली मोठी घट शेतकऱ्यांना आर्थिक संकटात नेणारी असणे, सदरहू बाब तातडीची व सार्वजनिक महत्त्वाची असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

फलोत्पादन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

परिवहन मंत्र्यांनी, "राज्यात सुरू असलेला वाहतूकदारांचा संप" इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने नियम ४७ अन्वये निवेदन केले.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७ पुढे ढकलण्यात येत आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची बैठक दुपारी ०२.०० वाजता पुन्हा भरेल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३२ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ०२.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

३. मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी, सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर केला.

सन २०२६-२०२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहास सादर करण्यात आला असून अर्थसंकल्पीय प्रकाशने सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्र शासनाच्या तसेच महाराष्ट्र विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०३ वाजून २५ मिनिटांनी सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चोवीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) पशुसंवर्धन मंत्री यांनी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला

(२) इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांनी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांचे सन २०१५-२०१६ ते सन २०१८-२०१९ या वर्षांचे अनुक्रमे तेहतीसावा, चौतीसावा, पस्तीसावा व छत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

३. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असून सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना त्यांच्या सूचनेवर बोलण्यास अनुमती देत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. जयंत पाटील वि.स.स. यांनी, "जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून विशेषतः सौदी अरेबिया, बहरीन, कतार, कुवेत, युनायटेड अरब एमिरेट्स या देशांत सुमारे १.१ कोटी भारतीय नागरिक सदरहू ठिकाणी राहत असून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे तेथे राहणाऱ्या आपल्या राज्यातील कुटुंबीयांमध्ये भीती, असुरक्षितता, अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असणे," इ. बाबत आपले म्हणणे मांडले.

उक्त सूचनेबाबत माननीय मुख्यमंत्री यांनी खुलासा केला असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. अस्लम शेख वि.स.स. यांनी, "मुंबई शहरात चित्रपट निर्माते, बांधकाम व्यावसायिक, सेलिब्रिटी यांच्या घराबाहेर गोळीबाराच्या वाढत्या घटनां" इ. बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना दिली असून या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

माननीय मुख्यमंत्र्यांनी, भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्वचषक जिंकल्याबाबत भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला व सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच या सभागृहाच्या वतीने हा अभिनंदनाचा प्रस्ताव पास करून ठरावाची एक प्रत भारतीय टीमला पाठवावी अशी विनंती केली.

सभागृहाने अभिनंदनाचा प्रस्ताव सर्वानुमताने संमत केला असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. अबु आझमी वि.स.स. यांनी मुद्दा मांडला. (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी प्रतिवेदन प्रलंबित)

दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या लक्षवेधी सूचनेबाबत स्पष्टीकरण व माननीय विधिमंडळासमोर वस्तुस्थितीदर्शक अहवाल.

संसदीय कार्य मंत्री यांनी, माणिकगढ सिमेंट आणि प्रदूषणासंदर्भात गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी रात्री ८:३० वाजताच्या सुमारास मांडण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेबाबत स्पष्टीकरण व वस्तुस्थिती निदर्शक अहवाल याबाबत सभागृहास अवगत केले व या सर्व बाबींचा विचार करता, संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन रद्द करण्यात यावे आणि त्यांना त्यांच्या मूळ पदावर तात्काळ पुनर्स्थापित करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

शासनाने याबाबतची सविस्तर माहिती माझ्याकडे आणि सभागृहात दिलेली आहे. त्यासंबंधीचा खुलासा प्राप्त झालेला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी देखील त्यांच्याकडून ब्रीफिंगमध्ये कमतरता झाली असेल किंवा त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारचा अनुचित व्यवहार झाला असेल, तर त्यांनी त्यासंदर्भात दिलगिरी व्यक्त केलेली आहे. तालिका अध्यक्षांनी यासंबंधी निदेश दिले होते. परंतु या सर्व बाबींचा विचार करता, आपण केलेले निलंबन मागे घेण्यात यावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी, कल्याण भागामध्ये बिरला कॉलेजच्या ६० ते ७० विद्यार्थ्यांची अकाऊंट्स बँकेत ओपन करून गैरव्यवहार केलेला असणे, त्यामुळे ते विद्यार्थी अतिशय चिंतेत असणे, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

या प्रकरणी माहिती घेऊन उचित कार्यवाही केली जाईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. अतुल भातखळकर वि.स.स. यांनी, कांदिवली (पूर्व) येथील लोखंडवाला येथे दोन दिवसापूर्वी रात्री अनधिकृत फेरिवाल्यांच्या विरोधात महानगरपालिकेचे कर्मचारी कारवाई करीत असताना त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न काहींनी केला असणे, त्यामुळे हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य सर्वश्री.अबु आझमी, अतुल भातखळकर यांनी जी माहिती सभागृहाला दिली आहे त्या माहितीची नोंद शासनाने घेऊन उचित कारवाई करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली.

३. (१) डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. अमिन पटेल, अस्लम शेख, रामदास मसराम, संजय मेश्राम, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. ज्योती गायकवाड वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राज्यात लग्नात हुंडा घेणे कायद्याने गुन्हा असणे, मात्र प्रत्येक गावात/ तांड्यात आणि शहरांमध्ये लोक अजूनही हुंडा म्हणून रोख रक्कम, सोन्याचे दागिने, दुचाकी- चारचाकी वाहने इत्यादी घेत असणे, त्यामुळे प्रत्येक मुलीच्या पालकांना त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी खूप मोठया प्रमाणावर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, कित्येकदा मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च मुलींच्या पालकांना करावा लागत असणे, या प्रथेमुळे मुलींच्या कित्येक पालकांनी आत्महत्या केल्याचीही उदाहरणे असणे, पालकांचे दुःख पाहून कित्येक मुलीही आत्महत्या करण्याचा मार्ग निवडत असणे, त्यामुळे शासनाने हुंडा प्रतिबंधक कायद्यातील तरतूदींची परिणामकारक अंमलबजावणी, जनजागृती करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत व्यक्त होणारा असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्रीमती श्वेता महाले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्री यांचे लक्ष वेधले,—

"राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (अ, ब, क, ड) इतर मागास प्रवर्ग तसेच विशेष मागास प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना राज्य शासनाच्या विविध नोकर भरती परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गाचे बरोबरीने परीक्षा शुल्क आकारणी होत असणे, उदाहरणार्थ खुल्या प्रवर्गासाठी एखाद्या परीक्षेचे शुल्क १००० रुपये असेल तर मागासवर्गीय प्रवर्गासाठी परीक्षा शुल्क ९०० रुपये असणे, खुला प्रवर्ग व राखीव प्रवर्गाच्या परीक्षा शुल्कात केवळ १०० रुपयांचा फरक असणे, भरमसाठ परीक्षा शुल्कांमुळे उक्त उल्लेखित प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना नोकर भरती अर्ज करताना आर्थिक अडचणी येत असणे,त्यामुळे खुल्या प्रवर्गाचे तुलनेत मागास वर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना परिक्षा शुल्क ५०% ने कमी होणे गरजेचे असणे, वाढीव परीक्षा शुल्कांमुळे मागास प्रवर्गातील बेरोजगार

शासकीय नोकरी मिळवण्याच्या संधीपासून वंचित राहत असणे, यामुळे उक्त प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांमध्ये नैराश्याची भावना निर्माण झाली असणे,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

माहिती तंत्रज्ञान मंत्री यांनी (मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री. सुभाष देशमुख, संजय केळकर, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती सुलभा गायकवाड वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राज्यात नगरपरिषदा, नगरपालिका, नगरपंचायती व महानगरपालिकांची लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांची निवड झालेली असताना पुरेश्या प्रमाणात कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ त्यांच्या मदतीला नसणे, त्यामुळे आगामी काळात सर्वच क्षेत्रातील विकास कामे विलंबाने होणार असणे, यास्तव राज्यातील सर्वच महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपालिका व नगरपंचायती मधील नोकर भरतीचा तातडाने आढावा घेऊन सर्व रिक्त पदे भरण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, सदर रिक्त पदे भरत असताना स्थानिक बेरोजगार युवकांना या क्षेत्रात संधी देण्याबाबतचा सर्वंकष असा आराखडा तयार करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"सन २००९ मध्ये स्थापना झालेल्या वसई विरार महानगरपालिकेने आतापर्यंत सी.सी.(C.C.) दिलेल्या जवळपास २००० इमारतींपैकी बहुतांश इमारतींचे बांधकाम पूर्ण होऊनही जवळपास ९०% इमारतींना अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) दिलेले नसणे, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत वसई विरार क्षेत्रात भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी अभय योजना लागू करण्याचे आदेश देण्यात येणे, मात्र अद्याप या आदेशांची अंमलबजावणी न होणे, इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र न घेणाऱ्या विकासकांच्या

इतर मालमत्तांवर बोजा लावून त्यांचा नवीन प्रकल्प मंजूर केला जाणार नाही असे आश्वासन दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी विधानसभा सभागृहात शासनाकडून दिलेले असणे, तसेच या विकासकांची "काळी यादी" तयार करून राज्यातील सर्व महानगरपालिकांना पाठविण्याचे निर्देश सन्माननीय तालिका अध्यक्षांकडून दिलेले असणे, मात्र अद्याप यावर महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही न होणे, जनतेची फसवणूक करणाऱ्या विकासकांना पाठिशी घालण्यासाठी मालमत्तांचा बाह्ययंत्रणा सेवा पुरवठादाराद्वारे सर्व्हे करण्यात येत असल्याचे कारण महानगरपालिकेने देणे, मूळातच ज्या इमारतींना महानगरपालिकेने स्वतः भोगवटा प्रमाणपत्र दिले आहेत ती इमारत पूर्ण झाली आहे काय, त्यातील बांधकामात अनियमितता आहे काय, हे तपासण्यासाठी बाह्ययंत्रणेची गरज काय, याचे उत्तर महानगरपालिकेने न देणे, परिणामी अजूनही या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू केली गेली नसल्याने नागारिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्रीमती विद्या ठाकूर, श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या ठाकूर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"मुंबईतील सिद्धार्थनगर पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प गेली १८ वर्षे रखडलेला असणे, गोरेगाव पश्चिमेतील म्हाडाच्या जमिनीवरील हा एक मोठा प्रकल्प असणे, विकासक काम अर्धवट सोडून गेल्यानंतर म्हाडाकडून हा प्रकल्प ताब्यात घेऊन पूर्ण केला जाणे, इमारती बांधून तयार असताना देखील अद्यापी घरांचा ताबा रहिवाशांना देण्यात आलेला नसणे, संस्था आणि म्हाडा यांच्यातील सुधारित विकास करारनामा झालेला नसणे, रहिवासी आणि म्हाडा यांच्यात करावयाचा वैयक्तिक करारनामा (PAAA) झालेला नसणे, इमारतीच्या निकृष्ट दर्जाबाबत तपासणी करण्याचे काम मा.उच्च न्यायालयाने वीरमाता जिजाबाई तंत्रशिक्षण संस्था (VJTI) यांना दिलेले असणे, त्याबाबतचा अहवाल अजूनपर्यंत शासनास प्राप्त झालेला नसणे, सदनिकांचा ताबा मिळण्यास होत असलेला विलंब, म्हाडामार्फत या संपूर्ण प्रकरणात होत असलेली टाळाटाळ, तसेच म्हाडातर्फे रहिवाशांना मिळत असलेल्या मासिक भाड्यात न झालेली वाढ, यामुळे रहिवाशांमध्ये शासनाविरुद्ध निर्माण झालेला संताप व असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

खनिकर्म मंत्री, (श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचेकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सन्माननीय सदस्य श्री. सुनिल प्रभू यांच्या विनंतीनुसार सदरहू लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत असून उद्या विशेष बैठकीमध्ये घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

४. माननीय अध्यक्षांनी पुढील प्रस्ताव मांडला,—

"दि.०८ मार्च, २०२६ हा दिवस "आंतरराष्ट्रीय महिला दिन" म्हणून जागतिक स्तरावर साजरा करण्यात येणे, नारी शक्तीच्या प्रेरणास्थानी असलेल्या मा.आई जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या या पुण्यभूमीत महिला सक्षमीकरण व बळकटीकरणाच्या विविध कल्याणकारी योजना आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिला वर्गात आत्मविश्वास व आत्मनिर्भरता निर्माण करणे, ४ थ्या महिला धोरणामध्ये विहित शाश्वत विकास व महिला सक्षमीकरण या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने प्रत्येक विभागासाठी कृती कार्यक्रम व त्यासाठी अपेक्षित विकास मोजमापाचे निर्देशांक निश्चित केलेले असणे, त्याच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून शासनाने आरोग्य, कायदा, बचतगट, सहकारी संस्था, महिला कामगार, महिला ऊसतोड कामगार, अत्याचार पीडीत महिला यांचेसाठी अनेक कार्यक्रम घेण्याची आवश्यकता, या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूद करणे, असंघटीत कामगार विशेषतः महिला कामगारांसाठी विशेष कार्यक्रमांची असलेली आवश्यकता, शासनाने शेतकरी व शेतमजूर महिलांसाठी तसेच महिला शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना, महाराष्ट्रात महिलांच्या सर्वसमावेशक आर्थिक सबलीकरणासाठी महिला बचत गट व महिला सहकारी संस्थांचे बळकटीकरण करणे, शहरी उपजिविका अभियानांद्वारे महिलांमधील कौशल्य व उद्योजकता वृध्दिंगत करणे व त्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, आदिवासी व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशिल क्षेत्रांमध्ये महिला वन कामगार, वनोत्पादकांचे संकलन, वननिवासी महिला निसर्ग पर्यटन तसेच वन व पर्यावरण संवर्धनात महिलांचा प्रभावी सहभाग व शाश्वत विकासाठी कृती कार्यक्रम राबविणे, किशोरवयीन मुलींना आरोग्य, पोषण, सुरक्षितता व स्वच्छतेबाबतचे प्रशिक्षण देणे, महिलांमध्ये डिजिटल साक्षरता तसेच ई-गव्हर्नन्स प्रणालीबाबत जागरुकता निर्माण करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचे क्षमतावर्धन करून महिलांमधील नेतृत्वगुणांचा विकास करणे, लिंगसापेक्ष अर्थसंकल्पिय तरतूदींबाबत जागरुकता निर्माण करणे, स्त्री-पुरुष समानतेप्रती अर्थधोरण राबविणे, महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रभावी कायदे तयार करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, महिलांमध्ये डिजीटल व्यवहार व

सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करून डिजीटल प्रणालीमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याच्यादृष्टीने प्रशिक्षण देणे, कौटुंबिक हिंसाचार व अत्याचारग्रस्त महिलांचे सक्षमीकरण, समुपदेशन व पुनर्वसन करणे, महिलांसाठी दुग्धव्यवसाय पतसंस्था, हस्तकला, स्वयंसहायता गट, महिला बचत गट, महिलांसाठी अनुरुप शहरी कौशल्य केंद्रे, महिला उद्योजकांसाठी सार्वजनिक-खाजगी-भागिदारी उपलब्ध करून देणे, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला, महिला कामगार यांचे सक्षमीकरण करणे, महिला विकासाच्या अनुषंगाने प्रत्येक विभागाने विभागनिहाय कृती कार्यक्रम जाहीर करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची अपेक्षा विचारात घेता यासंदर्भात शासनाने करावयाची उपाययोजना."

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्रीमती मनिषा चौधरी
(२) श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव
(३) श्रीमती सुलभा खोडके
(४) डॉ.ज्योती गायकवाड
(५) श्रीमती श्वेता महाले
(६) श्रीमती सरोज अहिरे
(७) श्रीमती श्रीजया चव्हाण
(८) श्रीमती स्नेहा दुबे पंडित
(९) श्रीमती मंदा म्हात्रे
(१०) श्रीमती सुलभा गायकवाड
(११) श्री. अर्जुन खोतकर
(१२) श्री. सुधीर मुनगंटीवार
(१३) श्री.सुरेश धस
(१४) श्री.हेमंत ओगले
(१५) श्री.नारायण पाटील
(१६) श्री.मुरजी (काका) पटेल
(१७) श्री.बालाजी कल्याणकर
(१८) श्री.अभिजीत पाटील

महिला व बालविकास मंत्री यांनी प्रस्तावावरील चर्चेस उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

५. वित्त राज्यमंत्री यांनी पुढील प्रस्ताव मांडला,—

"अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियम २४६ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

६. विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम व दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, सन्माननीय सदस्या डॉ. ज्योती गायकवाड, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्री. विश्वजीत कदम, साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम व अमित झनक यांचे प्रस्ताव अनुक्रमे मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

राज्यातील ऑटो रिक्षा परवान्यांच्या संख्येवर निर्बंध घालण्याबाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

श्री. हिरामण खोसकर वि.स.स. यांनी, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता कुंभमेळ्या निमित्त माझ्या मतदारसंघात टाकीआर्च ते शिरीघाट या दरम्यान रस्त्याचे काम सुरु आहे. मात्र त्या ठिकाणी सुरु असलेल्या कामासंबंधी कुठल्याही प्रकारचे सूचना फलक लावण्यात आलेले नसणे. त्यामुळे त्या ठिकाणाहून सकाळी मोटरसायकलवरुन जात असताना त्या ठिकाणी खोदण्यात आलेल्या ३ मिटर खोल खड्यात पडून एका तरुण आदिवासी मुलाचा करुण अंत झाला असणे, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने यासंबंधी उचित कार्यवाही करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

शासनाने याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

७. माननीय तालिका सभाध्यक्षांनी सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुनील प्रभू (२) श्री. अमिन पटेल

चर्चा अपूर्ण..

शासकीय विधेयके – (पुढे सुरू..)

(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

(२) महसूल मंत्री यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम व दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, सन्माननीय सदस्य सर्वश्री. विश्वजित कदम, साजिद पठाण, रामदास मसराम, हेमंत ओगले व अमित झनक यांचे प्रस्ताव अनुक्रमे मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(ब) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

(३) महसूल मंत्री यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबधीच्या प्रस्तावावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अनिल पाटील (२) श्री. सुनील प्रभू

(३) श्री. सुरेश धस (४) श्री. हेमंत ओगले

(५) श्री. बापूसाहेब पठारे (६) श्री.चेतन तुपे

महसूल मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा- (चर्चा पुढे सुरू..)

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(३) श्री. अतुल भातखळकर
(४) श्री. अर्जुन खोतकर
(५) श्री. प्रकाश (दादा) सोळंके
(६) श्री. कालिदास कोळंबकर
(७) श्री. प्रविण स्वामी
(८) श्री.हेमंत ओगले
(९) श्री. शिवाजी पाटील
(१०) श्री.बालाजी कल्याणकर
(११) श्री. अभिजित पाटील
(१२) श्री. दिलीपराव बनकर
(१३) श्री. सुनिल कांबळे
(१४) श्री. चंद्रदीप नरके
(१५) श्री. हिरामण खोसकर
(१६) श्री. हिकमत उढाण
(१७) श्री. किसन वानखडे
(१८) श्री. सुहास बाबर
(१९) श्री. प्रशांत ठाकूर
(२०) श्री. दिपक केसरकर
(२१) श्री. आनंद तिडके

चर्चा अपूर्ण..

सभागृहाची बैठक रात्री ११ वाजून १४ मिनिटांनी मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ९.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.

मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६

विधानसभेची विशेष बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.४५ वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्रीमती विद्या ठाकूर, श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"मुंबईतील सिद्धार्थनगर पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प गेली १८ वर्षे रखडलेला असणे, गोरेगाव पश्चिमेतील म्हाडाच्या जमिनीवरील हा एक मोठा प्रकल्प असणे, विकासक काम अर्धवट सोडून गेल्यानंतर म्हाडाकडून हा प्रकल्प ताब्यात घेऊन पूर्ण केला जाणे, इमारती बांधून तयार असताना देखील अद्यापी घरांचा ताबा रहिवाशांना देण्यात आलेला नसणे, संस्था आणि म्हाडा यांच्यातील सुधारित विकास करारनामा झालेला नसणे, रहिवासी आणि म्हाडा यांच्यात करावयाचा वैयक्तिक करारनामा (PAAA) झालेला नसणे, इमारतीच्या निकृष्ट दर्जाबाबत तपासणी करण्याचे काम मा.उच्च न्यायालयाने वीरमाता जीजाबाई तंत्रशिक्षण संस्था (VJTI) यांना दिलेले असणे, त्याबाबतचा अहवाल अजूनपर्यंत शासनास प्राप्त झालेला नसणे, सदनिकांचा ताबा मिळण्यास होत असलेला विलंब, म्हाडामार्फत या संपूर्ण प्रकरणात होत असलेली टाळाटाळ, तसेच म्हाडातर्फे रहिवाशांना मिळत असलेल्या मासिक भाड्यात न झालेली वाढ, यामुळे रहिवाशांमध्ये शासनाविरुद्ध निर्माण झालेला संताप व असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्रीमती सना मलिक, श्री. सुधीर मुनगंटीवार, डॉ. आशिष देशमुख,डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्रीमती सना मलिक, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधल,—

राज्यात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने शासनाने सुरु केलेली शिवभोजन थाळी योजना ही राज्यातील गरीब, मजूर, रुग्ण, विद्यार्थी, स्थलांतरित कामगार तसेच सर्वसामान्य गरजू नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली लोककल्याणकारी योजना असणे, या योजनेमुळे राज्यातील लाखो नागरिकांना प्रतिदिन स्वस्त

व पौष्टिक भोजन उपलब्ध होत असून हजारो महिला बचत गटांना तसेच युवकांना मोठया प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध झालेली असणे, या योजनेचा २० लाख गरजवंत नागरिक लाभ घेत असून राज्यामध्ये किमान १८०० शिवभोजन केंद्रे असणे, या योजनेच्या केंद्रांमुळे ९००० कुटूंबांचा उदरनिर्वाह होत असणे, शिवभोजन योजनेच्या अनुदानाचे सुमारे २०० कोटी रुपये शासनाकडून थकविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीपासून राज्यातील अनेक शिवभोजन केंद्रचालकांना देय असलेले अनुदान प्राप्त न झाल्यामुळे या केंद्राची आर्थिक घडी विस्कटली असून अनेक केंद्रे बंद झालेली असणे, तर उर्वरित सुरु असलेली केंद्र केव्हाही बंद पडण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, परिणामी गरीब आणि गरजू नागरिकांना स्वस्त व पौष्टिक भोजन उपलब्ध होत नसल्यामुळे राज्यातील गरीबांना अन्नापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, तसेच या योजनेची केंद्रे बंद पडल्यास हजारो लोकांचा रोजगार बंद होऊन दैनंदिन उपजिवीका तसेच घरातील वृध्दांच्या आरोग्याचा खर्च, लहान मुलांचे शिक्षण आणि उपजिवीकेसाठी उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे उपासमारीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता, सदरहू बाब लक्षात घेता शासनाने शिवभोजन योजना थाळीचे थकीत अनुदान संबंधित केंद्र चालकांना देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री. हारून खान , हिरामण खोसकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे (सार्वजनिक उपक्रम वगळून) वेधले,—

"नाशिक जिल्ह्यातील देवळाली विधानसभा मतदार क्षेत्रातून शासनाचा प्रस्तावित रिंगरोड प्रकल्पाचा मार्ग नियोजित असून त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु असल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकल्प विकासाच्या दृष्टीने महत्वाचा असला तरी देवळाली (जि.नाशिक) मधील शेतकऱ्यांच्या जमिनी या त्यांच्या कुटुंबांचा आधारस्तंभ असून त्यांनी पिढयानपिढया जोपासलेल्या असणे, त्यामुळे त्यास शेतकऱ्यांचा विरोध असणे, त्याचप्रमाणे सदर रिंगरोडसाठी, पुणे रिंगरोडप्रमाणे विशेष पॅकेज देण्याबाबत शेतकऱ्यांनी मागणी केलेली असणे, तसेच सदर बाहय रिंगरोड हा वनजमीन वा शासकीय भूखंड क्षेत्रातून प्रस्तावित करण्याची शेतकऱ्यांची मागणी असणे, त्याचबरोबर बाधित घरे, विहिरी, व्यवसाय इत्यादी वाचविण्यासाठी अलाइनमेंट बदल

करणे, पुणे रिंगरोडप्रमाणे विशेष मोबदला पॅकेज देणे वा पाचपट वाढवून अधिकचा मोबदला व पुनर्वसन योजना तसेच अरिंगळे मळा परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडवून प्रकल्प राबविण्यात यावा अशा मागण्या तेथील शेतकऱ्यांकडून करण्यात आलेल्या असणे, परिणामी सदर प्रकल्प राबविला गेल्यास शेतकऱ्यांचा होणारा उद्रेक व शासनाप्रति निर्माण होणारा असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे (सार्वजनिक उपक्रम वगळून)निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. प्रवीण तायडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"अमरावती जिल्ह्यातील अचलपूर नगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०१८-२०१९ मध्ये अमृत योजनेचे २२ कोटी रुपयांचे काम असणे, ही योजना अचलपूर नगरपालिका क्षेत्रामधील नागरिकांना कोणतीही अडचण न येता व योग्यरित्या नळाद्वारे मुबलक प्रमाणात पाणी मिळण्याकरिता असणे, मात्र या योजनेच्या माध्यमातून नागरिकांना कोणताच फायदा न होणे, नागरिकांना पाण्याची अडचण निर्माण होणे, त्यांच्या घरापर्यंत २२ कोटी रुपये खर्च करून सुद्धा पाणी न मिळणे, नळ न जोडता फक्त पाईप लाइन टाकून ठेवली असणे, यामुळे पाण्याची उपलब्धता असताना तसेच एवढा निधी खर्च करून देखील नागरिकांचे हाल होत असणे, या अमृत योजनेमध्ये काम पूर्ण न होता निधी खर्च केलेला असणे, सन २०१८ ते २०१९ मध्ये राबविलेल्या अमृत योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला असणे, त्यामुळे या योजनेची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री. कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, मोहन मते, प्रताप अडसड, राजन नाईक, वि.स.स यांची लक्षवेधी सूचना.

श्री. प्रवीण दटके, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"नागपूर शहरामध्ये ना.सु.प्र. ने लीजवर दिलेले मालकी हक्काचे भूखंड निवासी, औद्योगिक, वाणिज्यिक या उपयोगाकरिता दिलेले असणे, या भूखंडांवर ना.सु.प्र. द्वारे ग्राउंड रेंट घेण्यात

येणे, यात निवासी भूखंडाची संख्या - ५५,७१९, औद्योगिक – २१६३, वाणिज्यिक - ४०१५ व अन्य भूखंड फ्री होल्ड करण्यासंदर्भात ना.सु.प्र. ठराव क्र. ३/१२३६ दिनांक ७ डिसेंबर, २०२५ रोजी एकमताने मान्यता दिलेली असणे, या सर्व भूखंडधारकांकडून टक्केवारीप्रमाणे रकम वसूल करून जमीन विनियोग १९८३ नवीन नियम २७ फ्रि-होल्ड करण्याचा निर्णय एकमताने झालेला असणे, अप्पर मुख्य सचिव यांना पत्र क्रमांक ६१०५, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी शासनास सादर झालेले असणे, नागपूर शहराच्या दृष्टीकोनातून या महत्वपूर्ण विषयावर शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"मुंबईतील दहिसर परिसरातील भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या नियंत्रणाखालील रडार स्थलांतर करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०२५ मध्ये घेण्यात आला असला तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप पूर्ण झालेली नसणे, परिणामी दहिसरमधील अनेक पुनर्विकास प्रकल्पांवर उंची मर्यादा लागू राहिल्याने आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे (NOC) मिळण्यास अडथळे निर्माण झाले असणे, त्यामुळे संबंधित प्रकरणांमध्ये महानगरपालिकेकडील अंतिम बांधकाम परवानग्या न मिळणे, सदर परवानग्या प्रलंबित राहिल्या असून अनेक प्रकल्प रखडलेले असणे, जीर्ण इमारतीतील रहिवासी तात्पुरत्या निवासस्थानी स्थलांतरित झालेले असून त्यांना वेळेवर भाडे न मिळणे, आर्थिक ताण वाढणे, यामुळे विकासक व सदनिकाधारक यांच्यात वाद निर्माण होणे, अशा समस्या उद्‌भवलेल्या असणे, दहिसर मधील हजारो कुटुंबांच्या सुरक्षित निवासाचा प्रश्न असल्याने रडार स्थलांतर प्रक्रियेचा स्पष्ट व कालबद्ध आराखडा जाहीर करावा तसेच प्रलंबित प्रकल्पांना अंतरिम उंची सवलत देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) सर्वश्री. राजेश वानखडे, सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. राजेश वानखडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता लक्ष वेधले,—

"जल जीवन मिशन अंतर्गत चांदूरबाजार, अचलपूर व भातकुली या तालुक्यांकरिता १०५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना शासनाद्वारे माहे जानेवारी, २०२२ मध्ये मंजूर करून त्याचे कार्य प्रगतिपथावर असणे, तिवसा मतदारसंघातील एकूण ४० गावे खारपान पट्ट्यातील क्षारयुक्त पाण्याची असणे, या योजनेची भौतिक प्रगती केवळ ५० टक्के व आर्थिक प्रगती ६० टक्के एवढी झालेली असणे, परंतु माहे जानेवारी, २०२५ पासून झालेल्या २२ कोटींच्या कामांची देयके निधी अभावी प्रलंबित असणे, त्याचप्रमाणे सुधारित योजना मंजूर न झाल्यामुळे विविध पाईपलाईनची कामे सुद्धा प्रलंबित असणे, या योजनेअंतर्गत येणारी सर्व गावे हे खारपाणपट्ट्यात असणे, त्यामुळे नागरीकांना योजना पूर्णत्वास जाऊन तातडीने गोड पाणीपुरवठा होणे गरजेचे असणे, उन्हाळ्याच्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरीकांची योजना पूर्णत्वास नेण्याची मोठी मागणी असणे, निधी अभावी योजना पूर्णत्वास न गेल्यामुळे नागरीकांमध्ये शासनाप्रति रोष निर्माण झालेला असणे, या योजनेकरिता तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, सदरहू योजना तातडीने पूर्णत्वास जाण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

पाणी पुरवछा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली. स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता सुरु झाली.

१. (१) सहा तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) एक तारंकित प्रश्न हा सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाला.

(३) तारांकित प्रश्नांच्या यादीतील बत्तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. संसदीय कार्य मंत्र्यांनी, महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२५ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ ते दिनांक १४ डिसेंबर, २०२५ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ४६१ आश्वासनांची यादी तसेच

सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २४६ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवली.

३. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

माननीय अध्यक्षांनी सभागृहात पुढील दोन घोषणा केल्या,—

(१) सर्व सन्माननीय सदस्यांना विदित आहेच की, दिनांक ८ मार्च हा दिवस "जागतिक महिला दिन" म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. विद्यमान अर्थसंकल्पीय अधिवेशनात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून "महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण" या विषयावर माननीय मुख्यमंत्री, दोन्ही माननीय उपमुख्यमंत्री, माननीय कृषी मंत्री, दोन्ही सभागृहांचे सन्माननीय सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते ११.४५ या वेळेत मध्यवर्ती सभागृहात चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमात डॉ. नीलम गोऱ्हे, मा. उप सभापती या प्रमुख वक्त्या म्हणून तसेच श्रीमती पंकजा मुंडे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री, श्रीमती आदिती तटकरे, महिला व बालविकास मंत्री, श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. तथा महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या समिती प्रमुख, श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स., डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स. आपले विचार व्यक्त करतील. उक्त कार्यक्रमास कै. एम. एस. स्वामिनाथन, कृषी तज्ञ यांच्या कन्या डॉ. सौम्या स्वामिनाथन व डॉ. नित्या राव उपस्थित राहणार आहेत. कृपया सदर कार्यक्रमास आपण सर्वांनी अवश्य उपस्थित रहावे.

(२) " दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी विधानसभा सभागृहामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरू असताना अभ्यागत श्री. नितीन हिंदुराव देशमुख व श्री. सर्जेराव बबन टकले यांनी विधान भवन, मुंबई येथील मुख्य पोर्च येथे आपापसात धक्काबुक्की करीत अत्यंत आक्षेपार्ह कृत्य करून महाराष्ट्र विधानसभेची प्रतिष्ठा व प्रतिमा मलिन केल्याने श्री. नितीन हिंदुराव देशमुख व श्री. सर्जेराव बबन टकले यांच्यासंदर्भातील विशेषाधिकार भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणात त्यांना २ (दोन) दिवसांच्या कारावासाची शिक्षा देण्यात यावी", असा ठराव दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी विधानसभा सभागृहाने संमत केला होता. त्यानुसार माझे सही व शिक्क्यानिशी श्री. नितीन हिंदुराव देशमुख व श्री. सर्जेराव बबन टकले यांना "Warrant of Commitment" बजावण्यात आले होते. त्यानुषंगाने मला पोलीस उप आयुक्त, क्राईम ब्रँच, मुंबई व अतिरिक्त अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांचेकडून कळविण्यात आले आहे की, श्री. नितीन हिंदुराव देशमुख यांना दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ०६.४५ वाजता

अटक करून कारागृह अधीक्षक, आर्थर रोड, मुंबई यांच्या स्वाधीन करण्यात आले व त्यांना आर्थर रोड कारागृहात दाखल करण्यात आले. त्यांना दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी संध्याकाळी ०६.३५ वाजता कारागृहातून मुक्त करण्यात आले. तसेच पोलीस अधीक्षक, सांगली व अधीक्षक, सांगली कारागृह (वर्ग-२) यांचेकडून कळविण्यात आले आहे की, श्री. सर्जेराव बबन टकले यांना दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी १६:२० वाजता ताब्यात घेऊन त्यांना जिल्हा कारागृह, सांगली येथे दाखल करण्यात आले व त्यांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी १७.४० वाजता कारागृहातून मुक्त करण्यात आले.

४. सन२०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला पुढे सुरुवात झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. जयंत पाटील

(चर्चा अपूर्ण)

(१) महसूल मंत्र्यांनी, 'राज्यात एकूण ११ अपर जिल्हाधिकारी कार्यालयांची निर्मिती करणे ' इ.बाबत म.वि.स.

नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(२) महसूल मंत्र्यांनी, ' मोजणी प्रकरणांचा जलद, पारदर्शक व गुणवत्तापूर्वक निपटारा करण्यासाठी खाजगी परवानाधारक भूमापक/भूमापन अभिकरण यांची मोजणीकामी नियुक्ती करणे. ' इ.बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

सन२०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला पुढे सुरुवात झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(२) श्री. दिलीप वळसे-पाटील
(३) श्री. संजय केळकर
(४) श्री. निलेश राणे
(५) श्री. बाबाजी काळे
(६) श्री.नानाभाऊ पटोले
(७) श्री.बापूसाहेब पठारे
(८) डॉ. विनय कोरे
(९) ॲड. राहुल कुल
(१०) श्री. कैलास घाडगे-पाटील
(११) श्री.अमोल खताळ
(१२) श्री.संजय मेश्राम
(१३) श्रीमती सरोज अहिरे

(१४) श्री. अबु आझमी
(१५) श्री. शरद सोनावणे
(१६) श्रीमती नमिता मुंदडा
(१७) श्री. संजय उपाध्याय
(१८) श्री.विजयबाबू शिवतारे
(१९)श्री.राजकुमार बडोले
(२०)श्री.महेश सावंत
(२१)डॉ.नितीन राऊत
(२२) श्री. नारायण (आबा) पाटील
(२३) श्री.बबनराव यादव (लोणीकर)
(२४) श्रीमती मंजुळा गावित
(२५) डॉ. किरण लहामटे
(२६) श्री. उत्तमराव जानकर
(२७) श्री. सत्यजीत देशमुख
(२८) श्री. सिद्धार्थ खरात
(२९) श्री. मुरजी पटेल (काका)
(३०) श्री.अमित देशमुख
(३१) श्री.आशुतोष काळे
(३२) डॉ.अतुलबाबा भोसले
(३३) श्री.अमित झनक
(३४) श्री. अनंत(बाळा) नर
(३५) श्री. विठ्ठल लंघे
(३६) श्री. विश्वजीत कदम
(३७) श्री.शेखर निकम
(३८) श्री. गोपिचंद पडळकर
(३९) श्री. संजय देरकर
(४०) श्री. रणधीर सावरकर
(४१) श्री. बाबुराव कदम-कोहळीकर
(४२) डॉ. ज्योती गायकवाड
(४३) श्री. काशिनाथ दाते
(४४) श्री.चरणसिंग ठाकूर
(४५) श्री. हारून खान
(४६) श्रीमती सुलभा गायकवाड
(४७) श्री. मनोज जामसुतकर
(४९) श्रीमती स्नेहा दुबे
(५०) श्री.गजानन लवटे
(५१) श्री. प्रवीण तायडे
(५२) श्री.करण देवतळे
(५३) श्री. विक्रम पाचपुते
(५४) श्री. देवराव भोंगळे
(५५) श्री. देवेंद्र कोठे

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक रात्री ०१ वाजून १० मिनिटांनी बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ रोजीच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात दुपारी १२.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "राज्यातील हॉटेल्समधील गॅस पुरवठा बंद होणे, त्यावर राज्य सरकारकडून निवेदन होणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

पेट्रोलियम गॅस हा जरी केंद्र सरकारच्या अखत्यारितील विषय असला तरी राज्यातील जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून राज्य सरकार करत असलेल्या उपाययोजनांची माहिती सभागृहाला देण्यात यावी, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, "स्वीकृत कपात सूचनांबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देणे," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

१. (अ) सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(ब) आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील सोळा तारांकित प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी,—

(क) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(ख) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(ग) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(घ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे

(ड.) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(च) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ ते सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचे सन २०१९-२०२० ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "जेएनपीटी बंदरावर शेतकऱ्यांचा पडलेला माल," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

राज्य शासन याची दखल घेईल, असे संसदीय कार्यमंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, "घरगुती आणि व्यावसायिक सिलिंडरचा पडलेला तुटवडा," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

३. (१) श्री. महेश शिंदे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राज्यातील शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयात बनावट शुल्क वाढ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असल्याची अनेक उदाहरणे असणे, ठाणे जिल्ह्यातील शहापूर पोलिस स्टेशन आणि आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांच्याकडे तक्रार नोंदविण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, तसेच या कार्यालयातील ठेकेदारी पध्दतीने भरती केलेल्या कर्मचा-यांचे नियमबाहय वेतन वाढ करणे, शुल्क नियामक प्राधिकरणमधील सदस्यांनीही अध्यक्षांच्या विरोधात तक्रारी नोंदविण्यात येणे, अशा अनेक तक्रारी उच्च व तंत्रशिक्षण कार्यालयात करण्यात येणे, शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयाच्या कॅग ऑडिटमध्ये अनेक गंभीर अनियमितता निदर्शनास येणे, बनावट शुल्क वाढ प्रस्ताव मंजूर करून महाविद्यालयाच्या तपासणीसाठी विद्यार्थ्यांच्या पैशाने आलिशान गाडी खरेदी करणे व महाविद्यालयात एकदाही भेट न देणे, यासंदर्भात अनेक वेळा तक्रार करुनही कोणतीच कारवाई होत नसल्याने तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाचे तत्कालीन संचालक व आदिवासी विकास विभागाने भ्रष्टाचाराबाबत केलेल्या पत्रव्यवहारांची दखल न घेणे आणि प्राधिकरण सदस्याने पंतप्रधान कार्यालयासह उच्च व तंत्रशिक्षण विभाग व सर्व वरिष्ठ कार्यालयांना भ्रष्टाचाराबाबत तक्रार करून दखल न घेतली जाणे, यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, होतकरू गरीब विद्यार्थ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया आणि भूमिका."

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. हेमंत ओगले, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"हरेगाव (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनीपैकी ४ हजार एकर जमीन झेडआरटू ग्रुप होल्डिंग्स लिमिटेड या कंपनीच्या प्रकल्पासाठी ४९ वर्षांच्या भाडेकराराने देण्याकरिता एम.आय.डी.सी. (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) ला हस्तांतरित करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २३ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास घेतलेला असणे, परंतु सदर जमिनीबाबत मा. उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) खंडपीठाने सदर जमिनी मूळ खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना देण्यात याव्यात याबाबत दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास निकाल दिला असणे, शासनाने सदर निकालाप्रमाणे वाटप करणेबाबत मा. उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) खंडपीठात दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास प्रतिज्ञापत्र दाखल केले असणे, मा. उच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे सदर जमिनींचे खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना वाटप करण्याऐवजी शासनाने वेळकाढूपणा करून आता सदरहू जमीन खासगी कंपनीला देण्याचा निर्णय घेतलेला असणे, परिणामी येथील खंडकरी शेतकरी व त्यांचे कायदेशीर वारस यांच्यामध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री गोपिचंद पडळकर, दौलत दरोडा, बबनराव यादव (लोणीकर), सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. गोपिचंद पडळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर विभागातील संघटनांकडून सनदशीर मार्गाने अनेकवेळा लढा उभारण्यात आला असणे, भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांना मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई, खंडपीठ नागपूर यांचेकडील मूळ अर्ज क्र.४३६/२०१७ पवनकुमार केवटे व इतर ९८ मधील दिनांक १४ जानेवारी, २०२० चे आदेशान्वये अद्यापही तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नसणे, तसेच मा.मंत्री महसूल यांचे अध्यक्षतेखाली संघटना प्रतिनिधी यांचेसोबत मंत्रालय, मुंबई येथे दिनांक ४ जून, २०२५

रोजी झालेल्या बैठकीत भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करणेबाबत आश्वासित करुनही अद्यापही मागण्या मान्य झाल्या नसणे, विभाग व शासन स्तरावरुन याबाबत केवळ वेळकाढूपणा करून कर्मचाऱ्यांचे संविधानिक न्याय हक्कांवर गदा व दबावतंत्र आणण्याचे काम सुरु असणे, न्याय मिळत नसल्याने व्यथित होऊन नाईलास्तव राज्यभरातील समस्त कर्मचाऱ्यांनी भूमि अभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य चे अंतर्गत आंदोलन करण्याचा इशारा दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या निवेदनाद्वारे शासनास दिलेला असणे, भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबतची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, त्यानुसार भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. मंगेश चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग ७५३८ च्या विस्तारीकरणासाठी झालेल्या मुक्ताईनगर तालुक्यातील भूसंपादन प्रक्रियेत मोठया प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झालेला असणे, सदर भूसंपादनसंदर्भात कलम ३(ड) अन्वये अंतिम अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध होऊन प्रस्तावित जमिनी केंद्र शासनाकडे कायदेशीररित्या निहित झाल्यानंतरही संबंधित जमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार, हक्कसोडपत्रे, पुनर्हस्तांतरणदस्त इत्यादी नोंदविण्यात येऊन भविष्यात मिळणारा भूसंपादन मोबदला बेकायदेशीरपणे मिळविण्याचा प्रयत्न झाल्याची शक्यता असणे, त्याचप्रमाणे महसुली अभिलेख्यात जिरायत जमिनी अचानक बागायत दर्शविणे, पाईपलाईन अथवा सिंचन सुविधांचा दाखला देताना संबंधित जल प्राधिकरणांची पूर्वपरवानगी न घेणे, तसेच कलम ३(ब) अन्वये संयुक्त मोजणी अहवालात (JMS) वारंवार संशयितरित्या अवैधरित्या फेरफार होणे, काही ठराविक व्यक्तींना अनुचित लाभ मिळाल्याचा व शासनाची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाल्याचा दाट संशय निर्माण होणे, वाढीव भरपाईसाठी वेळोवेळी खोटे शपथपत्र दाखल करून शासनाची दिशाभूल करणे, या सर्व बाबींमुळे शासनाची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झालेली असण्याची शक्यता निर्माण होणे, या सर्व घटना एकमेकांशी संबंधित, पूर्वनियोजित व संगनमताने घडवून आणल्या असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत असणे, परिणामी भूसंपादन प्रक्रियेची पारदर्शकता व विश्वसनीयता यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे, यासंदर्भात सदर प्रकरणाची तातडीने विशेष तपास पथक (SIT) मार्फत उच्चस्तरीय चौकशी करून दोषीं विरुद्ध तात्काळ फौजदारी स्वरूपाचे गुन्हे

दाखल करण्यासह शासनास झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई वसूल करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

४. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

(४) श्री. विश्वजित कदम, वि.स.स. यांनी, "आखाती देशांमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना तातडीने मदत करणे, तसेच दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथील स्व. यशवंतराव चव्हाण आणि राजर्षी शाहू महाराज यांचे पुतळे अद्याप न बदलणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

५. मुख्यमंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला.

"अर्थसंकल्पातील अनुदानासाठीच्या मागण्यांवर चर्चा व मतदानाच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियम २५१ (१) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

६. माननीय अध्यक्षांनी खालील मंत्र्यांच्या विभागांच्या अनुदानाकरिता मागण्या एकत्रितपणे चर्चेस टाकल्या,–

ए-१, ए-२, ए-३, ए-४, ए-५, ए-६, ए-७, ए-८, ए-९, ए-१०, सी-१, सी-२, सी-३, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी१०, सी-१२, ई-२, ई-३, ई-४, ई-५, ओ-१, ओ-२, ओ-३, ओ-४, ओ-६, ओ-७, ओ-८, ओ-९, ओ-१०, ओ-११, ओ-१२, ओ-१३, ओ-१४, ओ-१५, ओ-१६, ओ-१७, ओ-१८, ओ-१९, ओ-२०,ओ-२१, ओ-२२, ओ-२३, ओ-२४, ओ-२५ओ-२६, ओ-२७, ओ-२८, ओ-२९, ओ-३०, ओ-३१, ओ-३२, ओ-३३, ओ-३४, ओ-३५, ओ-३६, ओ-३७, ओ-३८, ओ-३९, ओ-४०, ओ-४१, ओ-४२, ओ-४३, ओ-४४, ओ-४५, ओ-४६, ओ-४७, ओओ-४८, ओ-४९, ओ-५०, ओ-५१, ओ-५२, ओ-५३, ओ-५४, ओ-५५, ओ-५६, ओ-५७, ओ-५८, ओ-५९, ओ-६०, ओ-६१, ओ-६२, ओ-६३, ओ-६४, ओ-६५, ओ-६६, ओ-६७, ओ-६८, ओ-६९, ओ-७०, ओ-७१, ओ-७२, ओ-७३, ओ-७४, ओ-७५, ओ-७६, ओ-७७, ओ-७८, ओ-७९, ओ-८०, ओ-८१, ओ-८२, ओ-८३, ओ-८४, ओ-८५, एस-१, एस-२, एस-३, एस-४, एस-५. (चर्चा पुढे सुरू)

मागण्यांवरील चर्चा सुरू झाली. चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. विजय वडेट्टीवार (२) श्री. सुभाष देशमुख

(चर्चा अपूर्ण)

(५) श्री. शरददादा सोनवणे, वि.स.स. यांनी, "जुन्नर येथे एका विद्यार्थ्याने मुलीवर जीवघेणे हल्ले केल्याप्रकरणी अधिकाऱ्यावर तातडीने कारवाई करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

तालिका सभाध्यक्षांनी, शासनाने नोंद घ्यावी, असे सांगितले.

याबाबत सर्व माहिती घेऊन सभागृहाला कळविण्यात येईल, असे वन मंत्र्यांनी सांगितले.

मागण्यांवरील चर्चा सुरू झाली. चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(३) श्री. सुनील प्रभू (४) श्री. आमश्या पाडवी

(चर्चा अपूर्ण)

(६) श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांनी, "चौघुले फ्टॅक्ट येथील सगळे धंदे बंद करणे तसेच ट्रकची वाहतूक बंद करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मागण्यांवरील चर्चा सुरू झाली. चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(५) श्री. बापूसाहेब पठारे

(चर्चा अपूर्ण)

(७) श्री. प्रवीण दटके, वि.स.स. यांनी, "नागपूर शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली. चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(६) श्री. आशुतोष काळे (७) श्री. अबु आझमी

(८) श्री. नाना पटोले (९) श्री. मोहन मते

(१०) श्री. जयंत पाटील (११) डॉ. राहुल पाटील

(१२) श्री. विठ्ठल लंघे (१३) श्री. विनोद निकोले

(१४) श्री. शंकर मांडेकर (१५) श्री. राजू तोडसाम

(१६) डॉ. नितीन राऊत
(१७) श्री. अमोल खताळ
(१८) श्री. सुलभा खोडके
(१९) श्री. कैलास घाडगे पाटील
(२०) श्री. नारायण कुचे
(२१) श्री. हिरामण खोसकर
(२२) श्री. हेमंत ओगले
(२३) श्री. बालाजी किणीकर
(२४) श्री. रईस शेख
(२५) श्री. गजानन लवटे
(२६) श्री. सुरेश भोळे
(२७) श्री. आनंद तिडके
(२८) श्री. प्रवीण दटके
(२९) श्री. रामदास मसराम
(३०) श्री. संजय देरकर
(३१) श्री. शंकर जगताप
(३२) श्री. सुहास बाबर
(३३) श्री. राजेश पवार
(३४) श्री. बाबुराव कोहळीकर

वने मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री, शालेय शिक्षण मंत्री, माहिती तंत्रज्ञान मंत्री महसूल राज्यमंत्री, वित्त व नियोजन राज्यमंत्री यांनी मागण्यांवरील चर्चेला उत्तर दिले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

(अ) पुरःस्थापनार्थ,—

(१) वित्त राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीनेपुरःस्थापित केले.

सभागृहाची बैठक रात्री ०९ वाजून ४९ मिनिटांनी गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ०९ वाजून ४५ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६

विधानसभेची विशेष बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.४५ वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सभागृहात एकही मंत्री उपस्थित नसल्याने सभागृहाची बैठक सकाळी ०९ वाजून ४७ ते ०९ वाजून ५७ मिनिटांपर्यंत १० मिनिटांसाठी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी ०९ वाजून ५७ मिनिटांनी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

(१) श्री. संदीप क्षीरसागर, श्रीमती मोनिका राजळे वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. संदीप क्षीरसागर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"बीड व शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यातून जाणारा खरवंडी –ब्रम्हनाथ येळंब-आर्वी –खालापुरी –नवगन राजुरी या राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ या रस्त्याच्या कामाकरिता १९९ कोटी रुपयांची मान्यता माहे जून,२०१८ मध्ये आदेश देऊन १८ महिन्यात काम पूर्ण करण्याचे उद्दीष्ट असताना सात वर्षाचा कालावधी झालेला असतानाही अद्याप रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास येणे, सदर रस्त्याकरिता भूसंपादन अद्याप पूर्ण झाले नसल्याने ब्रम्हनाथ येळंब, मुंगूस वाडी जांब व नवघन राजुरी या गावांमधील रस्त्यांची कामे अदयापही रखडलेली असणे, तसेच भूसंपादन बाधितांना अदयाप जमिनीचा मोबदला मिळालेला नसणे, भूसंपादन व रस्त्याचे काम अपूर्ण असल्याने कामाच्या किंमतीमध्ये झालेली वाढ,परिणामी ९ कोटींचा वाढलेला अधिकचा खर्च, रस्त्याच्या भूसंपादनास विलंब झाल्यामुळे शासनाला आर्थिक भुर्दंड सोसावा लागणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. नरेंद्र मेहता, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"मिरा-भाईंदर क्षेत्रात MMRDA मार्फत अनेक विकास कामे प्रगतीपथावर असणे, त्यापैकी जे. कुमार या ठेकेदाराने कामासाठी आवश्यक कास्टिंगयार्डची मौ.चेणा सर्व्हे क्र१४१,१४३ व इतर येथे उभारणी करणे, सदरची जागा ही जे.कुमारच्या मालकीची असून येथील काही जागा इकोसेन्सिटिव्ह झोन व आदिवासी आरक्षणाने बाधित असणे, इकोसेन्सिटिव्ह झोन तथा आदिवासी विभागाची कोणतीही परवानगी न घेता स्वतःच्या मालकीची जागा असून देखील या ठेकेदाराने MMRDA कडून जेथे जमिनीच्या विक्रीचे बाजार मूल्य २० करोड रुपये असताना तेथे तब्बल ८० करोड रुपये भाडे स्वरूपात एम.एम.आर.डी.ए.कडून वसूल करणे, तसेच या ठेकेदारास दहिसर मेट्रो स्थानकाची मूळ निविदा ६० कोटींची असताना त्यात वाढीव दर देऊन सुप्रमा न देता तब्बल १२० कोटींची निविदा काढून काम देणे, प्रत्यक्षात मेट्रो ९ चे काम २०२३ ला पूर्ण होणे अपेक्षित असताना २०२६ उजाडून देखील काम पूर्ण न होणे, काम पूर्ण न होऊन देखील त्यांच्यावर अद्याप कोणताही दंड न आकारता वाढीव रक्कम MMRDA कडून देण्यात येणे, मेट्रोच्या खाली बांधण्यात आलेला समांतर उड्डाणपूल देखील निविदेच्या प्रत्यक्ष रकमेपेक्षा जास्त दराने तसेच सदर उड्डाणपुलाच्या ठरलेल्या नियोजित नकाशांमध्ये परस्पर बदल करून MMRDA मार्फत जे.कुमार या ठेकेदाराला देण्यात येणे, अवाजवी घेतलेली भाड्याची रक्कम, कामात केलेली दिरंगाई, मूळ निविदेच्या रकमेत झालेली वाढ, निविदा न देता करण्यात आलेले उड्डाणपूलाचे काम, यामुळे शासनाचे झालेले नुकसान याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. सुनील शेळके, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"पुणे जिल्ह्यातील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत सुमारे ९,९०० एकर क्षेत्र येत असून, २०२१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ४८ हजार ९६३ होती, परंतु सद्यःस्थितीमध्ये सदर लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली असणे, सदर भागातील विकासकामांसाठी केंद्र सरकारकडून कोणताही निधी प्राप्त होत नसताना येथील जकात कर आणि प्रवेश शुल्क बंद झाल्याने बोर्ड आर्थिक संकटात असणे, कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन दिले जात नसून पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, पथदिवे, औषध फवारणी अशा मूलभूत गरजांबाबत नागरिक त्रस्त

असणे, राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विकासकामांकरिता आजतागायत भरघोस निधी मंजूर झाला असून सदर विकासकामांना कॅन्टोन्मेंट बोर्डाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने मंजूर विकासकामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असणे, स्थानिक नागरिकांकडून सदर कॅन्टोन्मेंट बोर्ड बरखास्त करून येथे स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याची तीव्र मागणी होत असून प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, परिणामी सदर भागातील नागरिकांना सोयी-सुविधांपासून वंचित राहावे लागत असून सदर गंभीर बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी निर्माण झालेला असंतोष याप्रकरणी शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री. करण देवतळे, देवराव भोंगळे वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. करण देवतळे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"अनेक वर्षांपासून विदर्भ मल्टी सर्व्हिसेस ही कंपनी नगरपरिषद वरोरा, जि.चंद्रपूर मध्ये पाणी पुरवठ्याची देखभाल दुरुस्तीची कामे करीत असणे, गेल्या दीड वर्षांपूर्वी पालिकेच्या दूषित पाणी पुरवठ्यामुळे मालवीय वॉर्ड येथील एका चार वर्षीय बालकाचा मृत्यू झाला असणे, तसेच दूषित पाणी पिण्यामुळे शहरातील अनेक नागरिकांना साथीच्या रोगांची लागण होऊन शहरातील आरोग्याची समस्या बिकट झाली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण पसरले असणे, त्यामुळे विदर्भ मल्टी सर्व्हिसेस कंपनीविरुद्ध पोलीसांत गुन्हा दाखल झाल्यामुळे या कंपनीला त्वरित काळ्या यादीत टाकण्याची मागणी नागरिक व लोकप्रतिनिधींनी केली असणे, परंतु अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसणे, शासनाने तात्काळ सदरहू कंपनीला काळ्या यादीत टाकून कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) पाच तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नांच्या यादीतील तेवीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. (१) माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांनी, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सन २०२२ ते सन २०२४ या वर्षांचे अनुक्रमे पन्नासावा, एकावन्नावा व बावन्नावा वार्षिक एकत्रित अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवला.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२४ -२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) उद्योग राज्यमंत्र्यांनी, (क)पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल व (ख)विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. श्री.शंकर जगताप (समिती सदस्य), यांनी शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात नेमून दिलेले अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, अशासकीय विधेयकांच्या इंग्रजी अनुवादाबाबत मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

माननीय अध्यक्षांनी यासंदर्भात कायदेशीर तरतुदी नमूद करून आपले विचार मांडले..

४. माननीय अध्यक्षांनी सभागृहात पुढील घोषणा केली,—

"मुंबई शहरात पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथ विक्री अधिनियम, २०१४) या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत" या विषयावरील लक्षवेधी सूचनेवर दिनांक ६ मार्च, २०२६ राजी विधानसभा सभागृहात चर्चा झालेली आहे. या चर्चेच्या अनुषंगाने या विषयासंबंधी माननीय मंत्री, बृहन्मंबई महानगरपालिकेचे आयुक्त व मुंबईचे पोलीस आयुक्त

यांची बैठक शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता माझ्या दालनात (०४०) आयोजित करण्यात आली आहे. या विषयाच्या संदर्भात इच्छूक असणाऱ्या विधानसभा सदस्यांनी बैठकीस उपस्थित रहावे.

५. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांनी, " निराधार बातम्या प्रकाशित करून मानहानी व जनसामान्यात प्रतिमा मलीन करणे" या विषयाबाबत यांनी अकोला जिल्ह्यातील (१) उमेश अलोने (ए.बी.पी माझा), (२) श्री.अक्षय गवळी (साम टि.व्ही), ३) श्री.रविराज मोरे (वचक लोकशाही वृत्तपत्र) आणि (४) श्री.संजय आठवले (महाव्हाईज चॅनल) यांचे विरुद्ध विशेषाधिकारभंगाची सूचना असून सन्माननीय सदस्यांनी त्यावर आपले म्हणणे थोडक्यात मांडावे, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांनी उक्त सूचना मांडली व त्या पुष्ट्यर्थ आपले म्हणणे मांडले.

या संदर्भातील माहिती मागवून पुढील कार्यवाही केली जाईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री.महेश लांडगे, वि.स.स. यांनी, ' पिंपरी-चिंचवड शहरातील चाकण औद्योगिक वसाहतीत जवळजवळ २० हजार लघु उद्योजक असून अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धामुळे या उद्योजकांची परिस्थिती अत्यंत गंभीर बनलेली असणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

६. (१) सर्वश्री. सत्यजित देशमुख, डॉ. विनय कोरे, श्री. निलेश राणे वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"शिराळा विधानसभा मतदारसंघ परिसरासह लगतच्या तालुक्यातही बिबटयांच्या संख्येत प्रचंड वाढ होऊन मानवी वस्तीत मोठया प्रमाणात शिरकाव झालेला असल्याचे निदर्शनास येणे, बिऊर (ता.शिराळा) येथे ६ वर्षाच्या बालकाची बिबटयाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी घडली असणे, सदर घटनास्थळी वन विभागाचे अधिकारी वेळेत हजर न झाल्याने संतप्त जमावाने वन विभागाच्या कार्यालयाची नासधूस करणे, शिराळा कार्यालयातील वनक्षेत्रपाल पारधी यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित करणे, नरभक्षक बिबटयास त्वरीत ठार/जेरबंद करण्याची मागणी नागरीकांनी प्रशासनाकडे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे केलेली असणे, उक्त ठिकाणी बिबटया लहान मुले, शेळी व पाळीव कुत्र्यांना भक्ष्य करीत असल्याच्या वारंवार घटना घडत असल्याने नागरीकांची

जीवितहानी व मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, गव्यांच्या हल्ल्यांच्या घटना वारंवार घडत असणे, सदर ठिकाणच्या वन्य प्राण्यांच्या वाढत्या हल्ल्याने मानवी जिवीतास मोठा धोका निर्माण झाल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण निर्माण झालेले असणे, त्यानुषंगाने बिबटयांपासून पूर्णतः संरक्षण होणेकामी त्यांना पकडून त्यांच्या मूळ अधिवासात सोडणे, निर्बिजीकरण करणे, सापळे लावणे, ठार मारण्याची परवानगी मिळणे, स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवाना, सद्यःस्थितीत बिबट्याचा वावर पूर्णतः मानवी अधिवासात असल्याने शेड्युल १ मधून शेड्युल २ मध्ये समावेश करण्याची आवश्यकता असल्याबाबतची मागणी मा.वने मंत्री व स्थानिक प्रशासनाकडे वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली असणे, सदर बाबत कार्यवाही करण्यास दिरंगाई, टाळाटाळ केली जात असणे, उक्त प्रकरणी शासनाकडून सत्वर चौकशी करून संबंधित दोषींना निलंबित करणे, मृतांच्या कुटूंबियांना तसेच जखमींना उपचाराकरीता त्वरीत आर्थिक मदत देणे, तसेच उक्त ठिकाणच्या वन्य व हिंस्त्र प्राण्यांचा वाढता प्रादुर्भाव कायमस्वरुपी रोखण्याकरीता शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री सिध्दार्थ खरात, चेतन तुपे, प्रतापराव पाटील चिखलीकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश विटेकर, मनोज कायंदे, वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सिद्धार्थ खरात, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराची पाणी पातळी गेल्या ६ महिन्यांपासून सातत्याने वाढत असणे, कमळजा मातेचे मंदिर आणि गैबनशहा दर्गा तसेच इतर प्राचीन मंदिरे पूर्णतः पाण्याखाली जाणे, लोणार सरोवराच्या पाणी पातळीत २० ते २५ फुटांची लक्षणीय वाढ होणे, अशीच स्थिती कायम राहिल्यास सरोवराचे रुपांतर सामान्य तलावात होऊन पर्यटन व स्थानिक अर्थव्यवस्थेचे मोठया प्रमाणात नुकसान होण्याची निर्माण झालेली शक्यता, सातत्याने वाढणाऱ्या पाणी पातळीवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात या मागणीसाठी दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी लोणार शहर कडकडीत बंद ठेवण्यात येणे, लोणार सरोवरातील नैसर्गिक समतोल राखून त्याचे वैभव अबाधित ठेवण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशान्वये पाणी पातळी वाढीसंदर्भात चौकशी व उपाययोजना करण्यासाठी माहे जानेवारी, २०२६ मध्ये आ.आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येणे, सदर समितीने अद्यापही कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना न करणे, तसेच लोणार सरोवराच्या

विकासासाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये व मा.न्यायमूर्तींच्या देखरेखीखाली गठीत करण्यात आलेल्या "लोणार सरोवर व संवर्धन समिती" मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक अभ्यासक, संशोधक यांचा समावेश करण्यात आलेला नसणे, त्यामुळे सदर समितीच्या कामकाजाबाबत स्थानिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला असणे, उक्त समितीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक अभ्यासक, संशोधक यांचा समावेश करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"नवी मुंबईमध्ये सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या उद्यान, मैदाने, नाले तसेच आरक्षित असलेल्या भूखंडांवर भूखंड माफियांनी सर्रासपणे अनधिकृत बांधकामे उभारली असणे, तसेच सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या सामाजिक सेवेच्या आरक्षित असलेल्या अशा अनेक भूखंडावर अनधिकृत बांधकाम करणे म्हणजे एक प्रकारे गुन्हा असणे, ज्या आरक्षित भूखंडांवर भूमाफियांनी गोडाऊन, भंगाराचे दुकान, नर्सरी, ढाबे असे विविध प्रकारचे उत्पन्न निर्माण करणारे अनधिकृत बांधकाम उभारले असणे, नवी मुंबईमध्ये सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकी जागेवर अनेक अनधिकृत बांधकामे झाली असणे, तसेच भूमाफियांनी सर्व नियमांचे उल्लंघन करून अनधिकृत बांधकामांचा सपाटा लावला असणे, सिडको प्रशासनाने व नवी मुंबई महानगरपालिकेने किती अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली व कधी केली, सदर अनधिकृत बांधकामांमध्ये कोण कोणत्या आजी माजी नगरसेवकांची नावे आहेत, त्याचबरोबर या अनधिकृत बांधकामांना शह देण्याकरिता संबंधित अधिकारी यांचे पाठबळ असणे हे तपासणे अत्यंत महत्वाचे असणे, याबाबत सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या आरक्षित असलेल्या भूखंडांवर अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या भूमाफिया व अधिकाऱ्यांवर शासनाने कायदेशीर कारवाई करण्याची गरज, तसेच नवी मुंबईकरांना या अनधिकृत बांधकामांच्या विळख्यातून बाहेर काढण्याकरीता व अनधिकृत बांधकामधारकांवर व त्याला जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याकरीता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्रीमती तुकाराम काते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"चेंबूर येथील न. भूक्र. ४६९- अ महाराष्ट्र शासनाच्या शासकीय जागा बांधा, वापरा, हस्तांतर करा या तत्त्वावर सध्याच्या हब टाऊन या खाजगी कंपनीला ज्या अटी आणि शर्तींवर देण्यात आली त्या सर्व अटी आणि शर्तींचे सदरच्या खाजगी विकासकाच्या कंपनीने उल्लंघन केले असणे, अटी व शर्तींनुसार सदर विकासकामे सर्वप्रथम सर्व शासकीय इमारतींचे बांधकाम करून देणे क्रमप्राप्त असणे, त्यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह व इतरही शासकीय कार्यालयांच्या इमारतींचा समावेश असणे, परंतु सर्व इमारतींचे बांधकाम अत्यंत संथ गतीने सुरु असणे, कधी कधी तर ते बांधकाम बंदच ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असणे, या विकासकाने सदरचे बांधकाम बंद ठेऊन त्याने त्याच्या स्वतःच्या विक्री करता असलेल्या इमारतीचे व त्यामधील व्यापारी गाळे या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून स्वतःचा फायदा केला असणे, शासकीय इमारतींचे अटी आणि शर्तींनुसार सदर काम विहीत कालावधीत पूर्ण करून देणे क्रमप्राप्त असणे, भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभागृहाचे बांधकाम हे विकासक पूर्ण करत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब असणे, त्यांनी शासकीय जागा ज्या अटी व शर्तींवर विकास करण्यासाठी घेतलेली आहे त्यांचे उल्लंघन केले असून त्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री. विठ्ठल लंघे, हेमंत ओगले,वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. विठ्ठल लंघे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"अहिल्यानगर जिल्ह्यातील सन १९९२ पासून मंजुरी प्राप्त बेलापूर (श्रीरामपूर)-परळी प्रस्तावित रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण पूर्ण होऊन जून, २०२२ मध्ये अहवाल रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आलेला असताना, केवळ २.५५ टक्के RoR दाखवत दिनांक २६ सप्टेंबर २०२२ रोजी केंद्र शासनाकडून स्थगिती देण्यात आलेली असणे, राज्य शासनाने २०१९ मध्येच ५० टक्के आर्थिक सहभागाचे पत्र दिले असून सहभागानंतर RoR उणे ०.८७ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहील असे स्पष्ट करण्यात आलेले असतानाही प्रकल्प प्रलंबित ठेवण्यात येणे, परिणामी हा भागातील जनतेवर अन्याय करणारा निर्णय असल्याची भावना तीव्र होणे, अ.नगर-बीड-परळी, बारामती-लोणंद-फलटण, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव हे तोट्यातील प्रकल्प मंजूर असताना

सदर मार्ग स्थगित ठेवण्यात येणे, या प्रकल्पासाठी उपोषणे व तीव्र आंदोलन झालेले असून मा. मुख्यमंत्री यांनीही पाठपुराव्याचे आश्वासन दिलेले असताना देखील अद्याप ठोस प्रगती न झाल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावरील स्थगिती उठवून प्रकल्पास तात्काळ मंजुरी देण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

परिवहन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. सुहास बाबर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी, तासगाव, जत तसेच सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात अनेक गलाई बांधव कारागीर हे पिढ्यानपिढ्या देशभरातील विविध शहरांमध्ये सोने-चांदी रिफायनरी व सराफी व्यवसायात वस्तू निर्मितीचे काम करत असणे, देशभरात अंदाजे २ लाख प्रत्यक्ष व १० लाख अप्रत्यक्ष कामगारांची उपजीविका या व्यवसायावर अवलंबून असणे व कोट्यवधी रुपयांचा महसूल शासनाकडे जमा होत असणे, असे असतानाही जुना आयपीसी कलम ४११ तसेच नव्या बीएनएस कलम ३१७ अंतर्गत चोरीसंदर्भातील तरतुदींचा अवाजवी वापर करून पोलिसांकडून सातत्याने त्रास दिला जात असणे, शासन निर्णयानुसार चौकशी प्रक्रियेची अंमलबजावणी होत नसणे, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर संयुक्त समन्वय समिती स्थापन न झाल्याने व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, तसेच या व्यवसायास लघुउद्योगाचा दर्जा नसल्याने कर्ज सुविधा व संरक्षणात्मक उपाय मिळण्यात अडचणी येत असणे, या सर्व बाबींचा विचार करून संबंधितांना लघुउद्योग दर्जा देणे, समन्वय समित्या स्थापन करणे व पोलिस कारवाईस स्पष्ट मार्गदर्शक तत्वे लागू करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. चंद्रदीप नरके वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"आधी नंदापूर मग पंढरपूर" अशी ख्याती असलेले नंदवाळ हे प्रतिपंढरपूर म्हणून सर्व राज्यांमध्ये परिचित असणे, प्रतिवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला या ठिकाणी अंदाजित पाच लाखाहून अधिक प्रमाणात वारकरी दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून भेट देत असणे, सदर

दिंडी सोहळ्यामध्ये "गोलरिंगण सोहळ्याचे" आयोजन होत असणे, सदर सोहळ्याकरिता आवश्यक असणारी जागा नंदवाळ येथील गायरान गट क्र. ६३ मधील ४६ हेक्टर जमीन, भारत राखीव बटालियन क्र. ३ व राज्य राखीव पोलीस बल यांना देणेबाबतचा शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी झालेला असणे, परंतु सदर निर्णयास नंदवाळ ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी सदरची जागा बटालियनला देणेसाठी तीव्र विरोध करणे, याबाबत वारंवार आंदोलनेही झाली असून तत्कालीन मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथे दिनांक १९ मे, २०२३ रोजी बैठक झाली असणे, यामध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने गायरान गट क्र. ६३ मधील ५० एकर जागा गांवासाठी राखीव ठेवणेबाबत सूचना केल्या असणे, भाविकांना या जागेवर रिंगण सोहळ्याकरिता भारत बटालियनकडून विरोध झाला असणे, लोकप्रतिनिधींवर केसेस सुद्धा झालेल्या असणे, याबाबत सतत पाठपुरावा करून देखील अद्याप गेल्या दोन ते अडीच वर्षामध्ये पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, परिणामी ग्रामस्थ व वारकरी भाविकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) सर्वश्री. राजू तोडसाम, सुधीर मुनगंटीवार,वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. राजू तोडसाम, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राज्यातील १३ पेसा क्षेत्राबहुल जिल्ह्यांतील आदिवासी सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी राज्य सरकारने सरळसेवा भरतीची जाहिरात काढून संबंधित विभागांना त्या ठिकाणी पदभरती करण्याची निर्देश दिले असणे, या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र.६४८७२/२००५, दि.१७.११.२०२५ व विशेष अनुज्ञा याचिका क्र.२२१०९/२०२३, दि.६.१०.२०२५ अन्वये दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील पदभरतीबाबत शासन निर्णयाद्वारे सूचित करणे, परंतु राज्यातील अनेक जिल्ह्यांत अनुशेष असताना, आरक्षणाची बिंदुनामावली निश्चित नसणे, काही जिल्ह्यांतील प्रशासकीय अधिकारी या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करणे, काही जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी याबाबत शाशंक असणे, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिल्यानंतरसुद्धा अद्यापपर्यंत पदभरती न होणे, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ५ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित क्षेत्रातील १७ संवर्गांपैकी केवळ ९ संवर्गांची पदभरती करणे, सदर पदांसोबतच राज्य शासनाने वेळोवेळी निर्देश केलेल्या सरळ सेवा पदभरतीची

परीक्षा उत्तीर्ण असताना पेसा क्षेत्रातील उमेदवारांना जाणीवपूर्वक मागील ३ वर्षांपासून मानधन तत्वावर ठेवणे, त्यामुळे त्यांच्या सेवाज्येष्ठतेवर अन्याय होणे, ही बाब राज्यातील १३ जिल्ह्यांतील १७ संवर्गांतील उमेदवारांवर अतिशय अन्यायकारक असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. प्रकाश सुर्वे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"मे.ज्ञानप्रकाश शुल्का एलएलपी यांनी जोगेश्वरी, पूर्व, मुंबई येथील सीटीएस क्र ४५ व ४८ येथील जमिनीवर केलेल्या गंभीर अनियमित बाबी व जाणीवपूर्वक चुकीचे सादरीकरण करून अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, एसआरएचे नकाशे मंजूर करतांना त्यात अंतर्गत ९ मिटर रुंदीचा डीपी रस्ता दाखविण्यात येणे, परंतु प्रत्यक्षात केवळ ६ मिटरचा रस्ता असतांना अग्निशमन विभागाद्वारे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येणे, यांसदर्भात दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीच्या सुमारास मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन कार्यालय, मरोळ, अंधेरी, मुंबई यांना लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन देणे, या निवेदनानुसार अद्यापही या संदर्भात कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) डॉ. राहुल पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

"परभणी महानगरपालिकेला जकात अनुदान माहे सप्टेंबर, २०१६ करिता नगरपालिका संचालनालय यांचे दिनांक १० जून, २०१६ च्या आदेशान्वये दरमहा १,९० कोटी येणे, शासनाने महाराष्ट्र वस्तू व सेवाकर अधिनियम, २०१७ मधील कलम ४ नुसार सन २०१६-१७ हे वर्ष आधारभूत वर्ष (Base Year) घोषित करून कलम ५ नुसार आधारभूत वर्षाचा महसूल ठरवण्यात येणे, दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून शासनाने रुपये ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापारी आस्थापनांना स्थानिक संस्था करामधून सूट देणे, परंतु महानगरपालिका क्षेत्रात केवळ २ व्यापारी आस्थापना असणे, महागाई वाढ लक्षात घेता जकात अनुदानामध्ये

वाढ होणे अपेक्षित असणे, त्याऐवजी दरमहा ३६ लक्ष रुपये अनुदान कमी करणे, त्यामुळे ४ महिन्यांचे कर्मचारी वेतन व १५ व्या वित्त आयोगाचे हफ्ते थकीत असणे, परिणामी कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होणे, आर्थिक वर्षामध्ये वसूली माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च या कालावधीमध्ये कराची वसूली जास्त प्रमाणात होणे, परंतु याच काळात शासनाने कर वसुलीला स्थगिती दिल्यामुळे आधारभूत वर्षातील वसुली कमी होणे, वसुलीची स्थगिती दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी उठविणे, तोपर्यंत परभणी मनपाला वस्तू व सेवाकर अनुदान रक्कम निश्चित न झाल्यामुळे महानगरपालिका आर्थिक विवंचनेमध्ये सापडणे, परभणी महापालिकेने माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये अनुदानाची थकीत रक्कम विशेष बाब म्हणून मंजूर करण्याची विनंती शासनाकडे केलेली असणे, शासनाने सदर प्रकरणी केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने लक्ष वेधले,—

"मुंबई शहरात विशेषतः बोरिवली विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कांदळवनांची बेकायदेशीर तोड, अनधिकृत भरणी (Land Filling) आणि त्यावर मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली येणे, कांदळवने ही मुंबईसाठी नैसर्गिक संरक्षक भिंत असून पूरस्थितीपासून संरक्षण, समुद्राच्या भरती-ओहोटीचा परिणाम कमी करणे व पर्यावरणीय संतुलन राखणे महत्वाचे असणे, मात्र काही भू-माफिया व बिल्डर लॉबी यांच्या संगनमताने रात्रीच्या वेळी मलबा टाकून भरणी केली जात असल्याच्या स्थानिक नागरिकांच्या वारंवार तक्रारी असतानाही महापालिका, पोलीस प्रशासन व वन विभाग यांचे दुर्लक्ष होणे, कांदळवन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात झाडांची तोड व माती/मलबा टाकून भरणी, अनधिकृत बांधकामांना स्थानिक स्तरावर मूकसंमती, भविष्यात पूरस्थिती व पर्यावरणीय आपत्तीचा गंभीर धोका निर्माण झालेला असणे, मुंबईचे पर्यावरण वाचवणे आताच्या घडीला नितांत आवश्यक असून कांदळवनांचे रक्षण झाले नाही तर भविष्यात मुंबईला भीषण पूरस्थिती व पर्यावरणीय संकटाला सामोरे जावे लागणार असल्याची भिती निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

वने मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१२) श्री. अबू आझमी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रामध्ये अनेक वर्षांपासून एस.एम.एस. इंव्होक्लीन बायो वेस्ट कचरा जाळणारी कंपनी व आर.एम.सी. सिमेंट प्लांट कार्यरत असणे, सदर कंपनीमुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होणे, सदर कंपनी बंद करण्यात यावी याकरिता २००९ पासून विधानसभेत व सर्वच माध्यमातून वारंवार मागणी करण्यात येणे, सन २०१९ मध्ये कंपनी विरोधात आंदोलन करणे, तेथील नगरसेवक यांना अटक करणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२० रोजी पत्राद्वारे कंपनी ५० टक्के क्षमतेने चालू ठेवून उर्वरित कचरा तळोजा येथील कारखान्यात पाठवण्याचा आदेश देणे, दीर्घकालीन उपाययोजनांकरीता २०२२ पर्यंत खालापूर, रायगड या जागेमध्ये कंपनी सुरु करण्यात येत असल्याचे पत्राद्वारे कळविणे, तत्कालीन पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांचेद्वारे सदर विषयी संयुक्त बैठक दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी घेण्यात येणे, परंतु कंपनी स्थलांतरित न होणे व त्याचे काम पूर्ण क्षमतेने सुरु असणे, कंपनीचा कचरा तळोजा येथील कारखान्यात पाठविण्याकरिता निवेदन केले असता वाहतुकीसाठी जास्त खर्च येत असल्याचे सांगून टाळाटाळ करणे, विद्यमान पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांनी सदर विषयी बैठक घेण्याचे आश्वासन देऊनही बैठक न घेणे, दोन्ही कंपन्या बंद करण्याबाबत वारंवार मागणी करूनही कोणतीही कारवाई न होणे, सदर प्रकरणी जनसामान्यांमध्ये वाढलेला असंतोष, यावर शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१३) श्री. विजयसिंह पंडित, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधले.—

"राज्यातील कृषी क्षेत्राच्या डिजिटलायझेशनसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत 'फार्मर आयडी' अनिवार्य करण्यात आला असून, शासनाच्या बहुतांश कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी हा आयडी आधारभूत मानला जात असल्याचे अलीकडेच दिसून येणे, परंतु गेवराई विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्यातील हजारो शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमध्ये मोठ्या प्रमाणावर तांत्रिक विसंगती निर्माण झाल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या ८-अ वरील प्रत्यक्ष क्षेत्रापेक्षा फार्मर आयडीवर कित्येक पटीने जास्त क्षेत्र दर्शविले जाणे, नावात चुका असणे, जमिनीचा गट क्रमांक चुकीचा असणे किंवा एकाच शेतकऱ्याच्या नावावर इतरांच्या जमिनीची नोंद होणे, अशा गंभीर चुकांचा समावेश असणे, सदर तांत्रिक त्रुटींमुळे विविध

शासकीय अनुदानांपासून पात्र शेतकरी तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची व चिंतेची भावना असणे, विशेष म्हणजे या किरकोळ चुका दुरुस्त करण्यासाठी सध्या ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मंडळ अधिकारी किंवा तहसील स्तरावर कोणतीही तांत्रिक सुविधा वा अधिकार उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना जिल्हा मुख्यालयी हेलपाटे मारावे लागत असणे, शासकीय पोर्टलवरील या तांत्रिक बिघाडामुळे प्रत्यक्ष शेतकरी हवालदिल झाला असून, खरीप व रब्बी हंगामातील लाभांपासून तो वंचित राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली असणे, यावर तातडीने उपाययोजना म्हणून फार्मर आयडी दुरुस्तीचे अधिकार स्थानिक महसूल व कृषी स्तरावर प्रदान करणे आणि यासाठी विशेष मोहीम राबवून चुका दुरुस्त करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१४) श्री. विलास भुमरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि., एकनाथ नगर हा कारखाना सन २०१५ पासून मे. सचिन घायाळ शुगर प्रा. लि. या कंपनीस त्रिपक्षीय कराराद्वारे १८ गाळप हंगामांसाठी भाडेतत्त्वावर देण्यात आलेला असणे, करारानुसार सर्व देणी व एफ.आर.पी. रक्कम अदा करण्याची जबाबदारी संबंधित कंपनीची असताना उस गाळप हंगाम २०२४-२५ मधील शेतकऱ्यांची एफ.आर.पी. रक्कम अद्याप न देणे, तसेच शासनाची पूर्वपरवानगी न घेता कारखान्याची मालमत्ता तारण ठेवून सुमारे ३० कोटी रुपयांचे कर्ज उचलणे, त्यातील १६.१३ कोटी रुपयांच्या वापराबाबत लेखापरीक्षण अहवालात स्पष्ट नोंद नसणे, बनावट सभासद नोंदी व संस्थापक सभासदांना वगळणे, तसेच विशेष लेखापरीक्षकांनी संचालक मंडळ बरखास्त करण्याची शिफारस करूनही त्यावर कार्यवाही न होणे, यामुळे कारखान्यातील सहकार क्षेत्रात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत संबंधित संचालक मंडळ बरखास्त करणे, भाडेकरार रद्द करणे व दोषींवर फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया."

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

७. (१) माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.विधेयक क्रमांक १७- महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

८. श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स., 'सार्वजनिक आरोग्य विभागाची वैद्यकीय अधिकारी गट-अ, एस-२० या पदासाठी दिनांक २७ फेब्रुवारी,२०२६ रोजी स्वतंत्र निवड मंडळाने एक जाहिरात प्रसिद्ध केली असून त्यात १४४० जागांची क्षमता असताना आरक्षणाच्या टक्केवारीनुसार ही जाहीरात देण्यात आली नसणे' यांनी इ.बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

९. तालिका सभाध्यक्षांनी, १) गृह विभाग, २) कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विभाग ३) जलसंपदा विभाग ४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ५) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग६) मृद व जलसंधारण विभाग तालिका सभाध्यक्ष (श्री. संजय केळकर) : आता (१) गृह विभाग (२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विकास विभाग (३) जलसंपदा विभाग, (४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग (५) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (६) मृद व जलसंधारण विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक (१)गृह विभाग,अनुक्रमांक ११ ते २१(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग अनुक्रमांक ३२ ते ४१(३) जलसंपदा विभाग अनुक्रमांक ६९ ते ७३ (४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग अनुक्रमांक ९६ ते १०१ (५) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग अनुक्रमांक २३८ ते २४३ (६) मृद व जलसंधारण विभागअनुक्रमांक २६७ ते २७१चर्चेला घेण्यात येतील असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले व चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

विभागांच्या मागण्यांचा तपशील व मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांच्या विभागनिहाय याद्या सदस्यांना टपालखणाद्वारे (पिजन होल) वितरित करण्यात आल्या आहेत. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहीत धरून आता चर्चेला सुरुवात होईल, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. नानाभाऊ पटोले (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

(२) ग्राम विकास मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.विधेयक क्रमांक १५- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(३) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.विधेयक क्रमांक १६- महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(२) श्रीमती मोनिका राजळे
(३) श्री.सुनील प्रभू
(४) श्री. रमेश बोरनारे
(५) श्री.सुनील शेळके
(६) श्री. विजय वडेट्टीवार
(७) श्री. महेश (दादा) लांडगे
(८) श्री.दिलीप लांडे
(९) श्री. आबु आझमी
(१०) श्री. कैलास घाडगे-पाटील
(११) श्री.जयंत पाटील
(१२) श्री. अनिल पाटील
(१३) श्री. प्रवीण तायडे
(१४) श्री. अमोल खताळ
(१५) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे
(१६) श्रीमती मनिषा चौधरी
(१७) श्री. गजानन लवटे
(१८) श्री. चंद्रदीप नरके
(१९) श्री. राजकुमार बडोले
(२०) श्री. विकास ठाकरे
(२१) श्री. दिलीप बोरसे
(२२) श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव
(२३) श्री. हिरामण खोसकर
(२४) श्री.अभिजीत पाटील
(२५) श्री. भीमराव (आण्णा) तापकीर
(२६) श्री. सुहास बाबर
(२७) श्रीमती सुलभा खोडके
(२८) श्री. प्रवीण स्वामी
(२९) श्री. राजेश पवार
(३०) श्री. राजेश मोरे
(३१) श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली कटके
(३२) डॉ. ज्योती गायकवाड
(३३) श्री. शंकर जगताप
(३४) श्री. विलास भुमरे
(३५) श्री.शिवाजी पाटील
(३६) डॉ. राहुल आहेर
(३७) श्री. राजेंद्र गावित
(३८) श्री.आमश्या पाडवी
(३९) श्री.संजय पुराम
(४०) श्री.मुरजी (काका) पटेल
(४१) ॲड. श्रीजया अशोकराव चव्हाण

(४२) श्री. सत्यजीत देशमुख
(४३) श्री. संजय देरकर
(४४) श्री.सुरेश धस
(४५) श्रीमती मंजुळा गावित
(४६) श्री. संजय उपाध्याय
(४७) डॉ. नितीन राऊत
(४८) श्री. बालाजी कल्याणकर
(४९) श्री. देवराव भोंगळे
(५०) श्री. राजेश बकाने
(५१) श्री. मोहन मते
(५२) श्रीमती सुलभा गायकवाड
(५३) श्री. सिद्धार्थ शिरोळे
(५४) श्री. किसन वानखेडे
(५५) श्री. अमोल जावळे
(५६) श्री. राजू तोडसाम
(५७) श्री. सिद्धार्थ खरात
(५८) श्री. राजन नाईक

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, कृषी मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री, पशुसंवर्धन मंत्री, मृद् व जलसंधारण मंत्री, मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री, गृह (शहरे) राज्यमंत्री यांनी उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

१) गृह विभाग, २) कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विभाग ३) जलसंपदा विभाग ४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग ५) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग६) मृद व जलसंधारण या विभागांच्या अनुदानाच्या मागण्या एकत्रितपणे मतास टाकण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले .

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

वित राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक १२ - भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, डॉ.नितीन राऊत, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, सन्माननीय सदस्या डॉ. ज्योती गायकवाड, सन्माननीय सदस्य डॉ. विश्वजित कदम, सन्माननीय सदस्य सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम व अमित झनक यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

१०. (१) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर अर्धा तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"सार्वजनिक वाहतूक नियोजन व व्यवस्थापन आणि लॉजिस्टिक दृष्टीकोनातून चंद्रपूर महानगरमध्ये रिंगरोडची असलेली आवश्यकता, नवीन वाहतूक मार्गामुळे नवीन वसाहती, औद्योगिक क्षेत्र, व्यावसायिक आस्थापनांना जागा मिळू शकणे, चंद्रपूर शहर औद्योगिक व खनिज समृध्द भाग असल्यामुळे रिंगरोड असल्यास माल वाहतूक अंतर्गत रस्त्यापेक्षा बाहेरून जाईल, त्यामुळे उत्पादनांची वाहतूक अधिक जलद व सुरक्षित होणे शक्य होईल, शहराची वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण या पार्श्वभूमीवर रिंगरोडचे बांधकाम करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक बांधकाम(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर अर्धा तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"नवीन चंद्रपूर विकास योजनेअंतर्गत १३९१.७१ हेक्टर क्षेत्राचा समावेश असून मौजा पडोली (भाग), खुटाळा (भाग), कोसारा व दाताळा ही गावे या योजनेत अंतर्भूत असणे, भाग), खुटाळा (भाग), कोसारा व दाताळा ही गावे या योजनेत अंतर्भूत असणे, दिनांक ३० जून १९९८ रोजी विकास आराखड्यास शासन मान्यता मिळाली असून योजना १ सप्टेंबर १९९८ पासून अंमलात येणे, प्रकल्पाची मूळ किंमत रु. २२२८.७७३ लक्ष इतकी असणे, नवीन चंद्रपूर विकास योजनेअंतर्गत मूलभूत सुविधा, गृहनिर्माण व सामाजिक पायाभूत सुविधा उभारण्यात महत्त्वपूर्ण प्रगती झालेली असणे, तथापि, रस्ते दुरुस्ती, प्रलंबित निधी प्रतिपूर्ती व उर्वरित आरक्षित क्षेत्रांचा नियोजित विकास या बाबी तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक रात्री ११ वाजून १८ मिनिटांनी शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ०९.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.

शुक्रवार, दिनांक १३ मार्च, २०२६

विधानसभेची विशेष बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ९.४५ वाजता **माननीय उपाध्यक्ष श्री. अण्णा बनसोडे** यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) डॉ. किरण लहामटे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"अकोले विधानसभा क्षेत्रातील साठवण तलाव मोरदरी, समशेरपूर ता.अकोले, जि. अहिल्यानगर या योजनेस जिल्हा वार्षिक आदिवासी उपाययोजना सन २०१४-१५ (लघु पाटबंधारे योजना १०१ ते २५० हेक्टर) जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, अहिल्यानगर यांजकडून रुपये ४६७.३२ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त असणे, सदर कामाचे पाया खोदाई करत असतांना पायामध्ये कार (Dyke) लागल्यामुळे त्यामधून गळती होण्याची शक्यता असणे, गळती रोखण्यासाठी Dyke वरील उपाययोजना करणे आवश्यक असणे, सदरहू उपाययोजना करण्यासाठी खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली असणे, सदरील Dyke वरील उपाययोजनेसाठी येणारा खर्च तसेच GST व Royalty च्या रकमेत झालेली वाढ, या सर्व बाबींमुळे योजनेच्या खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली असणे, सदर योजना पूर्ण झाल्यास आदिवासी भागातील १२५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून तेथील सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार असणे, सदरील साठवण तलावाचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २६२४.२७ लक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विभागाकडे सादर करण्यात आलेला असणे, सदर कामास तातडीने आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता असणे, आदिवासी विभागामार्फत काही मतदार संघात जलसंधारणाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येणे परंतु मोरदरी साठवण बंधाऱ्यास आदिवासी विभागाकडे अद्यापही जाणीवपूर्वक प्रस्ताव प्रलंबित असणे, त्यामुळे जनमानसात तीव्र नाराजी निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

आदिवासी विकास मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. नारायण कुचे वि.स.स. यांनी मंत्री महोदय सभागृहात येईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशी विनंती केली.

लक्षवेधी सूचना क्रमांक ३ व ५ पुढे ढकलण्यात आली असून सभागृहाचे कामकाज १० मिनिटांकरिता तहकूब करण्यात येत असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ०९ वाजून ५९ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ९ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(२) सर्वश्री प्रवीण दटके, करण देवतळे, सुधीर मुनगंटीवार, मोहन मते, प्रताप अडसड, कृष्णा खोपडे, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रवीण दटके वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्य मंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"नागपूर शहराचा आऊटर भागामधे म.न.पा. व ना.सु.प्र. च्या जागेवर मोबाईल टॉवर लावण्याची मोहीम सुरु असणे, अवैध मोबाईल टॉवर्सवर म.न.पा. व ना.सु.प्र. कारवाई करण्यास असमर्थ असणे, आयुक्त, महानगरपालिका यांना वारंवार दिलेली तक्रार, मात्र मोबाईल कंपनीला छोटेखानी पत्र पाठवून दिशाभूल करून कसल्याही प्रकारची कारवाई न होणे, दूरसंचार कायदा दिनांक २६ जून, २०२४ रोजी लागू झालेला असून निगम आयुक्तांना दिनांक २ मे, २०२५ रोजी मंत्रालयाने पत्र पाठवून देखील यावर कारवाई न होणे, मोबाईल टॉवर कंपनीला अभयदान देण्याचा प्रयत्न, भरगच्छ वस्तीत अनधिकृत इमारतीवर असलेले मोबाईल टॉवर म्हणजे दुर्घटना होण्याची शक्यता, मोबाईल टॉवर उभारलेल्या इमारतीच्या बांधकामाला मंजुरी नसणे, इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट न होणे, मोबाईल कंपनीद्वारे त्यांच्या मर्जीने कुठेही मोबाईल टॉवर उभे करणे, राज्यात असे अनेक प्रकार घडले असून कसल्याही प्रकारची परवानगी न घेणे, त्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या नियमांचे होत असलेले उल्लंघन, या अवैध मोबाईल टॉवर्समुळे निर्माण झालेला संभाव्य धोका टाळण्यासाठी व यावर नियंत्रण राखण्यासाठी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, नागरिकांनी या अवैध मोबाईल टॉवर्स विरुद्ध म.न.पा. व ना.सु.प्र. मध्ये तक्रारी करून सुद्धा त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

उद्योगमंत्री यांनी (उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री) यांचेकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. विजय शिवतारे, ॲड. राहूल कुल, वि.स.स., यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विजय शिवतारे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्री यांचे लक्ष वेधले,—

"पुणे शहरातील हिंजवडी हे आयटी हब म्हणून उदयास येणे, प्रचंड ट्रॅफिक आणि पाच पाच तास होणारी वाहतूक कोंडी यामुळे उद्योजक हैराण होणे, अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि इतर

समस्यांमुळे बार्कले, नाईस, क्रेडिट स्विस, ल्युमीडेक्स यांसारख्या अनेक बड्या आयटी कंपन्यांनी हिंजवडी मधून परराज्यात स्थलांतर करणे, परिस्थितीत सुधारणा नसल्याने आणखी कंपन्या इतरत्र स्थलांतरित होण्याच्या विचारात असणे, स्थलांतरण रोखण्यासाठी व रोजगारवृद्धीसाठी पुण्याच्या बाजूला पुरंदर तालुक्यातील मौजे दिवे, मौजे कोडीत व चांबळी येथे आयटी पार्क प्रस्तावित करणे, प्रस्तावित जमिनी शासकीय गायरान असल्याने संपादनाची समस्या व खर्च नसणे, दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी तसेच दिनांक ३ एप्रिल, २०२५ रोजी मा. उद्योगमंत्री यांनी बैठका घेऊन महसूल विभागाकडून हस्तांतरण प्रस्ताव सादर करावा असे निदेश दिलेले असणे, मात्र अद्याप याबाबत महसूल विभागाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, सदरहू विषय तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) डॉ. अतुलबाबा भोसले,वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"कराड (जि. सातारा) तालुक्यामधील दक्षिण मांड या छोट्या नदीचे पाणलोट क्षेत्र कमी असून नदी केवळ पावसाळ्यातच वाहत असल्याने पावसाळा संपल्यानंतर दरवर्षी या खोऱ्यामध्ये शेतीच्या पाण्याची टंचाई जाणवत असणे, सुमारे २५ गावातील हजारो ग्रामस्थांना वाकुर्डे सिंचन योजनेच्या माध्यमातून शेतीसाठी व पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जात असणे, दरवर्षी उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच या भागात पाण्याची समस्या निर्माण होणे, पाणी टंचाईमुळे हजारो शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच पाणी सोडण्याचे नियोजन होण्याची आवश्यकता, या योजनेतील ८० टक्के वीज खर्च शासनाकडून आणि २० टक्के खर्च शेतकऱ्यांकडून भरण्याची व्यवस्था करण्यात आली असली तरी हा २० टक्क्यांचा भारदेखील गरीब शेतकऱ्यांना पेलवत नसणे, जास्तीत जास्त सौर ऊर्जा निर्मिती करण्याचे शासनाचे धोरण असल्याने वाकुर्डे उपसा सिंचन योजनेच्या पंपांना देखील विद्युत पुरवठा करण्यासाठी सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा उभारल्यास शेतकऱ्यांवरील कमी होणार असल्याने यासाठी ही योजना सोलर फिडरवर आणण्याची आवश्यकता, तरी शासनाने पाणी सोडण्याचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असणे, तसेच सदर योजना सोलर फीडर वर चालविण्याकरिता शासनाने याबाबत तातडीने प्रस्ताव मागवून मंजुरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री. नाना पटोले, समाधान अवताडे, विजय देशमुख, संजय केळकर, विलास तरे, विजय वडेट्टीवार, अमोल जावळे, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नानाभाऊ पटोले वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये महसूल, परिवहन व पोलीस विभागांतर्गत कार्यरत असलेल्या चेक पोस्टवर वाहनचालक, मालवाहतूकदार व सर्वसामान्य नागरिकांकडून गंभीर तक्रारी प्राप्त होत असणे, अनेक ठिकाणी अनावश्यक वाहन तपासणी, कागदपत्रांच्या किरकोळ कारणांवरून अडवणूक, विलंब तसेच कथित आर्थिक वसुली होत असल्याच्या तक्रारी मोठया प्रमाणात वाढल्या असणे, यामुळे मालवाहतुकीला उशीर होऊन उद्योग-व्यवसायांवर आर्थिक परिणाम होत असणे,काही चेकपोस्टवर सीसीटीव्ही व्यवस्था अपुरी असून डिजिटल पावती प्रणालीचा अभाव दिसून येणे,परिणामी पारदर्शकतेबाबत प्रश्न निर्माण होणे, राज्य शासनाने सर्व चेकपोस्टवर ई-तपासणी प्रणाली, सीसीटीव्ही अनिवार्य करणे, तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे व दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक असणे, तसेच राज्यातील सर्व चेकपोस्टची सखोल चौकशी करून पारदर्शक व नागरिकाभिमुख व्यवस्था उभारण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

परिवहन मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील जय मल्हार मच्छिमार संस्था, गवंडगाव, मल्हारी मार्तंड भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्या. आंडगा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्या. माळेगांव व राजमाता अहिल्यादेवी भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी घोटका, या चारही संस्था एकाच व्यक्तीने (श्री. चंद्रसेन ईश्वरराव पाटील, रा.गवंडगाव, ता.लोहा) नोंदणी केल्या असल्याचे आढळून येणे, तथापि यापैकी एकाही संस्थेत क्रियाशील सभासद नसल्याचे आढळून आलेले असणे, परिणामी जिल्ह्यातील मूळ मच्छिमारी करणाऱ्या व्यक्तींवर आलेली उपासमारीची वेळ, त्यामुळे

त्यांच्यामध्ये पसरलेली नैराश्याची भावना, सदर बनावट व खोटया कागदपत्रांच्या आधारे नोंदणी केलेल्या बनावट संस्थेमार्फत मच्छीमार असल्याचे तसेच शासनाकडून लाखो रुपयांची मच्छिमारी केल्याचे दाखवून शासनाचे लाखो रुपये उकळण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे अन्य गरजू व्यक्तींना मच्छीमारी करण्यापासून वंचित ठेवण्यात येणे, परिणामी त्या भागातील व परिसरातील क्रियाशील मच्छीमारांनी याबाबत शासनाकडून चौकशी करून संबंधित व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाकडे मागणी करण्यात आलेली असणे, शासनाचा निधी गैरमार्गाने हडप करणाऱ्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता व अपहार केलेल्या रकमेची वसुली करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय उपाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. सर्वश्री रणधीर सावरकर व इतर वि.स.स. यांचा, "शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या पीक नुकसानीवर कायम स्वरुपी उपाययोजना करणे" इ. बाबतचा म.वि.स. नियम २९३ अन्वयेचा प्रस्ताव.

तसेच

सर्वश्री आदित्य ठाकरे व इतर वि.स.स. यांचा, "राज्यातील अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा तसेच शिक्षकांचे विविध प्रश्न प्रलंबित असणे" इ. बाबतचा म.वि.स. नियम २९३ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त दोन्ही प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाले.

कृषी मंत्री, पाणीपुरवठा मंत्री व उद्योग मंत्री यांनी उपरोक्त प्रस्तावावरील एकत्रित चर्चेस उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

३. १) नगर विकास विभाग, २) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ३) गृहनिर्माण विभाग ४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग ५) इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक. (१) नगर विकास विभाग अनुक्रमांक ४६ ते ५१ (२)सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अनुक्रमांक १०२ ते १०८ (३) गृहनिर्माण विभाग अनुक्रमांक १९६ ते १९८ (४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग अनुक्रमांक २४९ ते २५४ (५) इतर मागास बहुजन कल्याण विभाग अनुक्रमांक २६३ ते २६६ चर्चेला घेण्यात येतील असे सांगून माननीय तालिका सभाध्यक्षांनी चर्चेची कार्यपद्धती विषद केली.

उपरोक्त माण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.वरुण सरदेसाई (२) श्री. मोहन मते (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण..)

श्री. जितेंद्र आव्हाड वि.स.स. यांनी मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसणे, इ. बाबत मुद्दा मांडला.

मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्याने सभागृहाची बैठक १० मिनिटांकरीता स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १ मिनिटांनी १० मिनिटांकरीता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (चर्चा पुढे सुरू..)

उक्त चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री. मोहन मते (भाषण पूर्ण) (३) श्री. विजय वडेट्टीवार

(४) श्री. मुरजी पटेल (काका) (५) श्री. चेतन तुपे

(६) श्री. जितेंद्र आव्हाड (७) श्री. सुनिल प्रभू

(८) श्री. हेमत रासने (९) श्री. अमीन पटेल

(१०) श्री. विलास भुमरे (११) श्री. अभिजीत पाटील

(१२) श्रीमती सना मलिक (१३) श्री. अबु आझमी

(१४) श्री. महेश लांडगे (१५) श्री. राजेश मोरे

(१६) श्री. बाबाजी काळे (१७) श्री. हिरामण खोसकर

(१८) डॉ. ज्योती गायकवाड (१९) श्री. जयंत पाटील

(चर्चा अपूर्ण..)

४. (अ) पुरःस्थापनार्थ :-

गृह (ग्रामीण) राज्यमंत्री यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी, धर्मस्वातंत्र्य विधेयक हे महाराष्ट्राचे क्रांतिकारी विधेयक असून देशाच्या अस्मितेला योग्य न्याय देणारे विधेयक आहे. म्हणून हे विधेयक घाईघाईने मंजूर न करता याबाबत सविस्तर चर्चा व्हावी, अशी विनंती केली.

सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (चर्चा पुढे सुरू..)

उक्त चर्चा पुढे सुरू झाली.

पर्यटन मंत्री यांनी (सामाजिक न्याय मंत्री यांच्याकरिता), उद्योग मंत्री (उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांच्याकरिता), विशेष सहाय्य मंत्री, सांस्कृतिक कार्य मंत्री व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांनी उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेस उत्तर दिले.

मागण्या मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत करण्यात आल्या.

अशासकीय कामकाज

५. (अ) पुरःस्थापनार्थ :-

पुढील विधेयके सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केली.

(१) सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक १० – महाराष्ट्र नगर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (सुधारणा) विधेयक, २०२६ श्री. शंकर जगताप वि.स.स.

(२) सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक ११ – महाराष्ट्र समान नागरी संहिता विधेयक, २०२६ श्री. अतुल भातखळकर वि.स.स.

(३) सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र फसवणूकपूर्वक धर्मांतरण, दबाव व लव्ह जिहाद प्रतिबंध विधेयक, २०२६ श्री. शंकर जगताप वि.स.स.

(४) सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक १४ – महाराष्ट्र योग आयोग विधेयक, २०२६ श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स.

(५) सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक १८ – भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स.

(६) सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक १९ – मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स.

सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून ५२ मिनिटांनी सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता मा. तालिका सभाध्यक्ष श्री योगेश सागर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तीन तारांकित अनुपस्थितीमुळे अतारांकित झाले.

(३) एक तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात आला.

(४) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सतरा प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(१) श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अजय चौधरी यांच्या मतदारसंघात ग्लोबल रुग्णालय असून या रूग्णालयात गरिबांना राखीव कोट्यातील खाटा उपलब्ध करून दिलेल्या नसणे, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

सरकारने या विषयामध्ये लक्ष द्यावे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स. यांनी, इराण आणि इस्त्रायल या देशामध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे देशात गॅसचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असणे, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

शासनाने यासंदर्भात सभागृहात निवेदन करावे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

२. (१) डॉ. तुषार राठोड, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"सध्या बी. एच. एम. एस. (BHMS) पदवीधर डॉक्टरांना महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस (MUHS) अंतर्गत एक वर्षाचा सीसीएमपी हा ब्रिज कोर्स करून महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू असणे, त्यासाठी स्वतंत्र पोर्टल निर्माण करून संबंधितांना RMP चा दर्जा देण्याचा मार्ग खुला करण्यात येत असणे, ही केवळ सर्वसाधारण बाब नसून वैद्यकीय शिक्षणाच्या गुणवत्तेचा, कायदेशीर अधिकाराचा व रुग्णसेवेचा प्रश्न निर्माण करणारी असणे, एमबीबीएस अभ्यासक्रम हा साडेपाच वर्षाचा व्यापक, क्लीनिकल व सर्जिकल प्रशिक्षणावर आधारित अभ्यासक्रम असणे, मेडिसिन, सर्जरी, ICU, आपत्कालीन सेवा, स्त्रीरोग व प्रसूती सेवा, बालरोग इत्यादी गुंतागुंतीच्या आजारांच्या व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणे, याउलट CCMP हा एक वर्षाचा मर्यादित ब्रिज कोर्स असणे, राज्यात मोठ्या प्रमाणात MBBS डॉक्टर उपलब्ध असताना ब्रिज कोर्सच्या माध्यमातून समांतर मार्ग तयार केला जाणे, एक वर्षाचा ब्रिज कोर्स करून BHMS डॉक्टर्सना full fledged ऍलोपॅथी प्रॅक्टिस करण्याचा मार्ग खुला होणे व यामुळे सर्वसामान्य जनतेचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत

शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया."

वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. तान्हाजी मुटकुळे वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"विद्या शक्ती शिक्षण प्रसारक मंडळ, कोळसा, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली द्वारा संचालित कै. लखन सर्जेराव नाईक इंग्लिश स्कूल, कोळसा या शाळेत मराठीची मान्यता असताना मुद्दामहून खाडाखोड करून इंग्रजी माध्यम सुरु करणे, त्यातून करोडो रुपये मिळविले असणे, राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे, या शाळेची मान्यता घेताना मागील तीन वर्षाचे दहावीचे निकाल संस्थेतील दुसऱ्या मराठी माध्यमिक शाळेचे दाखविलेले असणे, सन २०२४-२५ मध्ये सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, हिंगोली यांनी दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी भेट दिली असता दोनशे विद्यार्थ्यांपैकी १८३ विद्यार्थी उपस्थित व १७ विद्यार्थी रजा घेऊन गावी गेल्याचा अहवाल देण्यात येणे, सन २०२४-२५ मध्ये ३०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्कापोटी शासनाकडून या संस्थेला देण्यात आलेले असणे, सदर शाळेची सखोल चौकशी करून शाळेच्या सद्यःस्थितीचा अहवाल शासनास सादर करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचे लक्ष वेधले,—

"चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्यसेवा पुरविण्यासाठी बांधलेले इसापूर येथील आरोग्यवर्धिनी केंद्र गेल्या १५ वर्षापासून कर्मचारी आणि सुविधांअभावी बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, लाखो रुपये खर्चून उभारलेली इमारत केवळ ओसाड वास्तू म्हणून असणे, या आरोग्य केंद्रावर सहा गावातील हजारो नागरिकांचे आरोग्य अवलंबून असणे, सद्यःस्थितीत या आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय झालेली असणे, इमारतीच्या भोवती घाणीचे साम्राज्य पसरलेले असून आजुबाजुला झाडे-झुडपे वाढलेली असणे, इमारत अवैध

धंदयाचे केंद्र बनलेले असणे, केंद्राला परिचारिका, कर्मचारी, रुग्णवाहिका मिळण्याबाबत एकमुखी मागणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी संबंधिताकडे करणे, असे असतानाही अदयाप याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, सहा दुर्गम गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यासह आरोग्य केंद्र सुसज्ज करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. अभिजीत पाटील, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय, जलपर्यटन, धार्मिक, निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटन, विनयाई पर्यटन विकासाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याचा रु.३४२.७५ कोटी खर्चाचा प्रस्ताव मा.पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर केलेला असणे, उक्त प्रस्तावावर उच्चाधिकार समितीच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्तावातील पाण्याखालील प्राचीन शहर रु.५० कोटी तसेच मार्केटींग, ब्रँडींग व क्षमता बांधणी रु.१० कोटी असे एकूण रु.६० कोटी किंमतीचे काम वगळून उर्वरित रु.२८२.७५ कोटी इतक्या किंमतीचा आराखडा मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील शिखर समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्याची शिफारस करण्यात येणे, तद्नंतर दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी सदर प्रस्तावित रु.२८२.७५ कोटी किंमतीच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, कामांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करून घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना "संनियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येणे, उक्त आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळून ८ ते ९ महिने उलटूनही अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नसणे, शासनाने पर्यटन धोरणानुसार उजनी धरणावरती पर्यटन क्षेत्र निर्माण करून त्या ठिकाणी रोजगार निर्मिती करण्यास प्राधान्य देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नियोजन राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. समीर कुणावार, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रशांत ठाकूर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"पनवेल (जि.रायगड) तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस होऊनसुध्दा व सर्व धरणे भरली असून देखील पनवेल विधानसभा अंतर्गत येणा-या खारघर, कामोठे, नवीन पनवेल, तळोजा अशा ठिकाणी लोकांना तीव्र पाणी टंचाई जाणवत असणे, सातत्याने होत असलेल्या अपु-या पाणी पुरवठ्याबाबत वारंवार लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी प्रशासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले असणे, परंतू सिडको प्रशासन विशेषतः पाणीपुरवठा विभागाशी संबंधित अधिकारी याबाबत गंभीर असल्याचे दिसत नसणे, सणवार जवळ आले की पाणीपुरवठा अत्यंत अनियमित होत असणे, वारंवार सिडको प्रशासनाला याबाबत विविध सूचना केल्या असतानाही सिडकोतर्फे कुठल्याही प्रकारची अंमलबजावणी होताना दिसत नसणे, सिडको पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी अत्यंत बेफीकीर वृत्तीने काम करत असून कुठल्याही प्रकारचे उत्तरदायित्व स्विकारताना दिसत नसणे, काही विभागात हेतूपुरस्सर पाणी टंचाई निर्माण केली जाते असल्याचा आरोपही नागरिकांनी केला असणे,पाणी टंचाई अभावी पाण्याचे टँकर देताना हे अधिकारी अत्यंत मनमानी पध्दतीने त्याचे वाटप करत असणे, त्यामुळे नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता असणे जो पर्यंत उक्त विभागात नियमित पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत कुठल्याही प्रकारच्या नवीन बांधकामांना भोगवटा प्रमाणपत्र व पूर्णत्वाचा दाखला देण्यात येऊ नये, यावर शासनाने मनमानी कारभार करणाऱ्या उक्त विभागातील कर्मचा-यांवर कारवाई करून पाणी पुरवठा नियमित होणेकरिता उपाययोजना करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. मनोज जामसुतकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले,—

"मुंबईतील म्हाडाच्या पुनर्रचित ३८८ इमारतींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात शासनाने माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार, ३३(७) चे सर्व फायदे ३३(२४) मध्ये समाविष्ट करून पुनर्विकासाचा मार्ग मोकळा केलेला असणे, तथापि सदर नियमांतर्गत अद्याप एकाही इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प सादर झालेला नसणे, ३८८ इमारतींचे भूखंड लहान असून रहिवाशांची संख्या जास्त असल्यामुळे विकासकांसाठी प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरत

नसणे, म्हाडा स्वतः इमारतींची मालक असताना, खासगी विकासकांकडून २०% प्रीमियमची मागणी करणे, तसेच, लँड कॉस्टच्या २५% रेडीरेकनर दराएवढे फ्लॅट्स म्हाडाला देण्याची अट घालण्यात येणे, त्यामुळे कोणताही विकासक पुढे येण्यास तयार नसणे, इमारतींचा सुरुवातीचा एफएसआय ३.१९ वापरला असल्याने विकासकाला अतिरिक्त एफएसआय मिळणार नसणे, क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये शेजारील सेस इमारतींचे मालक आणि भाडेकरू सहकार्य करीत नसणे, पुनर्विकासासाठी आवश्यक असणारे प्रॉपर्टीकार्ड, इमारतीचे नकाशे म्हाडाकडून वेळेत उपलब्ध न होणे, तसेच म्हाडाकडून अद्यापही होकार पत्राचा आणि डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट (DA) चा मसुदा तयार झालेला नसून जुनाच ३३(७) चा फॉरमॅट वापरला जाणे, म्हाडा स्वतः मालक असतानाही, एसआरए किंवा सेस इमारतींप्रमाणेच भाडेपावत्या आणि इतर अनावश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात येणे, तसेच सक्सेशनची जाचक अट घालण्यात येणे, म्हाडाच्या ३८८ इमारतींच्या पुनर्विकासात येणाऱ्या अडचणी सोडवून या इमरतींच्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यटन मंत्री, (उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचेकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेवरील नियमित कामकाजातील लक्षवेधी सूचना क्रमांक ७ पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(८) डॉ. नितीन राऊत, श्री.राजकुमार बडोले, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नितीन राऊत वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"नागपूर येथे शासनाने १४० कोटी रुपये खर्चून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर उभारले असणे, मात्र माहे फेब्रुवारी, २०२६ च्या पाहणीनुसार इतका प्रचंड निधी खर्च करूनही ही वास्तू केवळ 'शोभेची वस्तू' म्हणून असणे, येथे नियोजित असलेला ४० फूट उंचीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अद्याप उभारला गेलेला नसणे, सदरहू बाब अत्यंत खेदजनक असणे, सध्या येथे केवळ सभागृह आणि वाचनालय सुरू असणे, नियोजित बँक, उपहारगृह आणि व्यावसायिक गाळे प्रशासकीय उदासीनतेमुळे बंद असणे, यासंदर्भात सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त व संबंधित अधिकारी कमालीचे दुर्लक्ष करीत असणे, विचारणा केल्यास योग्यप्रकारे उत्तरे दिली जात नसणे, धक्कादायक बाब म्हणजे केंद्राच्या देखभालीसाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र निधीची तरतूदही करण्यात आलेली नसणे, सार्वजनिक निधीचा असा

अपव्यय आणि महापुरुषांच्या स्मारकाची ही उपेक्षा जनतेमध्ये तीव्र संताप निर्माण करत असणे, या केंद्रातील सर्व सुविधा तात्काळ सुरू करण्याबाबत, निधीची उपलब्धता करून देण्याबाबत आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सामाजिक न्याय मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३. (१) सार्वजनिक बांधकाम विभाग, (२) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, (३) ग्रामविकास विभाग, (४) आदिवासी विकास विभाग, (५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग व (६) उच्च व तंत्र शिक्षण विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक (१) सार्वजनिक बांधकाम विभाग अनुक्रमांक ६० ते ६८ (२) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग अनुक्रमांक ७९ ते ८९ (३) ग्रामविकास विभाग अनुक्रमांक ९० ते ९५ (४) आदिवासी विकास विभाग अनुक्रमांक २०८ ते २१७ (५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग अनुक्रमांक २२२ ते २२५ (६) उच्च व तंत्र शिक्षण विभागअनुक्रमांक २२६ ते २३३ चर्चेला घेण्यात येतील असे सांगून माननीय तालिका सभाध्यक्षांनी चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेताल.

(१) श्री. सुनिल प्रभू	(२) श्री.रणधीर सावरकर
(३) श्री.विजय वडेट्टीवार	(४) श्री. रोजश मोरे
(५) श्री. जयंत पाटील	(६) डॉ. किरण लहामटे
(७) श्री. बबनराव यादव (लोणीकर)	(८) श्री. सिद्धार्थ खरात
(९) श्री. राजेश पवार	(१०) श्री. रमेश बोरनारे
(११) श्री. विकास ठाकरे	(१२) श्रीमती सुलभा गायकवाड
(१३) श्रीमती सरोज अहिरे	(१४) श्री. निलेश राणे
(१५) श्री. उत्तमराव जानकर	(१६) श्री. नानाभाऊ पटोले

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री, आदिवासी विकास मंत्री, कामगार मंत्री, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री, उर्जा राज्यमंत्री यांनी उपरोक्त माण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

[चर्चारोधी (गिलोटीन) सायंकाळी ५-३० वाजता]

चर्चेसाठी प्राथम्यक्रमात नसलेल्या खालील विभागांच्या मागण्या आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

१) वित्त विभाग--अनुक्रमांक ५२ ते ५९, २) विधि व न्याय विभाग--अनुक्रमांक ७४ ते ७८, ३) संसदीय कार्य विभाग--अनुक्रमांक १९३ ते १९५, ४) सार्वजनिक आरोग्य विभाग--अनुक्रमांक १९९ ते २०२, ५) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग--अनुक्रमांक २१८ ते २२१, ६) महिला व बालविकास विभाग--अनुक्रमांक २३४ ते २३, ७७) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग--अनुक्रमांक २४४ व २४, ५८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय--अनुक्रमांक २४६ ते २४, ८९) अल्पसंख्यांक विकास विभाग--अनुक्रमांक २५५ ते २५७, १०) मराठी भाषा विभाग--अनुक्रमांक २५८ ते २६२, ११) दिव्यांग कल्याण विभाग--अनुक्रमांक २७२ ते २७५.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

४. (अ) पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे.

मुख्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २१ – महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, ते महाराष्ट्र विनियोजन विधेयक पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत असल्याचे सांगितले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विनियोजन विधेयकाच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांनी सुधारणा दिल्या आहेत. त्यांनी त्या अनुक्रमे मांडाव्यात असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. विजय वडेट्टीवार व श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स. यांनी उपरोक्त विधेयकास सुधारणा मांडल्या.

माननीय मुख्यमंत्र्यांनी उक्त सुधारणांच्या अनुषंगाने उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खडशः विचारात घेण्यात आले.

खडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स. यांनी, सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांमध्ये मांडलेले काही मुद्दे प्रलंबित असून त्यासंदर्भात संयुक्त बैठक घेऊन ते सोडवावेत, अशी विनंती केली.

मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात नोंद घेतली.

शासकीय विधेयके – (पुढे सुरू..)

(ब) पुरःस्थापनार्थ :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २२ - सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) परिवहन मंत्री यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २३ - महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(४) मुख्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २० – महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा, दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक, डॉ. नितीन राऊत यांचा व तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.भास्कर जाधव (२) श्री.अस्लम शेख

(३) श्री. रईस शेख (४) श्री.अतुल भातखळकर

(५) श्री. जितेंद्र आव्हाड

(चर्चा अपूर्ण.)

श्री. दादाजी भुसे (शालेय शिक्षण मंत्री) यांनी, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी उक्त विधेयकाच्या संदर्भात त्यांच्या भावना व्यक्त करीत असताना महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केलेला असल्याने त्यांनी सभागृहात माफी मागावी अशी मागणी केली.

(सत्तारूढ पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज करणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ७ वाजून २३ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी सुरू झाली.

(सभागृहात सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

सन्माननीय सदस्य डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी उक्त विधेयकाच्या संदर्भात त्यांच्या भावना व्यक्त करीत असताना महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केलेला असणे, यासंदर्भातील मुद्याच्या अनुषंगाने माननीय अध्यक्षांनी आपले विचार मांडले व डॉ. जितेंद्र आव्हाड वि.स.स. यांनी सभागृहाची माफी मागावी असे स्पष्ट निर्देश दिले.

सन्माननीय सदस्य डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी उक्त प्रकरणाच्या संदर्भात सभागृहात माफी मागीतली.

सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २० – महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ च्या संदर्भातील चर्चा पुढे सूरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(६) श्री.योगेश सागर
(७) डॉ. नितीन राऊत
(८) श्री. अमित साटम
(९) श्री अमिन पटेल
(१०) श्री. राजू तोडसाम
(११) श्री. अबु आझमी
(१२) श्री. संजय गायकवाड
(१३) श्री. सचिन कल्याणशेट्टी
(१४) डॉ. ज्योती गायकवाड
(१५) श्री. शरददादा सानवणे
(१६) श्री. राजेश पवार
(१७) श्री. विनोद निकोले
(१८) श्री. प्रवीण दटके
(१९) श्री. सिद्धार्थ खरात (भाषण अपूर्ण)
(२०) श्री. विक्रम पाचपुते
(२१) श्री. हेमत ओगले
(२२) श्री. मोहन मते
(२३) श्री. अभिजीत पाटील
(२४) श्री. प्रशांत ठाकूर
(२५) श्री. संजय उपाध्याय
(२६) श्री. रणधीर सावरकर
(२७) श्री. मिहिर कोटेचा

(२८) श्री. अमोल जावळे (२९) श्री. प्रताप अडसड

(३०) श्री. सिद्धार्थ खरात

गृह (ग्रामीण) राज्यमंत्री यांनी विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खडशः विचारात घेण्यात आले.

खडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सभागृहाची बैठक रात्री १० वाजून ५२ मिनिटांनी मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ०९ वाजून ४५ मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६

विधानसभेची विशेष बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.४५ माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. समाधान अवताडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

लक्षवेधी सूचना अनुक्रमांक (२) च्या बाबतीत संबंधित मंत्री महोदयांनी विनंती केल्याप्रमाणे ती पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे (नगर विकास) लक्ष वेधले,—

" मुंबईतील परळ येथील ग्लोबल रूग्णालय प्रशासनाने मुंबई महानगरपालिकेच्या बांधकाम नियमांचे उल्लंघन करणे, मुंबई महानगरपालिकेच्या अटीनुसार रूग्णालयातील १५% खाटा गरीब रूग्णांकरीता या रुग्णालयाने आरक्षित न ठेवणे, महानगरपालिकेकडून विविध सुविधांचा लाभ घेणे, गेली १५ वर्ष महानगरपालिकेला आरक्षित खाटा हस्तांतरित न करणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्लोबल रूग्णालयातील १५% खाटा रूग्णालय प्रशासन गरीब रूग्णांकरीता उपलब्ध करून देत नसल्याने कठोर कारवाईची मागणी करणे, परंतु महानगरपालिका व ग्लोबल रूग्णालय प्रशासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही न करणे, याबाबत महानगरपालिकेच्या रूग्णालयातील दरानुसार १५% खाटा गरीब रुग्णांना उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. किसन वानखेडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"उमरखेड विधानसभा मतदारसंघातील एमएसआयडीसी (MSIDC) अंतर्गत ५१C व ५१D ही कामे HAM योजनेअंतर्गत प्रस्तावित असून सदर रस्ता अत्यंत महत्त्वाचा असणे, या रस्त्यावर उमरखेड येथील साखर कारखाना, शहरातील शाळा व महाविद्यालये, MIDC क्षेत्र तसेच सहस्त्रकुंड धबधबा ही पर्यटन स्थळे असणे, सदरहू रस्ता राष्ट्रीय महामार्गास जोडला जात असल्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असणे, तथापि सदर कामांच्या अंदाजपत्रकात रस्त्याची रुंदी केवळ ७ मीटर प्रस्तावित करण्यात आली असून वाढत्या वाहतुकीचा विचार करता ही रुंदी अपुरी असणे, तसेच प्रत्येक गावामध्ये रस्ता रुंदीकरण व काँक्रीट नालीची आवश्यकता असतानाही त्याबाबत कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसणे, ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक असणे, सदर दोन्ही कामांमध्ये रस्त्याची रुंदी किमान १० मीटर करण्यात यावी, गावालगतच्या रस्त्यांचे चौपदरीकरण करण्यात यावे, तसेच

आवश्यकतेनुसार दोन्ही बाजूंनी काँक्रीट नालीची तरतूद करण्यात यावी तसेच उमरखेड शहरातील उड्डाणपुलापासून गोपिकाबाई गवंडे महाविद्यालयापर्यंत रस्त्याचे चौपदरीकरण व दोन्ही बाजूंनी काँक्रीट नाली बांधकाम करण्याबाबत संबंधित यंत्रणेस तात्काळ आदेश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. अनिल ऊर्फ बाळासाहेब मांगुळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"यवतमाळ नगरपरिषद येथील मुख्याधिकारी यांनी त्यांच्या प्रशासकीय कार्यकाळामध्ये अनेक नियमबाहय कामे व निर्णय घेतले असल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये जैवखनन (BIO MINING) प्रकल्प टेंडर प्रक्रिया असो किंवा घनकचरा व्यवस्थापन (घंटागाडी) नाले साफसफाई, अग्निशमन दल विभागीय कार्यालयाचे बांधकाम निविदा, अशा अनेक निविदा प्रक्रिया नियमबाहय प्रक्रियेने राबवून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास येणे, तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी यांच्या कक्षेत असलेले शहरातील भुयारी गटारांची कामे व शहरात बेंबळा प्रकल्पाचे वाढीव पाणीपुरवठा योजनेची कामे करण्याकरिता शहरांतर्गत भागातील रस्त्यांची खोदकामे करणे, परंतु अनेक ठिकाणी करण्यात आलेल्या खोदकामांना २/३ महिन्यांचा कालावधी होऊनही रस्त्याचे काम पूर्ण न केल्यामुळे नागरीकांना रहदारीचा होत असलेला त्रास, त्यामुळे याबाबत नागरीकांच्या अनेक तक्रारी असणे, शहरासाठी ९ कोटी रुपयांचा विकास निधी प्राप्त झाला असतांना ४९ रस्त्यांची कामे पूर्ण झाली असल्याचे कागदोपत्री दाखविणे, यासर्व प्रकरणांची चौकशी करून शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. समीर मेघे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे यांचे लक्ष वेधले,—

"औद्योगिक वसाहत (MIDC) हिंगणा, जिल्हा नागपूर भागात ग्रा.पं. सोनेगाव (निपाणी) सर्व्हे क्र.४५/२ श्रमिकनगर येथे सन १९८० च्या पूर्वीपासून म्हणजे सुमारे ४३ वर्षापासून ४०० कुटुंबियांनी अतिक्रमणे केली असणे, तसेच नगरपंचायत निलडोह परिसरातील MIDC मधील

ओपन स्पेस क्र.३ व ४० येथे ८०० गरजू कुटुंबियांनी ४० ते ४५ वर्षापासून अतिक्रमणे केली असणे, तसेच नगरपरिषद डिगडोह, ता.हिंगणा, जि.नागपूर येथील सर्व्हे क्र.१० वर १६८ कुटुंबियांनी अतिक्रमणे केली असणे, या तिन्ही वसाहतींमध्ये अतिक्रमीतांनी पक्की घरे बांधून ते वास्तव्यास असणे, आजमितीस या तिन्ही अतिक्रमीत वसाहतींमध्ये वीज, पाणीपुरवठा, रस्ते, नाल्यांची बांधकामे, शिक्षण सुविधा निर्माण करण्यात आली असणे, अनेकदा पट्टे वाटप करण्यासंदर्भात निवेदने देण्यात आली असतांनाही अद्याप त्याबाबत कार्यवाही झाली नसणे, अतिक्रमीत कुटुंबियांना भूखंडाचे वाटप करण्यात न झाल्यामुळे घरांची दुरुस्ती, विस्तारित बांधकामे याकरिता बँक कर्ज मिळत नसणे, तसेच गरजेनुसार घरांची खरेदी–विक्री व्यवहार अतिक्रमीत धारकांना करता येत नसणे, सुमारे ४० ते ४५ वर्षापूर्वी अतिक्रमण करणाऱ्या मूळ कुटुंब प्रमुखाचे आजचे वय किंवा त्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील वारसदार या बाबी लक्षात घेता भूखंडाचे पट्टे वाटप होण्याचे प्रतिक्षेत ते असल्याची बाब शासनास निवेदनान्वये कळविण्यात आली असणे,त्यामुळे औद्योगिक वसाहत (MIDC) हिंगणा क्षेत्रातील मौजा सोनेगाव (निपाणी) श्रमिक नगर,नगरपंचायत नीलडोह व नगरपरिषद डिगडोह वसाहतीमधील अतिक्रमित धारकांना भूखंड नियमानुकूल करून निवासी पट्टयांचे वाटप करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. सुरेश धस, श्रीमती नमिता मुंदडा वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुरेश धस, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"बीड जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत जिल्हा सरकारी कामगार अधिकारी कार्यालय व तालुका कामगार अधिकारी कार्यालयामार्फत माहे मार्च, २०२० ते माहे फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत शेकडो बोगस मयत कामगार दाखऊन कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याची बाब उघडकीस येणे, काही नोंदणी करणाऱ्या संस्था व मयताच्या वारसांनी प्रशासनाशी संगनमत करून कित्येक वर्षांपूर्वी मृत्यू झालेल्या व्यक्तींना जिवंत दाखवून नगर परिषदेकडून ९० दिवस काम केल्याचे बनावट प्रमाणपत्र व खोटे मृत्यू दाखले मिळवून शासनाची मोठी फसवणूक करणे, सदर प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी, संस्था व बोगस वारसांवर अद्याप कोणतीही कठोर फौजदारी कारवाई न झाल्याने जनसामान्यांत पसरलेला तीव्र असंतोष, या संपूर्ण घोटाळ्याची सचिव स्तरावर उच्चस्तरीय चौकशी करून दोषींकडून

अपहारित रकमेची सक्तीची वसुली करण्याबाबत, संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणे, दोषींवर गुन्हे दाखल करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४३ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. (१) पाच तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नांच्या यादीतील सतरा प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, गॅस सिलेंडर टंचाईच्या मुद्याबाबत अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी सभागृहात आज संध्याकाळपर्यंत निवेदन करावे, अशी विनंती केली.

अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

आजच्या दिवसाचे कामकाज संपेपर्यंत माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी निवेदन करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

२. (१) अपारंपरिक ऊर्जा मंत्र्यांनी, (क) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल व (ख) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासोर ठेवला.

(२) पर्यटन मंत्र्यांनी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासोर ठेवला.

(३) इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी, पुढील वार्षिक लेखे सभागृहासोर ठेवले,—

(क) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२४-२०२५ चे वार्षिक लेखे.

(ख) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२४-२०२५ चे वार्षिक लेखे.

(ग) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे सन २०२४-२०२५ चे वार्षिक लेखे.

(घ) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे सन २०२४-२०२५ या वर्षाचे वार्षिक लेखे

(ङ) कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन २०२४-२०२५ चे वार्षिक लेखे

(३) इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचा अनुक्रमे बावन्नावा व त्रेपन्नावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवली.

३. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी, 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या नावावर अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहमदनगर वरून अहिल्यानगर करण्यात आलेले असून देखील मराठी आवृत्तीच्या विनियोजन विधेयकातील पृष्ठ क्रमांक-२८, २९ व ७७ वर तसेच इंग्रजी आवृत्तीच्या विनियोजन विधेयकातील पृष्ठ क्रमांक-२८ व ७२ वर 'अहिल्यानगर' ऐवजी 'अहमदनगर' असा उल्लेख करण्यात आलेला असणे' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीची नोंद संबंधित विभागाने घ्यावी व त्या अनुषंगाने उचित उपाययोजना करावी, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

४. (१) डॉ. बालाजी किणीकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर तालुक्यातील उल्हासनगर शहर हे सुमारे १३ चौ.कि.मी. क्षेत्रफळात वसलेले असून राज्यातील सर्वाधिक दाट लोकवस्तीचे शहर असताना सन २०१३ मध्ये प्रसिद्ध विकास आराखड्याबाबत नागरीकांकडून १७ हजार ३३ हरकती व सूचना प्राप्त होणे, त्यापैकी अत्यल्प हरकतींचाच विचार करण्यात आल्याची बाब समोर येणे, तसेच १२० फूट रुंदीच्या रिंगरोडमुळे झोपडपट्टी, वसाहती व व्यापारी आस्थापना बाधित होण्याची शक्यता निर्माण होणे, तसेच महाराष्ट्र शासनाच्या २००६ च्या अधिनियमाअंतर्गत दिनांक ०१ जानेवारी,

२००५ पूर्वीच्या अनधिकृत बांधकामांच्या नियमितीकरणासाठी दाखल सुमारे २५ हजार प्रकरणांवर आजतागायत निर्णय न होणे, वारंवार अर्ज व शुल्क भरूनही प्रकरणे प्रलंबित राहणे, अनेक इमारती जीर्ण अवस्थेत असताना नगररचना विभागाकडून अहवाल न देणे, तसेच नियमितीकरण प्रक्रियेवरील खर्च व प्रत्यक्ष महसूल याबाबत पारदर्शकता नसणे, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री संभाजी पाटील निलंगेकर, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

" ताई सुखदेव काळे, (वय ३१) रा. डोंजा, ता. परंडा, जि. धाराशिव यांचा दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला असणे, त्याबाबत अंबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला असणे, संबंधित तक्रारीनुसार आरोपींकडून मयत ताई सुखदेव काळे यांना वारंवार फोन कॉल व अश्लील मेसेजव्दारे त्यांच्याकडे शरीरसुखाची मागणी करून त्यांना ब्लॅकमेलिंग करून मानसिक त्रास दिला जात असल्याचे नमूद असणे, तथापि संबधित पोलीस अधिकारी यांना तक्रारदार यांनी पुरावे सादर करूनही त्यांनी आरोपींवर किरकोळ कलमे लावणे, त्यामुळे आरोपींना त्वरित जामीन मिळाला असणे, आरोपी सध्या पुरावे नष्ट करणे तसेच तक्रारदारावर दबाव टाकून त्याचा जबाब बदलण्यासाठी प्रयत्न करत असणे, यासाठी आरोपींना प्रथमदर्शनी पोलीसांची साथ मिळत असणे, त्यामुळे परिसरात प्रशासना विरूध्द असंतोष पसरत असणे, त्यानुषंगाने सदरहू गंभीर प्रकरणात आरोपींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक तसेच माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करणे, प्रकरणाची सखोल चौकशी होण्यासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करणे, कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करणे तसेच पीडित कुटुंबास आर्थिक सहाय्य व संरक्षण देऊन त्यांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री श्री. भीमराव (अण्णा) तापकीर , सुनील कांबळे वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

श्री. भीमराव (अण्णा) तापकीर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

" पुणे महानगरपालिका हद्दवाढी अंतर्गत दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ व ३० जून, २०२१ रोजी एकूण ३२ गावे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली असणे, समावेशानंतर विशेषतः खडकवासला मतदारसंघातील भागांमध्ये कचरा व्यवस्थापनात गंभीर समस्या असणे, अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येणे व स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव असणे, घनकचरा व्यवस्थापन विभागास दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध असतानाही त्याचा परिणामकारक वापर होत नसणे, मुख्य खाते क्षेत्रीय कार्यालय स्तरावर नियोजन देखरेखीत त्रुटी असणे, कंत्राटदार यांच्यात संगनमत होऊन निधीचा अपव्यय होत असणे, कचरा व्यवस्थापनासाठी दर्शविलेली वाहने, मशिनरी व कर्मचारी पूर्ण क्षमतेने कार्यरत नसतानाही त्यांच्या नावावर देयके अदा होणे, तसेच प्रत्यक्षात न केलेल्या कामांची देयके सादर होणे, विशेषतः क्षेत्रीय कार्यालयांतील स्वच्छता निरीक्षक (SI) व विभागीय स्वच्छता निरीक्षक (DSI) स्तरावर देखरेखीचा अभाव दिसून येणे, नियमित कचरा उचल न होणे, वाहने वेळेत न फिरणे व तक्रारींवर कार्यवाही न होणे, परिणामी अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग कायम राहून दुर्गंधी, डास व संसर्गजन्य रोगांचा धोका वाढणे, त्यामुळे खडकवासला मतदारसंघात कचरा व्यवस्थापनाबाबत चौकशी समिती स्थापन करून विशेष आर्थिक लेखापरीक्षण करणे, संबंधित अधिकारी व कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करणे तसेच पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित कचरा व्यवस्थापन आराखडा तयार करून समयबद्ध अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. कैलास घाडगे-पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

" राज्यामध्ये जवळपास ८६,००० अनुदानित शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेंतर्गत केंद्र सरकार मार्फत पोषण आहार योजनेसाठी जवळपास रुपये १८०० कोटी खर्च करणे, राज्यस्तरीय खरेदी समितीने निविदा प्रक्रियेमध्ये प्रत्येक घटकाचे दर व तपशील देणे, हिरवा वाटाणा पुरवठा करावा लागेल असे स्पष्ट करून "हिरवा वाटाणा" (Green Peas) चे दर मागवून रुपये १३४ प्रति किलो निश्चित करणे, याबाबत शिक्षण संचालनालयामार्फत प्रत्येक

जिल्हानिहाय कार्यादेश देण्यात येणे, त्यात मुळ निविदेमध्ये असलेला 'हिरवा वाटाणा' हा शब्द वगळून फक्त वाटाणा शब्द जाणीवपूर्वक घालणे, हिरवा वाटाणा हा बाजारात १२० ते १३० रुपये प्रति किलो मिळणे व पांढरा वाटाणा प्रति किलो ३० ते ३५ रुपये दराने मिळणे, १३४ रूपयांच्या हिरवा वाटाण्याऐवजी ३०-३५ रूपयांचा साधा वाटाणा पुरवठा करणे, पोषण आहाराचे काम हे महिला बचत गटामार्फत करणे, परंतु ८६ हजार शाळांमधील महिला बचत गटांवर अन्याय करून काही ठराविक लोकांनाच फायदा व्हावा या उद्देशाने हे काम त्यांना देण्यात येणे, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेत मुळ निविदेतील तपशील व कार्यादेश मधील तपशील यामध्ये जाणीवपूर्वक बदल करून करण्यात येणाऱ्या भ्रष्टाचाराची चौकशी करून कारवाई करणे व मुळ निविदेमध्ये असलेला हिरवा वाटाणा विद्यार्थ्यांना पुरवठा करण्याचे आदेश देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) ॲड. राहुल कुल व श्री. विजय शिवतारे, वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना.

ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"जलसिंचनामुळे राज्यातील चिबड जमिनींचे प्रमाण वाढले असल्याने चिबड जमिनी निर्मूलनाची आवश्यकता असणे, पाझरचर, बंदिस्त पझारचर यासाठी मापदंड निश्चित करून पाझरचर निर्मुलनासाठी दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रके त्वरित तयार करून त्यास मान्यता देण्याची आवश्यकता, नदी क्षेत्रातील उक्त जमीन सुधारणेकरीता १००% रक्कम अनुदान देण्याची मागणी, खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे काम सुरु असून उक्त काम वेळेत पूर्ण होण्याची आवश्यकता असणे, जनाई शिरसाई उपसासिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण निधीस मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून निविदा प्रक्रिया सुरु असणे, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कुपटेवाडी (भुलेश्वर) येथील वितरिकेच्या वरील बाजूस, वंचित जिरायती भागातील गावांच्या सिंचनासाठी नवीन पाईपलाईनसाठी अंदाजपत्रके तयार करण्यात येणे, त्यास पाणी परवानगी दिली असून, निधीसह मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, दौंडच्या पूर्वभागातील अनेक गावांतील शेती उजनी धरणाच्या बॅकवॉटरवर अवलंबून असणे, त्याठिकाणी बॅरेजे बांधण्याची मागणी असणे, मुळा मुठा व भीमा नदीवर कोपबंधाऱ्यांना अनेक वर्षांचा कालावधी झाला असल्याने त्यामधून पाण्याची गळती होत असल्याने, बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेसमध्ये रुपांतर करण्याची आवश्यकता

असणे, मुळशीचे पाणी पूर्वमुखी वळविण्याच्या प्रस्तावास टाटा पॉवर यांच्याकडून तत्वतः मान्यता दिली असणे, उक्त सर्व विषयांबाबत मा. मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक १२.०२.२०२५, १३.०८.२०२५, ३०.०९.२०२५, ०४.०३.२०२६ रोजी बैठका घेऊन देखील कोणताही निर्णय झाला नसणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

" विकास नियमावली ३३(११) व ३३(२०) B अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये ३ FSI मध्ये १ FSI व ४ FSI मध्ये १.५ FSI इतका साठा PAP/PTC स्वरूपात बांधून SRA/महानगरपालिकेला देणे असणे, मात्र प्रत्यक्षात IOD/IOA प्लॅनप्रमाणे बांधकाम न करता २BHK/३BHK घरे बांधून विक्री केली जात असल्याचे दिसून येणे, संबंधित विभागाकडून योग्य लेखापरीक्षण (Audit) न झाल्यामुळे शासनाची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असणे, मुलुंड मतदारसंघात ३३(११) व ३३(२०) B अंतर्गत ६ ते ७ प्रकल्पांमध्ये अनियमितता झाल्याची माहिती असणे, केवळ मुलुंड मध्येच १०० कोटींपेक्षा अधिक किंमतीची शासकीय मालमत्ता बेकायदेशीररीत्या विकली गेल्याची शक्यता असणे, संपूर्ण मुंबईत हा आकडा २००० कोटींपेक्षा जास्त असणे, तसेच नियमांनुसार PAP/PTC साठा ५ कि.मी.च्या आत किंवा लगतच्या वॉर्डमध्ये देणे अपेक्षित असताना मुलुंड मधील साठा मालाड–मालवणी व मानखुर्द येथे स्वीकारण्यात येणे, यामुळे भविष्यात मुलुंडमधील नागरिकांवर स्थलांतराची वेळ येणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५. महसूल मंत्र्यांनी, 'रब्बी हंगाम २०२५-२०२६ च्या ई-पीक पाहणी नोंदणीची मुदतवाढ ' इ.बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, 'आजच्या नियमित बैठकीतील लक्षवेधी सूचना क्रमांक-१ मध्ये माझे नाव छापले नसणे ' इ.बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा विषयक उपस्थित केला.

(७) श्री. राजू खरे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ विधानसभा मतदारसंघातील चिंचोळीकाटी एम.आय.डी.सी. मधील ओसी, छल्ला, फर फर, बासवा, ॲबो आर्यन व कृष्णा केमिकल या कंपन्यांमधुन दूषित पाणी सोडण्यात येत असल्यामुळे शेतीचे होत असलेले नुकसान, केमिकल युक्त दूषित पाणी सोडण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील विहीरी व बोर मधुन येणारे पाणी पूर्णपणे दूषित झालेले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून पूर्ण शेती खराब झालेली असणे, दूषित पाण्यामुळे तेथील लोकांचे आरोग्य सुध्दा धोक्यात आलेले असणे, चिंचोळीकाटी एम.आय.डी.सी. मधील दूषित पाणी सोडणाऱ्या वरील कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत वारंवार तक्रारी तेथील लोकप्रतिनिधी यांनी मा. पर्यावरण मंत्री यांच्याकडे करून सुद्धा त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्यामुळे तेथील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, उपरोक्त नमूद केलेल्या कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६. (१) माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांनी, (मुख्यमंत्री यांच्याकरीता) सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक १७ - महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री. हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ. नितीन राऊत यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. नानाभाऊ पटोले (२) श्री. प्रवीण दटके

(३) डॉ. नितीन राऊत (४)श्री. विकास ठाकरे

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी यांनी, 'विरोधी पक्षाच्या तीन महत्त्वपूर्ण ठरावांचे कामकाज तीन दिवसांपासून प्रलंबित असणे' इ.बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा विषयक उपस्थित केला.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २२ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ. नितीन राऊत यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) ग्राम विकास मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २२ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री. हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. नानाभाऊ पटोले
(२) श्री. अभिजीत पाटील
(३) श्री.विक्रम पाचपुते
(४) श्री.प्रवीण स्वामी
(५) श्री.प्रताप पाटील-चिखलीकर
(६) श्री. सुहास बाबर
(७) श्री. राजकुमार बडोले
(८) श्री.चंद्रदीप नरके
(९) डॉ. बाबासाहेब देशमुख
(१०) श्री. विठ्ठल लंघे
(११) श्री. हिरामण खोसकर
(१२) श्री. मनोज घोरपडे
(१३) श्री. हरिश पिंपळे
(१४) श्री. हेमंत ओगले
(१५) श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली कटके

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस ग्राम विकास मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी, ' राज्यात गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण होणे' इ.बाबत म.वि.स.नियम ४७ अन्वये निवेदन केले.

श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी या विषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

वने मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २४ - वन्यजीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,२०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(४) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक १६ – महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा), २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे,

डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री रामदास मसराम, हेमंत ओगले व अमित झनक, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. नानाभाऊ पटोले
(२) श्री.विजय वडेट्टीवार
(३) श्री.सुमित वानखेडे
(४) श्री. भास्कर जाधव
(५) श्री. अर्जुन खोतकर
(६)डॉ. नितीन राऊत
(७) श्री. हरिश पिंपळे
(८) श्री. अभिजीत पाटील
(९) श्री. राजकुमार बडोले
(१०) श्री. राजेश पवार
(११) श्री.हेमंत ओगले

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस शालेय शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(५) परिवहन मंत्र्यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २३ – महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. अभिजीत पाटील
(२) श्री.अर्जुन खोतकर
(३) श्री. आदित्य ठाकरे
(४) डॉ. नितीन राऊत

उपरोक्त विधेयकावरील चर्चेस परिवहन मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. अर्जुन खोतकर, वि.स.स.यांनी, ' मागील दोन दिवसांपासून राज्यातील धनगर समाजाच्या वतीने धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत माननीय श्री.दिपक बोराडे यांच्या नेतृत्वात आझाद मैदानावर आंदोलन सुरु असणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

(८) ॲड. श्रीजया चव्हाण, श्री. जितेश अंतापुरकर, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना-

ॲड. श्रीजया चव्हाण, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"जिल्हा रुग्णालय नांदेड याची क्षमता १०० खाटांवरुन ३०० खाटा इतकी श्रेणीवर्धीत करण्याबाबत सन २०२१ मध्ये शासनाकडे सादर झालेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली असणे, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे येणाऱ्या बाह्य रुग्णांची संख्या प्रतिदिन जवळ जवळ हजार इतकी असणे, या रुग्णालयात अंतररुग्ण म्हणून दाखल होणाऱ्या रुग्णांचे प्रमाणही लक्षणीय असणे, त्यामुळे जिल्हा रुग्णालयात भरती करावयाच्या रुग्णांकरीता खाटा मिळत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असणे, सुमारे ३६ लाख लोकसंख्या असलेल्या नांदेड जिल्ह्यात ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय सुरु झाल्यास त्या परिसरातील १६ तालुक्यांना त्याचा लाभ मिळणार असणे, मात्र नांदेड जिल्ह्यात आता उद्‌भवलेल्या आणिबाणीसदृश्य परिस्थितीत कोणतीही सक्षम पर्यायी व्यवस्था नसणे, आरोग्य सेवेअभावी रुग्णमृत्यू दरामध्ये सातत्याने लक्षणीय वाढ होणे, या पार्श्वभूमीवर अस्तित्वात असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय म्हणून श्रेणीवाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह प्राप्त होऊनही त्यावर शासनाने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, नागरिकांची होणारी गैरसोय, कुचंबणा व नागरीकांच्या जिवाला निर्माण होणारा धोका, या सर्व बाबी विचारात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. अमोल खताळ, वि.स.स. यांनी, ' नाशिक जिल्ह्यातील संगमनेर मतदारसंघात वडगाव पान येथे आज दुपारी एक अल्पवयीन विद्यार्थिनी शाळा सुटल्यानंतर घरी जात असताना तिच्यावर ॲसिडद्वारे हल्ला करण्यात येणे ' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, सभागृहात आवश्यक गणपूर्ती नसल्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी, ' नाशिक जिल्ह्यात त्र्यंबक तालुक्यात पिंपरी त्र्यंबक या ठिकाणी सुमिती विज्ञानपीठ अनुदानित आश्रमशाळेत दि.१२ मार्च, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजण्याच्या सुमारास श्री.संजय साधू नडगे हा दहावी उत्तीर्ण विद्यार्थी बेपत्ता झाल्यानंतर दिनांक

१५ मार्च, २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता त्याचा मृतदेह आढळणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

सभागृहात मंत्री उपस्थित नसल्याने सभागृहाची बैठक सायंकाळी ०६ वाजून २९ मिनिटांनी १० मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ०६ वाजून ३९ मिनिटांनी पुन्हा सुरु झाली.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, सभागृहात आवश्यक गणपूर्ती नसल्याचा मुद्दा उपस्थित केला.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०६ वाजून ४५ मिनिटांनी १० मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ०६ वाजून ५५ मिनिटांनी पुन्हा सुरु झाली.

श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, सभागृहात गणपूर्तीअभावी सभागृहाचे कामकाज चालविणे चुकीचे होईल, असा मुद्दा उपस्थित केला.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०६ वाजून ४५ मिनिटांनी बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ०९.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.

बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६

विधानसभेची विशेष बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.४५ वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. समाधान अवताडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्री. राजन नाईक, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. पराग शाह, प्रविण दटके, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्री. राजन नाईक, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"MMRDA क्षेत्राचा भाग असलेल्या वसई-विरार उपप्रदेशासाठी शासनाकडून सन १९९० मध्ये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात येणे, सिडकोने तयार केलेला २००१-२०२१ या कालावधीचा विकास आराखडा महानगरपालिका आयुक्तांच्या संमतीने दिनांक ९ फेब्रुवारी, २००७ रोजी मंजूर केलेला असणे, या आराखड्याची मुदत सन २०२१ मध्ये संपुष्टात आल्यानंतर वसई-विरार शहर महानगरपालिकेने MRTP कायदा, १९६६ च्या कलम २३ व ३८ नुसार दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी सुधारित विकास आराखडा तयार करण्याबाबत नोटीस प्रसिद्ध केली असणे, या क्षेत्रातून बुलेट ट्रेन, कोस्टल रोड त्याचप्रमाणे चौथ्या मुंबईचे नियोजन, मनपा क्षेत्राची सध्या वेगाने वाढणारी लोकसंख्या, अपुऱ्या पायाभूत सुविधा, अनधिकृत बांधकामे यांसारख्या गंभीर समस्या पाहता विशेष नियोजनाची आवश्यकता असणे, अनेक धोरणात्मक प्रकल्प आणि सध्याची अनधिकृत व नियोजनबाह्य बांधकामे धरुन सुधारित विकास आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक असलेले अनुभवी व तज्ज्ञ मनुष्यबळ महानगरपालिकेकडे उपलब्ध नसणे, MRTP कायदा कलम १६२ मध्ये कोणतेही नियोजन प्राधिकरण त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यास कार्यक्षम नसल्यास राज्य शासनास अशा अधिकाराचा वापर करण्याची तरतूद असणे, या पार्श्वभूमीवर महापालिकेने प्रसिद्ध केलेली नोटीस रद्द करून सुधारित विकास आराखडा तयार करण्यासाठी कलम १६२ नुसार MMRDA आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती गठित करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"मुंबईतील मालाड (पूर्व) येथील PAP प्रकल्प (CTS क्र. ८२७/A/४A/२) संदर्भात गंभीर अनियमितता झाल्याचे दस्तऐवजांवरून स्पष्ट होणे, सदर भूखंड मूलतः "पोलीस स्टाफ

क्वॉर्टर्स" साठी राखीव असताना तो PAP गृहनिर्माणासाठी वापरण्यात येणे, प्रकल्पाच्या LOA मध्ये माहे एप्रिल, २०२५ नंतर दुरुस्ती करून प्रति घरकूल खर्च रुपये ३२.२१ लाखांवरून तब्बल रुपये ५०.९८ लाखांपर्यंत वाढविण्यात आला असणे, ज्यामुळे सुमारे रुपये ६१८ कोटींची अतिरिक्त आर्थिक वाढ झाली असणे, या GR ने दिनांक १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी ASR दर रुपये ८४,४६० प्रति चौ.मी. योग्य असल्याचे स्पष्ट केले असणे, मुंबईतील विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी सद्यःस्थितीत अंदाजे ५०,००० पी.ए.पी.सदनिकांची आवश्यकता असणे, मुंबईचा विकास आराखडा (DP) राबविण्यासाठी २,२०,००० पी.पी.ए. सदनिकांची आवश्यकता असल्याचे कृती दलाच्या निदर्शनास आले असणे, मात्र दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी अचानक सर्वे क्रमांक बदलून दर रुपये १,३३,६७० प्रति चौ.मी. करण्यात येणे, कोणतीही नव्याने प्रत्यक्ष पाहणी किंवा स्वतंत्र मूल्यांकन न करता हा बदल करण्यात आल्याने संगनमताचा संशय निर्माण होणे, तसेच, टेंडर अटींनुसार टप्प्याटप्प्याने देयके देणे अपेक्षित असताना ५०% TDR व प्रीमियम आगाऊ देण्यात येणे, या सर्व बाबींची उच्चस्तरीय चौकशी करून दुरुस्त LOA स्थगित करण्याची व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगरविकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री.अनंत (बाळा) नर, मुरजी पटेल, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना—

श्री.अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले,—

"जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रामध्ये मयूर नगर, मोराचा पाडा मौजे मरोशी ता.बोरीवली न.भू.क्र १६२७ (पै) सर्वे नं १६९ येथे २५ वर्षापूर्वी झोपडपट्टी पुनर्विकास योजना (एसआरए) राबविली जात असणे, सदरहू संपूर्ण काम अर्धवट असून स्थानिक रहिवाशांना मूलभूत सुविधा पुरविलेल्या नसणे, सदर वसाहतीमध्ये ७५१ लाभार्थी असणे, त्या रहिवाशांचे परिशिष्ट -२ अद्याप केलेले नसणे, विकासकाने स्वतःच झोपडपट्टीवासियांना घरांचा ताबा देणे, सदर इमारतीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होणे, शासनाला देय असलेली पीएपीसाठी राखीव असलेली घरे न देणे, नियमाप्रमाणे अधिकृत रस्ता त्या वसाहतीला उपलब्ध न करणे, धोकादायक इमारतीत रहिवाशी जीवन जगत असणे, याठिकाणी विकासकाने प्रचंड अनियमितता केल्यामुळे त्याचेवर कारवाई करण्याची आणि या सर्व इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

पर्यटन मंत्र्यांनी (श्री.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४ व ५ माननीय मंत्र्यांनी पत्राद्वारे विनंती केल्यामुळे पुढे ढकलण्यात येत असून आता लक्षवेधी सूचना क्रमांक ६ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(४) श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील गमन येथील श्री हुन्या रुपा वसावे यांना आयुक्त, महसूल नाशिक विभाग यांच्या दिनांक ६ एप्रिल, २००५ रोजीच्या आदेशान्वये प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित करण्यात आलेले असणे, परंतु उपलब्ध सर्वेक्षण नोंदी १९८७ च्या यादीतील अनुपस्थिती तसेच संबंधित कागदपत्रांतील विसंगती यावरुन त्यांची जमीन प्रत्यक्षात प्रकल्पाच्या बुडीत अथवा बाधित क्षेत्रात गेलेली नसल्याची बाब समोर येणे, किरसिंग हुण्या वसावे हे त्यावेळी नर्मदा बचाव आंदोलनात सक्रीय कार्यकर्ता असल्याने अधिकाऱ्यांसोबत संगनमत करून त्यांनी सदर क्षेत्र हे बाधित दाखवून संबंधितांनी प्रकल्पग्रस्त या नात्याने शासनाकडून आर्थिक मोबदला व पुनर्वसन लाभ स्वीकारले असल्याची गंभीर तक्रार प्राप्त होणे, यामुळे खऱ्या पात्र प्रकल्पग्रस्तांवर अन्याय तसेच शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय होणे, संबंधित प्रकरणात कागदपत्रांची पडताळणी न करता लाभ मंजूर केल्याने निर्माण झालेला प्रशासकीय हलगर्जीपणा, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व कालबद्ध चौकशी करून अपात्र लाभ तात्काळ वसूल करण्याबाबत तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"पुणे जिल्ह्यातील हिंजवडी आयटीपार्कमध्ये १,००० फ्रेशर्स पदवीधरांना एका फसवणूक करणाऱ्या कंपनीने नोकरी देण्याच्या नावाखाली त्यांचेकडून सुमारे २ लाख रुपये घेऊन फसवणूक केली असल्याचे निदर्शनास येणे, हिंजवडी घोटाळ्यातील फ्रेशर्स पदवीधरांचे पैसे

परत मिळविण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याची आवश्यकता असणे, टीसीएस व इतर आयटी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना कॉन्फरन्स रूममध्ये नेऊन दबावाखाली राजीनामा देण्यास भाग पाडले जात असणे, कोणतेही आर्थिक पॅकेज न देता बेकायदेशीर कामावरून काढून टाकण्यात येणे, आयटी कंपन्यांमध्ये नोकरी सोडणे, जबरदस्तीने राजीनामे घेण्याच्या सत्रामुळे आयटीयन्सच्या मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, आयटी क्षेत्रात जबरदस्तीचे राजीनामे टाळण्यासाठी सुसूत्र पद्धतीने कर्मचाऱ्यांची कपात नियमन करण्यासाठी स्पष्ट व बंधनकारक चौकट तयार करण्याची आवश्यकता असणे, आयटीयन्सला कायद्यांच्या संरक्षणात्मक कक्षेत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या करून कामाचे तास, फुल अँड फायनल सेटलमेंट, आणि पीएफ पालन यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक असणे. कामाचे तास वाढवले जात असताना औद्योगिक विवाद अधिनियम अंतर्गत कामगार संज्ञेची आयटी क्षेत्रासाठी स्पष्ट व्याख्या नसल्याने आयटी कर्मचारी अजूनही अनेक संरक्षणात्मक कायदेशीर चौकटींच्या बाहेर असणे, फेअर बॅकग्राऊंड व्हेरिफिकेशन फुल अँड फायनल सेटलमेंटमध्ये होणारा विलंब पीएफच्या तफावती, ९० दिवसांच्या नोटीस पिरीयडची सक्ती ही गंभीर समस्या असणे, योग्य सक्षम तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध नसल्याने असुरक्षित आयटीयन्सच्या तक्रारीकरिता फास्ट-ट्रॅक लेबर कोर्ट प्रणाली/आयटी ट्रायब्युनल' सुरू करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी, "जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रामध्ये मयूर नगर, मोराचा पाडा मौजे मरोशी ता.बोरीवली न.भू.क्र १६२७ (पै) सर्वे नं १६९ येथे २० ते २५ वर्षापासून लोक राहत असून त्यांनी खरेदी केलेल्या घरांची सर्व कागदपत्रे बघून दखल घेण्यात यावी." इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भातील सर्व बाबी तपासून घेतल्या जातील असे पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्र्यांनी सांगितले.

श्री. सुभाष देशमुख, वि.स.स. यांनी, "सोलापूरमध्ये अवैध डान्सबारचा व्यवसाय सुरू असून काल एका डान्सबारमध्ये प्राणघातक हल्ला झालेला असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

या विषयासंदर्भात सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक यांना आजच्या आज सूचना दिल्या जातील असे पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्र्यांनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.समाधान आवताडे यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

१. (अ) सोमवार, दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्री. संजय देरकर, वि.स.स. यांचा "पुनवट (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील ग्रामपंचायतीच्या मालकीची शासकीय जमीन खाजगी शिक्षण संस्थेस दिल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २९९२४ उत्तरित झाला.

(ब) (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील वीस तारांकित प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(क) (१) आदिवासी विकास मंत्र्यांनी, "दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री. हारून खान व इतर वि.स.स यांच्या "शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी लाभार्थ्यांच्या घरकुलाची मजुरी प्रलंबित असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २५२८२ ला अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

(२) अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी, "दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर, वि.स.स यांच्या "पुणे शहरात ब्लिंक इट या ऑनलाईन अन्न वितरण सेवेद्वारे कालबाह्य खाद्यपदार्थांचे वितरण होत असल्याबाबत" या तारांकित प्रश्न क्रमांक २३६२० ला अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

(ड) सचिव-१ यांनी अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २३ ते ३३ सभागृहाच्या पटलावर ठेवली.

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २३ ते ३३ सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या असून सदरहू याद्या विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

२. (१) परिवहन मंत्र्यांनी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) परिवहन मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे लेखे अहवाल व सन २०२४ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

नियम ४७ अन्वये निवेदन –

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी, "बारामती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास दिनांक ३१ मे, २०२३ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले होते. आता दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी बारामती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित रुग्णालयासही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असणे" इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने नियम ४७ अन्वये निवेदन केले.

३. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले व अस्लम शेख यांनी एकाच विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना मांडली असून विषयाचे गांभीर्य लक्षात घेता अपवादात्मक परिस्थिती म्हणून सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांना अगदी थोडक्यात म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आहे आहे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी दिलेली माहिती अत्यंत गंभीर स्वरूपाची असून याची शासनाने नोंद घ्यावी व अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भात निवेदन करावे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

४. (१) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी, "नाशिक येथील देवळाली परिसरात प्रस्तावित नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याच्या दृष्टीने विशेष बाब म्हणून धोरणात्मक निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात यावा." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री.अबू आझमी, वि.स.स. यांचा मुद्दा.

(प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने हिंदी प्रतिवेदन प्रलंबित.)

(३) श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स. यांनी, "अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहाकरिताच्या नियोजित जागेस नगर विकास विभागाची एनओसी मिळाली असून सदर वसतिगृहाच्या बांधकामकरीता निधी उपलब्ध करून तातडीने काम सुरू करण्याची आवश्यकता." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. संजय पोतनीस, वि.स.स. यांनी, "कलिना येथील बहुतांश भाग हा विमानतळ प्राधिकरणाच्या आखत्यारित असल्यामुळे धोबी घाट, नागदेवी तसेच संदेश नगर, शांती नगर येथे राहणाऱ्या रहिवाशांना अनेक सोयी-सुविधांपासून वंचित राहावे लागत असणे तसेच विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवरील झोपड्यांचे स्थलांतराचे काम तातडीने करण्यात यावे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. अनुपभैया अग्रवाल, वि.स.स. यांनी, "धुळे शहरात घरगुती गॅसच्या बाबतीत इंडियन ऑईल कंपनीची आज्ञावली चालत नसून सदर कंपनीकडून त्यांची आज्ञावली त्वरित दुरुस्त करावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, "अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे दिनांक १७ मार्च २०२६ रोजी इयत्ता ६ वी मध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर ॲसिड हल्ला होणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

या विषयासंबंधीच्या स्थगन प्रस्तावावर माननीय अध्यक्षांनी निर्णय दिलेला आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांनी उत्तर दिले.

(७) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी, "राज्य शासनाने राज्यातील जनतेसाठी स्वच्छ, शाश्वत आणि प्रभावी उपचार मिळवून देण्यासाठी केंद्र शासनाप्रमाणे स्वतंत्र आयुष मंत्रालयाची स्थापना करावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, "नांदेडच्या सिडको भागातील शामराव कदम होमिओपॅथिक कॉलेजमध्ये दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या वाझेगाव येथील आकांक्षा गायकवाड या मुलीने वसतिगृहामध्ये गळफास घेऊन आत्महत्या करणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. बबनराव यादव (लोणीकर), वि.स.स. यांनी, "केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूर्य घर योजनेंतर्गत "हर घर सोलार" ही महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत घरांच्या छतांवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी असलेली ५ ते १० वर्षांची थकबाकी भरण्यासंदर्भातील अट शिथिल करण्यात यावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. यांनी, "मुंबई येथील मुंबई विद्यापीठामध्ये पीएच.डी संशोधक विद्यार्थी मेहता विमांसा यांचा सूडबुद्धीने छळ करून त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न विद्यापीठ परिसरात घडला असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. श्याम खोडे, वि.स.स. यांनी, "वाशीम जिल्ह्यात शेतामधून महावितरणची ११ kv ची मुख्य लाइनमधील तारांमध्ये घर्षण होऊन निर्माण झालेल्या आगीमुळे सावरगाव जिरे ता. वाशिम येथे श्री. दत्ता सोपान वानखेडे या शेतकऱ्याचा चार एकर गहू, केकतुमरा ता. वाशिम येथील पांडुरंग ढोरे या शेतकऱ्याचा दोन एकर गहू आणि खरोळा वाशिम येथील शुभम नंदू ठाकरे यांच्या शेतातील दोन एकर गहू अक्षरक्षः जळून खाक होणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. राजन नाईक, वि.स.स. यांनी, "पालघर जिल्ह्यातील वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पूर्वेकडील भागातील एक प्रचंड मोठे क्षेत्र हे मूलभूत सोयी-सुविधांच्या अभावामुळे अत्यंत गलिच्छ, दाटीवाटीचे आणि अनारोग्यकारक बनलेले असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी, "पश्चिम नागपूरमधील मानकापूर परिसरातील संत ज्ञानेश्वर नगर झोपडपट्टी व राजनगर झोपडपट्टी येथील सर्व विस्थापित कुटुंबांचे तात्काळ सर्वेक्षण करून कायमस्वरूपी पुनर्वसन करणे किंवा त्यांना पर्यायी निवासस्थान देण्यात यावे तसेच पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या जागेवर काचिपुरा रामदास येथे मागील ५० वर्षापासून राहत असलेल्या झोपडपट्टीवासीयांनासुद्धा मालकी हक्काचे पट्टे देण्यात यावेत." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्रीमती. श्वेता महाले, वि.स.स. यांनी, "मौजे एकलारा, ता. चिखली येथे बायर क्रॉप सायन्स लिमिटेड कंपनीने तसेच मौजे धाड तालुका जिल्हा बुलढाणा येथे सिंजेटा कंपनीने शेतकऱ्यांना बोगस मका बियाणे देऊन केलेली फसवणूक तसेच चिखली मतदारसंघातील बॉम्बे मार्केटमध्ये मोठी आग लागून सहा ते सात दुकानांचे झालेले प्रचंड नुकसान." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांनी, "पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना नदीलगतच्या रहिवाशांना पूरसदृश परिस्थितीमुळे तात्पुरते स्थलांतरित करण्यापासून रोखण्याकरिता पवना नदी सुधार प्रकल्पास तातडीने गती देण्याची आवश्यकता." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी, "या रब्बी हंगामासाठी अकोला जिल्ह्याची १५.१६ प्रतिहेक्टर हरभरा उत्पादन मर्यादा वाढवून ती प्रतिहेक्टर २५ क्विंटल करण्यात यावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. यांनी, "विदर्भातील अमरावती, यवतमाळ, अकोला, वर्धा, बुलढाणा या ठिकाणी कापूस खरेदीसाठी आवश्यक केंद्रे व इतर पायाभूत व्यवस्था तातडीने निर्माण करण्यात यावी तसेच दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजीपर्यंत कापूस खरेदीला मुदतवाढ देण्यात यावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री.नारायण कुचे, वि.स.स. यांनी, "जालना जिल्ह्यातील बदनापूर, अंबड व भोकरदन तालुक्यांमध्ये कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शेती अवजारे अनुदान व बी-बियाणे योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली असणे तसेच जालना जिल्ह्यातील बदनापूर व अंबड तालुक्यांतील हजारो शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० साठी पैसे भरलेले असताना अद्यापपर्यंत संबंधित ठेकेदाराने त्या शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये सौर पंप बसविलेले नसणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री.संजय गायकवाड, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्राच्या आरोग्य विभागात सीटी स्कॅन, एमआरआय, डायलिसीस ऑपरेटर, डॉक्टर, नर्स, तंत्रज्ञ, डेटा एन्ट्री ऑपरेटर, स्वच्छता कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी, डायलिसीस अशा सर्व सेवा पुरवठ्याची व्यवस्था बिव्हीजी कंपनी, स्मार्ट कंपनी व प्लेसहोल्ड कंपनीद्वारे राज्यपातळीवर कंत्राट न देता सदर सेवा पुरविण्यासाठी जिल्हापातळीवर निविदा प्रक्रिया राबवून जिल्हास्तरावरील संस्थांना कंत्राट देण्यात यावे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांनी, "कोराडी थर्मल पॉवर प्रकल्पात फ्ल्यू गॅस डिसल्फरायझेशन प्रणाली बसविण्यात आली नसल्यामुळे सदर परिसरातील पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या कलम १२ (१) (क) प्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णयानुसार २५ टक्के आरक्षित विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके,

गणवेश व शिक्षण सामग्री देण्यास सांगितले असताना कांदिवली व बोरीवलीतील नामांकित व प्रतिष्ठित पवार पब्लिक शाळा प्रशासन २५ टक्के आरक्षित प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांकडून वह्या, पुस्तके, गणवेश व लेखन सामग्रीसाठी शुल्क मागणी करीत असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री. दिलीप सोपल, वि.स.स. यांनी, "सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पाटबंधारे खात्याचे मायनर व मध्यम सिंचनाचे तलावांची पाणीपट्टी थकबाकी वसूली अन्यायकारक पद्धतीने करण्यात येत असणे तसेच पाणीपट्टी रकमेत केलेली १० पट वाढ कमी करण्यात यावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२३) प्रा. देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी, "नाशिक जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, फसवणूक व महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत चिंताजनक घटना घडत असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

औचित्याचे मुद्दे संपल्यानंतर अल्पकालीन चर्चा घेण्यात येतील आणि त्यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२४) श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, "मुंबईतील नागरी निवारा, मालाड पूर्व येथील नगर भूमापन क्रमांक ८२७४/४ यावर प्रसुतीगृह, लहान मुलांचे रुग्णालय, एनआयसीयु व सह प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे देण्यात आला असून या प्रस्तावावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे" इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, "सन १९९३ मध्ये झालेल्या प्रलयकारी भुकंपामध्ये औसा व निलंगा तालुक्यातील भुकंपग्रस्त अ, ब व क वर्गवारीच्या गावातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आराखडा फेब्रुवारी, २०२५ मध्ये सादर केला असून तो आराखडा मंजूर करण्यात यावा." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२६) श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी, "वर्सोवा-भाईंदर हा जोड रस्त्याच्या कामासाठी कापण्यात येणाऱ्या ४५ हजार मँग्रोजचे काम थांबवण्यात यावे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२७) श्री. अमोल खताळ, वि.स.स. यांनी, "राज्यातील जिल्हा अहिल्यानगर येथील संगमनेर तालुक्यातील अनेक गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनी सन २०२१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'तीन-ए' अधिसूचनेअंतर्गत सुरत–चेन्नई राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पासाठी अधिसूचित करण्यात आल्या असून आजतागायत या प्रकल्पास केंद्रीय मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरी मिळालेली नसणे तसेच भूसंपादनाचा

मोबदला देखील संबंधित शेतकऱ्यांना मिळालेला नसणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री. प्रविण तायडे, वि.स.स. यांनी, "राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (RBSK) या योजनेंतर्गत (cochlear implant) कॉक्लियर इम्प्लांट या शस्त्रक्रियेसाठी लागणारी वयोमर्यादा ० ते २ वर्षे असून ती ६ ते ७ वर्षे करण्यात यावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) श्री. सिद्धार्थ खरात, वि.स.स. यांनी, "राज्यात नाभिक समाजाला हजाम किंवा वारिक असे न संबोधता नाभिक असेच संबोधण्यात यावे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३०) श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांनी, "हडपसर येथे जलसंपदा विभागाने कॅनॉलमध्ये सोडलेले पाणी मांजरी, गोपाळपट्टी, घुलेवस्ती या भागातील झोपडपट्टीत आणि बैठ्या घरांमध्ये राहणाऱ्या अनेक गोरगरीब लोकांच्या घरात शिरुन मोठे नुकसान होणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३१) श्रीमती सुलभा गायकवाड, वि.स.स. यांनी, "कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पूर्व उल्हासनगर मधील अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागात अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३२) श्रीमती रंजनाताई जाधव, वि.स.स. यांनी, "छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श नागरीक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक मंडळाने दि.११/०७/२०२३ रोजी संगनमताने सुमारे २०२ कोटी रुपयांचा घोटाळा करणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३३) श्री.प्रविण दटके, वि.स.स. यांनी, "राज्यात आर्थिक फसवणूकीच्या सायबर गुन्ह्यांच्या प्रतिबंधासाठी धोरण तयार करण्यात यावे आणि सायबर गुन्हे करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३४) डॉ.बाबासाहेब देशमुख, वि.स.स. यांनी, "सांगोला तालुक्यातील अनेक शेतकरी टेंभू-म्हैसाळ योजना आणि नीरा उजवा कालवा या प्रकल्पावर अवलंबून असल्यामुळे सदर प्रकल्पांतर्गत उन्हाळी आवर्तन सुरु करण्यात यावे व सर्व नद्यांवरील तलाव, बंधारे संपूर्ण क्षमतेने भरण्याच्या नियोजनाची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३५) श्री.विठ्ठल लंघे, वि.स.स. यांनी, "राज्य सरकारने शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप योजना देत असताना शेतीसाठी नवीन वीज कनेक्शन देणे बंद केले असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३६) दलितमित्र डॉ. अशोकराव माने, वि.स.स. यांनी, "राज्यातील चांदी व्यवसायासाठी जगप्रसिद्ध असलेले कुपरी गाव व परिसरातील चांदी उद्योगाला ऊर्जितावस्था देण्यासाठी विशेष पॅकेज जाहीर करण्यात यावे तसेच कच्चा मालाच्या पुरवठ्यासाठी सुलभ यंत्रणा कार्यान्वीत करण्यात यावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३७) श्रीमती सना मलिक, वि.स.स. यांनी, "मुंबईतील ट्रॉम्बे, गोवंडी, मानखुर्द व चिता कॅम्प परिसरात "ड्रीम सनशाईन डिजिटल प्रा. लि." या कंपनीमार्फत सुमारे १२५ गुंतवणूकदारांची अंदाजे ५.१३ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक झाली असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३८) श्री.काशिनाथ दाते, वि.स.स. यांनी, "ढवळपुरी (ता.पारनेर जि.अहिल्यानगर) येथील श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ याने एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना दिनांक १० मार्च २०२६ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३९) डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स. यांनी, "मुंबई विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या इमारत निर्मितीसाठी व सुविधांसाठी अद्यापपर्यंत पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात आला नसणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४०) श्री.अर्जुन खोतकर, वि.स.स. यांनी, "जालना जिल्ह्यातील कामगारांच्या बाबतीत झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून दोषींविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४१) श्री.रईस शेख, वि.स.स. यांचा औचित्याचा मुद्दा.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने
हिंदी प्रतिवेदन प्रलंबित आहे.)

(४२) श्री.अमिन पटेल, वि.स.स. यांचा औचित्याचा मुद्दा.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने
हिंदी प्रतिवेदन प्रलंबित आहे.)

(४३) श्री.विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी, "शेतकऱ्यांनी CMEGP योजनेअंतर्गत कृषी फवारणीसाठी खरेदी केलेल्या ड्रोनचे नुकसान झाल्यानंतर त्यासाठी केलेला क्लेम विमा कंपन्यांनी सर्रासपणे धुडकावणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४४) श्री.शेखर निकम, वि.स.स. यांनी, "'सारथी' (छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था) मार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता परदेशी शिक्षण शिष्यवृत्तीसाठी १५ मे २०२५ रोजीच्या जाहिरातीमधील एकूण ७५ जागांपैकी पहिल्या निवड समितीच्या बैठकीत केवळ ४४ जागा भरून उर्वरित जागा अद्यापही रिक्त ठेवण्यात येणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४५) श्री.कैलास घाडगे-पाटील, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या परीक्षा व पिकांसाठी उन्हाचा तडाका वाढल्यामुळे ग्रामीण भागातील वाड्या वस्त्यावरील लोडशेडींग बंद करावी आणि शेती पंपाला दररोज किमान ८ तास सुरळीतपणे पुरेशा दाबाने वीज पुरवठा करण्यात यावा." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४६) श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, "मुंब्रा-कळवा येथे दाभोळकर नावाचा एक रोड असून त्याच्या बाजूला १०० वर्षे जूना पूल आहे सदर पुलाचे शासनाने तातडीने महापालिकेला निधी देऊन किंवा महापालिकेने स्वतःच्या निधीमधून रुंदीकरण करावे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४७) श्री.राजेश वानखडे, वि.स.स. यांनी, "संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नव्याने निर्माण झालेल्या व ग्रामीण चेहरा असलेल्या नगरपंचायतींच्या कार्यकक्षेत रोजगार हमी व कृषी विभागाच्या योजना कार्यान्वित करण्याकरिता व हक्काच्या रोजगार निर्मिती करिता धोरणात्मक निर्णय घेऊन तेथे जॉब कार्ड उपलब्ध करून देण्यात यावे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४८) श्री.हेमंत ओगले, वि.स.स. यांनी, "अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर व कमालपूर येथे अनुक्रमे सन १९७२ व सन १९७६ मध्ये गोदावरी नदीवर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यांची अवस्था चांगली नसणे तसेच शनिदेवगाव उच्च पातळी बंधारा प्रकल्प सध्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्याकडे मंजुरीसाठी प्रलंबित असून तो त्वरित मंजूर करण्यात यावा." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४९) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, "भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण मार्फत वाढवण बंदर प्रकल्पासाठी सुमारे ३२ कि.मी. नवीन (हरित क्षेत्रातील) महामार्ग व १० कि.मी. रेल्वेमार्ग उभारण्याचे नियोजन असून त्यासाठी पालघर जिल्ह्यातील जमीन संपादित केली जात असून देण्यात येणारा भरपाई दर हा स्थानिक बाजारभाव, उत्पादनक्षमता व शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन उपजीविकेच्या दृष्टीने अत्यल्प व अन्यायकारक असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५०) श्री.अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी, "मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील के-पूर्व विभागाचे विभाजन करून नव्याने करण्यात आलेल्या के-उत्तर आणि के-दक्षिण अशा दोन विभागामध्ये वॉर्ड ऑफिसरची नियुक्ती करण्यात आली असून इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अभाव असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५१) श्री.सुमित वानखेडे, वि.स.स. यांनी, "प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत वर्धा जिल्ह्यात २० हजार ९७३ घरकुले मंजूर असून त्यापैकी ९ हजार ६५ घरकुलांची कामे सुरु झालेली आहेत परंतु त्यापैकी ५८४ घरकुलांचे वर्ककोड अद्यापी नरेगा साईटवर जनरेट झालेले नसणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५२) श्री.हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी, "त्र्यंबकेश्वर- नाशिक हा सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएमआरडीए यांनी मंजूर केलेला रस्ता आश्वासन दिल्याप्रमाणे ४५ मीटरने कमी करण्यात आला नसणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५३) श्री.मनोज जामसुतकर, वि.स.स. यांनी, "मुंबईतील भायखळा येथील माझगांव-ताडवाडी येथील बीआयटी चाळ, आगरीपाडा बीआयटी चाळ, लवलेन आणि मुंबई सेंट्रल या बीआयटी चाळींचा पुनर्विकास गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५४) श्री.संजय देरकर, वि.स.स. यांनी, "वणी येथील आदिवासी विकास विभागाच्या अनेक आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या जेवणाच्या गुणवत्तेत मोठ्या प्रमाणात घसरण होत असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५५) श्री.गजानन लवटे, वि.स.स. यांनी, "राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०१९ ते २०२६ या सात वर्षाच्या कालावधीत महाविद्यालय स्तरावर सुमारे ४ हजार १४ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांच्या दिरंगाईमुळे प्रलंबित असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५६) श्री.प्रविण स्वामी, वि.स.स. यांनी, "उमरगा-लोहारा तालुक्यांमध्ये प्रचंड गारपीट होऊन ५०० ते १००० हेक्टरवरील केळी, द्राक्ष, कांदे, ज्वारी, गहू, करडीसह इतर अनेक पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असणे." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५७) श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स. यांनी, "सभागृहामध्ये उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यांवर १५ दिवसांच्या आत कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देण्यात यावेत." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने विभागवार ३० दिवसांत निर्देश द्यावेत असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(५८) श्री.सुरेश भोळे, वि.स.स. यांनी, "राज्यातील ओबीसी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी व शिष्यवृत्तीसाठी जात प्रमाणपत्र मिळत नसणे" इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५९) श्री.संजय केळकर, वि.स.स. यांनी, "मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आदर्श बीएमसी स्टॉल लायसन्स होल्डर युनियनमधील ४ हजार स्टॉलधारकांना ब्रिटिश काळामध्ये स्टॉल देण्यात आले असून त्यांच्याकडून शुल्क घेऊन आणि त्यांना त्यांच्या सर्व योजनांचा लाभ देण्यात यावा." इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

५. सदर अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नसून सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"राज्यात कोकण विभागाला (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) लाभलेले नैसर्गिक सौंदर्य, समुद्रकिनारे, डोंगररांगा आणि सांस्कृतिक वैशिष्टयांमुळे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र ठरले असणे, कोकणात विशेषतः मुख्यमंत्री कृषी आणि अन्न प्रक्रिया योजना, फळ प्रक्रिया योजना, अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादींना कृत्रिम बुध्दिमतेची सांगड घालून काजू बोंडापासून अल्कोहोल निर्मिती, आंब्यासारखे नगदी व निर्यातक्षम उत्पन्न व मच्छिमारी इत्यादींमुळे रोजगार निर्मिती झाली असणे, अपूर्ण पायाभुत सुविधा, वारंवार होणारी पूरस्थिती, औद्योगिक गुंतवणूकीचा अभाव व युवकांचे स्थलांतर या प्रमुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कोकण विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता, देशी गोवंश संवर्धन, 'कोकण कपिला' प्रसार व ब्रिडींग सेंटरसाठी विशेष अनुदान देण्याची आवश्यकता, कोकण कृषी विद्यापीठांतील रिक्त पदे भरण्याची आवश्यकता, या विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर कृषी शिक्षण संस्था स्थापन करण्याची आवश्यकता, आसाम राज्याच्या धर्तीवर सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये किमान १० टक्के बांबू उत्पादन आरक्षित करण्याचे धोरण राबविण्याची आवश्यकता, मुंबई-गोवा महामार्गाचे उर्वरित काम पुढील १ वर्षांत पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कालबध्द कार्यक्रम जाहिर करण्याची आवश्यकता, या महामार्गावर प्रत्येक २५ कि.मी. अंतरावर ट्रॉमा केअर सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, नर्सिंग कॉलेज आणि मरिन टॅक्नोलॉजी कॉलेज सुरु करण्याची आवश्यकता, कोकणातील धार्मिक स्थळांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, वन्यजीव

प्राण्यांपासून शेतीचे नुकसान टाळण्यासाठी सह्याद्री संवर्धन प्रकल्प पूर्ण क्षमतेने राबविण्याची आवश्यकता, डोंगराळ भागातील पाण्याचे व्यवस्थापन करण्याची आवश्यकता, सौरऊर्जेचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकालात काढण्याची आवश्यकता, आयटी पार्क उभारुन युवकांसाठी स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता, अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालय शासन स्तरावर उभारण्याची आवश्यकता, आपत्कालीन परिस्थितीसाठी एअर ॲम्बुलन्स सेवा सुरु करण्याची आवश्यकता, कोकणचा कॅलिफोर्निया करण्याकरिता कोकण विकास प्रकल्पाचे मार्गदर्शन व उचित कार्यवाहीसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची आवश्यकता, सर्वसामान्य नागरिकांना उचित माहिती मिळावी यासाठी सार्वजनिक ऑनलाईन डॅशबोर्ड उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(चर्चा अपूर्ण)

(२) श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"कोकणात पर्यटन व मत्स्य व्यवसाय विकास प्रकल्पांची घोषणा होऊनही न झालेली पूर्तता, गेल्या ८ ते १० वर्षापासून कोकणात सततची वादळे, चक्रीवादळे, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस इत्यादिमुळे आंबा, काजू इत्यादी फळबागायतदारांचे तसेच मच्छीमार व पर्यटन व्यवसायाचे झालेले नुकसान, शासनाकडून देण्यात येणारी तुटपुंजी मदत, गेल्या १८ वर्षापासून प्रलंबित असलेला मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, ग्रीन फिल्ड महामार्गाची केवळ घोषणा, चिपळूण-कराड रखडलेला रेल्वे प्रकल्प, रासायनिक कारखान्यांमुळे नद्या, समुद्र व जमीनी प्रदुषित होणे, रोजगार नसल्यामुळे कोकणातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त घरे बंद असणे, मत्स्य दुष्काळ व मच्छीमारांच्या कर्ज माफीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, कोकणातील संपूर्ण किनारपट्टी सिडकोला देण्याचा घातलेला घाट, मुद्दाम वणवे लावून नष्ट होत असलेली वनसंपदा, माकडे व अन्य प्राण्यांपासून शेती व बागायतदारांचे होत असलेले नुकसान, जलजीवन मिशन योजनेचा कोकणात उडालेला बोजवारा, कोकणातील गेल्या २५ वर्षापासून प्रलंबित असलेले सिंचन प्रकल्प, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ नसणे, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, कोकणच्या विकासासाठी अनेक समित्या नियुक्त होणे, सदर समित्यांच्या अहवालातील शिफारशीवर कोणतीही कार्यवाही न होणे, कोकणातील मूलभूत प्रश्नांविषयी शासनाने करावयाच्या उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

उपरोक्त अल्पकालीन चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.दीपक केसरकर
(२) श्री.भास्कर जाधव
(३) श्री.शेखर निकम
(४) श्रीमती मनिषा चौधरी
(५) श्री.हारून खान
(६) श्री.राजन नाईक
(७) श्री.सिद्धार्थ खरात
(८) श्रीमती सुलभा गायकवाड
(९) श्री.अशोक पाटील
(१०) श्री.अनंत (बाळा) नर

(चर्चा अपूर्ण)

आता अल्पकालीन चर्चेचे कामकाज संपल्याचे जाहीर करतो यानंतर अशासकीय विधेयकाचे कामकाज घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

६. श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र भविष्य कल्याण विधेयक, २०२६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावर उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिले व सदर विधेयक मागे घेण्यात यावे अशी विनंती केली.

सदर विधेयकासंदर्भात श्री.आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

श्री.अमित साटम, वि.स.स. यांनी सदर विधेयक मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागितली.

सभागृहाच्या अनुमतीने सदर विधेयक मागे घेण्यात आले.

७. (क) वने मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, सन्माननीय सदस्या डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ. नितीन राऊत यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल तद्नंतर माननीय मंत्री यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.आदित्य ठाकरे (२) श्री.सुनील प्रभू

विधेयकावरील चर्चेस वने मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

महसूल मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६ मांडले व सदर विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तत झाला.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.योगेश सागर (२) श्री.सुनील प्रभू

विधेयकावरील चर्चेस महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

आता उर्वरित लक्षवेधी सूचनांवरील कामकाज घेण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

८. (१) श्री. अशोक पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"गेटवे ऑफ इंडिया येथील जेटी क्रमांक ५ असुरक्षित घोषित करून प्रवासी वाहतूक बंद करण्यात आली असताना, मुंबई पोर्ट प्राधिकरणने रॉयल बॉम्बे यॉट क्लबला फ्लोटिंग पॉन्टून उभारण्यास परवानगी दिल्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असणे, स्वतंत्र संरचनात्मक लेखापरीक्षण झाले का, त्याचा अहवाल सार्वजनिक केला जाणार का, तसेच निविदा प्रक्रिया, करार अटी व महसूल वाटपाची माहिती सभागृहास देण्यात येण्याची आवश्यकता, महसुलातील मोठा हिस्सा खासगी संस्थेकडे जात असल्याने ही व्यवस्था पुनरावलोकनास पात्र असणे, पर्यायी जेटीचा विचार न करता घेतलेल्या निर्णयांमुळे स्थानिक नौकाधारकांचे आर्थिक नुकसान झाले असून त्यांच्या संरक्षणासाठी उपाय करणे अपेक्षित असणे, यॉट क्लबच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकांच्या जागेवरील कथित अतिक्रमणावर कारवाई होणार का असा प्रश्न निर्माण होणे, या निर्णय प्रक्रियेत सहभागी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून हितसंबंध संघर्ष व संभाव्य आर्थिक अनियमिततेची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्रीमती मंजुळा गावित, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"पिंपळनेर (ता.साक्री, जि.धुळे) येथे १३२/३३ के. व्ही. क्षमतेचे उपकेंद्र व्हावे म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांचेकडून होत असलेली मागणी, मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन उर्जामंत्री यांनी दिनांक २३ जून, २०२१ रोजी १३२/३३ के. व्ही. क्षमतेचे विज उपकेंद्र पिंपळनेर येथे उभारणेसाठी मान्यता देणे, उपकेंद्रासाठी सुकापूर, ता.साक्री येथील सरकारी जमीन गट क्र. १३७ क्षेत्र २ हे.२५ आर उपलब्ध करून देणे, सदर प्रकल्पासाठी वारंवार निविदा काढण्यात येऊनही कुठलाच स्थानिक ठेकेदार प्रकल्पाचे काम करण्यास समोर येत नसणे, दिनांक १४ ऑगस्ट,२०२५ रोजी मध्य प्रदेश मधील भोपाळ येथील टेस्ला या कंपनीस कार्यारंभ आदेश देणे, आदेश देऊन ६ महिन्यांचा कालावधी उलटला असतांना संबंधित कंपनीने आतापर्यंत केवळ साईटवर पाण्याच्या उपलब्धतेसाठी बोअरवेल मारणे, या व्यतिरिक्त तार कंपाऊंड करणे, गोडाऊन बांधणे इत्यादी किरकोळ कामांसह आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामुग्रीबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही न करणे, तसेच वीज

उपकेंद्राचे टॉवर उभे करणे, लाईन ओढणे व त्यानुषंगाने आवश्यक असलेली कामे करण्याचा कार्यारंभ आदेश शर्वरी इलेक्ट्रिकल्स छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या कंपनीस माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात येणे, सदर कंपनीने देखील आजतगायत कुठल्याच प्रकारचे काम न करणे, परिणामी पिंपळनेर, ता.साक्री येथील मंजूर असलेल्या १३२/३३ के.व्ही. उपकेंद्राचे काम अद्यापही सुरू न होणे, शासनाने सदर प्रकरणी तातडीने चौकशी करून पिंपळनेर येथील मंजूर उपकेंद्राचे काम वेळेत पूर्ण होण्यासाठी केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी (श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. अनुपभैय्या अग्रवाल, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"धुळे शहर हे सर विश्वेश्वरैया यांच्या रचनेतून वसलेले असणे, तसेच धुळे शहरातील सर्वे क्रमांक ११३ मध्ये असलेल्या नैसर्गिक नाल्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचा प्रकार निदर्शनास येणे, अतिक्रमणामुळे नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहात बदल होणे, त्यामुळे भविष्यात जीवितहानी तसेच वित्तहानी होण्याची दाट शक्यता असणे, त्यामुळे सदर अतिक्रमण काढण्याबाबत वेळोवेळी शासनाकडे स्थानिक नागरिक व लोकप्रतीनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येणे, सदर अतिक्रमण काढण्यासंदर्भात एक वर्षाच्या आत कार्यवाही करण्याबाबत शासनाकडून आश्वासित करण्यात येणे, जिल्हा प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्यास दिरंगाई होणे, सदर अतिक्रमणामुळे नाल्याची रुंदी २०० फुटावरुन १०० फुटापर्यंत होणे, जिल्हा प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्याबाबत हायकोर्टात बाजू खंबीरपणे मांडण्यात न येणे, शहरातील अनेक रस्ते, ओपन स्पेस, सरकारी जागा अतिक्रमणाच्या विळख्यात असणे, पावसाळा जवळ असल्यामुळे अतिक्रमण काढणे अत्यंत गरजेचे असणे, आर्थिक व जीवितहानी होण्याची शक्यता असणे, अतिक्रमणाबाबत प्रशासनाकडून अद्याप काहीही कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण होणे, सदर अतिक्रमण तातडीने काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

नियम २९३ अन्वये प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू

श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा, "राज्यात सार्वजनिक आरोग्याचा उडालेला बोजवारा व राज्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था." इ.बाबत उपस्थित केलेल्या नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चा – चर्चा पुढे सुरू

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) डॉ.बाबासाहेब देशमुख (२) श्री.अभिजीत पाटील

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक सायंकाळी ०७ वाजून ०१ मिनिटांनी सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६

विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या वेळी घडलेल्या घटनेबाबत-

श्री. अर्जुन खोतकर वि.स.स. यांनी सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष पदाच्या निवडणुकीच्या वेळी पर्यटन मंत्री यांना झालेल्या धक्काबुक्कीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला.

पर्यटन मंत्र्यांनी घडलेल्या घटनेच्या संदर्भात सभागृहास माहिती दिली.

उप मुख्यमंत्री यांनी यासंदर्भातील वस्तुस्थिती सभागृहास सांगितली.

सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जी वस्तुस्थिती सांगितलेली आहे, त्या वस्तुस्थितीच्या आधारावर या संपूर्ण प्रकरणाची योग्य ती चौकशी केली जाईल आणि चौकशीमध्ये जे निष्पन्न होईल, त्यानुसार संबंधितांवर कार्यवाही केली जाईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

१. (१) सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बारा प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

"सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, आज आपल्या सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी गोवा विधानसभेचे माननीय अध्यक्ष डॉ.गणेश गावकर विशेष अभ्यागत कक्षात उपस्थित आहेत. आपण सर्वांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करावे," अशी माननीय अध्यक्षांनी घोषणा केली.

२. सचिव – १ यांनी, सभागृहाच्या अनुमतीने शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

३. (१) ऊर्जा राज्यमंत्री यांनी, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) नगरविकास राज्यमंत्री यांनी, मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री यांनी, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी, अहवाल विधानसभेच्या पटलावर विलंबाने ठेवण्यात येत असणे, इ. बाबत मुद्दा मांडला.

(४) सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी, "हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाडयाचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे.'' या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवला.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकासआराखड्यासंदर्भातील प्रगती अहवालाबाब-

श्री. सुधीर मुनगंटीवार वि.स.स. यांनी, महाराष्ट्र नव्हे तर देशाचे हुतात्मा राजगुरुंचे स्मारक ३० वर्षांपासून रखडलेले असणे, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

(५) कृषी मंत्री यांनी पुढील माहिती सभागृहासमोर ठेवली,—

(क)"खरीप हंगाम २०२१ व खरीप हंगाम २०२२ च्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हक्काचा पिक विमा मिळवून देण्याबाबत" या विषयावरील श्री.कैलास घाडगे पाटील, वि.स.स. यांच्या दिनांक २७ जुलै, २०२३ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार लक्षवेधी सूचनेची अधिक माहिती व

(ख) "सन २०२४ च्या तृतीय (पावसाळी) अधिवेशनात दिनांक ४ जुलै, २०२४ रोजी श्री.विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांच्या म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार "वेळोवेळी पेरणी, मध्य हंगामी प्रतिकुल परिस्थिती, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात नुकसान, पीक कापणी प्रयोगांती झालेले नुकसान यासंदर्भात पीक विमा कंपन्यांकडून जास्तीत जास्त भरपाई शेतकऱ्यांना केल्याबाबत" यासंदर्भातील अधिकची माहिती तसेच,

(ग) कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल व(ख)नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांनी, आनंद विवाह अधिनियम, १९०९ (१९०९ चा ७) याच्या कलम ६ (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार "महाराष्ट्र आनंद विवाह नोंदणी नियम" प्रसिध्द करण्याची अधिसूचना क्रमांक विनोंको- २०१२/ प्र.क्र.३८७/ कुटुंब कल्याण, दिनांक २३ एप्रिल, २०२० सभागृहासमोर ठेवली.

३. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. विजय वडेट्टीवार वि.स.स. यांनी, "स्वतःला ज्योतिषी व देवाचा अवतार समजणाऱ्या अशोक खरातचे शंभरपेक्षा अधिक कृत्यांचे व्हिडिओ क्लिप्स पुढे आलेल्या असून देव–धर्माच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या अशा भोंदू बाबामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलिन होत असणे, त्यामुळे या प्रकरणी राजकीय क्षेत्रातील लोक, आयएएस अधिकारी, आयपीएस अधिकारी आणि महसूल विभागातील अधिकारी या सर्वांच्या मोबाईलचे सीडीआर तपासले जावेत," अशी मागणी केली.

श्री. नाना पटोले व श्री. भास्कर जाधव वि.स.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

मुख्यमंत्री यांनी यासंदर्भात खुलासा केला.

४. (ब) पुरःस्थापनार्थ –

महसूल मंत्री यांनी, सन २०२६ चे वि.स.वि. क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

५. (१) श्री. महेश सावंत, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"महावितरणमधील उपकेंद्रांच्या देखभाल व दुरुस्तीच्या आणि MSKVY २.० Scheme कामांमध्ये बारामती, पुणे, नाशिक व कोल्हापूर परिमंडळामध्ये मे. ःR.N. Electricals (Vendor Code - ०१०००१९४३५) या कंत्राटदारामार्फत सन २०१९ ते २०२६ मध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा आर्थिक अपहार करणे, बनावट बिलिंग, कामातील अनियमितता व तांत्रिक निष्काळजीपणामुळे नागरिक व जनावरांची जीवितहानी झाल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, इलेक्ट्रिकल इंजिनियर्स अँड कॉन्ट्रॅक्टर असो. यांनी दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी महावितरणचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य अभियंता (वितरण) यांचेकडे लेखी तक्रार सादर करणे, संबंधित कंत्राटदारामार्फत प्रत्यक्ष काम न करता खोट्या GRN (माल प्राप्ती नोंदी) व बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांचे बोगस बिलिंग करून शासन निधीचा अपहार करणे, तसेच उपकेंद्रातील स्विचगिअरची देखभाल व दुरुस्ती निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे अपघाताच्या वेळी Fault Trip System कार्यरत न राहता विद्युत अपघात होऊन परिमंडळातील नागरिक, जनावरांचे मृत्यू घडणे, शासनामार्फत कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी निश्चित करून कलम ३०४, ४२०, ४०९, ४६८, ४७१ व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून फौजदारी कारवाईची

मागणी होणे, सन २०१९ ते २०२६ या कालावधीत संबंधित कंत्राटदाराने केलेल्या सर्व कामांचे लेखापरीक्षण व स्वतंत्र तांत्रिक चौकशी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB), विशेष तपास पथक (SIT) मार्फत उच्चस्तरीय गुन्हेगारी तपास करून कंत्राटदारास तात्काळ काळ्या यादीत समाविष्ट करण्याची आणि दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

ऊर्जा राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

महसूल मंत्री यांनी, मुंबई शहर जिल्ह्यामधील मिळकतीच्या फेरफेरासंबंधी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करणे, इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

शासकीय विधेयके – (पुढे सुरू..)

(अ) कामगार मंत्र्यांचा प्रस्ताव-

कामगार मंत्र्यांनी, सन २०२५ चे वि.स.वि. क्रमांक ८९ – महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५ मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागीतली.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभागृहाच्या अनुमीने विधेयक मागे घेण्यात आले.

(३) सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. महेश बालदी वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"रायगड जिल्ह्यातील ता.उरण, मौजे चाणजे येथील गट क्र. २३ व २४ या जमिनीच्या अधिकार अभिलेखातील "वने" नोंद कमी करण्याबाबत श्री.परसिव्हल जोसेफ परेरा यांनी दाखल केलेल्या याचिका क्र.४६२८/१९८८ मधील मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २२/०९/१९८९ च्या आदेशाची अंमलबजावणी फेरफार क्र. ४८०१ (०९/०७/१९९१) द्वारे यापूर्वीच करण्यात आलेली असणे, त्यानंतर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या दिनांक १३/०७/२००० रोजीच्या परिपत्रकानुसार वनसंरक्षक यांच्या दिनांक १७/०४/२००१ रोजीच्या आदेशानुसार व तहसीलदार उरण यांच्या दिनांक १९/०३/२००१ च्या निर्णयानुसार या जमिनीवर

"महाराष्ट्र शासन वने" अशी नोंद करण्यात आलेली असणे, याचिका क्र. ९४३६/२०१० मधील दिनांक ०६/०५/२०१५ च्या आदेशात फक्त पूर्वीच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत खुलासा मागविण्यात आला असणे, तसेच दिनांक २७/०७/२०२५ च्या आदेशात "वने" नोंद कमी करण्याबाबत कोणताही स्पष्ट निर्देश नसणे, दरम्यान, महाराष्ट्र खाजगी वन (अधिग्रहण) अधिनियम १९७५ च्या कलम २२(अ) अंतर्गत दाखल केलेले अपील उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडे प्रलंबित असणे, अशा स्थितीत महसूल प्रशासनाकडून दिनांक १२/०९/२०२४ चे पत्र निर्गमित करून "वने" नोंद कमी करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याने प्रशासकीय अधिकाराचा अतिक्रमण झाल्याची गंभीर शंका निर्माण झाली असणे, शासनाने या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दिनांक १२/०९/२०२४ चे पत्र रद्द तसेच सदर जमिनीवरील "वने" नोंद कमी करण्यासंबंधी किंवा प्रस्तावित कार्यवाहीस स्थगिती देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वने मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील पिळंझे खुर्द येथील जेएमडी एंटरप्रायजेस या कंपनीने हजारो ब्रास खनिजांचे खाणीतून उत्खनन करुन, तस्करी व विक्री केल्याप्रकरणी सदरहू कंपनीला १० कोटी रुपयांची रॉयल्टी व दंड वसूलीचा आदेश पारित केल्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे, अशा प्रकारे याच तालुक्यातील डभाड-करमाळे, पिळंझे खुर्द, साखरोली, दुगडफाटा, भरे, वशेरे आदी गावातील खाणीतील खनिजाची बेकायदा उत्खनन व विक्री प्रकरणाची चौकशी केल्यास मोठया प्रमाणात महसूलाचे अर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येणार असणे, ठाणे, रायगड, पालघर या तीन जिल्ह्यात अनुक्रमे ३००, २००, ४०० मिळून ७०० दगडखाणी व स्टोन क्रशर प्रकल्प शासनाची परवानगी न घेता बेकायदेशीररित्या सुरु असणे, या खाणींमधील हजारो ब्रास खनिजाचे उत्खनन करून महसूल, खाण, प्रदुषण नियंत्रण मंडळ, पोलीस व वाहतूक विभागाच्या सबंधित अधिकाऱ्यांबरोबर अर्थिक संगनमत करून व खनिजाची बेकायदेशीररित्या विक्री करून शासनाच्या कोटयवधी रुपयांचे अर्थिक महसूलाचे नुकसान करण्यात येणे, सदरहू खाण व स्टोन क्रशर मालकांनी उत्खनन भाडेपट्टा, (पर्यावरण परवाना) ई-ट्रान्झिट पास, जमीन मालकी हक्काचे पुरावे व भूमालकाची लेखी संमती तसेच उत्खननाचे मंजूर प्रमाण व कालावधी याबाबतची शासनाची कोणतीही परवानगी न घेता,

स्फोटके वापरण्याची परवानगी न घेता, बेकायदा खनिजाचे उत्खनन करुन, तस्करी, वाहतूक आणि विक्री करण्यात येत असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री. उत्तमराव जानकर, विजय शिवतारे, जितेंद्र आव्हाड, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.उत्तमराव जानकर वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा-देवघर व गुंजवणी प्रकल्प धरणाचे कालवे कार्यान्वित नसल्यामुळे निरा-देवघर प्रकल्पाचे पाणी किंवा गुजवणीचे पाणी निरा उजवा कालव्यास उपलब्ध होत नसणे, त्यामुळे निरा उजवा कालव्याच्या मूळ लाभक्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होणे, निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील मुख्य कालवा किमी १३४/७६० येथून खाजगी/ सहकारी उपसा सिंचन योजनेचे काम प्रलंबित असणे, सदरच्या खाजगी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजना करून माळशिरस तालुक्यातील १६ दुष्काळग्रस्त गावांना पाणी मिळणेबाबत लोकप्रतिनिधींची मागणी असणे, त्यानुषंगाने निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील सहकारी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त असणे, त्यानुसार शासन निर्णय, धोरण व पाणी उपलब्धता इ. बाबींचा अभ्यास करून सदर प्रकरणी शासनाकडून उचित कार्यवाही होत नसणे, निरा-देवघर प्रकल्पाचा मुख्य कालवा १५८ कि.मी. लांबीचा असून कि.मी. ० ते ६५ मधील कालवा कामे ही पारंपारिक उघड्या पध्दीतीने पूर्ण झालेली असून कि.मी. ६६ ते १५८ हा बंदिस्त नलीकेद्वारे प्रस्तावित कामे प्रलंबित असणे, तर कि.मी. ६६ ते ८७ ची प्रगतीत असलेली कामेही अद्यापी प्रलंबित असणे, सदरच्या कामाच्या खर्चाचा प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये समावेश असून निधीअभावी सदरहू कामे प्रलंबित असणे, याबाबत शासनाने चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नरोत्तरे झाली.

(५) श्री. हेमंत रासने, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या वसाहतींची दुरवस्था झालेली असणे, अनेक इमारतींमध्ये मनपा सेवक, बिगर महानगरपालिका सेवक, सेवानिवृत्त सेवक राहत असून त्यांना अनेक मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागणे, यामध्ये प्रामुख्याने पाण्याची व्यवस्था नसणे, ड्रेनेज लाईनची व्यवस्था नसणे, इमारतींमध्ये स्लॅब गळती होणे, काही इमारतींमध्ये स्लॅब पडल्यामुळे नागरिकांना अनेक वेळा दुखापत झाल्याच्या घटनाही घडणे, महापालिकेला भाडे भरुनही सोयी सुविधांपासून नागरिकांना वंचित रहावे लागणे, पुणे महानगरपालिकेने काही वसाहतींचे उदाहरणार्थ राजेंद्र नगर येथील वसाहतीचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरु केलेली असणे, परंतु त्या ठिकाणी राहत असलेल्या नागरिकांनी मालकी हक्काने घरे देण्याची मागणी करणे, तसेच या ठिकाणी पूरग्रस्त सुध्दा रहात असून त्यांचाही निर्णय प्रशासनाने घेतलेला नसणे, तसेच अनेक अडचणींना महापालिका प्रशासनाकडून कोणीतीही सकारात्मक उत्तरे अथवा कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात न येणे, परिणामी या नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन येथील नागरिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री, रामदास मसराम, संजय मेश्राम, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास मसराम वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"गडचिरोली जिल्ह्यातील आधारभूत धान खरेदी केंद्रावर श्री. तीवाडे, जिल्हा पणन अधिकारी, गडचिरोली यांच्या आशीर्वादाने मोठ्या प्रमाणावर अनियमितता होणे, सन २०२१-२२ मध्ये मौजा कासावी व आष्टा तालुका आरमोरी येथे सिंचनाची कोणतीही सोय नसताना उन्हाळी पिक दाखवून एकाच परिवारातील ८ दारिद्रय रेषेखालील शेतकरी जे संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी असणे व बी.पी.एल.धारक असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर लाखो रुपये जमा करणे, चार्मोशी तालुक्यातील भूमीहीन व्यक्तींच्या नावे शेतकरी दर्शवून हजारो रुपये बोनस स्वरूपात देणे, खरेदी विक्री संस्था चार्मोशी यांनी सन २०२४-२५ मध्ये धान खरेदी बोनस घोटाळ्या प्रकरणी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी सदर अधिकाऱ्यास फौजदारी गुन्हा

दाखल करावयाचे निर्देश देऊनही हेतूपुरस्सर दुर्लक्ष करणे, धान वाहतुकीसाठी जीपीएस प्रणालीचा वापर न करणे, श्री. तीवाडे चंद्रपूर जिल्हा प्रभारी पणन अधिकारी असताना तेथेही त्यांनी अनियमितता केली असणे,या अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आधारभूत खरेदी केंद्राच्या व खरेदी विक्री सहकारी संस्थांच्या माध्यमातून अपसंपदा जमा केलेली असणे, त्यामुळे त्यांचे तात्काळ निलंबन करून भारतीय प्रशासकीय सेवाद्वारा नियुक्त अधिकारी यांचे मार्फत २०२०-२१ ते आजपर्यंतच्या कामकाजाची तसेच त्यांच्या संपत्तीची चौकशी करणेबाबतची मागणी असतानाही शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, परिणामी जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. संजय देरकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"केंद्र शासनाद्वारे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षांत राज्यांना भांडवली खर्चासाठी Special Assistance to States for Capital Investment अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येणे, त्यामध्ये नगररचना (Town Planning) योजनांना प्राधान्याने समाविष्ट करण्यात येणे, नगरपरिषद वणी हद्दीमध्ये सदर योजनेअंतर्गत टाउन प्लॅनिंग योजना राबविण्याचा प्रस्ताव विचाराधीन असणे, दुसरीकडे वणी शहराच्या पायाभूत सुविधा अत्यंत अपुऱ्या असून मुलभूत गरजा जसे की, पाणी पुरवठा, मलनिस्सारण वाहिन्या, अंतर्गत रस्ते, आरोग्य सुविधा, घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाकडून आवश्यक तेवढा निधी उपलब्ध होत नसणे, अशा परिस्थितीत टाउनप्लॅनिंग योजनेच्या नावाखाली भूसंपादन, आरक्षण व जमिनीचे पुनर्वाटप यासारख्या प्रक्रिया राबविल्यास त्याचा लाभ सर्वसामान्य नागरीकांना न होता मोजक्या विकासक/बिल्डर्स लॉबीकरीता मर्यादित राहण्याची शक्यता असणे, वणी शहराची झपाट्याने वाढ होत असून अनियोजित बांधकाम, रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व सार्वजनिक सुविधांवरील ताण वाढत असून केंद्र शासनाच्या वरील विशेष सहाय योजनेअंतर्गत उपलब्ध निधीचा प्रभावी उपयोग करून नियोजनबद्ध विकास आराखडा (Town Planning Scheme) राबविणे गरजेचे असणे, तथापि, सदर योजनेची अंमलबजावणी, निधी वितरण व प्रशासकीय कार्यवाहीबाबत स्थानिक स्तरावर स्पष्टता नसणे, शासनाने या सर्व प्रकरणी केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री.अमोल खताळ, वि.स.स.यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधले,—

"अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर नगरपालिकेच्या हद्दीत, सि.स. नं. ८१६/ १६४९ येथील कोल्हार-घोटी राजमार्गालगत असलेली सुमारे १.२६ हेक्टर क्षेत्रफळाची नगरपालिकेच्या मालकीची जागा गेल्या काही वर्षांपासून बेकायदेशीररित्या अतिक्रमित करण्यात आलेली असणे, सदर जागेवर १९७०-८० च्या दशकात राहणाऱ्या नागरिकांचे नियोजनबद्ध पुनर्वसन श्रमिकनगर येथे करण्यात आले असणे, मात्र त्यानंतर या जागेवर काही समाजकंटकांनी बेकायदेशीररित्या कब्जा करून कोणताही कर किंवा महसूल न भरता वापर सुरू ठेवला असणे, यापूर्वीच्या काही लोकप्रतिनिधींनी या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्याला अप्रत्यक्ष संरक्षण दिल्यामुळे नगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असणे, प्रत्यक्षात या जागेवर नगरपालिकेचे शॉपिंग सेंटर किंवा इतर उत्पन्नवर्धक प्रकल्प उभारले असते तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली असती, तसेच या परिसरात काहीवेळा कायदा व सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या असून त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असणे, मात्र प्रशासनाकडून या गंभीर बाबीकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याने नागरिकांमध्ये शासनाविषयी निर्माण झालेली तीव्र नाराजी व असंतोषाची भावना, या गंभीर प्रकरणी शासनाने हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. गोपिचंद पडळकर वि.स.स. यांनी, राज्यात गेल्या ४ दशकांपासून धनगर समाज आरक्षणाच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलन करीत असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. हेमंत ओगले वि.स.स.यांनी, त्यांच्या मतदारसंघात अचानकच पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाला आलेले द्राक्ष, डाळिंब, कलिंगड, आंबा, मका, गहू या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे, त्यांना सरकारने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

कृषी मंत्री यांनी यासंदर्भात माहिती दिली.

(३) श्री. संजय कुटे वि.स.स. यांनी, सोलर पंप योजनेसाठी २ एकर व ३ एकरच्या शेतकऱ्यांसाठी ३ एचपी पंपाची असलेली अट काढून त्यांच्यासाठी ५ एचपी आणि ७.५ एचपीचेच मोटर पंप देण्यात यावे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(९) श्री. बापुसाहेब पठारे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधले.—

"जलसंपदा विभागाकडून शेतकऱ्यांच्या उपसा जलसिंचन योजनेला हवेली (जि.पुणे) तालुक्यातील नदी तीरावरील हिंगणागाव, खामगाव टेक, टिळेकरवाडी, भवरापूर, अष्टापूर, शिंदेवाडी, शिरसवाडी, बिवरी, वाडेबोल्हाई, कारेगावमुळ, पेठनायगाव, थेऊर, मांजरी ब्रु., मांजरी खुर्द, प्रयागधाम,कोळवडी साष्टे, केसनंद, आव्हाडवाडी या गावातील ग्रामपंचायतींना जलमापक यंत्र बसविण्याबाबत लेखी सूचना झालेली असणे, जलसंपदा विभागाने पुणे महानगरपालिकेला मोबदला घेऊन पाणी पुरविणे, ज्या पाण्यावर पाणीपट्टी मोबदला घेतला तेच दुषित केमिकलयुक्त टाकाऊ घाण पाणी ड्रेनेजमधून नदीत सोडणे, त्याच रसायनमिश्रित घाण पाण्यावर पुन्हा जलमापक यंत्र लावून दुसऱ्यांदा शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी आकारण्यात येणे, सदरील केमिकलयुक्त पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापिकी होऊन शेती उद्योग धोक्यात आला असणे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मुळा-मुठा नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासून अहवाल सादर केला असता ही नदी प्रदुषणाच्या विळख्यात सापडली असल्याचे व गटारगंगा झाल्याचे अहवालात नमूद केलेले असणे, याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय न घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व संतापाची भावना, यावर शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आता आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या चारही प्रस्तावावर एकत्रित चर्चा सुरू होईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

७. सर्वश्री विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स.यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २०२६ पासून 'मोफत उपचार' सेवा बंद होऊन केसपेपर व शस्त्रक्रियांसाठी शुल्क आकारणी सुरू झाल्याने गरीब रुग्णांचे हाल होत असणे"

तसेच

सर्वश्री अमित साटम, व इतर वि.स.स.यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव,—

"दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व दिवंगत उपमुख्यमंत्री तथा तत्कालीन अर्थमंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान"

तसेच

सर्वश्री जयंत पाटील व इतर वि.स.स.यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव-

"दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी M/S VSR Ventures Pvt. Ltd. संचालित खाजगी विमानाच्या अपघातात राज्याचे तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा झालेला दुर्देवी मृत्यू, या संपूर्ण अपघाताची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता"

तसेच

सर्वश्री अतुल भातखळकर व इतर वि.स.स.यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव-

"महाराष्ट्राला निसर्गरम्य समुद्रकिनारा, प्राचीन लेण्या, गडकिल्ले, घनदाट वनसंपदा असा समृध्द वारसा लाभला असणे, पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकुल वातावरण निर्माण करण्याकरिता 'पर्यटन धोरण-२०२४' जाहिर करण्यात आले असणे,

उपरोक्त चारही प्रस्तावावरील एकत्रित चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अभिजित पाटील

(चर्चा अपूर्ण..)

(१) श्री. नितीन देशमुख वि.स.स. यांनी, त्यांच्या मतदारसंघातील पंचायत समितीतील कर्मचारी जागेअभावी दुसऱ्या हॉलमध्ये काम करीत असणे, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

यासंदर्भात शासनाने नोंद घ्यावी असे मानीनय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(२) डॉ. किरण लहामटे वि.स.स. यांनी, मुंबईतील आझाद मैदानावर आदिवासी विद्यार्थ्यांचे डीबीटी (DBT), स्वयंअर्थसहाय्य योजना आणि वसतिगृह प्रवेशातील दिरंगाईविरोधात तीव्र आंदोलन सुरु असणे, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

म.वि.स. नियम २९३ अन्वये एकत्रित प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरू)

उपरोक्त चारही प्रस्तावावरील एकत्रित चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री. बाबुराव कदम-कोहळीकर (३) श्री. विलास भुमरे

(चर्चा अपूर्ण..)

श्री. विजय वडेट्टीवार वि.स.स. यांनी उपरोक्त चाही प्रस्तावावर एकत्रित चर्चा न करता प्रत्येक प्रस्तावावर वेगळी चर्चा घेण्यात यावी असा मुद्दा उपस्थित केला.

पणन मंत्री यांनी यासंदर्भात खुलासा केला.

म.वि.स. नियम २९३ अन्वये एकत्रित प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरू..)

उपरोक्त चारही प्रस्तावावरील एकत्रित चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(४) श्री.विजय वडेट्टीवार (५) श्री. संजय कुटे

(६) श्री. चेतन तुपे

(चर्चा अपूर्ण..)

तालिका सभाध्यक्ष (श्री. राजू खरे) यांनी, सन्माननीय सदस्य श्री. चेतन तुपे यांनी राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांच्या विमान दुर्घटनेचे विस्तृत विवेचन केले असून या घटनेची सखोल चौकशी करावी असे निर्देश दिले.

आपण दिलेल निर्देश गांभिर्याने घेऊन सरकार चौकशी करेल असे सांस्कृतीक कार्यमंत्री यांनी सांगितले.

म.वि.स. नियम २९३ अन्वये एकत्रित प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरू..)

उपरोक्त चारही प्रस्तावावरील एकत्रित चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(७) श्री. संजय गायकवाड (८) श्री. संजय केळकर

(चर्चा अपूर्ण..)

श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे वि.स.स. यांनी, वसमत तालुक्यातील जिंतूर ते चारठाणा मार्गावर गणेशपूर पाटीजवळ झालेल्या भीषण अपघातात वसमत येथील सय्यद कुटुंबातील चार निष्पाप जीवांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची अत्यंत वेदनादायी घटना घडली असणे, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

म.वि.स. नियम २९३ अन्वये एकत्रित प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरू..)

उपरोक्त तीनही प्रस्तावावरील एकत्रित चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(९) डॉ. नितीन राऊत (१०) श्री. अतुल भातखळकर

(११) श्री. सुनिल प्रभू (१२) श्री. दिपक केसरकर

(१३) श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली कटके (१४) श्री. शरद (दादा) सानवणे

(१५) श्री. सत्यजित तांबे (१६) श्री. नानाभाऊ पटोले

(१७) श्रीमती मंजुळा गावित (१८) श्री. प्रविण स्वामी

(१९) श्री. किसन वानखेडे (२०) श्री. रवि राणा

(२१) श्री. काशिनाथ दाते (२२) श्री. अमिन पटेल

(२३) श्री. हिकमत उढाण (२४) श्री. बाबाजी काळे

(२५) श्री. संजय उपाध्याय (२६) श्री. हिरामण खोसकर

(२७) डॉ. ज्योती गायकवाड (२८) श्री. रणधीर सावरकर

(२९) श्री. अबु आझमी (३०) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैया नवघरे

(३१) श्री. हेमंत ओगले (३२) श्री. विक्रम पाचपुते

(३३) श्री. राजेश पवार (३४) श्री. बापुसाहेब पठारे

(चर्चा अपूर्ण..)

सभागृहाची बैठक रात्री ०९ वाजून ४१ मिनिटांनी मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ०९.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.

मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६

विधानसभेची विशेष बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.४५ वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. संजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्री. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"चोपडा शहराची विकास योजना दिनांक २० मे, २०१६ पासून अंमलात आलेली असून सदर योजनेतील रत्नावती नदी लगत असलेल्या क्षेत्रातून पूररेषा दर्शविण्यात आलेल्या असणे, सदर पूररेषेबाबत विकास योजना अहवालामध्ये उच्चतम पूररेषेमधील बांधकामाबाबत किमान २.५ मी. उंचीचे बांधकाम (स्टील्ट) करणेबाबत तरतूद करण्यात आलेली असणे, परंतु सदरची तरतूद ही सन २००६ मध्ये चोपडा शहरातील रत्नावती नदीला आलेला महापूर विचारात घेऊन करण्यात आलेली असणे, सन २००६ पासून ते आजपावेतो चोपडा शहरामध्ये कुठल्याही स्वरुपाचा महापूर आलेला नसणे, त्यानुषंगाने मंजूर विकास योजना अहवालातील उच्चतम पूररेषेमधील किमान २.५ मी. उंचीचे बांधकाम (स्टील्ट) ची अट शिथिल करून मंजूर विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र.३.१.३ नुसार सामान्य पुररेषा व महत्तम पूररेषा मधील क्षेत्रासाठी महत्तम पुररेषेच्या वर ०.४५ मी. उंची ची तरतूद करण्यात येणे, सदरची तरतूद ही चोपडा शहराकरीता सुद्धा गृहीत धरण्यात यावी अशी मागणी होत असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणे, तथापि, अद्यापपर्यंत याबाबत कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी नागरीकांमध्ये वाढते तीव्र नैराशाचे वातावरण, शासनाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. राजेश पवार, किसन कथोरे, समाधान आवताडे, प्रविण दटके, प्रताप अडसड, विक्रम पाचपुते, राजन नाईक, करण देवतळे, मोहन मते, वि.स.स.यांची लक्षवेधी सूचना –

श्री.राजेश पवार, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"राज्यात गेल्या काही वर्षात लहान मुले व किशोरवयीन मुलांकडून होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचे विविध अहवालांमधून दिसून येणे, मोबाईल फोन, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म तसेच विविध ऑनलाइन गेम्सचा अति व अनियंत्रित वापर याचा मुलांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होणे, तसेच ऑनलाइन गेम्स, हिंसक डिजिटल कंटेंट किंवा सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळविण्याच्या हव्यासामुळे मुलांकडून मारामारी, सायबर गुन्हे, चोरी, ब्लॅकमेलिंग, सायबर

बुलिंग तसेच इतर गंभीर गुन्हे घडत असणे, त्यामुळे मुलांचे मानसिक आरोग्य, सामाजिक वर्तन तसेच कायदा-सुव्यवस्था यावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असणे, या पार्श्वभूमीवर कर्नाटक व आंध्रप्रदेश राज्यांनी सोळा वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणण्याबाबत कायदे किंवा धोरणात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती प्रसारमाध्यमांतून समोर आलेली असणे, महाराष्ट्र राज्यातील अल्पवयीन मुलांकडून झालेल्या गुन्ह्यांपैकी अनेक गुन्हे सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स किंवा इंटरनेट वापराशी संबंधित असणे, शाळा, पालक व समाजामध्ये डिजिटल साक्षरता व जनजागृतीसाठी शासनाकडून काही विशेष मोहीम राबविण्याची आवश्यकता, कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही सोळा वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर काही निर्बंध आणण्यासाठी कायदा किंवा धोरण आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"भिवंडी–निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत ४९ शाळा चालवल्या जात असणे,सदर शाळांची अवस्था अत्यंत दयनीय धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास येणे, C-१ कॅटेगरीतील ७ शाळा बंद असणे व इतर शाळांची दुरुस्ती करणे गरजेचे असणे, याबाबत मानवअधिकार आयोगाने शाळांच्या सद्यःस्थितीबाबत पाठविलेल्या नोटीसा, सोयी-सुविधांचा असलेला अभाव, पाणी वीज, यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित असणे, मनपा शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटत असणे, यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी गळती असणे, तसेच माध्यमिक शाळांची कमतरता असणे, शाळांच्या दुरुस्तीबाबतचा ३० कोटींचा विशेष निधीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, भिवंडी–निजामपूर शहर महानगरपालिकेने ठराव करून शाळा दुरुस्ती व नवीन शाळांकरिता खर्च न करण्याचा घेतलेला निर्णय, भिवंडी–निजामपूर शहराची लोकसंख्या पाहता मनपाच्या शाळांची असलेली आवश्यकता, परिणामी शिक्षणाचा दर्जा खालावणे, विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून महापालिकेच्या शाळांच्या दयनीय अवस्थेबाबत लक्ष घालून त्वरित शाळांच्या दुरुस्ती व नवीन शाळा बांधण्याकरिता, सोयी-सुविधा पुरविण्याकरीता निधीची तरतूद करणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

नगर विकास राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधले,—

"कोल्हापूर शहराला मागील अनेक वर्षांपासून विविध नागरी समस्यांनी ग्रासलेले असणे, सन १९७२ साली नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर आजतागायत शहराची एक इंचही हद्दवाढ झालेली नसणे, वाढत्या नागरीकरणामुळे शहराशी एकरूप झालेल्या उपनगरांवर मूलभूत सुविधा पुरविण्याचा अतिरिक्त भार महानगरपालिकेवर पडत असणे, सन २०१९ व २०२१ मधील महापुरांमुळे शहराचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे तसेच ब्ल्यू लाईनमुळे नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी मोकळ्या जागांचा अभाव निर्माण होणे, सन १९९८ मध्ये जाहीर झालेल्या सुधारित विकास योजनेतील रिंगरोड, ॲम्यूनिटीज तसेच ओपन स्पेस ताब्यात घेण्याची कामे आजतागायत न झाल्यामुळे शहरातील रस्ते अरुंद होऊन वाहतूक कोंडी व पार्किंगची गंभीर समस्या निर्माण होणे, शहरात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्यामुळे प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत असणे, तसेच सेवा प्रवेश नियम शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित राहणे, पंचगंगा नदी प्रदुषणाचा प्रश्न गंभीर बनणे व काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेतील त्रुटींमुळे शहरातील पाणीपुरवठा वारंवार खंडित होणे, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, या सर्व प्रश्नांवर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी
(श्री.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) डॉ. राहुल आहेर, वि.स.स. यांनी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"एकीकडे गोण्यांच्या कमतरतेचे कारण पुढे करून सामान्य शेतकऱ्यांचा मका खरेदी करण्यास नकार दिला जात असताना, दुसरीकडे चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील हिवरखेडे खरेदी केंद्रावर पर तालुक्यातील मका अनधिकृतपणे विकला जात असल्याचा प्रकार माहे मार्च, २०२६ मध्ये उघडकीस आलेला असणे, या कारवाईत मक्याने भरलेल्या सहापैकी पाच ट्रॅक्टरमध्ये महाराष्ट्र शासनाच्या रिकाम्या गोण्याही मिळून येणे, निफाड तालुक्यातील टाकळी विंचूर येथील मका ट्रॅक्टरद्वारे चांदवडच्या हिवरखेडे केंद्रावर आणला असता स्थानिक

शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून महसूल विभागाने केंद्रावर छापा टाकला असता, तेथील कर्मचारी आणि खरेदीदार आधीच पसार झाले असणे, तपासणी दरम्यान ट्रॅक्टरमधील मक्याच्या खाली शासनाच्या हमीभाव केंद्रासाठी राखीव असलेल्या अधिकृत गोण्यांचा मोठा साठा आढळून येणे, या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर आणि दलालांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी शेतक-यांनी व सामाजिक संघटनांनी करणे, ट्रॅक्टर चालकांनी आपल्याला या व्यवहाराबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगणे, ज्यामुळे यामागे मोठे रॅकेट सक्रीय असल्याचे स्पष्ट होत असणे, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५ ही माननीय तालिका सभाध्यक्षांनी पुकारली परंतु संबंधित सन्माननीय सदस्य अनुपस्थित असल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"पवार पब्लिक स्कूल, कांदिवली (प.) मुंबई-६७ येथे शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत २५% आरक्षण [Section १२ (१) (c)] अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून वह्या, पुस्तके, गणवेश, लेखन साहित्य व इतर शैक्षणिक साहित्याकरिता शाळा प्रशासन शुल्क मागणी करीत असणे, शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार (GR) आरटीई अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत शिक्षण देणे बंधनकारक असणे, यामध्ये वह्या, पाठ्यपुस्तके, गणवेश, लेखन साहित्य इत्यादी शैक्षणिक साहित्याचा समावेश असणे, अशा विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क, देणगी किंवा साहित्याकरिता पैसे मागणे हे आरटीई कायद्याचे उल्लंघन असणे. तरी सुद्धा शाळा प्रशासन पालकांना सदर शुल्क भरण्यासाठी व पालकांवर दबाव आण्यासाठी एक-एक पालकांना मुख्य अध्यापिकेच्या केबिनमध्ये बोलाऊन फॉर्मवर त्यांच्या सह्या घेऊन पैसे भरल्याशिवाय वह्या-पुस्तके, गणवेश व शैक्षणिक साहित्य दिले जाणार नाही असे सांगून अनेक पालकांना परत पाठविण्यात येणे, ही कृती अत्यंत गंभीर व आरटीई कायद्याचे उल्लंघन करणारी असणे, या प्रकारामुळे आरटीई विद्यार्थ्यांच्या पालकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मागास घटकातील मुलांच्या शिक्षणाच्या मूलभूत अधिकारावर गदा येत असणे, याबाबत शासनाने शाळा प्रशासनास सूचना

देऊन आरटीई अंतर्गत प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके, गणवेश व शैक्षणिक साहित्य त्वरित देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) सर्वश्री. संतोष दानवे, नारायण कुचे, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्री. संतोष दानवे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील शेतकऱ्यांचे दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोलर पॅनलचे प्रचंड नुकसान झालेले असणे, यामध्ये प्रामुख्याने मदन विठ्ठल कुलवान यांच्या शेतातील सहा सोलर पॅनल फुटणे आणि दीपक शितल डोबाल यांच्या शेतातील सात पॅनल तुटल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले असणे, सदर नुकसानीबाबत संबंधित सीआरआय कंपनीने माहे सप्टेंबर महिन्यात पंचनामा करून क्लेम दाखल केला असला तरीही आता कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करण्यात येत असणे, शेतकऱ्यांना क्लेम रिजेक्ट झाल्याचे तोंडी सांगून त्यांची दिशाभूल व फसवणूक केली जात असणे, या गंभीर बाबीवर भोकरदन महावितरण उप अभियंता कार्यालयात बैठक होऊन कंपनीला सूचना दिल्यानंतरही आणि कंपनीने भरपाई देण्याचे मान्य करूनही अद्याप प्रत्यक्ष मदत मिळालेली नसणे, भोकरदन तालुक्यातील अनेक गावांमध्ये विविध सोलर कंपन्यांबाबत अशाच स्वरूपाच्या तक्रारींची व्याप्ती मोठी असणे, यामुळे शासनाच्या सौर ऊर्जा योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असणे, तरी शासनाने या प्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून संबंधित कंपन्यांना कडक निर्देश देणे, बाधित शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई मिळवून देणे आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या कंपन्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करून सौर ऊर्जा प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर सनियंत्रण समिती नेमण्याची प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

ऊर्जा राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) सर्वश्री. नरेंद्र भोंडेकर, नाना पटोले, संजय मेश्राम, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री.नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"गोसेखुर्द प्रकल्पामध्ये पूर्ण संच जलसाठा २४५.५०० त.मी. ने बाधित होणाऱ्या भंडारा विधानसभा मधील खमारी, खापा (अजिमाबाद), मुजबी, (दवडीपार बेला), दाभा, गणेशपुर, भोजापुर, सालेबर्डी, कारधा, तिड्डी, निमगाव, अर्जुनी टोली, मेंढा, कोरंभी देवी, बेला, कोथुर्णा, खैरी, पेवठा, कोंढी, कवडशी, बेरोडीटोला, करचखेडा, जमनी, लोहारा, भंडारा खास, पाहूनगाव, इटगाव, कुर्झा, खमाटा, बेटाळा, सुरबोडी, बोरगाव बुज, टोली या ३२ गावांच्या पुनर्वसनासाठी नवीन भूसंपादन कायद्यानुसार शासनास अद्यापही प्रस्ताव सादर करण्यात आलेला नसणे, तसेच मोबदलाही देण्यात आलेला नसणे, २०८८ हेक्टर शेती जमीन संपादीत करून आर्थिक मोबदला देण्यात यावा, पुर्णः बाधित प्रमाणे अंशतःबाधित प्रकल्पग्रस्तांना कृषी मजुरी एकमुस्त रक्कम देण्यात यावी, गोसेखुर्द प्रकल्पामध्ये अंशतः बाधित होणाऱ्या गावांचे जलसंपदा विभागामार्फत रेड ॲन्ड ब्लु ड्रोन सर्वेक्षणाच्या कामासाठी ९८ लाख रुपये निधी मंजूर झालेला असतानासुध्दा सर्वेक्षणाचे काम अपूर्ण असणे, प्रकल्पग्रस्तांना दिनांक १९ जानेवारी, २०२५ च्या (जीआर) मध्ये अटी शिथिल करून पूर्वीप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात यावे यासह अनेक मागण्यांचे निवेदन ३२ गावातील प्रकल्पग्रस्त यांनी करणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेला तीव्र असंतोष, या ३२ गावातील पुनर्वसन व नवीन कायद्यानुसार प्रकल्पग्रस्तांना आर्थिक मोबदला मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मदत व पुनर्वसन राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४४ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

१. (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तारांकित वीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

माननीय अध्यक्षांनी, म.वि.स. नियम २९२ किंवा २९३ अन्वये सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावातील विषयाबाबत कार्यपद्धती सविस्तर विशद केली.

श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "सत्ताधारी व विरोधी पक्षाचे प्रस्ताव एकत्रित करून त्यावर चर्चा घेण्यात आली असणे" इ.बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

२. (१) गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी, (क) दिनांक १३.०५.२०२४ रोजी घाटकोपर येथील बेकायदेशीर फलक कोसळल्यामुळे झालेल्या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी श्री. दिलीप बी. भोसले, माजी मुख्य न्यायाधीश, अलाहाबाद उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(ख) दिव्यांग कल्याण मंत्र्यांनी (मा.मुख्यमंत्री यांच्याकरीता), श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) अधिनियम, २०१८ च्या कलम ४६ च्या पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार "श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) नियम, २०२५" प्रसिध्द करण्याची अधिसूचना क्रमांक श.दे.वि - २२२५/प्र.क्र. १५०/कार्य - १६, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ सभागृहासमोर ठेवला.

(२) उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले,—

(क) निकमार विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल.

(ख) डीईएस विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल.

(ग) विजयभूमी विद्यापीठ, रायगड यांचा सन २०१९-२०२० ते सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल.

(३) महिला व बाल विकास मंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले –

(क) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल.

(ख) महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल.

३. श्री.राजू तोडसाम, समिती सदस्य यांनी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर केला.

४. श्री.रवि राणा, समिती प्रमुख यांनी, विधानसभा आश्वासन समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करणे.

५. (१) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "विधिमंडळ समित्याच्या बैठकांना अधिकारी अनुपस्थित राहत असणे किंवा समितीसमोर येण्यास टाळाटाळ करीत असणे." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त माहितीच्या मुद्यासंदर्भात माननीय अध्यक्षांनी निर्देश दिले.

(२) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "हाफकिन जैव औषध निर्माण महामंडळाच्या संचालकांकडून मालमत्ता विकण्याचे काम सुरू असणे." इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी मांडलेली माहिती अत्यंत गंभीर असून शासनाने याची गांभीर्याने नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(३) श्री.महेश बालदी, वि.स.स. यांनी, "केंद्र सरकारने मच्छीमारांकरिता मिळणाऱ्या डिझेलच्या दरात २३ रुपये ८ पैशांनी वाढ केली असणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुहास बाबर, वि.स.स. यांनी, "दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी ऊर्जा विभागांतर्गत असलेल्या महावितरण कंपनीकडून आटपाडी तालुक्यातील हिवतड, शेतफळे व दिव्यांचन येथील तीन उप केंद्राच्या लोकार्पणच्या शासकीय कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधींना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आल्यामुळे एमएसईबीच्या संचालिका, विटा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. विनायक दाते, आटपाडी विभागाचे उप कार्यकारी अभियंता श्री. राजेश डावरे, सहायक अभियंता श्री. द्वारकेश बाबर, श्री. मेहबूब उबाले यांच्याविरूद्ध विशेष हक्कभंगांची सूचना दिली.

सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या हक्कभंगासंदर्भातील संपूर्ण माहिती मागविण्यात येईल आणि त्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

६. श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "चंद्रपूर शहरातील झरपट नदीचे तातडीने पुनरुज्जीवन करणे" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर केला.

श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी, "एखाद्या मतदारसंघातील अधिकाऱ्यांच्या शासकीय पाहणी दौऱ्यांची माहिती तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींना देण्यात येत नसणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भातील शासन निर्णयान्वये अशा कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधींना कार्यक्रमाचे आमंत्रण देणे आवश्यक असून त्याचे अनुपालन केले जात नसेल तर निश्चितपणे कारवाई केली जाईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

७. (१) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, "भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील मांडळ येथील रहिवाशी श्री. मुनेश्वर वामनजी भगमारे यांनी दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास आपल्या शेतात गळफास लावून आत्महत्या केली असणे" इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना मांडली असून त्यांनी त्यासंदर्भात थोडक्यात माहिती द्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्य श्री. नानाभाऊ पटोले यांनी आज सभागृहासमोर जो मुद्दा मांडला आहे त्याची नोंद घेऊन शासनाने उचित कार्यवाही करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्रामध्ये अलिकडे अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत असून मागच्या १५ दिवसांमध्ये ब्रम्हपुरी शहरातून ६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या असणे" इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना उपस्थित केली.

याबाबत शासनाने नोंद घ्यावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(३) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, "शासनाने सहायक प्राध्यापक पदाच्या भरतीसाठी "नेट सेट" ही मूळ पात्रता असून या परीक्षेच्या मूळ पात्रतेसाठी ५ गुण आणि पीएच.डी. साठी १७ गुण असे निकष ठरविले असणे" इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना उपस्थित केली.

(४) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांनी, "अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या नुकसान झालेल्या शेतीपिकांचे पंचनामे करण्यात यावे" इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना उपस्थित केली.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.अर्जुन खोतकर, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात कृषी मंत्र्यांनी उत्तर दिले.

(५) श्री.आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी, "संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा मास्टर प्लॅन बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकाशित केलेला आहे. तसेच एका माकडाच्या गळयात स्टीलचा बाण मारला गेला असणे" इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना उपस्थित केली.

(६) डॉ.हेमंत ओगले, वि.स.स. यांनी, "पुणे येथील खराडी आयटी टॉवरमधील उद्वाहनच्या अनियमिततेबाबत हिवाळी अधिवेशन, २०२५ मध्ये स्थगन प्रस्तावान्वये गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आला असून पुढील बाबीबाबत अद्याप स्पष्ट माहिती उपलब्ध झालेली नसणे" इ.बाबत स्थगन प्रस्तावाची सूचना उपस्थित केली.

श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी, मी प्रस्तावित केलेल्या कामानंतर इतर लोकप्रतिनिधींकडून आलेल्या कामांना कोणतीही परवानगी न घेता प्राधान्य दिले जात असणे याबाबत के उत्तर विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.प्रशांत धुमाळे, पी दक्षिण विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. विशाल कुलकर्णी आणि झोपडपट्टी सुधार मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री.अभय रामटेके यांच्याविरूद्ध विशेष हक्कभंगांची सूचना दिली.

शासनाने नोंद घेऊन उचित उपाययोजना करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांना दालनात अनुमती नाकारलेली आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

८. सर्वश्री संजय केळकर, निलेश राणे, शेखर निकम, प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी, "कोकणचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कोकण विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता" इ.बाबत उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा - तसेच –

सर्वश्री भास्कर जाधव, सुनिल प्रभू, अजय चौधरी, अनंत (बाळा) नर, महेश सावंत, हारुन खान, वि.स.स. यांनी, "मागील १८ वर्षापासून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामामुळे कोकणच्या विकासाला बसलेली खीळ" इ.बाबत उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा - (चर्चा पुढे सुरु...)

उपरोक्त दोन्ही अल्पकालीन चर्चेस मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री, वने मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री, वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार मंत्री, जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), पर्यटन राज्यमंत्री, पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाने या दोन्ही प्रस्तावांवर विचार केलेला आहे असे
माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२६ निमित्त माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मंत्रीगण तसेच सर्व सन्माननीय सदस्य यांच्या सन्मानार्थ आज मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता विधान भवनाच्या हिरवळीवर माननीय अध्यक्षांच्यातर्फे अल्पोपहाराचे आयोजन केले आहे. तरी सर्वांनी अगत्याने या कार्यक्रमास उपस्थित राहावे.

९. (अ) पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

महसूल मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले व सदर विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(ब) (१) (क)महसूल मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य श्री. संजय मेश्राम यांचा पहिला प्रस्ताव व सन्माननीय सदस्य सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ. नितीन राऊत यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्री यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी भाषणास सुरुवात करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.भास्कर जाधव (२) श्री.अर्जुन खोतकर

(३) श्री.रणधीर सावरकर (४) श्री.चंद्रदीप नरके

(५) श्री.शरददादा सोनवणे (६) श्री.नानाभाऊ पटोले

(७) श्री.अभिजीत पाटील (८) श्री.हिरामण खोसकर

(९) श्री.विक्रम पाचपुते (१०) श्री.राजू तोडसाम

विधेयकावरील चर्चेस महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(चर्चा अपूर्ण)

१०. (१) मुख्यमंत्र्यांनी, "भोंदू बाबा अशोककुमार एकनाथ खरात यांच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे" इ.बाबत तसेच, (२) "ठाणे शहरातील मुंब्रा परिसरात झालेला गोळीबार" इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने नियम ४७ अन्वये निवेदन केले.

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ – चर्चा पुढे सुरू

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

११. श्री रोहित पवार, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम २९२ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले –

"राज्य सरकारच्या २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे मुंबईसह राज्यात १००० शाळा बंद पडण्याचा धोका निर्माण होणे, सीबीएसई, आयसीएसई, आयबी बोर्डाच्या शाळा व विद्यार्थ्यांची संख्या वाढत जाणे, गोदावरी, चंद्रभागा, नागनदी व

पंचगंगा नद्या प्रदूषण मुक्त करण्याचा शासनाचा कृती आराखडा, वृक्षतोड, वाहतूक कोंडी, बेसुमार बांधकामे यामुळे एमएमआरडीए क्षेत्र, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर इत्यादी शहरात वाढलेले प्रदूषण, पर्यावरणाचा ऱ्हास, एमआयडीसी विकसित करीत असलेल्या शिळ-महापे (जि.ठाणे) हा वन विभागाचा रस्ता रुंदीकरणासाठी केंद्र शासनाच्या वन विभागाची अंतिम मान्यता न घेणे व वनीकरणासाठी राखीव असलेले क्षेत्र खाजगी विकासकाला परस्पर वितरित करणे, सदर प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डातील कंत्राटी कामगारांच्या सेवा नियमित करण्याबाबत, पालघर व ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांबाबत प्रशासकीय अनास्था, मराठवाडा, विदर्भ व उर्वरीत महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळांना मार्च, २०२० नंतर मुदतवाढ देण्यात न येणे, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांवर वाढलेले अत्याचार, मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्स याचे प्रमाण नवयुवकांमध्ये वाढत असल्याची बाब समोर येणे, राज्यात भोंदुबाबांचे प्रकार वाढले असून त्यामुळे महिला व सर्वसामान्य जनता त्याला बळी पडत असणे, नाशिक येथील अशोक खरात या भोंदुबाबाने अनेक महिलांचे शोषण केल्याचा प्रकार उघड होणे, राज्यात मोठ्या प्रमाणात पैसे डबल करून देत असल्याचे सांगून फसवणूक केल्याची बाब समोर येणे, राज्यातील सीमावर्ती भागात परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून मनमानी वसुली होत असल्याची बाब निदर्शनास येणे, शासकीय नोकरीचे आमिष दाखऊन तरुण व तरुणींची होत असलेली फसवणूक, राज्यातील विविध विभागात सुरू असलेल्या शासकीय कर्मचारी भरतीमध्ये होत असलेले भ्रष्टाचार, राज्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे होत असलेले गैरव्यवहार, CAG ने दिलेले अहवाल, शासकीय जमिनींची होत असलेली लूट, राज्यातील नगर परिषदेमध्ये व नगरपालिका अंतर्गत स्वच्छतेच्या कामांमध्ये होत असलेली अनियमितता, राज्यामध्ये शुद्ध पाण्याच्या नावाखाली प्रत्येक ठिकाणी RO प्लांट टाकून स्वच्छ पाण्याची होत असलेली विक्री, राज्यात होत असलेला शालार्थ आयडी भ्रष्टाचार व त्यामुळे शिक्षकांवरती अतिरिक्त कार्यभार वाढत असणे, शालेय शिक्षण विभाग अंतर्गत प्रधानमंत्री पोषण आहारामध्ये होत असलेला भ्रष्टाचार, राज्यातून केजी टू पीजी सर्व शिक्षण व्यवस्था, शाळांची दयनीय परिस्थिती निर्माण होणे व शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, वाढती फी यामुळे विद्यार्थी पालक बेजार होणे, सामाजिक न्याय विभागाच्या विविध आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये काही ठराविक विविध निविदा धारकांना सहाय्य करण्यासाठी झालेला भ्रष्टाचार, दिव्यांग विभागामध्ये खोटे प्रमाणपत्र देऊन शासनाच्या घेतलेल्या नोकरीमध्ये फसवणूक झाल्याबाबत, रस्त्यांची झालेली दुरवस्था, ग्रामीण भागामध्ये प्रामुख्याने रस्त्यांची दुरवस्था झालेली असणे, लहान व मोठे पुलांचे बांधकामासाठी निधीची उपलब्धता न होणे, गेल्या दोन वर्षापासून राज्यातील विविध कंत्राटदारांची मोठ्या प्रमाणात देयके शासनाकडे प्रलंबित असणे, त्यामुळे विकास कामे अपुरी

असल्याची बाब समोर येणे, सार्वजनिक बांधकामांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, अन्न नागरी पुरवठा विभागात, प्रामुख्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील निविदा प्रक्रियेमध्ये झालेला घोळ तसेच POS मशीनच्या निविदा प्रक्रियेत झालेले भ्रष्टाचार, महसूल विभागामध्ये मोठ्या प्रमाणात टीडीआर घोटाळा समोर येणे, जलसंधारण विभागातील घोटाळा, वैद्यकीय उपकरणे/ औषधे खरेदी गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागातील गैरव्यवहार, राज्यात विविध भूसंपादन प्रकरणात होत असलेला घोटाळा, विरार अलिबाग कॉरिडॉर कामाच्या भूसंपादनामध्ये कुंडेवहाळ, ता.पनवेल येथील जमिनीसंदर्भात झालेला ५६ कोटीचा घोटाळा, यावर न्यायालयाने आदेश देऊन देखील संबंधित अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करता पाठराखण करण्याची शासनाची भूमिका, आदिवासी, विविध इनाम जमिनी हडपण्याचे राज्यात वाढलेले प्रमाण, एकंदरीतच महसूल विभागात वाढलेला भ्रष्टाचार व त्यावर नियंत्रण आणण्यास शासनाला आलेले अपयश, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात तीव्र पाणी टंचाई जाणवत असतानाही मा.उच्च न्यायालयाकडे मुबलक पाणी असल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र महापालिकेने सादर करणे, महापालिकेच्या शहरविकास विभागामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, रतनशी प्रेमजी ट्रस्टने ठाणे येथील जमिनीच्या विक्रीमध्ये केलेला गैरव्यवहार, येऊर येथील आदिवासी जमीनी धनदांडग्यांनी बळकावणे, आदिवासींवर होणारा अन्याय, अत्याचार, ठाणे येथील वनजमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.''

(चर्चा अपूर्ण)

१२. श्री.विजय वडेट्टीवार, "अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना एकही संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नसणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री.विजय वडेट्टीवार यांनी मागणी केल्याप्रमाणे अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु असताना संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित असावेत असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले व सभागृहाची बैठक १० मिनिटांकरिता स्थगित केली.

सभागृहाची बैठक मंत्रिमहोदय उपस्थित नसल्यामुळे सायंकाळी ५ वाजून ४९ मिनिटांनी, १० मिनिटांकरिता स्थगित झाली.

सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून ५९ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री रोहित पवार व इतर वि.स.स. यांचा, "राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये वाढलेले प्रदूषण, पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, महिलांवरील वाढते अत्याचार, शालेय शिक्षण, महसूल, सार्वजनिक बांधकाम विभाग इतर सर्वच विभागांमध्ये वाढलेला भ्रष्टाचार असे अनेकविध प्रश्न सोडविण्यात शासनाला आलेले अपयश" म.वि.स. नियम २९२ प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू

श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी उपरोक्त प्रस्ताव मांडला व आपले भाषण पूर्ण केले.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.अमित साटम
(२) श्री.विजय वडेट्टीवार
(३) श्री.मंगेश कुडाळकर
(४) श्री.सुनील प्रभू
(५) श्रीमती मनिषा चौधरी
(६) श्री.जितेंद्र आव्हाड (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेवर सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड हे ऑन लेग राहतील तसेच आता अर्धा तास चर्चेला सुरुवात करण्यात येईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

१३. (१) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, राज्यातील वीज दरवाढीमुळे उद्योग राज्याबाहेर स्थलांतरीत होत असल्याबाबत" या विषयावरील श्री. धनंजय मुंडे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १५६६२ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

उपरोक्त चर्चेस ऊर्जा राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, राज्यातील नद्यांमधील वाढते प्रदूषण रोखण्याबाबत" या विषयावरील डॉ.नितीन राऊत व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २२९७७ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

उपरोक्त चर्चेस पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी उत्तर दिले.

(३) श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत वरळी पुनर्विकास प्रकल्प हाती घेण्यात आला असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात येणे, उक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांमध्ये कोणकोणाची नेमणूक करण्यात आली तसेच सदर सल्लागार समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला असेल तर त्यावर शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, त्याचबरोबर राज्यातील विविध जिल्ह्यातून (मुंबई शहर व उपनगरासह) भरती झालेले मुंबई पोलीस अधिकारी व अंमलदार, हवालदार आदिंना सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळणाऱ्या तुटपुंज्या निवृत्तीवेतनातून मालकी हक्काचे मुंबई सारख्या शहरात घर घेणे शक्य नसल्याने त्यांना शहरात मालकी हक्काची घरे देण्याची आवश्यकता, त्याकरिता मुंबई उपनगरात मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्याबाबत स्वतंत्र व ठोस पोलीस हाऊसिंग धोरण जाहीर करण्यात यावे, तसेच पोलीस बांधवानी स्थापन केलेल्या पोलीस परिवार गृहनिर्माण सहकारी संस्थांना मालकी हक्काचे घरे अथवा भूखंड देण्यासाठी विशेष सवलतीसह योजना राबविण्याची आवश्यकता, सेवानिवृत्त मुंबई पोलीस अधिकारी /अंमलदार व त्यांच्या कुटुंबीयावर लादण्यात येणारे दंडणीय अनुज्ञाप्ती शुल्क पूर्णतः माफ करण्याची आवश्यकता, पोलिसांच्या मालकी हक्काच्या घरांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर पोलिसांसाठी घरे बांधण्यात यावी, सदर भूखंड खाजगी विकासकांच्या ताब्यात देण्यात येऊ नये अशी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त चर्चेस गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "आजच्या कामकाजपत्रिकेतील ७ व्या क्रमांकावरील अर्धा-तास सूचनेवरील कामकाज उद्या घेण्यात यावे." इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात विधासभा अध्यक्ष यांना कळविण्यात येईल तसेच सदर अर्धा-तास सूचना उद्याच्या कार्यक्रम पत्रिकेत दर्शविण्याची सूचना तत्वतः मान्य करतो असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

(४) श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"राज्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूकीचे सायबर गुन्हे घडत असणे, या फसवणूकीसाठी सोशल मिडीयाचा वापर होत असणे, सोशल मिडीयाच्या माध्यमातून विविध जाहिरातीद्वारे अमिषे दाखवून ही फसवणूक केली जात असणे, या आमिषांमुळे अनेक जणांची फसवणूक होत असणे, कित्येकदा या फसवणूक करणाऱ्या टोळ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरुन गुन्हे करीत असणे, त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाहीसाठी मर्यादा येत असणे, अनेक गुन्हे उघडकीस येत नसणे, त्यामुळे शासनाने या आर्थिक फसवणूकीच्या सायबर गुन्ह्यांना प्रतिबंधासाठी बहुवर्षीय राज्यव्यापी सायबर पूर्वसूचना, इशारा व नागरिक जनजागृती चौकट तयार करण्याची आवश्यकता, मात्र शासनाकडून कार्यवाहीत होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत निर्माण होत असलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त चर्चेस गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

(५) श्री. रोहित पाटील, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"सांगली शहरात तसेच तासगाव व विटा (जि. सांगली) परिसरामध्ये अमली पदार्थांचे वाढत असलेले जाळे, विटा एम.आय.डी.सी. परिसरात पोलिसांनी १४.५ किलो मेफेड्रोन नावाचे ड्रग्ज जप्त करत सुमारे २९ कोटींचा मोठा ड्रग्ज उत्पादन रॅकेट उद्ध्वस्त करणे, जिल्हास्तरावर अमली पदार्थांचे उत्पादन व वितरण साखळी सक्रिय असल्याचे उघड होणे, परंतु जिल्ह्यामध्ये बाहेरून येणारे अंमली पदार्थाचे जाळे देखील प्रस्थापित झालेले असणे, त्याचप्रमाणे तासगाव तालुक्यात ग्रामीण भागात गांजाची लागवड व जप्तीच्या घटना समोर आल्याने अमली पदार्थांचे जाळे लहान शहरांपासून गावांपर्यंत पोहोचल्याचे दिसून येणे, अंमली पदार्थांच्या सेवनामध्ये अल्पवयीन मुलांचा वाढता सहभाग, शाळा-महाविद्यालयीन वयोगटातील युवक व्यसनाधीनतेकडे वळत असल्याची बाब उघडकीस येणे, व्यसनाधीनतेमुळे चोरी, मारामारी, लहान स्वरूपातील गुन्हे, टोळी संस्कृती व हिंसक प्रवृत्ती वाढत असल्याचा धोका निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने कडक पावले उचलन्याची आावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.अभिजीत पाटील व श्री.हेमंत ओगले, वि.स.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त चर्चेस गृह (शहरे) राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

(६) श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"सिडको महामंडळातील कारभाराबाबत अत्यंत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी समोर येत असणे, पाणीपुरवठा, गृहनिर्माण, १२.५% योजना, नैना प्रकल्प, बांधकाम परवानग्या तसेच कंत्राट वाटप या सर्वच स्तरांवर मोठ्या प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याचे निदर्शनास येणे, विशेषतः सर्वसामान्य नागरिक व प्रकल्पग्रस्त शेतकरी यांना न्याय मिळत नसणे, यासंदर्भात प्रशासनाची भूमिका उदासीन व निष्क्रिय असणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सदर बाबींची शासनाने गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त चर्चेस खारभूमी विकास मंत्र्यांनी उत्तर दिले.

श्री रोहित पवार व इतर वि.स.स. यांचा, "राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये वाढलेले प्रदूषण, पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, महिलांवरील वाढते अत्याचार, शालेय शिक्षण, महसूल, सार्वजनिक बांधकाम विभाग इतर सर्वच विभागांमध्ये वाढलेला भ्रष्टाचार असे अनेकविध प्रश्न सोडविण्यात शासनाला आलेले अपयश" म.वि.स. नियम २९२ प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(७) श्री.कैलास घाडगे (८) श्री.वरूण सरदेसाई

(९) श्री.अभिजीत पाटील (१०) श्री.प्रवीण स्वामी (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक रात्री १२ वाजून ०४ मिनिटांनी बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ रोजीच्या सकाळी ०९.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.

बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६

विधानसभेची विशेष बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.४५ वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. समाधान अवताडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्री. संग्राम जगताप, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री.विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"अहिल्यानगर जिल्ह्यातील पारधी समाजसेविका सुमन काळे यांचा माहे मे, २००७ मध्ये पोलीस कोठडीत संशयास्पद मृत्यू झालेला असणे, प्रारंभी सदर प्रकरणात आत्महत्येची नोंद केलेली असणे, परंतु उपविभागीय दंडाधिकारी यांच्या चौकशीत सुमन काळे यांना पोलीसांनी अमानूष मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने दुर्देवी मृत्यू झाल्याचे स्पष्ट होणे, सदर प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांच्याकडे वर्ग करूनही आजपर्यंत सदर विभागाने कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसणे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर काही आरोपींवर गुन्हे दाखल झालेले असणे, मात्र सदर आरोपींवर खुनाऐवजी आत्महत्येस प्रवृत्त केल्याची कलमे लावलेली असणे, तसेच सदर प्रकरणातील एका खाजगी डॉक्टराला मा. उच्च न्यायालयाने दिलासा दिल्यानंतर, संबंधित विभागाने या विरूध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलेले नसणे, आज रोजी सदर प्रकरण मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे प्रलंबित असणे, सदर प्रकरणाच्या तपासाबाबत अनुसूचित जाती-जमाती आयोगानेही नाराजी व्यक्त केलेली असणे, या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणात तात्काळ स्वतंत्र विशेष तपास पथक (SIT) स्थापन करून प्रकरण सीआयडीकडून SIT कडे वर्ग करणे, ॲट्रॉसिटी कायद्यान्वये योग्य कलमवाढ करणे, तसेच मयत सुमन काळे व त्यांचे कुंटुंबीय यांना न्याय देण्यासाठी प्रकरणातील न्यायप्रक्रिया गतिमान करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी (श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, डॉ. विश्वजित कदम, श्री. नाना पटोले, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. नितिन राऊत, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. अमिन पटेल, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले

"मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात कामाठीपुरा परिसर असणे, या परिसरात मध्यमवर्गीय बहुभाषिक लोकांची वस्ती असणे, या विभागात अनेक जुन्या व जीर्ण चाळी असणे, त्यामुळे या विभागातील

इमारतींचा लवकरात लवकर पुनर्विकास व्हावा अशी स्थानिकांची मागणी असणे, कामाठीपुरा विकास समितीच्या माध्यमातून पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनास सादर होणे, त्यावर वास्तुविशारदाची नियुक्ती करीत निविदा काढण्यात येणे, कामाठीपुरा पुनर्विकास प्रक्रियेस गती मिळणे आवश्यक असणे, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या (पीएमजीपी) बहुतांश इमारती या उमरखाडी, कामाठीपुरा विभागात असणे, छताचा भाग कोसळणे, पाणी गळती, घरांच्या भिंतीची पडझड होणे यासारख्या प्रकारांमुळे येथील रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन राहणे, या इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पाला गती मिळावी याकरीता अनेक बैठका शासनस्तरावर होणे, परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, डोंगरी, भेंडीबाजार पायधुनी, भुलेश्वर, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, यामुळे म्हाडाने येथील इमारतींचे सर्वेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज निर्माण झालेली असणे, परंतु या सर्वेक्षणासाठी म्हाडाकडे कर्मचारी वर्गाचा तुटवडा असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरत असलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

गृह निर्माण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधले,—

"कुर्ला नेहरू नगर म्हाडा वसाहतीमध्ये १९ इमारती पोलीस वसाहत असणे, या १९ इमारती जीर्ण झालेल्या असून यांचा पुनर्विकास होणे अत्यंत आवश्यक असणे, या इमारतींचा पुनर्विकास म्हाडा प्राधिकरणामार्फत करून यातून नव्याने उपलब्ध होणाऱ्या सदनिकांमध्ये या ठिकाणी वर्षानुवर्ष राहत असलेले पोलीस बांधव यांना हक्काचं घर मिळावे या दृष्टीने माफक दरात घर उपलब्ध करावे अशी पोलिस पत्नींची मागणी असणे, या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या बैठकीत मुंबईतील म्हाडा अभिनयासात असलेल्या १७ पोलीस वसाहतींचा एकत्रित पुनर्विकास करून प्रस्ताव सादर करावा असे निर्देश देणे, परंतु सदर प्रस्ताव अद्याप प्रलंबित असणे, तसेच दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णयाद्वारे मुंबई पोलीस दलातील शासकीय निवासस्थानात रहात असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना मालकी स्वरूपाची घरे देता येतील काय याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी समिती गठन करणे, या समितीची बैठक दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी होणे, सदर बाबींमध्ये

अद्याप कोणताही निर्णय न झाल्याने विभागातील पोलीस पत्नी यांनी याबाबत सातत्याने मागणी करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

गृह निर्माण राज्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री.राजेश बकाने, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथील हिंगणघाट फैल परिसरातील जुना सर्व्हे क्र. ३६९, क्षेत्रफळ ११.२५ एकर ही जमीन शासकीय उपलब्ध नोंदीनुसार पूर्वीपासून परावर्तित जमीन म्हणून नोंद असणे, दशकापूर्वी मान्यताप्राप्त ले-आऊट विविध शासकीय अभिलेखांवर नोंद असणे, या परिसरात सुमारे ४०० कुटुंबे मागील ८० ते १०० वर्षांपासून वास्तव्यास असणे, संबंधित नागरिकांकडून आजपर्यंत नियमितपणे नगरपरिषदेकडे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आलेला असणे, विक्रीपत्र, दानपत्र व इतर व्यवहार उपनिबंधक कार्यालयामार्फत सुरळीतपणे नोंदविण्यात येत असणे, असे सर्व कायदेशीर व्यवहार सुरू असताना सन २०१३ मध्ये जिल्हाधिकारी, वर्धा यांनी सदर जमिनीवरील व्यवहारांवर स्थगिती देणारे पत्र निर्गमित करणे, परिणामी नगरपरिषदेकडून अनेक दशकांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना अतिक्रमणकर्ता घोषित करणे, त्यांच्या मालकी हक्कांवर व निवाऱ्यावर अनिश्चितता निर्माण होणे, स्थावर मालमत्तेची खरेदी-विक्री पूर्णपणे ठप्प होणे, बँक कर्ज, बांधकाम परवाने व वारस नोंदी प्रलंबित राहणे, नागरिकांमध्ये भीती व असंतोष पसरलेला असणे, सदर स्थगिती हटविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या निवेदनानुसार मा. महसूल मंत्री यांनी दिनांक ७ डिसेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी, वर्धा यांना निर्देश देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न होणे, यामुळे नागरिकांवर गंभीर अन्याय होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"जुहू येथील प्लॉट क्र.३५-सी/१, सी.टी.एस. क्र. १०७०,१०७१/१ व १०७१/२ या मिळकतीचे सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ मुंबई-३१, यांच्या कार्यालयात त्यांच्या संगनमताने

दिनांक १० जून, २०२५ रोजी दस्त क्र. मुं.३१/१४५७३/२०२५ नोंदविण्यात आलेली असणे, दस्तातील मिळकत मूळतः नसरवानजी दोराबजी सिरवाई व मेहरबानू नसरवानजी सिरवाई (दोघेही मयत) यांच्या नावे असणे, सदर मिळकत मयत ॲडमिनीस्ट्रेटर दोराब फुरदुनजी सिरवाई यांच्या पश्चात बनावट कुलमुखत्यार पत्राव्दारे श्री. विद्याधर सिताराम राव यांनी त्यांच्या स्वतःच्याच नावावर केलेली असणे, सदर कुलमुखत्यार पत्र बनावट व निरस्त असल्याचे निदर्शनास आलेले असणे, याबाबत चेंबूर, पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार झालेली असणे, सह दुय्यम निबंधक वर्ग-२ मुंबई-३१, यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे चुकीचे मुद्रांक शुल्क आकारून शासनाचे केलेले नुकसान, अशा गैरप्रकारे नोंदविलेल्या अनेक प्रकरणात शासनाचे शेकडो कोटींचे मुद्रांक शुल्काचे झालेले नुकसान, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, मुंबई-३१, यांच्या विरूध्द भ्रष्टाचाराचे असलेले अनेक आरोप, यामुळे पुण्यातील मुंढवा मुद्रांक शुल्क घोटाळ्याच्या धरतीवर सह दुय्यम निबंधक वर्ग-२, मुंबई-३१ व त्यांचे सहकारी यांच्या चौकशीची आवश्यकता, त्यांनी त्यांच्या काळात नोंदविलेल्या सर्व दस्तांची चौकशी करून शासनाच्या शेकडो कोटी रूपयांच्या महसूलाची वसूली होण्याची गरज, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. नितीन पवार, सुनिल प्रभू, विजय वडेट्टीवार, ॲड. राहूल ढिकले, वि.स.स. यांची लक्षवेधी सूचना–

श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. यांनी पुढील तडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,–

"प्रधानमंत्री आवास योजना ही महत्वकांक्षी योजना सुरु असणे, १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या महानगरांमध्ये राज्य शासनाकडून दिनांक ०८/११/२०१३ पासून ही योजना सुरु असणे, नाशिक शहरात सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीरित्या होत नसणे, काही बांधकाम व्यवसायिक यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून खोटे मोजणी नकाशे व सातबारा उतारे तयार करणे, भूखंडाचे ४००० चौरस मीटर पेक्षा कमी तुकडे करून गोरगरीब नागरिकांना योजनेपासून दूर ठेवणे, दिनांक २९/०३/२०२२ रोजी मा. सभापती, विधानपरिषद, यांनी म्हाडा व नाशिक मनपा या विभागांची संयुक्त बैठक घेऊन म्हाडा कार्यालयाची NOC घेण्याबाबत आदेश दिलेले असणे, मा.सभापती व मा.उपमुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशांच्या विपरीत दिनांक २०/०१/२०२५ रोजी मनपा आयुक्त यांनी निर्देशांचे पालन

करण्याची आवश्यकता नसल्याच्या आशयाचे परिपत्रक जारी करणे, महसूल विभागाच्या पुढाकाराने अनेक गरीब व गरजू नागरिकांना घरकुल मिळण्यात अडचणी निर्माण करणे, गोरगरिबांच्या घरकुलांमध्ये महसूल व नाशिक महानगरपालिका अधिकारी यांच्या संगनमताने सुरू असलेला भ्रष्टाचार, शासनाचे सदर बाबीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. बाबुराव कदम-कोहळीकर, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"चिचोरडी रोड, हिमायतनगर, जि.नांदेड येथे HVDS १ × १६ KVA रोहित्र अनधिकृतरित्या व महावितरण कंपनीच्या नियमांविरुद्ध बसविण्यात आलेले असणे, याबाबत वडगाव यांनी वरिष्ठांकडे वारंवार तक्रारी करणे, तथापि कोणतीच कार्यवाही न केल्याने दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ पासून महावितरणच्या उपविभाग कार्यालय, हिमायतनगर समोर आमरण उपोषण सुरू असणे, उपोषणकर्त्यांकडून देखभाल-दुरुस्ती, नवीन विद्युत खांब उभारणी, विद्युत लाईन स्थलांतर इत्यादी विविध मागण्या करण्यात येणे, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजी भोकर विभाग कार्यालयातील अधिकारी व संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासन देणे, तद्नंतर अनधिकृत HVDS १ x १६ KVA रोहित्र व संबंधित लाईनचे कंडक्टर काढून टाकणे, तसेच सदर प्रकरणी सक्षम समितीमार्फत सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या लागू असलेल्या सेवा नियमांनुसार कठोर शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन देणे, तथापि अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई न होणे, आमरण उपोषण अद्यापही सुरूच असणे, शासनाने सदर प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून दोषी असलेल्यांवर त्वरित कारवाई करण्याची तसेच उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.*

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री.श्याम खोडे, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"वाशिम जिल्ह्यातील सन २०२४-२५ व २०२६ मध्ये सोयाबीन, तूर, कापूस तसेच शेती मालाचे गोदाम, गुरांचे गोठे इत्यादींना आग लागण्याच्या अनेक घटना घडलेल्या असणे, सदर घटनांचे पंचनामे होऊन आर्थिक सहाय्य मिळण्याबाबतचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून शासनाकडे पाठविलेले असणे, सदर प्रकरणे आपत्ती व्यवस्थापनामध्ये समाविष्ट नसल्यामुळे यावर अनेक महिने होऊनसुद्धा या प्रकरणाबाबत कुठलीही कार्यवाही न होणे, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई ही जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरच होऊन त्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याबाबतची मागणी शेतकरी वर्गातून वारंवार होणे, परंतु यावर शासनाने कुठल्याही प्रकारची कार्यवाही न करणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्या बाबतची शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मदत व पुनर्वसन राज्यमंत्र्यांनी (श्री.मकरंद जाधव-पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. किशोर पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी (ग्रीडला जोडलेली परस्पर-सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा) (दुसरी सुधारणा) काढण्यात येणे, यामध्ये छपरावरील ऊर्जा निर्मिती सुलभ करणे, प्रक्रीया जलद करणे आणि हरित ऊर्जा प्रसाराला चालना देणे हा मुख्य उद्देश असणे, तसेच १० केव्ही पर्यंतच्या निवासी छप्परावरील ऊर्जा निर्मिती अर्जांना पहिले प्राधान्य देण्याची तरतूद करण्यात आली असून अर्ज पूर्ण असल्यास वितरण कंपनीने तांत्रिक अडचणी न पाहता तो स्वीकारावा अशी स्पष्टपणे तरतूद करण्यात येणे, यावरुन असे स्पष्ट होते की, सौर ऊर्जा निर्मिती व त्याचा वापर राज्यात जास्तीत जास्त होण्याकरीता विशेष प्रयत्न करण्याच्या हेतूने हा अध्यादेश काढण्यात येणे, देशातच नव्हेतर राज्यातही मोठया प्रमाणावर वायूप्रदूषण रोखण्याकरिता इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार होत असणे, गॅस वा चुलीवरील स्वयंपाकाकडून इंडक्शन कुकिंगकडे शहरासह ग्रामीण भागातही वापर होत असणे, शासकीय-खाजगी कार्यालयात वातानुकूलित यंत्रणेचा होत असलेला वापर, वर्क फ्रॉम होममुळे घरगुती वीज वापराचा लोड वाढत असणे, असे असतांनाही महावितरण कंपनीकडून मागील १२ महिन्यांच्या वीज वापरावर आधारित सौर क्षमतेवर मर्यादा लावली जात असणे,

अशा परिस्थितीत सौर प्रणालीचे आकारमान भूतकाळातील वापरावर आधारित ठरविणे म्हणजे भविष्यातील ऊर्जा गरजा नाकारण्यासारखे असणे, परिणामी राज्यात भविष्यात वीजेचा भासणारा तुटवडा पाहता शासनाने तातडीने महावितरण कंपनीला दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या अधिसूचनेची ठोसपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी (श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) श्री. राघवेंद्र पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"मनमाड ते इंदौर या ३५० कि.मी. रेल्वे मार्गाचे भुसंपादन होणे, पहिला टप्प्यात बोरविहीर ते नरडाणा या ५० कि.मी. अंतराचे भुसंपादन झालेले असणे, या ५० कि.मी. अंतरात धुळे व शिंदखेडा तालुक्यात सुमारे १ हजार शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत होणे, सदर शेतकऱ्यांना अतिशय कमी भावाने म्हणजे ४ लाख ते ८ लाख रुपये हेक्टरी या दराने मोबदला देणे, या आधी धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग, नागपुर-सुरत राष्ट्रीय महामार्ग व धुळे-सोलापुर राष्ट्रीय महामार्ग ह्या तीनही महामार्गांच्या भुसंपादन मोबदला ५६०० ते ९००० रुपये चौ.मि. ने दिलेला असणे, रेल्वेत भूसंपादीत शेतकऱ्यांना सदर मार्ग १५ ते २० फुट उंच असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, शेताचे दोन भाग होणार असुन मध्य भागातून रेल्वेमार्ग जात असल्याने शेतकऱ्यांनी उर्वरीत जमीन कशी कसावी यामुळेही शेतकऱ्यांच्या मनात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होणे, राष्ट्रीय महामार्गाप्रमाणे रेल्वे भूसंपादित शेतकऱ्यांना चौरस मिटर प्रमाणेच मोबदला देणे, सर्व बाधित शेतकऱ्यांना लवकर व योग्य मोबदला मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांची लवाद अधिकारी म्हणून नेमणूक होणे, लवादात सुमारे ७०० प्रकरणे दाखल असून संदर्भित प्राधिकारी स्तरावर दोन वर्षापासून प्रकरणे प्रलंबित असणे, सदर बहुआयामी प्रकल्पास शेतकऱ्यांचा विरोध नसणे, परंतु भूसंपादित झालेल्या शेतकऱ्यांवर अन्याय होणे, पुढील टप्प्यातील शेतकरी आधीच्या शेतकऱ्यांना न्याय दिल्याशिवाय पुढील मनमाड ते इंदोर प्रकल्पात जमीन संपादनास विरोध कायम होऊ शकणे व आधी संपादीत जमीनीचा लवाद अधिकारी जिल्हाधिकारी यांनी चौरस मिटरने मोबदला जाहीर करणे व पुढील टप्यातील जमीन संपादीत करणे, प्रकल्पात जमिनी संपादित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना रेल्वेत व शासकीय नोकरी देण्याची आवश्यकता, बागायती क्षेत्र असतांना सरसकट जिरायती मोबदला दिला अशा शेतकऱ्यांना बागायती दराने मोबदला देणे, सन २०१३ चा कायदा असल्यावर २००८ च्या

कायद्यानुसार शेतकऱ्यांना मोबदला देणे, सदरील शेतकरी बांधवांना न्याय देण्यासाठी राष्ट्रीय महामार्गातील संपादित चौरस मीटर जमिनीप्रमाणे मोबदला देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.समाधान आवताडे यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

१. (१) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठरा तारांकित प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, "दिनांक १३ मार्च, २०२६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील श्री.सुमित वानखेडे, वि.स.स यांचा "मौजा टाकरखेडा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना व्याजात सवलत देण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २९७६७ चे सुधारित उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवले.

सचिव – १ यांनी अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३४ ते ३६ सभागृहाच्या पटलावर ठेवली.

महसूल मंत्र्यांनी, "मौजे मुंडवा, ता. जि. पुणे येथील शेत सर्वे नं. ८८ मधील जमीन खरेदीच्या दस्तामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीचा अहवाल." इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने नियम ४७ अन्वये निवेदन केले.

२. (१) मुख्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.भास्कर जाधव (२) श्री.जितेंद्र आव्हाड

(३) श्री.अस्लम शेख (४) श्री.आदित्य ठाकरे

विधेयकावरील चर्चेस मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

३. (१) मुख्यमंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले,—

(क) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) "मार्च २०२३ ला संपलेल्या कालावधीचा अहवाल" (२) "मार्च २०२३ ला संपलेल्या कालावधीचा राज्य महसुलावरील अहवाल" व (३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र शासन यावरील अहवाल.

(ख) लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) सन २०२६-२०२७" हे प्रकाशन.

(२) नगरविकास राज्यमंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले,—

(क) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आकुर्डी, पुणे यांचा सन २०१३-२०१४ ते सन २०१९-२०२० या वर्षांचा अनुक्रमे बेचाळीस, त्रेचाळीस, चव्वेचाळीस, पंचेचाळीस, शेहेचाळीस, सत्तेचाळीस व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल.

(ख) नागपूर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी अधिकार नसताना स्मार्ट सिटी अंतर्गत केलेला आर्थिक गैरव्यवहार" या विषयावरील श्री. कृष्णा खोपडे व इतर, वि.स.स. यांच्या दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार लक्षवेधी सूचनेची अधिक माहिती.

(ग) "नगरपंचायत, केज, जि.बीड येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत ३.६२ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत" या विषयावरील श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांच्या दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार लक्षवेधी सूचनेची अधिक माहिती.

(३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी, म.वि.स. नियम ९४ अन्वये "उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याचे शासनाचे धोरण असताना त्याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत." या विषयावरील श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांच्या दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी उत्तरीत झालेल्या अर्धा तास चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अर्धा तास चर्चेची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

(४) संसदीय कार्य मंत्र्यांनी (श्री.दत्तात्रय भरणे, कृषी मंत्री यांच्याकरिता), सन २०२४ च्या दुसऱ्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ रोजी सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना तत्कालीन कृषी मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

४. सचिव - १ यांनी विधानपरिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केलेली १४ वि.स. विधेयके आणि तसेच विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशींशिवाय परत केलेली ८ वि.स. विधेयकांची नावे सभागृहास वाचून दाखविली.

५. श्री.नारायण कुचे, समिती प्रमुख यांनी अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर केला.

६. श्री.संतोष दानवे, समिती प्रमुख यांनी पंचायती राज समितीचा पहिला, दुसरा, तिसरा व चौथा अहवाल सभागृहास सादर केला.

७. श्री.संजय उपाध्याय, समिती सदस्य यांनी पुढील प्रस्ताव मांडला—

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) श्री. जयकुमार गोरे, मा. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी श्री. रोहित पवार, वि.स.स. यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

(२) श्री. जयकुमार गोरे, मा. ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी "लय भारी" युटयुब वाहिनीचे संपादक / चालक श्री. तात्यासो ऊर्फ तुषार आबाजी खरात यांचेविरुध्द दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३ (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

(ड) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तु झाला.

विधेयकावरील चर्चेत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी भाग घेतला –

विधेयकावरील चर्चेस कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

नगरविकास राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मूल्यविषयक नियमांचे पुनर्अधिनियमन व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६ मांडले.

(चर्चा अपूर्ण)

श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, "एखादे विधेयक सभागृहात आणून ते मांडायचे आणि त्यानंतर लगेच ते मंजूर करण्यात येणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात माननीय अध्यक्षांनी सविस्तर माहिती दिली.

नगरविकास राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मूल्यविषयक नियमांचे पुनर्अधिनियमन व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(चर्चा अपूर्ण)

८. नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील एकत्रित चर्चेस पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री, परिवहन मंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री, शालेय शिक्षण मंत्री, उद्योग मंत्री, पर्यटन मंत्री, सांस्कृतिक कार्य मंत्री, पर्यटन मंत्री यांनी उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावांवर विचार केला असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सहकार मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२६ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

९. श्री.आदित्य ठाकरे व इतर वि.स.स. यांचा, "राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये वाढलेले प्रदूषण, पर्यावरणाचा झालेला ऱ्हास, महिलांवरील वाढते अत्याचार, शालेय शिक्षण, महसूल, सार्वजनिक बांधकाम विभाग इतर सर्वच विभागांमध्ये वाढलेला भ्रष्टाचार असे अनेकविध प्रश्न सोडविण्यात शासनाला आलेले अपयश" इ.बाबत म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरु)

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

(१) श्री.जितेंद्र आव्हाड
(२) श्री.नानाभाऊ पटोले
(३) श्री.नितीन देशमुख
(४) श्री.जयंत पाटील
(५) श्री.चरणसिंग ठाकूर
(६) डॉ.नितीन राऊत
(७) श्री.हारून खान
(८) श्री.अबु आझमी
(९) श्री.राजू तोडसाम
(१०) श्री.मुफ्ती मोहम्मद खालिक
(११) श्री.गजानन लवटे
(१२) श्री.विकास ठाकरे
(१३) श्री.सिद्धार्थ खरात
(१४) श्री.देवराव भोंगळे
(१५) डॉ.ज्योती गायकवाड
(१६) श्री.अनंत (बाळा) नर
(१७) श्री.राजकुमार बडोले

प्रस्तावावरील चर्चेस मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी उत्तरादाखल भाषण केले.

सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मूल्यविषयक नियमांचे पुनर्अधिनियमन व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६ – चर्चा पुढे सुरू

नगरविकास राज्यमंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मूल्यविषयक नियमांचे पुनर्अधिनियमन व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव पुन्हा मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

सभागृहातील गोंधळसदृश्य परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून ३७ मिनिटांनी, ५ मिनिटांकरिता स्थगित झाली.

सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून ४२ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मूल्यविषयक नियमांचे पुनर्अधिनियमन व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६ – चर्चा पुढे सुरू

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) सहकार मंत्र्यांनी, सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२६ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत श्री.नानाभाऊ पटोल व श्री.जयंत पाटील, वि.स.स. यांनी भाग घेतला.

विधेयकावरील चर्चेस मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी, "२ हजार ड्रोनच्या सहाय्याने राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडविणाऱ्या भव्य ड्रोन शो चे आयोजन." इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने नियम ४७ अन्वये निवेदन केले.

१०. (१) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले ,—

"मानवी स्वास्थ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असणे, अश्या स्थितीत समाजाला स्वास्थपूर्ण व समृध्द बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नसणे, वैश्विक स्तरावर देखील

उत्तम शारिरीक स्वास्थ्याचा पर्याय म्हणून योगास मान्यता मिळणे, योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ वृत्तीने निरंतर कार्य करीत असणे, गुजरात, हरीयाणा, राजस्थान या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र योग शिक्षक संघ या संघटनेने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा या प्रमुख मागणीसह इतर काही महत्वपूर्ण मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, सदर मागण्यांची तातडीने पूर्तता होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

(२) श्री. महेश लांडगे, वि.स.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अर्धा-तास चर्चा उपस्थित केली व भाषण केले,—

"पुणे मेट्रोपोलिटन रिजन हा राज्याच्या आर्थिक वाढीचा प्रमुख केंद्रबिंदू असणे, आयटी उद्योग, ऑटोमोबाईल क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक गुंतवणुकीमुळे पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले असणे, Pune Metropolitan Region Development Authority (PMRDA) कार्यक्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना मूलभूत पायाभूत सुविधांची उभारणी मात्र त्या वेगाने झालेली नसणे, प्रमुख मार्गावर तीव्र वाहतूक कोंडी, इंद्रायणी, पवना, मुळा नदीचे वाढते प्रदूषण, हवा व पाणी प्रदूषणात वाढ, अनियोजित बांधकामे व विकासकामे, औद्योगिक क्षेत्रात मूलभूत सुविधांचा अभाव, वाढत्या मागणीमुळे वीज वितरण यंत्रणेवर ताण, Maha Metro मार्फत पुणे मेट्रो सुरू असून संपूर्ण PMR क्षेत्र अद्याप विस्तारीत झालेले नसणे, हिंजवडी, चाकण, तळेगाव, वाघोली, लोणीकंद या भागांसाठी मेट्रो विस्ताराचा कालबद्ध कार्यक्रम, रिंगरोड व मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब प्रकल्पांची सद्यस्थिती काय असा प्रश्न पडणे, PMPML सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, इंद्रायणी, पवना, मुळा या नद्यांचा उगम ते संगम असा नदीसुधार कार्यक्रम हाती घेऊन सर्वच नद्याचे जतन आणि संवर्धन करण्याची आवश्यकता, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढविण्याची तसेच MIDC क्षेत्रातील औद्योगिक सांडपाणी नियंत्रण करण्याची आवश्यकता, वाढत्या वाहनसंख्येमुळे हवा प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने धोरण आखण्याची आवश्यकता, ग्रामीण भागात वाढत्या शहरीकरणासाठी स्वतंत्र नियोजन यंत्रणा उभारणे, बेकायदेशीर बांधकामांवर गेल्या तीन वर्षांत कोणत्या प्रकारची कारवाई केली याचा अहवाल सादर करणे, नवीन औद्योगिक क्लस्टर नियोजन करणे, नवीन उपकेंद्रे उभारणीचा आराखडा तयार करणे, सौर व पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष

योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नगर विकास राज्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

आता लक्षवेधी सूचना क्रमांक २ चर्चेला घेण्यात येईल तसेच उर्वरित सर्व लक्षवेधी सूचनांचे लेखी उत्तरे देण्यात येतील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. चंद्रकांत निंबाजी पाटील, वि.स.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले,—

"तापी पूर्णा साखर कारखाना मर्यादित, मानपूर (रजि. क्र. १५४२१, दि. १०.०५.२००१) या संस्थेच्या नावाखाली भुसावळ तालुक्यातील मानपूर येथील गरीब शेतकऱ्यांकडून सुमारे ३५ हेक्टर जमीन कारखाना उभारण्याच्या उद्देशाने घेण्यात आली असणे, मात्र २५ ते २८ वर्षे उलटूनही या जमिनीवर कोणताही साखर कारखाना उभारण्यात आलेला नसणे, कारखान्याच्या नावाखाली घेतलेली ही ३५ हेक्टर जमीन (गट क्र. १६, १७, १८, १९, ११९, १२२, १२३ इ.) कोणत्याही शासकीय पूर्व परवानगीशिवाय आणि नियमांचे उल्लंघन करून एकाच राजकीय कुटुंबातील सदस्यांच्या नावे खरेदी करण्यात आली असणे, यात 'महार वतन' जमिनींचाही समावेश असून त्यांची विल्हेवाट लावताना कायदेशीर प्रक्रिया डावलण्यात आलेली असणे, जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिनांक १०.२.२०२६ रोजी अपर मुख्य सचिव (महसूल) यांना सादर केलेल्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की, गट क्र. १२२ सह अन्य जमिनींच्या खरेदी व्यवहारात गंभीर त्रुटी असून शासनाची परवानगी न घेता या जमिनी स्वतःच्या कुटूंबाच्या नावे केल्या गेल्या असणे, २५ वर्षे कारखाना न उभारता शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या या संचालक मंडळावर सरकारने फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाची दखल घेऊन सदर ३५ हेक्टर जमीन पुन्हा मूळ शेतकरी किंवा शासनाच्या नावे करण्यासाठी शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती पाहता शासनाने याची एसआयटी (विशेष चौकशी पथक) मार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

११. सचिव-१ यांनी सभागृहाच्या अनुमतीने म.वि.स.नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनांची जोडपत्रे अमुद्रीत स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवले.

म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनांची जोडपत्रे अमुद्रीत स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली असून सत्र समाप्तीनंतर सन्माननीय सदस्यांना लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र वितरित करण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

अशासकीय कामकाजाबाबत –

आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेले उर्वरित अशासकीय कामकाज पुढील अधिवेशनात घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

डीडीएसआर ग्रुपने लोकांची फसवणूक केल्याबाबत –

सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांना विशेष बाब म्हणून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्यात येत आहे असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

श्री. गोपिचंद पडळकर, वि.स.स. यांनी, "डीडीएसआर ग्रुप तयार करून त्या माध्यमातून ग्रामीण भागातील ४ ते ५ हजार लोकांची फसवणूक करण्यात आली असणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री.गोपिचंद पडळकर यांनी सभागृहात मांडलेली माहिती गंभीर असल्याचे दिसून येत असल्याने त्याची दखल घेऊन शासनाने योग्य ती कारवाई करावी असे निर्देश माननीय अध्यक्षांनी दिले.

श्री. शिवाजी पाटील, वि.स.स यांनी, "चंदगड विधानसभा मतदारसंघात उप जिल्हा कार्यालय मंजूर करण्यात यावे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. मुरजीभाई पटेल, वि.स.स. यांच्या लक्षवेधी संदर्भात पुढील आठवड्यात दालनात बैठक लावून सदर विषयाला न्याय देण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

यासंदर्भात माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशांचे पुढील ७ दिवसात पालन करण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

१२. माननीय अध्यक्षांनी, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळातील कामकाजाचा आढावा सभागृहासमोर ठेवला.

१३. माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे अशी शिफारस माननीय राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे, असे घोषित केले.

१४. माननीय अध्यक्षांनी सत्र समाप्तीसंबंधीचा माननीय राज्यपालांचा पुढील प्रमाणे संदेश वाचून दाखविला,—

"मी विष्णूदव वर्मा महाराष्ट्राचे राज्यपाल भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी याद्वारे बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे. यानुसार विधानसभेचे अधिवेशन आता संस्थगित झाल्याचे मी जाहीर करतो."

यानंतर 'राष्ट्रगीत' म्हणण्यात आले.

सायंकाळी ७ वाजून ४७ मिनिटांनी सत्र संस्थगित झाले.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक २५ मार्च २०२६.

जितेंद्र भोळे,
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

विवरण क्रमांक - ८

महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८(१) अन्वये, मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी नामनिर्देशित केलेली सभाध्यक्षांची तालिका :—

(१) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(२) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(३) श्री. दिलीप लांडे, वि.स.स.

(४) श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स.

(५) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.

(६) श्री. राजू खरे, वि.स.स.

(७) श्री. अमित झनक, वि.स.स.

(८) श्री. समाधान आवताडे, वि.स.स.

विवरण क्रमांक - ९

विविध सतित्यांवर/संस्थांवर/मंडळांवर/विद्यापीठांवर सदस्यांची निवडणूक व नामनियुक्ती

निरंक

विवरण क्रमांक - १०

विविध समित्यांच्या बैठकी

अ.क्र.	समितीचे नाव	बैठकीचा वार व दिनांक	बैठकीत झालेले कामकाज
(१)	(२)	(३)	(४)
(१)	कामकाज सल्लागार समिती	मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२६	विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता, कक्ष क्रमांक ०४०, तळमजला, विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने सन २०२६ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासंबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करून पुढील निर्णय घेतले :— :: निर्णय :: (१) सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी ते बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ या कालावधीत विधान भवन, मुंबई येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले. (२) सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी फक्त शोक प्रस्ताव घेण्यात येईल. सदर प्रस्तावावर विविध पक्षांचे गट नेते व पक्षनिहाय जास्तीत जास्त ०३ सदस्यांना भावना व्यक्त करण्यास अनुमती देण्यात येईल.

अ.क्र.	समितीचे नाव	बैठकीचा वार व दिनांक	बैठकीत झालेले कामकाज
(१)	(२)	(३)	(४)
			(३) मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी, नियमित कामकाजासोबत राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे, राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव, अध्यादेश सभागृहाच्या.० पटलावर ठेवणे, पुरवणी मागण्या सादर करणे हे सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजीचे उर्वरीत कामकाज घेण्यात येईल. (४) मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी मांडल्यानंतर त्याच दिवशी मा.राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा घेण्यात येईल. (५) शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी "मराठी भाषा गौरव दिनाचे" औचित्य साधून मध्यवर्ती सभागृहात सकाळी १०.०० ते ११.४५ या कालावधीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता भरेल. (६) शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सभागृहाची बैठक घेण्यात येईल. (७) सोमवार, दिनांक ०२ मार्च, २०२६ रोजी सभागृहाची बैठक होणार नाही. (८) "जागतिक महिला दिनाचे" औचित्य साधून सोमवार, दिनांक ०९ मार्च, २०२६ रोजी सभागृहात प्रस्तावाद्वारे चर्चा घेण्यात येईल.

अ.क्र.	समितीचे नाव	बैठकीचा वार व दिनांक	बैठकीत झालेले कामकाज
(१)	(२)	(३)	(४)
			(९) शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२६ रोजी सभागृहाची बैठक होणार नाही. (१०) म.वि.स. नियम २९२/२९३ अन्वये, देण्यात येणाऱ्या प्रस्तावाच्या विषयात ०३ पेक्षा जास्त विषयांचा अंतर्भाव करण्यात येऊ नये. सदर प्रस्तावावर चर्चेला सुरूवात करणाऱ्या सदस्याचा वेळ सोडून उर्वरित वेळ हा सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षात अर्धा-अर्धा वाटून देण्यात यावा. (११) विधेयके व वित्तीय कामकाज ही विधानमंडळाची प्रमुख कार्ये असल्याने त्यांना प्राधान्य मिळण्याच्या दृष्टीने सदर कामकाजास "दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात" प्राधान्य देण्यात यावे. लक्षवेधी सूचना सायंकाळी ५.०० वाजता कामकाजास येतील अशा पध्दतीने दर्शविण्यात याव्यात तसेच औचित्याचे मुद्दे सायंकाळी ८.०० वाजता किंवा कामकाजाच्या शेवटी उपस्थित करता येतील अशा पध्दतीने कामकाजाचे नियोजन करावे. (१२) अर्धा तास चर्चा व अशासकीय कामकाज कामकाजात दर्शविण्यात आलेल्या दिवशीच पूर्ण करण्यात यावे. (१३) "कोकण विकास" संदर्भात म.वि.स.नियम १०१ अन्वये चर्चा घेण्यात यावी. (१४) कामकाजाचा आढावा घेवून आवश्यकता भासल्यास कामकाज सल्लागार समितीची बैठक घेण्यात यावी.

विवरण क्रमांक - ११

शासकीय विधेयकासंबंधी सांख्यिकीय माहिती सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरःस्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव	विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक	विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधिनियम क्रमांक	शेरा
१	सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८९ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५	कामगार	श्री.आकाश फुंडकर	८/१२/२०२५	८/१२/२०२५	---	---	---	---	---	---	--	म.वि.स. नियम १५४ अन्वये विधानसभेमध्ये दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी विधेयक मागे घेण्यात आले.
२	सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ - महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२५	विधी व न्याय	मुख्यमंत्री	१३/१२/२०२५	१३/१२/२०२५	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२६/०२/२०२६	०४/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ०४	
३	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२६	नगर-विकास	श्री.एकनाथ शिंदे (मा.उप मुख्यमंत्री)	२४/०२/२०२६	२४/०२/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२५/०२/२०२६	२७/०२/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ०६	

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरःस्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव	विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक	विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधिनियम क्रमांक	शेरा
४	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६	ग्रामवि-कास	श्री.जयकुमार गोरे	२४/०२/२०२६	२४/०२/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२५/०२/२०२६	४/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ५	
५	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६	वित्त	श्री.देवेंद्र फडणवीस (मा. मुख्यमंत्री)	२५/०२/२०२६	२५/०२/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२६/०२/२०२६	२८/०२/२०२६	---	---	---	सन २०२६ चा २	
६	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२६	वित्त	श्री.देवेंद्र फडणवीस (मा. मुख्यमंत्री)	२७/०२/२०२६	२७/०२/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२७/०२/२०२६	२७/०२/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ३	
७	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६	उच्च व तंत्र शिक्षण	श्री.चंद्रकांत (दादा) पाटील	४/०३/२०२६	४/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	५/०३/२०२६	९/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ७	

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरःस्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव	विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक	विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधिनियम क्रमांक	शेरा
८	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६	ऊर्जा	श्री.देवेंद्र फडणवीस (मा. मुख्यमंत्री)	४/०३/२०२६	४/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	५/०३/२०२६	१२/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १२	
९	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६	उच्च व तंत्र शिक्षण	श्री.चंद्रकांत (दादा) पाटील	५/०३/२०२६	५/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	९/०३/२०२६	११/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ९	
१०	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६	महसूल	श्री.चंद्रशेखर बावनकुळे	५/०३/२०२६	५/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	९/०३/२०२६	१८/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १३	
११	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६	विधी व न्याय	श्री.देवेंद्र फडणवीस (मा. मुख्यमंत्री)	११/०३/२०२६	११/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१२/०३/२०२६	१३/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ३३	

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरःस्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव	विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक	विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधिनियम क्रमांक	शेरा
१२	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६	ग्रामवि-कास	श्री.जयकुमार गोरे	१२/०३/२०२६	१२/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१७/०३/२०२६	२३/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १७	
१३	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६	शालेय शिक्षण	श्री.दादाजी भुसे	१२/०३/२०२६	१२/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१७/०३/२०२६	१८/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १४	
१४	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६	सामान्य प्रशासन	श्री.देवेंद्र फडणवीस (मा. मुख्यमंत्री)	१२/०३/२०२६	१२/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१७/०३/२०२६	२३/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा २२	
१५	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६	गृह	श्री.देवेंद्र फडणवीस (मा. मुख्यमंत्री)	१५/०३/२०२६	१५/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१७/०३/२०२६	२३/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ४७	

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरःस्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव	विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक	विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधिनियम क्रमांक	शेरा
१६	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२६	वित्त	श्री.देवेंद्र फडणवीस (मा. मुख्यमंत्री)	१६/०३/२०२६	१६/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१६/०३/२०२६	१६/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १८	
१७	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६	उच्च व तंत्र शिक्षण	श्री.चंद्रकांत (दादा) पाटील	१६/०३/२०२६	१६/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१७/०३/२०२६	१८/०३/२०२६	---	---	---	--	
१८	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६	परिवहन	श्री.प्रताप सरनाईक	१६/०३/२०२६	१६/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१७/०३/२०२६	१८/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १५	
१९	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६	वन	श्री.गणेश नाईक	१७/०३/२०२६	१७/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१८/०३/२०२६	२३/०३/२०२६	---	---	---	--	

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरःस्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव	विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक	विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधिनियम क्रमांक	शेरा
२०	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६	महसूल	श्री.चंद्रशेखर बावनकुळे	२३/०३/२०२६	२३/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२४/०३/२०२६	२५/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १८	
२१	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६	महसूल	श्री.चंद्रशेखर बावनकुळे	२४/०३/२०२६	२४/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२४/०३/२०२६	२५/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १९	
२२	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२६	सहकार	श्री.बाबासाहेब पाटील	२५/०३/२०२६	२५/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२५/०३/२०२६	२५/०३/२०२६	--	---	---	सन २०२६ चा २०	
२३	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६	गृह	श्री.देवेंद्र फडणवीस (मा. मुख्यमंत्री)	२५/०३/२०२६	२५/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२५/०३/२०२६	२५/०३/२०२६	---	---	---	--	

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरःस्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव	विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक	विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधिनियम क्रमांक	शेरा
२४	सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - मुंबई महानगरपालिका (भूतलक्षी प्रभावाने सुधारणा, भांडवली मुल्यविषयक नियमांचे पुनअर्धिनियमन व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२६	नगर-विकास	श्री.एकनाथ शिंदे (मा.उप मुख्यमंत्री)	२५/०३/२०२६	२५/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२५/०३/२०२६	२५/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा २१	
२५	सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६	उच्च व तंत्र शिक्षण	श्री.चंद्रकांत (दादा) पाटील	४/०३/२०२६	४/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	५/०३/२०२६	४/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १०	
२६	सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६	महसूल	श्री.चंद्रशेखर बावनकुळे	४/०३/२०२६	४/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	९/०३/२०२६	६/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा ११	
२७	सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६	महसूल	श्री.चंद्रशेखर बावनकुळे	४/०३/२०२६	४/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१८/०३/२०२६	१८/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा १६	

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरःस्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयकासंबंधी प्रस्ताव	विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक	विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधिनियम क्रमांक	शेरा
२८	सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६	कौशल्य, रोजगार, उद्योजगता व नाविन्यता	श्री.मंगलप्रभात लोढा	४/०३/२०२६	४/०३/२०२६	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	२५/०३/२०२६	२४/०३/२०२६	---	---	---	सन २०२६ चा २३	

विवरण क्रमांक - १२

संविधान सुधारणेच्या अनुसमर्थनाचा प्रस्ताव.

निरंक

***

विवरण क्रमांक - १३

पुरःस्थापित अशासकीय विधेयक (एकूण ७)

(१)	श्री. अमित साटम, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र भविष्य कल्याण विधेयक, २०२६.
(२)	श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०– महाराष्ट्र नगर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (सुधारणा) विधेयक, २०२६
(३)	श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११– महाराष्ट्र समान नागरी संहिता विधेयक, २०२६
(४)	श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३– महाराष्ट्र फसवणूकपूर्वक धर्मांतरण, दबाव व लव्ह जिहाद प्रतिबंध विधेयक, २०२६
(५)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४– महाराष्ट्र योग आयोग विधेयक, २०२६
(६)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १८– भारतीय न्याय संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६
(७)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९- मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

***

विवरण क्रमांक - १४

विचारात घेण्यात आलेले अशासकीय विधेयक
(बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी विचारार्थ घेण्यात आले)

श्री. अमित साटम, वि.स.स. यांचे सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – महाराष्ट्र भविष्य कल्याण विधेयक, २०२६.

***

टिप.—खालील सहा अशासकीय विधेयके बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात विचारार्थ दर्शविण्यात आली होती. तथापि, विचारार्थ असलेल्या विधेयकांवर सभागृहात चर्चा होऊ शकली नाही.

(१)	श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ – कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५
(२)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२५
(३)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८८ - किमान वेतन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५
(४)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे - सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिराती फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२५
(५)	श्री.अबू आजमी, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८३ - महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, धर्मगुरू व धर्मग्रंथ, धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध विधेयक, २०२५
(६)	श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १९ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

***

विवरण क्रमांक - १५

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) अन्वये व म.वि.स. नियम १५९ (२) अन्वये अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी प्रस्ताव

अ.क्र.	प्रभारी सदस्य	अध्यादेश	शेरा
(१)	**श्री. संजय मेश्राम, वि.स.स.**	सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १३ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५.	नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.
(२)	**श्री. संजय मेश्राम, वि.स.स.**	सन २०२५ चा अध्यादेश क्रमांक १४ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५.	नापसंतीचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

***

विवरण क्रमांक - १६

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५-२०२६ च्या पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान दिनांक २६ व २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी मागण्या मंजूर झाल्या.

पुरवणी मागण्यांवर चर्चेसाठी प्राथम्यक्रमात असलेले विभाग

अ.क्र	विभागाचे नाव	एकूण मागण्या	मागण्यावर चर्चा व मतदानाचा दिनांक
(अ)			दि. २६ फेब्रुवारी , २०२६
(१)	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	१	
(२)	नियोजन विभाग	२	
(३)	सार्वजनिक आरोग्य विभाग	१	
(४)	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग	१	दि. २७ फेब्रुवारी , २०२६
(५)	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	२	
(६)	दिव्यांग कल्याण विभाग	१	
	एकूण ...	**८**	

(ब) दिनांक २७ मार्च, २०२६ रोजी चर्चारोधानंतर मतास टाकण्यात आलेल्या पुरवणी खर्चाच्या मागण्या

अ.क्र	विभागांची नावे	एकूण मागण्या
(१)	सामान्य प्रशासन विभाग	१
(२)	गृह विभाग	३
(३)	महसूल व वन विभाग	७
(४)	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग	४
(५)	नगरविकास विभाग	१
(६)	वित्त विभाग	१
(७)	सार्वजनिक बांधकाम विभाग	३
(८)	जलसंपदा विभाग	२
(९)	विधि व न्याय विभाग	२
(१०)	उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग	४
(११)	ग्रामविकास विभाग	३
(१२)	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	२
(१३)	गृहनिर्माण विभाग	१
(१४)	वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग	२
(१५)	आदिवासी विकास विभाग	३
(१६)	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	३
(१७)	उच्च व तंत्र शिक्षण विभाग	२

अ.क्र	विभागांची नावे	एकूण मागण्या
(१८)	महिला व बालविकास विभाग	१
(१९)	कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग	१
(२०)	अल्पसंख्यांक विकास विभाग	१
(२१)	इतर मागास बुहजन कल्याण विभाग	२
(२२)	मृद व जलसंधारण विभाग	१
	एकूण मागण्या ...	**५०**
	एकूण : (अ) ८ + (ब) ५० = ५८	

***

विवरण क्रमांक - १७

सन २०२५-२०२६ चे पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील कपात सूचना

अ.क्र.	विभाग	एकूण	मान्य	अमान्य	चर्चा व मतदानाचा दिनांक
१)	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	७	५	२	दि. २६ मार्च, २०२६
२)	नियोजन विभाग	१२	१२	०	
३)	सार्वजनिक आरोग्य विभाग	२९	२३	६	
४)	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग	१७	८	९	दि. २७ मार्च, २०२६
५)	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	११	६	५	
६)	दिव्यांग कल्याण विभाग	६	०	६	
	एकूण ...	**८२**	**५४**	**२८**	

अ.क्र.	प्राथम्यक्रमात नसलेल्या विभागांची नावे	
(१)	सामान्य प्रशासन विभाग	सदर विभाग प्राथम्यक्रमात नसल्यामुळे त्या विभागांवर कपात सूचना स्विकारण्यात आल्या नाहीत.
(२)	गृह विभाग	
(३)	महसूल व वन विभाग	
(४)	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग	
(५)	नगरविकास विभाग	
(६)	वित्त विभाग	
(७)	सार्वजनिक बांधकाम विभाग	
(८)	जलसंपदा विभाग	
(९)	विधि व न्याय विभाग	
(१०)	उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग	
(११)	ग्रामविकास विभाग	
(१२)	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	
(१३)	गृहनिर्माण विभाग	
(१४)	वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग	
(१५)	आदिवासी विकास विभाग	
(१६)	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	
(१७)	उच्च व तंत्र शिक्षण विभाग	
(१८)	महिला व बालविकास विभाग	
(१९)	कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग	
(२०)	अल्पसंख्यांक विकास विभाग	
(२१)	इतर मागास बुहजन कल्याण विभाग	
(२२)	मृद व जलसंधारण विभाग	

***

विवरण क्रमांक - १८

सन २०२५ - २०२६ च्या पुरवणी विनियोजन विधेयक
(पुरवणी विनियोजन विधेयक दिनांक २७ मार्च, २०२६ रोजी संमत झाले)

पुरवणी विनियोजन विधेयकावरील मुद्दे

सदस्यांचे नांव	स्विकृत	अस्विकृत	एकूण
श्री.नाना पटोले, वि.स.स.	२	१	३
श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.	४	०	४
एकूण ...	**६**	**१**	**७**

***

विवरण क्रमांक - १९

सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पातील मागण्या

अ.क्र	विभागाचे नाव	एकूण मागण्या
(१)	सामान्य प्रशासन विभाग	१०
(२)	गृह विभाग	११
(३)	महसूल व वन विभाग	१०
(४)	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग	१०
(५)	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग	५
(६)	नगरविकास विभाग	६
(७)	वित्त विभाग	८
(८)	सार्वजनिक बांधकाम विभाग	९
(९)	जलसंपदा विभाग	५
(१०)	विधी व न्याय विभाग	५
(११)	उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग	११
(१२)	ग्रामविकास विभाग	६
(१३)	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	६
(१४)	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	७
(१५)	नियोजन विभाग	८४
(१६)	संसदीय कार्य विभाग	३
(१७)	गृहनिर्माण विभाग	३
(१८)	सार्वजनिक आरोग्य विभाग	४
(१९)	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग	५
(२०)	आदिवासी विकास विभाग	१०
(२१)	पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग	४

अ.क्र	विभागाचे नाव	एकूण मागण्या
(२२)	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	४
(२३)	उच्च व तंत्र शिक्षण विभाग	८
(२४)	महिला व बालविकास विभाग	४
(२५)	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	६
(२६)	कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता विभाग	२
(२७)	महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय	३
(२८)	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग	६
(२९)	अल्पसंख्यांक विकास विभाग	३
(३०)	मराठी भाषा विभाग	५
(३१)	इतर मागास बहुजन कल्याण विभाग	४
(३२)	मृद व जलसंधारण विभाग	५
(३३)	दिव्यांग कल्याण विभाग	४
	एकूण ...	**२७५**

***

विवरण क्रमांक -२०

सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पातील मागण्यांवरील कपात सूचना

अ.क्र.	विभाग	एकूण	मान्य	अमान्य	चर्चा व मतदानाचा दिनांक
(१)	सामान्य प्रशासन विभाग	९	२	७	दि. ११ मार्च, २०२६
(२)	महसूल व वन विभाग	५५	३२	२३	
(३)	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग	५१	२५	२६	
(४)	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग	१२	११	१	
(५)	नियोजन विभाग	२	२	०	
(६)	गृह विभाग	४२	२९	१३	दि. १२ मार्च, २०२६
(७)	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग	२६	१२	१४	
(८)	जलसंपदा विभाग	९	४	५	
(९)	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	१२	७	५	
(१०)	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	१५	१३	२	
(११)	मृद व जलसंधारण विभाग	५	४	१	
(१२)	नगरविकास विभाग	५२	४२	१०	दि. १३ मार्च, २०२६
(१३)	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	३	३	०	
(१४)	गृहनिर्माण विभाग	१५	१४	१	
(१५)	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग	१४	११	३	
(१६)	इतर मागास बहुजन कल्याण विभाग	१	१	०	

अ.क्र.	विभाग	एकूण	मान्य	अमान्य	चर्चा व मतदानाचा दिनांक
(१७)	सार्वजनिक बांधकाम विभाग	२८	२०	८	दि. १६ मार्च, २०२५
(१८)	उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग	१२	१०	२	
(१९)	ग्रामविकास विभाग	३५	३०	५	
(२०)	आदिवासी विकास विभाग	११	१०	१	
(२१)	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	१०	७	३	
(२२)	उच्च व तंत्र शिक्षण विभाग	५	४	१	
	एकूण ...	**४२४**	**२९३**	**१३१**	

***

अ.क्र.	प्राथम्यक्रमात नसलेल्या विभागांची नावे	
(१)	वित्त विभाग	सदर विभाग प्राथम्यक्रमात नसल्यामुळे त्या विभागांवर कपात सूचना स्विकारण्यात आल्या नाहीत.
(२)	विधी व न्याय विभाग	
(३)	संसदीय कार्य विभाग	
(४)	सार्वजनिक आरोग्य विभाग	
(५)	पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग	
(६)	महिला व बालविकास विभाग	
(७)	कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता विभाग	
(८)	महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय	
(९)	अल्पसंख्यांक विकास विभाग	
(१०)	मराठी भाषा विभाग	
(११)	दिव्यांग कल्याण विभाग	

विवरण क्रमांक - २१

सन २०२६ - २०२७ च्या अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयक (अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयक दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी संमत झाले)

अर्थसंकल्पीय विनियोजन विधेयकावरील मुद्दे

सदस्यांचे नांव	स्विकृत	अस्विकृत	एकूण
श्री. नाना पटोले, वि.स.स.	५	४	९
श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	४	०	४
श्री. जयंत पाटील, वि.स.स.	०	९	९
एकूण ...	**९**	**१३**	**२२**

***

विवरण क्रमांक - २२

अध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ११ अन्वये)

काही नाही

***

विवरण क्रमांक - २३

उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ११ अन्वये)

काही नाही

***

विवरण क्रमांक -२४

निंदाव्यंजक प्रस्ताव

(म.वि.स. नियम २३ अन्वये)

काही नाही

***

विवरण क्रमांक -२५

एखाद्या व्यक्तीविरुध्द करावयाच्या अभिकथनासंबंधी दिलेल्या सूचना

(म.वि.स. नियम ३५ अन्वये)

अ.क्र. (१)	सदस्यांचे नांव (२)	विषय (३)	शेरा (४)
१.	श्री. चंद्रकांत निंबाजी पाटील, वि.स.स.	तापी पूर्णा साखर कारखाना मर्यादित, मानपूर (रजि. क्र. १५४२१, दि. १०-५-२००१) या संस्थेच्या नावाखाली भुसावळ तालुक्यातील मानपूर येथील गरीब शेतकऱ्यांकडून सुमारे ३५ हेक्टर जमीन कारखाना उभारण्याच्या उद्देशाने घेण्यात आली असल्याबाबत या विषयावरील लक्षवेधी सूचनेच्या वेळी श्री. एकनाथ खडसे, वि.प.स. सदस्य यांच्यावर आरोप करण्याबाबत	सूचना अमान्य करण्यात आली

***

विवरण क्रमांक - २६

म.वि.स. नियम ४७ अन्वये मंत्र्यांनी केलेली निवेदने

अ.क्र.	मंत्री	विषय	सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१.	ॲड आशिष जयस्वाल, मा. वित्त राज्यमंत्री	राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यामध्ये ३ टक्के वाढ देणेबाबत	२५ फेब्रुवारी, २०२६
२.	श्री. जयकुमार रावल, मा. पणन मंत्री	कापूस खरेदीची मुदत वाढविण्याबाबत	२८ फेब्रुवारी, २०२६
३.	श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. महसूल मंत्री	छत्रपती शिवाजी महाराज शिबीर अभियान (टप्पा क्र.१) बाबत	२८ फेब्रुवारी, २०२६
४.	श्री. भरत गोगावले, मा. रोजगार हमी योजना मंत्री	महाराष्ट्र विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक २५२८२ च्या अनुषंगाने मनरेगा योजनेंतर्गत अकौशल निधी देणेबाबत	४ मार्च, २०२६
५.	श्री. प्रताप सरनाईक, मा. परिवहन मंत्री	राज्यात सुरू असलेला वाहतूकदारांचा संपाबाबत	६ मार्च, २०२६
६.	श्री. प्रताप सरनाईक, मा. परिवहन मंत्री	राज्यातील ऑटो रिक्षा परवान्यांच्या संख्येवर निर्बंध घालण्याबाबत	९ मार्च, २०२६
७.	श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. महसूल मंत्री	राज्यात एकूण ११ अपर जिल्हाधिकारी कार्यालयांची निर्मिती करणेबाबत	१० मार्च, २०२६
८.	श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. महसूल मंत्री	मोजणी प्रकरणांचा जलद, पारदर्शक व गुणवत्तापूर्वक निपटारा करण्यासाठी खाजगी परवानाधारक भूमापक/भूमापन अभिकरण यांची मोजणीकामी नियुक्ती करणेबाबत	१० मार्च, २०२६

अ.क्र.	मंत्री	विषय	सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
९.	श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. महसूल मंत्री	रब्बी हंगाम २०२५-२०२६ च्या ई-पीक पाहणी नोंदणीची मुदतवाढ देण्याबाबत	१७ मार्च, २०२६
१०.	श्री. छगन भुजबळ, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री	राज्यात गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत	१७ मार्च, २०२६
११.	श्री. हसन मुश्रीफ, मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री	बारामती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास दिनांक ३१ मे, २०२३ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात येणे तसेच दिनांक १३ मार्च, २०२६ रोजी बारामती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित रुग्णालयासही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत	१८ मार्च, २०२६
१२.	श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. महसूल मंत्री	मुंबई शहर जिल्ह्यामधील मिळकतीच्या फेरफेरासंबंधी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करणेबाबत	२३ मार्च, २०२६
१३.	मा. मुख्यमंत्री	भोंदू बाबा अशोककुमार एकनाथ खरात यांच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे	२४ मार्च, २०२६
१४.	मा. मुख्यमंत्री	ठाणे शहरातील मुंब्रा परिसरात झालेला गोळीबार	२४ मार्च, २०२६

अ.क्र.	मंत्री	विषय	सभागृहात निवेदन केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१५.	श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. महसूल मंत्री	मौजे मुंडवा, ता. जि. पुणे येथील शेत सर्वे नं. ८८ मधील जमीन खरेदीच्या दस्तामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीचा अहवाल	२५ मार्च, २०२६
१६.	ॲड.आशिष शेलार, मा. सांस्कृतिक कार्य मंत्री	२ हजार ड्रोनच्या सहाय्याने राज्याच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडविणाऱ्या भव्य ड्रोन शो चे आयोजन	२५ मार्च, २०२६

***

विवरण क्रमांक - २७

सदस्यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

(म.वि.स. नियम ४८ अन्वये)

निरंक

***

विवरण क्रमांक -२८

महाराष्ट्र विधानसभा

प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२६

(म.वि.स. नियम ५७ अन्वये)

एकूण प्राप्त झालेले प्रस्ताव	४
मान्य झालेले प्रस्ताव	--
अमान्य झालेले प्रस्ताव	४

अ.क्र.	दिनांक	सदस्यांची नावे	विषय	निर्णय
१.	२४/२/२०२६	श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स	"शेतकरीविरोधी शक्तिपीठ महामार्गाला तीव्र विरोध होत आहे. सरकारच्या रेखांकन बदलाच्या तकलादू भूमिकेवर प्रश्न निर्माण झाले आहेत. गरज नसलेला हा महामार्ग केवळ कंत्राटदारांची शेतकऱ्यांच्यावर थोपवाला जात असल्यामुळे स्थगन प्रस्ताव देत आहे...".	अमान्य
२.	२४/२/२०२६	डॉ. नितिन राऊत वि. स. स	"महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनी लिमिटेडमधील 'मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजना २.०' अंतर्गत सुमारे १०० कोटी रुपयांच्या बनावट बँक गॅरंटीद्वारे झालेल्या कथित आर्थिक घोटाळ्याबाबत..".	अमान्य

अ.क्र.	दिनांक	सदस्यांची नावे	विषय	निर्णय
३.	४/३/२०२६	श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स	"नागपूर जिल्ह्यातील काटोल राऊळगाव येथे दि. १ मार्च २०२६ रोजी एसबीएल एनर्जी लिमिटेड दारुगोळा निर्मिती करणाऱ्या बनवणाऱ्या कंपनीमध्ये भीषण स्फोटात १८ कामगारांचा झालेला मृत्यू व अनेक जण गंभीररित्या जखमी झाले आणि सुरक्षेच्या प्रश्नाबाबत.".	अमान्य
४.	२३/३/२०२६	श्री. विजय वडेट्टीवार वि. स. स	"भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्याकडून झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात अटक केल्याबाबत..".	अमान्य

विवरण क्रमांक -२९

अर्धा- तास चर्चा सर्वसाधारण

(म.वि.स. नियम ९४ अन्वये)

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
(१)	श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.	"मुंबईतील बोरिवली (पूर्व), संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन विभागाच्या जागेतील २५,१४४ आदिवासी व अतिक्रमित झोपडीधारकांचे पुनर्वसन करून अतिक्रमणे निष्कासित करण्याचे दि. ७-५-१९९७ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतानाही अद्याप याबाबत २८ वर्षे इतका कालावधी होऊनही २५,१४४ पैकी १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने सदरहू झोपडीधारकांचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत अवस्थेत असणे, एकूण पात्र झोपडीधारकांपैकी दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील सीएस क्र. २३९/१ मधील वन विभागाच्या जागेतील रु. ७०००/- शुल्क भरलेल्या पात्र झोपडीधारकांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात न येणे, शासनाचे वन विभागाचे व एसआरए प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पुनर्वसनासाठी निश्चित केलेली आरे वसाहतीतील वन क्षेत्राची ९० एकर जागा ही संवेदनशील क्षेत्र म्हणून शासनाने दि. ५-१२-२०१६ रोजी शासन निर्णय जारी केला असल्याची माहिती लपवून सदरहू ९० एकर जागेत झोपडीधारकांचे	२६ फेब्रुवारी, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		एसआरए योजने अंतर्गत पुनर्वसन करण्याचा धक्कादायक निर्णय घेणे, संजय गांधी उद्यान हे मुंबईचे ऑक्सीजन स्त्रोत असून ते अतिक्रमण मुक्त करण्यास २८ वर्षे कालावाधी पूर्ण होऊनही ठोस कृती न झाल्याने शासनावर गंभीर ताशेरे ओढून उद्यान अतिक्रमण मुक्त करण्याचे मा.उच्च न्यायालयाने दि. १४-१-२०२५ रोजी शासनास आदेश देणे, त्यानुसार शासनाने उर्वरित १३७८६ झोपडीधारकांचे पुनर्वसन करणेसाठी कृती आराखडा तयार करून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(२)	श्री. देवराव भोंगळे, वि.स.स.	नांदाफाटा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथे असलेल्या अल्ट्राटेक, माणिकगड सिमेंट कंपनीव्दारे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याची तक्रार नागरिकांनी शासनाकडे वारंवार करणे, सदर कंपनीच्या परिसरामध्ये प्रदूषण नियंत्रण करणाऱ्या मशिनरी अकार्यक्षम असणे, प्रदूषण कमी करण्याबाबत या भागातील नागरिकांनी आंदोलने, मोर्चे काढून आपली तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा कोणतीही कारवाई न होणे, कंपनीच्या व्यवस्थापक मंडळाने पर्यावरण प्रदूषण विषयक प्रकरणे पूर्णपणे दाबली जात असल्याची बाब समोर येणे, कंपनीच्या प्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांना क्षयरोग, कर्करोग, श्वसनाचे रोग, चर्मरोग सारखे आजार झाले असल्याची बाब समोर येणे, या कारखान्यातून निघणारे	२६ फेब्रुवारी, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		सांडपाणी उघड्या मार्गाव्दारे विविध नदी व नाल्यांमध्ये सोडले जात असल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या समोर येणे, सदर कारखान्याच्या प्रदूषणाला दरवर्षी प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभागाकडून प्रदूषण होत नसल्याची क्लिनचीट मिळत असणे, सदरहू बाब गंभीर असल्याने या कारखान्यांवर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
(३)	डॉ. नितीन राऊत, वि.स.स.	"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळयात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाडयांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळयात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य	२६, २८ फेब्रुवारी ५, १२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(४)	श्री. महेश शिंदे, वि.स.स.	राज्यात खाद्य उद्योगांमध्ये पदार्थाचे आकर्षण ग्राहकांला होण्याकरिता वेगवेगळे खाद्य रंग वापरले जात असणे, नैसर्गिक रंग वनस्पती, प्राणि आणि खनिजांमधून मिळविले जात असणे, कृत्रिम रंग रासायनिक प्रक्रियेव्दारे तयार करण्यात येणे, सदरहू खाद्यरंग हे आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांना आयएस मानांकन दिले जात असणे, रासायनिक रंगामुळे खाद्यपदार्थाचे आकर्षण वाढविण्यासाठी सिंथेटिक पदार्थाचा वापर करण्यात आल्यामुळे ते मानवाच्या आरोग्यास अपायकारक असणे, यातील कित्येक रंगामुळे कॅन्सर व अन्य रोग उद्भवत असल्यामुळे मानवी आरोग्यास अपायकारक असणे, त्यामुळे अन्य देशांत असे रंग वापरण्यास बंदी घातलेली असतांना देखील आपल्या देशात सर्रासपणे त्याचा वापर होत असणे, नैसर्गिक रंगाचा वापर खाद्यपदार्थांमध्ये करण्याची आवश्यकता, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असणे, या संदर्भात केंद्र शासनाचा आयएस स्टँडर्डचे मानांकन बदलण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने खाद्यपदार्थामध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्य रंगाचे टॉक्सिक स्टडी करून त्यांच्या मानांकनामध्ये बदल करण्याबाबत कायदा करण्याची आवश्यकता, निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि नवीन उर्जा	५ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		स्त्रोतांचा शोध घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी क्वांटम फिजिक्स आणि बायोलॉजिकल अप्लाईड सायन्सचा वापर करून औद्योगिक क्षेत्रामध्ये लॅब आणि त्यावरती संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना इन्फ्रास्टक्चर उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(५)	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	"मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दि. १८/०५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात येणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात येणे, परंतू सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी न होणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पनधारक असल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करून निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	२६, २८ फेब्रुवारी ५, १२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
(६)	श्री. सत्यजित देशमुख, वि.स.स.	"चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण/अभयारण्य परिक्षेत्रातील गावांचे पुनर्वसन सन १९७८ ते २००० या कालावधीत सांगली, कोल्हापूर या ठिकाणी करण्यात येऊनही प्रकल्पग्रस्तांना कोणत्याही नागरी सोयी सुविधा उपलब्ध न केल्याचा गंभीर प्रकार माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सदरहू ठिकाणाच्या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी गावठाण जमीन देण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात येणे, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना त्यांच्या मूळ गावातील घरांची आणि जमिनींची नुकसान भरपाई देऊन सरकारने जमीन व घरांचे संपादन करून नुकसान भरपाई पोटी देण्यात आलेल्या रक्कमेतून शासनाने प्रकल्पग्रस्तांची मूळ जमीन संपादन करताना ६५ टक्के रक्कम कापून घेण्याबरोबरच पुनर्वसनासाठी पात्र होण्यासाठीची पुनर्वसन कायद्याची ११ ते १४ कलमे लागू करावी लागतात ती केलेली नसणे, प्रकल्पग्रस्त पुनर्वसनासाठी पात्रच होऊ न शकणे, प्रकल्पग्रस्तांनी वारंवार मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, वने मंत्री तसेच लोकप्रतिनिधीं, जिल्हाधिकारी कार्यालय व उप वन संरक्षक यांच्याकडे निवदने, आंदोलने करून सुध्दा त्यांना अद्यापी न्याय मिळालेला नसणे, उपरोक्त गंभीर प्रकारामुळे चांदोली धरणग्रस्त/ अभयारण्य प्रकल्पग्रस्तांमध्ये शासनाप्रती प्रचंड नाराजी व असंतोषाची भावना निर्माण होणे, या गंभीर प्रकरणी चौकशी करुन, प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन	२६ फेब्रुवारी, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		कायद्यातील कलम ११ ते १४ लागू करण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देऊन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन, मोबदला व सर्व सोयी सुविधांची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."	
(७)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.	"मानवी स्वास्थ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असणे, अश्या स्थितीत समाजाला स्वास्थपूर्ण व समृध्द बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नसणे, वैश्विक स्तरावर देखील उत्तम शारिरीक स्वास्थ्याचा पर्याय म्हणून योगास मान्यता मिळणे, योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ वृत्तीने निरंतर कार्य करीत असणे, गुजरात, हरीयाणा, राजस्थान या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र योग शिक्षक संघ या संघटनेने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा या प्रमुख मागणीसह इतर काही महत्वपूर्ण मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, सदर मागण्यांची तातडीने पूर्तता होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	२५ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
(८)	श्री. विनोद निकोले, वि.स.स.	"मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी अद्यापही सुटलेली नसणे, सुमारे ५५४ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून बांधलेल्या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होणे, मुंबईकडील मार्गिकेचे काम अद्यापही धिम्या गतीने सुरू असल्याने नव्याने तयार केलेल्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात खड्डे होणे, अनेक ठिकाणी कॉंक्रिटीकरणाचे काम करताना जुन्या डांबरी रस्त्यावर थेट सिमेंट काँक्रीट केल्यामुळे अनेक रस्ते तथा उड्डाण पुलांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचणे, मोठ्या वाहनांच्या अडथळ्यांमुळे रुग्णवाहिका, प्रवासी आणि माल वाहतूक ही तासंतास अडकून राहणे, डहाणू तालुक्यातील विवळवेडे, मॅढवण येथील उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहतूक ठप्प होण्याची शक्यता निर्माण होणे, वाहतूक नियोजनासाठी कंत्राटदारांकडून कोणतीच उपाययोजना केली गेलेली नसल्यामुळे वारंवार अपघाताचे प्रमाण वाढत असणे, गुजरात व मुंबईकडील दोन्ही मार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी लोकप्रतिनीधी व जिल्हाधिकारी यांनी वारंवार बैठका घेऊन देखील कोणतीच उपाययोजना न होणे, निकृष्ट रस्त्यामुळे दिनांक ३१ मे, २०२५ रोजी मॅढवन-खिंडवर झालेल्या अपघातामध्ये तीन निरपराध लोकांचा झालेला मृत्यू, रस्त्याचे काम निकृष्ट करणाऱ्या कंत्राटदारावर व सदर कंत्राटदाराला	२६, २८ फेब्रुवारी ५, १२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(९)	श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.	"शासन आदेश दिनांक १९ मे, २०२५ नुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत एका गावांतर्गत एका वेळी केवळ एकाच शेत रस्त्याचे काम करता येत असणे, शेत रस्त्याची कामे शक्यतो उन्हाळ्यात करावी लागत असणे, त्यामुळे गावातील इतर क्षेत्र रस्त्यांची कामे करण्यास पुरेसा कालावधी उपलब्ध होत नसणे, शेत रस्त्याच्या कामावरील मजुरांची ऑनलाइन हजेरी घेताना शेतात नेटवर्क कमजोर (वीक) असल्याने तांत्रिक समस्या येत असणे,ग्राम रोजगार सेवकांना उद्भवणाऱ्या तांत्रिक/ ऑनलाइन समस्या सोडवता याव्यात यासाठी त्यांना वेळोवेळी होणाऱ्या बदलाचे प्रशिक्षण देणे गरजेचे असणे, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामरोजगार सेवकांना दरमहा ८००० रुपये मानधन देण्यास मान्यता देणे, मात्र अद्याप या बाबीची अंमलबजावणी होत नसल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	५ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
(१०)	श्री. अनिल पाटील, वि.स.स.	"जळगाव शहरातील ऑप्टिकल दुकानांमध्ये नागरिकांच्या डोळ्यांच्या वैद्यकीय उपचाराची पध्दत अत्यंत क्रूर आणि संतापजनक असणे, चष्म्याच्या व्यवसायाचे रूपांतर एका अनियंत्रित 'बाजारात' झाले असून केवळ व्यावसायिक फायद्यासाठी तांत्रिक ज्ञान नसलेले लोक नेत्ररोग तज्ज्ञ बनून वावरत असणे, या सदोष तपासणीमुळे समाजात नेत्रविकारांचे प्रमाण वाढून नागरिकांना शारीरिक व मानसिक मनस्ताप सहन करावा लागत असणे, या प्रकरणात आरोग्य विभाग आणि अन्न व औषध प्रशासकीय यंत्रणेने कमालीचा निष्काळजीपणा आणि दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येणे, विनापरवाना डोळे तपासणी करणाऱ्या दुकानांवर अंकुश ठेवण्यात ही यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरलेली असणे, शासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन तात्काळ अशा अनधिकृत केंद्रांची चौकशी करून ती बंद करावीत आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी नागरीकांकडून होत असेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	२६, २८ फेब्रुवारी ५, १२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.
(११)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.	"बल्लारपूर शहर हे ऐतिहासिक, सांस्कृतिक तसेच वनसंपदा दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून, विशेषतः उच्च दर्जाच्या सागवानी लाकडासाठी संपूर्ण देशात सुप्रसिध्द असणे, पौराणिक मान्यतेनुसार प्रभू श्रीरामचंद्रांचे आजोळ बल्लारपूर येथे असल्याचे उल्लेख आढळणे, प्रभू श्रीरामचंद्राच्या मंदिरासाठी वापरण्यात	२६ फेब्रुवारी, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		आलेले अतिशय मौल्यवान सागवान लाकूड बल्लारपूर परिसरातूनच पुरविण्यात येणे, सन १९५८ मध्ये बल्लारपूर येथे कोसळलेल्या एका भव्य व दुर्मिळ सागवान वृक्षाचा बुंधा आजही जतन करून ठेवण्यात आलेला असून, त्या वृक्षास तत्कालीन काळात "राम-लक्ष्मण" असे नाव देण्यात येणे, या ऐतिहासिक वारशाच्या स्मरणार्थ बल्लारपूर येथे सध्या एक लघु वुड म्युझियम अस्तित्वात असणे तसेच बल्लारपूर टिंबर डेपो हा आशिया खंडातील सागवानाचा सर्वात मोठा टिंबर डेपो म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळखला जात असणे, वरील ऐतिहासिक, औद्योगिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेता, बल्लारपूर टिंबर डेपो येथे महाराष्ट्रातील सर्वप्रथम व एकमेव असे "टिंबर म्युझियम व झायलरियम स्थापन" करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(१२)	श्री. विकास ठाकरे, वि.स.स.	"राज्यात मोठया प्रमाणात आर्थिक फसवणूकीचे सायबर गुन्हे घडत असणे, या फसवणूकीसाठी सोशल मिडीयाचा वापर होत असणे, सोशल मिडीयाच्या माध्यमातून विविध जाहिरातीव्दारे अमिषे दाखवून ही फसवणूक केली जात असणे, या आमिषांमुळे अनेक जणांची फसवणूक होत असणे, कित्येकदा या फसवणूक करणाऱ्या टोळया राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरुन गुन्हे करीत असणे, त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाहीसाठी मर्यादा येत असणे, अनेक गुन्हे	२४ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		उघडकीस येत नसणे, त्यामुळे शासनाने या आर्थिक फसवणूकीच्या सायबर गुन्हयांना प्रतिबंधासाठी बहुवर्षीय राज्यव्यापी सायबर पूर्वसूचना, इशारा व नागरीक जनजागृती चौकट तयार करण्याची आवश्यकता, मात्र शासनाकडून कार्यवाहीत होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत निर्माण होत असलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(१३)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.	"उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याचे शासनाचे धोरण असताना या धोरणाची अंमलबजावणी होत नसल्याचे प्रकर्षाने दिसून येणे, उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार मिळावा या मागणीसाठी राज्यभर सातत्याने आंदालने होत असल्याचे निदर्शनास येणे, मात्र यावर उपाययोजना होत नसल्याचे दिसून येणे, उद्योग व्यवस्थापनांचा उद्दामपणा दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे त्यांना शासनाचा कोणताही धाक उरलेला नसणे, परिणामी स्थानिक भूमीपूत्रांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, स्थानिक भुमीपुत्रांना उद्योगांमध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	५ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
(१४)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.	"सार्वजनिक वाहतूक नियोजन व व्यवस्थापन आणि लॉजिस्टिक दृष्टीकोनातून चंद्रपूर महानगरमध्ये रिंगरोडची असलेली आवश्यकता, नवीन वाहतूक मार्गामुळे नवीन वसाहती, औद्योगिक क्षेत्र, व्यावसायिक आस्थापनांना जागा मिळू शकणे, चंद्रपूर शहर औद्योगिक व खनिज समृध्द भाग असल्यामुळे रिंगरोड असल्यास माल वाहतूक अंतर्गत रस्त्यापेक्षा बाहेरून जाईल, त्यामुळे उत्पादनांची वाहतूक अधिक जलद व सुरक्षित होणे शक्य होईल, शहराची वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण या पार्श्वभूमीवर रिंगरोडचे बांधकाम करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	१२ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली
(१५)	श्री. संजय उपाध्याय, वि.स.स.	"मुंबई शहरात विशेषतः बोरीवली परिसरात अंमली पदार्थांचे वाढत असलेले प्रमाण, विविध भागात ड्रग्स, मद्यपान करणे, सिगारेट व इतर अंमली पदार्थांची विक्री खुले आम होत असल्याच्या तक्रारी नागरीकांकडून सातत्याने होत असणे, ही परिस्थिती केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नसून समाजाच्या नैतिक व सामाजिक आरोग्याशी निगडीत असणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात फळे, मिठाई, मिंट इत्यादी फ्लेवरयुक्त वेप उत्पादने लहान मुलांना आकर्षित करणे, तसेच ई-सिगारेटची (वेप) अवैध खुलेआम विक्री होत असल्याने विशेषतः शालेय/कॉलेजचे विद्यार्थी याच्या विळख्यात अडकणे, त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक	५, १२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		वातावरणावर, कुटुंबव्यवस्थेवर तसेच समाजातील सुरक्षिततेवर याचा परिणाम होणे, या संदर्भात प्रशासनाकडे माहिती असतानाही अपेक्षित कार्यवाही न झाल्यामुळे नागरीकांच्या मनात खंत व्यक्त होणे, झेपटो, ब्लिंकइट यांसारख्या ऑनलाईन वितरण प्रणालीव्दारे अंमली पदार्थ सेवनासाठी वापरले जाणारे विविध साहित्य सहज उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे नागरीकांकडून ऑनलाईन विक्री करण्यास बंदी घालण्याची होत असलेली मागणी, मुंबई क्राईम ब्रँचने सन २०२५ मध्ये दहीसर, सांताक्रुझ, कालबादेवी, कम्बाला हिल इत्यादी ठिकाणी चीनमधून तस्करी केलेल्या रुपये ३२ लाखांच्या ई-सिगारेट मुद्दे मालासह जप्त करणे, मुंबईसह राज्यभरातील शाळा-कॉलेजांच्या ५०० मीटर परिसरात व सार्वजनिक ठिकाणी विशेष तपासणी मोहिम राबवून अवैध विक्री करणाऱ्या दुकानांवर, पुरवठादारांवर व ऑनलाईन विक्रेत्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, डब्ल्यू/सीडीसी डेटा व चीन तस्करीच्या धोक्यावर आधारीत व्याख्याने, सोशल मिडीया अभियानाव्दारे शालेय/ कॉलेजच्या विद्यार्थी/पालक तसेच जनतेमध्ये जन-जागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
(१६)	श्री. निलेश राणे, वि.स.स.	"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण वनक्षेत्रापैकी तब्बल ८९ टक्के वनक्षेत्र हे खाजगी वन असणे, सहयाद्री पट्टयातील हजारो एकर खाजगी जमिनीवर "वने म्हणून नोंद" केलेली असणे, तर माणगाव खोऱ्यातील २९ गावांमधील १७६५.७४ हेक्टर जमिनीवर आकारीपड म्हणून नोंद झालेली असणे, जिल्ह्यातचा १२१ कि.मी लांबीचा समुद्रकिनारा आणि त्याला ५० मीटरची सीआरझेडची अट असल्याने ६५६ हेक्टरपेक्षा जास्त मच्छीमारांची जमिन अविकसित राहिलेली असणे, तसेच यामुळे आंबोली आणि सावंतवाडी परिसरातील जवळपास ७१४० हेक्टर पेक्षा जास्त जमीन ही खाजगी वने आणि कबुलायतदार गावकरी आजही न्यायाच्या प्रतिक्षेत असणे, अदयापही इको सेन्सेटीव्हच्या नावाखाली जिल्ह्यातील एकूण १९ टक्के गावांवर यांचा परिणाम होणार असून सावंतवाडी दोंडामार्ग तालुकयातील २५ गाव हे इको सेन्सेटीव्ह झोन म्हणून जाहीर होणे, अनेक गावात तर जिल्हाधिकारी / जिल्हा परिषद सीईओ यांच्या नांवेही शेकडो एकर जमिनी असल्याचे निदर्शनास आले असणे, त्याचबरोबर शेकडो एकर जमीनीवर २९ छोटी धरण आणि काम सुरु असलेली १० ते १२ लहान मोठी धरणे, शासकीय झाली असणे, त्यामुळे सद्यस्थितीत जिल्ह्यात शेती विकासाकरिता जमीनच शिल्लकच नसल्याने सदरहू बाब अत्यंत गंभीर असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	५ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
(१७)	श्री. शंकर जगताप, वि.स.स.	"पिंपरी-चिंचवड शहराची वाढती गरज लक्षात घेता मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी मिळावे अशी मागणी महानगरपालिकेने दिनांक २ डिसेंबर २०२३ मध्ये शासनाकडे करणे, शहरातील प्रत्येक व्यक्तीस प्रतिदिन १३५ लिटर पाण्याची गरज भासणे, सध्या पवना धरणातून ५१० एमएलडी आणि एमआयडीसी कडून ३० एमएलडी आणि आंध्रा धरणातून ७० एमएलडी एवढे असा दररोज ६१० एमएलडी पाणी दिवसा उद्योग नगरीत नागरिकांना पुरविण्यात येणे, शहराची लोकसंख्या आगामी १० वर्षात दुप्पटीने वाढ होणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये हिंजवडी, मान, मारुंजी, जांभे, नेरे, सांगवडे, गहुंजे या सात गावांचा समावेश झाल्यास शहराला पुरेसे पाणी मिळावे यासाठी पाण्याचे नियोजन करण्याची आवश्यकता, चिंचवड शहराच्या पिण्याच्या पाण्याचे ऑडिट करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि पाण्याचे स्त्रोत्र याबाबत कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून एकत्रित अहवाल तयार करणे, मुळशी धरणातून बाहेर जाणाऱ्या पाण्याच्या मोजमापासाठी मीटर बसविणे, मुळशी धरणातील पाणी आरक्षित केल्यास तसेच धरणाची उंची वाढविल्यास पुणे शहरासह पिंपरी चिंचवड पीएमआरडी येथील रहिवाशांचा पाणी प्रश्न सुटण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल, नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत भामा आसखेड धरणातून १३७ एमएलडी पाणी उचलणे, शेतजमीन पाण्याखाली	५, १२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		जाऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत पाटबंधारे विभागाकडून सविस्तर अहवाल तयार करून उद्योगनगरीला पाणीपुरवठा देण्याबाबत सकारात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता, मुळशी धरणातून महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार जलसंपदा विभागात २१५ एम.एल.डी. पाण्याची मागणी व आरक्षणाची मागणी, मुळशी धरणातील टाटा पॉवर मालकीच्या तीनशे मेगाब्लॉक क्षमतेचे हायड्रोपॉवर जनरेशन करार हा सन २०३१ मध्ये संपत असून त्यानुसार पिंपरी-चिंचवड पुणे सह पीएमआडीए हद्दीत वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता आमाती ३० वर्षाचे नियोजन करण्यासाठी कमीत कमी १० टीएमसी पाणी उपलब्ध होण्याची व्यवहारता तपासण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(१८)	श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स.	"महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत वरळी पुनर्विकास प्रकल्प हाती घेण्यात आला असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात येणे, उक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांमध्ये कोणकोणाची नेमणूक करण्यात आली तसेच सदर सल्लागार समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला असेल तर त्यावर शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, त्याचबरोबर राज्यातील विविध जिल्ह्यातून (मुंबई शहर व उपनगरासह) भरती झालेले मुंबई पोलीस अधिकारी व अंमलदार,	२४ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		हवालदार आदिंना सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळणाऱ्या तुटपुंज्या निवृत्तीवेतनातून मालकी हक्काचे मुंबई सारख्या शहरात घर घेणे शक्य नसल्याने त्यांना शहरात मालकी हक्काची घरे देण्याची आवश्यकता, त्याकरिता मुंबई उपनगरात मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्याबाबत स्वतंत्र व ठोस पोलीस हाऊसिंग धोरण जाहीर करण्यात यावे, तसेच पोलीस बाधवांनी स्थापन केलेल्या पोलीस परिवार गृहनिर्माण सहकारी संस्थांना मालकी हक्काचे घरे अथवा भूखंड देण्यासाठी विशेष सवलतीसह योजना राबविण्याची आवश्यकता, सेवानिवृत्त मुंबई पोलीस अधिकारी /अंमलदार व त्यांच्या कुटुंबियावर लादण्यात येणारे दंडणीय अनुज्ञाप्ती शुल्क पुर्णतः माफ करण्याची आवश्यकता, पोलीसांच्या मालकी हक्काच्या घरांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर पोलीसासाठी घरे बांधण्यात यावी, सदर भूखंड खाजगी विकासकांच्या ताब्यात देण्यात येऊ नये अशी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(१९)	श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.	"नाशिक महानगरपालिका अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन पेस्ट सार्वजनिक ठिकाणची साफसफाई, पाणी पुरवठा, मलःनिसारण, वाहन चालक पुरवठा आधी ठेकेदारी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन दिले जात	१२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		असताना प्रति महिन्याला या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून विशिष्ट रक्कम रोख स्वरूपात परत घेतली जात असणे, ठेकेदारी कर्मचारी म्हणून कामकाज करणारा कर्मचारी गरीब घरातील असल्याने त्याला कामाची नितांत आवश्यकता असणे, ठेकेदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांच्या गरजेचा गैरफायदा घेतला जात असणे, याबाबत लक्षवेधी सूचना क्रमांक १५४४ उपस्थित केली असता मा.मुख्यमंत्री यांनी याबाबत निश्चित यंत्रणा केली जाईल व गरीब कर्मचाऱ्यांची लूट होणार नाही याबाबत काळजी घेतली जाईल तसेच या प्रकरणात एसआयटी स्थापन केली जाईल असे आश्वासन देणे, माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर अनेक कर्मचाऱ्यांनी नाशिक महानगरपालिकेकडे तक्रारी करणे, त्याचप्रमाणे पोलीस ठाण्यात देखील गुन्हा नोंदवण्यात येणे, परंतु या गरीब मुलांची आर्थिक अडवणूक करून त्यांनी केलेल्या तक्रारी मागे घेण्यासाठी ठेकेदार व त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींकडून दबाव निर्माण होत असणे, या प्रकरणा संदर्भात अटकपूर्व जामीन मंजूर करताना कर्मचाऱ्यांच्या लाभात कुठलाही हस्तक्षेप करू नये असे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले असताना देखील सदर जामीन रद्द करून कारवाई केली जात नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
(२०)	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.	नवीन चंद्रपूर विकास योजनेअंतर्गत १३९१.७१ हेक्टर क्षेत्राचा समावेश असून मौजा पडोली (भाग), खुटाळा (भाग), कोसारा व दाताळा ही गावे या योजनेत अंतर्भूत असणे, दिनांक ३० जून १९९८ रोजी विकास आराखड्यास शासन मान्यता मिळाली असून योजना १ सप्टेंबर १९९८ पासून अंमलात येणे, प्रकल्पाची मूळ किंमत रु. २२२८.७७३ लक्ष इतकी असणे, नवीन चंद्रपूर विकास योजनेअंतर्गत मूलभूत सुविधा, गृहनिर्माण व सामाजिक पायाभूत सुविधा उभारण्यात महत्त्वपूर्ण प्रगती झालेली असणे, तथापि, रस्ते दुरुस्ती, प्रलंबित निधी प्रतिपूर्ती व उर्वरित आरक्षित क्षेत्रांचा नियोजित विकास या बाबी तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	१२ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली
(२१)	श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स.	"हद्दवाढीला पर्याय म्हणून कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणे, मात्र स्थापनेनंतर आठ वर्षांचा कालावधी उलटूनही संबंधित ४२ गावांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव कायम असणे, केवळ बांधकाम परवानग्या देणे व किरकोळ कारवाई करणे यापुरते प्राधिकरणाचे कार्य मर्यादित असणे, कलम ४२ अंतर्गत स्थापन प्राधिकरणास शासनाचा थेट निधी उपलब्ध होत नसल्याने विकास कामे ठप्प होणे, त्यामुळे एमआरटीपी कायद्यातील कलम ४० अंतर्गत विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करून शासनाचा विशेष निधी,	१२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		शासकीय जमिनींचे हस्तांतरण व स्वतंत्र विकास आराखडा मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करून निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(२२)	श्री. महेश लांडगे, वि.स.स.	"पुणे मेट्रोपोलिटन रिजन हा राज्याच्या आर्थिक वाढीचा प्रमुख केंद्रबिंदू असणे, आयटी उद्योग, ऑटोमोबाईल क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक गुंतवणुकीमुळे पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले असणे, Pune Metropolitan Region Development Authority (PMRDA) कार्यक्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना मूलभूत पायाभूत सुविधांची उभारणी मात्र त्या वेगाने झालेली नसणे, प्रमुख मार्गावर तीव्र वाहतूक कोंडी, इंद्रायणी, पवना, मुळा नदीचे वाढते प्रदूषण, हवा व पाणी प्रदूषणात वाढ, अनियोजित बांधकामे व विकासकामे, औद्योगिक क्षेत्रात मूलभूत सुविधांचा अभाव, वाढत्या मागणीमुळे वीज वितरण यंत्रणेवर ताण, Maha Metro मार्फत पुणे मेट्रो सुरू असून संपूर्ण PMR क्षेत्र अद्याप विस्तारीत झालेले नसणे, हिंजवडी, चाकण, तळेगाव, वाघोली, लोणीकंद या भागांसाठी मेट्रो विस्ताराचा कालबद्ध कार्यक्रम, रिंगरोड व मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब प्रकल्पांची सद्यस्थिती काय असा प्रश्न पडणे, PMPML सक्षम	२५ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, इंद्रायणी, पवना, मुळा या नद्यांचा उगम ते संगम असा नदीसुधार कार्यक्रम हाती घेऊन सर्वच नद्याचे जतन आणि संवर्धन करण्याची आवश्यकता, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढविण्याची तसेच MIDC क्षेत्रातील औद्योगिक सांडपाणी नियंत्रण करण्याची आवश्यकता, वाढत्या वाहनसंख्येमुळे हवा प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने धोरण आखण्याची आवश्यकता, ग्रामीण भागात वाढत्या शहरीकरणासाठी स्वतंत्र नियोजन यंत्रणा उभारणे, बेकायदेशीर बांधकामांवर गेल्या तीन वर्षांत कोणत्या प्रकारची कारवाई केली याचा अहवाल सादर करणे, नवीन औद्योगिक क्लस्टर नियोजन करणे, नवीन उपकेंद्रे उभारणीचा आराखडा तयार करणे, सौर व पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
(२३)	श्री. रोहित पाटील, वि.स.स.	"सांगली शहरात तसेच तासगाव व विटा (जि. सांगली) परिसरामध्ये अमली पदार्थांचे वाढत असलेले जाळे, विटा एम.आय.डी.सी. परिसरात पोलिसांनी १४.५ किलो मेफेड्रोन नावाचे ड्रग्ज जप्त करत सुमारे २९ कोटींचा मोठा ड्रग्ज उत्पादन रॅकेट उद्ध्वस्त करणे, जिल्हा स्तरावर अमली पदार्थांचे उत्पादन व वितरण साखळी सक्रिय असल्याचे उघड होणे, परंतु जिल्ह्यामध्ये बाहेरून	२४ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		येणारे अंमली पदार्थाचे जाळे देखील प्रस्थापित झालेले असणे, त्याचप्रमाणे तासगाव तालुक्यात ग्रामीण भागात गांजाची लागवड व जप्तीच्या घटना समोर आल्याने अमली पदार्थांचे जाळे लहान शहरांपासून गावांपर्यंत पोहोचल्याचे दिसून येणे, अंमली पदार्थांच्या सेवनामध्ये अल्पवयीन मुलांचा वाढता सहभाग, शाळा-महाविद्यालयीन वयोगटातील युवक व्यसनाधीनतेकडे वळत असल्याची बाब उघडकीस येणे, व्यसनाधीनतेमुळे चोरी, मारामारी, लहान स्वरूपातील गुन्हे, टोळी संस्कृती व हिंसक प्रवृत्ती वाढत असल्याचा धोका निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने कडक पावले उचलन्याची आावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
(२४)	श्री. निलेश राणे, वि.स.स.	"कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंब्रड सारमळे येथील धरणाचे काम मृद व जलसंधारण विभागामार्फत होत असून या कामाला १९९६ साली प्रशासकीय मान्यता मिळालेली असून ३० वर्षाचा कालावधी झालेला असतानाही अद्याप प्रकल्प पूर्ण झालेला नसणे, त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत चाललेली असणे, यासंदर्भात विधानसभा सभागृहात विषय उपस्थित केला असता मा.मंत्री महोदयांनी प्रकल्पाच्या वाढीव खर्चाला तात्काळ प्रशासकीय मंजूरी देऊन धरणाच्या कामास सुरुवात करण्यात येईल असे आश्वासन दिलेले असतानाही अदयाप धरणाच्या वाढीव खर्चाला मंजूरी देण्यात आली नसल्याचे	१२, १७, २४ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आली परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		निदर्शनास आलेले असणे, आंब्रड धरणासंदर्भात सभागृहात विषय उपस्थित केल्यानंतर फक्त एकदाच बैठक झाली त्यानंतर प्रत्यक्षात काम सुरु झाले असले तरी जुन्या कामाबाबत कुठलही ऑडीट झालेले नसणे, काम १०० टक्के निकृष्ट सुरु असणे, एकदाही कार्यकारी अभियंता, मुख्य कार्यकारी अभियंता हे प्रत्यक्षात काम सुरू असलेल्या ठिकाणी गेलेले नसणे, तसेच ठेकेदार पी. के. कोंडेकर याने धरणाच्या बुडीत क्षेत्रातच अधिकृतरीत्या काळया दगडाची क्वारी खोदून तो दगड विकून कोट्यवधींचा शासनाचा महसूल बुडवलेला असणे, धरणाचे झालेले काम अत्यंत निकृष्ट असून धरणाचा मुख्य बंधारा कित्येक फूट खचला असणे, दहा वर्षांनंतर बंधाऱ्यावर उगवलेल्या झाडांची तोड करण्यात आलेली असणे, प्रत्यक्षात झालेल्या कामापेक्षा जास्त देयकाची रक्कम काढण्यात आलेली असणे, धरणात वापरल्या जाणाऱ्या मातीचे कुठलेही परिक्षण झालेले नसून उपलब्ध असेल ती माती धरणाच्या बंधाऱ्यात वापरली जात असणे, सदरील धरणाचे काम तात्काळ थांबवून झालेल्या कामाची चौकशी करावी, ठेकेदाराला काळया यादीत टाकून धरणासाठी नवीन ठेकेदार नियुक्त करण्यात यावा, तसेच कुडाळ तालुक्यातील भडगाव बुद्रुक येथील सुरू असलेल्या धरणाच काम हे ३०% पूर्ण झाले असून अद्याप शेतकऱ्यांना कुठलाही मोबदला	

अ.क्र	सदस्यांचे नांव	विषय	सभागृहात चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		मिळालेला नसणे, येथील शेतकऱ्यांची किमान ७ कोटी २३ लाखांची नुकसान भरपाई प्रलंबित असणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
(२५)	श्री. महेश बालदी, वि.स.स.	"सिडको महामंडळातील कारभाराबाबत अत्यंत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी समोर येत असणे, पाणीपुरवठा, गृहनिर्माण, १२.५% योजना, नैना प्रकल्प, बांधकाम परवानग्या तसेच कंत्राट वाटप या सर्वच स्तरांवर मोठया प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याचे निदर्शनास येणे, विशेषतः सर्वसामान्य नागरीक व प्रकल्पग्रस्त शेतकरी यांना न्याय मिळत नसणे, यासंदर्भात प्रशासनाची भूमिका उदासीन व निष्क्रिय असणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सदर बाबींची शासनाने गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	२४ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अर्धा तास चर्चेच्या (सर्वसाधारण) सूचनेची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

(म.वि.स. नियम ९४ अन्वये)

अ.क्र.	विषय	उत्तरीत झालेल्या सूचनेचा दिनांक व सदस्यांचे नांव	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
१.	"उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याचे शासनाचे धोरण असताना त्याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत."	श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांच्या दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी उत्तरीत झालेल्या म. वि. स. नियम ९४ अन्वये अर्धा तास चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.	दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

विवरण क्रमांक ३०

मंत्रीमंडळावर अविश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ९५ अन्वये)

निरंक

***

विवरण क्रमांक- ३१

मंत्रीमंडळावर विश्वास व्यक्त करणारा प्रस्ताव

(म.वि.स. नियम २३ अन्वये)

निरंक

***

विवरण क्रमांक -३२

स्थगन प्रस्ताव

(म.वि.स. नियम ९७ अन्वये)

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	बदलापूर (जि.ठाणे) मध्ये स्त्री बीजांची बेकायदेशीर तस्करी करणाऱ्या मोठ्या रॅकेट प्रकरणाबाबत	अमान्य	२४ फेब्रुवारी, २०२६
२.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	अन्न व औषध प्रशासन यांच्या मंत्रालयातील कार्यालयातील एका लिपिकास लाच घेताना अटक करण्यात आल्याबाबत.	अमान्य	-- " --
३.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	राज्यात दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पावसाबाबत.	अमान्य	-- " --
४.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	शेतकरीविरोधी शक्तिपीठ महामार्गाला तीव्र विरोध होत असताना सरकारच्या रेखांकन बदलाच्या तकलादू भूमिकेवर प्रश्न निर्माण झाल्याबाबत	अमान्य	-- " --
५.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मुंबई मधील मानखुर्द शिवाजीनगर येथे वाढत्या गुन्हेगारीमुळे पोलीस चौकीची आवश्यकता	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
६.	डॉ. नितिन राऊत, वि.स.स.	महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनी लिमिटेडमधील 'मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजना २.०' अंतर्गत सुमारे १०० कोटी रुपयांच्या बनावट बँक गॅरंटीद्वारे झालेल्या कथित आर्थिक घोटाळ्याबाबत.	अमान्य	-- " --
७.	डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स.	मुंबईतील आयआयटी,पवई येथील वसतिगृहात जिवंत काडतुसे सापडल्याबाबत..	अमान्य	-- " --
८.	श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.	राज्यात दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पावसाबाबत.	अमान्य	-- " --
९.	श्री. अमिन पटेल, वि.स.स.	मुंबईतील धारावीमधील कुंभारवाडा येथे विनापरवाना औषधांची साठवणूक केल्याबाबत.	अमान्य	-- " --
१०.	श्री. जयंत पाटील, वि.स.स.	मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व मुंबई-नाशिक महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होऊन प्रवाशांना झालेला त्रास.	अमान्य	-- " --
११.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मुंबई मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रामध्ये पोलिस चौकी बनविण्याबाबत	अमान्य	२५ फेब्रुवारी, २०२६

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१२.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	राज्यात दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पावसाबाबत	अमान्य	-- " --
१३.	श्री. जयंत पाटील, वि.स.स.	राज्यातील १,१६४ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय नसल्याचे आणि ३,३२८ शाळांमध्ये वीजही नसल्याबाबात	अमान्य	-- " --
१४.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	श्री. हनमंत पवार यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याबाबत	अमान्य	-- " --
१५.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	श्री. हनमंत पवार यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याबाबत	अमान्य	-- " --
१६.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	नांदेड जिल्ह्यातील मुखेड प्राथमिक शाळेत कायमस्वरुपी शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत	अमान्य	
१७.	श्री. अमिन पटेल, वि.स.स.	मुंबईतील वर्सोवा ते मढ प्रस्तावित सागरी किनारा मार्गासाठी १८४ झाडे तोडण्यात येणार असल्याबाबत	अमान्य	-- " --
१८.	श्री. भास्कर जाधव, वि.स.स.	हरयाणातील सिकरी येथील एका नामांकित रिसॉर्टमध्ये शिवप्रेमींच्या भावना दुखावणारा प्रकार	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रामध्ये नवीन पोलिस स्टेशन बनविण्याबाबत	अमान्य	२५ फेब्रुवारी, २०२६
२०.	श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स.	जोगेश्वरी (पूर्व) येथील गणेश मंडळ रहिवासी संघातील पात्र झोपडीधारकांच्या हक्कांचे उल्लंघन आणि एस.आर.ए. प्रशासनाच्या अनियमिततेबाबत	अमान्य	२६ फेब्रुवारी, २०२६
२१.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मानखुर्द शिवाजीनगर विभागात नवीन पोलिस स्टेशन बनविण्याबाबत	अमान्य	-- " --
२२.	श्री. अमित देशमुख, वि.स.स.	पुण्यातील आळंदी येथील पवित्र इंद्रायणी नदीच्या भीषण प्रदूषणामुळे निर्माण झालेली आणीबाणीची परिस्थिती आणि प्रशासकीय निष्काळजीपणाबाबत	अमान्य	४ मार्च, २०२६
२३.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	नागपूर जिल्ह्यातील काटोल राऊळगाव येथे दि. १ मार्च २०२६ रोजी एसबीएल एनर्जी लिमिटेड दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये भीषण स्फोटात १८ कामगारांचा झालेला मृत्यू व अनेक जण गंभीररित्या जखमी झाल्याबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२४.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	नागपूर जिल्ह्यातील काटोल राऊळगाव येथे दि. १ मार्च २०२६ रोजी एसबीएल एनर्जी लिमिटेड दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये भीषण स्फोटात १८ कामगारांचा झालेला मृत्यू व अनेक जण गंभीररित्या जखमी झाल्याबाबत	अमान्य	-- " --
२५.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	नागपूर जिल्ह्यातील काटोल राऊळगाव येथे दि. १ मार्च २०२६ रोजी एसबीएल एनर्जी लिमिटेड दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये भीषण स्फोटात १८ कामगारांचा झालेला मृत्यू व अनेक जण गंभीररित्या जखमी झाल्याबाबत	अमान्य	-- " --
२६.	श्री. अमिन पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, डॉ.ज्योती गायकवाड, वि.स.स.	वाहतूक पोलिसांकडून जबरदस्तीने दंडाची रक्कम वसूल करण्यात येण्याबाबत	अमान्य	-- " --
२७.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	बोरिवली तहसील कार्यालयात उत्पन्नाचे दाखले, डोमेसाईल व अन्य शैक्षणिक दाखल्यांसाठी तहसील कार्यालयांमधील भ्रष्टाचार समुळ नष्ट व्हावा, दलालांना जरब बसण्यासाठी करावयाची कार्यवाहीबाबत..	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२८.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मालेगाव येथे बांगलादेशी आणि रोहिंग्या राहत असल्याचे आरोप करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्यात येत असल्याबाबत	अमान्य	-- " --
२९.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	शेतकरीविरोधी शक्तिपीठ महामार्गाला तीव्र विरोध होत असताना सरकारच्या रेखांकन बदलाच्या तकलादू भूमिकेवर प्रश्न निर्माण झाल्याबाबत	अमान्य	-- " --
३०.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	नागपूर जिल्ह्यातील काटोल राऊळगाव येथे दि. १ मार्च २०२६ रोजी एसबीएल एनर्जी लिमिटेड दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये भीषण स्फोटात १८ कामगारांचा झालेला मृत्यू व अनेक जण गंभीररित्या जखमी झाल्याबाबत	अमान्य	-- " --
३१.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	बदलापूर येथे अल्पवीन मुलीवर झालेल्या अत्याचाराबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
३२.	श्री. जयंत पाटील, वि.स.स.	स्वामी गोविंद देवगिरी, कोषाध्यक्ष श्री. राम जन्मभुमी ट्रस्ट, अयोध्या यांनी ज्ञानेश्वरी व भागवत या ग्रंथांवर केलेल्या वादग्रस्त वक्तव्याबाबत	अमान्य	-- " --
३३.	श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.	अमेरिका-इस्त्रायल व इराण यांच्यातील युध्दामुळे होर्मुझच्या खाडीत जहाजांना बंदी घातल्यामुळे, भारतासह महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांचे केळी, द्राक्ष, कांदे पिक सडून खराब होऊन, शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होणार असल्याने, शासनाने तातडीने कार्यवाही करणेबाबत.	अमान्य	-- " --
३४.	श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स.	आण्णासाहेब पाटील मागास आर्थिक विकास महामंडळाच्या योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या उद्योजकांना व्याज परतावा मिळणेबाबत.	अमान्य	-- " --
३५.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	नागपूर जिल्ह्यातील काटोल राऊळगाव येथे दि. १ मार्च २०२६ रोजी एसबीएल एनर्जी लिमिटेड दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये भीषण स्फोटात १८ कामगारांचा झालेला मृत्यू व अनेक जण गंभीररित्या जखमी झाल्याबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
३६.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	नाशिक जिल्ह्यातील वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा अल्पवयीनांवर अत्याचार होत असल्याबाबत	अमान्य	५ मार्च, २०२६
३७.	श्री. अमिन पटेल, वि.स.स.	ए. के. मुन्शी योजना शाळेचा परवाना (लायसन्स) नूतनीकरण करण्याबाबत	अमान्य	-- " --
३८.	श्री. अमिन पटेल, वि.स.स.	तारापूर औद्योगिक वसाहतीलतील भगेरिया इंडिस्टीज या कारखान्यातून रसायन गळती झाल्याबाबत	अमान्य	-- " --
३९.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	महाराष्ट्र शासनाने दि. १७ जुलै २०२५ रोजी जाहीर केलेल्या सर्वसमावेशक अनुकंपा नियुक्ती धोरणामध्ये सर्व पात्र कुटुंबांना तातडीने न्याय देणेबाबत	अमान्य	-- " --
४०.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	महाराष्ट्र शासनाने दि. १७ जुलै २०२५ रोजी जाहीर केलेल्या सर्वसमावेशक अनुकंपा नियुक्ती धोरणामध्ये सर्व पात्र कुटुंबांना तातडीने न्याय देणेबाबत	अमान्य	-- " --
४१.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	महाराष्ट्र शासनाने दि. १७ जुलै २०२५ रोजी जाहीर केलेल्या सर्वसमावेशक अनुकंपा नियुक्ती धोरणामध्ये सर्व पात्र कुटुंबांना तातडीने न्याय देणेबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
४२.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील 'विद्या भवन' सोसायटीत स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबत आणि अनधिकृत/धोकादायक इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडिटबाबत	अमान्य	६ मार्च, २०२६
४३.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील 'विद्या भवन' सोसायटीत स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबत आणि अनधिकृत/धोकादायक इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडिटबाबत	अमान्य	-- " --
४४.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	नागपूर येथील लकडगंज पोलीस स्टेशन मध्ये सुरू असलेले गैरप्रकाराबाबत	अमान्य	९ मार्च, २०२६
४५.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	मुंबई शहरात चित्रपट निर्माता, बांधकाम व्यवसायिक, सेलिब्रेटींना घरांबाहेर गोलीबार करण्याच्या वाढत्या घटनेबाबत	अमान्य	-- " --
४६.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	राज्यातील शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत	अमान्य	-- " --
४७.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मालेगाव विभागात बांगलादेशी व रोहिंग्याच्या नावाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
४८.	डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स.	अहमदनगर येथे झालेल्या बिबट्यांच्या मृत्यूबाबत.	अमान्य	-- " --
४९.	बश्री. जयंत पाटील, वि.स.स.	सौदी अरेबिया, बहरीन, कतार, कुवैत व यूएई येथे राहणाऱ्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षित पुनर्वसनाबाबत	अमान्य	-- " --
५०.	डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स.	अहमदनगर येथे झालेल्या बिबट्यांच्या मृत्यूबाबत.	अमान्य	-- " --
५१.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मालेगाव येथे बांगलादेशी व रोहिंग्याच्या नावाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत	अमान्य	१० मार्च, २०२६
५२.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	महाराष्ट्र शासनाने दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी जाहीर केलेल्या सर्वसमावेशक अनुकंपा नियुक्ती धोरणामध्ये सर्व पात्र कुटुंबांना तातडीने न्याय देण्याबाबत	अमान्य	
५३.	श्री. जयंत पाटील, वि.स.स.	अमेरीका, इराण, इस्त्राइल या देशात सुरु असलेले युद्ध या युद्धाचा परिणाम देशातील हॉटेल उद्योगावरही जानवत असुन या युद्धामुळे राज्यात गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
५४.	श्री. अमित देशमुख, वि.स.स.	'एसएनए स्पर्श' (SNA SPARSH) या डिजिटल प्रणालीतील तांत्रिक त्रुटींमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यासह राज्यातील हजारो घरकुल लाभार्थ्यांचे अनुदान रखडल्याने निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीवर चर्चा करण्याबाबत	अमान्य	१६ मार्च, २०२६
५५.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	मार्वे-मनोरी फेरी बोट सेवेमध्ये करोडो रूपयांचा भ्रष्टाचार होत असल्याबाबत	अमान्य	१७ मार्च, २०२६
५६.	डॉ. नितिन राऊत, वि.स.स.	नांदेड जिल्ह्यातील हडको परिसरात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका तरुणीने वसतीगृह चालकाच्या कथित त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत	अमान्य	-- " --
५७.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	पुणे येथील आय टी टॉवर अनियमिततेची चौकशी करण्याबाबत	अमान्य	-- " --
५८.	डॉ. नितिन राऊत, वि.स.स.	नांदेड जिल्ह्यातील हडको परिसरात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका तरुणीने वसतीगृह चालकाच्या कथित त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत	अमान्य	१८ मार्च, २०२६

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
५९.	श्री. रोहित पवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स.	तत्काली उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघाताची पारदर्शक तपास होणेबाबत	अमान्य	-- " --
६०.	श्री. अमित देशमुख, वि.स.स.	१६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरामुळे निर्माण झालेले गंभीर मानसिक, शारीरिक व शैक्षणिक संकट आणि त्यावर तातडीने बंदी किंवा नियंत्रण आणण्याबाबत	अमान्य	-- " --
६१.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	संगमनेर तालुक्यातील अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये शाळेतून निघालेल्या सहावीच्या मुलीवर ॲसिड ने झालेल्या हल्ल्याबाबत	अमान्य	-- " --
६२.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मालेगाव विभागात बांगलादेशी व रोहिंग्या लोक राहत असल्याचा आरोप करून मुस्लीम समाजाला त्रास देऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याबाबत	अमान्य	-- " --
६३.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	संगमनेर तालुक्यातील अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये शाळेतून निघालेल्या सहावीच्या मुलीवर ॲसिड ने झालेल्या हल्ल्याबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
६४.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	संगमनेर तालुक्यातील अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये शाळेतून निघालेल्या सहावीच्या मुलीवर ॲसिड ने झालेल्या हल्ल्याबाबत	अमान्य	-- " --
६५.	श्री. अबू आझमी, वि.स.स.	मालेगाव येथे बांगलादेशी व रोहिंग्याच्या यांच्या नावाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याबाबत	अमान्य	२३ मार्च, २०२६
६६.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	ब्रह्मपुरी जिल्हा चंद्रपूर येथून अल्पवयीन मुलींची अपहरण होत असल्याबाबत	अमान्य	-- " --
६७.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	राज्यामध्ये अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान	अमान्य	-- " --
६८.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्याकडून झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात त्याला अटक केल्याबाबत.	अमान्य	-- " --
६९.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	मार्वे-मनोरी फेरी बोट सेवेमध्ये करोडो रूपयांचा भ्रष्टाचार झाल्याबाबत	अमान्य	-- " --
७०.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	वाघाच्या हल्ल्यात बाप्पावाडा येथील इसमाचा मृत्यू व वनविभागाच्या उपाययोजनांबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
७१.	डॉ. नितिन राऊत, वि.स.स.	विदर्भातील मुबलक नैसर्गिक संसाधने, खनिज संपत्ती आणि वीज निर्मिती असूनही सरकारच्या धोरणात्मक उदासीनतेमुळे विदर्भ विकासापासून वंचित राहिल्याबाबत	अमान्य	-- " --
७२.	डॉ. नितिन राऊत, वि.स.स.	नांदेड जिल्ह्यातील हडको परिसरात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका तरुणीने वसतीगृह चालकाच्या कथित त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत	अमान्य	-- " --
७३.	श्री. अमिन पटेल, वि.स.स.	ए. के. मुन्शी योजना शाळेतील विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून सदर शाळेचा परवाना (लायसन्स) नूतनीकरण करणेबाबत	अमान्य	-- " --
७४.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	राज्यामध्ये अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान	अमान्य	-- " --
७५.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्याकडून झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात त्याला अटक केल्याबाबत.	अमान्य	-- " --
७६.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्याकडून झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात त्याला अटक केल्याबाबत.	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
७७.	श्री. जयंत पाटील,डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स.	राज्यामध्ये अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान	अमान्य	-- " --
७८.	डॉ. नितिन राऊत, वि.स.स.	महाराष्ट्रातील सार्वजनिक विद्यापीठांमध्ये होणाऱ्या शिक्षक भरती प्रक्रियेबाबत NET/SET पात्र विद्यार्थ्यांवर होत असलल्या अन्यायाबाबत	अमान्य	२४ मार्च, २०२६
७९.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	ब्रह्मपुरी जिल्हा चंद्रपूर येथून मुली बेपत्ता होत असल्याबाबत	अमान्य	-- " --
८०.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	राज्यातील व मराठवाड्यामध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना मदत मिळणेबाबत	अमान्य	-- " --
८१.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	मार्वे-मनोरी फेरी बोट सेवे मध्ये करोडो रूपयांचा भ्रष्टाचार झाल्याबाबत	अमान्य	-- " --
८२.	श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स.	मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उदयानातील येऊरच्या जंगलाजवळ माकडावर स्टीलच्या बाणाने निशाणा करून हल्ला करून शिकार केल्याबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
८३.	श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स.	जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील होसकर बिल्डिंगचा रखडलेला पुनर्विकासाबाबत	अमान्य	-- " --
८४.	श्री. हेमंत ओगले, वि.स.स.	पुणे येथील आय टी टॉवर अनियमिततेची चौकशी करण्याबाबत	अमान्य	-- " --
८५.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	लाखांदूर तालुक्यातील मांदेड येथे शेतकऱ्याची आत्महत्या व कुटुंबाच्या पुनर्वसनाबाबत	अमान्य	-- " --
८६.	श्री. भास्कर जाधव, वि.स.स.	रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण शहरामध्ये वाशिष्ठी नदीत दिनांक २२ मार्च, २०२४ रोजी नदीच्या पिंपळी - पेढांबे येथील पात्रामध्ये बेकायदा रसायनयुक्त पिशव्यांची बिनधास्तपणे धुलाई करण्याचा गंभीर प्रकार घडल्याबाबत	अमान्य	२५ मार्च, २०२६
८७.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा व कोरपणा आदिलाबाद तसेच महाराष्ट्र राज्याला लागून असलेल्या गोंदिया जिल्ह्याच्या शिरपूर चेक पोस्ट व विविध जिल्ह्यातील सीमा भागातील राज्य परिवहन विभागामार्फत सुरू असलेल्या तपासणी नाक्यावर मोठ्या प्रमाणात अवैध प्रमाणात वसुली होत असल्याबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
८८.	श्री. वरुण सरदेसाई, वि.स.स.	डॉ.बळीराम हिरे स्थापत्य महाविद्यालयाने पदवी अभ्यासक्रमाणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याबाबत	अमान्य	-- " --
८९.	डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स.	सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट होवून फळबागांचे व शेतीचे झालेले अतोनात नुकसानीबाबत	अमान्य	-- " --
९०.	श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.	वरोरा जिल्हा चंद्रपूर येथून अल्पवयीन मुलीवर केलेल्या अत्याचार चा आरोपी फरार झाल्याबद्दल	अमान्य	-- " --
९१.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	मुंबईतील कांदिवली (पश्चिम), चारकोप परिसरात "Trident Hospital" नावाचे रुग्णालय कोणत्याही वैध परवानगीशिवाय आणि नोंदणीशिवाय चालू असल्याबाबत	अमान्य	-- " --
९२.	डॉ. नितिन राऊत, वि.स.स.	गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील आदिवासींची रेशनसाठी होणारी ८० किमीची पायपीट आणि रस्ते सुविधेचा अभाव असल्याबाबत	अमान्य	-- " --

अ.क्र.	सदस्यांचे नाव	विषय	निर्णय	सभागृहात उल्लेख केल्याची तारीख
(१)	(२)	(३)	(४)	(५)
९३.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	पुणे येथील आय टी टॉवर लिफ्टच्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत	अमान्य	-- " --
९४.	श्री. संजय मेश्राम, वि.स.स.	राज्यातील वैदयकीय अधिकारी गट-अ (एस-२०) पदभरतीबाबत	अमान्य	-- " --
९५.	श्री. संजय मेश्राम, वि.स.स.	शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी विशेष भरतीबाबत	अमान्य	-- " --
९६.	श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स.	बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पागडी इमारती,उपकर प्राप्त (सेस), व बिगर उपकर प्राप्त (नॉन सेस) इमारतीच्या पुनर्विकासाबाबत	अमान्य	-- " --

***

विवरण क्रमांक -३३

सभागृहात उपस्थित करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१.	श्री. तुकाराम काते, वि.स.स.	चेंबूर येथील सुभाषनगर या वसाहतीमध्ये इमारत क्रमांक ३६ चे काम सुरु असताना ५ कामगार ८ व्या मजल्यावरुन खाली पडले असून दुर्दैवाने त्यातील २ कामगारांचा जागीच मृत्यू होणेबाबत	२८ फेब्रुवारी, २०२६
२.	श्री.कैलास घाडगे-पाटील, वि.स.स.	ग्रामीण भागातील जुने मीटर चांगले असताना स्मार्ट मीटर लावण्यात आलेले असल्याबाबत	-- " --
३.	श्री.अनंत (बाळा) नर, वि.स.स.	मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या माध्यमातून निराधार कुटूंब रस्त्यावर आलेले असून ते न्यायाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत	-- " --
४.	श्री. अबु आझमी, वि.स.स.	**हिंदी भाषण प्रलंबित**	-- " --
५.	श्री. महेश सावंत, वि.स.स.	धारावी येथे अदाणी समुहाचे काम सुरु असून तेथील रस्त्याची साफसफाई केली जात नसल्याबाबत	-- " --
६.	डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स.	धारावी येथील शाहू नगरमध्ये जास्मीन मिल कंपाऊंड रस्त्यावरुन डंपींगचे ट्रक, मोठमोठे डंपर जाऊन मोठमोठ्या खड्डयांमुळे त्या रस्त्याची दुरवस्था झालेली असल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
७.	श्री.प्रविण स्वामी, वि.स.स.	उमरगा मतदार संघातील पवन चक्की व सौर ऊर्जा प्रकल्पातील जमिनीच्या अधिग्रहणाबाबत	-- " --
८.	श्री.जयंत पाटील, वि.स.स.	सन २०२६ चे शासकीय कार्यक्रमाचे परिपत्रक काढण्यात आले त्यामध्ये माजी मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या जयंतीचा समावेश नसल्याबाबत	-- " --
९.	श्री.जयंत पाटील, वि.स.स.	राज्यातील ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांना नवीन वेतनश्रेणी लागू करण्यासाठी शासनाकडून अभय यावलकर समितीच्या अहवालातील शिफारशी अद्याप लागू केलेल्या नसल्याबाबत	-- " --
१०.	श्री.आदित्य ठाकरे, वि.स.स.	संपूर्ण महाराष्ट्रात परीक्षेकरिता येणाऱ्या उमेदवारांची रात्री झोपण्याची व दिवसा राहण्या, खाण्याची व्यवस्था करण्याबाबत	-- " --
११.	श्री. हेमंत ओगले, वि.स.स.	बीड जिल्ह्यातील दौला वाडगाव ता. आष्टी येथे दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी रात्रीच्या वेळी अनुसूचित जातीतील श्री.गोपीनाथ गंगाधर गाडे या तरुणाचे दुकान आणि घर जाळण्यात आले असून त्यामुळे सुमारे ५० लाखांचे नुकसान झालेले असण्याबाबत	-- " --
१२.	श्री. मुरजी पटेल, वि.स.स.	मरोळपासून अंधेरी स्टेशनपर्यंत जाण्यासाठी लागणारा वेळ वाचवण्यासाठी वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१३.	श्री. करण देवताळे, वि.स.स	वरोरा येथे अवकाळी पावसामुळे चणा, गहू, तूर आणि मिरची या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याबाबत	-- " --
१४.	श्री.प्रविण तायडे, वि.स.स.	अचलपूर मतदारसंघातील एनटीसीची फिनले मिल अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याबाबत	-- " --
१५.	श्री.प्रविण तायडे, वि.स.स.	रिध्दपूर ते चांदूर बाजार या मार्गावर रेती तस्करी आणि गो-तस्करी प्रचंड प्रमाणात सुरू असणेबाबत	-- " --
१६.	श्री.अभिमन्यू पवार, वि.स.स.	औसा तालुक्यातील आधार नसलेल्या ३९४ विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी करून त्यांची संख्या ग्राह्य धरूनच "संच मान्यतेसाठी" शिफारस करण्याबाबत	-- " --
१७.	श्री. रईस शेख, वि.स.स.	**हिंदी भाषण प्रलंबित**	-- " --
१८.	श्री. वरूण सरदेसाई, वि.स.स.	वांद्रे पूर्व येथील पश्चिम द्रुतगती मार्गावरील ट्रॅफिक कमी होण्यासाठी लवरात लवकर उपाययोजना कराव्या व तेथील सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण हटवून त्यावर वन वे पार्किंग करण्याबाबत	-- " --
१९.	श्री. दिलीप लांडे, वि.स.स.	ऑल इंडिया नावाची खाजगी शाळेची इमारत धोकादायक असल्यामुळे मनपाने नोटीस देऊन ती पाडलेली असल्यामुळे या शाळेतील १ हजार ८०० ते २ हजार विद्यार्थी रस्त्यावर आलेले असणेबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
२०.	श्रीमती स्नेहा दुबे, पंडित वि.स.स.	वसई-विरार या परिसरातील घरे ३५-४० वर्षांपासून पाण्यापासून वंचित असण्याबाबत	-- " --
२१.	श्री. अस्लम शेख, वि.स.स.	**हिंदी भाषण प्रलंबित**	-- " --
२२.	श्री. वरुण सरदेसाई, वि.स.स.	विधान भवनच्या सीआर - २ मॉलच्या शेजारी असलेल्या फुटपाथवर सरकारी वाहने उभी असण्याबाबत	-- " --
२३.	श्री. राजू तोडसाम, वि.स.स.	आर्णी तालुक्यातील देवगाव प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या मुलाला अद्यापही जमिनीचा मोबदला मिळाला नसणेबाबत	-- " --
२४.	श्री. गजानन लवटे, वि.स.स.	नांदगाव पेठ, जि. अमरावती बस स्टँड परिसरात दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी रात्री एका दुचाकीचा किरकोळ धक्का लागल्याच्या रागात तीन लोकांनी दोन सख्ख्या भावांवर धारदार शस्त्राने गंभीर हल्ला केल्याबाबत	-- " --
२५.	श्री. अनुपभैय्या अग्रवाल, वि.स.स.	देवपूर येथे रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सुरु असून महानगरपालिकेची तेथे असलेली २ हजार चौ.मी. जागा भूमापन अधिकाऱ्याने खाजगी व्यक्तीस विकण्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
२६.	श्री. सिद्धार्थ खरात, वि.स.स.	बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराच्या पाण्याची पातळी काही कारणांमुळे वाढत असून तेथे दहाव्या व आकरव्या शतकातील चालुक्य काळातील कमळजा माता मंदिर, सासू-सून विहीर, रामगया झरा अशी दहा ते बारा मंदिरे पाण्याखाली गेल्यामुळे या भागात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणेबाबत	-- " --
२७.	श्री. किसन वानखेडे, वि.स.स.	उमरेखड-महागाव मतदारसंघात पैनगंगा अभयारण्य असून तेथे दगडथर येथील माजी सरपंच त्यांच्यावर दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी शेतात जात असताना वन्य प्राण्यांनी हल्ला केल्याबाबत	-- " --
२८.	श्री. किसन वानखेडे, वि.स.स.	दिनांक २३ व २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी अतिवृष्टीमुळे गहू, हरभरा, कापूस, मका, इत्यादी नष्ट झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने शासनाला अहवाल सादर करण्याबाबत	-- " --
२९.	श्रीमती सुलभा गायकवाड, वि.स.स.	कल्याण शहराची वाढती लोकसंख्या, वाहतूक कोंडी व प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत	-- " --
३०.	श्री.संजय उपाध्याय, वि.स.स.	भारत सरकारच्या प्रोहिबिशन ऑफ इलेक्ट्रॉनिक सिगारेट ॲक्ट-२०१९ अंतर्गत ई-सिगारेटचे उत्पादन, आयात, विक्री, साठवणूक, वाहतूक व जाहीरात करणे पूर्ण प्रतिबंधित असतानाही मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात हे उत्पादन अवैधरित्या खुलेपणाने विकले जात असल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
३१.	श्री. सुनिल कांबळे, वि.स.स.	पुणे महापालिका क्षेत्रामध्ये पुणे कॅन्टोनमेंट बोर्ड असून पूर्वी जकात आणि एल.बी.टी. हे कॅन्टोनमेंट बोर्डाचे प्रमुख आर्थिक स्त्रोत स्त्रोत बंद होऊन जी.एस.टी. करप्रणाली अस्तित्त्वात आलेली असल्याने महापालिका आणि शासनाकडून कॅन्टोनमेंट बोर्डाला सद्यःस्थितीत कोणतीही आर्थिक मदत मिळत नसल्यामुळे संकटात सापडले असल्याबाबत	-- " --
३२.	श्री.देवराव भोंगळे, वि.स.स.	राजुरा येथील श्री क्षेत्र गंगामाता देवस्थान, मारई पाटण या देवस्थानाला 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देऊन तेथे पाणी, निवास, इत्यादी आवश्यक त्या सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता असल्याबाबत	-- " --
३३.	श्री.चरणसिंग ठाकूर, वि.स.स.	नागपूर, अमरावती, वर्धा, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या भागातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना एक वर्ष होऊनही अद्यापपर्यंत अनुदान मिळालेले नसणेबाबत	-- " --
३४.	श्री.सुनिल प्रभू, वि.स.स.	मुंबईतील गोरेगाव पश्चिम, सिद्धार्थ नगर, पत्रा चाळ येथील पुनर्विकास प्रकल्पातील २७२ रहिवाशी कुटुंबांना शासनाने डिसेंबर, २०२२ च्या अधिवेशनात सोसायटीसोबत विकास करार (डी.ए.) आणि सभासदांसोबत वैयक्तिक करार (पी.ए.ए.) करण्याबाबत आश्वासन देऊनही अद्याप म्हाडाने करार न करता याकडे दुर्लक्ष केल्यामुळे या कुटुंबियांना नवीन इमारतीतील घरांचा ताबा मिळाला नसल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
३५.	श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स.	अहिल्यानगर तालुक्यात रुई छत्तीशी या गावातील लोकांनी त्यांच्या गावामध्ये अवैध धंदे सुरु असल्याने ते बंद करण्यासाठी सामूहिक उपोषण केल्याबाबत	-- " --
३६.	श्री. राहुल कुल, वि.स.स.	पश्चिम महाराष्ट्रामध्ये पुणे जिल्ह्याच्या परिसरातातील नागरिकांवर बिबट्याचे हल्ले प्रचंड प्रमाणात होत असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याबाबत	-- " --
३७.	श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स.	यवतमाळ जिल्ह्यातील रेमण्ड इको जेनिअन या कंपनीतील कर्मचारी त्यांच्या मागण्यांसाठी उपोषणास बसलेले असल्याबाबत	-- " --
३८.	श्री. विलास भुमरे, वि.स.स.	पैठण विधानसभा मतदारसंघातून जाणाऱ्या सुकणा व बेंबळा या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे या नद्यांचे पात्र अरुंद झालेले असल्यामुळे या दोन्ही नद्यांचे खोलीकरण करण्याची आवश्यकता	-- " --
३९.	श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.	संपूर्ण महाराष्ट्रातील ग्राम रोजगार सेवक यांनी विविध मागण्यांसाठी आंदोलनाच्या माध्यमातून मांडलेल्या मागण्यांबाबत	-- " --
४०.	श्री. शंकर जगताप, वि.स.स.	हिंजवडी, पुणे येथे दिनांक १ डिसेंबर २०२५ रोजी आयटी कंपनीच्या एका मद्यधुंद वाहन चालकाने पदपथावरुन चालणाऱ्या ५ व्यक्तींना चिरडल्याने मृत्यूमुखी पडले असल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
४१.	श्री. अमोल जावळे, वि.स.स.	राज्यातील टोकरे कोळी, महादेव कोळी जातीचे आदिवासी समाजबांधव आझाद मैदान येथे गेल्या २-३ दिवसांपासून उपोषणाला बसलेले असल्याबाबत	-- " --
४२.	श्री. बाबुराव कोहळीकर कदम, वि.स.स.	सिंदखेडराजा, (जि.बुलढाणा) हे राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थानी मोठया प्रमाणात सुविधांचा अभाव असून त्याला 'ब' किंवा 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करणे आवश्यक असल्याबाबत	-- " --
४३.	डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स.	शासनाने पीक पाहणीसाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत वाढवून द्यावी किंवा ऑफलाईन नोंदणी करण्यासाठीचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत	-- " --
४४.	श्री. प्रताप अडसड, वि.स.स.	माकडांना पकडण्यासाठी १० हजार रुपयांची मर्यादा परवडत नसल्यामुळे ती शासनाने काढून टाकण्याबाबत	-- " --
४५.	श्री. शंकर मांडेकर, वि.स.स.	भोर, राजगड तालुक्यातील शेतकऱ्यांना महाबीजच्या वतीने देण्यात आलेले परभणी शक्ती हे ज्वारीचे वाण निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत	-- " --
४६.	डॉ. अतुलबाबा भोसले, वि.स.स.	उंडाळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना सुरु करण्याची आवश्यकता	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
४७.	श्री. प्रविण दटके, वि.स.स.	नागपूर सुत गिरणी कर्मचाऱ्यांना मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ५० कोटी रुपये मंजूर झालेले असूनही त्यानंतर २ अधिवेशने झाली तरी देखील पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून हे पैसे मिळालेले नसल्याबाबत	-- " --
४८.	श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स.	नाशिक येथे देवळाली परिसरात प्रस्तावित नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत	१८ मार्च, २०२६
४९.	श्री.अबू आझमी, वि.स.स.	हिंदी भाषण प्रलंबित	-- " --
५०.	श्री. संदिप क्षीरसागर, वि.स.स.	बीड शहरामध्ये अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी अद्यावत वसतीगृह सुरु करण्याबाबत	-- " --
५१.	श्री. संजय पोतनीस, वि.स.स.	विमनपतन प्राधिकरणाच्या हद्दीतील जागेवरील कलिना विधानसभा क्षेत्रातील प्रकल्प बाधित झोपडीधारकांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी बैठक आयोजित करणेबाबत	-- " --
५२.	श्री. अनुपभैया अग्रवाल, वि.स.स.	"धुळे शहरातील घरगुती गॅस समस्यांबाबत	-- " --
५३.	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.	अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे दिनांक १७ मार्च २०२६ रोजी इयत्ता ६ वी मध्ये शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर झालेल्या ॲसिड हल्ल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
५४.	श्री. सिध्दार्थ शिरोळे, वि.स.स.	महाराष्ट्र राज्यासाठी स्वतंत्र 'आयुष' मंत्रालय स्थापन करणेबाबत	-- " --
५५.	श्री. भास्कर जाधव, वि.स.स.	नांदेडच्या हडको येथील शामराव कदम होमिओपॅथिक कॉलेजमध्ये दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या वाजेगाव येथील आकांक्षा गायकवाड या मुलीने वसतिगृहात गळफास घेऊन आत्महत्या केल्याबाबत	-- " --
५६.	श्री. बबनराव लोणीकर (यादव), वि.स.स.	वीज बिलाची प्रलंबित रक्कम भरल्याशिवाय "हर घर सोलार" योजनेअंतर्गत लाभ मिळणार नाही ही जाचक अट रद्द करून टप्प्याटप्प्याने किंवा सौर वीज बिलातून प्रलंबित रक्कम कपात करण्याबाबत	-- " --
५७.	श्री. राजकुमार बडोले, वि.स.स.	मुंबई विद्यापीठातील पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांबाबत नियम व प्रक्रियेचा भंग झाल्याबाबत	-- " --
५८.	श्री. श्याम खोडे, वि.स.स.	वाशीम जिल्ह्यात विद्युत घर्षणामुळे आग लागलेल्या गव्हाच्या पिकांची नुकसान भरपाई मिळणेबाबत	-- " --
५९.	श्री. राजन नाईक, वि.स.स.	वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात अर्बन रिन्युअल स्किम URS प्रभावीपणे राबविण्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
६०.	श्री. विकास ठाकरे, वि.स.स.	पश्चिम नागपूरमधील मानकापूर परिसरातील संत ज्ञानेश्वर नगर झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या प्रत्येक नागरीकांचा मालकी हक्क पट्टा हा अधिकार देण्याबाबत	-- " --
६१.	श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.	"मौजे एकलारा, ता. चिखली, मोजे शिरपूर, ता. बुलढाणा व मौजे धाड (जिल्हा बुलढाणा) येथील शेतकऱ्यांनी खरेदी केलेले मका बियाणे बोगस निघाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेबाबत	-- " --
६२.	श्रीमती श्वेता महाले, वि.स.स.	चिखली येथील बॉम्बे मार्केटमधील आगीत सहा ते सात दुकानांचे नुकसान झाले त्यांना शासनाने मदत करण्याबाबत	-- " --
६३.	श्री. शंकर जगताप, वि.स.स.	पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना नदी सुधार प्रकल्पास गती देणेबाबत	-- " --
६४.	श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.	राज्यात नाफेडकडून खरेदी करताना रबी हंगाम २०२४-२५ साठी हरभरा पिकाच्या खरेदी उत्पादन मर्यादेमध्ये वाढ करणेबाबत	-- " --
६५.	श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स.	विदर्भातील अमरावती, यवतमाळ, अकोला, वर्धा, बुलढाणा या ठिकाणी कापूस खरेदीसाठी आवश्यक केंद्रे व इतर पायाभूत व्यवस्था तातडीने निर्माण करण्यात यावी तसेच दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजीपर्यंत कापूस खरेदीला मुदतवाढ देण्यात यावी."	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
६६.	श्री.नारायण कुचे, वि.स.स.	जालना जिल्ह्यातील बदनापूर, अंबड व भोकरदन तालुक्यांमध्ये कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शेती अवजारे अनुदान व बी-बियाणे योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याबाबत	-- " --
६७.	श्री.नारायण कुचे, वि.स.स.	जालना जिल्ह्यातील बदनापूर व अंबड तालुक्यांतील हजारो शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० साठी पैसे भरलेले असताना अद्यापपर्यंत संबंधित ठेकेदाराने त्या शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये सौर पंप बसविलेले नसल्याबाबत	-- " --
६८.	श्री.संजय गायकवाड, वि.स.स.	महाराष्ट्राच्या आरोग्य विभागात सर्व सेवा पुरवठ्याची व्यवस्था बिव्हीजी कंपनी, स्मार्ट कंपनी व प्लेसहोल्ड कंपनीव्दारे राज्यपातळीवर कंत्राट न देता सदर सेवा पुरविण्यासाठी जिल्हापातळीवर निविदा प्रक्रिया राबवून जिल्हास्तरावरील संस्थांना देण्याबाबत	-- " --
६९.	डॉ.नितीन राऊत, वि.स.स.	कोराडी थर्मल पॉवर प्रकल्पात फ्ल्यू गॅस डिसल्फरायझेशन प्रणाली बसविण्यात आली नसल्यामुळे सदर परिसरातील पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
७०.	श्री. योगेश सागर, वि.स.स.	कांदिवली व बोरीवलीतील नामांकित व प्रतिष्ठित पवार पब्लिक शाळा प्रशासन २५ टक्के आरक्षित प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांकडून वह्या, पुस्तके, गणवेश व लेखन सामग्रीसाठी शुल्क मागणी करीत असल्याबाबत	-- " --
७१.	श्री. दिलीप सोपल, वि.स.स.	सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील पाटबंधारे खात्याचे मायनर व मध्यम सिंचनाचे तलावांची पाणीपट्टी थकबाकी वसूली अन्यायकारक पद्धतीने करण्यात येत असल्याबाबत	-- " --
७२.	श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.	नाशिक जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, फसवणूक व महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत चिंताजनक घटना घडत असल्याबाबत	-- " --
७३.	श्री. सुनील प्रभू, वि.स.स.	मुंबईतील नागरी निवारा, मालाड पूर्व येथील नगर भूमापन क्रमांक ८२७४/४ यावर प्रसुतीगृह, लहान मुलांचे रुग्णालय, एनआयसीयु व सह प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे देण्यात आला असून या प्रस्तावावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याबाबत	-- " --
७४.	श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स.	सन १९९३ मध्ये झालेल्या प्रलयकारी भुकंपामध्ये औसा व निलंगा तालुक्यातील भुकंपग्रस्त अ, ब व क वर्गवारीच्या गावातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आराखडा मंजूर करण्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
७५.	श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स.	वर्सोवा-भाईंदर हा जोड रस्त्याच्या कामासाठी कापण्यात येणाऱ्या ४५ हजार मँग्रोजचे काम थांबविण्याबाबत	-- " --
७६.	श्री. अमोल खताळ, वि.स.स.	राज्यातील जिल्हा अहिल्यानगर येथील संगमनेर तालुक्यातील अनेक गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनी सन २०२१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'तीन-ए' अधिसूचनेअंतर्गत सुरत-चेन्नई राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पासाठी अधिसूचित करण्यात आल्या असून या प्रकल्पास केंद्रीय मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरी मिळालेली नसणे तसेच भूसंपादनाचा मोबदला शेतकऱ्यांना मिळालेला नसल्याबाबत	-- " --
७७.	श्री. प्रविण तायडे, वि.स.स.	राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (RBSK) या योजनेंतर्गत (cochlear implant) कॉक्लियर इम्प्लांट या शस्त्रक्रियेसाठी लागणारी वयोमर्यादा ० ते २ वर्षे असून ती ६ ते ७ वर्षे करण्याबाबत	-- " --
७८.	श्री. सिध्दार्थ खरात, वि.स.स.	राज्यात नाभिक समाजाला हजाम किंवा वारिक असे न संबोधता नाभिक असेच संबोधण्याबाबत	-- " --
७९.	श्री. चेतन तुपे, वि.स.स.	हडपसर येथे जलसंपदा विभागाने कॅनॉलमध्ये सोडलेले पाणी मांजरी, गोपाळपट्टी, घुलेवस्ती या भागातील झोपडपट्टीत आणि बैठ्या घरांमध्ये राहणाऱ्या अनेक गोरगरीब लोकांच्या घरात शिरुन मोठे नुकसान झाल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
८०.	श्रीमती सुलभा गायकवाड, वि.स.स.	कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पूर्व उल्हासनगर मधील अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागात अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याबाबत	-- " --
८१.	श्रीमती रंजना जाधव, वि.स.स.	छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श नागरीक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक मंडळाने सुमारे २०२ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याबाबत	-- " --
८२.	श्री.प्रविण दटके, वि.स.स.	राज्यात आर्थिक फसवणुकीच्या सायबर गुन्हांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधासाठी धोरण तयार करण्याबाबत	-- " --
८३.	डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स.	सांगोला तालुक्यातील अनेक शेतकरी टेंभू-म्हैसाळ योजना आणि नीरा उजवा कालवा या प्रकल्पावर अवलंबून असल्यामुळे सदर प्रकल्पांतर्गत उन्हाळी आवर्तन सुरु करण्याबाबत	-- " --
८४.	श्री.विठ्ठल लंघे, वि.स.स.	राज्य सरकारने शेतकऱ्यांना सौर ऊर्जा पंप योजना देत असताना शेतीसाठी नवीन वीज कनेक्शन देणे बंद केले असल्याबाबत	-- " --
८५.	डॉ. अशोकराव माने, वि.स.स.	राज्यातील चांदी व्यवसायासाठी जगप्रसिध्द असलेले कुपरी गाव व परिसरातील चांदी उद्योगाला ऊर्जितावस्था देण्यासाठी विशेष पॅकेज जाहीर करण्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
८६.	श्रीमती सना मलिक, वि.स.स.	मुंबईतील ट्रॉम्बे, गोवंडी, मानखुर्द व चिता कॅम्प परिसरात "ड्रीम सनशाईन डिजिटल प्रा. लि." या कंपनीमार्फत सुमारे १२५ गुंतवणूकदारांची अंदाजे ५.१३ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक झाली असल्याबाबत	-- " --
८७.	श्री.काशिनाथ दाते, वि.स.स.	ढवळपुरी (ता.पारनेर, जि. अहिल्यानगर) येथील श्री दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यांनी एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याबाबत	-- " --
८८.	डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स.	मुंबई विद्यापीठातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या इमारत निर्मितीसाठी व सुविधांसाठी अद्यापपर्यंत पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याबाबत	-- " --
८९.	श्री.अर्जून खोतकर, वि.स.स.	जालना जिल्ह्यातील कामगारांच्या बाबतीत केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत	-- " --
९०.	श्री. रईस शेख, वि.स.स.	**हिंदी भाषण प्रलंबित**	-- " --
९१.	श्री. अमिन पटेल, वि.स.स.	**हिंदी भाषण प्रलंबित**	-- " --
९२.	श्री.विक्रम पाचपुते, वि.स.स.	शेतकऱ्यांनी CMEGP योजनेअंतर्गत कृषी फवारणीसाठी खरेदी केलेल्या ड्रोनचे नुकसान झाल्यानंतर त्यासाठी केलेला क्लेम विमा कंपन्यांनी सर्रासपणे धुडकवून लावल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
९३.	श्री. शेखर निकम, वि.स.स.	'सारथी' (छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था) मार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता परदेशी शिक्षण शिष्यवृत्तीसाठी १५ मे २०२५ रोजीच्या जाहिरातीमधील एकूण ७५ जागांपैकी पहिल्या निवड समितीच्या बैठकीत केवळ ४४ जागा भरून उर्वरित जागा अद्यापही रिक्त ठेवल्याबाबत	-- " --
९४.	श्री.कैलास घाडगे-पाटील, वि.स.स.	महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या परीक्षा व पिकांसाठी उन्हाचा तडाका वाढल्यामुळे ग्रामीण भागातील वाड्या वस्त्यावरील लोडशेडींग बंद करावी आणि शेती पंपाला दररोज किमान ८ तास सुरळीतपणे पुरेशा दाबाने वीज पुरवठा करण्याबाबत	-- " --
९५.	डॉ. जितेंद्र आव्हाड, वि.स.स.	मुंब्रा-कळवा येथे दाभोळकर नावाचा एक रोडच्या बाजूला असलेल्या जुन्या पुलाचे रुंदीकरण करण्याबाबत	-- " --
९६.	श्री.राजेश वानखडे, वि.स.स.	संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नव्याने निर्माण झालेल्या व ग्रामीण चेहरा असलेल्या नगरपंचायतींच्या कार्यकक्षेत रोजगार हमी व कृषी विभागाच्या योजना कार्यान्वित करण्याकरिता व हक्काच्या रोजगार निर्मिती करिता धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
९७.	श्री.हेमंत ओगले, वि.स.स.	अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर व कमालपूर येथे गोदावरी नदीवर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यांची दुरावस्था तसेच शनिदेवगाव उच्च पातळी बंधारा प्रकल्प सध्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्याकडून मंजूरी मिळण्याबाबत	-- " --
९८.	श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.	वाढवण बंदर प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या पालघर जिल्ह्यातील जमीनींच्या भरपाई दर हा स्थानिक बाजारभाव, उत्पादनक्षमता व शेतकऱ्यांच्या दीर्घकालीन उपजीविकेच्या दृष्टीने अत्यल्प व अन्यायकारक असल्याबाबत	-- " --
९९.	श्री.अनंत (बाळा) नर, वि.स.स.	मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील के-पूर्व विभागाचे विभाजन करून नव्याने करण्यात आलेल्या के-उत्तर आणि के-दक्षिण अशा दोन विभागामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत	-- " --
१००.	श्री.सुमित वानखेडे, वि.स.स.	प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत वर्धा जिल्ह्यात घरकुलांचे वर्ककोड अद्यापी नरेगा साईटवर जनरेट झालेले नसल्यामुळे त्याचा लाभ मिळत नसल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१०१.	श्री.हिरामण खोसकर, वि.स.स.	त्र्यंबकेश्वर- नाशिक हा सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एमएमआरडीए यांनी मंजूर केलेला रस्ता ४५ मीटरने कमी करण्यात आला नसल्याबाबत	-- " --
१०२.	श्री.मनोज जामसुतकर, वि.स.स.	मुंबईतील भायखळा येथील माझगांव-ताडवाडी येथील बीआयटी चाळ, आगरीपाडा बीआयटी चाळ, लवलेन आणि मुंबई सेंट्रल या बीआयटी चाळींचा पुनर्विकास गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला असल्याबाबत	-- " --
१०३.	श्री.संजय देरकर, वि.स.स.	वणी येथील आदिवासी विकास विभागाच्या अनेक आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या जेवणाच्या गुणवत्तेत मोठ्या प्रमाणात घसरण होत असल्याबाबत	-- " --
१०४.	श्री.गजानन लवटे, वि.स.स.	राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांच्या दिरंगाईमुळे प्रलंबित असल्याबाबत	-- " --
१०५.	श्री.प्रविण स्वामी, वि.स.स.	उमरगा-लोहारा तालुक्यांमध्ये प्रचंड गारपीट होऊन ५०० ते १००० हेक्टरवरील केळी, द्राक्ष, कांदे, ज्वारी, गहू, करडीसह इतर अनेक पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असल्याबाबत	-- " --

क्रमांक	सदस्याचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात उपस्थित केल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१०६.	श्री.सुरेश भोळे, वि.स.स.	राज्यातील ओबीसी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी व शिष्यवृत्तीसाठी जात प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत	-- ” --
१०७.	श्री.संजय केळकर, वि.स.स.	मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आदर्श बीएमसी स्टॉल लायसन्स होल्डर युनियनमधील ४ हजार स्टॉलधारकांना सर्व योजनांचा लाभ देण्याबाबत	-- ” --

****

विवरण क्रमांक - ३४

औचित्याच्या मुद्दयांवरील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

निरंक

****

विवरण क्रमांक - ३५

पॉईंट ऑफ इन्फॉरमेशनच्या माध्यमातून मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांसंदर्भात मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार संबंधीत मंत्र्यांनी केलेली निवेदने

निरंक

***

विवरण क्रमांक- ३६

अल्पकालीन चर्चा

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१.	सर्वश्री. संजय केळकर, निलेश राणे, शेखर निकम, प्रशांत ठाकूर, वि.स.स.	"राज्यात कोकण विभागाला (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) लाभलेले नैसर्गिक सौंदर्य, समुद्रकिनारे, डोंगररांगा आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांमुळे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र ठरले असणे, कोकणात विशेषतः मुख्यमंत्री कृषी आणि अन्न प्रक्रिया योजना, फळ प्रक्रिया योजना, अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादींना कृत्रिम बुध्दिमतेची सांगड घालून काजु बोंडापासून अल्कोहोल निर्मिती, आंब्यासारखे नगदी व निर्यातक्षम उत्पन्न व मच्छिमारी इत्यादींमुळे रोजगार निर्मिती झाली असणे, अपूर्ण पायाभुत सुविधा, वारंवार होणारी पूरस्थिती, औद्योगिक गुंतवणूकीचा अभाव व युवकांचे स्थलांतर या प्रमुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कोकण विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता, देशी गोवंश संवर्धन, 'कोकण कपिला' प्रसार व ब्रिडींग सेंटरसाठी विशेष अनुदान देण्याची आवश्यकता, कोकण कृषी विद्यापीठांतील रिक्त पदे भरण्याची आवश्यकता, या विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर कृषी शिक्षण संस्था स्थापन करण्याची आवश्यकता, आसाम	१८ मार्च, २०२६ रोजी दोन्ही सूचनांवर एकत्रित चर्चा होऊन दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी उत्तर दिले.

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		राज्याच्या धर्तीवर सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये किमान १० टक्के बांबु उत्पादन आरक्षित करण्याचे धोरण राबविण्याची आवश्यकता, मुंबई-गोवा महामार्गाचे उर्वरित काम पुढील १ वर्षांत पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कालबध्द कार्यक्रम जाहिर करण्याची आवश्यकता, या महामार्गावर प्रत्येक २५ कि.मी. अंतरावर ट्रॉमा केअर सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, नर्सिंग कॉलेज आणि मरिन टॅक्नोलॉजी कॉलेज सुरु करण्याची आवश्यकता, कोकणातील धार्मिक स्थळांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, वन्यजीव प्राण्यांपासून शेतीचे नुकसान टाळण्यासाठी सह्याद्री संवर्धन प्रकल्प पूर्ण क्षमतेने राबविण्याची आवश्यकता, डोंगराळ भागातील पाण्याचे व्यवस्थापन करण्याची आवश्यकता, सौरऊर्जेचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकालात काढण्याची आवश्यकता, आयटी पार्क उभारुन युवकांसाठी स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता, अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालय शासन स्तरावर उभारण्याची आवश्यकता, आपत्कालीन परिस्थितीसाठी एअर ॲम्बुलन्स सेवा सुरु करण्याची आवश्यकता, कोकणचा कॅलिफोर्निया करण्याकरिता कोकण विकास प्रकल्पाचे मार्गदर्शन व उचित कार्यवाहीसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची आवश्यकता,	

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		सर्वसामान्य नागरिकांना उचित माहिती मिळावी यासाठी सार्वजनिक ऑनलाईन डॅशबोर्ड उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२.	सर्वश्री. भास्कर जाधव, आदित्य ठाकरे, सुनिल प्रभु, अजय चौधरी, अनंत (बाळा) नर, महेश सावंत, हारुन खान, वि.स.स.	"कोकणात पर्यटन व मत्स्य व्यवसाय विकास प्रकल्पांची घोषणा होऊनही न झालेली पूर्तता, गेल्या ८ ते १० वर्षापासून कोकणात सततची वादळे, चक्रीवादळे, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस इत्यादिमुळे आंबा, काजू इत्यादी फळबागायतदारांचे तसेच मच्छिमार व पर्यटन व्यवसायाचे झालेले नुकसान, शासनाकडून देण्यात येणारी तुटपुंजी मदत, गेल्या १८ वर्षापासून प्रलंबित असलेला मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, ग्रीन फिल्ड महामार्गाची केवळ घोषणा, चिपळूण-कराड रखडलेला रेल्वे प्रकल्प, रासायनिक कारखान्यांमुळे नद्या, समुद्र व जमीनी प्रदुषित होणे, रोजगार नसल्यामुळे कोकणातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त घरे बंद असणे, मत्स्य दुष्काळ व मच्छीमारांच्या कर्ज माफीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, कोकणातील संपूर्ण किनारपट्टी सिडकोला देण्याचा घातलेला घाट, मुद्दाम वणवे लावून नष्ट होत असलेली वनसंपदा, माकडे व अन्य प्राण्यांपासून शेती व बागायतदारांचे होत असलेले नुकसान, जलजीवन मिशन योजनेचा कोकणात उडालेला बोजवारा, कोकणातील गेल्या २५ वर्षापासून प्रलंबित असलेले सिंचन प्रकल्प, बचत	१८ मार्च, २०२६ रोजी दोन्ही सूचनांवर एकत्रित चर्चा होऊन दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी उत्तर दिले.

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ नसणे, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, कोकणच्या विकासासाठी अनेक समित्या नियुक्त होणे, सदर समित्यांच्या अहवालातील शिफारशीवर कोणतीही कार्यवाही न होणे, कोकणातील मुलभूत प्रश्नांविषयी शासनाने करावयाच्या उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.”	

****

विवरण क्रमांक - ३७

अल्पकालीन चर्चेच्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(म.वि.स. नियम १०१ अन्वये)

निरंक

****

विवरण क्रमांक - ३८

लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये)

एकूण प्राप्त सूचना : ३१०३
एकूण स्विकृत संख्या : ४८६
एकूण चर्चा झालेले संख्या : १२५

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१	सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, नरेंद्र भोंडेकर, मोहन मते, बबनराव यादव (लोणीकर), रामदास मसराम, वि. स. स.	" राज्य शासनाच्या दिनांक २५ मार्च २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी २० हजार पर्यंत बोनस जाहीर करणे, धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस जाहीर करुन शासनाने आर्थिक संकटातुन मुक्त करणे, सन २०२५ मधील सप्टेंबर व ऑक्टोबर या महिन्यात अवकाळी पाऊसामुळे पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होणे, धान उत्पादक	दिनांक २४ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याने त्यांना बोनस जाहीर करणे अत्यंत आवश्यक असणे, नोंदणीकृत धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करावा अशी राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांकडून मागणी होणे, माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२५ दरम्यान अवकाळी पावसामुळे झालेल्या धान उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचा व आर्थिक संकटाचा विचार करुन धान उत्पादन शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार बोनस जाहीरर करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही.”	
२	श्री. धनंजय मुंडे, वि. स .स.	"राज्यातील महामार्गांवर चालविण्यात येत असलेल्या खाजगी स्लीपर कोच बसेसना वारंवार लागणारी भीषण आग व त्यामुळे निष्पाप प्रवाशांचे होणारे होरपळून मृत्यू, या कारणास्तवव राज्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर झालेला असणे, दिनांक २ जानेवारी, २०२६ रोजी समृद्धी महामार्गावर मुंबईहून बुलढाण्याकडे जाणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सला आग लागून बस पूर्णतः जळूनन एका प्रवाशाचा मृत्यू होणे व बसमधील ३२ प्रवासी थोडक्यात	दिनांक २४ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बचावणे, यापूर्वी स्लीपर बसला आग लागून माहे जुलै २०२३ मध्ये सिंदखेडराजा येथे २५ प्रवाशांचा, माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये १२ प्रवाशांचा मृत्यूच्या घटना घडलेल्या असणे, अशा घटना वारंवार घडत असूनही ठोस सुरक्षा उपाययोजना झालेली नसणे, चीन-युरोपातील अनेक देशांमध्ये सुरक्षेच्या कारणास्तव स्लीपर कोचवर बंदी असताना महाराष्ट्र राज्यातत मात्र निकृष्ट दर्जाची अंतर्गत वायरिंग, आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याच्या व्यवस्थेचा अभाव, तातडीचा इशारा देणारी यंत्रणा अपुरी असतानाही या बसेस राजरोसपणे चालविण्यात येत असणे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून बसेसच्या सुरक्षा मानकाबाबत होणारे अक्षम्य दुर्लक्ष, चालकांच्या बेफाम वेगामुळे प्रवाशांचे प्राण धोक्यात येत असूनही प्रशासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने या सर्व घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून बसेसच्या अंतर्गत संरचनेत बदल करण्याचे बंधनकारक नियम लागू करावेत आणि परदेशातील धर्तीवर राज्यात स्लीपर कोचवर बंदी किंवा अत्यंत कठोर सुरक्षा मानके लागू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३	सर्वश्री. सुनिल प्रभू, चेतन तुपे, राजकुमार बडोले, प्रतापराव पाटील चिखलीकर, अनिल पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. राजेश विटेकर, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री. शंकर मांडेकर, संजय केळकर, सुभाष देशमुख, वि. स .स.	" राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत गत वर्षी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ पासून राज्यव्यापी कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेअंतर्गत ३ कोटी ५ लाख नागरिकांची तपासणी केल्यानंतर त्यातून ४१ हजार १६९ संशयीत कर्करुग्णांची नोंद झाली असून बायोप्सी झाल्यानंतर १६७७ जणांना कर्करोगाचे निदान झाले असून ४१६ रुग्णांवर सार्वजनिक आरोग्य संस्थांमार्फत उपचार करण्यात येत असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास येणे, मुंबई हे शहर फुफ्फुस कर्करोगाचे हॉटस्पॉट बनले असून केवळ धुम्रपान करणाऱ्यांपूरता हा रोग मर्यादीत राहीला नसून शहरातील विषारी हवेमुळे नॉनस्मोकर्सही या रोगाला बळी पडले असणे, मुंबईतील आकडेवारीनूसार फुफ्फुस कर्करोगाच्या रुग्णांमध्ये ५७% ॲडेनोकार्सिनोमा, २८% स्क्वॅमस सेल कार्सिनोमा आणि १६% स्मॉल सेल कार्सिनोमा आढळून येणे, निदान झालेल्या कर्करुग्णामध्ये मुख, गर्भाशय व स्तनाशी सबंधीत सर्वाधिक रुग्णांची नोंद करण्यात येणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यात वाढते कर्करोगाचे प्रमाण रोखण्यासाठी, शासनाने टाटा या खाजगी रुग्णालयसह शासकीय	दिनांक २४ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रुग्णालयांना देखील आवश्यक निधी तातडीने मंजूर करुन औषधोपचार सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
४	सर्वश्री. अतुल भातखळकर, काशिनाथ दाते, सुधीर मुनगंटीवार, अबू आझमी, गोपिचंद पडळकर, सुरेश धस, वि. स .स.	चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याला खासगी सावकारांनी कर्जाच्या विळख्यात ओढून परदेशातील कंबोडियात जाऊन त्याची किडनी विकण्यास भाग पाडल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, संबंधित शेतकऱ्याने ब्रह्मपुरी येथील एका सावकाराकडून एक लाख रुपये व्याजाने घेतलेले असता संबंधित सावकाराने अवाजवी व्याज आकारल्याने १ लाखाची रक्कम ७४ लाखावर जाणे, मात्र नापीक जमीन असल्यामुळे कर्ज फेडणे शक्य न झाल्याने शेतकऱ्याने आपली जमीन व मोटरसायकल विकूनही कर्ज न फिटल्याने शेवटी परदेशातील कंबोडियात जाऊन त्याची एक किडनी विकल्याचे वैद्यकीय अहवालातून उघडकीस येणे, चंद्रपूर आणि नागभीड परिसरातून निदर्शनास आलेल्या किडनी रॅकेट प्रकरणाचे संबंध दिल्ली, तामिळनाडू आणि पंजाबपर्यंत पसरले असल्याचे तसेच यामध्ये कंबोडियासारख्या परदेशातील रुग्णालयांचा सहभाग असल्याचे उघड होणे, राज्यात	दिनांक २५ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सहकारी संस्था, पतपेढ्या, राष्ट्रीय बँका यांची मोठ्या प्रमाणात सुविधा असतानाही खासगी परवानाधारक सावकारांच्या संख्येत वाढ झालेली असणे, या सावकारांविरुद्ध राज्य शासनाने सावकारी प्रतिबंधक कायदा, मानवी अवयव तस्करी प्रतिबंधक कायदा व इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता, राज्यातील ग्रामीण भागात फोफावलेली अवैध सावकारी मोडून काढण्यासाठी आणि गरीब शेतकऱ्यांना या किडनी रॅकेटपासून वाचवण्यासाठी विशेष तपास पथकांमार्फत (SIT) राज्यव्यापी कारवाई मोहीम राबवण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.	
५	डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. हेमंत ओगले, अमित विलासराव देशमुख, रोहित पवार, वि. स .स.	राज्यात मुलींच्या जन्मदरामध्ये वाढ व्हावी यासाठी लेक लाडकी, माझी कन्या भाग्यश्री, सुकन्या समृध्दी योजना यांसारख्या अनेक योजना असतानाही १ हजार पुरुषांमागे महिला जन्मदराचे प्रमाण ८७० ते ८९४ असल्याची बाब दिनांक ९ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास आलेली असणे, गर्भधारणापूर्व, प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा असतानाही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात मुलींच्या जन्माचे स्वागत	दिनांक २५ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		होत नसल्याचे दिसून येणे,राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षणामध्ये महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यांत लेक नकोशी असल्याची गंभीर माहिती उघडकीस येणे,मुलगी म्हणजे ओझे,जबाबदारी, घराण्याची अप्रतिष्ठा या पारंपारिक जोखडातून महाराष्ट्र अजूनही बाहेर पडलेला नसल्याची बाब राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात नोंदवलेल्या मुलींच्या घटत्या जननदरांवरुन दिसून येणे,गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा पारीत करणारे महाराष्ट्र हे जगातील पहिले राज्य असतांनाही सदरचे कायदे डावलून शहरी,निमशहरी आणी महानगरांमध्ये गर्भलिंग निदान व गर्भपात केंद्रे प्रशासकीय व्यवस्थेच्या आशीर्वादाने राजरोसपणे सुरु असणे,महाराष्ट्रात ५४ हजारपेक्षा जास्त मुली गर्भातच मारल्या जात असणे,सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन कार्यवाही करण्याची सामाजिक संघटना,लोकप्रतिनीधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचेकडे दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार मागणी करणे, या प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई व याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,परिणामी राज्यात महिला जन्मदराचे प्रमाण चिंताजनक पातळीवर असल्याने या प्रकरणी	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही,उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.	
६	सर्वश्री. हारुन खान, मोहन मते, वि. स .स.	" पुणे येथील शासकीय ससून रुग्णालयातून १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या पॉक्सो (POCSO) या गंभीर गुन्ह्यात अटकेत असलेल्या एका आरोपीने एमआयसीयू वार्डच्या बाथरूमची काच तोडून पलायन केल्याची घटना दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी उघडकीस आली असणे, एमआयसीयू हा अतिसंवेदनशील विभाग असताना आरोपी पलायनाच्या वेळी तेथे तैनात पोलीस बंदोबस्त, सुरक्षा रक्षक व सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत नसल्यामुळे ही चूक घडल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, ससून रुग्णालयातून यापूर्वीही ड्रग्ज प्रकरण, मर्डर प्रकरण व इतर विविध गुन्ह्यातील आरोपींनी पलायन केल्याच्या पार्श्वभूमीवर ससून रुग्णालय हे आरोपींसाठी 'सेफ पॅसेज' ठरत असल्याची बाब समोर येणे, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून पॉक्सो (POCSO) सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीच्या पलायनास जबाबदार असलेल्या पोलीस व रुग्णालय प्रशासनातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच	दिनांक २६ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ससूनसह राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये आरोपी रुग्णांसाठी स्वतंत्र उच्च सुरक्षा व्यवस्था लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
७	सर्वश्री. सुनिल कांबळे, भिमराव तापकीर, वि. स .स.	पुणे शहरामध्ये वाढत्या लोकसंख्येच्या व रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर आयसीयू बेडची उपलब्धता अपुरी असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असणे, शासकीय व खासगी रुग्णालयांमधील विद्यमान आयसीयू क्षमतेच्या तुलनेत गंभीर रुग्णांची संख्या अधिक असल्याने उपचारांसाठी प्रतीक्षा करावी लागण्याची स्थिती निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले असणे, सदर परिस्थितीमुळे आपत्कालीन उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना तातडीने आयसीयू सेवा उपलब्ध होण्यात अडथळे निर्माण होत असून रुग्णांचे नातेवाईकांना विविध रुग्णालयांमध्ये आयसीयू सेवा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावे लागणे, परिणामी आरोग्य व्यवस्थेवर अतिरिक्त ताण येत असून नागरिकांमध्ये अस्वस्थता व असुरक्षिततेची भावना निर्माण होत असणे, वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची क्षमता वाढवून शासकीय रुग्णालयांमध्ये आयसीयू बेडची संख्या वाढविण्याची आवश्यकता, अत्याधुनिक	दिनांक २७ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सुविधा उपलब्ध करून देणे तसेच आवश्यक मनुष्यबळ व वैद्यकीय उपकरणांची पूर्तता करण्याची आवश्यकता, सदरहू बाब विचारात घेऊन नागरिकांना वेळेवर व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनस्तरावर आवश्यक नियोजनात्मक व प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.	
८	सर्वश्री. मुरजी पटेल, रत्नाकर गुट्टे, वि. स .स.	मुंबईमधील अंधेरी पूर्व व अंधेरी पश्चिमला जोडणारा अंधेरी सबवे हा एकमेव मार्ग असून दर पावसाळ्यात सदरचा सबवे पाण्यात पूर्णपणे जात असणे, किंबहुना सबवेमध्ये पाणी साचत असणे, त्यामुळे अंधेरी पूर्व व अंधेरी पश्चिमेला जोडणारा एकमेव मार्ग बंद होत असल्याने प्रचंड प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असणे, अपघात होत असल्यामुळे नागरिकांची व प्रवाशांची सततची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असणे, सदरच्या गंभीर समस्यांबाबत प्रत्येक अधिवेशनात चर्चा होऊन त्यावर मार्ग काढण्यात येईल असेच आश्वासन मिळणे, परंतु आश्वासन पाळण्यात शासनाला येत असलेले अपयश, यामुळे जनमानसात तीव्र संतापाची निर्माण होत असलेली भावना, यामुळे अंधेरी सबवेबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याची नितांत असलेली	दिनांक २७ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
९	सर्वश्री. विक्रम पाचपुते, प्रविण दटके, वि. स .स.	राज्यातील लग्नसमारंभ,धार्मिक कार्यक्रमांमध्ये कृत्रिम फुले, प्लास्टिक फुगे व कमी दर्जाच्या प्लास्टिक खेळण्यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असणे, नैसर्गिक फुलांचा तुटवडा असल्याने या वस्तूंना पर्यायी मागणी असून त्याचा मानव आरोग्य, पर्यावरण, प्राणी-पक्षी आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत असणे, रसायनांचे वायू उन्हामुळे बाहेर पडून डोकेदुखी, त्वचाविकार, खाज, लालसरपणा, डोळयांची जळजळ, लहान मुलांमध्ये श्वसनाचे त्रास, प्लास्टिक व रंगातील दीर्घकालीन रसायनांमुळे कर्करोगासारख्या धोक्याची शक्यता संशोधनात अधोरेखित होत असणे, पशुधनावरील धोका, गाई, म्हशी व इतर पाळीव प्राण्यांच्या तोंडात कृत्रिम फुले/खेळणी गेल्यास आतड्याचे विकार, पचनसंस्था बंद पडणे, पर्यावरणीय हानी, डास-माशांचा प्रादुर्भाव वाढत असणे, कमी दर्जाच्या किंवा विषारी रसायनयुक्त प्लास्टिक फुले/फुगे/खेळण्यांवर तातडीने बंदी अथवा कठोर नियंत्रण घालण्याची आवश्यकता, पर्यावरण विभागाकडून गुणनियंत्रण तपासणी अनिवार्य करणे, लग्न व कार्यक्रमस्थळी वापरल्या	दिनांक २७ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जाणाऱ्या सजावटीच्या वस्तूंसाठी नॉन-टॉक्सिक प्रमाणपत्र सक्तीचे करणे, तपासणी व अंमलबजावणी करणे, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी बाजारातील अशा वस्तूंची नमूना तपासणी करणे, अनधिकृत उत्पादनांवर दरडोई दंड व जप्ती याची स्पष्ट कार्यवाही सूचना देणे, जनजागृती व पर्यायी प्रोत्साहन, नागरिकांना नैसर्गिक फुले, पुनर्वापर योग्य सजावट, फॅब्रिक डेकोरेशन यांचा वापर करण्यास प्रोत्साहन, नैसर्गिक फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन, अनुदान व बाजारपेठ उपलब्ध करणे, कार्यक्रमस्थळी व विवाह हॉलमध्ये प्लास्टिक सजावट वापरबंदीचे बोर्ड व दंडात्मक तरतुदी लागू करणे, वैज्ञानिक अहवाल व धोरण याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१०	श्री. संजय मेश्राम, वि. स .स.	नागपूर जिल्ह्यातील उमरेड-मोहपा मार्गावर दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी मुलीच्या बारावी परीक्षेसाठी दुचाकीवर निघालेल्या सुभाष भिवणकर व त्यांची मुलगी यांना ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यु होणे, धुरखेडा ग्रामपंचायत अंतर्गत कुंभारी, मोहपा या परिसरात मोठ्या प्रमाणावर गिट्टी खदानी असल्याने या रस्त्यावर दिवसभर ट्रक, टिप्पर व ट्रॅक्टर इत्यादी अवजड वाहनांची	दिनांक २७ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वाहतूक सुरू असणे, अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे होणे, रस्त्यावरील उखडलेली गिट्टी व उडणारी धूळ यामुळे प्रवास जीवघेणा ठरत असून उमरेड-मोहपा हा मार्ग धोकादायक झालेला असणे, या मार्गावरील जड वाहतूक तात्काळ बंद करून या रस्त्याची त्वरित दुरुस्ती करावी व अवैध वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याबाबत अनेक वर्षापासून स्थानिक नागरिक व ग्रामस्थानकडून होत असलेली मागणी, यासंदर्भात वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याने शासनाबाबत ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
११	सर्वश्री. महेश लांडगे, शंकर जगताप, वि. स .स.	भोसरी विधानसभा मतदार क्षेत्रातील पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक आणि निवासी अशा दोन्ही पट्टयातील वीज ग्राहकांना नियमितपणे वीज समस्यांना सामोरे जावे लागणे, समाविष्ट गावांत मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढलेली असून त्या तुलनेत वीज यंत्रणा सक्षम करण्यात आली नसणे, त्यामुळे वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी काही विकासकामे तात्काळ मार्गी लावणे आवश्यक असणे, सफारी पार्क	दिनांक २८ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मोशी अतिउच्चदाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्र उभारण्यात येणार असणे, मोशी, डुडुळगांव,आकुर्डी,चिखली,तळवडे याभागातील औद्योगिक व निवासी पट्टयातील वीज पुरवठा सुरळीत होणार असणे, चन्होली अतिउच्चदाब (ई.एच.व्ही.) उपकेंद्र उभारण्यात येणार असणे, त्यामुळे भोसरी,चहोली,दिघी,धानोरी याभागात पुरेशा दाबाने वीजपुरवठा करणे सुलभ होणार असणे, भोसरी गावठाण येथील नवीन स्विचिंग उपकेंद्र भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत ओव्हरहेड वीज वाहिन्यांचे भूमिगत वाहिन्यांमध्ये रुपांतर करणे, सवस्तिर योजना राबवणे, तळवडे येथील देवी इंद्रायणी स्विचिंग उपकेंद्रातून स्वतंत्र फिडर बे व भूमिगत काम तातडीने करण्याची योजना राबवत त्याला गती देण्याची नितांत आवश्यकता, भोसरी विभागांमधील वाढत्या शहरी करणाचा विचार करून चहोली, मोशी येथे अतीउच्चदाब उपकेंद्राचे प्रस्ताव सादर करणे, तसेच मुख्यअभियंता, पुणे परिमंडल यांचे सूचनेप्रमाणे भोसरी येथील सेंच्युरी इंका या अतिउच्चदाब उपकेंद्रामध्ये दोन पावर ट्रान्सफर्मर बसविण्याचा प्रस्ताव असणे, यासह मध्यम दाब स्वीचिंग स्टेशनसाठीही प्रस्ताव सादर केला असणे, त्यामुळे रहिवासी भागात तसेच औद्योगिक ग्राहकांना विजेची चांगली सेवा देणे सोयीचे होणार असल्या्ने याबाबत	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१२	श्री. दिलीप लांडे, वि. स .स.	मुंबईतील चांदिवली विधानसभा मतदारसंघातील तसेच उपनगरातील महानगरपालिकेच्या उद्यानात गर्दुल्ले व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचा वावर वाढल्याने नागरिकांना अस्वच्छता व असुरक्षितता निर्माण झालेली असणे, मुंबई महानगरपालिकेकडून नागरिकांच्या आरोग्यवर्धनासाठी, सकस वातावरणात व्यायाम, चालणे व विरंगुळ्यासाठी महानगरपालिकेकडून उद्याने सुरू करण्यात आली असणे, मागील काही दिवसांपासून या उद्यानात गर्दुल्ले व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांचा वावर वाढला असून त्यामुळे उद्यान परिसरात अस्वच्छता, काचेच्या बाटल्यांचे तुकडे, सिगारेटच्या तुकडयांचा खच पडलेला असणे, अस्वच्छतेमुळे दुर्गंधी पसरणे, रात्रीच्या वेळी मद्यपान व धूम्रपान यामुळे उद्याने गर्दुल्ल्यांचे अड्डे बनलेले असणे, या उद्यानात सकाळी व्यायामासाठी आणि फिरायला येणाऱ्या नागरिकांना त्रास व त्यांच्या जिवितास धोका निर्माण झालेला असणे, यास्तव या उद्यानातील अस्वच्छता व सुरक्षेच्यादृष्टीने शासनाकडून पोलीस गस्तत अथवा आवश्यक सुरक्षारक्षक नेमणे तसेच आवश्यक प्रकाशयोजना	दिनांक २८ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१३	सर्वश्री. बापूसाहेब पठारे, विजय शिवतारे, ॲड. राहूल कुल, श्री. सिध्दार्थ शिरोळे, वि. स .स.	पुणे शहर हे शिक्षणाचे माहेरघर, आयटी हब म्हणून ओळखले जाणे, शिक्षण, नोकरी व कायमस्वरूपी वास्तव्यासाठी दरवर्षी लाखो नागरिक शहरात येत असल्यामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढणे, वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रस्ते व पायाभूत सुविधा अपुऱ्या पडणे, वडगावशेरी मतदारक्षेत्रासह शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरिवाल्यांमुळे वाहतूक कोंडी व गोंगाट होत असणे, दहावी, बारावी तसेच इतर परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना, नागरिकांना प्रचंड त्रास होत असणे, यासंदर्भात महानगरपालिका अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई न होणे, उलट आर्थिक तडजोडीतून अधिकाऱ्यांकडून तक्रारी करणाऱ्या नागरिकांची नावे संबंधित व्यवसायिकांना सांगितली जाणे, त्यामुळे नागरिक व व्यवसायिक यांच्यात वाद निर्माण होऊन कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, सदर बाबी गंभीर स्वरूपाच्या असून शासनाने याची तातडीने दखल घेणे आवश्यक असणे, शहरातील मुख्य	दिनांक २८ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		व अंतर्गत रस्ते तात्काळ पथारीमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबविणे, यासह अनधिकृत पथारी व्यवसाय व ध्वनीप्रदूषणावर कारवाई करण्याची आवश्यकता, तक्रारदार नागरिकांची नावे गोपनीय ठेवण्याबाबत निर्देश देण्याची कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून निष्काळजीपणा आढळल्यास त्यांचे विरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१४	श्री. वरुण सरदेसाई, वि. स .स.	मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील मौजे कोले कल्याण भारतनगर या वसाहतीच्या म्हाडा अभिन्यासाच्या एकूण ३,०३,८१५.६० चौ. मी. म्हणजेच सुमारे ४४ एकर क्षेत्रफळापैकी सुमारे १,१३,१२२ चौ. मी. मोकळ्या भूखंडावर झोपडीधारकांनी स्वतः बांधकाम केलेले असणे, या झोपडीधारकांना सद्यस्थितीमध्ये सोयीसुविधा पुरविण्याचे काम म्हाडा मार्फत केले जात असणे, भारतनगर वसाहतीचा समूहह पुनर्विकास होऊन रहिवाशांना उच्चतम दर्जाच्या सोयीसुविधा (Amenities),” पायाभूत सुविधा (Infrastructure) मिळावे याकरिता म्हाडामार्फत भारतनगर, सी.टी.एस. क्र. ७६४३ (पार्ट), वांद्रे (पूर्व) येथील पुनर्विकासस म्हाडाच्या ३३/५ योजनेंतर्गत करण्याचा प्रस्ताव अपर	दिनांक २८ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दिनांक ८ ऑगस्ट, २०२५ रोजी प्रस्ताव सादर केलेला असणे, सदर प्रस्तावास मान्यता देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, सदर प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व शासनाची भूमिका.	
१५	सर्वश्री. चेतन तुपे, अमित साटम, धनंजय मुंडे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. सुनिल प्रभू, सुधीर मुनगंटीवार, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नानाभाऊ पटोले, अस्लम शेख, अमीन पटेल, संजय मेश्राम, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. प्रतापराव पाटील	मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ रोजी आडोशी बोगद्याजवळ प्रोपिलिन ज्वलनशील रसायन वायू वाहून नेणारा टँकर उलटला असणे, टँकरमधून सुरू असलेल्या वायू गळतीमुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव वाहतूक पूर्णतः बंद ठेवल्याने ३६ तास महामार्ग ठप्प असणे, हजारो प्रवासी, वाहनचालक, रुग्ण व विद्यार्थ्यांचे अन्न-पाण्याविना, मूलभूत सोयीसुविधांविना महामार्गावर अडकून पडून अतोनात शारीरिक व मानसिक हाल झालेले असणे, दोन्ही औद्योगिक महानगरांचे कोट्यवधी रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, अशा गंभीर आपत्कालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेमध्ये कमालीचा समन्वयाचा अभाव दिसून येणे, अडकलेल्या प्रवाशांना तातडीने माहिती	दिनांक २८ फेब्रुवारी , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	चिखलीकर, अनिल पाटील, ज्ञानेश्वर कटके, राजेश विटेकर, विठ्ठल लंघे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री. मुरजी पटेल, शंकर जगताप, मनोज कायंदे, मोहन मते, श्रीमती. मनिषा चौधरी, श्री.बाबाजी काळे, वि. स .स.	देण्यासाठी व वाहतूक वळवण्यासाठी शासनाकडे कोणतीही सक्षम आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था सज्ज नसणे, या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन कार्यवाही व उपाययोजना करण्याची सामाजिक संघटना, लोकप्रतिनीधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार तक्रारी केलेल्या असणे, वाहतूक कोंडीमुळे होणारा त्रास लक्षात घेऊन भविष्यात अशी घटना घडल्यास कोणत्या प्रकारची सज्जता असावी याबाबत चौकशी करुन शिफारशीसह सविस्तर अहवाल सादर करण्याचे मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री (सार्वजनिक उपक्रम) यांनी एमएमआरडीसी व संबंधीत विभागांना निदेश दिलेले असणे, दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६६ रोजी ठाणे येथील दोन अपघातामुळे मुंबई-नाशिक महामार्गावर ४ ते ५ तास वाहतुक कोंडी झालेली असणे, राज्यातील मुंबई-पुणे, पुणे-नाशिक, पुणे-औरंगाबाद, मुंबई-नाशिक यासहह इतर महत्वाच्या महामार्गावरील वाहतूक कायमस्वरुपी व्यवस्थीतरित्या होण्याकरिता तसेच आपत्कालीन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याबाबत शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१६	श्री. निलेश राणे, वि. स .स.	सिंधुदुर्ग जिल्हयात जवळजवळ ४२२४२ हेक्टर क्षेत्रावरर सन १९९६ साली वनसंज्ञा लादण्यात येणे, संपूर्ण राज्यात ६२ हजार क्षेत्र वनसंज्ञेखाली घेण्यात येणे, परंतु त्यावेळी फक्त एकट्या सिंधुदुर्ग जिल्हयात ४२ हजार क्षेत्रर वनसंज्ञेखाली घेण्यात येणे, त्यामुळे जिल्हयातील अनेक गावे, बाजारपेठा, मंदिरे, शाळा, दवाखाने, शेत जमिनी, बागायती आदि वनसंज्ञेखाली दर्शविण्यात येणे, त्यामुळे जिल्हयाचा विकास खुंटला असणे, सर्व विकास कामे ठप्प झालेली असणे, जिल्हयात असलेल्या डोंगर दऱ्यांमुळे विकास होईल असे जमीन क्षेत्र शिल्लक न राहणे, चुकीच्या पध्दतीने वनसंज्ञा /वन नोंद झाल्यामुळे सद्यस्थितीत जिल्हयातील ३०० पेक्षा जास्त गावे विकासापासून वंचित राहिलेली असणे, शेतकऱ्यांच्या हक्काच्या जमीनी असूनही त्यांना लाभ घेता येत नसणे, अनेकदा शेतकऱ्यांच्या जमिनी शासकीय कामाकरिता संपादित केल्या जाणे परंतु वन नोंदीमुळे त्याचा शेतकऱ्यांना मोबदला न मिळणे, सदर मोबदला शासन जमा होणे, वनसंज्ञा व वन नोंदी झाल्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था ना जमिनी, ना शेती, ना मोबदला अशी होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली चिड,	दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सिंधुदुर्ग जिल्हयात नव्याने सर्व्हेक्षण करुन प्रत्यक्षातील वनक्षेत्र, खाजगी वनक्षेत्र व वनसंज्ञा यांची नव्याने नोंद करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१७	सर्वश्री. राजकुमार बडोले, चेतन तुपे, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश विटेकर, विठ्ठल लंघे, राजु तोडसाम, मंगेश चव्हाण वि. स .स.	ग्रामीण भागात जवळपास प्रत्येक घरात एकेकाळी बांबूच्या वस्तु जसे की चाळण्या, टोपल्या, सूप, झाडू, चटई व धान्य साठवणूकीसाठी पेट्या इ.वस्तु घरगुती वापरासाठी बाळगण्यात येत असणे, कालांतराने प्लॅस्टीकच्या वस्तुने बाजारपेठ काबीज केल्यामुळे ग्राहकांचा कल प्लॅस्टीककडे झुकला असल्याने बांबूच्या वस्तुंची मागणी मोठ्या प्रमाणात घटत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बांबू लागवडीवर भर देण्याबरोबरच बांबूच्या वस्तुंना शासनाने बाजारपेठ, दर, शासकीय खरेदी व प्रचार-प्रसाराची व्यवस्था करणे आवश्यक असणे, प्लॅस्टीकमुळे होणारे प्रदुषण व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि पर्यावरणाचा समतोल बिघडण्याचे धोके लक्षात घेऊन बांबू वस्तुंचा वापर वाढविणेबाबत अनेक तज्ञांनी वेळोवेळी आपापली मते व्यक्त केली असणे, यास्तव राज्य शासनाच्या वतीने बांबू लागवड वाढवून	दिनांक ४ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रोजगार निर्मिती व त्यावर अवलंबून असणाऱ्यांना आर्थिक लाभ मिळण्यासाठी विशेष नियोजन करण्याचे शासनाकडून सांगण्यात येणे, मात्र शासनाने या योजनेबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे बांबू व्यवसायिक तसेच बांबू कारागीरींचा प्रश्न आर्थिकदृष्टया ऐरणीवर आला असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, परिणामी प्लॅस्टीकमुळे पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम तसेच अनेकांना हा पारंपारीक व्यवसाय सोडावा लागल्याचे निदर्शनास येणे, बांबू व्यवसायिक व बांबू कारागीर यांचा विचार करुन या बांबू व्यवसायास चालना देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
१८	सर्वश्री. अभिमन्यु पवार, अमित साटम, काशिनाथ दाते, हारुन खान,डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री चेतन तुपे, दौलत दरोडा, प्रतापराव पाटील चिखलीकर, अनिल पाटील, ज्ञानेश्वर कटके, राजेश विटेकर, शंकर मांडेकर,	लातूर जिल्ह्यातत जिल्हा परिषदेच्या १२६७ शाळांपैकी जवळपास ६२४ शाळा खोली असलेल्या इमारती मोडकळीस आलेल्या असणे, अनेक शाळांची दुरवस्था झाल्याने धोकादायक झालेल्या असणे, लातूर जिल्ह्यातीलल ११६ शाळांची वीज जोडणी थकीत बिलामुळे खंडित केलेली असणे, बहुतांश शाळांना संरक्षण भिंत /खेळाचे मैदान, मुला मुलींसाठी शौचालय नसणे, शिपाई व सफाई कर्मचारी नसल्याने शाळा व शौचालयांमध्ये स्वच्छता नसल्याने दुर्गंधी असणे, अनेक शाळेत	दिनांक ४ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	सुधीर मुनगंटीवार, डॉ. नितीन राऊत, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अमीन पटेल, अस्लम शेख, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. विकास ठाकरे, संजय मेश्राम, तानाजी मुटकुळे, नारायण पाटील, अभिजीत पाटील, सुभाष देशमुख, विजय रहांगडाले, संजय पुराम, विनोद अग्रवाल, रोहित पाटील, राजेश मोरे, वि. स .स.	किचन शेड नसणे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. (CCTV) यंत्रणा बसविलेली नसणे, शाळेत शुद्धध पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख आणि शिक्षकांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम झालेला असणे, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कला,क्रीडा व कार्यानुभव विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नियुक्त नसणे, लातूर जिल्ह्याप्रमाणे संपूर्ण राज्यात ९०% जिल्हा परिषद शाळांची स्थिती अशीच असणे, राज्यातील खाजगी संस्थांच्या शाळांमध्ये प्रशस्त इमारत व सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याने पालकांचा खाजगी शाळेत प्रवेशासाठी ओढा असणे, राज्यातील जिल्हा परिषद शाळांची पुनर्बांधणी करण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रत्येक शाळेत इंटरनेट सुविधा,खेळाचे मैदान,सौर प्रकल्प, सी.सी.टी.व्ही., शुद्ध पाणी, रिक्त पदांची भरती,सर्व शाळेत कला क्रीडा व कार्यानुभव शिक्षक नियुक्ती,शाळेच्या स्वच्छतेसाठी प्रत्येक शाळेत शिपाई नियुक्ती करण्यासाठी मान्यता आणि विशेष निधी उपलब्ध करून देणे व शाळा पुनर्बांधणी योजना राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१९	श्री. रोहित पाटील, वि. स .स.	राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणावर बेदाणा निर्मितीवर अवलंबून असणे, यावर्षी हवामानातील प्रतिकूल परिस्थिती, उत्पादनातील घट आणि वाढलेला खर्च यामुळे बेदाण्याचे एकूण उत्पादन कमी झालेले असणे, परिणामी बाजारात उपलब्धता मर्यादित असल्याने सध्या स्थानिक बेदाण्याला चांगला दर मिळत असला तरी बाहेरील अनेक देशांमधून कमी दराने तसेच काही ठिकाणी बेकायदेशीर मार्गाने बेदाणा महाराष्ट्रात येत असल्याच्या तक्रारी सातत्याने निदर्शनास येत असणे, अशा आयातीमुळे राज्यातील बाजारपेठेत दरावर दबाव निर्माण होत असणे व स्थानिक शेतकऱ्यांच्या उत्पादनाला अपेक्षित भाव मिळत नसणे, त्यामुळे द्राक्षातून बेदाणा तयार करणाऱ्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत परतावा कमी असल्याने बेकायदेशीर आयात रोखण्यासाठी सीमाशुल्क यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता, आयात होणाऱ्या बेदाण्यावर कडक गुणवत्ता तपासणी लागू करणे, आवश्यक असल्यास आयात शुल्कात वाढ करणे तसेच स्थानिक उत्पादकांच्या संरक्षणासाठी विशेष बाजार हस्तक्षेप धोरण राबविण्याबाबत भूमिका घेण्यासाठी राज्यशासनाने कार्यवाही करणे गरजेचे असणे, यासंदर्भात राज्यातील	दिनांक ४ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शेतकरी संघटना,लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व मा. कृषिमंत्री यांचेकडे दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार निवेदनाद्वारे मागणी केलेली असणे, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही व उपाययोजना केली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असणे,राज्यातील बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांचे हित सुरक्षित राहावे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२०	श्री. विजय वडेट्टीवार, वि. स .स.	अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये कामगार विभागाकडील नोंदणी असलेल्या कामगारांना गृहपयोगी साहित्य वाटप करण्यासाठी मोठ्या प्रमाणात अडीअडचणी येत असून त्यांची योग्यरीत्या नोंदणी करून त्यांना सदर साहित्य मिळत नसल्याची बाब दिनांक १३ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास आली असणे, सदर योजनेंतर्गत एका दिवसामध्ये सुमारे ५०० कामगारांना साहित्यांचा वाटप होत असताना वाटप ठिकाण कमी असल्यामुळे व जिल्ह्याच्या ठिकाणी फक्त एक किंवा दोन सेंटर असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणी येत असणे, जिल्ह्यातील सर्व कामगार त्या ठिकाणी पोचत असल्यामुळे साहित्यांचे वाटपामध्ये मोठी गैरसोय होत असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी व सर्व कामगारांकडून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सदर साहित्य वाटप केंद्र सुरू करण्याची	दिनांक ४ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मागणी होत असणे, याविषयी कामगार विभागामार्फत कोणती कार्यवाही न होणे उलट ज्या ठेकेदाराला संबंधित काम देण्यात आलेले आहे तो कामगारांची कोणतीही शहानिशा न करता प्रत्येक माणसाला साहित्य वाटप करत असल्याचो बाब देखील समोर येत असणे, याविषयी शासनाच्या विभागाकडे व संबंधित जिल्हाधिकारी तसेच कामगार अधिकारी यांच्याकडे तक्रार होत असणे, त्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागामार्फत अद्याप कोणतीही कार्यवाही न करणे, त्यामुळे या सर्व साहित्य वाटपाची चौकशी करून संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२१	सर्वश्री. काशिनाथ दाते, सुनिल प्रभू, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. अमिन पटेल, अस्लम शेख, साजिद खान पठाण, संजय मेश्राम, मुरजी पटेल, संजय केळकर, राजेश मोरे,	ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीवरून कळवा येथे बारावीचा पहिलाच पेपर देण्यासाठी जात असताना मुंब्रा-कळवा स्टेशन दरम्यान गर्दीमुळे लोकलमधून पडून सोहम कटरे या विद्यार्थ्याचा दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी दुर्दवी मृत्यू झाल्याची घटना घडलेली असणे, मुंबईत उपनगरीय रेल्वेत गर्दीमुळे झालेल्या वादात एका शिक्षकाची हत्या झाल्याची घटना ताजी असतानाच, कुर्ला रेल्वे स्थानकात सीएसएमटी	दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	वि. स .स.	टर्मिनसच्या दिशेने जाणाऱ्या धीमी लोकलमधुन शीव स्थानकाजवळ गर्दीच्या रेट्यामुळे सचिन विश्वकर्मा यांचेसह तीन प्रवासी रुळावर पडल्याची घटना दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी घडणे, तीघांपैकी अफझल चौधरी यांची प्रकृती चिंताजनक असणे तर उर्वरित दोघेजण जखमी होणे, मुंबईकरांची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी उपनगरीय लोकल अनेकांसाठी रोजचा जीवघेणा प्रवास ठरत असून वेळेची घाई, उशिराने धावणाऱ्या गाड्या, क्षमतेपेक्षा जास्त गर्दी आणि अपुऱ्या सुविधांमुळे लोकल प्रवास कायमचाच धोकादायक ठरणे, सन २०२५ सालामध्ये मुंबई उपनगर रेल्वेवर ४८४१ अपघात घडलेले असूनन यामध्ये २८७ प्रवाशांचा मृत्यू झालेला असणे तर २२५४ प्रवासी जखमी झाल्याचे निदर्शनास येणे, अधिकृत आकडेवारीनुसार दररोज सरासरी १३ प्रवासी लोकल अपघाताचा बळी ठरत असणे, मुंबई उपनगरी रेल्वे गाड्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र राखीव डबा असावा म्हणून पालकांकडून व विद्यार्थ्यांकडून रेल्वे प्रशासनाला वारंवार निवेदन दिलेली असणे, अपघात टाळण्यासाठी तसेच वाढत्या गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी स्वयंचलित दरवाजे बसविणे व कार्यालयीन वेळेत बदल करण्याबाबत सभागृहात अनेक वेळा चर्चा होऊनही यावर ठोस	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपाययोजना करण्याबाबत अद्याप शासनाकडून कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सर्वसामान्य प्रवासी जनता मृत्युमुखी पडणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.	
२२	श्रीमती नमिता मुंदडा, वि. स .स.	नगरपंचायत, केज, जि. बीड येथे प्रधानमंत्री आवास योजन (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (BLC) वितरित करण्यात आलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या अनुदान निधीच्या वापरासंदर्भात अत्यंत गंभीर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असणे, लेखापाल, वित्त नियंत्रक/प्राधिकरण कार्यालय, म्हाडा, मुंबई तसेच लेखा विभागाच्या तपासणी अहवालानुसार सुमारे ०३.६२ कोटी रुपयांचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग न करता अनधिकृत व नियमबाह्य कामांसाठी वापरण्यात आला असल्याचे निर्दशनास येणे, तसेच SNA-Zero Balance खात्यात जमा झालेल्या अनुदान व त्यावरील व्याजाची रक्कम शासनाच्या स्पष्ट निर्देशांनुसार परत न करता इतर कामांवर खर्च केल्याचे आढळून आले असणे, यासंदर्भातील आवश्यक लेखा संचिका, देयके, व्हाऊचर्स व नोंदी उपलब्ध नसून संचिका गायब करण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आलेला असणे, या	दिनांक ५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रकरणामुळे प्रधानमंत्री आवास योजनेच्या विश्वासार्हतेला धक्का बसत असून सार्वजनिक निधीचा थेट गैरवापर झाला असणे, त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता विशेष समितीमार्फत तातडीने चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करून गैरवापर झालेली संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
२३	डॉ. विनय कोरे, वि. स .स.	कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुका हा डोंगराळ व दुर्गम भाग असून शाहूवाडी तालुक्यातील ऐनवाडी-धनगरवाडी या गावातील विद्यार्थ्यांची सातवीपर्यंतची शिक्षणाची सोय असणे, ऐनवाडी-धनगरवाडी येथील लोकवस्तीचा विचार करता माध्यमिक शाळा आवश्यक असणे, तथापि ऐनवाडी- धनगरवाडी येथून ११ किलोमीटर पर्यंत माध्यमिक शाळा नसणे, तेथील बृहत आराखडा रद्द केल्यामुळे अनुदानित शाळा चालविणे कोणत्याही संस्थेला अशक्य झालेले असणे, त्यामुळे धनगरवाडी व आसपासच्या वाड्या-वस्त्यांवरील अनेक विद्यार्थ्यांचे कायमस्वरूपी शैक्षणिक नुकसान होण्याची निर्माण झालेली परिस्थिती, यास्तव विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये पसरलेले नैराश्याचे वातावरण, या प्रकरणात शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची	दिनांक ५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आवश्यकता, या भागात माध्यमिक शाळा सुरू करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२४	सर्वश्री. अतुल भातखळकर, सुधीर मुनगंटीवार, राजेश बकाने, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, नाना पटोले, चरणसिंग ठाकूर, निलेश राणे, नरेंद्र भोंडेकर, हारुन खान, वि. स .स.	काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील कळमेश्वर पोलीस ठाणे हद्दतील राऊळगाव येथील 'एसबीएल एनर्जी लिमिटेड' या स्फोटक निर्मिती करणाऱ्या कंपनीत रविवार, १ मार्च २०२६ रोजी सकाळी भीषण स्फोट झाल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, या भीषण स्फोटामध्ये १८ कामगारांचा मृत्यू झाला असून २४ जण गंभीर जखमी असल्याचे निदर्शनास येणे, सदर कंपनीमध्ये खाणकाम व पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वापरण्यात येणारे स्फोटक व डिटोनेटर तयार करण्यात येत असणे, स्फोटानंतर बचाव कार्यासाठी रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या गाड्यांना खराब रस्ते व दुर्गमतेमुळे पोहोचण्यास विलंब झाल्याने मोठी जीवितहानी झाली असणे, सदरहू कंपनी धोकादायक स्फोटके बनवत असताना सुरक्षिततेच्या नियमांचे उल्लंघन करत असल्याचे प्राथमिक चौकशीतून स्पष्ट होत असणे, या घटनेमुळे औद्योगिक सुरक्षेचे नियम, स्फोटक साठवणूक व हाताळणीसंबंधीचे प्रोटोकॉल तसेच कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेली उपाययोजना याबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे, या परिसरातील	दिनांक ५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला असून व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे ही भीषण दुर्घटना झाली असणे, त्यामुळे जिल्हयातील सर्व स्फोटक कारखान्यांचे तातडीने सेफ्टी ऑडिट करण्याची आवश्यकता, सदर दुर्घटनेची तात्काळ उच्चस्तरीय व स्वतंत्र चौकशी करुन या निष्काळजीपणाला जबाबदार असणाऱ्या व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची आवश्यकता, या घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना व जखमी कामगारांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची व पुनर्वसनासाठी विशेष मदत देण्याची नितांत गरज असणे, तसेच भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी औद्योगिक सुरक्षा नियमावलीची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२५	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि. स .स.	चंद्रपूर जिल्ह्यातील नारंडा (ता.कोरपणा) येथील दालमिया सिमेंट कंपनीमध्ये दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सल्फ्युरिक ॲसिड टँकर अनलोडिंग प्रक्रियेदरम्यान गंभीर अपघात घडणे, या अपघातात दोन कंत्राटी कामगार रासायनिक द्रव्याने भाजल्यामुळे गंभीर जखमी झाले असून ते सध्या रुग्णालयात उपचार घेत मृत्युशी झुंज देत असणे, धोकादायक रसायन हाताळताना आवश्यक सुरक्षा साधनांचा अभाव	दिनांक ५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असल्यामुळे सदर अपघात घडणे, प्रमाणित मार्गदर्शक कार्यपध्दत (एस.ओ.पी.) व सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन न होणे, अपघाताची माहिती तात्काळ संबंधित यंत्रणांना देण्यात न येणे, अपघातात गंभीर जखमी झालेल्या कामगारांना व्यवस्थापनाने कोणतेही अर्थसहाय्य न देणे,या घटनेची सखोल चौकशी होऊन दोषींवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कामगारांमध्ये पसरलेला असंतोष, भविष्यात अशा दुर्घटना घडू नये म्हणून उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
२६	सर्वश्री. रईस शेख, अमीन पटेल, अस्लम शेख, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री. संजय मेश्राम, अबू आझमी, वि. स .स.	मुंबई शहरात पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथ विक्री अधिनियम २०१४) या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसणे, सदर कायदा लागू होऊन सुमारे १० वर्षे कालावधी झाल्यानंतरही एकसमान अंमलबजावणी अपूर्ण असणे, प्रभावीपणे मुंबई शहरात नगर विक्रेता समिती (Town Vending Committee) गठीत झालेली नसणे,तसेच कायद्याने बंधकारक असलेले प्रतिनिधी त्या समितीमध्ये नसणे, कलम ३ अंतर्गत अपेक्षित असलेले नियतकालिक सर्वेक्षण वेळेत व पारदर्शक पध्दतीने पूर्ण न करणे, मागिल सर्वेक्षण व परवाना नोंदणी असूनही पात्र	दिनांक ६ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पथ विक्रेत्यांना विक्री परवाना प्रमाणपत्र (Certificates of Vending) जारी न करणे, कलम ३८ अंतर्गत आवश्यक असलेली वैधता सर्वसमावेशकपणे कार्यान्वित न करणे, या वैधानिक त्रुटी असतानाही मुंबईतील विविध भागांमध्ये निष्कासन मोहिमा, रात्री उशिरा टाकले जाणारे छापे, मालाची जप्ती आणि दंड आकारणी केली जात असल्याचे निदर्शनास येणे, कायद्याची पूर्ण अंमलबजावणी न होता प्रशासकीय कारवाया सुरु राहिल्यामुळे मुंबईतील पथविक्रेते व त्यांच्या कुटुंबियांमध्ये मोठ्या प्रमाणावर भिती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होणे, नियमानुसार नगर विक्रेता समिती कार्यान्वित केली नसणे, सर्वेक्षण झालेल्या विक्रेता परवाना धारकांना विक्री प्रमाणपत्रे जारी न करणे, कलम ३८ अंतर्गत योजनेची अंमलबजावणी झालेली नसणे, पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथ विक्री अधिनियम २०१४) या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२७	सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, वि. स .स.	नाशिक शहरात अतिक्रमण ही अत्यंत गंभीर समस्या झालेली असणे, सदर समस्या अधिक गंभीर करण्यामध्ये नाशिक महानगरपालिकेच्या	दिनांक ६ मार्च ,

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अतिक्रमण विभागाचा मोठा सहभाग असणे, त्र्यंबक रोड, सातपूर कॉलनी परिसरात अनेक खाद्यपदार्थ विक्रेते, फळविक्रेते, भाजीपाला विक्रेते व चिकन विक्रेत्यांनी राजरोसपणे रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे व्यवसाय सुरु केलेला असणे, उटंवाडी-त्रिमुर्ती चौकात वाढत असलेले अतिक्रमण, याबाबत अनेक तक्रारी करुनही त्याकडे संबंधित विभागाचे जाणीवपुर्वक होत असलेले दुर्लक्ष, अतिक्रमण विभागाकडून मनमानी पद्धतीने अतिक्रमण काढण्याची कारवाई होणे, अनेक प्रकरणात दोन नोटीसा होऊन देखील अतिक्रमण काढण्याची कारवाई केली न जाणे, अतिक्रमण काढण्यापूर्वी अतिक्रमण धारकांना पूर्वकल्पना दिली जाणे, त्यामुळे नागरिकांमध्ये अतिक्रमणाचे भय राहिलेले नसणे, अतिक्रमणाची कारवाई करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मागणी केली जाणे, काही खाजगी जागांवर नोटीसा न देता देखील कारवाई केली जाणे, यामुळे शहराला बकाल स्वरूप प्राप्त झाले असणे, यास्तव गेल्या दोन-तीन वर्षापासून अतिक्रमण विभागामार्फत केलेल्या कामकाजाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, विशेषत: प्रशासकीय कालावधीत केल्या गेलेल्या अतिक्रमणाची व प्रलंबित ठेवलेल्या अतिक्रमणांची चौकशी करण्याची आवश्यकता,	२०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शासनाचे सदर बाबींकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर उच्चस्तरीय समिती स्थापन करून चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.	
२८	कॅप्टन आर. सेल्वन, सर्वश्री. अबू आझमी, अनंत (बाळा) नर, श्रीमती स्नेहा दुबे, वि. स. स.	महाराष्ट्र राज्य शासनातर्फे अपात्र झोपडीधारकांना पात्र करून घेण्याकरीता अभय योजना राबवली जात असणे, सदर योजना एसआरए मार्फत योग्य पद्धतीने राबवली जात नसल्याने बहुतांश झोपडीधारकांना पात्र होण्याकरिता बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत असणे, याचा फायदा घेऊन विकासक जाणीवपूर्वक नव्याने खरेदी केलेल्या झोपडीधारकांचे नाव पुरवणी परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट न करणे, नवीन खरेदी केलेल्या झोपडीधारकांचे नाव पुरवणी परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करण्यापूर्वी प्रकल्प सुरू करण्यास परवानगी देण्यात येत असणे, त्याचबरोबर सायन येथील विविध प्रकल्पांचा पुनर्विकास रखडला असणे, यामध्ये साईसिटी संस्थेचा पुनर्विकास करण्याकरिता ४ वेळा निविदा काढून एकाही विकासकाने प्रक्रियेत भाग न घेणे, या परिस्थितीत स्थानिक रहिवाशी यांना विकासक नेमण्याची परवानगी मिळत नसणे, निर्मलनगर संस्थेमधील पात्र झोपडीधारकांना ताबापत्र	दिनांक ६ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मिळूनही एसआरए मार्फत सदनिका सील केली असणे, सदर पात्र झोपडीधारकांच्या नावांची जाहिरात वर्तमानपत्रात जाहीर करूनही सदनिकेचा ताबा न मिळणे, निसर्ग संस्थेमधील विकासकाने १९ वर्षे होऊनही नियमांचे पालन न केल्याने इमारत पूर्ण असूनही भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) मिळत नसल्याने सदनिकेचा ताबा मिळण्यास अडचणी येत असणे, त्यामुळे हे सर्व प्रकल्प मार्गी लागण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
२९	सर्वश्री. दिपक केसरकर, निलेश राणे, शेखर निकम, वि. स .स.	सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा व काजू बागांमध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात मोहोर येणे, मात्र अवकाळी पाऊस, अचानक तापमानात झालेली घट, थंडीची लाट व बदलत्या हवामानामुळे मोहोर करपणे, फळधारणा न होणे व लहान फळांची मोठ्या प्रमाणात गळती होणे. या संदर्भात सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी मंत्रालयात बैठक घेऊन आंबा व काजू फळपिकांबाबत क्षेत्रीय पाहणी अहवाल सादर करण्यास निदेश दिले असणे, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२६ ते २१ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान कृषी विभाग व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांच्या तज्ञांनी संयुक्त पाहणी करणे, त्यानुसार चालू हंगामात आंबा व काजू उत्पादनात सरासरीच्या तुलनेत जवळपास ८५ ते ९० टक्क्यांपेक्षा	दिनांक ६ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अधिक घट होण्याची शक्यता असणे, आंबा व काजू हे जिल्ह्यातील प्रमुख नगदी पीक असून हजारो शेतकरी कुटुंबांचे उपजीविकेचे मुख्य साधन असणे, उत्पादनात झालेली मोठी घट शेतकऱ्यांना आर्थिक संकटात नेणारी असणे, सदरहू बाब तातडीची व सार्वजनिक महत्वाची असल्याने याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
३०	सर्वश्री. भास्कर जाधव, मोहन मते, वि. स .स.	धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात तेरखेडा गावासह परिसरात फटाके बनविण्याचे कारखाने मोठ्या प्रमाणात असणे, या कारखान्यांमध्ये अधून मधून स्फोटांच्या घटना घडत असून अनेक कामगारांना प्राण गमवावे लागले असणे, तर अनेकांना गंभीर जखमा होऊन अपंगत्व आलेले असणे, असे असतानाही संबंधित फटाका कारखाना मालकांकडून कामगारांच्या सुरक्षेसाठी कोणतीही उपकरणे पुरविण्यात येत नसल्याने होणाऱ्या स्फोटांमुळे कामगारांच्या जिवितास निर्माण झालेला धोका, सदर फटाके कारखान्यांच्या गलथान कारभारामुळे दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास गोजवाडा शिवारातील गट क्र. ५६१ मध्ये बालाजी फायर वर्क या कारखान्यात कच्चा माल ठेवण्यात आलेल्या ठिकाणी स्फोट होऊन कारखान्याचे रोड पूर्णपणे उध्वस्त होणे, या ठिकाणी ४० किलो पेक्षा जास्त मिक्स केलेली	दिनांक ६ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		स्फोटाची दारू आढळून येणे, स्फोट कशामुळे झाला हे अद्यापही स्पष्ट न होणे, विशेषत: तेरखेडा, खामकरवाडी शिवारात दिनांक ३१ जानेवारी, २०२६ रोजी फटाका कारखान्यात प्रचंड स्फोट झाला असतांना त्याचा अहवाल शासनाला देण्यात आलेला नसणे, सदर बाबतीत छोट्या-मोठ्या कारखानदारांनी कामगारांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपकरणे व साधनसामग्री खरेदी केलेली नसणे, संबंधित कामगारांना धोका निर्माण होत असल्याने याबाबत राज्य शासनाच्या अखत्यारीतील प्राधिकाऱ्यांना निवेदन देऊनही केवळ व्यवसायिकांचा बचाव करण्यासाठीच्या प्रयत्नामुळे सर्वसामान्य कामगार वर्गात निर्माण झालेली तीव्र चिडीची व संतापाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३१	डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री. अमीन पटेल, अस्लम शेख, रामदास मसराम, संजय मेश्राम, वि. स .स.	राज्यात लग्नात हुंडा घेणे कायद्याने गुन्हा असणे, मात्र प्रत्येक गावांत/ तांड्यात आणि शहरांमध्ये लोक अजूनही हुंडा म्हणून रोख रक्कम, सोन्याचे दागिने, दुचाकी- चारचाकी वाहने इत्यादी घेत असणे, त्यामुळे प्रत्येक मुलीच्या पालकांना त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी खुप मोठ्या प्रमाणावर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, कित्येकदा मुलींच्या लग्नाचा संपूर्ण खर्च मुलींच्या पालकांना करावा लागत असणे,	दिनांक ९ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		या प्रथेमुळे मुलींच्या कित्येक पालकांनी आत्महत्या केल्याचीही उदाहरणे असणे, पालकांचे दु:ख पाहून कित्येक मुलीही आत्महत्या करण्याचा मार्ग निवडत असणे, त्यामुळे शासनाने हुंडा प्रतिबंधक कायद्यातील तरतूदींची परिणामकारक अंमलबजावणी, जनजागृती करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत व्यक्त होणारा असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.	
३२	श्रीमती श्वेता महाले, वि. स .स.	राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (अ, ब, क, ड) इतर मागास प्रवर्ग तसेच विशेष मागास प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना राज्य शासनाच्या विविध नोकर भरती परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गाचे बरोबरीने परीक्षा शुल्क आकारणी होत असणे,उदाहरणार्थ खुल्या प्रवर्गासाठी एखाद्या परीक्षेचे शुल्क १००० रुपये असेल तर मागासवर्गीय प्रवर्गासाठी परीक्षा शुल्क ९०० रुपये असणे, खुला प्रवर्ग व राखीव प्रवर्गाच्या परीक्षा शुल्कात केवळ १०० रुपयांचा फरक असणे,भरमसाठ परीक्षा शुल्कांमुळे उक्त उल्लेखित	दिनांक ९ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना नोकर भरती अर्ज करताना आर्थिक अडचणी येत असणे,त्यामुळे खुल्या प्रवर्गाचे तुलनेत मागास वर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांना परिक्षा शुल्क ५०% ने कमी होणे गरजेचे असणे, वाढीव परीक्षा शुल्कांमुळे मागास प्रवर्गातील बेरोजगार शासकीय नोकरी मिळविण्याच्या संधीपासून वंचित राहत असणे, यामुळे उक्त प्रवर्गाच्या सुशिक्षित बेरोजगारांमध्ये नैराश्याची भावना निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.	
३३	श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री. सुभाष देशमुख, संजय केळकर, वि. स .स.	राज्यात नगरपरिषदा, नगरपालिका, नगरपंचायती व महानगरपालिकांची लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांची निवड झालेली असताना पुरेश्या प्रमाणात कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ त्यांच्या मदतीला नसणे, त्यामुळे आगामी काळात सर्वच क्षेत्रातील विकास कामे विलंबाने होणार असणे, यास्तव राज्यातील सर्वच महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपालिका व नगरपंचायती मधील नोकर भरतीचा तातडीने आढावा घेऊन सर्व रिक्त पदे भरण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, सदर रिक्त पदे भरत असताना स्थानिक बेरोजगार युवकांना या क्षेत्रात संधी देण्याबाबतचा सर्वंकष असा आराखडा तयार करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	दिनांक ९ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३४	श्रीमती स्नेहा दुबे, वि. स .स.	सन २००९ मध्ये स्थापना झालेल्या वसई विरार महानगरपालिकेने आतापर्यंत सी.सी. (C.C.) दिलेल्या जवळपास २००० इमारतींपैकी बहुतांश इमारतींचे बांधकाम पूर्ण होऊनही जवळपास ९०% इमारतींना अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (O.C.) दिलेले नसणे, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत वसई विरार क्षेत्रात भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी अभय योजना लागू करण्याचे आदेश देण्यात येणे, मात्र अद्याप या आदेशांची अंमलबजावणी न होणे, इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र न घेणाऱ्या विकासकांच्या इतर मालमत्तांवर बोजा लावून त्यांचा नवीन प्रकल्प मंजूर केला जाणार नाही असे आश्वासन दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी विधानसभा सभागृहात शासनाकडून दिलेले असणे, तसेच या विकासकांची "काळी यादी" तयार करून राज्यातील सर्व महानगरपालिकांना पाठविण्याचे निर्देश सन्माननीय तालिका अध्यक्षांकडून दिलेले असणे, मात्र अद्याप यावर महानगरपालिकेकडून कोणतीही कार्यवाही न होणे, जनतेची फसवणूक करणाऱ्या विकासकांना पाठिशी घालण्यासाठी मालमत्तांचा बाह्ययंत्रणा सेवा पुरवठादाराद्वारे सर्व्हे करण्यात येत असल्याचे कारण महानगरपालिकेने देणे, मुळातच ज्या इमारतींना महानगरपालिकेने	दिनांक ९ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		स्वत: भोगवटा प्रमाणपत्र दिले आहेत ती इमारत पूर्ण झाली आहे काय, त्यातील बांधकामात अनियमितता आहे काय, हे तपासण्यासाठी बाह्ययंत्रणेची गरज काय, याचे उत्तर महानगरपालिकेने न देणे, परिणामी अजूनही या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू केली गेली नसल्याने नागारिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."	
३५	श्रीमती विद्या ठाकूर, श्री. सुनिल प्रभू, वि. स .स.	मुंबईतील सिद्धार्थनगर पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प गेली १८ वर्षे रखडलेला असणे, गोरेगाव पश्चिमेतील म्हाडाच्या जमिनीवरील हा एक मोठा प्रकल्प असणे, विकासक काम अर्धवट सोडून गेल्यानंतर म्हाडाकडून हा प्रकल्प ताब्यात घेऊन पूर्ण केला जाणे, इमारती बांधून तयार असताना देखील अद्यापी घरांचा ताबा रहिवाशांना देण्यात आलेला नसणे, संस्था आणि म्हाडा यांच्यातील सुधारित विकास करारनामा झालेला नसणे, रहिवासी आणि म्हाडा यांच्यात करावयाचा वैयक्तिक करारनामा (PAAA) झालेला नसणे, इमारतीच्या निकृष्ट दर्जाबाबत तपासणी करण्याचे काम मा.उच्च न्यायालयाने वीरमाता जिजाबाई तंत्रशिक्षण संस्था (VJTI) यांना दिलेले असणे, त्याबाबतचा	दिनांक १० मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अहवाल अजूनपर्यंत शासनास प्राप्त झालेला नसणे, सदनिकांचा ताबा मिळण्यास होत असलेला विलंब, म्हाडामार्फत या संपूर्ण प्रकरणात होत असलेली टाळाटाळ, तसेच म्हाडातर्फे रहिवाशांना मिळत असलेल्या मासिक भाड्यात न झालेली वाढ, यामुळे रहिवाशांमध्ये शासनाविरुद्ध निर्माण झालेला संताप व असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.	
३६	श्रीमती सना मलिक, श्री. सुधीर मुनगंटीवार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अनंत) बाळा (नर, वि. स . स.	राज्यात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने शासनाने सुरु केलेली शिवभोजन थाळी योजना ही राज्यातील गरीब, मजूर, रुग्ण, विद्यार्थी, स्थलांतरित कामगार तसेच सर्वसामान्य गरजू नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली लोककल्याणकारी योजना असणे, या योजनेमुळे राज्यातील लाखो नागरिकांना प्रतिदिन स्वस्त व पौष्टिक भोजन उपलब्ध होत असून हजारो महिला बचत गटांना तसेच युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध झालेली असणे, या योजनेचा २० लाख गरजवंत नागरिक लाभ घेत असून राज्यामध्ये किमान १८०० शिवभोजन केंद्रे असणे, या योजनेच्या केंद्रांमुळे ९००० कुटूंबांचा उदरनिर्वाह होत असणे, शिवभोजन योजनेच्या अनुदानाचे सुमारे २०० कोटी रुपये शासनाकडून थकविण्यात	दिनांक १० मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आल्याचे निदर्शनास येणे, माहे जून,२०२५ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीपासून राज्यातील अनेक शिवभोजन केंद्रचालकांना देय असलेले अनुदान प्राप्त न झाल्यामुळे या केंद्राची आर्थिक घडी विस्कटली असून अनेक केंद्रे बंद झालेली असणे, तर उर्वरित सुरु असलेली केंद्र केव्हाही बंद पडण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, परिणामी गरीब आणि गरजू नागरिकांना स्वस्त व पौष्टिक भोजन उपलब्ध होत नसल्यामुळे राज्यातील गरीबांना अन्नापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, तसेच या योजनेची केंद्रे बंद पडल्यास हजारो लोकांचा रोजगार बंद होऊन दैनंदिन उपजिवीका तसेच घरातील वृध्दांच्या आरोग्याचा खर्च, लहान मुलांचे शिक्षण आणि उपजिवीकेसाठी उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे उपासमारीची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता, सदरहू बाब लक्षात घेता शासनाने शिवभोजन योजना थाळीचे थकीत अनुदान संबंधित केंद्र चालकांना देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.	
३७	श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री. हारुन खान, हिरामण खोसकर, वि. स .स.	नाशिक जिल्हयातील देवळाली विधानसभा मतदार क्षेत्रातून शासनाचा प्रस्तावित रिंगरोड प्रकल्पाचा मार्ग नियोजित असून त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु असल्याचे निदर्शनास येणे, सदर प्रकल्प	दिनांक १० मार्च , २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विकासाच्या दृष्टीने महत्वाचा असला तरी देवळाली (जि.नाशिक) मधील शेतकऱ्यांच्या जमिनी या त्यांच्या कुटुंबांचा आधारस्तंभ असून त्यांनी पिढ्यानपिढ्या जोपासलेल्या असणे, त्यामुळे त्यास शेतकऱ्यांचा विरोध असणे, त्याचप्रमाणे सदर रिंगरोडसाठी, पुणे रिंगरोडप्रमाणे विशेष पॅकेज देण्याबाबत शेतकऱ्यांनी मागणी केलेली असणे, तसेच सदर बाह्य रिंगरोड हा वनजमीन वा शासकीय भूखंड क्षेत्रातून प्रस्तावित करण्याची शेतकऱ्यांची मागणी असणे, त्याचबरोबर बाधित घरे, विहिरी, व्यवसाय इत्यादी वाचविण्यासाठी अलाइनमेंट बदल करणे, पुणे रिंगरोडप्रमाणे विशेष मोबदला पॅकेज देणे वा पाचपट वाढवून अधिकचा मोबदला व पुनर्वसन योजना तसेच अरिंगळे मळा परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडवून प्रकल्प राबविण्यात यावा अशा मागण्या तेथील शेतकऱ्यांकडून करण्यात आलेल्या असणे, परिणामी सदर प्रकल्प राबविला गेल्यास शेतकऱ्यांचा होणारा उद्रेक व शासनाप्रती निर्माण होणारा असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	चर्चा झाली.
३८	श्री. प्रविण तायडे, वि. स .स.	अमरावती जिल्ह्यातील अचलपूर नगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०१८ - २०१९मध्ये अमृत योजनेचे २२ कोटी रुपयांचे काम असणे, ही योजना	दिनांक १० मार्च ,

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अचलपूर नगरपालिका क्षेत्रामधील नागरिकांना कोणतीही अडचण न येता व योग्यरित्या नळाद्वारे मुबलक प्रमाणात पाणी मिळण्याकरिता असणे, मात्र या योजनेच्या माध्यमातून नागरिकांना कोणताच फायदा न होणे, नागरिकांना पाण्याची अडचण निर्माण होणे, त्यांच्या घरापर्यंत २२ कोटी रुपये खर्च करून सुद्धा पाणी न मिळणे, नळ न जोडता फक्त पाईप लाइन टाकून ठेवली असणे, यामुळे पाण्याची उपलब्धता असताना तसेच एवढा निधी खर्च करून देखील नागरिकांचे हाल होत असणे, या अमृत योजनेमध्ये काम पूर्ण न होता निधी खर्च केलेला असणे, सन २०१८ ते २०१९ मध्ये राबविलेल्या अमृत योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला असणे, त्यामुळे या योजनेची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	२०२६ रोजी चर्चा झाली.
३९	सर्वश्री. कृष्णा खोपडे, प्रविण दटके, मोहन मते, प्रताप अडसड, राजन नाईक, वि. स . स.	नागपूर शहरामध्ये ना.सु.प्र. ने लीजवर दिलेले मालकी हक्काचे भूखंड निवासी, औद्योगिक, वाणिज्यिक या उपयोगाकरिता दिलेले असणे, या भूखंडांवर ना.सु.प्र. द्वारे ग्राउंड रेंट घेण्यात येणे, यात निवासी भूखंडाची संख्या-५५,७१९, औद्योगिक-२१६३, वाणिज्यिक-४०१५ व अन्य भूखंड फ्रि होल्ड करण्यासंदर्भात ना.सु.प्र. ठराव क्रं. ३/१२३६, दिनांक ७	दिनांक १० मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		डिसेंबर, २०२५ रोजी एकमताने मान्यता दिलेली असणे, या सर्व भूखंडधारकांकडून टक्केवारीप्रमाणे रकम वसूल करून जमीन विनियोग १९८३ नवीन नियम २७ फ्रि-होल्ड करण्याचा निर्णय एकमताने झालेला असणे, अप्पर मुख्य सचिव यांना पत्र क्रमांक ६१०५, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी शासनास सादर झालेले असणे, नागपूर शहराच्या दृष्टीकोनातून या महत्वपूर्ण विषयावर शासनाने तात्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.	
४०	श्रीमती मनिषा चौधरी, वि. स . स.	मुंबईतील दहिसर परिसरातील भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या नियंत्रणाखालील रडार स्थलांतर करण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०२५ मध्ये घेण्यात आला असला तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्याप पूर्ण झालेली नसणे, परिणामी दहिसरमधील अनेक पुनर्विकास प्रकल्पांवर उंची मर्यादा लागू राहिल्याने आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे (NOC) मिळण्यास अडथळे निर्माण झाले असणे, त्यामुळे संबंधित प्रकरणांमध्ये महानगरपालिकेकडील अंतिम बांधकाम परवानग्या न मिळणे, सदर परवानग्या प्रलंबित राहिल्या असून अनेक प्रकल्प रखडलेले असणे, जीर्ण इमारतीतील रहिवासी तात्पुरत्या निवासस्थानी	दिनांक १० मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		स्थलांतरित झालेले असून त्यांना वेळेवर भाडे न मिळणे, आर्थिक ताण वाढणे, यामुळे विकासक व सदनिकाधारक यांच्यात वाद निर्माण होणे, अशा समस्या उद्भवलेल्या असणे, दहिसर मधील हजारो कुटुंबांच्या सुरक्षित निवासाचा प्रश्न असल्याने रडार स्थलांतर प्रक्रियेचा स्पष्ट व कालबद्ध आराखडा जाहीर करावा तसेच प्रलंबित प्रकल्पांना अंतरिम उंची सवलत देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.	
४१	सर्वश्री. राजेश वानखडे, सुधीर मुनगंटीवार, वि. स .स.	जल जीवन मिशन अंतर्गत चांदूरबाजार, अचलपूर व भातकुली या तालुक्यांकरिता १०५ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना शासनाद्वारे माहे जानेवारी, २०२२ मध्ये मंजूर करून त्याचे कार्य प्रगतीपथावर असणे, तिवसा मतदारसंघातील एकूण ४० गावे खारपान पट्ट्यातील क्षारयुक्त पाण्याची असणे, या योजनेची भौतिक प्रगती केवळ ५० टक्के व आर्थिक प्रगती ६० टक्के एवढी झालेली असणे, परंतु माहे जानेवारी, २०२५ पासून झालेल्या २२ कोटींच्या कामांची देयके निधी अभावी प्रलंबित असणे, त्याचप्रमाणे सुधारित योजना मंजूर न झाल्यामुळे विविध पाईपलाईनची कामे सुद्धा प्रलंबित असणे, या योजनेअंतर्गत येणारी सर्व	दिनांक १० मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गावे हे खारपाण पट्ट्यात असणे, त्यामुळे नागरिकांना योजना पूर्णत्वास जाऊन तातडीने गोड पाणीपुरवठा होणे गरजेचे असणे, उन्हाळ्याच्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची योजना पूर्णत्वास नेण्याची मोठी मागणी असणे, निधी अभावी योजना पूर्णत्वास न गेल्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती रोष निर्माण झालेला असणे, या योजनेकरिता तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, सदरहू योजना तातडीने पूर्णत्वास जाण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना.	
४२	श्री. महेश शिंदे, वि. स .स.	राज्यातील शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयात बनावट शुल्क वाढ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असल्याची अनेक उदाहरणे असणे, ठाणे जिल्हयातील शहापूर पोलिस स्टेशन आणि आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांच्याकडे तक्रार नोंदविण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, तसेच या कार्यालयातील ठेकेदारी पध्दतीने भरती केलेल्या कर्मचाऱ्यांचे नियमबाह्य वेतन वाढ करणे, शुल्क नियामक प्राधिकरणमधील सदस्यांनीही अध्यक्षांच्या विरोधात तक्रारी नोंदविण्यात येणे, अशा अनेक तक्रारी उच्च व तंत्रशिक्षण कार्यालयात करण्यात येणे, शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयाच्या कॅग ऑडिट मध्ये अनेक	दिनांक ११ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गंभीर अनियमितता निदर्शनास येणे, बनावट शुल्क वाढ प्रस्ताव मंजूर करून महाविद्यालयाच्या तपासणीसाठी विद्यार्थ्यांच्या पैशाने आलिशान गाडी खरेदी करणे व महाविद्यालयात एकदाही भेट न देणे, यासंदर्भात अनेक वेळा तक्रार करुनही कोणतीच कारवाई होत नसल्याने तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाचे तत्कालीन संचालक व आदिवासी विकास विभागाने भ्रष्टाचाराबाबत केलेल्या पत्रव्यवहारांची दखल न घेणे आणि प्राधिकरण सदस्याने पंतप्रधान कार्यालयासह उच्च व तंत्रशिक्षण विभाग व सर्व वरिष्ठ कार्यालयांना भ्रष्टाचाराबाबत तक्रार करून दखल न घेतली जाणे, यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, होतकरू गरीब विद्यार्थ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया आणि भूमिका.”	
४३	श्री. हेमंत ओगले, वि. स .स.	हरेगाव (ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनीपैकी ४ हजार एकर जमीन झेडआरटू ग्रुप होल्डिंग्स लिमिटेड या कंपनीच्या प्रकल्पासाठी ४९ वर्षांच्या भाडेकराराने देण्याकरिता एम.आय.डी.सी. (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) ला हस्तांतरित करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २३ जानेवारी, २०२६	दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रोजी वा त्यासुमारास घेतलेला असणे,परंतु सदर जमिनीबाबत मा. उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) खंडपीठाने सदर जमिनी मूळ खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना देण्यात याव्यात याबाबत दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास निकाल दिला असणे, शासनाने सदर निकालाप्रमाणे वाटप करणेबाबत मा. उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) खंडपीठात दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास प्रतिज्ञापत्र दाखल केले असणे, मा. उच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणे सदर जमिनींचे खंडकरी शेतकरी अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना वाटप करण्याऐवजी शासनाने वेळकाढूपणा करून आता सदरहू जमीन खासगी कंपनीला देण्याचा निर्णय घेतलेला असणे, परिणामी येथील खंडकरी शेतकरी व त्यांचे कायदेशीर वारस यांच्यामध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४४	सर्वश्री. गोपिचंद पडळकर, दौलत दरोडा, बबनराव यादव (लोणीकर), सुधीर मुनगंटीवार	भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर विभागातील संघटनांकडून सनदशीर मार्गाने अनेकवेळा लढा उभारण्यात आला असणे, भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांना	दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	वि. स. स.	मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई, खंडपीठ नागपूर यांचेकडील मूळ अर्ज क्र.४३६/२०१७ पवनकुमार केवटे व इतर ९८ मधील दिनांक १४ जानेवारी, २०२० चे आदेशान्वये अद्यापही तांत्रिक वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नसणे, तसेच मा.मंत्री महसूल यांचे अध्यक्षतेखाली संघटना प्रतिनिधी यांचेसोबत मंत्रालय, मुंबई येथे दिनांक ४ जून, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करणेबाबत आश्वासित करुनही अद्यापही मागण्या मान्य झाल्या नसणे, विभाग व शासन स्तरावरुन याबाबत केवळ वेळकाढूपणा करुन कर्मचाऱ्यांचे संविधानिक न्याय हक्कांवर गदा व दबावतंत्र आणण्याचे काम सुरु असणे, न्याय मिळत नसल्याने व्यथित होऊन नाईलास्तव राज्यभरातील समस्त कर्मचाऱ्यांनी भूमि अभिलेख कर्मचारी कृती समिती महाराष्ट्र राज्य चे अंतर्गत आंदोलन करण्याचा इशारा दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या निवेदनाद्वारे शासनास दिलेला असणे, भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबतची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, त्यानुसार भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने तातडीने	चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
४५	श्री. मंगेश चव्हाण, वि. स .स.	राष्ट्रीय महामार्ग अधिनियम,१९५६ अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग ७५३८ च्या विस्तारीकरणासाठी झालेल्या मुक्ताईनगर तालुक्यातील भूसंपादन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व आर्थिक गैरव्यवहार झालेला असणे, सदर भूसंपादनसंदर्भात कलम ३(ड)अन्वये अंतिम अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध होऊन प्रस्तावित जमिनी केंद्र शासनाकडे कायदेशीररित्या निहित झाल्यानंतरही संबंधित जमिनींचे खरेदी-विक्री व्यवहार, हक्कसोडपत्रे, पुनर्हस्तांतरणदस्त इत्यादी नोंदविण्यात येऊन भविष्यात मिळणारा भूसंपादन मोबदला बेकायदेशीरपणे मिळविण्याचा प्रयत्न झाल्याची शक्यता असणे, त्याचप्रमाणे महसुली अभिलेख्यात जिरायत जमिनी अचानक बागायत दर्शविणे, पाईपलाईन अथवा सिंचन सुविधांचा दाखला देताना संबंधित जल प्राधिकरणांची पूर्वपरवानगी न घेणे,तसेच कलम ३(ब) अन्वये संयुक्त मोजणी अहवालात (JMS) वारंवार संशयितरित्या अवैधरित्या फेरफार होणे,काही ठराविक व्यक्तींना अनुचित लाभ मिळाल्याचा व शासनाची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाल्याचा दाट संशय निर्माण होणे,वाढीव भरपाईसाठी वेळोवेळी खोटे शपथपत्र दाखल करून शासनाची दिशाभूल	दिनांक ११ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करणे,या सर्व बाबींमुळे शासनाची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झालेली असण्याची शक्यता निर्माण होणे,या सर्व घटना एकमेकांशी संबंधित, पूर्वनियोजित व संगनमताने घडवून आणल्या असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत असणे, परिणामी भूसंपादन प्रक्रियेची पारदर्शकता व विश्वसनीयता यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असणे, यासंदर्भात सदर प्रकरणाची तातडीने विशेष तपास पथक (SIT) मार्फत उच्चस्तरीय चौकशी करून दोषी विरुद्ध तात्काळ फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यासह शासनास झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई वसूल करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
४६	श्री. सत्यजित देशमुख, डॉ. विनय कोरे, श्री. निलेश राणे, वि. स .स.	शिराळा विधानसभा मतदारसंघ परिसरासह लगतच्या तालुक्यातही बिबटयांच्या संख्येत प्रचंड वाढ होऊन मानवी वस्तीत मोठ्या प्रमाणात शिरकाव झालेला असल्याचे निदर्शनास येणे, बिऊर (ता.शिराळा) येथे ६ वर्षाच्या बालकाची बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३० जानेवारी, २०२६ रोजी घडली असणे, सदर घटनास्थळी वन विभागाचे अधिकारी वेळेत हजर न झाल्याने संतप्त जमावाने वन विभागाच्या कार्यालयाची नासधूस करणे, शिराळा कार्यालयातील	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वनक्षेत्रपाल पारधी यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित करणे, नरभक्षक बिबट्यास त्वरीत ठार/जेरबंद करण्याची मागणी नागरीकांनी प्रशासनाकडे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे केलेली असणे, उक्त ठिकाणी बिबट्या लहान मुले, शेळी व पाळीव कुत्र्यांना भक्ष्य करीत असल्याच्या वारंवार घटना घडत असल्याने नागरीकांची जिवीतहानी व मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, गव्यांच्या हल्ल्यांच्या घटना वारंवार घडत असणे, सदर ठिकाणच्या वन्य प्राण्यांच्या वाढत्या हल्ल्याने मानवी जिवीतास मोठा धोका निर्माण झाल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण निर्माण झालेले असणे, त्यानुषंगाने बिबटयांपासून पूर्णत: संरक्षण होणेकामी त्यांना पकडून त्यांच्या मूळ अधिवासात सोडणे, निर्बिजीकरण करणे, सापळे लावणे, ठार मारण्याची परवानगी मिळणे, स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवाना, सद्य:स्थितीत बिबट्याचा वावर पूर्णत: मानवी अधिवासात असल्याने शेड्युल १ मधून शेड्युल २ मध्ये समावेश करण्याची आवश्यकता असल्याबाबतची मागणी मा.वने मंत्री व स्थानिक प्रशासनाकडे वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली असणे, सदर बाबत कार्यवाही करण्यास दिरंगाई, टाळाटाळ केली जात असणे, उक्त प्रकरणी	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शासनाकडून सत्वर चौकशी करुन संबंधित दोषींना निलंबित करणे, मृतांच्या कुटूंबियांना तसेच जखमींना उपचाराकरीता त्वरीत आर्थिक मदत देणे, तसेच उक्त ठिकाणच्या वन्य व हिंस्त्र प्राण्यांचा वाढता प्रादुर्भाव कायमस्वरुपी रोखण्याकरीता शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
४७	सर्वश्री. सिध्दार्थ खरात, चेतन तुपे, प्रतापराव पाटील चिखलीकर, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री. राजेश विटेकर, मनोज कायंदे, वि. स . स.	बुलढाणा जिल्हयातील लोणार सरोवराची पाणी पातळी गेल्या ६ महिन्यांपासूनन सातत्याने वाढत असणे, कमळजा मातेचे मंदिर आणि गैबनशहा दर्गा तसेच इतर प्राचीन मंदिरे पूर्णत: पाण्याखाली जाणे, लोणार सरोवराच्या पाणी पातळीत २० ते २५ फुटांची लक्षणीय वाढ होणे, अशीच स्थिती कायम राहिल्यास सरोवराचे रुपांतर सामान्य तलावात होऊन पर्यटन व स्थानिक अर्थव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची निर्माण झालेली शक्यता, सातत्याने वाढणाऱ्या पाणी पातळीवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात या मागणीसाठी दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी लोणार शहर कडकडीत बंद ठेवण्यात येणे, लोणार सरोवरातील नैसर्गिक समतोल राखून त्याचे वैभव अबाधित ठेवण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशान्वये पाणी पातळी वाढीसंदर्भात चौकशी व	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपाययोजना करण्यासाठी माहे जानेवारी, २०२६ मध्ये आ.आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली समिती कठीत करण्यात येणे, सदर समितीने अद्यापही कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना न करणे, तसेच लोणार सरोवराच्या विकासासाठी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये व मा.न्यायमूर्तींच्या देखरेखीखाली गठीत करण्यात आलेल्या "लोणार सरोवर व संवर्धन समिती"मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक अभ्यासक, संशोधक यांचा समावेश करण्यात आलेला नसणे, त्यामुळे सदर समितीच्या कामकाजाबाबत स्थानिकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला असणे, उक्त समितीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक अभ्यासक, संशोधक यांचा समावेश करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.	
४८	श्री. संदिप क्षीरसागर, श्रीमती मोनिका राजळे, वि. स .स.	बीड व शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यातून जाणारा खरवंडी ब्रम्हनाथ येळंब-आर्वी खालापुरी नवगन राजुरी या राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ या रस्त्याच्या कामाकरिता १९९ कोटी रुपयांची मान्यता माहे जून,२०१८ मध्ये आदेश देऊन १८ महिन्यात काम पूर्ण करण्याचे उद्दीष्ट असताना सात वर्षाचा कालावधी झालेला असतानाही अद्याप रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास येणे, सदर रस्त्याकरिता	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		भूसंपादन अद्याप पूर्ण झाले नसल्याने ब्रम्हनाथ येळंब, मुंगूस वाडी जांब व नवघन राजुरी या गावांमधील रस्त्यांची कामे अदयापही रखडलेली असणे, तसेच भूसंपादन बाधितांना अदयाप जमिनीचा मोबदला मिळालेला नसणे, भूसंपादन व रस्त्याचे काम अपूर्ण असल्याने कामाच्या किंमतीमध्ये झालेली वाढ,परिणामी ९ कोटींचा वाढलेला अधिकचा खर्च, रस्त्याच्या भूसंपादनास विलंब झाल्यामुळे शासनाला आर्थिक भुर्दंड सोसावा लागणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
४९	श्री. नरेंद्र मेहता, वि. स .स	मिराभाईंदर क्षेत्रात MMRDA मार्फत अनेक विकास कामे प्रगतीपथावर असणे, त्यापैकी जे. कुमार या ठेकेदाराने कामासाठी आवश्यक कास्टिंगयार्डची मौ.चेणा सर्व्हे क्र१४१,१४३ व इतर येथे उभारणी करणे, सदरची जागा ही जे.कुमारच्या मालकीची असून येथील काही जागा इकोसेन्सिटिव्ह झोन व आदिवासी आरक्षणाने बाधित असणे, इकोसेन्सिटिव्ह झोन तथा आदिवासी विभागाची कोणतीही परवानगी न घेता स्वतःच्या मालकीची जागा असून देखील या ठेकेदाराने MMRDA	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कडून जेथे जमिनीच्या विक्रीचे बाजार मूल्य २० करोड रुपये असताना तेथे तब्बल ८० करोड रुपये भाडे स्वरूपात एम.एम.आर.डी.ए.कडून वसूल करणे, तसेच या ठेकेदारास दहिसर मेट्रो स्थानकाची मूळ निविदा ६० कोटींची असताना त्यात वाढीव दर देऊन सुप्रमा न देता तब्बल १२० कोटींची निविदा काढून काम देणे, प्रत्यक्षात मेट्रो ९ चे काम २०२३ ला पूर्ण होणे अपेक्षित असताना २०२६ उजाडून देखील काम पूर्ण न होणे, काम पूर्ण न होऊन देखील त्यांच्यावर अद्याप कोणताही दंड न आकारता वाढीव रक्कम MMRDA कडून देण्यात येणे, मेट्रोच्या खाली बांधण्यात आलेला समांतर उड्डाणपूल देखील निविदेच्या प्रत्यक्ष रकमेपेक्षा जास्त दराने तसेच सदर उड्डाणपुलाच्या ठरलेल्या नियोजित नकाशांमध्ये परस्पर बदल करून MMRDA मार्फत जे.कुमार या ठेकेदाराला देण्यात येणे, अवाजवी घेतलेली भाड्याची रक्कम, कामात केलेली दिरंगाई, मूळ निवेदीच्या रकमेत झालेली वाढ, निविदा न देता करण्यात आलेले उड्डाणपुलाचे काम, यामुळे शासनाचे झालेले नुकसान, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
५०	श्री. सुनिल शेळके, वि. स .स.	पुणे जिल्हयातील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत सुमारे ९,९०० एकर क्षेत्र येत असून, २०२१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ४८ हजार ९६३	दिनांक १२ मार्च ,

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		होती, परंतु सद्यस्थितीमध्ये सदर लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली असणे, सदर भागातील विकासकामांसाठी केंद्र सरकारकडून कोणताही निधी प्राप्त होत नसताना येथील जकात कर आणि प्रवेश शुल्क बंद झाल्याने बोर्ड आर्थिक संकटात असणे, कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन दिले जात नसून पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, पथदिवे, औषध फवारणी अशा मूलभूत गरजांबाबत नागरिक त्रस्त असणे, राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून विकासकामांकरिता आजतागायत भरघोस निधी मंजूर झाला असून सदर विकासकामांना कॅन्टोन्मेंट बोर्डाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने मंजूर विकासकामे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असणे, स्थानिक नागरिकांकडून सदर कॅन्टोन्मेंट बोर्ड बरखास्त करुन येथे स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याची तीव्र मागणी होत असून प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, परिणामी सदर भागातील नागरिकांना सोयी-सुविधांपासून वंचित राहावे लागत असून सदर गंभीर बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी निर्माण झालेला असंतोष, याप्रकरणी शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक ती कार्यवाही व उपाययोजना.	२०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
५१	सर्वश्री. करण देवतळे, देवराव भोंगळे, वि. स .स.	अनेक वर्षांपासून विदर्भ मल्टीसर्व्हिसेस ही कंपनी नगरपरिषद वरोरा, जि.चंद्रपूर मध्ये पाणीपुरवठ्याची देखभाल दुरुस्तीची कामे करीत असणे, गेल्या दीड वर्षांपूर्वी पालिकेच्या दुषित पाणीपुरवठ्यामुळे मालवीय वॉर्ड येथील एका चार वर्षीय बालकाचा मृत्यू झाला असणे, तसेच दुषित पाणी पिण्यामुळे शहरातील अनेक नागरिकांना साथीच्या रोगांची लागण होऊन शहरातील आरोग्याची समस्या बिकट झाली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण पसरले असणे, त्यामुळे विदर्भ मल्टीसर्व्हिसेस कंपनीविरुद्ध पोलीसांत गुन्हा दाखल झाल्यामुळे या कंपनीला त्वरित काळ्या यादीत टाकण्याची मागणी नागरिक व लोकप्रतिनिधींनी केली असणे, परंतु अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसणे, शासनाने तात्काळ सदरहू कंपनीला काळ्या यादीत टाकून कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.
५२	श्रीमती मंदा म्हात्रे, वि. स. स.	नवी मुंबईमध्ये सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या उद्यान,मैदाने,नाले तसेच आरक्षित असलेल्या भूखंडांवर भूखंड माफियांनी सर्रासपणे अनधिकृत बांधकामे उभारली असणे, तसेच सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या सामाजिक सेवेच्या आरक्षित	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असलेल्या अशा अनेक भूखंडावर अनधिकृत बांधकाम करणे म्हणजे एक प्रकारे गुन्हा असणे, ज्या आरक्षित भूखंडांवर भूमाफियांनी गोडाऊन, भंगाराचे दुकान, नर्सरी, ढाबे असे विविध प्रकारचे उत्पन्न निर्माण करणारे अनधिकृत बांधकाम उभारले असणे, नवी मुंबईमध्ये सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकी जागेवर अनेक अनधिकृत बांधकामे झाली असणे, तसेच भूमाफियांनी सर्व नियमांचे उल्लंघन करून अनधिकृत बांधकामांचा सपाटा लावला असणे, सिडको प्रशासनाने व नवी मुंबई महानगरपालिकेने किती अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली व कधी केली, सदर अनधिकृत बांधकामांमध्ये कोण कोणत्या आजी माजी नगरसेवकांची नावे आहेत, त्याचबरोबर या अनधिकृत बांधकामांना शह देण्याकरिता संबंधित अधिकारी यांचे पाठबळ असणे हे तपासणे अत्यंत महत्वाचे असणे, याबाबत सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या आरक्षित असलेल्या भूखंडांवर अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या भूमाफिया व अधिकाऱ्यांवर शासनाने कायदेशीर कारवाई करण्याची गरज, तसेच नवी मुंबईकरांना या अनधिकृत बांधकामांच्या विळख्यातून बाहेर काढण्याकरीता व अनधिकृत बांधकामधारकांवर व त्याला	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जबाबदार अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याकरीता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
५३	श्री. तुकाराम काते, वि. स. स.	चेंबूर येथील न. भूक्र. ४६९- अ महाराष्ट्र शासनाच्या शासकीय जागा बांधा, वापरा, हस्तांतर करा या तत्त्वावर सध्याच्या हब टाऊन या खाजगी कंपनीला ज्या अटी आणि शर्तीवर देण्यात आली त्या सर्व अटी आणि शर्तींचे सदरच्या खाजगी विकासकाच्या कंपनीने उल्लंघन केले असणे, अटी व शर्तींनुसार सदर विकासकामे सर्वप्रथम सर्व शासकीय इमारतींचे बांधकाम करून देणे क्रमप्राप्त असणे, त्यामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह व इतरही शासकीय कार्यालयांच्या इमारतींचा समावेश असणे, परंतु सर्व इमारतींचे बांधकाम अत्यंत संथ गतीने सुरु असणे, कधी कधी तर ते बांधकाम बंदच ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असणे, या विकासकाने सदरचे बांधकाम बंद ठेऊन त्याने त्याच्या स्वतःच्या विक्री करता असलेल्या इमारतीचे व त्यामधील व्यापारी गाळे या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून स्वतःचा फायदा केला असणे, शासकीय इमारतींचे अटी आणि शर्तींनुसार सदर काम विहीत कालावधीत पूर्ण करून देणे क्रमप्राप्त असणे, भारतरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सभागृहाचे बांधकाम हे विकासक पूर्ण	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब असणे, त्यांनी शासकीय जागा ज्या अटी व शर्तींवर विकास करण्यासाठी घेतलेली आहे त्यांचे उल्लंघन केले असून त्यांची उच्चस्तरीय चौकशी करून त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
५४	सर्वश्री. विठ्ठल लंघे, हेमंत ओगले, वि. स .स.	अहिल्यानगर जिल्ह्यातील सन १९९२ पासून मंजुरी प्राप्त बेलापूर (श्रीरामपूर)-परळी प्रस्तावित रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण पूर्ण होऊन माहे जून, २०२२ मध्ये अहवाल रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आलेला असताना, केवळ २.५५ टक्के RoR दाखवत दिनांक २६ सप्टेंबर २०२२ रोजी केंद्र शासनाकडून स्थगिती देण्यात आलेली असणे, राज्य शासनाने २०१९ मध्येच ५० टक्के आर्थिक सहभागाचे पत्र दिले असून सहभागानंतर RoR उणे ०.८७ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहील असे स्पष्ट करण्यात आलेले असतानाही प्रकल्प प्रलंबित ठेवण्यात येणे, परिणामी हा भागातील जनतेवर अन्याय करणारा निर्णय असल्याची भावना तीव्र होणे, अ.नगर-बीड-परळी, बारामती-लोणंद-फलटण, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव हे तोट्यातील प्रकल्प मंजूर असताना सदर मार्ग स्थगित ठेवण्यात येणे, या प्रकल्पासाठी उपोषणे व तीव्र आंदोलन झालेले असून मा. मुख्यमंत्री यांनीही पाठपुराव्याचे आश्वासन दिलेले	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असताना देखील अद्याप ठोस प्रगती न झाल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावरील स्थगिती उठवून प्रकल्पास तात्काळ मंजुरी देण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.	
५५	श्री. सुहास बाबर, वि. स .स.	सांगली जिल्ह्यातील खानापूर, आटपाडी, तासगाव, जत तसेच सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यात अनेक गलाई बांधव कारागीर हे पिढ्यानपिढ्या देशभरातील विविध शहरांमध्ये सोने-चांदी रिफायनरी व सराफी व्यवसायात वस्तू निर्मितीचे काम करत असणे, देशभरात अंदाजे २ लाख प्रत्यक्ष व १० लाख अप्रत्यक्ष कामगारांची उपजीविका या व्यवसायावर अवलंबून असणे व कोट्यवधी रुपयांचा महसूल शासनाकडे जमा होत असणे, असे असतानाही जुना आयपीसी कलम ४११ तसेच नव्या बीएनएस कलम ३१७ अंतर्गत चोरीसंदर्भातील तरतुदींचा अवाजवी वापर करून पोलिसांकडून सातत्याने त्रास दिला जात असणे, शासन निर्णयानुसार चौकशी प्रक्रियेची अंमलबजावणी होत नसणे, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर संयुक्त समन्वय समिती स्थापन न झाल्याने व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, तसेच या व्यवसायास लघुउद्योगाचा दर्जा नसल्याने कर्जसुविधा व	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		संरक्षणात्मक उपाय मिळण्यात अडचणी येत असणे, या सर्व बाबींचा विचार करून संबंधितांना लघुउद्योग दर्जा देणे, समन्वय समित्या स्थापन करणे व पोलिस कारवाईस स्पष्ट मार्गदर्शक तत्वे लागू करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
५६	श्री. चंद्रदीप नरके, वि. स .स.	"आधी नंदापूर मग पंढरपूर" अशी ख्याती असलेले नंदवाळ हे प्रतिपंढरपूर म्हणून सर्व राज्यांमध्ये परिचित असणे, प्रतिवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशीला या ठिकाणी अंदाजित पाच लाखाहून अधिक प्रमाणात वारकरी दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून भेट देत असणे, सदर दिंडी सोहळ्यामध्ये "गोलरिंगण सोहळ्याचे" आयोजन होत असणे, सदर सोहळ्याकरिता आवश्यक असणारी जागा नंदवाळ येथील गायरान गट क्र. ६३ मधील ४६ हेक्टर जमीन, भारत राखीव बटालियन क्र. ३ व राज्य राखीव पोलीस बल यांना देणेबाबतचा शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २०२० रोजी झालेला असणे, परंतु सदर निर्णयास नंदवाळ ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी सदरची जागा बटालियनला देणेसाठी तीव्र विरोध करणे, याबाबत वारंवार आंदोलनेही झाली असून तत्कालीन मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथे दिनांक १९ मे, २०२३ रोजी बैठक झाली असणे, यामध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने गायरान गट	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		क्र. ६३ मधील ५० एकर जागा गांवासाठी राखीव ठेवणेबाबत सूचना केल्या असणे, भाविकांना या जागेवर रिंगण सोहळ्याकरिता भारत बटालियनकडून विरोध झाला असणे, लोकप्रतिनिधींवर केसेस सुद्धा झालेल्या असणे, याबाबत सतत पाठपुरावा करुन देखील अद्याप गेल्या दोन ते अडीच वर्षामध्ये पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, परिणामी ग्रामस्थ व वारकरी भाविकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
५७	सर्वश्री. राजु तोडसाम, सुधीर मुनगंटीवार, वि. स .स.	राज्यातील १३ पेसा क्षेत्राबहुल जिल्ह्यांतील आदिवासी सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी राज्य सरकारने सरळसेवा भरतीची जाहिरात काढून संबंधित विभागांना त्या ठिकाणी पदभरती करण्याची निर्देश दिले असणे, या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका क्र. ६४८७२/२००५, दि. १७.११.२०२५ व विशेष अनुज्ञा याचिका क्र. २२१०९/२०२३, दि. ६.१०.२०२५ अन्वये दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पेसा क्षेत्रातील १७ संवर्गातील पदभरतीबाबत शासन निर्णयाद्वारे सूचित करणे, परंतु राज्यातील अनेक जिल्ह्यांत अनुशेष असताना, आरक्षणाची बिंदुनामावली निश्चित नसणे, काही जिल्ह्यांतील	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रशासकीय अधिकारी या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करणे, काही जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी याबाबत शाशंक असणे, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिल्यानंतरसुद्धा अद्यापपर्यंत पदभरती न होणे, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ५ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित क्षेत्रातील १७ संवर्गांपैकी केवळ ९ संवर्गांची पदभरती करणे, सदर पदांसोबतच राज्य शासनाने वेळोवेळी निर्देश केलेल्या सरळ सेवा पदभरतीची परीक्षा उत्तीर्ण असताना पेसा क्षेत्रातील उमेदवारांना जाणीवपूर्वक मागील ३ वर्षांपासून मानधन तत्वावर ठेवणे, त्यामुळे त्यांच्या सेवाज्येष्ठतेवर अन्याय होणे, ही बाब राज्यातील १३ जिल्ह्यांतील १७ संवर्गांतील उमेदवारांवर अतिशय अन्यायकारक असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
५८	श्री. प्रकाश सुर्वे, वि. स .स.	मे.ज्ञानप्रकाश शुल्का एलएलपी यांनी जोगेश्वरी, पूर्व , मुंबई येथील सीटीएस क्र ४५ व ४८ येथील जमिनीवर केलेल्या गंभीर अनियमित बाबी व जाणीवपूर्वक चुकीचे सादरीकरण करुन अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, एसआरएचे नकाशे मंजूर करतांना त्यात अंतर्गत ९ मिटर रुंदीचा डीपी रस्ता दाखविण्यात	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		येणे, परंतु प्रत्यक्षात केवळ ६ मिटरचा रस्ता असतांना अग्निशमन विभागाद्वारे "ना हरकत प्रमाणपत्र "देण्यात येणे, यांसदर्भात दिनांक १६ मार्च, २०२६ रोजीच्या सुमारास मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन कार्यालय, मरोळ, अंधेरी, मुंबई यांना लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन देणे, या निवेदनानुसार अद्यापही या संदर्भात कोणतीचच कार्यवाही करण्यात न आल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
५९	डॉ. राहूल पाटील, वि. स .स.	परभणी महानगरपालिकेला जकात अनुदान माहे सप्टेंबर,२०१६ करिता नगरपालिका संचालनालय यांचे दिनांक १० जून,२०१६ च्या आदेशान्वये दरमहा १,९० कोटी येणे, शासनाने महाराष्ट्र वस्तू व सेवाकर अधिनियम,२०१७ मधील कलम ४ नुसार सन २०१६-१७ हे वर्ष आधारभूत वर्ष (Base Year) घोषित करुन कलम ५ नुसार आधारभूत वर्षाचा महसूल ठरवण्यात येणे, दिनांक १ ऑगस्ट,२०१५ पासून शासनाने रुपये ५० कोटी पेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापारी आस्थापनांना स्थानिक संस्था करामधून सूट देणे, परंतु महानगरपालिका क्षेत्रात केवळ २ व्यापारी आस्थापना असणे, महागाई वाढ लक्षात घेता	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जकात अनुदानामध्ये वाढ होणे अपेक्षित असणे, त्याऐवजी दरमहा ३६ लक्ष रुपये अनुदान कमी करणे, त्यामुळे ४ महिन्यांचे कर्मचारी वेतन व १५ व्या वित्त आयोगाचे हफ्ते थकीत असणे, परिणामी कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होणे, आर्थिक वर्षामध्ये वसूली माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च या कालावधीमध्ये कराची वसूली जास्त प्रमाणात होणे, परंतु याच काळात शासनाने कर वसुलीला स्थगिती दिल्यामुळे आधारभूत वर्षातील वसुली कमी होणे, वसुलीची स्थगिती दिनांक ५ एप्रिल,२०१८ रोजी उठविणे, तोपर्यंत परभणी मनपाला वस्तू व सेवाकर अनुदान रक्कम निश्चित न झाल्यामुळे महानगरपालिका आर्थिक विवंचनेमध्ये सापडणे,परभणी महापालिकेने माहे नोव्हेंबर,२०२५ मध्ये अनुदानाची थकीत रक्कम विशेष बाब म्हणून मंजूर करण्याची विनंती शासनाकडे केलेली असणे, शासनाने सदर प्रकरणी केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.	
६०	श्री. संजय उपाध्याय, वि. स .स.	मुंबई शहरात विशेषतः बोरिवली विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कांदळवनांची बेकायदेशीर तोड, अनधिकृत भरणी (Land Filling) आणि त्यावर मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू असल्याची गंभीर बाब समोर आली येणे, कांदळवने ही मुंबईसाठी नैसर्गिक संरक्षक भिंत असून	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पूरस्थितीपासून संरक्षण, समुद्राच्या भरती-ओहोटीचा परिणाम कमी करणे व पर्यावरणीय संतुलन राखणे महत्वाचे असणे, मात्र काही भू-माफिया व बिल्डर लॉबी यांच्या संगनमताने रात्रीच्या वेळी मलबा टाकून भरणी केली जात असल्याच्या स्थानिक नागरिकांच्या वारंवार तक्रारी असतानाही महापालिका, पोलीस प्रशासन व वन विभाग यांचे दुर्लक्ष होणे, कांदळवन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात झाडांची तोड व माती/मलबा टाकून भरणी, अनधिकृत बांधकामांना स्थानिक स्तरावर मूकसंमती, भविष्यात पूरस्थिती व पर्यावरणीय आपत्तीचा गंभीर धोका निर्माण झालेला असणे, मुंबईचे पर्यावरण वाचवणे आताच्या घडीला नितांत आवश्यक असून कांदळवनांचे रक्षण झाले नाही तर भविष्यात मुंबईला भीषण पूरस्थिती व पर्यावरणीय संकटाला सामोरे जावे लागणार असल्याची भिती निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
६१	श्री. अबू आझमी, वि. स .स.	मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा क्षेत्रामध्ये अनेक वर्षांपासून एस.एम.एस. इंव्होक्लीन बायो वेस्ट कचरा जाळणारी कंपनी व आर.एम.सी. सिमेंट प्लांट कार्यरत असणे, सदर कंपनीमुळे स्थानिक	दिनांक १२ मार्च, २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होणे, सदर कंपनी बंद करण्यात यावी याकरिता २००९ पासून विधानसभेत व सर्वच माध्यमातून वारंवार मागणी करण्यात येणे, सन २०१९ मध्ये कंपनी विरोधात आंदोलन करणे, तेथील नगरसेवक यांना अटक करणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०२० रोजी पत्राद्वारे कंपनी ५० टक्के क्षमतेने चालू ठेवून उर्वरित कचरा तळोजा येथील कारखान्यात पाठवण्याचा आदेश देणे, दीर्घकालीन उपाययोजनांकरीता २०२२ पर्यंत खालापूर, रायगड या जागेमध्ये कंपनी सुरु करण्यात येत असल्याचे पत्राद्वारे कळविणे, तत्कालीन पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांचेद्वारे सदर विषयी संयुक्त बैठक दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी घेण्यात येणे, परंतु कंपनी स्थलांतरित न होणे व त्याचे काम पूर्ण क्षमतेने सुरु असणे, कंपनीचा कचरा तळोजा येथील कारखान्यात पाठविण्याकरिता निवेदन केले असता वाहतुकीसाठी जास्त खर्च येत असल्याचे सांगून टाळाटाळ करणे, "विद्यमान पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री यांनी सदर विषयी बैठक घेण्याचे आश्वासन देऊनही बैठक न घेणे, दोन्ही कंपन्या बंद करण्याबाबत वारंवार मागणी करूनही कोणतीही कारवाई न होणे, सदर प्रकरणी जनसामान्यांमध्ये वाढलेला	चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असंतोष, यावर शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.”	
६२	श्री. विजयसिंह पंडित, वि. स . स.	राज्यातील कृषी क्षेत्राच्या डिजिटलायझेशनसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला असून, शासनाच्या बहुतांश कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी हा आयडी आधारभूत मानला जात असल्याचे अलीकडेच दिसून येणे, परंतु गेवराई विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्यातील हजारो शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमध्ये मोठ्या प्रमाणावर तांत्रिक विसंगती निर्माण झाल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या ८-अ वरील प्रत्यक्ष क्षेत्रापेक्षा फार्मर आयडीवर कित्येक पटीने जास्त क्षेत्र दर्शविले जाणे, नावात चुका असणे, जमिनीचा गट क्रमांक चुकीचा असणे किंवा एकाच शेतकऱ्याच्या नावावर इतरांच्या जमिनीची नोंद होणे, अशा गंभीर चुकांचा समावेश असणे, सदर तांत्रिक त्रुटींमुळे विविध शासकीय अनुदानांपासून पात्र शेतकरी तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची व चिंतेची भावना असणे, विशेष म्हणजे या किरकोळ चुका दुरुस्त करण्यासाठी सध्या ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) मंडळ अधिकारी किंवा तहसील स्तरावर कोणतीही तांत्रिक	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सुविधा वा अधिकार उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना जिल्हा मुख्यालयी हेलपाटे मारावे लागत असणे, शासकीय पोर्टलवरील या तांत्रिक बिघाडामुळे प्रत्यक्ष शेतकरी हवालदिल झाला असून, खरीप व रब्बी हंगामातील लाभांपासून तो वंचित राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली असणे, यावर तातडीने उपाययोजना म्हणून फार्मर आयडी दुरुस्तीचे अधिकार स्थानिक महसूल व कृषी स्तरावर प्रदान करणे आणि यासाठी विशेष मोहीम राबवून चुका दुरुस्त करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
६३	श्री. विलास भुमरे, वि. स .स.	छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील संत एकनाथ सहकारी साखर कारखाना लि., एकनाथ नगर हा कारखाना सन २०१५ पासून मे. सचिन घायाळ शुगर प्रा .लि .या कंपनीस त्रिपक्षीय करारा द्वारे १८ गाळप हंगामांसाठी भाडेतत्त्वावर देण्यात आलेला असणे, करारानुसार सर्व देणी व एफ.आर.पी. रक्कम अदा करण्याची जबाबदारी संबंधित कंपनीची असताना उस गाळप हंगाम २०२४-२५ मधील शेतकऱ्यांची एफ.आर.पी. रक्कम अद्याप न देणे, तसेच शासनाची पूर्वपरवानगी न घेता कारखान्याची मालमत्ता तारण ठेवून सुमारे ३० कोटी रुपयांचे कर्ज उचलणे, त्यातील १६.१३ कोटी रुपयांच्या	दिनांक १२ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वापराबाबत लेखापरीक्षण अहवालात स्पष्ट नोंद नसणे, बनावट सभासद नोंदी व संस्थापक सभासदांना वगळणे, तसेच विशेष लेखापरीक्षकांनी संचालक मंडळ बरखास्त करण्याची शिफारस करूनही त्यावर कार्यवाही न होणे, यामुळे कारखान्यातील सहकार क्षेत्रात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत संबंधित संचालक मंडळ बरखास्त करणे, भाडेकरार रद्द करणे व दोषींवर फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया.	
६४	डॉ. अतुल भोसले, वि. स .स.	कराड (जि. सातारा (तालुक्यामधील दक्षिण मांड या छोट्या नदीचे पाणलोट क्षेत्र कमी असून नदी केवळ पावसाळ्यातच वाहत असल्याने पावसाळा संपल्यानंतर दरवर्षी या खोऱ्यामध्ये शेतीच्या पाण्याची टंचाई जाणवत असणे, सुमारे २५ गावातील हजारो ग्रामस्थांना वाकुर्डे सिंचन योजनेच्या माध्यमातून शेतीसाठी व पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जात असणे, दरवर्षी उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच या भागात पाण्याची समस्या निर्माण होणे, पाणी टंचाईमुळे हजारो शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी उन्हाळा सुरु होण्यापूर्वीच पाणी सोडण्याचे नियोजन होण्याची आवश्यकता, या योजनेतील ८० टक्के वीज खर्च	दिनांक १३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शासनाकडून आणि २० टक्के खर्च शेतकऱ्यांकडून भरण्याची व्यवस्था करण्यात आली असली तरी हा २० टक्क्यांचा भारदेखील गरीब शेतकऱ्यांना पेलवत नसणे, जास्तीत जास्त सौर ऊर्जा निर्मिती करण्याचे शासनाचे धोरण असल्याने वाकुर्डे उपसा सिंचन योजनेच्या पंपांना देखील विद्युत पुरवठा करण्यासाठी सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा उभारल्यास शेतकऱ्यांवरील भार कमी होणार असल्याने यासाठी ही योजना सोलर फिडरवर आणण्याची आवश्यकता, तरी शासनाने पाणी सोडण्याचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज असणे, तसेच सदर योजना सोलर फीडर वर चालविण्याकरिता शासनाने याबाबत तातडीने प्रस्ताव मागवून मंजुरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
६५	सर्वश्री. प्रविण दटके, करण देवतळे, सुधीर मुनगंटीवार, मोहन मते, प्रताप अडसड, कृष्णा खोपडे, वि. स .स.	नागपूर शहराचा आऊटर भागामधे म.न.पा. व ना.सु.प्र .च्या जागेवर मोबाईल टॉवर लावण्याची मोहीम सुरु असणे, अवैध मोबाईल टॉवर्सवर म.न.पा. व ना.सु.प्र. कारवाई करण्यास असमर्थ असणे, आयुक्त, महानगरपालिका यांना वारंवार दिलेली तक्रार, मात्र मोबाईल कंपनीला छोटेखानी पत्र पाठवून दिशाभूल करून कसल्याही प्रकारची कारवाई न होणे, दूरसंचार कायदा दिनांक २६ जून, २०२४ रोजी लागू झालेला	दिनांक १३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असून निगम आयुक्तांना दिनांक २ मे, २०२५ रोजी मंत्रालयाने पत्र पाठवून देखील यावर कारवाई न होणे, मोबाईल टॉवर कंपनीला अभयदान देण्याचा प्रयत्न, भरगच्छ वस्तीत अनधिकृत इमारतीवर असलेले मोबाईल टॉवर म्हणजे दुर्घटना होण्याची शक्यता, मोबाईल टॉवर उभारलेल्या इमारतीच्या बांधकामाला मंजुरी नसणे, इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट न होणे, मोबाईल कंपनीद्वारे त्यांच्या मर्जीने कुठेही मोबाईल टॉवर उभे करणे, राज्यात असे अनेक प्रकार घडले असून कसल्याही प्रकारची परवानगी न घेणे, त्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या नियमांचे होत असलेले उल्लंघन, या अवैध मोबाईल टॉवर्समुळे निर्माण झालेला संभाव्य धोका टाळण्यासाठी व यावर नियंत्रण राखण्यासाठी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, नागरिकांनी या अवैध मोबाईल टॉवर्स विरुद्ध म.न.पा. व ना.सु.प्र .मध्ये तक्रारी करून सुद्धा त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना.	
६६	श्री. विजय शिवतारे, ॲड. राहूल कुल, वि. स .स.	पुणे शहरातील हिंजवडी हे आयटी हब म्हणून उदयास येणे, प्रचंड ट्रॅफिक आणि पाच पाच तास होणारी वाहतूक कोंडी यामुळे उद्योजक हैराण होणे, अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि इतर समस्यांमुळे बार्कले,	दिनांक १३ मार्च , २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नाईस, क्रेडिट स्विस, ल्युमीडेक्स यांसारख्या अनेक बड्या आयटी कंपन्यांनी हिंजवडी मधून पर‌राज्यात स्थलांतर करणे, परिस्थितीत सुधारणा नसल्याने आणखी कंपन्या इतरत्र स्थलांतरित होण्याच्या विचारात असणे, स्थलांतरण रोखण्यासाठी व रोजगारवृद्धीसाठी पुण्याच्या बाजूला पुरंदर तालुक्यातील मौजे दिवे, मौजे कोडीत व चांबळी येथे आयटी पार्क प्रस्तावित करणे, प्रस्तावित जमिनी शासकीय गायरान असल्याने संपादनाची समस्या व खर्च नसणे, दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी तसेच दिनांक ३ एप्रिल, २०२५ रोजी मा. उद्योगमंत्री यांनी बैठका घेऊन महसूल विभागाकडून हस्तांतरण प्रस्ताव सादर करावा असे निदेश दिलेले असणे, मात्र अद्याप याबाबत महसूल विभागाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, सदरहू विषय तातडीने मार्गी लावण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.	चर्चा झाली.
६७	डॉ. किरण लहामटे, वि. स .स.	अकोले विधानसभा क्षेत्रातील साठवण तलाव मोरदरी,समशेरपूर ता.अकोले,जि.अहिल्यानगर या योजनेस जिल्हा वार्षिक आदिवासी उपाययोजना सन २०१४-१५ (लघु पाटबंधारे योजना १०१ ते २५० हेक्टर) जिल्हाधिकारी कार्यालय,जिल्हा नियोजन समिती, अहिल्यानगर	दिनांक १३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		यांजकडून रुपये ४६७.३२ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त असणे,सदर कामाचे पाया खोदाई करत असतांना पायामध्ये कार (Dyke) लागल्यामुळे त्यामधून गळती होण्याची शक्यता असणे,गळती रोखण्यासाठी Dyke वरील उपाययोजना करणे आवश्यक असणे, सदरहू उपाययोजना करण्यासाठी खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असणे,सदरील Dyke वरील उपाययोजनेसाठी येणारा खर्च तसेच GST व Royalty च्या रकमेत झालेली वाढ,या सर्व बाबींमुळे योजनेच्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असणे,सदर योजना पूर्ण झाल्यास आदिवासी भागातील १२५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून तेथील सिंचनाचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार असणे,सदरील साठवण तलावाचे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २६२४.२७ लक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विभागाकडे सादर करण्यात आलेला असणे,सदर कामास तातडीने आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता असणे, आदिवासी विभागामार्फत काही मतदार संघात जलसंधारणाच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येणे परंतु मोरदरी साठवण बंधाऱ्यास आदिवासी विभागाकडे अद्यापही जाणीवपूर्वक प्रस्ताव	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रलंबित असणे,त्यामुळे जनमानसात तीव्र नाराजी निर्माण होणे,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.”	
६८	सर्वश्री. नाना पटोले, समाधान अवताडे, विजय देशमुख, संजय केळकर, विलास तरे, विजय वडेट्टीवार, अमोल जावळे, वि. स .स.	राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये महसूल, परिवहन व पोलीस विभागांतर्गत कार्यरत असलेल्या चेकपोस्टवर वाहनचालक, मालवाहतूकदार व सर्वसामान्य नागरिकांकडून गंभीर तक्रारी प्राप्त होत असणे, अनेक ठिकाणी अनावश्यक वाहन तपासणी, कागदपत्रांच्या किरकोळ कारणांवरून अडवणूक, विलंब तसेच कथित आर्थिक वसुली होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या असणे, यामुळे मालवाहतुकीला उशीर होऊन उद्योग-व्यवसायांवर आर्थिक परिणाम होत असणे,काही चेकपोस्टवर सीसीटीव्ही व्यवस्था अपुरी असून डिजिटल पावती प्रणालीचा अभाव दिसून येणे,परिणामी पारदर्शकतेबाबत प्रश्न निर्माण होणे, राज्य शासनाने सर्व चेकपोस्टवर ई-तपासणी प्रणाली, सीसीटीव्ही अनिवार्य करणे, तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे व दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक असणे, तसेच राज्यातील सर्व चेकपोस्टची सखोल चौकशी करून पारदर्शक व नागरिकाभिमुख व्यवस्था उभारण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	दिनांक १३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
६९	श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, वि. स .स.	नांदेड जिल्ह्यातील लोह तालुक्यातील जय मल्हार मच्छिमार संस्था, गवंडगाव, मल्हारी मार्तंड भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्या. आंडगा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्या. माळेगांव व राजमाता अहिल्यादेवी भुजलाशयीन मत्स्य व्यवसायिक सहकारी घोटका, या चारही संस्था एकाच व्यक्तीने (श्री.चंद्रसेन ईश्वरराव पाटील,रा.गवंडगाव,ता.लोहा) नोंदणी केल्या असल्याचे आढळून येणे, तथापि यापैकी एकाही संस्थेत क्रियाशील सभासद नसल्याचे आढळून आलेले असणे, परिणामी जिल्हयातील मूळ मच्छिमारी करणाऱ्या व्यक्तींवर आलेली उपासमारीची वेळ, त्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेली नैराश्याची भावना, सदर बनावट व खोट्या कागदपत्रांच्या आधारे नोंदणी केलेल्या बनावट संस्थेमार्फत मच्छिमार असल्याचे तसेच शासनाकडून लाखो रुपयांची मच्छिमारी केल्याचे दाखवून शासनाचे लाखो रुपये उकळण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे अन्य गरजू व्यक्तींना मच्छिमारी करण्यापासून वंचित ठेवण्यात येणे, परिणामी त्या भागातील व परिसरातील क्रियाशील मच्छिमारांनी याबाबत शासनाकडून चौकशी करुन संबंधित व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाकडे मागणी	दिनांक १३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्यात आलेली असणे, शासनाचा निधी गैरमार्गाने हडप करणाऱ्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याची आवश्यकता वव अपहार केलेल्या रकमेची वसुली करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
७०	डॉ. तुषार राठोड, वि. स .स.	सध्या बी. एच. एम. एस. (BHMS) पदवीधर डॉक्टरांना महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस (MUHS) अंतर्गत एक वर्षाचा सीसीएमपी हा ब्रिज कोर्स करून महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू असणे, त्यासाठी स्वतंत्र पोर्टल निर्माण करून संबंधितांना RMP चा दर्जा देण्याचा मार्ग खुला करण्यात येत असणे, ही केवळ सर्वसाधारण बाब नसून वैद्यकीय शिक्षणाच्या गुणवत्तेचा, कायदेशीर अधिकाराचा व रुग्णसेवेचा प्रश्न निर्माण करणारी असणे, एमबीबीएस अभ्यासक्रम हा साडेपाच वर्षाचा व्यापक, क्लीनिकल व सर्जिकल प्रशिक्षणावर आधारित अभ्यासक्रम असणे, मेडिसिन, सर्जरी, ICU, आपत्कालीन सेवा, स्त्रीरोग व प्रसूती सेवा, बालरोग इत्यादी गुंतागुंतीच्या आजारांच्या व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणे, याउलट CCMP हा एक वर्षाचा मर्यादित ब्रिज कोर्स असणे, राज्यात मोठ्या प्रमाणात MBBS डॉक्टर उपलब्ध असताना ब्रिज कोर्सच्या	दिनांक १६ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		माध्यमातून समांतर मार्ग तयार केला जाणे, एक वर्षाचा ब्रिज कोर्स करून BHMS डॉक्टर्सना full fledged ऍलोपॅथी प्रॅक्टिस करण्याचा मार्ग खुला होणे व यामुळे सर्वसामान्य जनतेचे आरोग्य धोक्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया.	
७१	श्री. तानाजी मुटकुळे, वि. स .स.	विद्या शक्ती शिक्षण प्रसारक मंडळ, कोळसा, तालुका सेनगाव, जिल्हा हिंगोली द्वारा संचालित काही लखन सर्जेराव नाईक इंग्लिश स्कूल, कोळसा या शाळेत मराठीची मान्यता असताना मुद्दामहून खाडाखोड करुन इंग्रजी माध्यम सुरु करणे, त्यातून करोडो रुपये मिळविले असणे, राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे, या शाळेची मान्यता घेताना मागील तीन वर्षाचे दहावीचे निकाल संस्थेतील दुसऱ्या मराठी माध्यमिक शाळेचे दाखविलेले असणे, सन २०२४-२५ मध्ये सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, हिंगोली यांनी दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी भेट दिली असता दोनशे विद्यार्थ्यांपैकी १८३ विद्यार्थी उपस्थित व १७ विद्यार्थी रजा घेऊन गावी गेल्याचा अहवाल देण्यात येणे, सन २०२४-२५ मध्ये ३०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्कापोटी शासनाकडून	दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		या संस्थेला देण्यात आलेले असणे, सदर शाळेची सखोल चौकशी करून शाळेच्या सद्य:स्थितीचा अहवाल शासनास सादर करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.	
७२	श्री. शिवाजी पाटील, वि. स .स.	चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्याच्या दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्यसेवा पुरविण्यासाठी बांधलेले इसापूर येथील आरोग्यवर्धिनी केंद्र गेल्या १५ वर्षापासून कर्मचारी आणि सुविधांअभावी बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, लाखो रुपये खर्चून उभारलेली इमारत केवळ ओसाड वास्तू म्हणून असणे, या आरोग्य केंद्रावर सहा गावातील हजारो नागरिकांचे आरोग्य अवलंबून असणे, सद्य:स्थितीत या आरोग्य केंद्राची अवस्था अत्यंत दयनीय झालेली असणे, इमारतीच्या भोवती घाणीचे साम्राज्य पसरलेले असून आजुबाजुला झाडे-झुडपे वाढलेली असणे, इमारत अवैध धंदयाचे केंद्र बनलेले असणे, केंद्राला परिचारिका, कर्मचारी, रुग्णवाहिका मिळण्याबाबत एकमुखी मागणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी संबंधिताकडे करणे, असे असतानाही अदयाप याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, सहा दुर्गम गावातील नागरिकांचे आरोग्य	दिनांक १६ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		धोक्यात आलेले असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यासह आरोग्य केंद्र सुसज्ज करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
७३	श्री. अभिजीत पाटील, वि. स . स.	सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय, जलपर्यटन, धार्मिक, निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटन, विनयाई पर्यटन विकासाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याचा रु.३४२.७५ कोटी खर्चाचा प्रस्ताव मा.पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेस्तव सादर केलेला असणे, उक्त प्रस्तावावर उच्चाधिकार समितीच्या दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्तावातील पाण्याखालील प्राचीन शहर रु.५० कोटी तसेच मार्केटींग, ब्रँडींग व क्षमता बांधणी रु.१० कोटी असे एकूण रु.६० कोटी किंमतीचे काम वगळून उर्वरित रु.२८२.७५ कोटी इतक्या किंमतीचा आराखडा मा .मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील शिखर समिती समोर मान्यतेस्तव ठेवण्याची शिफारस करण्यात येणे, तद्नंतर दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी सदर प्रस्तावित रु.२८२.७५ कोटी किंमतीच्या	दिनांक १६ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विकास आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, कामांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करून घेण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना "संनियंत्रण अधिकारी "म्हणून घोषित करण्यात येणे, उक्त आराखड्यास प्रशासकीय मान्यता मिळून ८ ते ९ महिने उलटूनही अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नसणे, शासनाने पर्यटन धोरणानुसार उजनी धरणावरती पर्यटन क्षेत्र निर्माण करून त्या ठिकाणी रोजगार निर्मिती करण्यास प्राधान्य देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
७४	सर्वश्री. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम,श्रीमती मनिषा चौधरी,श्री. समीर कुणावार, वि. स .स.	पनवेल (जि.रायगड) तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस होऊनसुध्दा व सर्व धरणे भरली असून देखील पनवेल विधानसभा अंतर्गत येणाऱ्या खारघर, कामोठे, नवीन पनवेल, तळोजा अशा ठिकाणी लोकांना तीव्र पाणी टंचाई जाणवत असणे, सातत्याने होत असलेल्या अपुऱ्या पाणी पुरवठ्याबाबत वारंवार लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी प्रशासनाचे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले असणे,परंतू सिडको प्रशासन विशेषतः पाणी पुरवठा विभागाशी संबंधित अधिकारी याबाबत गंभीर असल्याचे दिसत नसणे, सणवार जवळ आले की पाणी पुरवठा अत्यंत अनियमित होत असणे, वारंवार सिडको प्रशासनाला याबाबत विविध सूचना केल्या	दिनांक १६ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असतानाही सिडकोतर्फे कुठल्याही प्रकारची अंमलबजावणी होताना दिसत नसणे, सिडको पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी अत्यंत बेफीकीर वृत्तीने काम करत असून कुठल्याही प्रकारचे उत्तरदायित्व स्विकारताना दिसत नसणे, काही विभागात हेतूपुरस्सर पाणी टंचाई निर्माण केली जाते असल्याचा आरोपही नागरिकांनी केला असणे,पाणी टंचाई अभावी पाण्याचे टँकर देताना हे अधिकारी अत्यंत मनमानी पध्दतीने त्याचे वाटप करत असणे, त्यामुळे नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता असणेजो पर्यंत उक्त विभागात नियमित पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत कुठल्याही प्रकारच्या नवीन बांधकामांना भोगवटा प्रमाणपत्र व पूर्णत्वाचा दाखला देण्यात येऊ नये, यावर शासनाने मनमानी कारभार करणाऱ्या उक्त विभागातील कर्मचाऱ्यांवर कारवाई करून पाणी पुरवठा नियमित होणेकरिता उपाययोजना करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.	
७५	श्री. मनोज जामसुतकर, वि. स .स.	मुंबईतील म्हाडाच्या पुनर्रचित ३८८ इमारतींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात शासनाने माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार, ३३(७) चे सर्व फायदे ३३(२४) मध्ये समाविष्ट करून पुनर्विकासाचा मार्ग मोकळा	दिनांक १६ मार्च , २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		केलेला असणे, तथापि सदर नियमांतर्गत अद्याप एकाही इमारतीचा पुनर्विकास प्रकल्प सादर झालेला नसणे, ३८८ इमारतींचे भूखंड लहान असून रहिवाशांची संख्या जास्त असल्यामुळे विकासकांसाठी प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरत नसणे,म्हाडा स्वतः इमारतींची मालक असताना,खासगी विकासकांकडून २०% प्रीमियमची मागणी करणे, तसेच, लँड कॉस्टच्या २५% रेडीरेकनर दराएवढे फ्लॅट्स म्हाडाला देण्याची अट घालण्यात येणे, त्यामुळे कोणताही विकासक पुढे येण्यास तयार नसणे, इमारतींचा सुरुवातीचा एफएसआय ३.१९ वापरला असल्याने विकासकाला अतिरिक्त एफएसआय मिळणार नसणे, क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये शेजारील सेस इमारतींचे मालक आणि भाडेकरू सहकार्य करीत नसणे, पुनर्विकासासाठी आवश्यक असणारे प्रॉपर्टीकार्ड, इमारतीचे नकाशे म्हाडाकडून वेळेत उपलब्ध न होणे, तसेच म्हाडाकडून अद्यापही होकार पत्राचा आणि डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट (DA) चा मसुदा तयार झालेला नसून जुनाच ३३(७) चा फॉरमॅट वापरला जाणे, म्हाडा स्वतः मालक असतानाही, एसआरए किंवा सेस इमारतींप्रमाणेच भाडेपावत्या आणि इतर अनावश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात येणे, तसेच सक्सेशनची जाचक अट घालण्यात	चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		येणे, म्हाडाच्या ३८८ इमारतींच्या पुनर्विकासात येणाऱ्या अडचणी सोडवून या इमरतींच्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
७६	डॉ. नितिन राऊत,श्री .राजकुमार बडोले, वि. स .स.	नागपूर येथे शासनाने १४० कोटी रुपये खर्चून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर उभारले असणे, मात्र माहे फेब्रुवारी, २०२६ च्या पाहणीनुसार इतका प्रचंड निधी खर्च करूनही ही वास्तू केवळ शोभेची वस्तू म्हणून असणे, येथे नियोजित असलेला ४० फूट उंचीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अद्याप उभारला गेलेला नसणे, सदरहू बाब अत्यंत खेदजनक असणे,सध्या येथे केवळ सभागृह आणि वाचनालय सुरू असणे, नियोजित बँक, उपहारगृह आणि व्यावसायिक गाळे प्रशासकीय उदासीनतेमुळे बंद असणे, यासंदर्भात सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त व संबंधित अधिकारी कमालीचे दुर्लक्ष करीत असणे, विचारणा केल्यास योग्यप्रकारे उत्तरे दिली जात नसणे, धक्कादायक बाब म्हणजे केंद्राच्या देखभालीसाठी अर्थसंकल्पात स्वतंत्र निधीची तरतूदही करण्यात आलेली नसणे, सार्वजनिक निधीचा असा अपव्यय आणि महापुरुषांच्या स्मारकाची ही उपेक्षा जनतेमध्ये तीव्र	दिनांक १६ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		संताप निर्माण करत असणे, या केंद्रातील सर्व सुविधा तात्काळ सुरू करण्याबाबत, निधीची उपलब्धता करून देण्याबाबत आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
७७	ॲड. राहूल कुल, वि. स .स.	जलसिंचनामुळे राज्यातील चिबड जमिनींचे प्रमाण वाढले असल्याने चिबड जमिनी निर्मुलनाची आवश्यकता असणे, पाझरचर, बंदिस्त पझारचर यासाठी मापदंड निश्चित करून पाझरचर निर्मुलनासाठी दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रके त्वरित तयार करून त्यास मान्यता देण्याची आवश्यकता, नदी क्षेत्रातील उक्त जमिन सुधारणेकरीता १००% रक्कम अनुदान देण्याची मागणी, खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे काम सुरु असून उक्त काम वेळेत पूर्ण होण्याची आवश्यकता असणे, जनाई शिरसाई उपसासिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण निधीस मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून निविदा प्रक्रिया सुरु असणे, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या कुपटेवाडी (भुलेश्वर) येथील वितरिकेच्या वरील बाजूस, वंचित जिरायती भागातील गावांच्या सिंचनासाठी नवीन पाईपलाईनसाठी अंदाजपत्रके तयार करण्यात येणे, त्यास पाणी	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		परवानगी दिली असून, निधीसह मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, दौंडच्या पूर्वभागातील अनेक गावांतील शेती उजनी धरणाच्या बॅकवॉटरवर अवलंबून असणे, त्याठिकाणी बॅरेजे बांधण्याची मागणी असणे, मुळा मुठा व भीमानदीवर कोपबंधाऱ्यांना अनेक वर्षांचा कालावधी झाला असल्याने त्यामधून पाण्याची गळती होत असल्याने, बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेसमध्ये रुपांतर करण्याची आवश्यकता असणे, मुळशीचे पाणी पूर्वमुखी वळविण्याच्या प्रस्तावास टाटा पॉवर यांच्याकडून तत्वतः मान्यता दिली असणे, उक्त सर्व विषयांबाबत मा. मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक १२.०२.२०२५, १३.०८.२०२५, ३०.०९.२०२५, ०४.०३.२०२६ रोजी बैठका घेऊन देखील कोणताही निर्णय झाला नसणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
७८	श्री. किसन वानखेडे, वि. स .स.	उमरखेड विधानसभा मतदारसंघातील एमएसआयडीसी (MSIDC) अंतर्गत ५१C व ५१D ही कामे HAM”योजनेअंतर्गत प्रस्तावित असून सदर रस्ता अत्यंत महत्त्वाचा असणे, या रस्त्यावर उमरखेड येथील साखर कारखाना, शहरातील शाळा व महाविद्यालये, MIDC क्षेत्र तसेच सहस्त्रकुंड धबधबा ही पर्यटन स्थळे असणे, सदरहू रस्ता राष्ट्रीय	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		महामार्गास जोडला जात असल्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असणे, तथापि सदर कामांच्या अंदाजपत्रकात रस्त्याची रुंदी केवळ ७ मीटर प्रस्तावित करण्यात आली असून वाढत्या वाहतुकीचा विचार करता ही रुंदी अपुरी असणे, तसेच प्रत्येक गावामध्ये रस्ता रुंदीकरण व काँक्रीट नालीची आवश्यकता असतानाही त्याबाबत कोणतीही तरतूद करण्यात आलेली नसणे, ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक असणे, सदर दोन्ही कामांमध्ये रस्त्याची रुंदी किमान १० मीटर करण्यात यावी, गावालगतच्या रस्त्यांचे चौपदरीकरण करण्यात यावे, तसेच आवश्यकतेनुसार दोन्ही बाजूंनी काँक्रीट नालीची तरतूद करण्यात यावी तसेच उमरखेड शहरातील उड्डाणपुलापासून गोपिकाबाई गवंडे महाविद्यालयापर्यंत रस्त्याचे चौपदरीकरण व दोन्ही बाजूंनी काँक्रीट नाली बांधकाम करण्याबाबत संबंधित यंत्रणेस तात्काळ आदेश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	
७९	श्री. अजय चौधरी, वि. स .स.	मुंबईतील परळ येथील ग्लोबल रूग्णालय प्रशासनाने मुंबई महानगरपालिकेच्या बांधकाम नियमांचे उल्लंघन करणे, मुंबई महानगरपालिकेच्या अटीनुसार रूग्णालयातील १५% खाटा गरीब	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रूग्णांकरीता या रुग्णालयाने आरक्षित न ठेवणे, महानगरपालिकेकडून विविध सुविधांचा लाभ घेणे, गेली १५ वर्ष महानगरपालिकेला आरक्षित खाटा हस्तांतरीत न करणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ग्लोबल रूग्णालयातील १५% खाटा रूग्णालय प्रशासन गरीब रूग्णांकरीता उपलब्ध करून देत नसल्याने कठोर कारवाईची मागणी करणे, परंतु महानगरपालिका व ग्लोबल रूग्णालय प्रशासनाने याबाबत कोणतीही कार्यवाही न करणे, याबाबत महानगरपालिकेच्या रूग्णालयातील दरानुसार १५% खाटा गरीब रुग्णांना उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	चर्चा झाली.
८०	श्री. अनिल मांगुळकर, वि. स .स.	यवतमाळ नगरपरिषद येथील मुख्याधिकारी यांनी त्यांच्या प्रशासकीय कार्यकाळामध्ये अनेक नियमबाह्य कामे व निर्णय घेतले असल्याचे निदर्शनास येणे. यामध्ये जैवखनन (BIO MINING) प्रकल्प टेंडर प्रक्रिया असो किंवा घनकचरा व्यवस्थापन (घंटागाडी) नाले साफसफाई, अग्नीशमन दल विभागीय कार्यालयाचे बांधकाम निविदा, अशा अनेक निविदा प्रक्रिया नियमबाह्य प्रक्रियेने राबवून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास येणे, तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी यांच्या कक्षेत असलेले शहरातील भुयारी गटारांची कामे व शहरात बेंबळा	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रकल्पाचे वाढीव पाणीपुरवठा योजनेची कामे करण्याकरिता शहरांतर्गत भागातील रस्त्यांची खोदकामे करणे, परंतु अनेक ठिकाणी करण्यात आलेल्या खोदकामांना २/३ महिन्यांचा कालावधी होऊनही रस्त्याचे काम पूर्ण न केल्यामुळे नागरिकांना रहदारीचा होत असलेला त्रास, त्यामुळे याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी असणे, शहरासाठी ९ कोटी रुपयांचा विकास निधी प्राप्त झाला असतांना ४९ रस्त्यांची कामे पूर्ण झाली असल्याचे कागदोपत्री दाखविणे, यासर्व प्रकरणांची चौकशी करुन शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
८१	श्री. समीर मेघे, वि. स .स.	औद्योगिक वसाहत (MIDC) हिंगणा, जिल्हा नागपूर भागात ग्रा.पं.सोनेगाव (निपाणी) सर्व्हे क्र.४५/२ श्रमीकनगर येथे सन १९८० च्या पूर्वीपासून म्हणजे सुमारे ४३ वर्षापासून ४०० कुटुंबियांनी अतिक्रमणे केली असणे, तसेच नगरपंचायत निलडोह परिसरातील MIDC मधील ओपन स्पेस क्र.३ व ४० येथे ८०० गरजू कुटुंबियांनी ४० ते ४५ वर्षापासून अतिक्रमणे केली असणे, तसेच नगरपरिषद डिगडोह, ता.हिंगणा, जि.नागपूर येथील सर्व्हे क्र.१० वर १६८ कुटुंबियांनी अतिक्रमणे केली असणे, या तिन्ही वसाहतीं मध्ये अतिक्रमीतांनी पक्की घरे बांधुन ते वास्तव्यास असणे, आजमितीस या तिन्ही अतिक्रमीत	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वसाहतींमध्ये विज,पाणीपुरवठा,रस्ते,नाल्यांची बांधकामे, शिक्षण सुविधा निर्माण करण्यात आली असणे, अनेकदा पट्टे वाटप करण्यासंदर्भात निवेदने देण्यात आली असतांनाही अद्याप त्याबाबत कार्यवाही झाली नसणे, अतिक्रमीत कुटुंबियांना भूखंडाचे वाटप करण्यात न झाल्यामुळे घरांची दुरुस्ती, विस्तारीत बांधकामे याकरिता बँक कर्ज मिळत नसणे, तसेच गरजेनुसार घरांची खरेदीविक्री व्यवहार अतिक्रमीत धारकांना करता येत नसणे, सुमारे ४० ते ४५ वर्षापूर्वी अतिक्रमण करणाऱ्या मूळ कुटुंब प्रमुखाचे आजचे वय किंवा त्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या पिढीतील वारसदार या बाबी लक्षात घेता भूखंडाचे पट्टे वाटप होण्याचे प्रतिक्षेत ते असल्याची बाब शासनास निवेदनान्वये कळविण्यात आली असणे,त्यामुळे औद्योगिक वसाहत (MIDC) हिंगणा क्षेत्रातील मौजा सोनेगाव (निपाणी) श्रमीक नगर,नगरपंचायत निलडोह व नगरपरिषद डिगडोह वसाहतीमधील अतिक्रमीत धारकांना भूखंड नियमानुकुल करुन निवासी पट्टयांचे वाटप करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
८२	श्री. सुरेश धस, श्रीमती नमिता	बीड जिल्हा इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी	दिनांक

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	मुंदडा, वि. स. स.	मंडळांतर्गत जिल्हा सरकारी कामगार अधिकारी कार्यालय व तालुका कामगार अधिकारी कार्यालयामार्फत माहे मार्च, २०२० ते माहे फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत शेकडो बोगस मयत कामगार दाखऊन कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याची बाब उघडकीस येणे, काही नोंदणी करणाऱ्या संस्था व मयताच्या वारसांनी प्रशासनाशी संगनमत करून कित्येक वर्षांपूर्वी मृत्यू झालेल्या व्यक्तींना जिवंत दाखऊन नगर परिषदेकडून ९० दिवस काम केल्याचे बनावट प्रमाणपत्र व खोटे मृत्यू दाखले मिळऊन शासनाची मोठी फसवणूक करणे, सदर प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी, संस्था व बोगस वारसांवर अद्याप कोणतीही कठोर फौजदारी कारवाई न झाल्याने जनसामान्यांत पसरलेला तीव्र असंतोष, या संपूर्ण घोटाळ्याची सचिव स्तरावर उच्चस्तरीय चौकशी करून दोषींकडून अपहारित रकमेची सक्तीची वसुली करण्याबाबत, संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणे, दोषींवर गुन्हे दाखल करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	१७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.
८३	सर्वश्री. संभाजी पाटील-	ताई सुखदेव काळे, (वय ३१)१ रा. डोंजा, ता. परंडा, जि. धाराशिव यांचा	दिनांक

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	निलंगेकर, राणाजगजितसिंह पाटील, वि. स .स.	दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला असणे, त्याबाबत अंबी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला असणे, संबंधित तक्रारीनुसार आरोपींकडून मयत ताई सुखदेव काळे यांना वारंवार फोन कॉल व अश्लील मेसेजव्दारे त्यांच्याकडे शरीर सुखाची मागणी करून त्यांना ब्लॅकमेलिंग करून मानसिक त्रास दिला जात असल्याचे नमूद असणे, तथापि संबंधित पोलीस अधिकारी यांना तक्रारदार यांनी पुरावे सादर करूनही त्यांनी आरोपींवर किरकोळ कलमे लावणे, त्यामुळे आरोपींना त्वरित जामीन मिळाला असणे, आरोपी सध्या पुरावे नष्ट करणे तसेच तक्रारदारावर दबाव टाकून त्याचा जबाब बदलण्यासाठी प्रयत्न करत असणे, यासाठी आरोपींना प्रथमदर्शनी पोलीसांची साथ मिळत असणे, त्यामुळे परिसरात प्रशासना विरूध्द असंतोष पसरत असणे, त्यानुषंगाने सदरहू गंभीर प्रकरणात आरोपींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक तसेच माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करणे, प्रकरणाची सखोल चौकशी होण्यासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करणे, कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करणे तसेच पीडित कुटुंबास	१७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आर्थिक सहाय्य व संरक्षण देऊन त्यांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
८४	डॉ. बालाजी किणीकर, वि. स .स.	ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर तालुक्यातील उल्हासनगर शहर हे सुमारे १३ चौ.कि.मी. क्षेत्रफळात वसलेले असून राज्यातील सर्वाधिक दाट लोकवस्तीचे शहर असताना सन २०१३ मध्ये प्रसिद्ध विकास आराखड्याबाबत नागरिकांकडून १७ हजार ३३ हरकती व सूचना प्राप्त होणे, त्यापैकी अत्यल्प हरकतींचाच विचार करण्यात आल्याची बाब समोर येणे, तसेच १२० फूट रुंदीच्या रिंगरोडमुळे झोपडपट्टी, वसाहती व व्यापारी आस्थापना बाधित होण्याची शक्यता निर्माण होणे, तसेच महाराष्ट्र शासनाच्या २००६ च्या अधिनियमाअंतर्गत दिनांक ०१ जानेवारी, २००५ पूर्वीच्या अनधिकृत बांधकामांच्या नियमिती-करणासाठी दाखल सुमारे २५ हजारर प्रकरणांवर आजतागायत निर्णय न होणे, वारंवार अर्ज व शुल्क भरूनही प्रकरणे प्रलंबित राहणे, अनेक इमारती जीर्ण अवस्थेत असताना नगररचना विभागाकडून अहवाल न देणे, तसेच नियमितीकरण प्रक्रियेवरील खर्च व प्रत्यक्ष महसूल याबाबत पारदर्शकता नसणे, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शासनाची प्रतिक्रिया.	
८५	सर्वश्री. भिमराव तापकीर, सुनिल कांबळे, वि. स .स.	पुणे महानगरपालिका हद्दवाढी अंतर्गत दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ व ३० जून, २०२१ रोजी एकूण ३२ गावे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली असणे, समावेशानंतर विशेषतः खडकवासला मतदारसंघातील भागांमध्ये कचरा व्यवस्थापनात गंभीर समस्या असणे, अनेक ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा कचऱ्याचे ढीग साचलेले दिसून येणे व स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव असणे, घनकचरा व्यवस्थापन विभागास दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध असतानाही त्याचा परिणामकारक वापर होत नसणे, मुख्य खाते क्षेत्रीय कार्यालय स्तरावर नियोजन व देखरेखीत त्रुटी असणे, कंत्राटदार यांच्यात संगनमत होऊन निधीचा अपव्यय होत असणे, कचरा व्यवस्थापनासाठी दर्शविलेली वाहने, मशिनरी व कर्मचारी पूर्ण क्षमतेने कार्यरत नसतानाही त्यांच्या नावावर देयके अदा होणे, तसेच प्रत्यक्षात न केलेल्या कामांची देयके सादर होणे, विशेषतः क्षेत्रीय कार्यालयांतील स्वच्छता निरीक्षक (SI) व विभागीय स्वच्छता निरीक्षक (DSI) स्तरावर देखरेखीचा अभाव दिसून येणे, नियमित कचरा उचल न होणे, वाहने वेळेत न फिरणे व तक्रारींवर कार्यवाही न होणे, परिणामी अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग कायम	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		राहून दुर्गंधी, डास व संसर्गजन्य रोगांचा धोका वाढणे, त्यामुळे खडकवासला मतदारसंघात कचरा व्यवस्थापनाबाबत चौकशी समिती स्थापन करून विशेष आर्थिक लेखापरीक्षण करणे, संबंधित अधिकारी व कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करणे तसेच पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित कचरा व्यवस्थापन आराखडा तयार करून समयबद्ध अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
८६	श्री. मिहीर कोटेचा, वि. स .स.	विकासस नियमावली ३३(११) व ३३(२०)B अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये ३ FSI मध्ये १ FSI व ४ FSI मध्ये १.५ FSI इतका साठा PAP/PTC स्वरूपात बांधून SRA/महानगरपालिकेला देणे असणे, मात्र प्रत्यक्षात IOD/IOA प्लॅनप्रमाणे बांधकाम न करता २BHK/३BHK घरे बांधून विक्री केली जात असल्याचे दिसून येणे, संबंधित विभागाकडून योग्य लेखापरिक्षण (Audit) न झाल्यामुळे शासनाची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असणे, मुलुंड मतदारसंघात ३३(११) व ३३(२०)B अंतर्गत ६ ते ७ प्रकल्पांमध्ये अनियमितता झाल्याची माहिती असणे, केवळ मुलुंड मध्येच १०० कोटींपेक्षा अधिक किंमतीची शासकीय मालमत्ता बेकायदेशीररीत्या विकली गेल्याची	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शक्यता असणे, संपूर्ण मुंबईत हा आकडा २००० कोटींपेक्षा जास्त असणे, तसेच नियमांनुसार PAP/PTC साठा ५ कि.मी.च्या आत किंवा लगतच्या वॉर्डमध्ये देणे अपेक्षित असताना मुलुंड मधील साठा मालाड-मालवणी व मानखुर्द येथे स्वीकारण्यात येणे, यामुळे भविष्यात मुलुंडमधील नागरिकांवर स्थलांतराची वेळ येणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
८७	श्री. कैलास घाडगे पाटील, वि. स .स.	राज्यामध्ये जवळपास ८६,००० अनुदानित शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेंतर्गत केंद्र सरकार मार्फत पोषण आहार योजनेसाठी जवळपास रुपये १८०० कोटी खर्च करणे, राज्यस्तरीय खरेदी समितीने निविदा प्रक्रियेमध्ये प्रत्येक घटकाचे दर व तपशील देणे, हिरवा वाटाणा पुरवठा करावा लागेल असे स्पष्ट करून "हिरवा वाटाणा" (Green Peas) चे दर मागवून रुपये १३४ प्रति किलो निश्चित करणे, याबाबत शिक्षण संचालनालयामार्फत प्रत्येक जिल्हानिहाय कार्यादेश देण्यात येणे, त्यात मुळ निविदेमध्ये असलेला हिरवा वाटाणा हा शब्द वगळून फक्त वाटाणा शब्द जाणीवपुर्वक घालणे, हिरवा वाटाणा हा बाजारात १२० ते १३० रुपये प्रती किलो मिळणे व पांढरा वाटाणा प्रति किलो ३० ते ३५ रुपये दराने मिळणे, १३४ रूपयांच्या हिरवा वाटाणा ऐवजी ३०-३५	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रूपयांचा साधा वाटाणा पुरवठा करणे, पोषण आहाराचे काम हे महिला बचत गटामार्फत करणे, परंतु ८६ हजार शाळांमधील महिला बचत गटावर अन्याय करुन काही ठराविक लोकांना फायदा व्हावा या उद्देशाने हे काम त्यांना देण्यात येणे, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेत मुळ निविदेतील तपशील व कार्यादेश मधील तपशील यामध्ये जाणीवपूर्वक बदल करुन करण्यात येणाऱ्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन कारवाई करणे व मुळ निविदेमध्ये असलेला हिरवा वाटाणा विद्यार्थ्यांना पुरवठा करण्याचे आदेश देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
८८	श्री. राजु खरे, वि. स .स.	सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ विधानसभा मतदारसंघातील चिंचोळीकाटी एम.आय.डी.सी. मधील ओसी, छल्ला, फर फर, बासवा, ॲबो आर्यन व कृष्णा केमिकल या कंपन्यांमधुन दुषित पाणी सोडण्यात येत असल्यामुळे शेतीचे होत असलेले नुकसान, केमिकल युक्त दुषित पाणी सोडण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील विहीरी व बोर मधुन येणारे पाणी पुर्णपणे दुषित झालेले असणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून पूर्ण शेती खराब झालेली असणे, दुषित पाण्यामुळे तेथील लोकांचे आरोग्य सुध्दा धोक्यात आलेले असणे,	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		चिंचोळीकाटी एम.आय.डी.सी. मधील दुषित पाणी सोडणाऱ्या वरील कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत वारंवार तक्रारी तेथील लोकप्रतिनिधी यांनी मा. पर्यावरण मंत्री यांच्याकडे करुन सुद्धा त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्यामुळे तेथील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, उपरोक्त नमूद केलेल्या कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
८९	ॲड. श्रीजया चव्हाण, श्री. जितेश अंतापुरकर, वि. स .स.	जिल्हा रुग्णालय नांदेड याची क्षमता १०० खाटांवरुन ३०० खाटा इतकी श्रेणीवर्धीत करण्याबाबत सन २०२१ मध्ये शासनाकडे सादर झालेल्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली असणे, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे येणाऱ्या बाह्य रुग्णांची संख्या प्रतिदिन जवळ जवळ हजार इतकी असणे, या रुग्णालयात अंतररुग्ण म्हणून दाखल होणाऱ्या रुग्णांचे प्रमाणही लक्षणीय असणे, त्यामुळे जिल्हा रुग्णालयात भरती करावयाच्या रुग्णांकरीता खाटा मिळत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असणे, सुमारे ३६ लाख लोकसंख्या असलेल्या नांदेड जिल्ह्यात ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय सुरु झाल्यास त्या परिसरातील १६ तालुक्यांना त्याचा लाभ मिळणार असणे, मात्र नांदेड जिल्ह्यात आता उद्भवलेल्या	दिनांक १७ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आणिबाणीसदृष्य परिस्थितीत कोणतीही सक्षम पर्यायी व्यवस्था नसणे, आरोग्य सेवेअभावी रुग्णमृत्यू दरामध्ये सातत्याने लक्षणीय वाढ होणे, या पार्श्वभूमीवर अस्तित्वात असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय म्हणून श्रेणीवाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव संपूर्ण समर्थनासह प्राप्त होऊनही त्यावर शासनाने कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, नागरिकांची होणारी गैरसोय, कुचंबणा व नागरिकांच्या जिवाला निर्माण होणारा धोका, या सर्व बाबी विचारात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
९०	श्री. राजन नाईक,ॲड .पराग अळवणी, सर्वश्री. पराग शाह, प्रविण दटके, वि. स .स.	MMRDA क्षेत्राचा भाग असलेल्या वसईईविरार उपप्रदेशासाठी शासनाकडून १९९० मध्ये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्यात येणे, सिडकोने तयार केलेला २००१-२०२१ या कालावधीचा विकास आराखडा महानगरपालिका आयुक्तांच्या संमतीने दिनांक ०९ फेब्रुवारी, २००७ रोजी मंजूर केलेला असणे, या आराखड्याची मुदत २०२१ मध्ये संपुष्टात आल्यानंतर वसई-विरार शहर महानगरपालिकेने MRTP कायदा, १९६६ च्या कलम २३ व ३८ नुसार दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी सुधारित विकास आराखडा	दिनांक १८ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तयार करण्याबाबत नोटीस प्रसिद्ध केली असणे, या क्षेत्रातून बुलेट ट्रेन, कोस्टल रोड त्याचप्रमाणे चौथ्या मुंबईचे नियोजन, मनपा क्षेत्राची सध्या वेगाने वाढणारी लोकसंख्या, अपुऱ्या पायाभूत सुविधा, अनधिकृत बांधकामे यांसारख्या गंभीर समस्या पाहता विशेष नियोजनाची आवश्यकता असणे, अनेक धोरणात्मक प्रकल्प आणि सध्याची अनधिकृत व नियोजनबाह्य बांधकामे धरुन सुधारित विकास आराखडा तयार करण्यासाठी आवश्यक असलेले अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ महानगरपालिकेकडे उपलब्ध नसणे, MRTP कायदा कलम १६२ मध्ये कोणतेही नियोजन प्राधिकरण त्याच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यास कार्यक्षम नसल्यास राज्य शासनास अशा अधिकाराचा वापर करण्याची तरतुद असणे, या पार्श्वभूमीवर महापालिकेने प्रसिद्ध केलेली नोटीस रद्द करून सुधारित विकास आराखडा तयार करण्यासाठी कलम १६२ नुसार MMRDA आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
९१	श्री. अस्लम शेख, वि. स .स.	मुंबईतील मालाड (पुर्व) येथील PAP प्रकल्प (CTS क्र. ८२७/ A/	दिनांक

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		४A/२) संदर्भात गंभीर अनियमितता झाल्याचे दस्तऐवजांवरून स्पष्ट होणे, सदर भूखंड मूलतः uपोलीस स्टाफ क्वार्टर्सस साठी राखीव असताना तो PAP गृहनिर्माणासाठी वापरण्यातत येणे, प्रकल्पाच्या LOA मध्ये माहे एप्रिल, २०२५ नंतर दुरुस्ती करून प्रति घरकुल खर्च रुपये ३२.२१ लाखांवरून तब्बल रुपये ५०.९८ लाखांपर्यंत वाढविण्यात आला असणे, ज्यामुळे सुमारे रुपये ६१८ कोटींची अतिरिक्त आर्थिक वाढ झाली असणे, या GR ने १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी ASR दर रुपये ८४,४६० प्रति चौ.मी. योग्य असल्याचे स्पष्ट केले असणे, मुंबईतील विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी सद्य:स्थितीत अंदाजे ५०,००० पी.ए.पी.सदनिकांची आवश्यकता असणे, मुंबईचा विकास आराखडा (DP) राबविण्यासाठी २,२०,००० पी.पी.ए. सदनिकांची आवश्यकता असल्याचे कृती दलाच्या निदर्शनास आले असणे, मात्र दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी अचानक सर्व्हे क्रमांक बदलून दर रुपये १,३३,६७० प्रति चौ.मी. करण्यात येणे, कोणतीही नव्याने प्रत्यक्ष पाहणी किंवा स्वतंत्र मूल्यांकन न करता हा बदल करण्यात आल्याने संगनमताचा संशय निर्माण होणे,तसेच, टेंडर अटींनुसार टप्प्याटप्प्याने देयके देणे अपेक्षित असताना ५०% TDR व	१८ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रीमियम आगाऊ देण्यात येणे,या सर्व बाबींची उच्चस्तरीय चौकशी करून दुरुस्त LOA स्थगित करण्याची व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता असून याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
९२	सर्वश्री. अनंत (बाळा) नर, मुरजी पटेल, वि. स. स.	जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रामध्ये मयुर नगर, मोराचा पाडा मौजे मरोशी ता.बोरीवली न.भू.क्र १६२७(पै) सर्वे नं १६९ येथे २५ वर्षापूर्वी झोपडपट्टी पुनर्विकास योजना (एसआरए) राबविली जात असणे, सदरहू संपूर्ण काम अर्धवट असून स्थानिक रहिवाशांना मुलभूत सुविधा पुरविलेल्या नसणे, सदर वसाहतीमध्ये ७५१ लाभार्थी असणे, त्या रहिवाशांचे परिशिष्ट-२ अदयाप केलेले नसणे, विकासकाने स्वत:च झोपडपट्टी वासियांना घरांचा ताबा देणे, सदर इमारतीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होणे, शासनाला देय असलेली पीएपी साठी राखीव असलेली घरे न देणे, नियमाप्रमाणे अधिकृत रस्ता त्या वसाहतीला उपलब्ध न करणे, धोकादायक इमारतीत रहिवाशी जीवन जगत असणे, याठिकाणी विकासकाने प्रचंड अनियमितता केल्यामुळे त्याचेवर कारवाई करण्याची आणि या सर्व इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची	दिनांक १८ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रतिक्रिया.	
९३	श्री. आमश्या पाडवी, वि. स .स.	नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील गमन येथील श्री हुन्या रुपा वसावे यांना आयुक्त, महसूल नाशिक विभाग यांच्या दिनांक ०६ एप्रिल, २००५ रोजीच्या आदेशान्वये प्रकल्पग्रस्त म्हणून घोषित करण्यात आलेले असणे, परंतु उपलब्ध सर्वेक्षण नोंदी १९८७ च्या यादीतील अनुपस्थिती तसेच संबंधित कागदपत्रांतील विसंगती यावरुन त्यांची जमीन प्रत्यक्षात प्रकल्पाच्या बुडीत अथवा बाधित क्षेत्रात गेलेली नसल्याची बाब समोर येणे, किरसिंग हुण्या वसावे हे त्यावेळी नर्मदा बचाव आंदोलनात सक्रीय कार्यकर्ता असल्याने अधिकाऱ्यांसोबत संगनमत करुन त्यांनी सदर क्षेत्र हे बाधित दाखऊन संबंधितांनी प्रकल्पग्रस्त या नात्याने शासनाकडून आर्थिक मोबदला व पुनर्वसन लाभ स्वीकारले असल्याची गंभीर तक्रार प्राप्त होणे, यामुळे खऱ्या पात्र प्रकल्पग्रस्तांवर अन्याय तसेच शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय होणे, संबंधित प्रकरणात कागदपत्रांची पडताळणी न करता लाभ मंजूर केल्याने निर्माण झालेला प्रशासकीय हलगर्जीपणा, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व कालबद्ध चौकशी करुन अपात्र लाभ तात्काळ वसूल करण्याबाबत तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर	दिनांक १८ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
९४	श्री. शंकर जगताप, वि. स .स.	पुणे जिल्हयातील हिंजवडी आयटीपार्कमध्ये १,००० फ्रेशर्स पदवीधरांना एका फसवणूक करणाऱ्या कंपनीने नोकरी देण्याच्या नावाखाली त्यांचेकडून सुमारे २ लाख रुपये घेऊन फसवणूक केली असल्याचे निदर्शनास येणे, हिंजवडी घोटाळ्यातील फ्रेशर्स पदवीधरांचे पैसे परत मिळविण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याची आवश्यकता असणे, टीसीएस व इतर आयटी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना कॉन्फरन्स रूममध्ये नेऊन दबावाखाली राजीनामा देण्यास भाग पाडले जात असणे, कोणतेही आर्थिक पॅकेज न देता बेकायदेशीर कामावरून काढून टाकण्यात येणे, आयटी कंपन्यांमध्ये नोकरी सोडणे, जबरदस्तीने राजीनामे घेण्याच्या सत्रामुळे आयटीयन्सच्या मनामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, आयटी क्षेत्रात जबरदस्तीचे राजीनामे टाळण्यासाठी सुसूत्र पद्धतीने कर्मचाऱ्यांची कपात नियमन करण्यासाठी स्पष्ट व बंधनकारक चौकट तयार करण्याची आवश्यकता असणे, आयटीयन्सला कायद्यांच्या संरक्षणात्मक कक्षेत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या करून कामाचे तास, फुल अँड फायनल सेटलमेंट,	दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आणि पीएफ पालन यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक असणे. कामाचे तास वाढवले जात असताना औद्योगिक विवाद अधिनियम अंतर्गत कामगार संज्ञेची आयटी क्षेत्रासाठी स्पष्ट व्याख्या नसल्याने आयटी कर्मचारी अजूनही अनेक संरक्षणात्मक कायदेशीर चौकटींच्या बाहेर असणे, फेअर बॅकग्राऊंड व्हेरिफिकेशन फुल अँड फायनल सेटलमेंटमध्ये होणारा विलंब पीएफच्या तफावती, ९० दिवसांच्या नोटीस पिरीयडची सक्ती ही गंभीर समस्या असणे, योग्य सक्षम तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध नसल्याने असुरक्षित आयटीयन्सच्या तक्रारीकरिता फास्ट-ट्रॅक लेबर कोर्ट प्रणाली/आयटी ट्रायब्युनल सुरू करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
९५	श्रीमती मंजुळा गावित, वि. स .स.	पिंपळनेर (ता.साक्री, जि.धुळे) येथे १३२/३३ के. व्ही. क्षमतेचे उपकेंद्र व्हावे म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधी यांचेकडून होत असलेली मागणी, मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन उर्जामंत्री यांनी दिनांक २३ जून, २०२१ रोजी १३२/३३ के.व्ही. क्षमतेचे विज उपकेंद्र पिंपळनेर येथे उभारणेसाठी मान्यता देणे, उपकेंद्रासाठी सुकापूर ता.साक्री येथील सरकारी जमीन गट क्र. १३७ क्षेत्र २ हे.२५	दिनांक १८ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आर उपलब्ध करुन देणे, सदर प्रकल्पासाठी वारंवार निविदा काढण्यात येऊनही कुठलाच स्थानिक ठेकेदार प्रकाल्पाचे काम करण्यास समोर येत नसणे, दिनांक १४ ऑगस्ट,२०२५ रोजी मध्य प्रदेश मधील भोपाळ येथील टेस्ला या कंपनीस कार्यारंभ आदेश देणे,आदेश देऊन ६ महिन्यांचा कालावधी उलटला असतांना संबंधीत कंपनीने आतापर्यंत केवळ साईटवर पाण्याच्या उपलब्धतेसाठी बोअरवेल मारणे, या व्यतिरीक्त तार कंपाऊंड करणे,गोडाऊन बांधणे इत्यादी किरकोळ कामांसह आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामुग्रीबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही न करणे, तसेच विज उपकेंद्राचे टॉवर उभे करणे, लाईन ओढणे व त्यानुषंगाने आवश्यक असलेली कामे करण्याचा कार्यारंभ आदेश शर्वरी इलेक्ट्रिकल्स छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या कंपनीस माहे नोव्हेंबर,२०२५ मध्ये वा त्या दरम्यान देण्यात येणे,सदर कंपनीने देखील आजतगायत कुठल्याच प्रकारचे काम न करणे, परिणामी पिंपळनेर,ता.साक्री येथील मंजूर असलेल्या १३२/३३ के.व्ही.उपकेंद्राचे काम अद्यापही सुरु न होणे,शासनाने सदर प्रकरणी तातडीने चौकशी करुन पिंपळनेर येथील मंजूर उपकेंद्राचे काम वेळेत पूर्ण होण्यासाठी केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रतिक्रिया.	
९६	श्री. अनुपभैय्या अग्रवाल, वि. स .स.	धुळे शहर हे सर विश्वेश्वरैया यांच्या रचनेतून वसलेले असणे, तसेच धुळे शहरातील सर्व्हे क्रमांक ११३३ मध्ये असलेल्या नैसर्गिक नाल्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचा प्रकार निदर्शनास येणे, अतिक्रमणामुळे नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहात बदल होणे, त्यामुळे भविष्यात जीवितहानी तसेच वित्त हानी होण्याची दाट शक्यता असणे, त्यामुळे सदर अतिक्रमण काढण्याबाबत वेळोवेळी शासनाकडे स्थानिक नागरिक व लोकप्रतीनिधी यांच्याकडून मागणी करण्यात येणे, सदर अतिक्रमण काढण्यासंदर्भात एक वर्षाच्या आत कार्यवाही करण्याबाबत शासनाकडून आश्वासित करण्यात येणे, जिल्हा प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्यास दिरंगाई हाणे, सदर अतिक्रमणामुळे नाल्याची रुंदी २०० फुटावरुन १०० फुटापर्यंत होणे, जिल्हा प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्याबाबत हायकोर्टात बाजू खंबीरपणे मांडण्यात न येणे, शहरातील अनेक रस्ते, ओपन स्पेस, सरकारी जागा अतिक्रमणाच्या विळख्यात असणे, पावसाळा जवळ असल्यामुळे अतिक्रमण काढणे अत्यंत गरजेचे असणे, आर्थिक व जिवीतहानी होण्याची शक्यता असणे, अतिक्रमणाबाबत प्रशासनाकडून अद्यापही काहीही कार्यवाही	दिनांक १८ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्यात न येणे, त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण होणे, सदर अतिक्रमण तातडीने काढण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
९७	श्री. अशोक पाटील, वि. स .स.	गेटवे ऑफ इंडिया येथील जेटी क्रमांक ५ असुरक्षित घोषित करून प्रवासी वाहतूक बंद करण्यात आली असताना, मुंबई पोर्ट प्राधिकरणने रॉयल बॉम्बे यॉट क्लबला फ्लोटिंग पॉन्टून उभारण्यास परवानगी दिल्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असणे, स्वतंत्र संरचनात्मक लेखापरीक्षण झाले का, त्याचा अहवाल सार्वजनिक केला जाणार का, तसेच निविदा प्रक्रिया, करार अटी व महसूल वाटपाची माहिती सभागृहास देण्यात येण्याची आवश्यकता, महसूलातील मोठा हिस्सा खासगी संस्थेकडे जात असल्याने ही व्यवस्था पुनरावलोकनास पात्र असणे, पर्यायी जेटीचा विचार न करता घेतलेल्या निर्णयांमुळे स्थानिक नौकाधारकांचे आर्थिक नुकसान झाले असून त्यांच्या संरक्षणासाठी उपाय करणे अपेक्षित असणे, यॉट क्लबच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी, तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकांच्या जागेवरील कथित अतिक्रमणावर कारवाई होणार का असा प्रश्न निर्माण होणे, या निर्णय प्रक्रियेत सहभागी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून हितसंबंध	दिनांक १८ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		संघर्ष व संभाव्य आर्थिक अनियमिततेची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
९८	श्री. महेश सावंत, वि. स. स.	महावितरणमधील उपकेंद्रांच्या देखभाल व दुरुस्तीच्या आणि MSKVY २.० Scheme कामांमध्ये बारामती, पुणे, नाशिक व कोल्हापूर परिमंडळामध्ये मे. R. N. Electricals (Vendor Code ०१०००१९४३५) या कंत्राटदारामार्फत सन २०१९ ते २०२६ मध्ये संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा आर्थिक अपहार करणे, बनावट बिलिंग, कामातील अनियमितता व तांत्रिक निष्काळजीपणामुळे नागरिक व जनावरांची जीवितहानी झाल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, इलेक्ट्रिकल इंजिनियर्स अँड कॉन्ट्रॅक्टर असो.यांनी दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी महावितरणचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य अभियंता (वितरण) यांचेकडे लेखी तक्रार सादर करणे, संबंधित कंत्राटदारामार्फत प्रत्यक्ष काम न करता खोट्या GRN (माल प्राप्ती नोंदी) व बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधी रुपयांचे बोगस बिलिंग करून शासन निधीचा अपहार करणे, तसेच उपकेंद्रातील स्विचगिअरची देखभाल व दुरुस्ती निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे अपघाताच्या वेळी Fault Trip System कार्यरत न राहता विद्युत	दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अपघात होऊन परिमंडळातील नागरिक, जनावरांचे मृत्यू घडणे,शासनामार्फतत कंत्राटदार व अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी निश्चित करून कलम ३०४, ४२०, ४०९, ४६८, ४७१ व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून फौजदारी कारवाईची मागणी होणे, सन २०१९ ते २०२६ या कालावधीत संबंधित कंत्राटदाराने केलेल्या सर्व कामांचे लेखापरीक्षण व स्वतंत्र तांत्रिक चौकशी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB), विशेष तपास पथक (SIT) मार्फत उच्चस्तरीय गुन्हेगारी तपास करून कंत्राटदारास तात्काळ काळ्या यादीत समाविष्ट करण्याची आणि दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
९९	सर्वश्री. उत्तमराव जानकर, विजय शिवतारे, जितेंद्र आव्हाड, वि. स .स.	माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील निरा-देवघर व गुंजवणी प्रकल्प धरणाचे कालवे कार्यान्वित नसल्यामुळे निरा-देवघर प्रकल्पाचे पाणी किंवा गुजवणीचे पाणी निरा उजवा कालव्यास उपलब्ध होत नसणे, त्यामुळे निरा उजवा कालव्याच्या मूळ लाभक्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होणे, निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील मुख्य कालवा किमी १३४/७६० येथून खाजगी /सहकारी उपसा सिंचन योजनेचे काम	दिनांक २३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रलंबित असणे, सदरच्या खाजगी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजना करुन माळशिरस तालुक्यातील १६ दुष्काळग्रस्त गावांना पाणी मिळणेबाबत लोकप्रतिनिधींची मागणी असणे, त्यानुषंगाने निरा-देवघर प्रकल्पांतर्गत तालुक्यातील सहकारी उपसा सिंचन योजनेऐवजी शासकीय उपसा सिंचन योजनेचा प्रस्ताव शासनास प्राप्त असणे, त्यानुसार शासन निर्णय, धोरण व पाणी उपलब्धता इ. बाबींचा अभ्यास करुन सदर प्रकरणी शासनाकडून उचित कार्यवाही होत नसणे, निरा-देवघर प्रकल्पाचा मुख्य कालवा १५८ कि.मी .लांबीचा असून कि.मी. ० ते ६५ मधील कालवा कामे ही पारंपारिक उघड्या पध्दीतीने पूर्ण झालेली असून कि.मी. ६६ ते १५८ हा बंदिस्त नलीकेद्वारे प्रस्तावित कामे प्रलंबित असणे, तर कि.मी. ६६ ते ८७ ची प्रगतीत असलेली कामेही अद्यापी प्रलंबित असणे, सदरच्या कामाच्या खर्चाचा प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालामध्ये समावेश असून निधीअभावी सदरहू कामे प्रलंबित असणे, याबाबत शासनाने चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१००	सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत	रायगड जिल्ह्यातील ता.उरण, मौजे चाणजे येथील गट क्र. २३ व २४ या	दिनांक

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, वि. स .स.	जमिनीच्या अधिकार अभिलेखातील "वने" नोंद कमी करण्याबाबत श्री.परसिव्हल जोसेफ परेरा यांनी दाखल केलेल्या याचिका क्र.४६२८/१९८८ मधील मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २२/०९/१९८९ च्या आदेशाची अंमलबजावणी फेरफार क्र .४८०१ (१९९१/०७/०९) द्वारे यापूर्वीच करण्यात आलेली असणे, त्यानंतर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या दिनांक १३/०७/२००० रोजीच्या परिपत्रकानुसार वनसंरक्षक यांच्या दिनांक १७/०४/२००१ रोजीच्या आदेशानुसार व तहसीलदार उरण यांच्या दिनांक १९/०३/२००१ च्या निर्णयानुसार या जमिनीवर uमहाराष्ट्र शासन वने अशी नोंद करण्यात आलेली असणे, याचिका क्र. ९४३६/२०१० मधील दिनांक ०६/०५/२०१५ च्या आदेशात फक्त पूर्वीच्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत खुलासा मागविण्यात आला असणे, तसेच दिनांक २७/०७/२०२५ च्या आदेशात वने नोंद कमी करण्याबाबत कोणताही स्पष्ट निर्देश नसणे, दरम्यान, महाराष्ट्र खाजगी वन (अधिग्रहण) अधिनियम १९७५ च्या कलम २२(अ) अंतर्गत दाखल केलेले अपील उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडे प्रलंबित असणे, अशा स्थितीत महसूल प्रशासनाकडून दिनांक १२/०९/२०२४ चे पत्र निर्गमित करून "वने" नोंद कमी करण्याबाबत	२३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याने प्रशासकीय अधिकाराचा अतिक्रमण झाल्याची गंभीर शंका निर्माण झाली असणे, शासनाने या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दिनांक १२/०९/२०२४ चे पत्र रद्द तसेच सदर जमिनीवरील वने नोंद कमी करण्यासंबंधी किंवा प्रस्तावित कार्यवाहीस स्थगिती देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१०१	श्री. हेमंत रासने, वि. स .स.	पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या वसाहतींची दुरवस्था झालेली असणे, अनेक इमारतींमध्ये मनपा सेवक, बिगर महानगरपालिका सेवक, सेवानिवृत्त सेवक राहत असून त्यांना अनेक मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागणे, यामध्ये प्रामुख्याने पाण्याची व्यवस्था नसणे, ड्रेनेज लाईनची व्यवस्था नसणे, इमारतींमध्ये स्लॅब गळती होणे, काही इमारतींमध्ये स्लॅब पडल्यामुळे नागरिकांना अनेक वेळा दुखापत झाल्याच्या घटनाही घडणे, महापालिकेला भाडे भरुनही सोयी सुविधांपासून नागरिकांना वंचित रहावे लागणे,पुणे महानगरपालिकेने काही वसाहतींचे उदाहरणार्थ राजेंद्र नगर येथील वसाहतीचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरु केलेली असणे, परंतु त्या ठिकाणी राहत असलेल्या नागरिकांनी मालकी हक्काने घरे देण्याची मागणी करणे, तसेच या ठिकाणी पूरग्रस्त सुध्दा रहात असून त्यांचाही निर्णय प्रशासनाने	दिनांक २३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		घेतलेला नसणे, तसेच अनेक अडचणींना महापालिका प्रशासनाकडून कोणीतीही सकारात्मक उत्तरे अथवा कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात न येणे, परिणामी या नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन येथील नागरिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
१०२	श्री. संजय देरकर, वि. स .स.	केंद्र शासनाद्वारे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षांत राज्यांना भांडवली खर्चासाठी Special Assistance to States for Capital Investment अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येणे, त्यामध्ये नगररचना (Town Planning) योजनांना प्राधान्याने समाविष्ट करण्यात येणे, नगरपरिषद वणी हद्दीमध्ये सदर योजनेअंतर्गत टाउन प्लॅनिंग योजना राबविण्याचा प्रस्ताव विचाराधीन असणे, दुसरीकडे वणी शहराच्या पायाभूत सुविधा अत्यंत अपुऱ्या असून मुलभूत गरजा जसे की, पाणी पुरवठा, मलनिस्सारण वाहिन्या, अंतर्गत रस्ते, आरोग्य सुविधा, घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाकडून आवश्यक तेवढा निधी उपलब्ध होत नसणे, अशा परिस्थितीत टाउनप्लॅनिंग योजनेच्या नावाखाली भूसंपादन, आरक्षण व जमिनीचे पुनर्वाटप यासारख्या प्रक्रिया	दिनांक २३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		राबविल्यास त्याचा लाभ सर्वसामान्य नागरीकांना न होता मोजक्या विकासक/बिल्डर्स लॉबीकरीता मर्यादित राहण्याची शक्यता असणे, वणी शहराची झपाट्याने वाढ होत असून अनियोजित बांधकाम, रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व सार्वजनिक सुविधांवरील ताण वाढत असून केंद्र शासनाच्या वरील विशेष सहाय योजनेअंतर्गत उपलब्ध निधीचा प्रभावी उपयोग करून नियोजनबद्ध विकास आराखडा (Town Planning Scheme) राबविणे गरजेचे असणे, तथापि, सदर योजनेची अंमलबजावणी, निधी वितरण व प्रशासकीय कार्यवाहीबाबत स्थानिक स्तरावर स्पष्टता नसणे, शासनाने या सर्व प्रकरणी केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
१०३	श्री. अमोल खताळ, वि. स .स.	अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर नगरपालिकेच्या हद्दीत, सि.स. नं. ८१६/१६४९ येथील कोल्हार-घोटी राजमार्गालगत असलेली सुमारे १.२६ हेक्टर क्षेत्रफळाची नगरपालिकेच्या मालकीची जागा गेल्या काही वर्षांपासून बेकायदेशीररित्या अतिक्रमित करण्यात आलेली असणे, सदर जागेवर १९७०-८० च्या दशकात राहणाऱ्या नागरिकांचे नियोजनबद्ध पुनर्वसन श्रमिकनगर येथे करण्यात आले असणे, मात्र त्यानंतर या जागेवर काही समाजकंटकांनी बेकायदेशीररित्या कब्जा	दिनांक २३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करून कोणताही कर किंवा महसूल न भरता वापर सुरू ठेवला असणे, यापूर्वीच्या काही लोकप्रतिनिधींनी या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्याला अप्रत्यक्ष संरक्षण दिल्यामुळे नगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असणे, प्रत्यक्षात या जागेवर नगरपालिकेचे शॉपिंग सेंटर किंवा इतर उत्पन्नवर्धक प्रकल्प उभारले असते तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली असती, तसेच या परिसरात काहीवेळा कायदा व सुव्यवस्थेच्या समस्या निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या असून त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असणे, मात्र प्रशासनाकडून या गंभीर बाबीकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याने नागरिकांमध्ये शासनाविषयी निर्माण झालेली तीव्र नाराजी व असंतोषाची भावना, या गंभीर प्रकरणी शासनाने हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१०४	श्री. सुनिल प्रभू, वि. स .स.	भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील पिळंझे खुर्द येथील जेएमडी एंटरप्रायजेस या कंपनीने हजारो ब्रास खनिजांचे खाणीतून उत्खनन करुन, तस्करी व विक्री केल्याप्रकरणी सदरहू कंपनीला १० कोटी रुपयांची रॉयल्टी व दंड वसूलीचा आदेश पारित केल्याचा प्रकार	दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नुकताच उघडकीस येणे, अशा प्रकारे याच तालुक्यातील डभाड-करमाळे, पिळंझे खुर्द, साखरोली, दुगडफाटा, भरे,वशेरे आदी गावातील खाणीतील खनिजाची बेकायदा उत्खनन व विक्री प्रकरणाची चौकशी केल्यास मोठ्या प्रमाणात महसूलाचे अर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येणार असणे,ठाणे, रायगड, पालघर या तीन जिल्हयात अनुक्रमे ३००,२००,४०० मिळून ७०० दगडखाणी व स्टोन क्रशर प्रकल्प शासनाची परवानगी न घेता बेकायदेशीररित्या सुरु असणे, या खार्णीमधील हजारो ब्रास खनिजाचे उत्खनन करुन महसूल,खाण,प्रदुषण नियंत्रण मंडळ, पोलीस व वाहतूक विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांबरोबर अर्थिक संगनमत करुन व खनिजाची बेकायदेशीररित्या विक्री करुन शासनाच्या कोटयवधी रुपयांचे अर्थिक महसूलाचे नुकसान करण्यात येणे,सदरहू खाण व स्टोन क्रशर मालकांनी उत्खनन भाडेपट्टा, (पर्यावरण परवाना) ई-ट्रान्झिट पास, जमीन मालकी हक्काचे पुरावे व भूमालकाची लेखी संमती तसेच उत्खननाचे मंजूर प्रमाण व कालावधी याबाबतची शासनाची कोणतीही परवानगी न घेता,स्फोटके वापरण्याची परवानगी न घेता, बेकायदा खनिजाचे उत्खनन करुन, तस्करी, वाहतूक आणि विक्री करण्यात येत	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे,याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
१०५	सर्वश्री. रामदास मसराम, संजय मेश्राम, वि. स .स.	गडचिरोली जिल्ह्यातील आधारभूत धान खरेदी केंद्रावर श्री. तीवाडे, जिल्हा पणन अधिकारी, गडचिरोली यांच्या आशीर्वादाने मोठ्या प्रमाणावर अनियमितता होणे, सन २०२१-२२ मध्ये मौजा कासावी व आष्टा तालुका आरमोरी येथे सिंचनाची कोणतीही सोय नसताना उन्हाळी पिक दाखवून एकाच परिवारातील ८ दारिद्रय रेषेखालील शेतकरी जे संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी असणे व बी.पी.एल.धारक असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर लाखो रुपये जमा करणे, चार्मोशी तालुक्यातील भूमीहीन व्यक्तींच्या नावे शेतकरी दर्शवून हजारो रुपये बोनस स्वरूपात देणे,खरेदी विक्री संस्था चार्मोशी यांनी सन २०२४-२५ मध्ये धान खरेदी बोनस घोटाळ्या प्रकरणी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी सदर अधिकाऱ्यास फौजदारी गुन्हा दाखल करावयाचे निर्देश देऊनही हेतूपुरस्सर दुर्लक्ष करणे, धान वाहतुकीसाठी जीपीएस प्रणालीचा वापर न करणे, श्री. तीवाडे चंद्रपूर जिल्हा प्रभारी पणन अधिकारी असताना तेथेही त्यांनी अनियमितता केली असणे,या अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आधारभूत खरेदी केंद्राच्या व खरेदी	दिनांक २३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विक्री सहकारी संस्थांच्या माध्यमातून अपसंपदा जमा केलेली असणे, त्यामुळे त्यांचे तात्काळ निलंबन करून भारतीय प्रशासकीय सेवाद्वारा नियुक्त अधिकारी यांचे मार्फत २०२०-२१ ते आजपर्यंतच्या कामकाजाची तसेच त्यांच्या संपत्तीची चौकशी करणेबाबतची मागणी असतानाही शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, परिणामी जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
१०६	श्री. ज्ञानेश्वर कटके, वि. स .स.	जलसंपदा विभागाकडून शेतकऱ्यांच्या उपसा जलसिंचन योजनेला हवेली (जि.पुणे) तालुक्यातील नदी तीरावरील हिंगणागाव, खामगाव टेक, टिळेकरवाडी, भवरापूर, अष्टापूर,शिंदेवाडी, शिरसवाडी, बिवरी, वाडेबोल्हाई, कारेगावमुळ, पेठनायगाव, थेऊर, मांजरी ब्रु., मांजरी खुर्द, प्रयागधाम,कोळवडी साष्टे, केसनंद, आव्हाडवाडी या गावातील ग्रामपंचायतींना जलमापक यंत्र बसविण्याबाबत लेखी सूचना झालेली असणे, जलसंपदा विभागाने पुणे महानगरपालिकेला मोबदला घेऊन पाणी पुरविणे, ज्या पाण्यावर पाणीपट्टी मोबदला घेतला तेच दुषित केमिकलयुक्त टाकाऊ घाण पाणी ड्रेनेजमधून नदीत सोडणे, त्याच रसायनमिश्रित घाण पाण्यावर पुन्हा जलमापक यंत्र लावून दुसऱ्यांदा	दिनांक २३ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी आकारण्यात येणे, सदरील केमिकलयुक्त पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापिकी होऊन शेती उद्योग धोक्यात आला असणे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रणण मंडळाने मुळा-मुठा नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासून अहवाल सादर केला असता ही नदी प्रदुषणाच्या विळख्यात सापडली असल्याचे व गटारगंगा झाल्याचे अहवालात नमूद केलेले असणे, याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कुठलाही निर्णय न घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व संतापाची भावना, यावर शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
१०७	श्री. चंद्रकांत सोनवणे, वि. स . स.	चोपडा शहराची विकास योजना दिनांक २० मे, २०१६ पासून अंमलात आलेली असून सदर योजनेतील रत्नावती नदी लगत असलेल्या क्षेत्रातून पूररेषा दर्शविण्यात आलेल्या असणे, सदर पूररेषेबाबत विकास योजना अहवालामध्ये उच्चतम पूररेषेमधील बांधकामाबाबत किमान २.५ मी. उंचीचे बांधकाम (स्टील्ट) करणेबाबत तरतूद करण्यात आलेली असणे, परंतु सदरची तरतूद ही सन २००६ मध्ये चोपडा शहरातील रत्नावती नदीला आलेला महापूर विचारात घेऊन करण्यात आलेली असणे, सन २००६ पासून ते आजपावेतो चोपडा शहरामध्ये	दिनांक २४ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कुठल्याही स्वरुपाचा महापूर आलेला नसणे, त्यानुषंगाने मंजूर विकास योजना अहवालातील उच्चतम पूररेषेमधील किमान २.५ मी. उंचीचे बांधकाम (स्टील्ट) ची अट शिथील करुन मंजूर विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र.३.१.३ नुसार सामान्य पुररेषा व महत्तम पूररेषा मधील क्षेत्रासाठी महत्तम पुररेषेच्या वर ०.४५ मी. उंची ची तरतूद करण्यात येणे, सदरची तरतूद ही चोपडा शहराकरीता सुध्दा गृहीत धरण्यात यावी अशी मागणी होत असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणे, तथापी अद्यापपर्यंत याबाबत कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी नागरीकांमध्ये वाढते तीव्र नैराश्याचे वातावरण, शासनाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
१०८	श्री. रईस शेख, वि. स .स.	भिवंडीनिजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत ४९ शाळा चालवल्या जात असणे,सदर शाळांची अवस्था अत्यंत दयनीय धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास येणे, C-१ कॅटेगरीतील ७ शाळा बंद असणे व इतर शाळांची दुरुस्ती करणे गरजेचे असणे, याबाबतत मानवअधिकार आयोगाने शाळांच्या सद्य:स्थितीबाबत पाठविलेल्या	दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नोटीसा, सोयी-सुविधांचा असलेला अभाव, पाणी वीज, यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित असणे, मनपा शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटत असणे, यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी गळती असणे, तसेच माध्यमिक शाळांची कमतरता असणे, शाळांच्या दुरुस्तीबाबतचा ३० कोटींचा विशेष निधीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, भिवंडीनिजामपूर शहर महानगरपालिकेने ठराव करुन शाळा दुरुस्ती व नवीन शाळांकरिता खर्च न करण्याचा घेतलेला निर्णय, भिवंडीनिजामपूर शहराची लोकसंख्या पाहता मनपाच्या शाळांची असलेली आवश्यकता, परिणामी शिक्षणाचा दर्जा खालावणे, विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून महापालिकेच्या शाळांच्या दयनीय अवस्थेबाबत लक्ष घालून त्वरित शाळांच्या दुरुस्ती व नवीन शाळा बांधण्याकरिता, सोयी-सुविधा पुरविण्याकरीता निधीची तरतूद करणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
१०९	श्री. राजेश क्षिरसागर, वि. स .स.	कोल्हापूर शहराला मागील अनेक वर्षांपासून विविध नागरी समस्यांनी ग्रासलेले असणे, सन १९७२ साली नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर आजतागायत शहराची एक इंचही हद्दवाढ झालेली नसणे,	दिनांक २४ मार्च , २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वाढत्या नागरीकरणामुळे शहराशी एकरूप झालेल्या उपनगरांवर मुलभूत सुविधा पुरविण्याचा अतिरिक्त भार महानगरपालिकेवर पडत असणे, सन २०१९ व २०२१ मधील महापुरांमुळे शहराचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे तसेच ब्ल्यू लाईनमुळे नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी मोकळ्या जागांचा अभाव निर्माण होणे, सन १९९८ मध्ये जाहीर झालेल्या सुधारित विकास योजनेतील रिंगरोड, ॲम्यूनिटीज तसेच ओपन स्पेस ताब्यात घेण्याची कामे आजतागायत न झाल्यामुळे शहरातील रस्ते अरुंद होऊन वाहतूक कोंडी व पार्किंगची गंभीर समस्या निर्माण होणे, शहरात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्यामुळे प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत असणे, तसेच सेवा प्रवेश नियम शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित राहणे, पंचगंगा नदी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनणे व काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेतील त्रुटींमुळे शहरातील पाणीपुरवठा वारंवार खंडित होणे, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, या सर्व प्रश्नांवर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	चर्चा झाली.
११०	डॉ. राहूल आहेर, वि. स .स.	एकीकडे गोण्यांच्या कमतरतेचे कारण पुढे करून सामान्य शेतकऱ्यांचा	दिनांक

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मका खरेदी करण्यास नकार दिला जात असताना, दुसरीकडे चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील हिवरखेडे खरेदी केंद्रावरर पर तालुक्यातील मका अनधिकृतपणे विकला जात असल्याचा प्रकार माहे मार्च, २०२६ मध्ये उघडकीस आलेला असणे, या कारवाईत मक्याने भरलेल्या सहापैकी पाच ट्रॅक्टरमध्ये महाराष्ट्र शासनाच्या रिकाम्या गोण्याही मिळून येणे, निफाड तालुक्यातील टाकळी विंचूर येथील मका ट्रॅक्टरद्वारे चांदवडच्या हिवरखेडे केंद्रावर आणला असता स्थानिक शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून महसूल विभागाने केंद्रावर छापा टाकला असता, तेथील कर्मचारी आणि खरेदीदार आधीच पसार झाले असणे, तपासणी दरम्यान ट्रॅक्टरमधील मक्याच्या खाली शासनाच्या हमीभाव केंद्रासाठी राखीव असलेल्या अधिकृत गोण्यांचा मोठा साठा आढळून येणे, या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर आणि दलालांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी शेतकऱ्यांनी व सामाजिक संघटनांनी करणे, ट्रॅक्टर चालकांनी आपल्याला या व्यवहाराबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगणे, ज्यामुळे यामागे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे स्पष्ट होत असणे, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	२४ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.
१११	श्री. योगेश सागर, वि. स. स.	पवार पब्लिक स्कूल, कांदिवली (प.) मुंबई-६७ येथे शिक्षणाचा	दिनांक

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत २५% आरक्षण (Section १२ (१) (c)) अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून वह्या, पुस्तके, गणवेश, लेखन साहित्य व इतर शैक्षणिक साहित्याकरिता शाळा प्रशासन शुल्क मागणी करीत असणे,शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार (GR) आरटीई अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत शिक्षण देणे बंधनकारक असणे, यामध्ये वह्या, पाठ्यपुस्तके, गणवेश, लेखन साहित्य इत्यादी शैक्षणिक साहित्याचा समावेश असणे, अशा विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क, देणगी किंवा साहित्याकरिता पैसे मागणे हे आरटीई कायद्याचे उल्लंघन असणे. तरीसुधा शाळा प्रशासन पालकांना सदर शुल्क भरण्यासाठी व पालकांवर दबाव आण्यासाठी एक-एक पालकांना मुख्य अध्यापिकेच्या केबिनमध्ये बोलाऊन फॉर्मवर त्यांच्या सह्या घेऊन पैसे भरल्याशिवाय वह्या-पुस्तके, गणवेश व शैक्षणिक साहित्य दिले जाणार नाही असे सांगून अनेक पालकांना परत पाठविण्यात येणे, ही कृती अत्यंत गंभीर व आरटीई कायद्याचे उल्लंघन करणारी असणे, या प्रकारामुळे आरटीई विद्यार्थ्यांच्या पालकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असून	२४ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मागास घटकातील मुलांच्या शिक्षणाच्या मूलभूत अधिकारावर गदा येत असणे, याबाबत शासनाने शाळा प्रशासनास सूचना देऊन आरटीई अंतर्गत प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके, गणवेश व शैक्षणिक साहित्य त्वरित देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
११२	सर्वश्री. संतोष दानवे, नारायण कुचे, वि. स .स.	जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील शेतकऱ्यांचे दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोलर पॅनलचे प्रचंड नुकसान झालेले असणे, यामध्ये प्रामुख्याने मदन विठ्ठल कुलवान यांच्या शेतातील सहा सोलर पॅनल फुटणे आणि दीपक शितल डोबाल यांच्या शेतातील सात पॅनल तुटल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले असणे, सदर नुकसानीबाबत संबंधित सीआरआय कंपनीने माहे सप्टेंबर महिन्यात पंचनामा करून क्लेम दाखल केला असला तरीही आता कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करण्यात येत असणे, शेतकऱ्यांना क्लेम रिजेक्ट झाल्याचे तोंडी सांगून त्यांची दिशाभूल व फसवणूक केली जात असणे, या गंभीर बाबीवर भोकरदन महावितरण उप अभियंता कार्यालयात बैठक होऊन कंपनीला सूचना दिल्यानंतरही आणि कंपनीने भरपाई देण्याचे मान्य करूनही अद्याप प्रत्यक्ष मदत	दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मिळालेली नसणे, भोकरदन तालुक्यातील अनेक गावांमध्ये विविध सोलर कंपन्यांबाबत अशाच स्वरूपाच्या तक्रारींची व्याप्ती मोठी असणे, यामुळे शासनाच्या सौर ऊर्जा योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असणे, तरी शासनाने या प्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून संबंधित कंपन्यांना कडक निर्देश देणे, बाधित शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई मिळवून देणे आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या कंपन्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करून सौर ऊर्जा प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर सनियंत्रण समिती नेमण्याची प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
११३	सर्वश्री. राजेश पवार, किसन कथोरे, समाधान आवताडे, प्रविण दटके, प्रताप अडसड, विक्रम पाचपुते, राजन नाईक, करण देवतळे, मोहन मते, वि. स .स.	राज्यात गेल्या काही वर्षात लहान मुले व किशोरवयीन मुलांकडून होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचे विविध अहवालांमधून दिसून येणे, मोबाईल फोन, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म तसेच विविध ऑनलाइन गेम्सचा अति व अनियंत्रित वापर याचा मुलांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होणे, तसेच ऑनलाइन गेम्स, हिंसक डिजिटल कंटेंट किंवा सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळविण्याच्या हव्यासामुळे मुलांकडून मारामारी, सायबर गुन्हे, चोरी, ब्लॅकमेलिंग, सायबर बुलिंग तसेच इतर	दिनांक २४ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गंभीर गुन्हे घडत असणे, त्यामुळे मुलांचे मानसिक आरोग्य, सामाजिक वर्तन तसेच कायदा-सुव्यवस्था यावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असणे, या पार्श्वभूमीवर कर्नाटक व आंध्रप्रदेश राज्यांनी सोळा वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणण्याबाबत कायदे किंवा धोरणात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती प्रसारमाध्यमांतून समोर आलेली असणे, महाराष्ट्र राज्यातील अल्पवयीन मुलांकडून झालेल्या गुन्ह्यांपैकी अनेकक गुन्हे सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स किंवा इंटरनेट वापराशी संबंधित असणे, शाळा, पालक व समाजामध्ये डिजिटल साक्षरता व जनजागृतीसाठी शासनाकडून काही विशेष मोहीम राबविण्याची आवश्यकता, कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही सोळा वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर काही निर्बंध आणण्यासाठी कायदा किंवा धोरण आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
११४	सर्वश्री. नरेंद्र भोंडेकर, नाना पटोले, संजय मेश्राम, वि. स .स.	गोसेखुर्द प्रकल्पामध्ये पूर्ण संच जलसाठा २४५.५०० त.मी .ने बाधित होणाऱ्या भंडारा विधानसभा मधील खमारी, खापा)अजिमाबाद,(मुजबी, (दवडीपार बेला), दाभा, गणेशपुर, भोजापुर, सालेबर्डी, कारधा,	दिनांक २४ मार्च , २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तिड्डी, निमगाव, अर्जुनी टोली, मेंढा, कोरंभी देवी, बेला, कोथुर्णा, खैरी, पेवठा, कोंढी, कवडशी, बेरोडीटोला, करचखेडा, जमनी, लोहारा, भंडारा खास, पाहूनगाव, इटगाव, कुर्झा, खमाटा, बेटाळा, सुरबोडी, बोरगाव बुज, टोली या ३२ गावांच्या पुनर्वसनासाठी नवीन भूसंपादन कायदयानुसार शासनास अद्यापही प्रस्ताव सादर करण्यात आलेला नसणे, तसेच मोबदलाही देण्यात आलेला नसणे, २०८८ हेक्टर शेती जमीन संपादीत करून आर्थिक मोबदला देण्यात यावा, पुर्णः बाधित प्रमाणे अंशतःबाधित प्रकल्पग्रस्तांना कृषी मजुरी एकमुस्त रक्कम देण्यात यावी, गोसेखुर्द प्रकल्पामध्ये अंशत: बाधित होणाऱ्या गावांचे जलसंपदा विभागामार्फत रेड ॲन्ड ब्लु ड्रोन सर्वेक्षणाच्या कामासाठी ९८ लाख रुपये निधी मंजूर झालेला असतानासुध्दा सर्वेक्षणाचे काम अपूर्ण असणे, प्रकल्पग्रस्तांना दिनांक १९ जानेवारी, २०२५ च्या)जीआर (मध्ये अटी शिथिल करून पूर्वीप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात यावे यासह अनेक मागण्यांचे निवेदन ३२ गावातील प्रकल्पग्रस्त यांनी करणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेला तीव्र असंतोष, या ३२ गावातील पुनर्वसन व नवीन कायाद्यानुसार प्रकल्पग्रस्तांना आर्थिक मोबदला मिळण्यासाठी शासनाने	चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
११५	श्री. श्याम खोडे, वि. स .स.	वाशिम जिल्ह्यातील सन २०२४-२५ व २०२६ मध्ये सोयाबीन, तूर,कापूस तसेच शेती मालाचे गोदाम, गुरांचे गोठे इत्यादींना आग लागण्याच्या अनेक घटना घडलेल्या असणे, सदर घटनांचे पंचनामे होऊन आर्थिक सहाय्य मिळण्याबाबतचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून शासनाकडे पाठविलेले असणे, सदर प्रकरणे आपत्ती व्यवस्थापनामध्ये समाविष्ट नसल्यामुळे यावर अनेक महिने होऊनसुद्धा या प्रकरणाबाबत कुठलीही कार्यवाही न होणे, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई ही जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरच होऊन त्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याबाबतची मागणी शेतकरी वर्गातून वारंवार होणे, परंतु यावर शासनाने कुठल्याही प्रकारची कार्यवाही न करणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्या बाबतची शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.
११६	श्री. संग्राम जगताप, वि. स .स.	अहिल्यानगर जिल्ह्यातील पारधी समाजसेविका सुमन काळे यांचा माहे मे, २००७ मध्ये पोलीस कोठडीत संशयास्पद मृत्यू झालेला असणे, प्रारंभी सदर प्रकरणात आत्महत्येची नोंद केलेली असणे, परंतु	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपविभागीय दंडाधिकारी यांच्या चौकशीत सुमन काळे यांना पोलीसांनी अमानूष मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने दुर्देवी मृत्यू झाल्याचे स्पष्ट होणे, सदर प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांच्याकडे वर्ग करूनही आजपर्यंत सदर विभागाने कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसणे. मा .मुंबई उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर काही आरोपींवर गुन्हे दाखल झालेले असणे, मात्र सदर आरोपींवर खुनाऐवजी आत्महत्येस प्रवृत्त केल्याची कलमे लावलेली असणे, तसेच सदर प्रकरणातील एका खाजगी डॉक्टराला मा. उच्च न्यायालयाने दिलासा दिल्यानंतर, संबंधित विभागाने या विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलेले नसणे, आज रोजी सदर प्रकरण मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे प्रलंबित असणे, सदर प्रकरणाच्या तपासाबाबत अनुसूचित जाती-जमाती आयोगानेही नाराजी व्यक्त केलेली असणे, या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणात तात्काळ स्वतंत्र विशेष तपास पथक (SIT) स्थापन करून प्रकरण सीआयडीकडून SIT कडे वर्ग करणे, ॲट्रॉसिटी कायद्यान्वये योग्य कलमवाढ करणे, तसेच मयत सुमन काळे व त्यांचे कुंटूंबिय यांना न्याय देण्यासाठी प्रकरणातील न्यायप्रक्रिया गतिमान करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व	चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपाययोजना.	
११७	श्री. बाबुराव कदम - कोहळीकर, वि. स .स.	चिचोरडी रोड, हिमायतनगर, जि.नांदेड येथे HVDS १ "१६ KVA रोहित्र अनधिकृतरित्या व महावितरण कंपनीच्या नियमांविरुद्ध बसविण्यात आलेले असणे, याबाबत वडगाव यांनी वरिष्ठांकडे वारंवार तक्रारी करणे, तथापि कोणतीचच कार्यवाही न केल्याने दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ पासून महावितरणच्या उपविभाग कार्यालय, हिमायतनगर समोर आमरण उपोषण सुरू असणे, उपोषणकर्त्यांकडून देखभाल-दुरुस्ती, नवीन विद्युत खांब उभारणी, विद्युत लाईन स्थलांतर इत्यादी विविध मागण्या करण्यात येणे, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजी भोकर विभाग कार्यालयातील अधिकारी व संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासन देणे, तद् नंतर अनधिकृत HVDS १ x १६ KVA रोहित्र व संबंधित लाईनचे कंडक्टर काढून टाकणे, तसेच सदर प्रकरणी सक्षम समितीमार्फत सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यां-विरुद्ध महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या लागू असलेल्या सेवा नियमांनुसार कठोर शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन देणे, तथापि अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई न होणे, आमरण	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपोषण अद्यापही सुरूच असणे, शासनाने सदर प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून दोषी असलेल्यांवर त्वरित कारवाई करण्याची तसेच उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
११८	श्री. किशोर पाटील, वि. स .स.	महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी (ग्रीडला जोडलेली परस्पर-सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा) (दुसरी सुधारणा) काढण्यात येणे,यामध्ये छपरावरील ऊर्जा निर्मिती सुलभ करणे,प्रक्रीया जलद करणे आणि हरित ऊर्जा प्रसाराला चालना देणे हा मुख्य उद्देश असणे,तसेच १० केव्ही पर्यंतच्या निवासी छप्परावरील ऊर्जा निर्मिती अर्जांना पहिले प्राधान्य देण्याची तरतूद करण्यात आली असून अर्ज पूर्ण असल्यास वितरण कंपनीने तांत्रिक अडचणी न पाहता तो स्वीकारावा अशी स्पष्टपणे तरतूद करण्यात येणे, यावरुन असे स्पष्ट होते की, सौर ऊर्जा निर्मिती व त्याचा वापर राज्यात जास्तीत जास्त होण्याकरीता विशेष प्रयत्न करण्याच्या हेतूने हा अध्यादेश काढण्यात येणे, देशातच नव्हेतर राज्यातही मोठ्या प्रमाणावर वायूप्रदूषण रोखण्याकरिता इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार होत असणे, गॅस	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वा चुलीवरील स्वयंपाकाकडून इंडक्शन कुकिंगकडे शहरासह ग्रामीण भागातही वापर होत असणे, शासकीय-खाजगी कार्यालयात वातानुकूलित यंत्रणेचा होत असलेला वापर, वर्क फ्रॉम होममुळे घरगुती वीज वापराचा लोड वाढत असणे,असे असतांनाही महावितरण कंपनीकडून मागील १२ महिन्यांच्या वीज वापरावर आधारित सौर क्षमतेवर मर्यादा लावली जात असणे, अशा परिस्थितीत सौर प्रणालीचे आकारमान भूतकाळातील वापरावर आधारित ठरविणे म्हणजे भविष्यातील ऊर्जा गरजा नाकारण्यासारखे असणे,परिणामी राज्यात भविष्यात वीजेचा भासणारा तुटवडा पाहता शासनाने तातडीने महावितरण कंपनीला दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या अधिसूचनेची ठोसपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
११९	श्री. मंगेश कुडाळकर, वि. स . स.	कुर्ला नेहरू नगर म्हाडा वसाहतीमध्ये १९ इमारती पोलीस वसाहत असणे, या १९ इमारती जीर्ण झालेल्या असून यांचा पुनर्विकास होणे अत्यंत आवश्यक असणे, या इमारतींचा पुनर्विकास म्हाडा प्राधिकरणामार्फत करून यातून नव्याने उपलब्ध होणाऱ्या सदनिकांमध्ये	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		या ठिकाणी वर्षानुवर्ष राहत असलेले पोलीस बांधव यांना हक्काचं घर मिळावे या दृष्टीने माफक दरात घर उपलब्ध करावे अशी पोलिस पत्नींची मागणी असणे, या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या बैठकीत मुंबईतील म्हाडा अभिनयासात असलेल्या १७ पोलीस वसाहतींचा एकत्रित पुनर्विकास करून प्रस्ताव सादर करावा असे निर्देश देणे, परंतु सदर प्रस्ताव अद्याप प्रलंबित असणे, तसेच दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णयाद्वारे मुंबई पोलीस दलातील शासकीय निवासस्थानात रहात असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना मालकी स्वरूपाची घरे देता येतील काय याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी समिती गठन करणे, या समितीची बैठक दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी होणे, सदर बाबींमध्ये अद्याप कोणताही निर्णय न झाल्याने विभागातील पोलीस पत्नी यांनी याबाबत सातत्याने मागणी करणे, याबाबतत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१२०	सर्वश्री. अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, डॉ. विश्वजित कदम, श्री. नाना पटोले, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. नितिन राऊत, वि. स .स.	मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात कामाठीपुरा परिसर असणे, या परिसरात मध्यमवर्गीय बहुभाषिक लोकांची वस्ती असणे, या विभागात अनेक जुन्या व जीर्ण चाळी असणे, त्यामुळे या विभागातील इमारतींचा लवकरात लवकर पुनर्विकास व्हावा अशी स्थानिकांची मागणी असणे, कामाठीपुरा विकास समितीच्या माध्यमातून पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनास सादर होणे, त्यावर वास्तुविशारदाची नियुक्ती करीत निविदा काढण्यात येणे, कामाठीपुरा पुनर्विकास प्रक्रियेस गती मिळणे आवश्यक असणे, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या (पीएमजीपी) बहुतांश इमारती या उमरखाडी, कामाठीपुरा विभागात असणे, छताचा भाग कोसळणे, पाणी गळती, घरांच्या भिंतीचो पडझड होणे यासारख्या प्रकारांमुळे येथील रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन राहणे, या इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पाला गती मिळावी याकरीता अनेक बैठका शासन स्तरावर होणे, परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, डोंगरी, भेंडीबाजार पायधुनी, भुलेश्वर, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, यामुळे म्हाडाने येथील इमारतींचे सर्व्हेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्याची गरज निर्माण झालेली असणे, परंतु या सर्व्हेक्षणासाठी म्हाडाकडे कर्मचारी वर्गाचा तुटवडा असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरत असलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
१२१	श्री. राजेश बकाने, वि. स .स.	वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथील हिंगणघाट फैल परिसरातील जुना सर्व्हे क्र. ३६९, क्षेत्रफळ ११.२५ एकर ही जमीन शासकीय उपलब्ध नोंदीनुसार पूर्वीपासून परावर्तित जमीन म्हणून नोंद असणे, दशकापूर्वी मान्यताप्राप्त ले-आऊट विविध शासकीय अभिलेखांवर नोंद असणे, या परिसरात सुमारे ४०० कुटुंबे मागील ८० ते १०० वर्षांपासून वास्तव्यास असणे, संबंधित नागरिकांकडून आजपर्यंत नियमितपणे नगरपरिषदेकडे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आलेला असणे, विक्रीपत्र, दानपत्र व इतर व्यवहार उपनिबंधक कार्यालयामार्फत सुरळीतपणे नोंदविण्यात येत असणे, असे सर्व कायदेशीर व्यवहार सुरू असताना सन २०१३ मध्ये जिल्हाधिकारी, वर्धा यांनी सदर जमिनीवरील व्यवहारांवर स्थगिती देणारे पत्र निर्गमित करणे, परिणामी नगरपरिषदेकडून अनेक दशकांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना अतिक्रमणकर्ता घोषित करणे,	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्यांच्या मालकी हक्कांवर व निवाऱ्यावर अनिश्चितता निर्माण होणे, स्थावर मालमत्तेची खरेदी-विक्री पूर्णपणे ठप्प होणे, बँक कर्ज, बांधकाम परवाने व वारस नोंदी प्रलंबित राहणे, नागरिकांमध्ये भीती व असंतोष पसरलेला असणे, सदर स्थगिती हटविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या निवेदनानुसार मा. महसूल मंत्री यांनी दिनांक ७ डिसेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी, वर्धा यांना निर्देश देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न होणे, यामुळे नागरिकांवर गंभीर अन्याय होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१२२	श्री. रत्नाकर गुट्टे, वि. स .स.	जुहू येथील प्लॉट क्र.३५-सी/१, सी.टी.एस. क्र. १०७०, १०७१/१ व १०७१/२ या मिळकतीचे सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ मुंबई-३१, यांच्या कार्यालयात त्यांच्या संगनमताने दिनांक १० जून, २०२५ रोजी दस्त क्र. मुं.३१/१४५७३/२०२५ नोंदविण्यात आलेली असणे, दस्तातील मिळकत मूळत: नसरवानजी दोराबजी सिरवाई व मेहरबानू नसरवानजी सिरवाईई “(दोघेही मयत) यांच्या नावे असणे, सदर मिळकत मयत ॲडमिनीस्ट्रेटर दोराब फुरदुनजी सिरवाई यांच्या पश्चात बनावट कुलमुखत्यार पत्राव्दारे श्री. विद्याधर सिताराम राव यांनी त्यांच्या	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		स्वत:च्याच नावावर केलेली असणे, सदर कुलमुखत्यार पत्र बनावट व निरस्त असल्याचे निदर्शनास आलेले असणे, याबाबत चेंबूर, पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार झालेली असणे, सह दुय्यम निबंधक वर्ग-२ मुंबई-३१, यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे चुकीचे मुद्रांक शुल्क आकारून शासनाचे केलेले नुकसान, अशा गैरप्रकारे नोंदविलेल्या अनेक प्रकरणात शासनाचे शेकडो कोटींचे मुद्रांक शुल्काचे झालेले नुकसान, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, मुंबई-३१, यांच्या विरूध्द भ्रष्टाचाराचे असलेले अनेक आरोप, यामुळे पुण्यातील मुंढवा मुद्रांक शुल्क घोटाळ्याच्या धरतीवर सह दुय्यम निबंधक वर्ग-२, मुंबई-३१ व त्यांचे सहकारी यांच्या चौकशीची आवश्यकता, त्यांनी त्यांच्या काळात नोंदविलेल्या सर्व दस्तांची चौकशी करून शासनाच्या शेकडो कोटी रूपयांच्या महसूलाची वसूली होण्याची गरज, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.	
१२३	श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. नितीन पवार, सुनिल प्रभू, विजय वडेट्टीवार, ॲड. राहूल ढिकले, वि. स .स.	प्रधानमंत्री आवास योजना ही महत्वकांक्षी योजना सुरु असणे, १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या महानगरांमध्ये राज्य शासनाकडून दिनांक ०८/११/२०१३ पासून ही योजना सुरु असणे, नाशिक शहरात सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीरित्या होत नसणे,	दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		काही बांधकाम व्यवसायिक यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून खोटे मोजणी नकाशे व सातबारा उतारे तयार करणे, भूखंडाचे ४००० चौरस मीटर पेक्षा कमी तुकडे करून गोरगरीब नागरिकांना योजनेपासून दूर ठेवणे, दिनांक २९/०३/२०२२ रोजी मा . सभापती, विधानपरिषद,यांनी म्हाडा व नाशिक मनपा या विभागांची संयुक्त बैठक घेऊन म्हाडा कार्यालयाची NOC घेण्याबाबत आदेश दिलेले असणे, मा.सभापती व मा.उपमुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशांच्या विपरीत दिनांक २०/०१/२०२५ रोजी मनपा आयुक्त यांनी निर्देशांचे पालन करण्याची आवश्यकता नसल्याच्या आशयाचे परिपत्रक जारी करणे, महसूल विभागाच्या पुढाकाराने अनेक गरीब व गरजू नागरिकांना घरकुल मिळण्यात अडचणी निर्माण करणे,गोरगरिबांच्या घरकुलांमध्ये महसूल व नाशिक महानगरपालिका अधिकारी यांच्या संगनमताने सुरू असलेला भ्रष्टाचार, शासनाचे सदर बाबीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१२४	श्री. राघवेंद्र पाटील, वि. स .स.	मनमाड ते इंदौर या ३५० कि.मी. रेल्वे मार्गाचे भुसंपादन होणे, पहिला टप्प्यात बोरविहीर ते नरडाणा या ५० कि.मी.अंतराचे भुसंपादन झालेले असणे.या ५० कि.मी.अंतरात धुळे व शिंदखेडा तालुक्यात सुमारे १ हजार शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत होणे,सदर शेतकऱ्यांना अतिशय कमी भावाने म्हणजे ४ लाख ते ८ लाख रुपये हेक्टरी या दराने मोबदला देणे, या आधी धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग,नागपुर-सुरत राष्ट्रीय महामार्ग व धुळे-सोलापुर राष्ट्रीय महामार्ग ह्या तीनही महामार्गांच्या भुसंपादन मोबदला ५६०० ते ९००० रुपये चौ.मि.ने दिलेला असणे, रेल्वेत भूसंपादीत शेतकऱ्यांना सदर मार्ग १५ ते २० फुट उंच असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, शेताचे दोन भाग होणार असुन मध्य भागातून रेल्वेमार्ग जात असल्याने शेतकर्यांनी उर्वरीत जमीन कशी कसावी यामुळेही शेतकऱ्यांच्या मनात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होणे, राष्ट्रीय महामार्गाप्रमाणे रेल्वे भूसंपादित शेतकऱ्यांना चौरस मिटर प्रमाणेच मोबदला देणे, सर्व बाधित शेतकऱ्यांना लवकर व योग्य मोबदला मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांची लवाद अधिकारी म्हणून नेमणूक होणे, लवादात सुमारे ७०० प्रकरणे दाखल असून संदर्भित प्राधिकारी स्तरावर दोन वर्षापासून	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रकरणे प्रलंबित असणे, सदर बहुआयामी प्रकल्पास शेतकऱ्यांचा विरोध नसणे, परंतु भूसंपादित झालेल्या शेतकऱ्यांवर अन्याय होणे, पुढील टप्प्यातील शेतकरी आधीच्या शेतकऱ्यांना न्याय दिल्याशिवाय पुढील मनमाड ते इंदोर प्रकल्पात जमीन संपादनास विरोध कायम होऊ शकणे व आधी संपादीत जमीनीचा लवाद अधिकारी जिल्हाधिकारी यांनी चौरस मिटरने मोबदला जाहीर करणे व पुढील टप्यातील जमीन संपादीत करणे, प्रकल्पात जमिनी संपादीत होणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलांना रेल्वेत व शासकीय नोकरी देण्याची आवश्यकता, बागायती क्षेत्र असतांना सरसकट जिरायती मोबदला दिला अशा शेतकऱ्यांना बागायती दराने मोबदला देणे, सन २०१३ चा कायदा असल्यावर २००८ च्या कायदयानुसार शेतकऱ्यांना मोबदला देणे, सदरील शेतकरी बांधवांना न्याय देण्यासाठी राष्ट्रीय महामार्गातील संपादित चौरस मीटर जमिनीप्रमाणे मोबदला देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१२५	श्री. चंद्रकांत निंबाजी पाटील, वि. स .स.	तापी पूर्णा साखर कारखाना मर्यादित,मानपूर (रजि. क्र. १५४२१, दि. १०.०५.२००१) या संस्थेच्या नावाखाली भुसावळ तालुक्यातील मानपूर येथील गरीब शेतकऱ्यांकडून सुमारे ३५ हेक्टर जमीन कारखाना	दिनांक २५ मार्च , २०२६ रोजी

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उभारण्याच्या उद्देशाने घेण्यात आली असणे, मात्र २५ ते २८ वर्षे उलटूनही या जमिनीवर कोणताही साखर कारखाना उभारण्यात आलेला नसणे, कारखान्याच्या नावाखाली घेतलेली ही ३५ हेक्टर जमीन)गट क्र,१६ . १७, १८, १९, ११९, १२२, १२३ इ.) कोणत्याही शासकीय पूर्व परवानगीशिवाय आणि नियमांचे उल्लंघन करून एकाच राजकीय कुटूंबातील सदस्यांच्या नावे खरेदी करण्यात आली असणे, यात uमहार वतनन जमिनींचाही समावेश असून त्यांची विल्हेवाट लावताना कायदेशीर प्रक्रिया डावलण्यात आलेली असणे, जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिनांक १०.२.२०२६ रोजी अपर मुख्य सचिव (महसूल) यांना सादर केलेल्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की, गट क्र. १२२ सह अन्य जमिनींच्या खरेदी व्यवहारात गंभीर त्रुटी असून शासनाची परवानगी न घेता या जमिनी स्वतःच्या कुटूंबाच्या नावे केल्या गेल्या असणे, २५ वर्षे कारखाना न उभारता शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या या संचालक मंडळावर सरकारने फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाची दखल घेऊन सदर ३५ हेक्टर जमीन पुन्हा मूळ शेतकरी किंवा शासनाच्या नावे करण्यासाठी शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, या संपूर्ण	चर्चा झाली.

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रकरणाची व्याप्ती पाहता शासनाने याची एसआयटी (विशेष चौकशी पथक) मार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.	
१२६.	श्री. अतुल भातखळकर,श्री . धनंजय मुंडे,श्री .नानाभाऊ पटोले,श्री .विजय वडेट्टीवार,श्री . अमिन पटेल,श्री .अस्लम शेख, डॉ. ज्योती गायकवाड,श्री .संजय मेश्राम,श्री .विकास ठाकरे,श्री . सुनिल प्रभू,श्री .मनोज कायंदे,श्री .रोहित पवार वि. स . स.	"बारामती (जि. पुणे) येथे दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या भीषण विमान अपघातात राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ५ जणांचा झालेला मृत्यु, या प्रकरणी निदर्शनास येत असलेल्या तांत्रिक बाबींमुळे हा अपघात नसून सुनियोजित घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात असणे, अपघातग्रस्त विमान चालवणारी व्हीएसआर व्हेंचर्सस (VSR Ventures) ही कंपनी विमानांच्या देखभालीबाबत (Maintenance) गंभीर त्रुटींसाठी ओळखली जात असणे, अपघाताच्या अवघ्या एक मिनिट आधी विमानाचा ट्रान्सपोंडरर बंद झालेला असणे, वैमानिकाने एटीसीच्या सूचना डावलून अवघड धावपट्टीवर उतरण्याचा प्रयत्न केलेला असणे, तसेच मूळ वैमानिकाला ऐनवेळी बदलण्यात आलेले असणे, असे अनेक अनुत्तरित प्रश्न जनमानसात असणे, राज्यातील ३१ विमानतळांपैकी अनेक ठिकाणी रडार यंत्रणा, नाईट लॅंडिंगचा अभाव	स्वीकृत

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आणि धावपट्ट्यांचे सक्षमीकरण न झाल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत किंवा हवामान खराब असताना विमाने उतरवणे कठीण होऊन मोठी हानी होण्याची शक्यता नाकारता येत नसणे, रत्नागिरी, सोलापूर, चंद्रपूर, अमरावती आणि जळगाव येथील विमानतळे अद्याप पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नसणे, हवाई प्रवासाच्या सुरक्षेसाठी राज्यात १५० किलो मिटर अंतरावर एक सुसज्य विमानतळ असण्याची आवश्यकता, बारामती येथील दुर्घटने प्रकरणी केवळ राज्य सीआयडी (CID) चौकशी पुरेशी नसून, आंतरराष्ट्रीय सुरक्षा यंत्रणांमार्फत (उदा. NTSB) निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असणे, संबंधित कंपनी आणि व्यवस्थापनावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याबाबत तसेच नागरी विमान धोरण २०१७ ची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
१२७.	श्री. अमोल खताळ वि .स .स.	"राज्यातील तरुण हिंदू विशेषकरून गरीब ओबीसी, दलित, आदिवासी मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून मुस्लिम धर्मात आणण्यासाठी मुस्लिम तरुणांकडून प्रयत्न केला जात असल्याचे वारंवार निष्पन्न होणे, सर्वोच्च न्यायालयाने एन.आय.ए. ला केरळमध्ये मुलींचे धर्मांतर होत असेल तर त्याबाबत चौकशी करणेबाबत परवानगी दिली असणे, त्याचबरोबर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उत्तर प्रदेश सरकारने "उत्तरप्रदेश विधी विरुध्द धर्म सपरिवर्तन प्रतिबंध कायदा, २०२०" मंजूर केला असणे, या कायद्यानुसार कायद्याचा भंग करणाऱ्या आरोपीने जर जबरदस्तीने, अत्याचार आणि फसवणुकीद्वारे धर्मांतर करून अशी प्रकरणे केल्यास आरोपींवर अजामीनपात्र गुन्हे दाखल होऊन दहा वर्षापर्यंत शिक्षा भोगावी लागेल अशीही तरतूद करण्यात आली असणे, बेकायदेशीर धर्मांतर, मुलीचा धर्म बदलण्याचा, विवाह थांबवण्यासाठी तरतूद केलेली आहे तसा अध्यादेश काढलेला असणे, प्रस्तावित कायद्यात १० वर्षे पर्यत कारावास आणि व किमान ५०,००० रुपये दंड करण्याची तरतूद तसेच महिला अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीची किंवा अल्पवयीन असेल त्याबद्दल हि कायद्यात विशेष प्रावधान निर्माण केले असणे, जर कुणी बळजबरीने, अत्याचार करून फसवणूक करून दुसऱ्या धर्माच्या मुलींची फसवणूक करून जबरदस्तीने धर्मांतर करीत असेल त्याला प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र राज्यातही अशा स्वरूपाचा कायदा होणे गरजेचे असणे, याकरिता शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१२८.	श्री. योगेश सागर वि .स .स.	"महाराष्ट्र राज्यातील काही महत्वाची शहरे तसेच तेथील उपनगरे जसे की मुंबई व पुणे शहर येथे विशिष्ट धर्मातील लोकांकडून तेथील रहिवाशी भागांमध्ये सांप्रदायिक तणाव निर्माण केला जात असणे. अश्याप्रकारच्या धार्मिक तणाव व दबावामुळे भितीपोटी यापरिसरातील नागरिक आपल्या कष्टाने कमविलेल्या मालमत्ता यांची अत्यंत कमी मोबदला घेऊन विक्री करून, स्थलांतरण करत असणे. परिणामी सदर परिसरांतील सामाजिक सलोखा व स्थैर्य बिघडणे, लोकसंख्यात्मक असमतोल निर्माण होणे व कायदा-सुव्यवस्थेवर ताण येणे इत्यादी बाबी घडत असणे .अशी वस्तुस्थिती गुजरात राज्यात असल्याने, तेथील शासनाने 'गुजरात अशांत क्षेत्र कायदा' पारीत करून, अधिसूचित भागांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेऊनच मालमत्ता हस्तांतरण करण्याची तरतूद केलेली असणे. अशा प्रकारच्या नियमनामुळे धार्मिक तणाव असलेल्या भागामध्ये दबावाखाली होणारे हस्तांतरण रोखून, तेथील सामाजिक स्थिरता व सलोखा अबाधित ठेवण्यास मदत होत असणे. त्याअनुषंगाने महाराष्ट्रातील महत्वाची शहरे व उपनगरे येथील हिंसाचारप्रवण व संवेदनशील क्षेत्रे अधिसूचित करून, तेथील दबावाखाली होणारे मालमत्ता हस्तांतरण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		"महाराष्ट्र अशांत क्षेत्र कायदा" लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१२९.	श्री. अतुल भातखळकर, वि .स .स.	"महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने २०१३ ते २०२५ या कालावधीत दिलेल्या १८० शिफारसीं पैकी केवळ ४४ शिफारसींवरच शासनाने कार्यवाही केली असून उर्वरित १३६ प्रकरणांत अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे माहे जानेवारी २०२६ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये मानवाधिकार आयोगाच्या आदेशानुसार पीडितांना द्यावयाची सुमारे ३.४ कोटी रुपयांची नुकसानभरपाई अद्याप प्रलंबित असणे, त्यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालयाने या विलंबाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करून राज्य शासनाला ३.५ कोटी रुपये जमा करण्याचे निर्देश दिले असणे, त्यामुळे गेल्या १० वर्षांपासून या शिफारसी प्रलंबित राहण्यामागील कारणांची चौकशी करण्याची गरज असणे, तसेच मानवाधिकार आयोगाच्या शिफारशी वेळेत अंमलात आणण्यासाठी ठोस यंत्रणा उभारणे, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे व भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१३०.	श्री. सुनिल प्रभू, श्री .मोहन मते वि .स .स.	"ठाणे जिल्ह्यातील बदलापूर पश्चिमेकडील एका प्री-स्कुलमध्ये शिकणाऱ्या चार वर्षीय अल्पवयीन बालिकेवर स्कुल व्हॅनचालकाने व्हॅनमध्ये बलात्कार केल्याची धक्कादायक घटना दिनांक २२ जानेवारी, २०२६ रोजी घडणे, दुपारी दीड वाजून गेल्यानंतरही मुलगी घरी न आल्याने तपास सुरु केला असता, व्हॅनचालकाचा घृणास्पद प्रकार उघडकीस येणे, याआधी बदलापूरमधील नामांकित शाळेत अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची घटनेस दोन वर्षे झालेली नसतानाही दुसरी घटना घडणे, याआधीच्या बदलापूर घटनेनंतर शाळांबाबत तयार करण्यात आलेल्या सुरक्षा नियमावलीनुसार स्कूल बस किंवा स्कुलव्हॅनमध्ये महिला सहाय्यक असणे बंधनकारक करण्यात आले असतानाही त्याचे या ठिकाणी पालन न होणे, अल्पवयीन मुलींचे संरक्षण करण्यास शासनाचे शिक्षण विभाग व शाळा व्यवस्थापनाकडून झालेले दुर्लक्ष व याबाबत शासनास आलेले अपयश, यामुळे येथील जनतेत अल्पवयीन मुलींच्या सुरक्षतेबाबत निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, या प्रकरणाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१३१.	श्री. काशिनाथ महादु दाते, श्री .सुधीर मुनगंटीवार, श्री .रोहित पाटील वि .स .स.	"बीड येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सुरू झालेल्या पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये दीपक वाहुळे या तरुणानेही धावण्यामध्ये सहभाग घेतलेला असणे , त्याने १६०० मीटर धावण्याची चाचणी पूर्ण केल्यानंतर त्याच्या शरीरातील पाणी कमी (डीहायड्रेशन) होण्यामुळे दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेली असणे, संबंधित तरुण हा भूमिहीन ऊसतोड कामगाराचा मुलगा असून त्याच्या या दुर्देवी अंताने कुटुंबातील आधारस्तंभ गेलेला असणे, राज्यभरात राबविण्यात येत असलेल्या पोलीस भरतीमध्ये तरुण-तरुणींना पहाटे मैदानामध्ये मैदानी चाचणीसाठी हजर राहावे लागणे व दुपारच्या कडक उन्हामध्ये धावण्याची चाचणी घेतली जात असणे, या दरम्यान या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे पाणी, नाश्ता, जेवण ,टॉयलेट इत्यादीची सोय करण्यात न येणे ,त्यामुळे अनेक उमेदवार मैदानी चाचणी दरम्यान बेशुद्ध पडणे, शरीरातील पाणी कमी होणे, हृदयविकाराची झटके येणे यासारख्या गंभीर घटना घडत असणे, मैदानी चाचणी ही सकाळच्या किंवा सायंकाळच्या सत्रामध्ये घेण्यात यावी अशी उमेदवाराकडून होत असलेली मागणी, चंद्रपूर येथे सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		१०० मीटर धावण्याच्या परीक्षेदरम्यान वापरण्यात येणाऱ्या सेन्सरबाबत अनेक उमेदवारांकडून तक्रारी प्राप्त होणे, सदर धावण्याच्या परीक्षेत वापरलेला सेन्सर तांत्रिक दृष्टया बिघाड असल्याने अनेक सक्षम व सुदृढ विद्यार्थ्यांना १५ पैकी फक्त ४,६ व काही विद्यार्थ्यांना ८ असे अत्यल्प गुण मिळत असल्याची बाब निदर्शनास येणे, इतर जिल्ह्यांतील पोलीस भरतीतील उमेदवारांना १५ पैकी १२ ते १५ गुण मिळणे, मात्र चंद्रपूरमध्ये तुलनेने अत्यल्प गुण मिळत असल्याने स्थानिक उमेदवारांमध्ये नाराजी निर्माण होणे, बीडच्या पोलीस भरतीत दुर्दैवी अंत झालेल्या तरुणाच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच भरती प्रक्रियेतील उमेद्वारांवर अन्याय होऊ नये यासाठी स्टार्टिंग पॉईंटवर देखिल सेन्सर लाऊन धावण्याचे अचूक मोजमाप सुनिश्चित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
१३२.	श्री. सुनिल प्रभू,श्री .चेतन तुपे,श्री .अबू आझमी,श्री . विकास ठाकरे,श्री. नानाभाऊ पटोले,श्री .विजय वडेट्टीवार,श्री . अमिन पटेल,श्री .अस्लम शेख,	“मुंबईतील ट्रॉम्बे येथील एका व्यायसायिकाला आरटीओ चालान नावाने एक एपीके फाईल पाठवून त्यांच्या क्रेडीट कार्डवरुन सुमारे २ कोटी रुपये परस्पर वळवून निधीचा अपहार केल्याचा प्रकार दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ रोजी घडणे, देवनार परिसरात राहणाऱ्या हार्डवेअरचा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	डॉ. विश्वजित कदम, डॉ. ज्योती गायकवाड, श्री. संजय मेश्राम, श्री. साजिद खान पठाण, श्री. अमित झनक, श्री. अर्जुन खोतकर,डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. नारायण कुचे,श्री. राजेश विटेकर,श्री. भास्कर जाधव, श्री. गोपिचंद पडळकर,डॉ. नितिन राऊत,श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. शंकर मांडेकर, श्री. राजु तोडसाम, श्री. मंगेश चव्हाण वि. स. स.	मोबाईलवर वाहनावर त्वरीत ५०० रुपये इतका दंड भरण्याचा संदेश पाठविण्यात येणे, दंड भरण्यासाठी संदेशात लिंक देण्यात येणे, व्यावसायिकाने लिंकवर क्लीक करुन केडिट कार्डद्वारे ५०० दंड रक्कम भरल्यानंतर काही वेळाने एका पाठोपाठ एक असे संदेश येऊन २ कोटी रुपये बँक खात्यामधून वजा करण्यात येणे, घाटकोपर पूर्व पंतनगर येथील ७१ वर्षीय वृध्द महिलेला ५०० रुपये दंड भरण्याची लिंक पाठवून त्याद्वारे २ लाख रुपये इतकी रक्कम काढून घेण्यात येणे, मालाड येथील ६५ वर्षीय वृध्द जेष्ठ नागरिकाच्या खात्यातून अशाच पध्दतीने ७ लाख ६० हजार रुपये इतकी रक्कम काढण्यात येऊन अर्थिक फसवणूक करण्यात येणे,तसेच दक्षिण मुंबईतील ७२ वर्षीय व्यवसायिकाला आभासी कैद म्हणजेच 'डिजीटल अरेस्ट' ची भीती दाखवून दिनांक १९ ऑगस्ट ते ८ ऑक्टोंबर या काळात त्यांच्याकडून एकूण ५८ कोटी १३ लाख रुपये उकळले असून ही रक्कम एकूण १८ खात्यात वळविण्यात येणे, मुंबईच्या पश्चिम उपनगरात एका ६८ वर्षीय ज्येष्ठ महिलेची 'डिजीटल अरेस्ट' आणि ऑनलाईनद्वारे सुमारे३.७५ ते ३.८ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०२५ दरम्यान उघडकीस येणे, गेल्या वर्षभरात राज्यात जवळपास ५ हजार	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कोटींची वेगवेगळ्या पध्दतीने फसवणूक झाल्याचे उघडकीस येणे, सन २०२५ या वर्षात १० हजार सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असून ४८२५ गुन्हे फक्त मुंबईत झालेले असणे, त्यापैकी ८५६ गुन्हे हे शेअरमार्केटच्या माध्यमातून घडून आलेले असणे, यासंदर्भात १४१० सायबर चोरांना पोलिसांनी केलेली अटक लक्षात घेता,हे गुन्हे पुर्णपणे नियंत्रणात आणण्यास पोलिसांना आलेले अपयश,या गुन्ह्यांमध्ये विशेषत: फिशिंग, पोर्नोग्राफी, मॉर्फींग, क्रेडीट कार्ड हॅकींग, डेटा चोरी,फसवणूक अशा प्रकारच्या गेल्या ५ वर्षांत २४ हजार पेक्षा जास्त गुन्ह्यांची झालेली नोंद लक्षात घेता,या गुन्ह्यांच्या माध्यमातून जेष्ठ नागरिक,पेन्शनर्स,ज्यांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी आहे असे वयस्क व्यक्ती, उद्योजक यांना शोधून फसवणूक करण्यात येत असल्याचे उघडकीस येणे,परिणामी जनतेत पसरलेले घबराटीचे व भितीचे वातावरण लक्षात घेता,या सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१३३.	श्री. सुधीर मुनगंटीवार वि .स .स.	“चंद्रपूर शहरात आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार माहे फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, व्ह्युनो	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मार्केटिंग सर्व्हिसेस लिमिटेड या कंपनीने गुंतवणूकदारांना दहा वर्षांत चार पट रक्कम देण्याचे प्रलोभन दाखवून २५ लाख ७ हजार ५१ रुपयांची फसवणूक करणे, तक्रारदार विवेक नारायण बारसिंगे)वय ,५२ रा. विवेकनगर, चंद्रपूर, मुक्काम नागपूर) यांना आरोपींनी मोठ्या रकमेची गुंतवणूक केल्यास भरघोस परतावा मिळेल असे आमिष दाखविणे, आरोपींनी व्ह्युनो मार्केटिंग सर्व्हिसेस लिमिटेड, झेबाईट रेंटल प्लॅनेट प्रा. लिमिटेड, झेबाइट इन्फोटेक प्रा. लिमिटेड आणि व्ह्युनो इन्फोटेक प्रा .लिमिटेड अशा विविध कंपन्या स्थापन करणे, या कंपन्यांच्या माध्यमातून गुंतवणूक करा आणि दहा वर्षांनंतर चौपट रक्कम मिळवा, अशा भूलथापा देणाऱ्या योजना राबवून त्यांनी अनेकांना गुंतवणूक करण्यास भाग पाडणे, या प्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्याची व गुंतवणूकदारांना त्यांच्या मुळ रकमा परत मिळवून देण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१३४.	श्री. विक्रम पाचपुते, श्री .रोहित पवार,	“शिरूर जिल्हा पुणे येथे जप्त केलेल्या दोन कोटी रुपयांच्या एमडी ड्रग्स प्रकरणाचे धागेदोरे अहिल्यानगर पोलीस दालनापर्यंत पोहोचलेले	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	डॉ. विश्वजित कदम, श्री .वरुण सरदेसाई वि .स .स.	असणे,अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचारी श्यामसुंदर विश्वनाथ गुजर वय ३९,नेप्ती तालुका नगर येथून अटक केलेली असणे,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली या पथकाने शिरूर शहरातील बाबुरावनगर भागात ड्रग्स विकणाऱ्यांना पकडण्यासाठी आले असताना शादाब रियाज शेख वय ४१ हा शनिवारी रात्री संशयस्पद फिरत असताना पोलिसांनी ताब्यात घेतले असता त्याच्या बॅगची पंचासमक्ष झडती केली असता सुमारे २ कोटी १० लाख रुपयाचे १ किलो ५२ ग्राम वजनाचे एमडीड्रग्स सापडलेले असणे,त्याने कबुली दिलेली असणे पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणानंतर सायंकाळी पोलीस अधीक्षक कार्यालयातील स्थानिक गुन्हे शाखेतून गुजर याला ताब्यात घेतलेले असणे,त्याच्या विरोधात महत्त्वाचे पुरावे आढळून आल्याने त्याला अटक झाले असणे,पोलीस कर्मचारी शामसुंदर गुजर हा गुन्हे शाखेत नार्को टेस्टसाठी काम करायचा अहिल्यानगर जिल्ह्यात जप्त केलेले पदार्थाचा मुद्देमाल कक्ष त्याच्या ताब्यात असणे,या कक्षाची चावी त्याच्याकडेच कायमस्वरूपाची असणे तसेच या विभागाचा सर्व पत्रव्यवहार देखील तो सांभाळीत असणे पोलिसांच्या चौकशीत शामसुंदर गुजर याने पोलिसांनी जप्त केलेले ड्रग्स	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मधून मुद्देमाल काढून बाहेर विकत असल्याचे समोर आलेले असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१३५.	श्री. अशोक पाटील वि .स .स.	"संबंधित साकीनाका पोलीस स्टेशन येथील पोलीस अधिकारी ज्ञानेश्वर पाटील यांनी आरोपी वाहन चालक बदलून दुसरे दाखवणे. अपघातग्रस्त मोहन नायर बेशुद्ध अवस्थेत असताना हॉस्पिटल मधील कर्मचारी यांचा भेटण्यास विरोध असताना यांना हॉस्पिटलमध्ये सारखे जाऊन भेटण्याची घाई कशाला तसेच यांच्या परिवारातील सदस्यांना कायम धमकावणे. तरी पोलीस अधिकारी ज्ञानेश्वर पाटील यांची वरिष्ठांमार्फत कसून चौकशी केल्यास नक्कीच हा अपघात नसून रचलेला घातपाताचा कट होता हे सिद्ध होण्याची दाट शक्यता असणे, भांडूप मदारसंघाचे विधानसभा सदस्य यांनी दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी साकीनाका पोलीस स्टेशन येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे सविस्तर माहिती घेतली असता ते सुद्धा म्हणाले की ज्ञानेश्वर पाटील यांनी अपघातग्रस्त मोहन नायर यांना हॉस्पिटलमध्ये जाणे तसेच त्यांच्या घरी जाऊन परिवारातील सदस्यांना त्रास देणे हे नियमबाह्य काम त्यांनी केले असणे, मागील हिवाळी आधिवेशनात सभागृहात विषय मांडूनही श्री ज्ञानेश्वर पाटील यांना निलंबीत केले गेलेले नसणे, आजही ते सदरहु	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पोलिस ठाणे मध्ये कार्यरत असणे, मागे पुणे येथे घडलेल्या फरारी कारच्या अपघात प्रकरणात रक्ताचा नमुना बदलण्यात आला होता तेव्हा त्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले होते परंतु या प्रकणात चक्क आरोपीच बदलला गेला परंतु अद्यापपर्यंत काहीच कारवाई झालेली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१३६.	श्री. प्रविण तायडे वि .स .स.	"संपूर्ण राज्यामध्ये नागरिकांना कर्ज देणाऱ्या कंपन्या कार्यरत असणे, या कंपन्या गोरगरीब, गरजवंत नागरिकांना कर्ज देत असणे, मात्र या सर्व कंपन्या नागरिकांची चक्री व्याज लावून सरळ सरळ फसवणूक करीत असल्याचे वारंवार निदर्शनास येणे, कर्ज घेत असताना संपूर्ण फॉर्म इंग्लिशमध्ये असून त्यावर सही घेत असणे, कर्ज घ्यायच्या वेळेस संबंधित नागरिकांचा विमा काढताना आणि त्या विम्याची रक्कम त्यांच्या कर्जामधून कपात करत असणे, मात्र कर्ज घेणारा व्यक्ती मरण पावल्यास त्याला त्या विम्याचा लाभ न देता व कर्ज माफ न करता जबरीने कर्ज वसुली करणे, त्यांच्या घरच्यांना धमकावणे, घर-प्लॉट शेती जप्तीची नोटीस देणे, त्यांच्या घरावर जप्ती आणणे, नोटीस देऊन त्या मरण पावलेल्या व्यक्तीच्या घरच्या महिलेला स्थानिक कार्यालयात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		न बोलावता मुख्य कार्यालयात बोलावणे, काही कंपन्यांचे मुख्य कार्यालय केरळ, हैदराबाद सारख्या ठिकाणी असणे, कर्ज घेऊन ४ वर्ष झालेले असता त्या नागरिकांनी कर्जाची रक्कम ४ वर्ष भरलेली असता त्याला संपूर्ण रक्कम १० ते १२ वर्षाच्या व्याजानिशी चक्री व्याज नुसार भरायला लावत असणे, सदरहू बाब गंभीर असून याची सखोल चौकशी करून या कंपन्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, चक्री व्याजानुसार नागरिकांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांना काळ्या यादीत टाकण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
१३७.	श्री. सुधीर मुनगंटीवार वि .स .स.	"श्रीरामपूर (जि. अहिल्यानगर) शहरातील एका शाळेतील शिक्षकाने आठ वर्षीय चार विद्यार्थिनींशी शाळेत लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी घडणे, या घटनेचा विविध स्तरातून संताप व्यक्त होणे, सचिन महाजन गोणारकर नामक शिक्षकाने हे कृत्य करणे, सदर शिक्षक दिनांक १ ऑगस्ट, २०२५ रोजी पवित्र पोर्टलद्वारे संबंधित शाळेवर नियुक्त होणे, या शिक्षकाने शिकवत असलेल्या वर्गातील इयत्ता दुसरीतील एका विद्यार्थिनीशी त्याने वर्ग भरलेला असताना वर्गातील मागील बाकावर बसून गैरवर्तन करणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मुलीने हा प्रकार आईला सांगणे,पालकांनी चौकशी केली असता त्याने चार मुलींशी असेच गैरवर्तन करून अत्याचार केल्याचे निदर्शनास येणे, या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषीवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
१३८.	श्री. सुधीर मुनगंटीवार वि .स .स.	"महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने दहशतवादी कारवाया आणि तरुण कट्टरपंथीकरणाच्या संशयावरून दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६ रोजी अहिल्यानगरसह ७ ठिकाणी तसेच यवतमाळमध्ये मोठी संयुक्त मोहीम राबवत २० हून अधिक ठिकाणी छापे टाकणे,मध्यरात्रीच्या या कारवाईत संशयितांची चौकशी करुन डिजिटल पुरावे, आक्षेपार्ह कागदपत्रे व शस्त्रे जप्त करण्यात येणे,अहिल्यानगरमध्ये ७ विविध ठिकाणी एटीएसने शोधमोहीम राबविणे, तरुणांचे ब्रेनवॉशिंग, दहशतवादी संघटनांशी संबंध आणि कट्टरपंथी हालचालींचा संशय व्यक्त होणे, यवतमाळ, पुसद, उमरखेड आणि अहिल्यानगरमध्ये संयुक्तपणे २० पेक्षा जास्त ठिकाणी एकाच वेळी छापे टाकले जाणे, छापेमारीत आक्षेपार्ह कागदपत्रे, मोबाईल फोन आणि इलेक्ट्रॉनिक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गॅझेट्स जप्त करण्यात येणे, अनेक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात येणे,हे छापे दहशतवादी संघटनांच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींना शोधण्यासाठी आणि घातपाती कृत्य उधळून लावण्यासाठी टाकण्यात येणे, येत्या काळात राज्यात मोठा दहशतवादी हल्ला वा कारवाई होण्याची दाट शक्यता, नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.”	
१३९.	श्रीमती देवयानी फरांदे वि. स .स.	“ब्रिटिशसरकारने १९४३मध्ये ख्रिश्चन समाजाच्या विकासासाठी शासकीयजागा नाशिक डाययोसेशनट्रस्ट असोसिएशन लिमिटेड याकंपनीला कलम ८अंतर्गत सामाजिक प्रयोजनांसाठी दिली असणे, १९५८ मध्ये धर्मदाय संस्था अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर नाशिक डाययोसेशन ट्रस्ट नावाची धर्मदाय संस्था निर्माण करण्यात येणे, जमिनीचा विनियोग यानंतर या धर्मदायसंस्थे मार्फत केला जाणे, २०१६ मध्ये काही भूमाफियांनी नाशिक डायओस्टेशन ट्रस्ट असो. कंपनी पुनर्जीवित करणे, कंपनीचा उद्देश सामाजिक बदलून व्यावसायिक करण्यात येणे, याबाबत पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदवण्यात येणे, तसेच	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नाशिक सत्रन्यायालयाने पुनरजीवीत कंपनीला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसल्याचे आदेश देणे, न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात जाऊन अनेक व्यवहार कंपनीकडून केले जाणे,शैक्षणिक संस्थांसह व्यक्तींच्या घरांचा देखील करार करण्यात येणे, याबाबत वेळोवेळी तक्रारी व गुन्हे नोंदवणे,कंपनीच्या संचालकांच्या विरोधात अटकपूर्व जामीन फेटाळला असताना अटक न होणे, मोठ्या प्रमाणावर शासकीय जमिनीवर ताबा घेण्याचे प्रकारवाढणे,यात शाळा,शाळांचे मैदान, शासकीय जागा,चर्चची जागा, यासह पोलिस आयुक्तालय असलेल्या जागेवर देखील ताबा घेण्याचा प्रयत्न केला जाणे.उच्चन्यायालयाने हस्तक्षेप केल्यानंतर देखील भूमाफियांच्या मार्फत जागा ताब्यात घेण्याचे प्रकार सुरूच असणे,मोठे आर्थिक गणित असल्यामुळे शासकीय कर्मचारी यात सहभागी असणे,यामुळे नाशिक शहरात दहशतीचे वातावरण निर्माण होणे, अनेक सामान्य माणसांनी केलेल्या गुंतवणुकी धोक्यात येणे,शासकीय जागांचा वापर सामाजिक प्रयोजनासाठी होत नसल्याने शर्तभंग करून याट्रस्टची व कंपनीची जागा शासनजमा करून घेण्याची आवश्यकता, सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, याबाबत संघटित गुन्हेगारी असल्यामुळे मोका अंतर्गत कारवाई करण्याची	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणारी आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."	
१४०.	श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) वि. स. स.	"नाशिक येथील अंबड व सातपूर या दोन पोलिस ठाण्यांच्या हद्दीमध्ये औद्योगिक वसाहतीचा समावेश असणे, नागरी वसाहत आणि औद्योगिक वसाहत अशी मोठी हद्द या दोन्ही पोलिस ठाण्याच्या हद्दीत असून त्या तुलनेत मनुष्यबळाची कमतरता आणि वाढते गुन्हे यामुळे औद्योगिक वसाहतीतील नागरीकांकडून व उद्योजकांकडून गेल्या काही वर्षापासून नवीन पोलीस ठाण्याची होत असलेली मागणी, त्यासाठी पोलिस आयुक्तालयाकडून शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असणे, त्यानुषंगाने अंबड व सातपूर पोलिस ठाण्याचे विभाजन करुन माहे जुलै, २०२५ मध्ये चुंचाळे पोलिस ठाण्यास मान्यता देण्यात येणे, सदर पोलिस ठाण्याकरीता पोलिस निरीक्षकांसह विविध संवर्गाच्या १८१ पदांना मंजुरी देण्यात येणे, तथापि चुंचाळे एमआयडीसी पोलिस ठाण्याचा अद्याप मुहुर्त लागलेला नसणे, सदर पोलिस ठाणे केवळ कागदावरच असणे, परिणामी एमआयडीसीमधील उद्योजग व नागरीकांमध्ये वाढते नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण, शासनाने याबाबत तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करुन चुंचाळे येथील मान्यता देण्यात आलेल्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नवीन पोलीस ठाण्यातील मंजूर असलेली सर्व पदे भरुन सदर पोलिस ठाणे त्वरीत सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
१४१.	श्री. रवी राणा वि .स .स.	"अमरावती येथील नवनिर्मित बेलोरा विमानतळ हे अमरावती शहरापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर असून प्रवाशांची वाढती ये-जा, मालवाहतूक तसेच नागरी व औद्योगिक दळणवळणाच्या दृष्टीने या विमानतळाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत असणे, नागरिक व प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बेलोरा विमानतळाचा परिसर अमरावती शहर पोलीस कार्यक्षेत्रात वर्ग करून त्या ठिकाणी स्वतंत्र पोलीस स्टेशन मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली असणे, यास अनुसरून विद्यमान मा. महसूल मंत्री तथा पालकमंत्री, अमरावती जिल्हा यांनी दिनांक ०२ ऑगस्ट २०२५ रोजी पत्र क्रमांक ५५३/२५ अन्वये माननीय मुख्यमंत्री यांचेकडे शिफारस वजा विनंती केली असणे, अद्याप या विषयावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नसने, त्यामुळे शासनाने ही बाब प्राधान्याने विचारात घेऊन सुरक्षा व्यवस्थेबाबत आवश्यक निर्णय, स्वतंत्र पोलीस ठाण्याची मंजुरी तसेच	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तात्पुरती पोलीस बंदोबस्त व्यवस्था याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१४२.	श्री. संजय केळकर वि .स .स.	“ठाणे येथील मध्यवर्ती कारागृह स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, तसेच या ठिकाणी नवीन बांधकाम न करण्याबाबत अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधार सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांना शासनाने लेखी ठाणेकरांच्या व नागरिकांच्या भावना या किल्ल्याशी जोडले गेले असल्याने सदरच्या कारागृह हलवू नये अशी ठाणेकरांची तीव्र मागणी असणे, स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने व सातत्याच्या पाठपुराव्याने ऐतिहासिक ठेवा जोपासण्याच्या दृष्टीने व पुढील पिढ्यांना प्रेरणा ठरण्याच्या दृष्टीने स्मारकाचे काम सुरू असल्याने सदर कामांना स्थगिती देऊ नये अशी मागणी करण्यात येणे तथापि काही बिल्डर धार्जिण्याकडून कारागृह हालवण्याचे प्रयत्न सुरू असून नव्याने स्थलांतरित करण्यात येणाऱ्या कारागृहाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्याकरिता किमान आठ ते नऊ वर्ष एवढा कालावधी लागणार असल्याचे तज्ञांचे मत असणे, त्यामध्ये प्रस्ताव बनविणे, अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे व प्रत्यक्ष बांधकाम सुरू करणे, ही प्रक्रिया वेळखाऊ असल्याने अनेक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		समस्या निर्माण होण्याची शक्यता असणे, कारागृहात उपलब्ध असलेल्या जागेत नव्याने इमारती बांधून हे कारागृह आहे त्याच ठिकाणी ठेवणे याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१४३.	श्री. हेमंत रासने,श्री .किसन वानखेडे वि .स .स.	“कसबा विधानसभा क्षेत्रामध्ये खडक येथील पोलिस वसाहतीतील निवासस्थानांचे बांधकाम ब्रिटीश काळात झाले असून बहुसंख्य निवासस्थाने सन १८७५ पूर्वी बांधलेली असणे, या निवासस्थानांची वारंवार डागडुजीही करण्यात आली, परंतु सद्यःस्थितीत ही निवासस्थाने मूलभूत सुविधांसह राहण्यालायक नसून शासकीय कर्मचारी व कुटुंबियांना जीव मुठीत घेऊन रहावे लागणे, तर काही कर्मचारी अन्यत्र भाडेतत्वावर राहत असणे, याकरिता शासनाने तातडीने या पोलिस वसाहतीतील निवासस्थानांचे स्ट्रक्चरल ऑडिट (संरचनात्मक परिक्षण) करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करुन सदरील वसाहती मधील निवासस्थानांचा पुनर्बांधणीबाबतचा प्रस्ताव व त्यासाठी आवश्यक खर्चाची अंदाजपत्रकांस तातडीने मान्यता देऊन निधी उपलब्ध देण्याची आवश्यकता या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित मंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापही या संदर्भात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी या रहिवाश्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाचीप्रतिक्रिया व भूमिका."	
१४४	श्री. गजानन लवटे वि .स .स.	"नांदगाव पेठ (जि.अमरावती) बसस्टँड परिसरात दि. ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास एका दुचाकीचा किरकोळ धक्का लागल्याच्या कारणावरुन रागाच्या भरात तीन अज्ञात युवकांनी अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती येथील दुचाकीस्वार दोन सख्या भावांवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करणे, सदर हल्ल्यात गौरव घोटेकार या तरुणाचा जागीच मृत्यू होणे, तर त्याचा भाऊ सौरव घोटेकर हा गंभीर जखमी होणे, त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरु असणे, सदर तरुण कामावरुन घरी परत असतांना नांदगाव पेठ बसस्टँडवर समोरुन येणाऱ्या एका दुचाकीला त्यांच्या दुचाकीचा धक्का लागल्या कारणावरुन किरकोळ वाद सुरु होणे, तद्नंतर आरोपींनी "आम्ही महादेव खोरीचे भाई आहोत, ओळखत नाही का ?" म्हणत गौरव व सौरव घोटेकर यांच्यावर धारदार शस्त्रांनी सात ते आठ वार करणे, सदर प्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्यात येणे, तसेच संबंधित आरोपींना पोलीसांनी अटक केलेली असणे, वर्दळीच्या ठिकाणी झालेल्या या निर्घृण हत्याकांडामुळे नांदगाव पेठ परिसरात पसरलेले भितीचे वातावरण, शासनाने सदर प्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१४५.	श्री. संजय केळकर,डॉ .जितेंद्र आव्हाड,श्री .चेतन तुपे,श्री . राजकुमार बडोले,श्री .प्रतापराव पाटील चिखलीकर,श्री .अनिल पाटील,श्री. दौलत दरोडा,श्री . राजेश विटेकर,श्री .हारुन खान,श्री .राजु तोडसाम,श्री . मोहन मते वि .स .स.	"राज्यातील ठाणे जिल्हयात वागळे इस्टेट परिसरातील सेंट्रम बिझनेस पार्कमध्ये कार्यालय थाटून 'ट्रेड विथ जेंझ असोसिएटस प्र.लि.' या कंपनी मार्फत शेअर बाजारात गुंतवणूक करुन दरमहा १० टक्के नफा व ४ टक्के परतावा दिला जाईल असे प्रलोभन दाखवून राज्यभरातील ११ हजार गुंतवणूकदारांची घोर फसवणूक होणे, या कंपनीच्या राज्यभरात ठाणे, गुहागर, चिपळूण, रत्नागिरी इ. ठिकाणी १६ शाखा असल्याचे व अंदाजे १२०० कोटी रुपयांची गुंतवणूक जमा करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, या कंपनीचे मालक व व्यवस्थापकीय संचालक असलेले श्री.समीर नार्वेकर, त्यांची पत्नी नेहा नार्वेकर व संचालक श्री. अमित पालम यांना अलीकडेच गुजरातमधून अटक होणे, या कंपनीमध्ये अपर पोलीस अधिक्षक, रत्नागिरी, उपविभागीय पोलीस	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अधिकारी, चिपळूण रत्नागिरी पोलीस अधिक्षक कार्यालयातील पोलीस कॉन्स्टेबल, ठाणे आर्थिक गुन्हे शाखा कार्यालयातील कॉन्स्टेबल व या प्रकरणाचे चौकशी अधिकारी, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वारजे माळवाडी इ. बिझनेस पार्टनर असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी चौकशीच्या कामात व्यत्यय येत असल्याचे निदर्शनास येणे, या प्रकरणाची दखल सेबी व नॅशनल स्टॉक एक्सेंजने गुंतवणूकदारांना प्रिकाशनरी नोटीस काढली असल्याचे निदर्शनास येणे, यासंदर्भात एफआयआर करण्यात आले असणे, याबाबतची तक्रार मा.मुख्यमंत्री व अपर पोलीस महासंचालक यांच्याकडे लेखी स्वरुपात केली असल्याचे निदर्शनास येणे,परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१४६.	श्री. अभिजीत पाटील वि .स .स.	“माढा तालुक्यात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती दि.१९ फेब्रुवारी, २०२६ रोजी सहाय्यक आयुक्त (अन्न) यांना प्राप्त झालेली असणे, त्यानुषंगाने रात्री ९.०० च्या सुमारास अन्न व सुरक्षा अधिकारी श्रीमती रेणूका रमेश पाटील, श्री.चन्नवीर स्वामी तसेच पंच साक्षीदार हे मौजे बावी, ता.माढा,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जि.सोलापूर येथे उभ्या असलेल्या वाहनाची तपासणी करण्यासाठी गेले असता सदर ठिकाणी दोस्त अशोक लिलॅण्ड वाहन क्र.एम.एच.१३/ डी.क्यू.९५६१ आणि बोलेरो पिकअप वाहन क्र.एम.एच.११/ डी.डी. ९९०२ या वाहनधारकाकडून पळून जाण्याचा प्रयत्न होणे, त्यास अडविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी श्रीमती पाटील व इतर अधिकाऱ्यांच्या अंगावर वाहन घालण्याचा प्रयत्न करणे,त्यात सदर अधिकाऱ्यांचे वाहन क्र.एम.एच.११/बी.व्ही.९०९२ या वाहनास धडक देणे, गुटखा तस्करी करणाऱ्या वाहने पोलीसांच्या मदतीने जप्त करण्यात येणे, त्यामधून गुटखा, पान मसाला व सुगंधीत तंबाखूच्या साठ्यासह तीन वाहने असा एकुण ३६,६८,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात येणे, सदर प्रकरणी अन्न व सुरक्षा अधिकारी, सोलापूर यांनी माढा पोलीस ठाण्यात दि.२०/०२/२०२६ रोजी गुन्हा दाखल झालेला असणे,ही बाब अत्यंत गंभीर असून शासकीय अधिकाऱ्यांवर अशाप्रकारे प्राणघातक हल्ले होत असल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेले भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण, शासनाने यासर्व प्रकरणी तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१४७.	श्री. प्रकाश) दादा (सुंदरराव सोळंके वि. स .स.	"धार्मिक कार्याच्या नावाखाली लोकांकडून कोट्यावधी रूपयांच्या देणग्या उकळणे ,आयकर विभाग, शासनाची फसवणूक करणे, एकाच बँकेत ५ खात्यावर ४ कोटी ७३ लाखाची रक्कम आढळून आल्या प्रकरणी पात्रुड ता. माजलगाव जि.बीड येथील गुलजार - ए- रजा या बोगस ट्रस्ट विरोधात छत्रपती संभाजीनगर च्या दहशतवाद विरोधी पथकाने माजलगाव ग्रामीण (जि.बीड) पोलीस स्टेशन येथे ट्रस्टच्या ४ विश्वस्ता विरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दि.८.०१.२०२६ रोजी वा त्या सुमारास दाखल केले असणे, अशा स्वरूपाचे ट्रस्ट महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आढळून आले असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता
१४८.	श्रीमती स्नेहा दुबे वि. स .स.	" वसई तालुक्यातील पेल्हार येथील भूमिहिन,शेतमजूर,स्वातंत्र सैनिक आणि आदिवासी खातेदारांना जमिनी वाटप केलेले असणे, जमीन महसूल संहिता कलम ३६ नुसार या जमिनी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय हस्तांतरास कायद्याने बंदी असणे , तरीसुद्धा भूमाफियांनी या भूखंडांचा बेकायदेशीर ताबा घेऊन रशिद कंपाऊंडमध्ये शेकडो अनधिकृत गाळे आणि चाळींचे बांधकाम आजही सुरू असणे, दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी या अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी गेलेल्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वसई विरार महानगरपालिकेच्या पथकावर तेथील भूमाफियांनी प्राणघातक हल्ला करणे, हल्ल्याचे व्हिडीओ उपलब्ध असताना पोलिसांनी सर्व आरोपींचा गुन्हयात समावेश न करणे,अशाचप्रकारे वसईतील बापाने गावातील शासकीय जमिनीवरील बेकायदा कामावर कारवाईसाठी गेलेल्या मंडळ अधिकाऱ्यावर दि.२४ फेब्रुवारी २०२६ रोजी समाजकंटकांनी हल्ला करणे, शासकीय गाडी फोडणे , भूमाफियांच्या दहशतीने याची पोलिसांत तक्रार न नोंदविणे, अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी तात्काळ व पुरेसा बंदोबस्त पोलीसांकडून न देणे , बंदोबस्तासाठी ८-१० दिवस अगोदर अर्ज करण्याचे परिपत्रक पोलिसांकडून काढणे, तेवढ्या वेळात अनधिकृत चाळी-गाळे उभारून त्यात माणसे- सामान ठेवून कारवाईला भूमाफियांकडून विरोध करणे, या अनधिकृत बांधकामांमुळे स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेचा आणि नागरी सुविधांचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, संपूर्ण शहराचे नियोजन कोलमडणे, परिणामी नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, या भूमाफियांवर मोका लावण्याची स्थानिकांची मागणी, यावर शासनाने करावयाची कारवाई आणि उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१४९.	श्री. किशोर पाटील वि .स .स.	"पाचोरा-भडगांव मतदार संघातील शिंदाड येथील अतुल लक्ष्मण अहिरे (२२) हा तरुण पुणे जिल्हयातील वाघोली परिसरात असलेल्या एचओडी प्राणा बॅन्केट अँड रिसोर्ट हॉटेलमध्ये काही महिन्यापासून कामावर काम करीत असणे, त्यांच्यावर चोरी झाल्याचा आरोप करीत हॉटेल संचालक यांनी त्यांच्या कार्यालयात बोलावून जबर मारहाण करून गुन्हा कबूल करण्यास सक्ती करून कबूलनाम्यावर सह्या करून घेतल्या असणे, सदरील अपमान सहन न झाल्याने अतुल यांनी दिनांक २३.२.२०२६ रोजी पुणे येथील सासवड रोड रेल्वे स्टेशनजवळ रेल्वेखाली आत्महत्या करणे, त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी मोबाईलवर सदरील घटनेचा मजकूर पाठविण्यात आला असणे, या प्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित हॉटेल मालक व संचालकांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता
१५०.	श्री. सुधीर मुनगंटीवार वि. स .स.	"चंद्रपूर मधील वरोरा तालुक्यात दिनांक १ मार्च २०२६ रोजी रेतीच्या वादामुळे भरत नागपाल यांचा निर्घृणपणे खून होणे, माढेली जवळील बामर्डा गावात घाट लिलावाच्या वादातून भीषण आणि हिंसक घटना	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		घडणे, रेती उत्खननाच्या हक्कावरून दोन गटांमध्ये तीव्र वाद होणे,या संघर्षात भरत नागपाल, रा. पुलगाव, जि. वर्धा येथील या व्यक्तीचा खून होणे, १० ते २५ इसमांनी तलवारी ने खून करून त्याला नदीत फेकून देणे,काही जण गंभीर जखमी होणे, या घटनेमुळे गावात भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण होणे,घटनेनंतर संतप्त झालेल्या काही व्यक्तींनी घटनास्थळी उभी असलेली जेसीबी मशीन पेटवून देणे तसेच तीन ते घार वाहनांची तोडफोड करण्यात येणे, या घटनेची सखोल चौकशी होऊन दोषींवर कडक कारवाई होण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
१५१.	श्री. उत्तमराव जानकर वि .स .स.	"माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील माळखांबी गावामध्ये गेल्या काही दिवसांपासून चोऱ्यांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली असणे. विशेषतः दिनांक ०८ ते १२.०२.२०२६ व दिनांक २५.०२.२०२६ या कालावधीत गावातील वेगवेगळ्या भागात सातत्याने चोऱ्या झाल्या असून, एकाच घरात सलग दोन दिवस चोरी झाल्याचे धक्कादायक प्रकार घडला असणे, नैसर्गिक संकटे आणि अतिवृष्टीमुळे आधीच हवालदिल झालेला शेतकरी आता या चोरांच्या टोळ्यांमुळे उद्ध्वस्त	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		होऊन एकाच वेळी साधारण १५ ते १६ शेतकऱ्यांच्या शिवारातील तांब्याच्या केबल्स, विहिरीवरील मोटारी, शेळ्या आणि इतर जीवनावश्यक वस्तूंची चोरी होत असणे, चोरांची कार्यपद्धती अत्यंत विघातक असून ते तांब्याची तार काढल्यानंतर उर्वरित केबल जाणीवपूर्वक विहिरीत किंवा बोअरवेलमध्ये टाकून देत यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंडासोबतच शारीरिक श्रमाचा मोठा त्रास सहन करावा लागत असणे, चोरांची संख्या मोठी असल्याने ग्रामस्थांच्या आणि शेतकऱ्यांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होऊन वारंवार तक्रारी करूनही पोलीस प्रशासनाकडून ठोस कारवाई करण्याबाबत उदासीनता दिसत असणे. त्यामुळे स्थानिक जनतेमध्ये पोलीस प्रशासनाविरुद्ध प्रचंड असंतोष आणि भीतीचे वातावरण असणे, या गंभीर बाबीची दखल घेऊन संबंधित पोलीस स्टेशनच्या हद्दीत रात्रीची गस्त वाढवणे, चोरांच्या टोळीचा तातडीने छडा लाऊन बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तातडीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१५२.	श्री. संजय मेश्राम वि .स .स.	“भिवापूर, जि.नागपूर येथील प्रभारी ठाणेदार जयप्रकाश निर्मल यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर करुन अमन अरोरा या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		किराणा दुकानदारास खोट्या आरोपाखाली गुंतवले असून दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी एफआईआर नोंदवला असणे, एफआईआर दाखल करताना येथील रेती माफियांना सहायता करणे व पोलिसांच्या गाडीचा पाठलाग करणे असा आरोप ठेवणे, वास्तविक सदर फिर्यादीकडे या ठाणेदाराने एक लाख रुपयांची लाच मागितली असणे, परंतु त्यांनी नकार दिल्याने खोटा गुन्हा नोंदविणे, त्यामुळे फिर्यादीला रुपये अंदाजे ३५ हजार रुपयांचा आर्थिक भुर्दंड बसला असून त्यांना मानसिक त्रास व समाजात बदनामीला सामोरे जावे लागणे, त्यामुळे त्यांनी यासंदर्भात पोलीस आयुक्त ग्रामीण, नागपूर यांचेकडे तक्रार दाखल करुन त्यांच्यावरील खोटा गुन्हा मागे घ्यावा व उच्चस्तरीय चौकशी करुन सदर ठाणेदारावर कारवाई व्हावी अशी मागणी करणे, परंतु कारवाईस होत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत व्यक्त होणारा असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
१५३.	श्री. संजय मेश्राम वि .स .स.	"भिवापूर (जि.नागपूर) तालुक्यातील एक महिन्यापासून बेपत्ता असलेल्या एका अल्पवयीन मुलीला अहिल्यानगर येथे सव्वा लाखात विक्री केली असल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		येणे, प्राप्त माहितीनुसार दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी शाळेत जाण्याचे दिवशी तिला अमिष दाखवून अपहरण करणे, वैद्यकीय तपासणीत तिच्यावर अत्याचार झाल्याचे समोर येणे, या गुन्हयात एक महिला व एक व्यक्ती सामील असून त्यांच्यावर गुन्हा नोंद होऊन अटक होणे, येथे मोठ्या रॅकेटची शक्यता असल्याचा संशय व्यक्त होणे, या मानवी तस्करीमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे अपेक्षित असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, सबब शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१५४.	श्री. योगेश सागर वि .स .स.	“बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील गोवंडी येथे दत्तगुरू तसेच समर्पण एसआरए सहकारी गृहनिर्माण सोसायटी असणे. सदर दोन सोसायटीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयातर्फे प्रकल्पबाधित लाभार्थी (पी.ए.पी.) यांच्या पुनर्वसनासाठी विशिष्ट राखीव	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कोटा ठेवलेला असणे.सदर राखीव कोट्यात कायदेशीर प्रक्रिया पार पाडून प्रकल्पबाधित व्यक्तिंना सदनिका देणे अपेक्षित असणे परंतु कोणतेही कायदेशीर प्रक्रिया पार न पाडता दत्तगुरू सोसायटीमध्ये ०६ तसेच समर्पण सोसायटीमधील ०४ पी.ए.पी.सदनिका या महानगर-पालिकेचे तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे संबंधित अधिकारी यांनी संगनमत करून, आपल्या आर्थिक फायद्यासाठी, बोगस लाभार्थी यांना वितरीत केलेल्या असणे. याकरिता संबंधित अधिकारी यांनी सदर बोगस लाभार्थी यांचे बनावट व खोटे ओळखीचे तसेच रहिवासाचे पुरावे तयार केलेले असणे. अश्याप्रकारे दत्तगुरू तसेच समर्पण एसआरए गृहनिर्माण सोसायटीमध्ये पी.ए.पी. सदनिका वाटप करताना गैरप्रकार झालेले असल्यामुळे, पात्र लाभार्थी यांच्यावर अन्याय झालेला असून, शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडालेला असणे. त्यामुळे सदर दत्तगुरू तसेच समर्पण या सोसायटीमधील पी.ए.पी. सदनिकांच्या वाटपामध्ये गैरप्रकार करणारे अधिकारी व बोगस लाभार्थी यांच्यावर प्रशासकीय तसेच फौजदारी स्वरूपाची तात्काळ कारवाई करणे, तसेच	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे,रायगड या जिल्ह्यांतील एसआरए योजनेअंतर्गत बांधलेल्या सोसायटयांमधील पी.ए.पी. सदनिकांच्या वाटपाची उच्चस्तरीय स्थापन करून चौकशी करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१५५.	ॲड. श्रीजया चव्हाण,श्री .जितेश अंतापुरकर वि .स .स.	“राज्यातील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये गंभीर गुन्ह्यातील बरेचशे पुरावे आणि तपशील तपासणीसाठी पाठविण्यात येणे. या मध्ये खुन, बलात्कार, विषबाधा, अन्नामधील भेसळ या सारख्या गुन्ह्यातील पुराव्यांच्या तपासणीची प्रकरणे अंतर्भुत असणे, मात्र जोखमीच्या आणि सुक्ष्म तपशीलासह अचूक निष्कर्षावर आधारित अनुमान देणाऱ्या न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने कामकाजावर विपरीत परिणाम होणे, अ व ब गटातील निम्म्याहुन अधिक जागांसह मंजूर पदांपैकी मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त असणे, परिणामत: तपास प्रक्रियेला विलंब लागणे, या विलंबाचा परिणाम न्याय प्रक्रियेवर होणे व त्याचा फायदा गुन्हेगारांना मिळण्याची शक्यता असणे, या परिस्थितीत राज्यातील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांमधील रिक्त पदांचा आढावा घेऊन रिक्त पदे तातडीने	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		भरण्याची आवश्यकता असणे, मात्र त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे तपासयंत्रणा आणि त्यानंतर न्यायदान प्रक्रियेवर परिणाम व विलंब होत असल्याने संबंधीतांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."	
१५६.	श्री. सुधीर मुनगंटीवार वि .स .स.	"चंद्रपूर शहरानजिकच्या दुर्गापूर पोलीस ठाणे हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत सुमारे ९१ लाख रुपयांच्या ५०० रुपयांच्या बनावट नोटांच्या झेरॉक्स प्रती दि. ११ मार्च, २०२६ रोजी मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात येणे, या प्रकरणी मध्यप्रदेश राज्यातील शुभम नागर या युवकास ताब्यात घेण्यात आले असून तो काही सहकाऱ्यांसह अपार्टमेंटमध्ये राहत असल्याचे उघड होणे,एवढ्या मोठ्या प्रमाणात बनावट नोटांची झेरॉक्स प्रत तयार करून बॉक्समध्ये साठवून ठेवण्यात आल्याने राज्यात बनावट चलनाचा मोठा गैरप्रकार घडण्याची शक्यता निर्माण होणे, बाहेरच्या राज्यातील व्यक्तीकडून अशा प्रकारे बनावट चलनाशी संबंधित प्रकार उघडकीस आल्यामुळे या मागे एखादे संघटीत रॅकेट कार्यरत असण्याची दाट शक्यता असणे, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करणे, तसेच राज्यात बनावट चलनाच्या संभाव्य रॅकेटचा शोध घेण्यासाठी विशेष तपास	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मोहीम राबविण्याची नितांत आवश्यकता,शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१५७.	श्री. अमोल जावळे वि .स .स.	“गो तस्करीला आळा घालण्याकरीता राज्यातील काही व्यक्ती स्वयंप्रेरणेने गोरक्षणाचे कार्य करत असणे. दि १०.०२.२०२६ .रोजी उदगीर, लातूर पोलीस स्टेशन येथे गोवंश वाहतूक करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हा दाखल झालेला असूनसुध्दा गो तस्करी करीता वापरण्यात आलेल्या गाड्या तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यामार्फत सोडण्यात आलेल्या असणे .तसेच तासगांव, सांगली पोलीस स्टेशन येथे गो तस्करीच्या गुन्हयामधील गाडी क्र. MH-१० DT -७०८५ ही न्यायालयाच्या आदेशाशिवाय सोडलेली असणे, ज्या गोरक्षकांमार्फत पोलीसांना गोतस्करीबाबत माहिती दिली जाते त्यांचा जबाब दाखल न करता इतर दुसरा डमी गोरक्षकाचा जबाब दाखल करुन गोतस्करी करणाऱ्या गाड्या सोडण्यात येत असणे, गोतस्करी करणाऱ्या वाहनांना पकडल्यावर त्यांचा वाहन परवाना रद्द होत नसणे, त्यामुळे गोतस्करीकरीता एकच वाहन पुन्हा पुन्हा वापर करण्यात येत असणे, बाजार समितीमध्ये दाखल होणाऱ्या अनेक गोवंशाच्या कानामध्ये टॅग	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नसल्याने त्यांचा वापर गोतस्कर स्वत:ला शेतकरी भासवून गो तस्करीसाठी करत असणे, पोलीसांमार्फत गोतस्करांवर तात्काळ गुन्हे दाखल होत नसल्याने गोतस्करीतील प्राण्यांना गोशाळांकडे पाठविण्यात अडचणी निर्माण होत असणे, मागील पावसाळी अधिवेशनामध्ये पुढील अधिवेशनापर्यंत गोरक्षणाचा कायदा कडक करण्याबाबत व गोतस्करांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याबाबतचे आश्वासन मा. गृहराज्यमंत्री यांनी दिले असणे, त्याबाबत आजतागायत कारवाई झालेली नसणे, तरी पोलीसांकरीता एक सर्व समावेशक SOP तयार करणे, गोतस्करांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका व उपाययोजना."	
१५८.	श्री. गोपिचंद पडळकर वि .स . स.	"नवी मुंबई येथील विकासक (DDSR Group) समूहाचे DDSR Builder & Developer LLP कंपनीच्या नावे Hieght, Tathagat CHS, सात्विक या सोसायट्याचे कळंबोळी नेरुळ येथे तसेच REALTY LLP या कंपनीच्या नावे Honey Homes CHS, Matoshri CHS, Maitri CHS या सोसायाट्याची कामे खारघर, कामोठे, नेरुळ, कळंबोली, सानपाडा, पनवेल येथे सुरु असणे या सारख्या अनेक ठिकाणी DDSR Group चे प्रकल्प सुरु असणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्यामध्ये ४ ते ५ हजार नागरिकांनी फ्लॅट घेण्यासाठी पैसे भरलेले असणे, अद्याप त्या ठिकाणी केवळ एकच प्रकल्पाचे कामं पूर्ण झाले असून इतर प्रकल्पाचे कामे अपूर्ण असणे, सदर विकासकाने प्रकल्पाचे बांधकाम अपूर्ण ठेवल्याने ग्राहकांची आर्थिक फसवणूक होणे तसेच सदर प्रकल्पामध्ये सह भागीदार गुंतवणूकदार यांच्याकडून दाम दुप्पटीचे प्रलोभन दाखवून हजारो कोटी रुपये घेतलेले असणे, त्यांना देखील ते पैसे अद्याप परत मिळालेले नसणे, काही प्रकल्पाचे कामं सुरु असून त्यांची CC देखील घेतलेली नसणे, तसेच जेवढे प्रकल्प सुरु आहेत त्यांचे GST चे पैसेही शासनाला भरलेले नसणे, GST विभागाने सदर विकासकास नोटीस बजावली असूनही GST चा भरणा करण्यात आलेला नसणे, यामध्ये GST अधिकारी व विकासक यांच्या मध्ये आर्थिक संगनंमत होणे, विकासक यांनी मोठा आर्थिक घोटाळा करून ग्राहकांची, गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे निष्पन्न होणे, याबाबत शासनाने विकास DDSR Group तसेच संबंधित जबाबदारांची तात्काळ चौकशी करून करावायची कारवाई व प्रतिक्रिया.”	
१५९.	श्री. मोहन मते वि .स .स.	“नाशिक जिल्ह्यातील शासकीय वसतीगृहातील अल्पवयीन दहावीच्या ७ विद्यार्थ्यांनी पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गुंगीचे औषध देऊन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अत्याचार केल्याची गंभीर घटना दि. ६ मार्च, २०२६ रोजी उघडकीस आली असणे, मात्र हा प्रकार सातत्याने मागील सात महिन्यांपासून घडत असणे, याबाबत अधिक्षकांना तक्रार प्राप्त होऊनही त्यांनी या प्रकारांकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, या गंभीर कृत्याची वेळीच अधिक्षकांनी दखल घेतली असती तर या प्रकारच्या घटना आळा घालणे शक्य झाले असणे, अशा प्रकारे घडणाऱ्या घटना व गुन्ह्यांना लगाम बसण्यासाठी शासकीय वसतीगृहांमध्ये आवश्यक त्या ठीकाणी CCTV कॅमेरा बसविणे, कडक नियमावली करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, सदरहू घटनेत गुन्हा करणारे विद्यार्थी व पीडीत विद्यार्थी-विद्यार्थींनी दोन्ही अल्पवयीन असणे, अशा ठिकाणी अधिक्षकांची मुख्य जबाबदारी असणे, भविष्यात शासकीय व निमशासकीय वसती गृहांतील विद्यार्थ्यांना जिवाशी धोका निर्माण होऊ नये, याकरिता त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१६०	श्री. गोपिचंद पडळकर वि. स .स.	“अहिल्यानगर जिल्हा नियोजन समितीचे सदस्या,सौ.वैशाली संजय नान्नोर यांचे कुटुंबियांवर सुनील लोखंडे या आरोपीने दिनांक ७/१०/२०२१ रोजी बंदुकोचा धाक दाखवून जिवे मारण्याचा प्रयत्न केला असणे, सदरहू आरोपी सुनील लोखंडे हा बडतर्फ पोलीस अधिकारी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असून त्याचेवर कोथरुड पोलीस स्टेशन,पुणे तसेच शिरुर पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. कलम नुसार अनेक गुन्ह्यांची नोंद असणे, सदर आरोपी अहिल्यानगर कारागृह येथे बंदी असणे, आरोपीला उपचारार्थ अहिल्यानगर जिल्हा शासकीय रुग्णालयात आणले असता पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे दिनांक १०/०६/२०२५ रोजी आरोपीने पलायन करुन फरार झाला असणे, त्यासंबंधीत सदर आरोपीवर तोफखाना पोलीस स्टेशन अंतर्गत अहिल्यानगर येथे गु.र.क्र.०६१९/२०२५ अंतर्गत गुन्हा दाखल होऊन सुमारे चार महिने होऊनही आरोपीचा शोध घेण्यात पोलिसांना अपयश आले असणे, आरोपी हा पुर्वाश्रमीचा तत्कालिन बडतर्फ पोलीस अधिकारी असल्यामुळे त्याला पोलीस खात्यातील अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळत असणे, सदरहू फरार आरोपीमुळे वैशाली नान्नोर यांना व त्याच्या कुटुंबियांच्या जीवितास धोका निर्माण झाला असणे, याप्रकरणी सदरहू आरोपीस तात्काळ अटक करुन बाधित कुटुंबियास संरक्षण देण्याची विनंती बाधित कुटुंबियांनी दि.१०/०३/२०२६ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.गृह (ग्रामीण) राज्यमंत्री, आय.जी.,नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस अधिक्षक, अहिल्यानगर, पोलीस निरिक्षक,राहुरी पोलीस स्टेशन, राहुरी	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली असणे, याबाबत आरोपीचा शोध घेऊन अटक करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१६१.	श्री. मनोज कायंदे वि .स .स.	“मौजे चिखला ता.लोणार जिल्हा बुलढाणा येथे अंगणवाडीच्या मोकळ्या जागेत दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ रोजी अज्ञातइसमाने अनाधिकृतपणे छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा बसविण्यात येणे,तथापि सामाजिक कार्यासाठीची एकमेव जागेच्या अडचण निर्माण होत असल्याने पोलीस प्रशासन व गावकऱ्यांमध्ये या दरम्यान बैठक घेण्यात येणे,पोलिसांकडून अज्ञातइसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणे,पोलीस प्रशासनाकडून पुतळा सुरक्षित ठिकाणी हलविणे संदर्भात कार्यवाही सुरू असणे,दरम्यान तेथील दोन गटांत हाणामारी होऊन घटनेला जातीयवादाचे स्वरूप प्राप्त होणे,घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक स्वतः उपस्थित असतानाही घडलेला दुर्दैवी प्रकार,परिस्थिती हाताबाहेर जात असताना पोलिसांनी तात्काळ जमावबंदी लागू करणे आवश्यक असतानाही त्यामध्ये जाणीवपूर्वक दिरंगाई करणे, पोलिस प्रशासनाच्या निष्काळजीपनामुळे गाव परिसराबाहेरील हजारो लोकांचा सातत्याने ३ दिवस जमाव गावामध्ये	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जमणे अश्लील व प्रक्षोभक जातीय तेढ निर्माण होतील अशी भाषणे करणे,मध्यरात्रीच्या वेळेला रस्त्यावरील गाड्यांची तोड फोड होणे,गावातील इतर सर्व जातीधर्माच्या घरांवर दगड फेक होणे,पोलीस प्रशासनाच्या या संशयास्पद भूमिकेमुळे आणि हलगर्जीपणामुळेच वाद विकोपाला जाऊन गावात जातीय तेड निर्माण होणे,या संघर्षात प्रत्यक्ष सहभागी नसलेल्या अनेक निर्दोष व्यक्तींवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाप्रती निर्माण झालेला संताप,याप्रकरणाची SIT मार्फत उच्चस्तरीय चौकशी व सर्व संबंधित व्यक्तीसह संबंधित अधिकाऱ्यांचे CDR तपासून,दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करुन निरपराध व्यक्तींवरील गुन्हे तातडीने मागे घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१६२.	डॉ. नितिन राऊत, श्री .विजय वडेट्टीवार,श्री .नानाभाऊ पटोले,श्री .अस्लम शेख, श्री .अमिन पटेल, श्री .संजय मेश्राम, डॉ. ज्योती गायकवाड वि .स .स.	"नागपूरातील व नागपूर (उत्तर) मतदार संघाला लागून असलेले कोराडी थर्मल पॉवर प्लांटमध्ये फ्लाय ॲश व्यवस्थापन व पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल (NGT) ने महाजेनकोवर रुपये ५ कोटींचा पर्यावरणीय दंड ठोठावला असणे, NGT च्या पुणे खंडपीठाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला अतिरिक्त पर्यावरणीय नुकसान भरपाईचे मूल्यांकन करून ती वसूल करण्याचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निर्देशही दिले असणे, तपासणी दरम्यान ६६० मेगावॅट क्षमतेच्या युनिट ८, ९ आणि १० मध्ये १००% फ्लाय ॲश वापर, ग्रीन बेल्ट विकास आणि FGD प्रणालीसारख्या अनिवार्य पर्यावरणीय उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात त्रुटी आढळल्या असणे, तसेच SO_2 आणि NOx सारखे प्रदूषक घटक निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात आढळून आलेले असून ज्याचा नागपूर उत्तर मतदार संघामध्ये कार्बन मुळे हवामानामध्ये व पर्यावरणामध्ये मोठे बदल झाले असणे, त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असणे, तसेच नागपूर व परिसरातील पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असणे, NGT ने 'Polluter Pays' तत्त्वानुसार हा निर्णय देत स्पष्ट केले की वसूल केलेली रक्कम केवळ पर्यावरण पुनर्स्थापना आणि सुधारणा कार्यांसाठी आवश्यकता, विदर्भातील पर्यावरण आणि जनतेच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांवर कठोर देखरेख आणि जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."	
१६३.	श्री. अनुपभैय्या अग्रवाल वि .स .स.	"धुळे जिल्ह्यात महावितरणसाठी सध्या सुसज्ज प्रशासकीय इमारत उपलब्ध नसणे, कार्यालयाचे कामकाज असुविधाजनक व अपुऱ्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जागेत सुरू असणे, काही विभागांची कार्यालये इतरत्र विखुरलेली असल्यामुळे नागरिकांना, शेतकऱ्यांना व उद्योजकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असणे, त्यामुळे प्रशासकीय कार्यक्षमतेवर परिणाम होत असून सेवा वितरणाबाबत विलंब होत असणे, धुळे विभागासाठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत उभारण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याची विनंती महावितरण, धुळे यांच्याकडे करण्यात आलेली असणे, परंतू अद्याप प्रस्ताव सादर न करणे, त्यामुळे स्थानिक नागरिक, उद्योजक यांच्या शासनाप्रती असंतोष निर्माण होणे, सदर प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करणे, शासनाकडून प्रस्तावास मान्यता देण्यासाठी शासनाकडून कार्यवाही होणे अपेक्षित असणे, सदर बाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१६४.	श्री. रवी राणा वि .स .स.	“अमरावती जिल्ह्यातील सासन रामापूर ता. दर्यापूर या ग्रामीण भागात वीज वितरण कंपनीचे काही विद्युत पोल अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत उभे असून ते कधीही कोसळण्याची शक्यता असणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीवितास व मालमत्तेस गंभीर धोका निर्माण झाला असणे, विशेषतः वादळी पावसाळ्यात अपघात होण्याची भीती अधिक तीव्र झाली असणे, या संदर्भात लोकप्रतिनिधी यांनी दिनांक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		०४/०७/२०२५ रोजी पत्राद्वारे मा. महसूल मंत्री तथा पालकमंत्री, अमरावती जिल्हा तसेच मुख्यअभियंता व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, अमरावती यांचेकडे लेखी मागणी केली असणे, त्यानंतर जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती यांनी दि. २५/०७/२०२५ रोजी अधीक्षक अभियंत्यांना पत्र पाठवून धोकादायक पोल काढणे किंवा त्या ठिकाणी विद्युत वाहिनी बेंच केबल टाकण्याचेसाठी निर्देश दिले असणे, मात्र सदर बाब तातडीची असतानाही अद्याप ते काम पूर्ण झालेले नसणे, हे काम पूर्ण होण्यासाठी शासनाने तात्काळ दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१६५.	श्री. नारायण (आबा) गोविंदराव पाटील वि. स. स.	"करमाळा (जि. सोलापूर) मतदारसंघांमध्ये उजनी धरण, सीना कोळगाव प्रकल्प, सीना माढा उपसा सिंचन योजना, भीमा सिना बोगद्यास मोठ्या प्रमाणात पाण्याची उपलब्धता असणे, मतदार संघातील लोकांची उपजीविका मुख्यत: शेतीवर अवलंबून असणे, विद्युत पंपाचा वापर करून बागायती शेती करण्यात येणे, तथापि आजमितीस तालुक्यातील बहुतांश विद्युत वितरण रोहित्र हे अतिभारीत झाल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य दाबाचा अखंडीत वीज पुरवठा होण्यास अडचणी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		येणे, त्याठिकाणी नवीन अतिरिक्त विद्युत वितरण रोहित्र उभारणी करणे अत्यंत गरजेचे असणे, तथापि कृषी पंपाकरिता पायाभूत सुविधा उभारणीची कोणतीही योजना महावितरणकडे नसणे, ग्राहक स्वखर्चाने ते करण्यास तयार असताना सुद्धा DDF योजना मागील दोन वर्षापासून बंद करण्यात आलेली असणे, त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण होणे, शेतीसाठी मुबलक पाणी असतानाही शेतीला पाणी देता येत नसणे, अतिभारीत विद्युत वितरण रोहित्रांचे ठिकाणी नवीन अतिरिक्त विद्युत रोहीत्र स्वखर्चाने DDF योजनेअंतर्गत उभारणी करण्याची परवानगी दिल्यास शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसून कृषी पंप धारकांना मोठी मदत मिळणार असणे, त्यामुळे शासनाने करमाळा (जि. सोलापूर) मतदार संघातील शेतकऱ्यांना अतिभारीत विद्युत वितरण रोहित्रांच्या ठिकाणी नवीन अतिरिक्त विद्युत रोहीत्र स्वखर्चाने DDF योजनेअंतर्गत उभारणी करण्याची परवानगी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
१६६.	श्री. राजु तोडसाम वि .स .स.	“श्री.रामकुमार मिश्रा (टेक्नोकेअर कंपनीचे प्रोप्रा.) यांनी माहे, डिसेंबर २०१९ पासून एम.एस.ई.डी.सी.एल. चे सबस्टेशन मेंटेनन्सची कंत्राटे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कोट्यवधी रुपयांची कामे केली असणे, या अंतर्गत इलेक्ट्रिक उपकरणे बदलून नवीन लावणे, बॅटरी चार्जर, बॅटरी सेट बदलून नवीन लावणे, सुधारणा करणे इत्यादी कामांचा समावेश असणे, परंतु श्री.रामकुमार मिश्रा यांनी बसविलेली उपकरणे नवीन नसून जुनी उपकरणे दुरुस्त करून अत्यंत निकृष्ट दर्जाची वापरलेली आहेत अशी तक्रार प्राप्त झाली असणे, त्यांच्या संबंधित एजन्सीने नवीन उपकरणांची देयके काढली असणे, कंपनीने बॅटरी सेट व बॅटरी चार्जर, एम.एस.ई.डी.सी.एल.च्या सबस्टेशनला लावले असून ते त्यांनी स्वतः मॅन्युफॅक्चर केले असणे, त्या बॅटरी सेटचे कोणतेही प्रामाणिकतेचे/ गुणवत्तेचे सर्टिफिकेट (आय.एस.आय.) किंवा रजिस्ट्रेशन नसणे, एम.एस.ई.डी.सी.एल.च्या मानकाप्रमाणे ११० ए.एच. च्या बॅटरी ऐवजी ६० ए.एच. च्या बॅटरी कंपनीने लावल्या असणे, यामुळे फॉल्ट आले असणे, श्री.रामकुमार मिश्रा (टेक्नोकेअर कंपनीचे प्रोप्रा.) यांनी केलेल्या कामांची सखोल चौकशी करुन त्याआचा अहवाल ८ दिवसात दि. १०जून,२०२५ पूर्वी या कार्यालयास सादर करावा याचे गोपनीय पत्र मुख्य अभियंता (वितरण) यांनी दि. ३ जून,२०२५ रोजी मा. मुख्यत अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.लि. परिमंडळ, नागपूर, गोंदिया, अकोला,	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अमरावती यांना देणे,परंतु अद्यापपर्यंत अहवाल सादर केलेला नसणे, संबंधित अधिकारी चौकशी करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करित असल्याचे स्पष्ट होणे, त्यामुळे महावितरण कंपनीच्या झालेल्या नुकसानीची भरपाई वसूल करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१६७.	डॉ. नितिन राऊत,श्री .हारुन खान वि .स .स.	“राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहीनी योजना २.० अंतर्गत महावितरणमध्ये सुमारे ९९.५० कोटी रुपयांची बनावट बँक गॅरंटी सादर करून मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे वृत्त माहे फेब्रुवारी २०२६ च्या दरम्यान समोर येणे, संबंधित ओम एस सीजेआर लामाट व्हिया प्रोजेक्ट कंपनी या खासगी कंपनीने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नावाने खोटी बँक गॅरंटी व बनावट ई-मेलद्वारे कागदपत्रे सादर करून सौर प्रकल्पाचे कंत्राट व वीज खरेदी करार मिळविणे, या प्रकरणात काही अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही शंका व्यक्त होत असून, पडताळणी प्रक्रियेत गंभीर त्रुटी झाल्याचे दिसून येणे, या घोटाळ्यामुळे शासन व महावितरणचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, सौर ऊर्जा योजनांवरील विश्वास डळमळीत झाला असणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि भविष्यात अशा प्रकारचे प्रकार टाळण्यासाठी पारदर्शक व कडक पडताळणी यंत्रणा लागू करण्याची आवश्यकता, याबाबत राज्य शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."	
१६८.	श्री. चंद्रकांत सोनवणे वि .स .स.	"जळगांव जिल्ह्यातील चोपडा मतदार संघ हा आदिवासी बहूल येथील दुर्गम, अतिदुर्गम भागातील १४ गावे व २५ पाड्यांना सुरळीत व नियमित वीज पुरवठा करता यावा याकरीता मौजे कर्जाने, ता.चोपडा येथे दि.१७ मार्च, २०१२ रोजी ३३ के.व्ही. उपकेंद्र मंजूर करण्यात येणे, सदर उपकेंद्राचे बांधकाम २०१३ मध्ये पूर्ण होणे, तथापि अद्याप विद्युत वाहिन्यांचे काम अपूर्णावस्थे असणे, उपकेंद्राच्या विद्युत तारा या वन विभागाच्या हद्दीतून जात असल्यामुळे वन विभागाची परवानगी गरजेचे असणे, परंतु वन विभागाने एन.पी.व्ही.ची रक्कम भरणा न केल्यामुळे विद्युत तारा टाकण्यास परवानगी नाकारणे, एन.पी.व्ही.पोटी१५.४६ कोटी रुपये वने विभागाला देणे प्रलंबित असणे, गेल्या १३ वर्षापासून सदर प्रकल्पाचे काम अर्धवट अवस्थेत असल्याने आदिवासी बांधवांना विजेपासून वंचित रहावे लागणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असंतोष, मुख्य अभियंता, महावितरण, प्रतापगड यांनी एन.पी.व्ही.ची रक्कम देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठीचा प्रस्ताव सह सचिव, उर्जा विभाग यांचेकडे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये सादर केलेला असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून गेल्या १० वर्षापासून सदर प्रकरणी पाठपुरावा करण्यात येणे, शासनाने सदर प्रकरणी तातडीने कार्यवाही करुन उक्त प्रस्तावास मंजूरी देऊन कर्जाने, ता.चोपडा येथील ३३के.व्ही.उपकेंद्र त्वरीत कार्यान्वीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.”	
१६९.	डॉ. अतुलबाबा भोसले वि .स . स.	“राज्यातील गावांमधील गावठाणांमध्ये पिठाच्या गिरण्या चालविणे, पाणीपुरवठा पंप चालविणे अशा स्वरुपाच्या विविध मूलभूत कारणांसाठी थ्री फेज विद्युत पुरवठ्याची चोवीस तास आवश्यकता असणे, ही गरज ओळखून शासनाने त्यानुसार गावठाणसाठी चोवीस तास विद्युत पुरवठ्याचे धोरण निश्चित करणे, त्यासाठी महावितरणने निविदा काढून मे. जॅक्सन लि. या कंपनीला एप्रिल २०२३ मध्ये काम देणे, परंतु जानेवारी २०२६ अखेर कोणतेही काम पूर्ण झालेले नसणे, सदर कामाची मूळ मुदत २७ महिने एवढी असणे, मूळ मुदत जुलै २०२५ मध्ये संपणे, ठेकेदारास महावितरणकडून पुढील ६ महिने एवढी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मुदतवाढ देण्यात येणे, वाढीव मुदत देखील जानेवारी २०२६ मध्ये संपणे, एवढ्या काळात ठेकेदार कंपनीकडून २०% देखील काम पूर्ण न होणे, कार्यान्वित केलेल्या कामांची संख्या शून्य एवढी असणे, जनतेमध्ये याबाबत मोठ्या प्रमाणावर पसरलेली नाराजी, नजिकच्या भविष्यकाळात ठेकेदाराकडून काम पूर्ण होण्याची शक्यता वाटत नसणे, त्यास आणखी मुदतवाढ देण्याबाबत शासनाने पुनर्विचार करण्याची गरज, याबाबत दोषी कंपनीवर शासनाने करावयाची कारवाई, तसेच गावठाणामधील विद्युत पुरवठा चोवीस तास करण्यासाठी केलेली अथवा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१७०.	श्री. धर्मरावबाबा आत्राम वि .स .स.	"महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनीअंतर्गत येत असलेल्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील तीन निविदामध्ये २७.२९ कोटींचा घोटाळा झालेले असणे, टिन शेड बांधकामाच्या निविदेत मुख्य अभियंता राठोड यानी नियमात बदल करून कन्वेयर बेल्ट स्ट्रक्चर बांधकामाचा अनुभव ही अट अनावश्यकरीत्या जोडल्यामुळे मर्जीतील ठराविक ठेकेदाराला पात्रता मिळाणे, तर पात्र ठेकेदारांना जाणीवपूर्वक अपात्र ठरवण्यात येणे, आरएफएक्स क्र ३०००० ६२८७४ अंतर्गत सुमारे ७.८२ कोटी, आरएफएक्स क्र ३०००० ६२८०७ अंतर्गत सुमारे १८	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कोटी व आरएफएक्स क्र ३०००० ६२९८७ अंतर्गत सुमारे १.४७ कोटी कामामध्ये अनियमितता झालेल्या असणे, त्यामुळे यामागणीसह मुख्य अभियंता विजय राठोड यांच्या कार्यकाळातील सर्व कामांची व निविदा प्रक्रियाची चौकशी करण्यात यावी तसेच त्यांच्या नातेवाईकांची टेक्निकल असिस्टंट म्हणून झालेल्या नियुक्तीची चौकशी करण्यात यावी, काही कंत्रादाराच्या सोयीसाठी डि.पी.आर. प्रस्ताव व क्वालिफाइलिंग रिकवायरामेंट निकष मनमानी पद्धतीने ठरवले जात असल्यामुळे या गंभीर प्रकरणाची कंत्राटदार संघटनेने तक्रार करुन साखळी उपोषण सुरु करणे, तरी सुध्या अध्यापही कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांत पसरत असलेला तीव्र असंतोष, त्यामुळे या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितांवर कार्यवाही होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
१७१.	श्री. मुरजी पटेल, श्री. अर्जून खोतकर, श्री. अमोल पाटील, श्री. सचिन कल्याणशेट्टी, श्री. राजेश बकाने, श्रीमती नमिता मुंदडा,	“विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन आणि विजनिर्मीती मधील पर्यावरणाची हानी टाळून आर्थिक विकास अबाधित राहण्यासाठी तसेच शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी मा.पंतप्रधान यांनी पीएम सुर्यघर मोफत विज योजना, रुप टॉप सौर उर्जा सोलार योजना अंमलात आणणे, राज्यात मा. मुख्यमंत्री यांनीही सौर उर्जेच्या विविध योजना अंमलात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	ॲड. राहूल कुल, वि. स .स.	आणल्या असणे, राज्यातील ग्रामीण भागातील जनता उपजिवीकेच्या साधनांसाठी शहराकडे वळत असणे, उपजिवीकेच्या साधनांसाठी मुंबईमध्ये आलेले नागरीक हे गेली ४० ते ५० वर्षापासून झोपडपट्टीमधील झोपड्यांमध्ये वास्तव्य करीत असल्याने झोपडपट्टीमुक्त मुंबई करण्यासाठी शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधलेल्या इमारतीमध्ये झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे, परंतु त्यांची आर्थिक परिस्थीती नसल्यामुळे इमारतीची देखभाल व विजबिल अदा करणे शक्य नसणे, शहरी भागातील लोकप्रतिनिधींना त्यांच्या निधीतून सौर उर्जेची कामे करण्यासंदर्भात दिनांक २२ जून, २०२२ ते ४ मार्च, २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये काही जाचक अटी असल्यामुळे गृहनिर्माण संस्थेच्या किंबहूना एसआरए अंतर्गत असलेल्या गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर सौर उर्जा संच बसविणे कठीण झालेले असणे, वाढती लोकसंख्या व वाढती विजेची मागणी लक्षात घेऊन शहरी भागातील गृहनिर्माण संस्थेस सौर उर्जा उपलब्ध करुन देण्यासाठी योजना निर्माण करण्याची तसेच उक्त शासन निर्णयातील अटी शिथील करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१७२.	श्री. शिवाजी पाटील वि .स .स.	"चंदगड तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहता सध्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे सध्या कार्यरत असलेले उपविभाग कार्यालय हे कोवाड, कुदनूर, शिनोळी, तुडये, कोलीक, म्हाळुंगे, राजगोळी, हाजगोळी या भागातील ग्राहकांच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीची असणे, सदरहू कार्यालयाचे कार्यक्षेत्र अंदाजे १२५ ते १५० कि.मी भागात विस्तृतपणे पसरलेले असल्याने ग्राहकांना अडचणीचे व खर्चिक होत असल्याने चंदगड उपविभाग कार्यालयाचे विभाजन करुन नवीन हलकर्णी उपविभाग कार्यालयाची निर्मिती करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून नवीन हलकर्णी उपविभाग कार्यालयाची निर्मिती करणेबाबत करावयाची कार्यवाही."	कित्ता
१७३.	श्री. किशोर पाटील वि .स .स.	"महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाच्या विद्युत महामंडळाच्या संगणकीय प्रणालीवर विद्युत जोडणी विकल्प रद्द केला असून सौर ऊर्जा जोडणी असा विकल्प असणे, यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपंपाकरिता वीज कनेक्शन नसल्याने त्यांनी पिके सुकून वाया जावून आर्थिक नुकसान होणे, ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून वीज वाहिनी तारा गेल्या आहेत अशा शेतकऱ्यांना सौर ऊर्जा जोडणी मिळत नसणे, तसेच धरणाच्या काठावरुन शेतीला पाणी घ्यावयाचे असल्यास तेथे सौर ऊर्जाची जोडणी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मिळत नसणे, अशा शेतकरी बांधवांना विद्युत जोडणी देणे गरजेचे असणे, त्याचबरोबर राज्यातील शेतकऱ्यांना विद्युत जोडणी व सौर ऊर्जा जोडणी हवी असल्यास त्यांना विद्युत वा सौर ऊर्जा जोडणी तातडीने देण्याची आवश्यकता , शासनाने विद्युत महामंडळाच्या संगणकीय प्रणालीवर विद्युत जोडणी व सौर ऊर्जा जोडणी असे दोन्ही विकल्प उपलब्ध करुन देण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."	
१७४.	ॲड. राहूल कुल, श्री . सिध्दार्थ खरात वि .स .स.	"महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमध्ये (महावितरण) सन २००५-०६ पासून हजारो कंत्राटी कर्मचारी अत्यंत तुटपुंज्या वेतनावर आणि जीवावर उदार होऊन अखंडपणे सेवा बजावत असणे, नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणेच तांत्रिक आणि कष्टाची कामे करूनही या कर्मचाऱ्यांना अद्याप uबेकायदेशीर कंत्राटी कर्मचारी म्हणून संबोधले जात असणे, ही अत्यंत खेदजनक बाब असणे, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार या कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन, भत्ते आणि इतर सोयी-सुविधांपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवण्यात आले असणे, विशेष म्हणजे, २०१२ मध्ये या अनुभवी कर्मचाऱ्यांना सेवेत	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सामावून घेण्याऐवजी किंवा त्यांना न्याय देण्याऐवजी नवीन तांत्रिक कर्मचारी भरती करण्यात आली असणे, ज्यामुळे जुन्या कर्मचाऱ्यांवर मोठा अन्याय झाला असणे, या अन्यायाविरुद्ध माननीय ठाणे औद्योगिक न्यायालयाने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल देऊनही, महावितरण प्रशासनाकडून न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला असणे, अद्यापही या कर्मचाऱ्यांना ना वेतन वाढ मिळाली आहे, ना सेवेचे संरक्षण. या गंभीर बाबीमुळे हजारो कष्टकरी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबात तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी करावयाची उपाययोजना."	
१७५.	श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), ॲड. राहूल कुल वि. स. स.	"केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूर्य घर योजना अंतर्गत "हर घर सोलार" ही महत्त्वाकांक्षी योजना राज्यात राबविण्यात येत असणे, घरांच्या छतांवर सौरऊर्जा प्रकल्प उभारून वीज निर्मिती वाढविणे, नागरिकांचा वीज खर्च कमी करणे तसेच स्वच्छ व अक्षय ऊर्जेला प्रोत्साहन देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश असणे, मात्र प्रत्यक्षात या योजनेचा लाभ घेताना अनेक लाभार्थ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी समोर येत असणे, विशेषतः ज्या ग्राहकांकडे वीज	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बिलाची काही रक्कम प्रलंबित असलेल्या ग्राहकांना या योजनेचा लाभ घेता येत नसणे, लाभ मिळण्यापूर्वी संपूर्ण थकबाकी भरावी लागत असणे, या अटीमुळे अनेक मध्यमवर्गीय व ग्रामीण भागातील ग्राहकांना आर्थिक अडचणींमुळे या योजनेत सहभागी होता येत नसणे, परिणामी या योजनेबाबत अपेक्षित उत्साह नागरिकांमध्ये दिसून येत नसणे, सौर पॅनल बसवल्यानंतर निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सौरऊर्जेमुळे संबंधित ग्राहकांच्या वीज खात्यात क्रेडिट जमा होत असणे, त्यामुळे प्रलंबित वीज बिलाची रक्कम ही भविष्यात निर्माण होणाऱ्या सौरऊर्जेच्या युनिटमधून टप्याटप्याने वजा करण्याची किंवा थकबाकीची रक्कम ग्राहकांना सुलभ हप्त्यांमध्ये भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असणे, या पार्श्वभूमीवर "हर घर सोलार" योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी व ग्राहकांना सोयीस्कर अटी लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१७६.	श्री. रामदास मसराम,श्री .संजय मेश्राम वि .स .स.	"गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी मतदारसंघ हा आदिवासी व घनजंगलांनी व्यापलेला भाग असून येथे वाघ, हत्ती, बिबट्या, अस्वल,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रानडुक्कर यांसारख्या घातक वन्यप्राण्यांचा सतत वावर असणे, सध्या दिवसा होणारे लोड शेडिंग आणि रात्री वीजपुरवठा यामुळे शेतकरी रात्री शेतीसाठी शेतावर जावे लागत असणे, मात्र रात्री वन्यप्राणी अधिक आक्रमक असतात, ज्यामुळे नागरिकांच्या जीवित सुरक्षेवर गंभीर धोका निर्माण होत असणे, वास्तविक काही ठिकाणी नागरिकांवर हल्ल्याचे प्रकरणे नोंदली गेली असणे, ज्यामुळे भीती, असंतोष आणि मानसिक त्रास वाढला असणे, आदिवासी व जंगल परिसरातील नागरिकांच्या जीवनाचे रक्षण हा अत्यंत गंभीर प्रश्न असणे, शासनाने तातडीने या समस्येवर लक्ष देऊन दिवसा होणारे लोड शेडिंग पूर्णतः बंद करावे व अखंड वीजपुरवठा सुनिश्चित करावा, जेणेकरून नागरिक सुरक्षितपणे शेती व दैनंदिन कामे करू शकतील व भीतीमुक्त जीवन जगू शकतील, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१७७.	श्री. नारायण कुचे वि .स .स.	“जालना जिल्ह्यातील तालुका बदनापूर व अंबड येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक गावांमध्ये सोलर प्रकल्प उभारण्यास शासनाने मंजुरी दिलेली कामे कंत्राटदार कंपन्यांमार्फत सुरू असणे तसेच प्रत्यक्ष पाहणी आणि स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांकडून प्राप्त	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		झालेल्या तक्रारीनुसार अनेक ठिकाणी या प्रकल्पांची कामे अत्यंत संथगतीने सुरू असून काही ठिकाणी काम अपूर्ण असणे, या कामात अनियमिता असून मोठ्या प्रमाणात आर्थिक भ्रष्टाचार निदर्शनास येत असणे. काही गावातील प्रकल्पाच्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याच्या तक्रारीही नागरिकांनी दिलेल्या असणे, परिणामी या शासनाचा योजनेचा मुख्य उद्देश असलेला शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा उपलब्ध करून देण्याचा निर्णय यास हरताळ फासण्याचे काम ठेकेदार करीत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीच्या कामांसाठी आवश्यक असलेली वीज उपलब्ध होत नसल्याने मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होत असून शेतकरी बांधवात तीव्र नाराजी व्यक्त होत असणे, अनेक ठिकाणी प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून देऊनही कामे वेळेत पूर्ण करण्यात आलेली नसणे, तसेच प्रशासनाकडे सदर योजनेतील गाववाइज सविस्तर माहिती उपलब्ध नसणे, तसेच संबंधित प्रकल्पांची क्षमता, एकूण प्रकल्प किंमत व कामाची सद्यस्थिती यांची कोणतीही माहिती संबंधित यंत्रणेकडे नसणे, जबाबदार अधिकारी यांना तातडीने निलंबित करावे तसेच संबंधित ठेकेदार यांच्यावर कारवाई, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१७८.	श्री. गोपिचंद पडळकर वि .स .स.	"राज्यातील वातानुकूलन (AC) उत्पादक व संबंधित सेवा पुरवठादारांकडून सादर करण्यात येणाऱ्या देयकांवर वस्तू व सेवा कर (GST) दर ठरविताना HSN/SAC कोडनुसार कर आकारणी करण्यात येत असणे, काही प्रकरणांमध्ये संबंधित HSN/SAC कोडनुसार आकारलेला कर दर विभागामार्फत ग्राह्य धरला जात नसल्याच्या तक्रारी शासनाच्या निदर्शनास आल्या असणे, तसेच अशा प्रकरणांमध्ये उच्च दराने कर आकारणी करण्याबाबत आग्रह धरुन संबंधित उद्योजकांना पूर्वलक्षी (retrospective) स्वरूपात २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून कर भरण्याच्या नोटिसा देण्यात आल्या असणे, सदर नोटिसांमुळे संबंधित उद्योजकांवर मोठ्या प्रमाणात आर्थिक दायित्व निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली असणे, HSN/SAC कोडनुसार कर निर्धारणाबाबत एकसमान व स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असणे, सदर प्रस्तावाबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता
१७९.	श्री. दौलत दरोडा, श्री . शांताराम मोरे वि .स .स.	"पालघर जिल्हा नियोजन समितीला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये येथील बिगर आदिवासी व आदिवासींच्या सर्वांगीण	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विकासाकरीता सर्वसाधारण जिल्हा योजना ४०० कोटी व जिल्हा वार्षिक आदिवासी घटक योजना ४०० कोटी एकूण ८०० कोटी रुपये मंजूर करण्यात येणे, या योजनेमधून त्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विविध विभागातील कामे मंजूर करण्यासाठी जिल्हाधिकारी पालघर, प्रकल्प अधिकारी जव्हार/डहाणू यांना सुपूर्द करण्याबाबत सांगण्यात येणे, तथापि मागील सहा महिन्यांपासून शासनाच्या जिल्हास्तर विविध यंत्रणाकडून लेखी प्रत्रान्वये प्रस्ताव, जिल्हा नियोजन समिती आदिवासी/बिगर आदिवासी योजनेतून अंतिम मंजुरीकरीता सादर करुन देखील मंजूरी न मिळणेबाबतचा प्रकार तसेच याबाबत मा.लोकप्रतिनिधीनी अनेकवेळा पाठपुरावा करुन सुध्दा निधी मंजूर असूनही प्रशासकीय मान्यता न देण्याचा प्रकार अधिकारी आपल्या मर्जीतील विकासकाना राजरोजपणे कोणत्याही लोकप्रतिनिधीची शिफारस नसतांना आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन कंत्राटदाराशी हातमिळवणी करुन राजरोजपणे देत असलेल्या नियमबाह्य मंजुऱ्या, आमदार स्थानिक विकास निधी जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि. २०२५/११/१२रोजी निधी खर्चाबाबत पालघर जिल्हाधिकारी यांना हमीपत्र देऊनही आजतागायत पाच महिने उलटूनही देखील प्रशासकीय	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मान्यता देण्यात न येणे, याबाबत शासनाने चौकशी करण्याची नितांत आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका	
१८०.	श्री. मनोज कायंदे वि .स .स.	"नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग प्रकल्पाच्या अनुषंगाने सन २०१४ मध्ये एम.एस.आर.डी.सी .च्या माध्यमातून सुमारे ७०० किलोमीटर अंतरात १४स्मार्ट सिटी उभारण्याची घोषणा करण्यात येणे, यामध्ये प्रायोगिक तत्त्वावर पहिला प्रकल्प बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे उभारण्याचे नियोजित असणे, मात्र या प्रकल्पासाठी शासनस्तरावर विशेष उपसमिती गठीत करण्यात आली असतानाही आजतागायत या समितीची एकही बैठक न झाल्यामुळे जानेवारी माहे २०२६ पर्यंत सिंदखेड राजा येथे कोणतीही प्रत्यक्ष विकासकामे सुरू न होणे, समृद्धी महामार्गाचे काम पूर्ण होऊन तो वाहतुकीसाठी खुला झाला असतानाही त्यालगतच्या या महत्त्वाकांक्षी स्मार्ट सिटी प्रकल्पाला गती न मिळाल्याने प्रकल्पासाठी जमिनी दिलेल्या स्थानिक नागरिक व शेतकरी बांधवांना अद्याप मोबदला मिळालेला नसणे, तसेच तांत्रिक अडचणींमुळे बँकांकडून कर्ज नाकारले जात असल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होऊन माहे डिसेंबर २०२५ मध्ये त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिला असणे, प्रशासकीय मंजुरी, निधी वितरण व नियोजनातील	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		या अक्षम्य विलंबामुळे सिंदखेड राजा तालुक्याच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होत असणे, तरी या विलंबास कारणीभूत असलेल्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून भूसंपादनाचा मोबदला तात्काळ वितरित करणे आणि स्मार्ट सिटीच्या कामांसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
१८१.	श्री. अतुल भातखळकर वि .स .स.	“मुंबई मालाड पूर्व येथील जय हनुमान पाडा येथील पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या रहिवाशांना जमीन मालक व विकासक यांनी अंधारात ठेवून करारनामे केले असणे, त्यामुळे सुमारे ५५ रहिवाशांची घरे अपात्र झाल्याने त्यांना त्यांच्या हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागत असणे, त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना देण्याची गरज असणे, तसेच सदर रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत योग्य ते लाभ देण्याकरिता ठोस उपाययोजना करण्याची गरज असणे, त्यामुळे सदर ५५ रहिवाशांना त्यांचे हक्काचे घर देण्याकरिता पंतप्रधान आवास योजने अंतर्गत त्यांना पात्र करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१८२.	श्री. अतुल भातखळकर वि .स .स.	"हनुमान नगर, कांदिवली पूर्व येथील काही झोपडपट्टी पुनर्वसन संस्थांचा पुनर्विकास करण्यासाठी महाप्रीतत या सरकारी आस्थापनाकडे दिल्या असणे, परंतु सदर नियुक्ती होऊन सुमारे दीड वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप प्रत्यक्ष कामाला किंवा रहिवाशांच्या पुनर्वसनाला कोणतीही सुरुवात झालेली नसणे, त्यामध्ये या सर्व झोपडपट्टी पुनर्वसन संस्थांनी महाप्रीत मधून बाहेर पाडण्याकरीता शासनाकडे निवेदन दिले असणे, परंतु अद्यापावेतो त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने प्रकल्प रखडले असणे, त्यामुळे या संस्थांना महाप्रीत मधून मुक्त करून प्रकल्प जलद गतीने मार्गी लावण्यासाठी ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता
१८३.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मुंबई मालाड (पू) प्रभाग क्र. ४१ मधील न्यु दिंडोशी म्हाडा इमारत २२-२३ मधील राखीव भूखंडावर जलतरण तलाव,व्यायामशाळा व जेष्ठाकरिता विरंगुळा केंद्र आदी विकासकामे करणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्यासाठी, शासनाने म्हाडा प्राधिकरणाला दि.२१.०२.२०२५ रोजी पालकमंत्री, मुंबई उपनगर जिल्हा यांचे बैठकीत निर्देश देण्यात येऊनही, अद्याप म्हाडातर्फे यावर कोणतीच कार्यवाही न करण्यात येणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		महापालिका, उपायुक्त (उद्याने) विभाग आणि झोपडपट्टी सुधार मंडळाकडे, यांचेकडून अंदाजपत्रकासाठी मागणी किंवा प्रस्ताव सादर करण्याबाबत यावर म्हाडाने कोणतीच कार्यवाही न करणे, सदरहू प्रकरणी उपरोक्त विकासकाम विना विलंब करण्यासाठी प्रस्ताव तयार करुन, (उद्याने) विभाग आणि मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाची मान्यता घेऊन, यावर शासनाकडून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
१८४.	श्री. अशोक पाटील वि .स .स.	"भांडुप पश्चिम येथे मार्शल एस. आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियो) या प्रकल्पामध्ये २० झोपडीधारकांना बेकायदेशीर रित्या पात्र केल्याबाबत सन २००० पूर्वीच्या खोट्या सर्वे पावत्या दाखवून भांडुप महावितरण चे कार्यकारी अभियंता श्री.संजय बोरकर तसेच इतर यांनी आधार कार्ड वरील असलेला बाहेरील पत्ता मतदार यादीत नाव नसणे तसेच शिधापत्रिकेमध्ये देखील नाव नसतानाही सन २००० पूर्वीचे वीज मीटर बसून केलेले नियमबाह्य काम २० रहिवाशांना लालसेपोटी पात्र करण्यासाठी ५१ झोपडीधारकांच्या एस.आर.ए. मध्ये ही २० खोटी प्रकरणे दाखवून अशा एकूण ७१ झोपड्या दाखवून तीन पट	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		एफ.एस.आय .अधिकचा मिळवला असणे, शासनाची सुमारे ५० कोटीची फसवणूक अधिकाऱ्यांना हाताशी धरून या विकासकाने केलेली असणे, एम.आर.टी.पी. ऍक्ट १९६६ अंतर्गत नोटीस येऊनही या विकासकाने आदेशास न जुमानता सदरील सदनिका वाटप केल्या या प्रकरणात विधानसभा सदस्य यांनी वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य ती कार्यवाही केलेली नाही तरी या गंभीर प्रकरणात तातडीने उचित कार्यवाही करावी अशी अपेक्षा करतो पुनर्विकासाच्या वादातुन रहिवाशावर विकासकाचा हल्ला दिनांक २९ जानेवारी, २०२६ रोजी भांडुपच्या उषानगर परिसरातील 'बादल' या इमारतीचा पुर्नविकास रखडल्याचा तक्रारीने या विकासकाने रहीवाशी रमेश मोहन यांना लोखंडी रॉडने मारहाण केली रहीवाशी गंभीर जखमी झाले तसेच इमारतीमधील रहीवासी आजही भयभीत असणे याबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१८५.	श्री. मंगेश कुडाळकर वि .स .स.	"नेहरू नगर, टिळक नगर, सहकार नगर व नवीन टिळक नगर ह्या म्हाडा वसाहतींच्या ५० वर्ष जुन्या अशा मलनिःसारण वाहिन्याचे दुरवस्था असणे, याबाबत सन २०१४ पासून म्हाडा प्राधिकरणाशी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वारंवार पाठपुरावा लोकप्रतिनिधी ह्या नात्याने विधानसभा सदस्यकडून होणे, महानगरपालिका व म्हाडा प्रशासन यांच्यात समन्वय साधून सन २०२३ मध्ये प्रत्यक्ष कामास सुरुवात महानगरपालिकाकडून होणे, पहिला टप्पा पूर्ण होणे आणि दुसऱ्या टप्पा कामाची निविदा काढताना महानगरपालिका आयुक्त यांनी आर्थिक परिस्थिती लक्ष्यात घेता सदर खर्च म्हाडा प्रशासनाकडून घेणे आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांना निर्देश देणे, दुसरा टप्पा सुरु होणे आवश्यक असल्याने सदरचे काम म्हाडा आणि महानगरपालिका यांचा समन्वय होणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
१८६.	श्री. सुनिल कांबळे वि .स .स.	"पुणे, लोहियानगर परिसरातील सर्वे नं. ५३९ मधील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार, बनावट लाभार्थी यादी, अनधिकृत बांधकामे व मालक तसेच शासनाची गंभीर फसवणूक झाली असल्याचे निदर्शनास आले असणे, सन १९६३ पासून कायदेशीररित्या सुरू असलेल्या सॉ मिल (लाकूड वखार) असलेल्या ओपन प्लॉटवर अस्तित्वात नसलेल्या ३०० बनावट झोपड्यांचा दाखला देऊन SRA प्रकल्प मंजूर केला गेला; स्थळ पाहणी, पंचनामा वा सरकारी मोजणी न करता बांधकाम परवानग्या देण्यात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आल्या. या प्रकल्पातील ८०० झोपड्यांचे निष्कासन, चार इमारतींचे अनधिकृत पूर्ण बांधकाम, STP न बांधता मिळवलेला ओ.सी, तसेच पात्र लाभार्थ्यांना घरे न देणे ही अत्यंत गंभीर बाब निदर्शनास आली असणे, प्लॉट क्र. १६१ व १६२ मध्ये मूळ लाभार्थी यांना आजपर्यंत घरे मिळालेली नाहीत, बनावट प्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आली असून महानगरपालिका प्रशासनाशी संगनमत करत TDR गैरवापर झाल्याचीही तक्रारी आहेत. तसेच कोथरुड CTS ६६० या प्रकल्पात ३७ मुळ झोपडीधारक असताना त्याव्यतिरिक्त १२३ बनावट झोपडीधारक दाखवून साधारण १०० कोटींची फसवणूक झाल्याचे दिसून येत असणे, सदर प्रकरणांची तात्काळ सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि यामध्ये मूळ पात्र लाभार्थी यांचे हित जोपसावे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१८७.	श्री. सुनिल प्रभू वि. स .स.	"मुंबईतील जोगेश्वरी पुर्व मौजे-मजास न.भू.क्र.४५ व ४८ वर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत मे.ग्यान एस.पी.डेव्हलपर्सचे, ग्यान शुक्ला व निखील शुक्ला या विकासकाने,मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार करुन, भ्रष्ट्राचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, महापालिकेच्या आरक्षित जमीनीवर कोणतेही आरक्षण नसल्याची	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		खोटी माहिती दिल्याप्रकरणी महापालिकेने मा. न्यायालयात याचिका दाखल करण्यात येत असतांना, तत्कालिन महापालिका आयुक्त, यांनी फाईलमध्ये लिहिलेल्या शेऱ्यामध्ये खाडाखोड केल्याप्रकरणी, आझाद मैदान पोलीस ठाण्यात २०१८ मध्ये गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर घटनेतील महापालिकेचे कर्मचारी व साक्षीदार सुभाष वाल्मिकी यांचा अवघ्या पाच दिवसात घात-पात करुन, कागदोपत्री अपघाती मृत्यु दाखविण्यात येणे, सदर प्रकरणांची अद्याप चौकशी न होणे, योजनेत पोहोच रस्ता नसतांना देखील एसआरए प्राधिकरणाने योजनेला मंजूरी देणे, महापालिकेच्या मंजूर आराखड्यानुसार योजनेवर १८.३ मीटर रुंदीचे २ रस्ते विकसीत न करता शेजारील खाजगी जमीनीतून रस्ता देण्यात येऊन, दोन रस्त्याच्या जमीनीचा लाभ विकासकाला देण्यात येणे, विकासकाने अग्निशमन विभागाची परवानगी घेण्यासाठी प्रत्यक्षात नकाशामध्ये ६ मीटर रुंदीचा रस्ता दाखवून, कागदोपत्री ९ मीटर रुंदीचा रस्ता दाखवून फसवणूक करणे, तसेच विकासकाने प्राधिकरणाच्या पाच वर्षानंतर घरे विक्रीच्या अटीचे उल्लंघन करुन, अनेक मुळ झोपडीधारंकाकडून झोपड्या खरेदी करुन, अर्थिक घोटाळा करण्यात येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
१८८.	श्री. सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे वि. स. स.	“नाशिक येथील सर्वे नं.७५९/ए/२,७५९/ए/३ व ७५९/ए/४ यांचे एकूण क्षेत्र १६०००.०० चौ.मीटर या मिळकतीचे मालक व भागिदार यांनी नाशिक महापालिकेकडून दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९ रोजी एम.एन.डी./बी.पी./सी.डी.७३१ अन्वये बांधकाम नकाशा मंजूर करुन घेतलेला असणे, सदर मिळकतीवर नाशिक शहरात सेंट्रल पार्क अपार्टमेंट या नावाने एकूण १० इमारतींचे बांधकाम करण्यात येणे, सदरचा गृहनिर्माण प्रकल्प हा रेरा कायद्यान्वये दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी नोंदणीकृत असणे,सदर प्रकल्पाचा बांधकाम नकाशा मंजूर करतेवेळी तो प्रधानमंत्री आवास योजना अर्बनच्या नियमानुसार नाशिक महानगरपालिकेकडून नोंदणीकृत करण्यात आलेला नसणे,प्रधानमंत्री आवास योजना अर्बन योजनेंतर्गत तयार करण्यात आलेली घरे ई.डब्ल्यू.एस./एल.आय.जी. (ईकोनॉमिकल व्हिकर) ई.डब्ल्य.एस. सेक्शन व अल्प उत्पन्न गटातील नागरीकांसाठी माफक दरात घरे मिळावीत यासाठी असणे,सदर गृहनिर्माण प्रकल्पाचा बांधकाम नकाशा मंजूर करतेवेळी या इमारती प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत येत असल्याची बाब लपवून ठेवण्यात येणे,कागदपत्रांची फेरफार करण्यात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		येणे, गोरगरीबांना माफक दरात घरे विकण्याची परवानगी असतांना आर्थिकदृष्ट्या श्रीमंत लोकांना प्रकल्पातील घरे विकल्याची बाब निदर्शनास येणे,सदरच्या प्रकल्पामधील एफ विंग मधील प्लॉट नं.१३०१ ही मिळकत इन्होवा रबर्स प्रा.लि. कंपनीला दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी (दस्त क्र.२७३३/२०२३) विक्री करण्यात आल्याचे निदर्शनास येणे,संबंधित विकासकाविरुध्द गंगापूर,जि.नाशिक पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी फसवणूकीची तक्रार करण्यात येणे, शासनाने उक्त प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन दोषी विकासकावर कारवाई करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
१८९.	श्री. तुकाराम काते वि .स .स.	"दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी मुंबईतील चेंबूर परिसरातील सुभाषनगर, इमारत क्रमांक ३६ येथे आदित्यराज बिल्डर मार्फत सुरू असलेल्या पुनर्विकास प्रकल्पाच्या ठिकाणी स्लॅब कोसळून भीषण अपघात होणे, सदर दुर्घटनेत दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू होऊन पाच कामगार गंभीर जखमी होणे व त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू असणे, ही घटना कामगार सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर व चिंताजनक असणे, संबंधित विकासकाकडून आवश्यक सुरक्षा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		साधनांची उपलब्धता, तांत्रिक देखरेख व संरचनात्मक तपासणीमध्ये हलगर्जीपणा झाल्याची शक्यता व्यक्त होणे, अशा घटना वारंवार घडत असूनही बांधकाम स्थळांवरील सुरक्षेबाबत प्रभावी अंमलबजावणी होत नसणे, याबाबत उच्चस्तरीय चौकशी आदेशित करून संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करणे, मृतांच्या कुटुंबियांना नुकसानभरपाई व जखमींच्या वैद्यकीय खर्चाची जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
१९०.	श्री. सुनिल प्रभू, श्री .विजय वडेट्टीवार वि .स .स.	“नाशिक शहरात ४ हजार चौ.मी.पेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या अंतिम आराखडा (ले-आऊट) मंजूर करतांना गृहनिर्माण प्रकल्पातील ४९ गृहनिर्माण प्रकल्पामध्ये,अर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटासाठी किमान २० टक्के भूखंड किंवा सदनिका राखीव ठेऊन,म्हाडास हस्तांतरीत न करता परस्पर विक्री करुन,जमीन मालक व विकासकांनी यामध्ये कोट्यावधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे,सदरहू प्रकरणी विकासकांनी दि.०८ नोव्हेंबर,२०१३ यापुर्वी प्रत्यक्षात विभाजन झालेले नसतांना व नियमानुसार मोजणी झाल्याबाबत दुय्यम रजिस्टर मध्ये नोंद	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नसतांनाही,तहसील कार्यालयाकडे बनावट मोजणी नकाशे सादर करुन, प्रकल्प विकासकांनी संगनमताने, सदरहू क्षेत्राचे ४ हजार चौ. मीटरपेक्षा कमी क्षेत्राचे तुकडे करुन व सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेसाठी २० टक्के क्षेत्र उपलब्ध करुन न देता शासन व म्हाडाची दिशाभूल करुन फसवणूक करण्यात येणे,२०१३ या वर्षी शासन निर्णय जारी करुन,१२ वर्ष इतका कालावधी होऊनही,४९ प्रकल्पातील प्रकल्प विकासकांनी, म्हाडाला गृहप्रकल्पातील २० टक्के राखीव घरे न देता, परस्पर विक्री करुन अर्थिक घोटाळा करण्यात येणे, सदरहू प्रकरणाची शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन, संबंधित दोषी विकासक आणि शासकीय अधिकारी यांच्याविरुध्द कठोर कायदेशीर कारवाई करुन, २० टक्के राखीव घराचे क्षेत्रफळ अथवा सदनिका जप्त करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
१९१.	श्री. योगेश सागर वि .स .स.	“मुंबईसह संपुर्ण महाराष्ट्रात राबविल्या जाणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या योजनांमध्ये गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि घोटाळे समोर येत असणे, अनेक प्रकल्पांमध्ये पात्र	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		झोपडपट्टी धारकांना डावलून विकासक आणि काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने बोगस व्यक्तींची नावे लाभार्थी म्हणून घुसवली जात असणे, विकासकांकडून पात्र लाभार्थी यांना दिले जाणारे मासिक घरभाडे वर्षानुवर्षे थकविले जात असणे, विकासक केवळ एफएसआय प्राप्त करण्यासाठी प्रकल्प हाती घेत असणे व प्रकल्प दहा पंधरा वर्ष रखडून सुध्दा पुर्ण न होता काम बंद होत असणे, पंचशीला तसेच एकता प्रकल्पाला काम बंद करण्याची नोटीस प्राप्त झाली असणे, तसेच महाराष्ट्र नगर नाला रुंदीकरण व समर्पण सोसायटींच्या प्रकल्पांमध्ये गुन्हा नोंद झालेली असणे, धारावी येथील शताब्दी नगरात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात शिडीखालची जागा, मंदिर, पानटपरी आणि मीटर केबीनही झोपडी असल्याचे दाखवून संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने दलालांनी त्यावर घरी मिळवली असणे, त्याबाबत धारावी बचाव आंदोलनाच्या नेत्यांमार्फत एस.आर.ए. चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुराव्यानिशी तक्रार दाखल करूनही त्यावर कोणती कारवाई झालेली नसणे, संबंधित दोषी विकासकांवर आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर शासनामार्फत कारवाई होणे, रखडलेले प्रकल्प पुर्ण करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करणे तसेच भविष्यात असे घोटाळे	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रोखण्यासाठी 'बायोमेट्रिक' आणि 'डिजिटल ट्रॅकिंग' सारखी यंत्रणा राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
१९२.	श्री. नानाभाऊ पटोले वि .स .स.	"कांदिवली (पूर्व) येथील सीटीएस क्र.८३७ ते ८४० मधील समतानगर म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पात एसडी.कॉर्पोरेशन विकासकाने म्हाडा अधिकाऱ्यांशी संगनमत करून गंभीर अनियमितता केल्याचे निदर्शनास येणे, म्हाडाच्या प्रॉपर्टीकार्डवर मे.एसडी कॉर्पोरेशनचे नाव अनधिकृतरीत्या चढविण्यात आलेले असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुनर्वसित भाडेकरूंना घरे दिल्याशिवाय विक्री घटकासाठी FSI देऊ नये, असे निर्देश असताना म्हाडाने विकासकास सुमारे ३ लाख चौ.मी. FSI देऊन मा.न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करुन विकासकांशी संगनमत करुन ६००० कोटी रुपयांच्या महसूलाचे आर्थिक नुकसान करणे, म्हाडाकडून NOC न घेता भूखंडावर खासगी बँकेकडून रुपये १००० कोटी कर्ज घेण्यात येणे, पर्यावरण विभागाची NOC मिळण्यापूर्वीच रिहॅब इमारतींच्या बांधकामास परवानगी देऊन पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ चे उल्लंघन झालेले असणे, मध्यम उत्पन्न गटाच्या ६६० व उच्च उत्पन्न गटाच्या २४० अशा एकूण ९०० सदनिकांच्या पुनर्विकासाचे काम अद्यापही सुरु न करता गार्डन, शाळा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		व इतर उपक्रमांसाठी आरक्षित असलेल्या जमिनीवर विकासकाने मनमानीपणे ४० मजली खाजगी विक्रीच्या सरोवा, सिएना, औबबर्ण, ॲस्ट्रॉन, अल्पिन, इपसिलिन या इमारती उभारुन कोट्यवधी रुपयांचा फायदा करुन घेतल्याचे निदर्शनास येणे, या अनियमित व्यवहारांमुळे शासनाचे सुमारे रुपये ६००० कोटींचे आर्थिक नुकसान झाल्याने चौकशी करण्याबाबतची मागणी सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरण विभागाचे माजी राज्य समन्वयक यांनी माहे मार्च, २०२६ मध्ये शासनाकडे तक्रार दाखल केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
१९३.	श्री. संजय उपाध्याय, श्री .पराग शाह वि .स .स.	"मौजे देवनार ता. कुर्ला, जिल्हा मुंबई उपनगर येथील क्लस्टरमध्ये गौतम नगर भाग-४ चे झोपटपट्टीधारक यांचे एकता एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) येथे पुनर्वसन करताना गंभीर अनियमितता व घोटाळा केलेला असणे, सदर संस्थेमध्ये ५८ अपात्र लाभार्थींचा समावेश करून, बनावट कागदपत्रांच्या आधारे त्यांना सदनिकेचा व सोसायटीच्या सदस्यत्वचा लाभ देणे, विकासक व पदाधिकारी यांनी संगनमताने अवैध कामे केल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे होत असणे, त्याचबरोबर बोगस लाभार्थ्यांच्या बनावट	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पावत्यांव्दारे त्यांना अतिरिक्त लाभार्थी दाखवून, विकासकाला अतिरिक्त एफएसआयव्दारे मंजूरीपेक्षा जास्त सदनिका तसेच दुकाने बांधता येतील व त्यांना मोठा आर्थिक लाभ मिळेल यादृष्टीने अनुकूल योजना तयार केलेली असणे, त्यामुळे सदर प्रकरणात सहकारी अधिनियम तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमांचे स्पष्टपणे उल्लंघन करून घोटाळा केलेला असणे, सदर गंभीर प्रकरणात झोपडपट्टी पुनर्वसन कार्यालय, पोलीस प्रशासन, गृहनिर्माण विभाग इत्यांदीकडे वारंवार तक्रारी करूनही आजपर्यंत त्यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसणे, त्यामुळे सदर प्रकरणाची उच्चस्तरिय समितीव्दारे चौकशी करून संबंधित बोगस लाभार्थी, अधिकारी, विकासक व सोसायटीची व्यवस्थापकीय समिती यांच्यावर कारवाई करणे, दोषी व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करणे, स्वतंत्र व निष्पक्ष यंत्रणेमार्फत लाभार्थ्यांबाबत फेरसर्व्हेक्षण करून पात्र लाभार्थ्यांना लाभ देणे, याबाबत शासनाची भुमिका व पुढील उपाययोजना.”	
१९४.	श्री. संजय केळकर, श्री. किसन कथोरे, श्री . प्रशांत ठाकूर वि. स. स.	“ठाणे शहरातील हजारो नागरिकांची आर्थिक आणि मानसिक छळवणूक होत असल्याने अनेक नांगरिकांनी विकासाच्या विरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार करणे, तथापि ठाण्यातील वर्तक नगर मधील	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		इमारत क्र-४८,४९ व ५० येथील इमारतीमधील रहिवासी १४ वर्षांपासून अत्यंत हालाकीच्या अवस्थेत दिवस काढत असून आदित्य एंटरप्राइजेस संजय भालेराव या विकासकाकडुन त्यांची आर्थिक फसवणूक होऊन त्यांना प्रचंड मानसिक जाचाला सामोरे जावे लागणे, नौपाडा येथील जोशी एंटरप्रयाजेस यांचेकडुन देखील शेकडो रहिवाश्यांचे आर्थिक शोषण फसवणूक झाल्याचे माहे जानेवारी २०२६ मध्ये उघड होणे, वेळोवेळी पोलिसात तक्रार करून देखील त्यांच्यावर कारवाई न होणे, ढोकळी येथील तिरूपति ग्रुपचे मेरी गोल्ड इमारतीमधील राहिवाश्यांची फसवणूक केल्याचे उघड होणे, १४ वर्षे प्रकल्प रेंगाळत ठेवून ५० टक्के रक्कम भरून देखील तेथील रहिवाश्यांना अद्याप ही सदनिका दिल्या गेल्या नसणे, तसेच त्रिनिटी टॉवर यांनी देखील सदनिका धारकानी पैसे भरून सुद्धा त्यांना सदनिका दिल्या गेल्या नसून यामध्ये सदनिका धारकांचे मोठे प्रमाणात आर्थिक नुकसान होऊन संबंधित विकासकावर अद्याप कोणतीच दंडात्मक कारवाई झालेली नसणे, त्यामुळे रहिवाश्यांमध्ये तीव्र संताप निर्माण होणे, या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित विकासकावर दंडात्मक कारवाई करण्याचे तीव्र मागणी होणे. याबाबत	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना.”	
१९५.	श्री. मुरजी (काका) पटेल वि. स. स.	“मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन करुन या प्राधिकरणाच्या माध्यमातून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येणे, ही योजना शासनाचा एक महत्वपुर्ण उपक्रम असून झोपडपट्टीत राहणाऱ्या पात्र झोपडीधारकांना मोफत पक्की घरे देण्यात येणे, या योजनेअतंर्गत खाजगी विकासक झोपडपट्टीच्या जागेवर पुनर्विकास करतात, झोपडीधारकांना नविन इमारत बांधून देणे आणि उर्वरित जागेवर विक्री घटकाची इमारत बांधून त्यातील सदनिकांची विक्री करतात, मुंबईमध्ये अनेक इमारती या योजनेअंतर्गत बांधलेल्या असून सदर पुनर्विकास इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेले असून यातील अनेक इमारतीचे बांधकाम ३० वर्षांपुर्वी झालेले असून या इमारती मोडकळीस आणि जिर्ण झालेल्या असणे, या योजनेतील इमारतीच्या पुनर्विकासाचे निश्चित धोरण नसल्यामुळे, अशा अनेक इमारतीचा पुनर्विकास करण्यास अडथळा निर्माण होत असून अनेक इमारती पुनर्विकासापासून वंचित राहणे, अशा जिर्ण आणि मोडकळीस आलेल्या इमारतीमधील रहिवाशी जिव मुठीत घेवून वास्तव्य करीत असणे, इमारतीचा भाग कोसळून कधीही अपघात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		होऊन जिवीत आणि वित्त हानी होण्याची दाट शक्यता असणे, त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधलेल्या जिर्ण आणि मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत शासनाने ठोस धोरण निश्चित करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रया."	
१९६.	श्री. अतुल भातखळकर, श्री. सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, श्री. राजेश विटेकर, श्री. मोहन मते वि. स. स.	"मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट उपक्रमातील सुमारे साडेसहा हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटी आणि रजेचे रोखीकरण यांसह एकूण दीड हजार कोटी रुपयांची देणी मागील तीन वर्षांहून अधिक काळापासून थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती बिकट असून मुंबई महानगर पालिकेकडून मिळणाऱ्या अनुदानावर उपक्रमाचा कारभार चालत असणे, त्यामुळे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची हक्काची देणी मिळवून देण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असणे, त्यामुळे मुंबई महानगरपालिकेला विशेष आर्थिक अनुदान देण्याबाबत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युइटी आणि रजेचे रोखीकरण पूर्णतः अदा करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
१९७.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मुंबई मालाड (पू.) लक्ष्मणनगर,कुरारगाव मालाडगाव (पु.) ते संस्कार कॉलेज या प्रस्तावित १८.३० मीटर विकास नियोजीत रस्त्यातील १७३ बाधितांचे, लगतच्या एसआरए प्रकल्पात पुनर्वसन करणेबाबत, सहाय्यक आयुक्त पी/उत्तर विभाग यांना सदनिका हस्तांतरीत होऊनही, अद्याप त्यांनी बाधीतांचे पुनर्वसन करणेबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास येणे, बाधींताचे पुनर्वसन करुन प्रलंबीत रस्ता रुंदी करणाचे विकासकाम तातडीने पुर्ण करण्याचे आश्वासन देण्यात येऊनही यावर कार्यवाही न होणे, सदरहू प्रकरणी शासन तथा महापालिकेने १७३ प्रकल्प बाधीतांचे एसआरए कडून प्राप्त झालेल्या सदनिका वितरीत व पुनर्वसन करुन, प्रलंबित रस्ता रुंदीकरणाचे विकासकाम पुर्ण करण्यासाठी, शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	कित्ता
१९८.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	" मुंबई गोरेगाव (पूर्व), पी/उत्तर विभाग, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, मौजे दिंडोशी येथील न.भू.क्र.९९ पैकी १०९,१०८ या शासकीय मालकीच्या भूखंडावर अनुक्रमे आरओएस/उद्यान/पार्क तसेच आरपीयु	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		न्यायालय आणि आर आर शासकीय निवासस्थान असे आरक्षण असून यामध्ये बदल करुन, आरपीयु पोलीस ठाणे आणि आर आर पोलीस वसाहत असे आरक्षण बदल करण्यात येऊन, त्यावर पोलीस आयुक्त, कार्यालय परिमंडळ-१२ आणि दिंडोशी पोलीस ठाणे उभारण्याबाबत, अद्याप शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, सदरहू भुखंडावर गृहनिर्माण विभागाचे आरक्षण बदलून, उपायुक्त परिमंडळ-१२ आणि दिंडोशी पोलीस ठाण्याकरिता भूखंड पोलीस विभागास उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव दि.०२.०९.२०२२ रोजी नगर विकास विभाग यांना सादर करण्यात येऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न करता प्रस्ताव प्रलंबीत असणे, यामुळे परिमंडळ कार्यालय आणि पोलीस ठाणे उभारणेबाबतचे विकास काम ठप्प झाल्याने, पी-पुर्व विभागातील जनेतची होत असलेली, गैरसोयीची समस्या अद्यापही कायम असणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
१९९.	श्री. विक्रम पाचपुते, श्री . प्रविण दटके वि .स .स.	“महाराष्ट्र शासनाने दिनांक ०४ जुन, २०१८ रोजी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची शासन निर्णय निर्णयाप्रमाणे शुल्क निश्चिती केलेली	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे, नगर विकास विभागामार्फत विविध प्रकारची विकास कामे केली जात असणे, त्याकरिता वास्तुविशारद अभियंता अंतर्गत सजावटकार असे विविध सल्लागारांची आवश्यकता असणे, कामानुसार शैक्षणिक पात्रता तसेच कामांच्या स्वरूपानुसार तांत्रिक कुशल सल्लागार असणे दिनांक ०४/०६/२०१८ शासन निर्णयान्वये सरसकट शुल्क निश्चित करण्यात आलेले असणे, ते केंद्राचा वास्तुविशारद कायदा १९७२ नुसार सुसंगत नसणे वास्तुविशारद परिषदेने काउन्सिल ऑफ आर्किटेक्चर कामांच्या व्याप्ती व प्रकारानुसार शुल्क रचना करून निश्चित केलेली असणे, योग्य सल्लागार मार्फत कामे झाली तर कामांचे सकारात्मक परिणाम प्राप्त होतात दुय्यम कामे झाली तर शासनाचा निधी विनियोग योग्य होत नसणे शासनास विनंती असणे, ०४/०६/२०१८ च्या निर्णयामध्ये शैक्षणिक पात्रता अनुभव कामाचा लागणारा कालावधी इत्यादी बाबीचा उल्लेख करून त्याप्रमाणे शुल्क निश्चिती करावी तसेच ११ सप्टेंबर, २०१८ व ४ जून २०१८ या दोन शासन निर्णयामधील संभ्रम अवस्था दूर करून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२००.	श्री. किसन कथोरे, श्री . समाधान आवताडे वि .स .स .	"राज्यात राबविण्यात आलेल्या बी.एस.यु.पी.योजनेतील घरांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याने या घरांचे वाटप योग्य त्या लाभार्थ्यांना झाले नसल्याचे आत्तापर्यंतच्या अनुभवातून निदर्शनास येणे, अनेक नगरपालिका व महापालिका क्षेत्रातील बी.एस.यु.पी. घरांच्या इमारतीची कामे निकृष्ठ दर्जाची झाल्याने अनेक वर्षापासून लाभार्थ्यांनी या घरांचा ताबाच घेतलेला नसणे, या योजनेची चौकशी करण्यातच अनेक वर्षाचा कालावधी लोटला गेलेला असणे, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हद्दीतील बी.एस.यु.पी. योजनेतील घरांचे निकृष्ठ बांधकाम लाभार्थी निवड व इतर अनेक कारणानी अद्याप घरांचे वाटप करण्यात आलेले नसणे, ठेकेदारावर व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे लाभार्थी घरापासून वंचित असणे, बदलापूर येथील बी.एस.यु.पी. योजनेतील घरांच्या निकृष्ठ दर्जा व बोगस लाभार्थी निवड याबाबतीत शासनाने अहवाल मागविलेला असणे, त्यावर अद्याप पुढील कोणतीच कार्यवाही व कारवाई झालेली नसणे, त्यामुळे आता तर हा प्रोजेक्ट पाटबंधारे विभागाच्या रेड व ब्लू झोन च्या विळख्यात सापडलेला असणे, या निकृष्ठ दर्जाच्या घरामुळे व बोगस लाभार्थी निवडीमुळे लाभार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संतापाची लाट उसळणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्याचप्रमाणे कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं.९८, ९८अ, व ९९ मौजे बेलवली व शांतीनगर वडवली येथील पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांच्या ठेकेदारास सुद्धा दोनवेळा मुदत वाढ दिल्याने घरांच्या किमतीमध्ये प्रचंड वाढ झाल्याचे निदर्शनास येणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी कार्यवाही व उपाययोजना."	
२०१.	श्री. किसन कथोरे, श्री .समाधान आवताडे वि .स .स.	"ठाणे जिल्ह्यातील कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मौजे वालीवली येथील सर्वे नंबर १८८ बदलापूर पश्चिम येथे रहिवास क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या डम्पिंग ग्राउंडला नागरिकांनी विरोध करणे, सदर ठिकाणी डम्पिंग ग्राउंड झाल्यास रहिवास क्षेत्र असल्याने नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होणार असून शहरातील रहिवास क्षेत्रात दुर्गंधी व प्रदूषणामुळे नागरिकांचे बळी जाण्याची शक्यता नाकारता येत नसणे, या डम्पिंग ग्राउंडच्या सर्वेक्षणाकरिता आलेल्या टीमला सर्वे न करताच परत पाठवण्यात येणे, नगरपरिषद, जिल्हाधिकारी, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री यांना वेळोवेळी पत्रव्यवहार करून या शहरातील नागरिकांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी व विधानसभा सदस्य यांनी डम्पिंग ग्राउंड ला कडाडून विरोध केलेला असणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वेळोवेळी आंदोलने, धरणे, मोर्चे इत्यादी द्वारे पालिका प्रशासन व शासनाचा विरोध व निषेध करण्यात येणे, त्यामुळे हे डम्पिंग ग्राउंड रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची वा करण्यात येणारी तातडीची कार्यवाही व उपाययोजना."	
२०२.	श्री. किसन कथोरे, श्री .समाधान आवताडे वि .स .स.	"ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील कुळगांव-बदलापूर नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर ३५/३/२ क्षेत्र ५७.०० हे .आर. ही जमीन खाजगी जमीन मालक श्री रामकृष्ण शंकर जोशी व इतर यांची असणे, परंतू सदर जमिनीवर नगरपरिषदेने अतिक्रमण करून शाळेचे बांधकाम करण्यात येणे याबाबत सन २००९ च्या डिसेंबरमध्ये झालेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक २०९३ उपस्थित केलेला असणे, त्यावेळी नगरपालिकेच्या नावाने सातबारा करण्याची कार्यवाही सुरू असल्याबाबत उत्तर देण्यात येणे, जमीन मालकाने जागा खाली करून देण्याबाबत नोटिसा बजावणे २०१० पासून नगरपरिषदेने शाळेच्या आरक्षणाबाबत एमएमआरडीएकडे प्रस्ताव पाठवणे एमएमआरडीएने जमिनीबाबत २०१९ मध्ये शासनाच्या नगरविकास विभागाकडे मार्गदर्शन मागवण्यात येणे, नगरपरिषदेने तहसीलदार यांच्याकडे जमीनधारकास कोणताही मोबदला न देता सातबारा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उताऱ्यावर नगरपरिषदेच्या नावाची नोंदघेणे बाबत अर्ज करणे परंतु तहसीलदार यांनी नगरपरिषदेची मागणी फेटाळण्यात येणे, नगरपरिषदेच्या शाळेत मोठ्या प्रमाणात विद्यार्थी संख्या असल्याने नगर परिषदेने जागामालक श्री. रामकृष्ण जोशी यांना नोटीस पाठवून नवीन वर्ग खोल्या इमारत बांधकाम करण्यासाठी संमती मागण्यात येणे, टीडीआर किंवा मोबदला न दिल्याने जागा मालक बेचैन होणे, जागेचा प्रश्न प्रलंबित असल्याने शाळेतील हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षण अधांतरी असणे, त्यामुळे शासनाने या बाबीची दखल घेऊन करावयाची वा करण्यात येणारी कार्यवाही व उपाययोजना ."	
२०३.	श्री. मनोज जामसुतकर वि .स .स.	" मुंबईतील माझगाव, ताडवाडी येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या १०० वर्षांहून जुन्या बी.आय.टी. चाळी असणे, सदर चाळी अत्यंत जीर्ण व धोकादायक झालेल्या असणे, सदर चाळींच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने येथील रहिवाशी/भाडेकरुंनी माझगाव ताडवाडी सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना करुन त्याच्या माध्यमातून सन २००५ मध्ये एका विकासकाची केलेली नियुक्ती, तथापि सन २००५ ते २०१८ पर्यंत पुर्नविकासास प्रत्यक्ष सुरुवात न	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		झाल्याने सदर विकासकाची नियुक्ती महापालिकेने रद्द करणे, त्याचप्रमाणे बी.आय.टी. चाळ क्र.१२ ते १६ या इमारतींची अवस्था अत्यंत धोकादायक झाल्यामुळे येथील २२० कुटुंबियांना बळजबरीने महापालिकेने माहुल येथील प्रदुषणरहित संक्रमण शिबिरात स्थलांतरीत करणे, तसेच १८० कुटुंबियांसाठी प्रत्यक्ष जागेवर संक्रमण शिबिर निर्माण करुन त्याठिकाणी स्थलांतरीत करण्यात येणे, तथापि सदर संक्रमण शिबिर देखील जीर्ण झाले असून सदरच्या संक्रमण शिबिराची अवस्था दयनीय झालेली असणे, शासनाने ज्याप्रमाणे बी.डी.डी. चाळी व काळाचौकी अभ्युदयनगर येथील रहिवाश्यांकरीता पुर्नविकासासाठी धोरण राबविले त्याच धर्तीवर माझगाव ताडवाडी येथील बी.आय.टी.चाळींचा पुनर्विकास करण्यात यावा तसेच माहुल येथील प्रदुषणरहित परिसरात २२० कुटुंबियांना माझगाव येथे स्थलांतरीत करण्याचीही रहिवाश्यांकडून होत असलेली मागणी, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनीही मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे मे, २०२५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केलेली मागणी, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने निर्णयात्मक करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२०४.	श्री. अशोक पाटील वि .स .स.	"भांडुप मतदार संघाचे विधानसभा सदस्य यांनी कांजूरमार्ग (पूर्व) येथील डम्पिंग ग्राउंडची पाहणी केली असता कांजूरमार्ग मधील कचरा भूमीला दिलेल्या जागेचा वापर गरजेपेक्षा जास्त अति प्रमाणात चालू असल्याचे निदर्शनास आले. यामुळे दुर्गंधीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले असणे, तसेच याबाबत माननीय उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून मागील अधिवेशनात देखील प्रश्नाद्वारे विचारणा केली असता खूप उशिरा संबंधित विभागाने उत्तर दिले की येथील काम सर्व अटीशर्ती नियमाप्रमाणे चालू आहे. या उलट उच्च न्यायालयाने या विरुद्ध तीव्र नाराजी व्यक्त केली असणे (पुरावे विधानसभा सदस्य यांच्याकडे उपलब्ध असणे) तरी सदरील प्रकल्प जागेचा योग्य असा वापर करून चालवल्यास कोणत्याही तक्रारी उद्भवणार नाही हे नक्की भांडुपमधील युवकांची तसेच नागरिकांची वारंवार असलेली आंतरराष्ट्रीय स्टेडिअमची मागणी, कांजूरमार्ग पूर्व येथील कचरा भूमीतील ११८ हेक्टर जागेमधून देण्यात यावी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."	कित्ता
२०५.	श्री. अशोक पाटील वि .स .स.	" भांडुप पश्चिम मधील बराचसा भाग हा झोपड्यांनी व्यापलेला असणे या परिसराचा विकास हवा असल्यास प्रथम रस्ते मोठे असणे आवश्यक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		झाले असणे, रस्त्यांच्या समस्येमुळे या विभागात विकासक पुढे येत नाहीत टेंभीपाडा रोड, जंगल मंगल रोड, क्वारी रोड, गावदेवी रोड तसेच हनुमान नगर रोड या चार मुख्य रस्त्यांच्या रुंदीकरणाचा अंतिम आराखडा तयार आहे असे विधानसभा सदस्य यांना सांगण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे या रस्ता रुंदीकरणाच्या प्रकल्पासाठी पात्र बाधित असणाऱ्या झोपडीधारकांना "भांडुप पश्चिम मध्येच सदनिका PAP देण्यात यावी" अशी अट विनंती, आणि मागणी बाधित झोपडीधारकांनी भांडुप मतदारसंघाचे विधानसभा सदस्य यांच्याकडे केलेली असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२०६.	श्री. विक्रम पाचपुते, श्री .प्रविण दटके वि .स .स.	"शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे येथील घोड नदी पात्रामध्ये शिरूर नगरपालिकेने दूषित सांडपाणी सोडल्यामुळे या नदीत मोठ्या प्रमाणात जलप्रदूषण झालेले असणे, याबाबत शासनाने अनेक उपाययोजना केलेल्या असतानाही शिरूर नगर परिषदेचे सांडपाणी हे कोणत्याकही प्रकारची प्रक्रिया न करता ते नदीमध्ये सोडले गेल्याने शिरूर नदीकाठ लगतच्या हिंगणी, गव्हाणेवाडी, राजापूर माठ, मासे वडगाव, शिंदोडी, चिंचणी, बोरी या गावातील नागरिकांना या पाण्याच्या वापरामुळे अनेक त्वचा रोगाच्या समस्या निर्माण झाल्या असणे, तसेच घोड नदीवरती	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		घोड धरण बांधले गेलेले असून या धरणावरून श्रीगोंदा काष्टी व इतर अनेक गावांच्या पाणी योजना अवलंबून असून या पाण्याचा वापर पिण्यासाठी व शेतीसाठी केला जात असून ते नागरिकांच्या आरोग्यास खुप मोठ्या प्रमाणात हानी पोहचलेली असणे, सदर सांडपाण्याकडे नगरपरिषदेकडून दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे याप्रकरणी तातडीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२०७.	श्री. योगेश सागर वि .स .स.	“चारकोप विधानसभा क्षेत्र कांदिवली (प.), मुंबई येथे सर्वोदय सोसायटी लक्ष्मी निवास, जलाराम निकेतन, कृष्णभवन, राधा निवास, राठोड निकेतन, गोपाल निवास अशा अनेक जुन्या मोडकळीस आलेल्या इमारती मुंबई महापालिकेने अतिधोकादायक ठरवून पाडल्या असणे, या इमारतीतील रहिवाशी हे अनेक वर्षांपासून पागडी पद्धतीने भाडेकरू म्हणून रहात होते. हे सर्व मध्यमवर्गीय परिवार असणे, यांचे कुठेच घर नाही, घर विकत घेण्याची यांची ऐपत नाही, अशा निम्न व मध्यम उत्पन्न गटातील हे रहिवासी अनेक वर्षांपासून बेघर झाले असून मिळेल तिथे आसरा घेतला असणे, पागडी पद्धतीने असल्याने इमारतीचे मालक वेगळे व राहणारे वेगळे अशी परिस्थिती असल्याने भाडेकरू रहिवासी अत्यंत तणावाखाली असणे, अशा इमारतीच्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पुनर्विकासाबाबत शासनाचे कोणतेच सुस्पष्ट धोरण नसल्यामुळे रहिवाशी चिंतेत असणे, मुंबईत अशा शेकडो इमारती असून यांचे पुनर्विकासाबाबत धोरण ठरविण्याची अत्यंत आवश्यकता असणे, या विस्थापित भाडेकरूंच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जनप्रतिनिधींनी सदर बाबतीत अनेकवेळा पत्रव्यवहार व चर्चा करून सुद्धा या प्रश्नाकडे शासनाचे वर्षानुवर्षे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष. याबाबत शासनाने करावयाची आवश्यक ती उपाययोजना व शासनाच्या प्रतिक्रिया."	
२०८.	श्री. हारुन खान,श्री. सुधीर मुनगंटीवार,डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. ज्योती गायकवाड, श्री. अतुल भातखळकर, श्री. काशिनाथ महादु दाते, श्री. संजय केळकर, श्री. मोहन मते, श्री. मुरजी (काका) पटेल, श्री. सुनिल प्रभू वि. स. स.	"मुंबईतील मुलुंडमधील एलबीएस मार्गावर दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६ रोजी वडाळा-ठाणे-कासारवडवली मेट्रो-४ मार्गिकेच्या खांबावरील अडीच मेट्रीक टनाचा सिमेंटचा कठडा (पॅरापेट) कोसळून ऑटो रिक्षा व चारचाकी वाहनाचा चक्काचूर होऊन झालेल्या अपघातामध्ये एका प्रवाशाचा जागीच मृत्यु झालेला असून तीन जण गंभीर जखमी होणे, विकास कामांदरम्यान प्रचंड हजगर्जी केली जात असल्याने आतापर्यंत १२ हून अधिक निष्पापांचे बळी गेलेले असणे, फक्त मेट्रो-९ च्या कामात ७ जणांचा बळी जाणे, मुंबईसह एमएमआर मध्ये एमएमआरडीए कडून १४ मेट्रो मार्गिकांची कामे सुरु असणे,सदर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कामांसाठी मार्गदर्शक सूचना तयार करुन त्यांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात येणे,मात्र कंत्राटदारांकडून त्याचे पालक होते काय याकडे संबंधित अधिकारी लक्ष देत नसल्याचे निदर्शनास येणे, अशा प्रकारची घटना घडणे हे बांधकामातील सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारे असणे,गर्दीच्या व रहदारीच्या मार्गावर सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पात आवश्यक ती खबरदारी, सुरक्षा जाळी (सेफ्टी नेट), संरक्षक आवरण व वाहतूक व्यवस्थापनाचे नियम पाळले गेले नसल्याचे निदर्शनास येणे, उक्त प्रकरणी चौकशी करून दोषी आढळून येणाऱ्या संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सर्व मेट्रो प्रकल्पांवर तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण (Safety Audit) करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
२०९.	श्री. महेश (दादा) किसन लांडगे, अॅड. राहूल कुल वि. स. स.	"भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणारे शहर म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराचा वेगाने विस्तार होत असल्याने भविष्यातील पाण्याची वाढती गरज ओळखून नवीन जलस्रोत निर्माण करणे काळाची गरज असणे, सध्याच्या ३० लाख लोकसंख्येला पवना, आंद्रा आणि भामा आसखेड धरणांतून होणारा पाणीपुरवठा वाढत्या नागरीकरणामुळे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		भविष्यात अपुरा पडण्याची दाट शक्यता निर्माण झालेली असणे, महापालिका प्रशासनाने मुळशी धरणातून शहरासाठी पाणी आरक्षित करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला असून त्याला अद्याप तांत्रिक मंजुरी मिळालेली नसणे, चासकमान धरणातून पाणी आरक्षित करण्याबाबत सन २००८ मध्ये प्रकल्पाला सुरुवात झाली असली तरी स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे हा प्रकल्प दीर्घकाळ 'जैसे थे' स्थितीत प्रलंबित असणे, महायुती सरकारच्या काळात या प्रकल्पावरील स्थगिती आदेश उठविण्यात आले असूनही प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नसणे, या प्रशासकीय दिरंगाईमुळे भविष्यात शहराला गंभीर पाणी टंचाईच्या प्रश्नाचा सामना करावा लागण्याची आणि नागरी विकासाला खीळ बसण्याची मोठी भीती निर्माण झालेली असणे, तरी शासनाने मुळशी धरणातून पाणी आरक्षणाच्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी देऊन पिंपरी-चिंचवडचा भविष्यातील पाणीप्रश्न निकाली काढणे तसेच स्थानिक नागरिक, शेतकरी व लोकप्रतिनिधी यांच्यासोबत सामोपचाराने चर्चा घडवून आणून चासकमान पाणी योजनेचे काम निश्चित कालबद्ध मर्यादेत युद्धपातळीवर सुरू करण्याबाबत प्रशासनाला आवश्यक निर्देश देऊन कृती आराखडा राबविणे अत्यंत	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२१०.	श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) वि. स. स.	“नाशिक शहरासह सातपूर औद्योगिक वसाहतीमधील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झालेली असणे, सातपुर परिसरातील श्रमिकनगर, अशोकनगर, छत्रापती शिवाजीनगर, सोमेश्वर कॉलनी, विश्वासनगर या परिसरात रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली असणे, तसेच अंबड-सातपूर लिंकरोड या अत्यंत वर्दळीच्या ६ किमी अंतराच्या रस्त्यावरही मोठ-मोठे खड्डे पडलेले असणे, रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करण्यात येत असून तात्पुरती मलमपट्टी करुन बुजवण्यात आलेले खड्डे निकृष्ट दर्जाच्या कामामुळे काही दिवसातच पुन्हा रस्त्याची दुरवस्था होत असणे, परिणामी स्थानिक नागरीक, वाहनचालक व प्रवाशी यांना नाहक त्रास सहन करावा लागणे, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दिवसेंदिवस वाहतुक कोंडीचे व अपघाताचे वाढते प्रमाण, अपघातामध्ये अनेक प्रवाश्यांना आपला जीव गमवावा लागणे, तसेच अनेक प्रवासी गंभीर जखमी होणे, नाशिक शहरातील विविध रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी वारंवार स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधी यांचेकडून संबंधित विभागाकडे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्यात येणे, त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांचे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने उक्त प्रकरणी तातडीचे चौकशी करुन नाशिक शहरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२११.	डॉ. आशिषराव देशमुख वि .स .स.	“सावनेर तालुक्यातील (जि. नागपूर) कोच्छी येथे डॅम्प तयार झाल्यामुळे भविष्यात नियमित पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन मागील पंचवार्षिक काळात कोच्छी डॅम येथून पाईपद्वारे शहराला पाणी आणणे, तीन नविन पाण्याच्या टाक्या व फिल्टर प्लांट उभारणे या स्वरुपात सुमारे ९५ कोटी ६१ लाख ५७ हजार ७५४ रुपयांचा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत प्रस्ताव तयार करण्यात येणे, सदरहू प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडून मंजूरीसाठी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन, बेलापूर, मुंबई येथे मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असणे, परिणामी तालुक्यातील नागरिकांना नेहमीच पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने या प्रस्तावाला मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२१२.	श्रीमती विद्या ठाकूर वि. स .स.	“गोरेगाव (पश्चिम) येथील राम मंदिर परिसराचा संपूर्ण भूखंड एम एम आर.डी.ए.च्या मालकीचा असणे,या भूभागाला ओशिवरा डिस्ट्रीक सेंटर या नावाने ओळखले जाणे, एम.एम.आर.डी.ए.च्या जागांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण असणे, सदर परिसरात मुलभूत सोयी-सुविधांचा असलेला अभाव, रस्ते, दिवाबत्ती, सार्वजनिक शौचालय, रुग्णालय या सारख्या अत्यावश्यक सेवा या भागात नसणे, सरकारतर्फे सदर भूभाग हा बीकेसीच्या धर्तीवर करण्यात येण्याची संकल्पना असणे, परंतू प्रत्यक्षात मात्र असे काहीही झालेले नसणे, सदर परिसराच्या नियोजनबध्द विकासाची आवश्यकता असणे, सदर भूभाग एम एम आर डी.ए. कडून मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत करण्याची स्थानिकांची मागणी असणे, याबाबत अजून पर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, परिणामी मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव असणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२१३.	श्री. मुरजी (काका) पटेल वि. स. स.	"राज्यात हॉटेल, लॉज किंवा गेस्ट हाऊस उघडण्यासाठी अनिर्वाय मान्यता, परवानग्या जसे महानगर पालिका इमारत/ भोगवस्ती प्रमाणपत्र, पोलिस मंजूरी,आगणीसुरक्षा एनओसी अन्नासाठी एफ एस ए आय (भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण) परवाना आणि आरोग्य व्यापार परवाना तसेच जीएसटी नोंदणी, दुकान व आस्थापना नोंदणी व प्रदूषण नियंत्रण मंजूरी आदि. परवानग्या घेणे आवश्यक असणे, परंतु उक्त कोणत्याही प्रकारच्या परवानग्या न घेता मुंबई, मुंबई उपनगरामध्ये शेकडो विशेषत: अंधेरीमध्ये जवळपास ४०० पेक्षा अधिक हॉटेल,लॉज,गेस्ट हाऊस प्रशासनाच्या आशीर्वादाने बेकायदेशीर रीत्या सर्रासपणे सुरू असणे. तसेच बहुतांश हॉटेल्स, लॉज, गेस्ट हाऊस यांच्या व्यवस्थापनाकडून अनधिकृत रित्या महापालिकेची जलवाहिनी जोडून चोरीच्या पद्धतीने पाण्याचा वापर हॉटेल्स, लॉज, गेस्ट हाऊससाठी केला जात असणे, गेल्यावर्षी सांताक्रुझ मधील हॉटेल गॅलक्सीला लागलेल्या भीषण आगीत तीन जणांच्या मृत्यू होण्याची घटना पाहता प्रशासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे हॉटेल्स, लॉज , गेस्ट हाऊस मध्ये जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षितता धोक्यात आलेली असणे, यामुळे जनमानसात निर्माण झालेली चिडेची	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		व तीव्र असंतोषाची भावना, यावर शासनाने करावयाची ठोस कार्यवाही व उपाययोजना.”	
२१४.	श्री. योगेश सागर,श्री .संजय केळकर,डॉ. आशिषराव देशमुख वि .स .स.	“मुंबई अग्निशमन दलाकडे ३४-३५ मजल्यांवरील आगीवर नियंत्रण ठेवण्याची किंवा अडकलेल्या नागरिकांचे बचावकार्य करण्याची क्षमता नसतानाही मुंबईत १०० हून अधिक मजली गगनचुंबी इमारतींना मंजुरी दिली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला असणे, हा प्रकार म्हणजे मुंबईकरांच्या जीवाशी थेट खेळ असणे, अग्निशमन दलाकडील सर्वात आधुनिक हायड्रॉलिक प्लॅटफॉर्मची उंची जेमतेम १०४ मीटर म्हणजेच सुमारे ३४ मजले इतकी असणे, यापुढील मजल्यांवर आग लागल्यास बाह्य अग्निशमन किंवा बचावकार्य करणे पूर्णतः अशक्य असल्याचे अग्निशमन दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यापूर्वीच अधिकृतरीत्या मान्य केले असणे, असे असतानाही वडाळा येथील प्रस्तावित ‘आयकॉनिक टॉवर’ १०० हून अधिक मजले, ५२६ मीटर उंच) तसेच महालक्ष्मी रेसकोर्स पुनर्विकास प्रकल्पातील १२५ मजली निवासी मनोऱ्यासारख्या अतिउंच इमारतींना मंजुरी देण्यात येत आहे किंवा त्या प्रक्रियेत असणे, या इमारतीमध्ये आग लागल्यास नागरिकांना वाचवण्याची कोणतीही प्रत्यक्ष व्यवस्था अस्तित्वात नाही, त्यामुळे या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		इमारती म्हणजे 'उभे मृत्यूचे सापळे' असल्याचा आरोप नागरिक व सामाजिक संस्थांकडून करण्यात येत असणे, सदरहू इमारतींच्या सुरक्षेच्या दृष्टीने मुंबई सारख्या शहरात अग्निशमन दलाकडे अद्ययावत यंत्रणा उभी करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२१५.	डॉ. बालाजी किणीकर वि .स .स.	"ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील अंबरनाथ नगर परिषद हद्दीत दररोज सुमारे १६० टन घनकचरा निर्मिती होत असताना, सदर कचरा संकलन व वाहतूक करण्याचे ५ वर्षांच्या कालावधीसाठी काम मे. समीक्षा वेस्ट मॅनजमेंट इन्फ्रा प्रा. लि., ठाणे यांना दि. २३ ऑगस्ट, २०२४ रोजी देण्यात आलेले असणे, संबंधित ठेकेदाराने अंदाजित दरापेक्षा १५.२५ टक्के कमी दराने निविदा भरून CNG व इलेक्ट्रिक वाहने वापरण्याचे आश्वासन दिले असताना प्रत्यक्षात जुनी डिझेल वाहने वापरणे, आवश्यक ८४ वाहनांऐवजी केवळ ५६ वाहने कार्यरत असणे, GPS प्रणाली बंद असणे, तसेच मनुष्यबळ अपुरे असणे, घनकचरा व्यवस्थापन नियम सन २००० व २०१६ तसेच करारातील अटींचे उल्लंघन होत असताना शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिग साचून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, उक्त प्रकरणी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		संबंधित ठेकेदारावर करारनामा रद्द करुन काळ्या यादीत टाकून अंबरनाथ तालुक्यातील घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता, याबाबत यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२१६.	डॉ. जितेंद्र आव्हाड वि .स .स.	“ठाणे महापालिका क्षेत्रातील वागळे इस्टेट येथील शांतीनगरमधील ३५ वर्षे जुनी असलेल्या नूतन नीलम अपार्टमेंटच्या पाचव्या मजल्यावरील स्लॅब चौथ्या मजल्यावर कोसळून दि.१७ फेब्रुवारी, २०२६ रोजी अनेकजण गंभीर जखमी झालेले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असणे, सदरची इमारत सी २ बी धोकादायक प्रवर्गातील असून इमारतीमध्ये २६ रुम व ९५ रहिवासी वास्तव्यास असणे, सदरचे सर्व रहिवासी बेघर झालेले असणे, महापालिका क्षेत्रात सद्यस्थीतीत ४२९४ पेक्षा जास्त इमारती धोकादायक अवस्थेत असणे, यातील ८४ पेक्षा जास्त इमारती अतिधोकादायक तर १७५ हून अधिक इमारती धोकादायक स्थीतीत असणे, या इमारतींमध्ये हजारो रहिवासी वास्तव्यास असुन त्यांच्या जिवीतास गंभीर धोका निर्माण झालेला असणे, यापूर्वी किसननगर, नौपाडा,मुंब्रा येथील इमारती कोसळून अनेकांचे जीव गेलेले असणे, किसननगर येथील हजारो कुटूंबियांचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पुनर्वसन करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या क्लस्टरच्या इमारतींचे काम अत्यंत संथगतीने सुरु असणे, त्यामुळे धोकादायक इमारतींमधील रहिवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, मुंब्रा, कळवा, राबोडी, लोकमान्यनगर येथील क्लस्टरबाबत कोणत्याही हालचाली नसणे,पर्यायाने येथील धोकादायक इमारती कोसळून मोठा अपघात होऊन जिवीत तथा वित्तहानी होणार असणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक उपाययोजना करण्याची सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री मा.उपमुख्यमंत्री, नगरविकास तसेच आयुक्त, ठाणे महापालिका यांचेकडे दि.२० फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार मागणी केलेली असतांनाही सदरबाबत कोणतीही कार्यवाही, उपाययोजना केली जात नसल्याने येथील नागरीकांमध्ये चिंतेचे तथा असुरक्षिततेचे वातावरण पसरलेले असणे, महापालिका प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही केली जात नसल्याने, यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२१७.	श्री. तुकाराम काते वि .स .स.	“शताब्दी रुग्णालय गोवंडी येथील उपचारासाठी आलेल्या रुग्णांना तेथील अतिदक्षता विभागात कार्यरत असणारे डॉक्टर सर्रासपणे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रुग्णांची उपचारासाठी कोणतीही काळजी न घेता येथे रुग्णालयात सुविधा नाहीत असे सांगून रुग्णाला सायन रुग्णालयात पाठवित असणे, त्यामुळे अनेकदा रुग्ण सायन रुग्णालयात पोहोचण्या आधीच दगावत असणे, किंवा त्या रुग्णाला सायन रुग्णालयातील उपचार मिळेपर्यंत तासन तास रखडवावे लागते असाच प्रकार १५ दिवसापुर्वी घडला असून एका चिमुकलीला प्राण गमवावे लागले असणे, चेंबूर खारदेव नगर परिसरातील रहिवासी रवी कोल्हे यांच्या ३ महिन्याच्या मुलीला ३ फेब्रुवारी, २०२६ रोजी अचानक खोकला आणि ताप आला असल्यामुळे तिला उपचारासाठी शताब्दी रुग्णालय येथे आणले परंतु शताब्दी रुग्णालयातील डॉक्टरांनी त्या मुलीला उपचारासाठी सायन रुग्णालयात पाठवले परंतु तेथील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे चुकीचे इंजेक्शन दिल्याने त्या ३ महिन्याच्या मुलीचा आकडी येऊन आईच्या समोर दुर्दैवी मृत्यू झाला असणे ही अत्यंत संतापजनक बाब असून त्याबाबत गोवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केलेला असून या घटनेची नोंद घेऊन चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून दोषींवर कारवाई करण्यात आलेली नसणे, अशा गंभीर प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असेल तर ही खूप दुर्दैवी बाब	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे संबंधित प्रकाराची शासनाने चौकशी करून शताब्दी रुग्णालय गोवंडी येथेच नागरिकांना उपचारासाठी सोय व्हावी याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२१८.	श्री. संजय गायकवाड वि .स .स.	"बुलढाणा शहराच्या सन १९९१ च्या मंजूर विकास योजना आराखड्यामध्ये सर्व्हे नं.४/१ मध्ये Play Ground चे आरक्षण असणे, शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक २१ डिसेंबर, १९९५ रोजी राज्यातील शहराच्या विकास योजनेमध्ये क्रिडांगणासाठी आरक्षित असणाऱ्या जागांमध्ये कोणताही फेरबदल करण्यांत येऊ नये याबाबत शासनस्तरावरुन धोरणात्मक निर्णय झालेला असणे, असे असतांनाही सदर आरक्षित क्षेत्र असलेल्या काही भागावर एका जमिनमालकाने बेकायदेशिर रित्या गुंठेवारी नियमानुकुल अधिनियमाखाली नगरपरिषदेकडून परवानगी प्राप्तकरुन सदरजागेचा मंगलकार्यालय या प्रयोजनार्थ वाणिज्य वापर चालु करणे, बुलढाणा नगरपरिषद हद्दीअंतर्गत सन १९९१ चे मंजुरविकास योजनेमध्ये सर्व्हे क्र. ४१/१ अंतर्गत येणाऱ्या जमिनीवर आरक्षण क्रमांक १ क्रिडांगण या प्रयोजनार्थ आरक्षण असणे, मंजुर विकासयोजनेत सदरआरक्षण कायम असतांनाही तत्कालीन अपर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी सदर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		क्रिडांगण या प्रयोजनार्थ आरक्षित असलेल्या जमिनीवरच नियम बाह्यरित्या अकृषक आदेश पारीत करुन नियमांचा भंग करणे, सदर जागेवर गुंठेवारी अधिनियमाखाली भुखंड नियमानुकुल करण्याबाबत नगर परिषदेने बेकायदेशिररित्या दिलेला आदेश, त्यावर दिलेली बांधकाम परवानगी रद्द करणे, सदर भुखंडावर झालेले अनाधिकृत बांधकाम पाडणे, खेळाचे मैदान या प्रयोजनार्थ सुविधा क्षेत्र म्हणून दर्शविलेली सदरजागा शासनाने ताब्यात घेणे, मंजुर विकास योजनेत सदर आरक्षण कायम असतांनाही तत्कालीन अपरजिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी सदर क्रिडांगण या प्रयोजनार्थ आरक्षित असलेल्या जमिनीवरच नियमबाह्यरित्या अकृषक आदेशपारीत करुन नियमांचा भंग करणे, सदर नियमबाह्यरित्या पारीत केलेले अकृषक आदेश रद्द करुन याप्रकरणास जबाबदार असलेल्या संबंधितांची सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता, तसेच या नियमबाह्य गुंठेवारी प्रकरणात जबाबदार असलेल्या संबंधितांची सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याची आवश्यकता. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२१९.	श्री. योगेश सागर वि .स .स.	"मुंबई महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता प्रबोधिनी अभियान योजनेअंतर्गत झोपडपट्टी व इतर निवासी परिसरात गल्ल्या व रस्ते साफसफाईची कामे मोठ्या प्रमाणात केली जात असणे, या कामाचे कंत्राट बचत गटांना महापालिका देत असून बचत गट या लोकांकडून ही साफसफाईची कामे करून घेत असणे. या कामात पुरुषासोबत महिलांची संख्या जास्त असून असे मुंबईभरात एकूण १२ हजारापेक्षा अधिक सफाई कामगार सफाईची कामे करीत असणे, यांना कामाच्या मोबदल्यात प्रतिदिन रुपये १८०/-एवढी तुटपुंजी रक्कम दिली जात असणे, अनेक कामगार हे काम गेली १० ते १५ वर्षापासून करीत असणे, यातील बहुतेक कर्मचारी मागासवर्गीय असणे, यांची नियमित आरोग्य तपासणी केली जात नसणे, हे कामगार स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता मुंबईकरांचे आरोग्य व जीवनमान चांगले राहण्यासाठी परिसर व गल्ल्या स्वच्छ ठेवण्याचे काम प्रामाणिकपणे करीत असणे, एवढ्या तुटपुंज्या रकमेत त्यांच्या परिवाराचा खर्च व मुलाबाळांचे शिक्षण करण्यासाठी त्यांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागत असणे. त्यामुळे त्यांना कायदा व नियमानुसार किमान वेतन देण्याची अत्यंत	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२२०.	श्री. नरेंद्र मेहता वि .स .स.	"मीराभाईंदर महानगरपालिकेचा विकास आराखडा १९९७ ला २० वर्षाकरिता मंजूर करण्यात येऊन त्याची मुदत २०१७ ला संपुष्टात येणे, त्यानुसार महानगरपालिकेने नवीन डीपी तयार करून शासनाकडे पाठविणे आवश्यक असणे, परंतु प्रशासनाच्या दिरंगाईमुळे डीपी वेळेत सादर न केल्याने डीपी तयार करण्याचे अधिकार शासनाने स.संचालक नगररचनाकार ठाणे यांना देणे, त्या अनुषंगाने दि २८/१०/२०२२ अधिसूचना काढून प्रारूप आराखडा अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे प्रलंबित असणे, सादर केलेल्या प्रारूप आराखड्यात मोठ्या प्रमाणात त्रूट्या असणे, प्रारूप आराखडा अंतिम करताना संबंधित अधिकाऱ्यांनी काही खाजगी विकासकाच्या फायद्यासाठी आरक्षणामध्ये मोठे फेरबदल केलेले असणे, रहिवास भागाच्या एकूण जागेच्या प्रमाणात नागरी सुविधा क्षेत्राकरिता आवश्यक आरक्षण नसणे, त्या व्यतिरिक्त घनकचरा, उद्यान, पार्किंग, बाजार इ. महत्वाची आरक्षणे पुरेशा प्रमाणात नसणे, तसेच यातील काही आरक्षणे CRZ मध्ये जेथे कांदळवन, उच्चदाब वाहिनी गेली आहे त्या जागेत दर्शविले असणे, मूळ प्रारूप आराखडा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तयार करून सूचना व हरकती मागविल्यानंतर देखील त्यात मोठ्या प्रमाणावर संशयास्पद रित्या फेरबदल करणे, तसेच १९९७ पूर्वीच्या डीपी मध्ये देखील फेरबदल करण्यात येणे, प्रारूप आराखडा अंतिम मंजूर झालेला नाही त्यामध्ये देखील महापालिका प्रशासनाने १५ आरक्षण डीपी मधून बदलण्यासाठी प्रस्ताव शासनास पाठविणे, भविष्यात हा आराखडा मंजूर झाल्यास महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन येथील नागरिकांना मूलभूत सुखसुविधांपासून वंचित रहावे लागणार असणे, याकरता शासनाने सदर प्रारूप आराखडा रद्द करून नव्याने तयार करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२२१.	श्री. सुनिल शेळके वि .स .स.	"मौजे शिरगाव ता. मावळ, जि. पुणे येथील कोहिनूर अभिमान को-ऑप सोसायटी मध्ये साधारणतः बाराशे सदनिका धारक असुन सरासरी सहा हजार लोकसंख्येची ही सोसायटी असणे. सदर सोसायटी येथील सदनिकाधारकांकडे हस्तांतरित करताना विकासकानी बऱ्याच सुविधा ह्या अर्धवट दिल्या असल्यामुळे रहिवाशांना दैनंदिन जीवन जगणे कठीण झालेले असणे. सदर सोसायटी मध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा, सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी कोणतेही योग्य व्यवस्थापन नसल्याचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निदर्शनास येणे. सद्यस्थितीत सदर सांडपाणी थेट नदीपात्रामध्ये सोडले गेले असल्याने नदीचे प्रदूषण होत असून कित्येकदा सदर सांडपाणी जवळील शेतीमध्ये घुसल्याने शेतीचेही प्रचंड नुकसान झालेले असणे. सदर सांडपाण्याचा निचरा होत नसून दूषित पाण्यामुळे कावीळ व इतर अनेक संसर्गजन्य आजारांना सामोरे जावे लागत असणे. नागरिकांचा आरोग्याचा संदर्भात व भौतिक सुविधांच्या समस्येबाबत विकासकाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येणे. सदर विकासक बांधकामांबाबत सर्व नियम डावलून मोठमोठे प्रकल्प उभे करत असल्याचे निदर्शनास येणे. कोणतीही भौतिक सोयीसुविधा पुरवल्या गेल्या नसताना संबंधित विकासकास कुठलीही शहानिशा न करताच भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे. सदर नागरिकांनी वेळोवेळी विकासक व प्रशासनाकडे तक्रार करूनही प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष व त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाविषयी असलेली तीव्र नाराजी यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना.	
२२२.	श्री. संतोष बांगर, श्री. विलास भुमरे,	"मुंबईत केईएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलेल्या रुग्णांना एमआरआय व सीटी स्कॅन चाचणीसाठी किमान आठवडाभर प्रतीक्षा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	श्री. मुरजी (काका) पटेल, श्री. अमोल पाटील, श्री. प्रकाश सुर्वे, श्री. किशोर पाटील, श्री. अजय चौधरी, श्री. वरुण सरदेसाई, श्री. अबू आझमी वि. स. स.	करावी लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, ओपीडी रुग्णांसाठीही तीन महिने नंतरची तारीख देण्यात येत असून, वेळेवर बेड उपलब्ध न होणे आणि चाचण्यांसाठी लांब प्रतीक्षा करावी लागणे, रुग्णालयात दररोज ६ ते ७ हजार रुग्ण येत असून रुग्णालयातील २ हजार बेडांच्या मर्यादेमुळे रुग्णांचे हाल होणे, रुग्णालयातील शौचालये व मूलभूत सुविधा देखील बिकट स्थितीत असणे, परिणामी रुग्ण व नातेवाईकांमध्ये रुग्णालय प्रशासन व शासनाप्रती निर्माण झालेली चीड व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने व्यवस्थापकीय सुधारणा करून रुग्णांना वेळेवर चाचण्या व उपचार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
२२३.	श्री. सिध्दार्थ शिरोळे वि .स .स.	“महाराष्ट्रातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणारे अपघाती मृत्यू ही अत्यंत गंभीर समस्या बनली असणे, मागील पाच वर्षांत सर्वोच्च न्यायालयातील एका याचिकेच्या सुनावणीदरम्यान उघड झालेल्या माहितीनुसार, राज्यात २,१३६ नागरिकांचा खड्ड्यांमुळे मृत्यू झाला असून या बाबतीत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असणे, मुंबई उच्च न्यायालयानेही वारंवार या प्रश्नावर गंभीर चिंता व्यक्त केली	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे, पुणे, ठाणे, कोल्हापूर, नाशिक महामार्ग आदी भागांमध्ये खड्ड्यांमुळे अपघात व मृत्यूच्या घटना सातत्याने समोर येत असणे, पुण्यातील अनेक रस्त्यांवरील खड्डे जीवघेणे ठरले असून दुचाकीस्वारांना विशेष धोका निर्माण झाला आहे. काही ठिकाणी निष्काळजीपणाबद्दल ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणीही झाली असणे, खराब रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी वाढते तसेच नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत असणे, या पार्श्वभूमीवर शासनाने जबाबदारी निश्चित करून दर्जेदार रस्ते दुरुस्ती, कठोर देखरेख, दोषींवर कारवाई आणि दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजना तातडीने राबवणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतीक्रिया.”	
२२४.	श्री. नरेंद्र मेहता वि .स .स.	“ठाणे जिल्ह्यातील मिराभाईंदर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त ३/३/२१ ते ८/९/२३ या कार्याकाळात अनेक अनियमित व नियमबाह्य कामे झाल्याचे वारंवार निदर्शनास आले असणे, नवीन इमारत बांधकाम परवानग्या देतांना नियमाचे उल्लंघन करणे, रुगणालय आरक्षीत भुखंड नियमबाह्य पद्धतीने विकासकाला देणे, पालिकेच्या राखीव निधीच्या मुदत ठेवी नियमबाह्य पद्धतीने मोडून त्या पैश्यातुन ठेकेदारांचे देयक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अदा करून भ्रष्टाचार करणे, नाट्यगृह उभारणेकरीता विकासकाला नियमबाह्य पद्धतीने TDR देणे, धुळ नियंत्रक वाहने व अग्निशमन विभागात नियमबाह्य बुलेट खरेदी, शौचालयाच्या निवीदेत भ्रष्टाचार, नियमबाह्य पद्धतीने देयके अदा करणे, प्रारुप विकास आराखडा मंजूर नसतांनाही शैक्षणीक भुखंड आयुक्तांच्या मर्जीतल्या खाजगी संस्थाना देण्याकरीता निविदा प्रसिध्द करणे, महापालिकेचे मुख्यालयाचे इमारतीचे भुमीजन मा.मुख्यमंत्र्यांनी हस्ते होऊनही त्या कामाचा पाठपुरावा न करता विकासकाला फायदा पोहोचविण्याचा दृष्टिकोनातुन नियमबाह्य पद्धतीने दुसऱ्या ठिकाणी पालिका मुख्यालयाचे भुमीपूजन करणे, नियमबाह्य पद्धतीने होर्डींगची निवीदा प्रसिध्द करून पालिकेचे करोडो रुपयांचा नुकसान करणे, परिवहन सेवेच्या बसेसेचे नियमबाह्य पद्धतीने मर्जीतील ठेकेदारांना ठेका देऊन भ्रष्टाचार करणे, अशा अनेक प्रकरणांमध्ये आयुक्तांनी अनियमितता केली असून याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी केली असता माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सदर विभागास दि ०६/०३/२०२५ रोजी तात्काळ चौकशीचे निर्देश देणे, तरी देखील आतापर्यंत चौकशी पूर्ण न करून गुन्हा दाखल न झाल्याने	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रशासनाप्रती नागरिकांमध्ये पसरत असलेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२२५.	श्रीमती सरोज अहिरे वि. स .स.	"नाशिक महापालिकेने वॉटर ग्रेस प्रोडक्ट्स कंपनीला नाशिक शहरातील रुग्णालयांच्या बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंटचा ठेका दिलेला असणे, त्यासाठी पंधरा गुंठे जागा नाममात्र दराने भाडेतत्वाने दिलेली असणे, या भूखंडाबाबत करार करताना कंपनीने बेकायदेशीर करारनामे करणे, करारनाम्यात छेडछाड करुन नाशिक महापलिकेची फसवणूक केलेली बाब उघड होणे, नाशिक महापालिका मेडिकल ऑफीसर व सिटी इंजिनिअर तसेंच वॉटर ग्रेस कंपनी यांच्यामध्ये २१ वर्षे मुदतीसाठी सुधारित करारनामा करण्यांत येणे, त्यास महासभा व स्थायी समिती यांची धोरणात्मक बाब म्हणून मान्यता न घेतल्याची गंभीर अनियमितता उघड होणे, स्थानिक निधी लेखापरिक्षण वर्ष २०१२ ते वर्ष २०१३ याअंतर्गत प्राप्त परिच्छेदानुसार सन २००१ ते २००५ याकालावधीत सेवा शुल्काच्या रक्कमे पेक्षा रु.९५,२७,९०८/- इतकी रक्कम ज्यादा संबंधित विभागाचे अधिकारी यांनी वॉटर ग्रेस कंपनीला अदा केल्याची बाब उघड होणे, त्यावरील रॉयल्टीची रु.१३,४०,११२/- असे एकूण रु.१,०८,६८,०२०/- एवढ्या रक्कमेचे नाशिक महानगरपालिकेचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नुकसान झाल्याबाबत आक्षेप प्राप्त झालेला असताना देखील गेल्या अनेक वर्षांपासून आक्षेपार्ह रक्कम मनपा अधिकारी यांनी वसुल न करणे, वॉटर ग्रेस कंपनीची चौकशी करण्यांत येऊन भाडे आकारण्यात येण्याबाबत आजरोजीपर्यंत कारवाई न होणे, याप्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७९ नुसार मनपाच्या जागेचा वापर अनधिकृतपणे करणे व करार नाम्यात छेडछाड करणे, याप्रकरणी मनपाच्या नियमाप्रमाणे कारवाई होऊन तात्काळ वॉटर ग्रेस प्रोडक्ट्स कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२२६.	श्री. प्रशांत ठाकूर, श्री .महेश बालदी, श्री .समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी वि. स .स.	"सिडको अंतर्गत पनवेल, उरण तालुक्यातील (जि.रायगड) ९५ गावांतील प्रकल्पग्रस्तांनी बांधलेली घरे/बांधकामे नियमित करणेबाबत अनेक वर्षे प्रश्न प्रलंबित असणे, त्यानंतर प्रकल्पग्रस्तांना दिलासा देण्याच्या दृष्टीने सर्वप्रथम महाराष्ट्र शासनाने दि.२५/२/२०२२ व दि.७/१२/२०२२ च्या शासन निर्णयानुसार सदर प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करणेबाबत शासन निर्णय जाहीर केला परंतू प्रकल्पग्रस्त तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्या निर्णयातील अनेक त्रुटींबाबत आक्षेप घेतल्यानंतर सुधारित शासन निर्णय दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी जाहिर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करणे, त्यानुसार दि.२५/०२/२०२२ पूर्वी प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे/बांधकामे नियमित करणेबाबत निर्णय घेण्यात येणे, सदर बांधकामे नियमित करताना बांधकामाखालील जमीन सिडकोच्या प्रचलित दराच्या १५ टक्के इतके शुल्क आकारून भाडेपट्टा तत्वावर प्रकल्पग्रस्तांना देणेबाबतचा प्रस्ताव असणे, या गोष्टीकरिता प्रकल्पग्रस्तांमध्ये नाराजीची भावना असणे, त्याऐवजी सदर बांधकामाखालील जमीन ही पूर्ण मालकी हक्काने मिळावी अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी असणे,त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी बांधकामाखालील जमीन ही भाडेपट्टयावर अथवा फ्रीहोल्ड न करता, या विस्तारित गावठाणांतील जमिनी या मालकी हक्काने देण्याकरिता सिडकोतर्फे विक्री करार करून देण्यात याव्यात अशी प्रकल्पग्रस्तांची मागणी असणे, असे केल्यास भविष्यात प्रत्येक छोट्या मोठ्या परवानगीकरिता सतत सिडकोकडे जावे लागणार नसणे, त्यामुळे गरजेपोटी बांधकामे नियमित करित असताना ती भाडेपट्टयावर देणेऐवजी कायमस्वरूपी प्रकल्पग्रस्तांना मालकी हक्काने देण्याकरीता शासनाने तात्काळ निर्णय घेण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२२७.	श्रीमती देवयानी फरांदे वि. स .स.	"नाशिक महानगरपालिका प्रशासनाचे पर्यावरणाकडे सुरू असलेले दुर्लक्ष, एम एन जी एल कंपनीच्यावतीने विविध यंत्रणांकडून कामकाज केले जाणे, इमारतीवर गॅस पाईपलाईन टाकणे, पाईपलाईनला गॅसचा पुरवठा करून देणे, या प्रकारच्या कामांचा समावेश असणे, याबाबत नाशिक महानगरपालिकेकडून ना हरकत प्रमाणपत्र दिले जाणे, या प्रत्येक कामासाठी स्वतंत्र रस्ता खोदला जाणे, या कंपनीबरोबर नाशिक महानगरपालिका प्रशासनाचा कोणताही समन्वय नसणे, यासाठी संबंधित कंपनीकडून रक्कम भरून घेऊन देखील रस्त्याची कामे वेळेवर न होणे, भरून घेतलेल्या रकमेचा वापर रस्ते दुरुस्तीसाठी न करता अन्य कामासाठी करणे, त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले असणे, याबाबत नाशिक महानगरपालिका प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष असणे, तसेच सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी विविध कामे करताना मोठ्या प्रमाणावर धूळ सर्वत्र पसरणे याबाबत कोणतीही उपाययोजना प्रशासनाने न करणे, तसेच इमारतीचे रीडेव्हलपमेंट करताना नियमाचे पालन न करता कोणतीही जाळी न लावता काम केले जाणे, महानगरपालिका प्रशासनाचे सदर बाबीकडे असणारे अक्षम्य दुर्लक्ष, तसेच बांधकामासाठी जाणाऱ्या गाड्यांमधून साहित्य पडून विविध	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अपघात होत असणे, तसेच रस्त्यावर पसरलेल्या धुळीमुळे देखील विविध अपघात होणे, नागरिकांना श्वसनाचे गंभीर आजार होणे, महानगरपालिका प्रशासनासह शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
२२८.	डॉ. जितेंद्र आव्हाड वि .स .स.	“दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी मुंबईच्या भांडुप येथील पश्चिम स्टेशन रोड या गजबजलेल्या परिसरात मुंबई महानगरपालिका उपक्रमा अंतर्गत असलेल्या बेस्टच्या चालकाचा यंत्रणेवरील ताबा सुटून त्यामध्ये ५ प्रवासी जागीच ठार झाल्याचे व अन्य १० प्रवासी जखमी अवस्थेत असल्याची दुर्घटना घडल्याचे आढळून येणे, सदर स्टेशनरोडवरील परिसरात अवैध फेरीवाले आणि भाजी विक्रेत्यांमुळे परिसरात जागा अपुरी राहत असल्यामुळे बस चालवितांना चालकाला तारेवरची कसरत करावी लागल्याचे वेळोवेळी निदर्शनास येत असणे, याप्रकरणी बस चालकाला पोलिसांकडून ताब्यात घेण्यांत आले असून चौकशी सुरु असल्याचे तर तसेच बेस्ट उपक्रमातर्फेदेखील या अपघाताची चौकशी करण्यांत येणार असल्याचे सांगण्यात आलेले असणे, तसेंच अपघातातील मृत व्यक्तींच्या कुटुंबियांस शासनाकडून ५ लाख रुपये	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तर बेस्ट उपक्रमामार्फत २ लाख रुपये.देण्याचे शासनाकडून व बेस्ट उपक्रमांकडून जाहीर करण्यांत आलेले असणे, त्याबाबत करण्यांत आलेल्या दोन्ही चौकशीमध्ये काय आढळून आले व पुढे कोणती कार्यवाही करण्यांत आली तसेंच शासनाने जाहीर केलेल्यानुसार मृतांच्या कुटुंबियांस रक्कम देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२२९.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मुंबईतील चर्नीरोड-गिरगाव पुलाच्या बांधकामाला विरोध करणाऱ्या सैफी हॉस्पीटल व्यवस्थापनाच्या विरोधात गिरणगावातील स्थानिक जनतेने, गिरगाव पुल समिती आणि मंगळवाडी, केळेवाडी रहिवाशी संघटनेच्या वतीने सैफी हॉस्पीटलच्या प्रवेशद्वारासमोर दि.१४.०२.२०२६ रोजी तीव्र आंदोलन करण्यात येणे, महर्षी कर्वे मार्गावर साहित्य संघ मंदिर, केळेवाडी हा सदरचा शंभर वर्ष जुना पादचारी पुल धोकादायक झाल्याने ४ वर्षांपुर्वी पाडण्यात येणे, चर्णीरोड रेल्वे स्थानकालगत असलेल्या पादचारी पुलावरुन, गिरगावात जाण्यासाठी हा महत्वाचा मार्ग असणे, परंतु सदरहू ठिकाणी पुल नसल्याने जीव धोक्यात घालून गिरगावात जाणारे प्रवासी व नागरिकांना महर्षी कर्वेरोड मार्ग ओलांडून जावे लागत असणे, या मार्गावरुन कायम मोठी वाहतूक असल्याने	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अपघात होण्याची शक्यता असणे, सदरहू ठिकाणी पुलाच्या बांधकामासाठी निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती केली असतांनाही, केवळ सैफी रुग्णालयाच्या मनमानीमुळे पुलाचे काम अद्याप सुरु न होता रखडणे, यामुळे येथील जनतेची झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
२३०.	श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर वि .स .स.	"महाराष्ट्राची राज्याची सांस्कृतिक राजधानी,शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या अनेक विभागांमध्ये माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२५ या कालावधीत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये प्रामुख्याने शहरातील कचरा न उचलता लाखो रुपयांची बोगस देयके अदा करण्यांत येणे, पुणे शहरात अनेक ठिकाणी कचऱ्यांचे ढिग साचणे, याचा नागरिकांना नाहक प्रचंड त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावर महानगरपालिका आयुक्तांचे कोणतेही नियंत्रण नसणे, कचरा घोटाळा पाठोपाठ शहरात अनेक ठिकाणी रस्त्यात खड्डे पडलेले असून दुरुस्तीच्या नावावर लाखो रुपयांची बोगस देयके उचलली जात असणे, तसेच ड्रेनेज लाईन अनेक दुरुस्ती न करतां खोटी देयके तयार	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करुन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे दिसून येणे, शहरात अनेक ठिकाणी महानगरपालिकाचे विद्युत खांब, लाईट बसविण्यात येत नसणे, त्यामुळे जनता महानगरपालिकेच्या संपूर्ण कारभाराला कंटाळली असणे, यासर्व बाबींस पुणे महानगरपालिकेचे आयुक्त व अतिरिक्त आयुक्त हे कारणीभूत असणे, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२३१.	श्री. महेश बालदी, श्री .प्रशांत ठाकूर वि .स .स.	"नवी मुंबईत (सिडको) महामंडळाकडून नैना प्रकल्पांतर्गत टी.पी.एस. ८, ९ व १२ मधील पायाभूत विकासाच्या कामासाठी M/s. PNC-Akshya JV Pvt. Ltd. या ठेकेदारास माहे ऑक्टोबर २०२४ दरम्यान वर्क ऑर्डर देण्यात आलेली असणे, दरम्यान, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दि. ०६/०५/२०२४ रोजी W.P. No. १३९७६ of २०२४ मध्ये दिलेल्या आदेशाद्वारे सदर वर्क ऑर्डर रद्द करण्याच्या सूचना केल्या असणे, तथापि उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर वर्क ऑर्डर प्रत्यक्षात रद्द करण्यात आली आहे का, याबाबत स्पष्टता नसणे, सदर कामाअंतर्गत संबंधित ठेकेदारास मोबलायझेशन अडव्हान्स देण्यात आलेला का, दिला असल्यास किती रकमेचा ॲडव्हान्स देण्यात आला,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सदर ॲडव्हान्स ठेकेदाराने सिडकोकडे परत केला का, जर ॲडव्हान्स परत करण्यात आलेला नसेल, तर त्याच्या वसुलीसाठी सिडकोने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली याबाबत शासनाने तात्काळ माहिती घेऊन ॲडव्हान्स वसुलीत दिरंगाई झालेली असल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाकडून जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच सदर प्रकरणात न्यायालयीन आदेश, सार्वजनिक निधीचा वापर, तसेच प्रशासकीय जबाबदारी यांचा गंभीर संबंध असल्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
२३२.	श्री. विलास भुमरे वि .स .स.	“राज्यात पारदर्शक प्रशासनाचा दावा केला जात असताना, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका येथे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत गंभीर आर्थिक अनियमितता उघडकीस आलेली असणे, महागाई भत्ता मूळ वेतनावर देणे अपेक्षित असताना एकूण वेतनावर लागू केल्यामुळे तीन कंत्राटी एजन्सींना तब्बल रुपये २२ कोटी ४२ लाख इतकी रक्कम जादा अदा झाल्याचे दि. २२ जानेवारी, २०२५ रोजीच्या लेखापरीक्षणात निदर्शनास येणे, सुमारे २ हजार ५०० कंत्राटी कर्मचारी विविध विभागांत कार्यरत असताना फाईल	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आठ स्तरांवर तपासली जाऊनही ही गंभीर चूक लक्षात न येणे, संबंधित एजन्सींवर अद्याप फौजदारी कारवाई, ब्लॅकलिस्टिंग किंवा जबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई न झाल्याची बाब समोर येणे, यामुळे शासनाच्या निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न निर्माण होणे, या प्रकरणी शासनाने केलेली चौकशी, जबाबदारांवर कारवाई व रकमेच्या वसुलीबाबतची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
२३३.	श्री. चंद्रदीप नरके वि .स .स.	“कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील ऐतिहासिक शाहू मिलच्या जागेवर लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारण्याची घोषणा २०१२ मध्ये शासनस्तरावर करण्यात येऊनही आजतागायत प्रत्यक्ष कामास सुरुवात न होणे, १६९ कोटी रुपयांच्या मूळ प्रकल्पास मंजुरी मिळून तातडीच्या निधीची घोषणाही करण्यात आलेली असताना महापालिकेला प्रत्यक्ष निधी न मिळणे, २५ सदस्यीय समितीची स्थापना जाहीर होऊनही ती प्रत्यक्षात कार्यरत न होणे, तसेच डीपीआर तयार होऊनही तांत्रिक मंजुरीअभावी फाईल विविध विभागांत प्रलंबित राहणे, दरम्यान शाहू मिलची जागा अद्याप वस्त्रोद्योग महामंडळाच्या ताब्यातच राहणे, कसबा बावडा कोल्हापूर येथील जन्मस्थळ व नर्सरी बागेतील समाधी स्थळाच्या कामास विलंब	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		होणे, परिणामी सामाजिक न्याय, समता व प्रबोधनाचे प्रतीक ठरणारा हा सांस्कृतिक प्रकल्प केवळ कागदावरच राहणे, परिणामी कोल्हापूरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांच्या स्मारकास तातडीने निधी उपलब्ध करून प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
२३४.	श्री. चंद्रदीप नरके वि .स .स.	“कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यात तसेच शहरालगतच्या सुमारे ४२ गावांचा समावेश असलेल्या प्राधिकरण क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून गुंठेवारीचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत असणे, १९८० नंतर नागरीकरणाच्या वाढत्या वेगामुळे शेतजमिनीवर प्लॉट पाडून हजारो कुटुंबांनी आपापल्या ऐपतीनुसार घरे उभारलेली असणे, परंतु आज प्राधिकरणाच्या आराखड्यात रहिवासी क्षेत्र नोंद नसल्याच्या कारणास्तव बांधकाम परवानगी नाकारली जात असणे, ग्रामपंचायतींचे अधिकार काढून घेतल्याने नागरिकांना परवानगी नेमकी कोणाकडून घ्यायची हा मूलभूत प्रश्न निर्माण होणे, बांधकाम परवाना नसल्याने बँकांकडून कर्ज न मिळणे व त्यामुळे घर दुरुस्ती, वाढीव बांधकाम अथवा पक्के घर उभारण्याची स्वप्ने अधांतरी राहणे, महापालिका क्षेत्रात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नियमितीकरण शक्य होत असताना प्राधिकरण क्षेत्रात ठोस निर्णय न होणे, परिणामी हजारो कुटुंबे कायदेशीर व आर्थिक कचाट्यात सापडणे, या पार्श्वभूमीवर गुंठेवारी नियमितीकरणाबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन नागरिकांना कायदेशीर दिलासा देण्यासाठी केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
२३५.	श्री. संजय उपाध्याय वि .स .स.	"बोरीवली विधानसभा मतदारसंघातील आर/मध्य विभागात रस्ते विभागामार्फत विविध रस्त्यांचे काँक्रिटीकरण, पर्जन्य जलवाहिनी इत्यादींची कामे वर्ककोड W-४४७(M/s. BPCPL Infrastructure Ltd.) व इतर कोड अंतर्गत कामे चालू असणे,सदररस्ते विभागाच्या कामात बऱ्याचश्या त्रुटी आढळल्या, त्यानुसार संबंधित रस्ते विभागाचे अधिकारी यांच्या सोबत वारंवार स्थळ पाहणी व बैठका घेतल्या व त्यांना सदर कामामध्ये कामाचा दर्जा सुधारणाच्या सूचना दिल्या परंतु रस्ते विभागाची संबंधित अधिकारी यांनी त्याची कुठलीही दखल न घेता मतदारसंघातील रस्त्याची कामे निम्न दर्जाची केली व सद्यःस्थितीत काहीकामे प्रगती पथावर असणे, बोरीवली मतदारसंघातील व बृहन्मुंबई महानगरपालिका परिमंडळ ७ यामध्ये रस्ते विभागामार्फत करण्यात येणाऱ्या सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या कामामध्ये खूप मोठा आर्थिक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाला असणे, सदर रस्त्याची कामे करत असताना महापालिका आयुक्त यांनी हवा गुणवत्ता सूचकांक सुधारण्याबाबत दिलेल्या निर्देश/सूचनांचे पालन संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांनी केलेले नसणे, तसेच खोदकाम केल्यानंतर बरेच ठिकाणी लोखंडी बॅरिकेटसचा वापर करण्यात न आल्यामुळे बऱ्याच ठिकाणी अपघात होऊन नाहक जनतेचा जीव गेलेला असणे, सदर रस्त्याचे कामे करत असताना संबंधित कंत्राटदार यांनी बांग्लादेशी कामगार यांच्याकडून काम करण्यात येत असल्याचे दिसून येणे, रस्ते बांधकाम या कामांमध्ये आर्थिक घोटाळा प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व सर्व रस्ते विभागातील सर्व संबंधित अधिकारी, अभियंता व ठेकेदार कंपनी यांच्याविरुद्ध शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."	
२३६.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील चेंबूर येथील एम पश्चिम विभागातील रस्ते, जलनि:सारण व्यवस्था,पायाभुत सुविधा आदी महत्वाची विकास कामे सुरु असलेल्या विभागातील, २५ हून अधिक अभियंत्यांची नियमबाह्य पध्दतीने परिमंडळ-५ चे उपायुक्त, देविदास क्षीरसागर यांच्या आदेशानुसार दि.२५.०२.२०२६ रोजी अचानक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तडका-फडकी, बदली करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडणे, बदली करण्यात आलेल्या संबंधित अभियंता हे अनुभवी व कर्तव्यदक्ष व त्यांच्याकडे कामाचा चांगला अनुभव असतांना व त्यांचे कामाबाबत कोणतीही तक्रार नसतांना, उपायुक्तांनी मा. महापालिका आयुक्तांची मान्यता न घेता, परस्पर गैरव्यवहार व अनियमितता करुन आणि प्रक्रियेतील नियमाचे उल्लंघन करुन, अचानक बदली करुन या कर्तबगार अभियंत्यांना तांत्रिक कामाऐवजी दुय्यम अथवा अडगळीच्या ठिकाणी व प्रशासकीय कामात गुंतवून ठेऊन, त्यांचे जागी मर्जीतील अभियंत्याना आर्थिक संगनमताने लाभदायक खाती देण्याचा गैरप्रकार घडणे, परिणामी या विभागात सुरु असलेल्या नागरी सुविधांच्या व महत्वांच्या प्रकल्पांच्या कामावर अनिष्ट परिणाम होऊन, प्रकल्प रखडण्याची शक्यता असणे तसेच या बदली प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याची शक्यता असणे, यामुळे सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन, संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२३७.	श्री. विजय वडेट्टीवार वि .स .स.	"नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (NAB) ही संस्था खान अब्दुल गफार खान मार्गावर वरळी स्थित असणे, या संस्थेच्या आवारात दिव्यांग कल्याणाचे कार्य करण्याकरीता राज्य शासनाने काही अटी व शर्ती नमूद करून या संस्थेस भूखंड मंजूर केलेला असणे, या अटी शर्तीचा भंग करून नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (NAB) या संस्थेच्या ट्रस्टीनी ब्लू सी बँक्वेट हॉलला काही माग हस्तांतरीत करणे, ब्लू सी बँक्वेट हॉल या संस्थेमार्फत बँक्वेट हॉल व क्लाऊड किचन चालविणे, या बँक्वेट हॉलला, मुंबई महापालिका, अन्न व औषध, प्रशासन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पोलीस आयुक्त कार्यालय यांची परवानगी नसणे, बँक्वेट हॉल नॅब (NAB) या संस्थेच्या आवारात कार्यरत असणे या हॉलमधील विविध कार्यक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययनामध्ये व निवासामध्ये अडथळे निर्माण होणे, या हॉलमधील कार्यक्रमामधील येणाऱ्या व्यक्तींचे आवाज, वाहने किचन व म्यूझिक सिस्टिम यामुळे नॅब (NAB) या संस्थेस उपलब्ध असलेल्या जागेवर बँक्वेट हॉलचे अतीक्रमण होत असल्यामुळे पर्यायाने दिव्यांग निवासी विद्यार्थ्यांना व इतर नागरिकांना त्रास होणे, या बँक्वेट हॉलकडून खान अब्दुल गफार खान मार्गावर, अवैध पार्कींग केली जाणे,ब्लू सी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बँक्वेट हॉलच्या वैले पार्कींगचे लोकांनी शाळेच्या बस चालकास व विद्यार्थ्यांच्या वाहन चालकास दमदाटी/अरेरावी करणे, सदर परवानगी तातडीने रद्द करून शासनाने यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२३८.	श्री. विक्रम पाचपुते वि .स .स.	"शासन निर्णय पीएमसी(RR) -३०१४/प्रक्र/नवि-२२,दि २६/०८/२०१४ हा शासन निर्णय पुणे महापालिकेस लागू करण्यात आला. त्यामध्ये एक समान संवर्गातील कनिष्ठ अभियंता ते शाखा अभियंता (स्थापत्य/ विद्युत) पदोन्नतीसाठी यांना वेगळा नियम व कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांना थेट उप अभियंता हि पदोन्नती देताना शाखा अभियंता हे पद वगळण्यात आले त्यासाठी वेगळा नियम लावण्यात आल्याचे निदर्शनास येणे, एकाच संवर्गातील (अभियांत्रिकी) स्थापत्य/विद्युत सन २०१४ च्या पूर्वी कामावर नियुक्त झालेल्या कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता पदावर पदोन्नतीसाठी विभागीय परीक्षेची अट शिथिल केली असणे, शासनामार्फत जा.क्र.पीएमसी/२०२२/प्रक्र-१२८/नवि-२२ दि १४/१२/२०२२ नुसार पुणे महानगरपालिकेत सन २०१४ पूर्वी नियुक्त झालेल्या अभियांत्रिकी संवर्गाकरिता विभागीय परीक्षा रद्द करणेबाबत आपल्या स्तरावर घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे २०१४	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नंतर नियुक्त झालेल्या अभियांत्रिकी संवर्गाच्या विभागीय परीक्षेबाबत आपल्या स्तरावर कार्यवाही करावी असे आदेश देणे, शहर अभियंता, पुणे महानगरपालिका अभियांत्रिकी विभागप्रमुख यांचेकडून मागविण्यात आलेल्या अभिप्रायानुसार शहर अभियंता यांनी सदर विभागीय ही परीक्षा रद्द करावे असा स्पष्ट अभिप्राय देण्यात येणे, शासनाकडील जाक्र पीएमसी-२०२५/प्रक्र५३३/नवि-२२ दिनांक २५/०९/२०२५ च्या पत्रानुसार मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांनी दिलेल्या आदेशान्वये विभागीय परीक्षेतील सूट बाबत कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, विभागीय परीक्षा रद्द करणेबाबत सर्व स्पष्ट अभिप्राय, शासनाचे आदेश, मा. उच्च न्यायालयाचे आदेश असताना देखील १० वर्षापासून कनिष्ठ अभियंता पदावर काम करणाऱ्या व शाखा अभियंता पदावर वेळेत पदोन्नती न मिळालेल्या सेवकांना महानगरपालिका सेवा प्रवेश नियमावली २०१४(RR) तील चुकीच्या नियमामुळे त्यांची सेवाज्येष्ठता गमवावी लागणार असलेने त्यांच्यावर अन्याय होणार असल्याने या अन्यायास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, सेवाप्रवेश नियमावली २०१४ (RR) मध्ये चुकीच्या नियमामुळे	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कोणत्याही अभियांत्रिकी सेवेतील सेवकाची सेवाज्येष्ठता व्यपगत होणार नाही आणि सेवकांवर अन्याय होणार नाही, अभियांत्रिकी संवर्गातील यांत्रिकी सेवाप्रमाणे पदोन्नतीसाठी स्थापत्य व विद्युत यांना एक समान न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
२३९.	श्री. शंकर जगताप वि .स .स.	"पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९७२ साली थेरगाव, वाल्हेकरवाडी, काळेवाडी, वाकड ठिकाणच्या आरक्षित केलेल्या शेतजमिनी, जागांवर १९८०-९० च्या दशकात स्थानिक शेतकऱ्यांनी गुंठा, दोनगुंठे प्लॉटिंग करून विक्री केलेल्या जमिनीवर गरजू अल्प मध्यम उत्पन्न गटातील कामगार, नागरिकांनी स्वतः राहण्यासाठी घरे बांधून तेथे मागील चाळीस-पंचेचाळीस वर्षापासून वास्तव्यास असणे, पिंपरीचिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे पुणे महानगरविकास प्राधिकरणामध्ये विलिनीकरण करताना नागरी वस्तीचा ताबा मनपाला हस्तांतरित केलेल्या भूखंडांवर नागरिकांनी बांधण्यात आलेल्या घरांना मनपाच्या वतीने नियमित मालमत्ताकर, पाणीपट्टी आकारण्यात येणे, महावितरणच्या वतीने सदर बांधकामावर नागरिकांच्या नावे वीजमीटर देऊन आकारणीही करण्यात येणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मनपाच्या वतीने सदर रहिवासी वसाहतींची रीतसर नोंदणी करून सर्वप्रकारच्या नागरी सुविधा पुरविल्या जाणे, मात्र त्यांच्या मालकी हक्का संदर्भात सातबारा उतारा, प्रॉपर्टीकार्ड उपलब्ध नसल्याने ताबेदार नागरिकांच्या जमिनी नावावर नसल्याने प्लॅनमंजुरी अधिकृत बांधकाम, गृहकर्ज, नोंदणी, हस्तांतर, कायदेशीर संरक्षण मिळण्यास अडचणी येणे, पिंपरी-चिंचवड मनपाच्या दि. १८.०६.२०२१ रोजीच्या आमसभेतील कार्यपत्रिका क्र. ५९ च्या ठरावानुसार अशा नागरिकांकडे ताबा असलेल्या क्षेत्रानुसार केवळ एक रुपया नाममात्र दराने प्रीमियम भरून अधिकृतनोंद करून हस्तांतरित करण्यास मान्यता दिली असल्याने ताबेदार नागरिकांना ७/१२ व प्रॉपर्टी कार्ड मिळण्याकरिता घरपट्टी, पाणीपट्टी, लाईटबिल हे ताबा प्रमाणपत्राचा पुरावा ग्राह्य धरण्यात येऊन सदर ताबेदारांच्या नावावर ७/१२ व प्रॉपर्टीकार्ड काढण्याची प्रक्रिया विशेष बाब म्हणून मंजूर करून शहरातील हजारो मध्यमवर्गीय कुटुंबीयांना हक्काचे घर, कायदेशीर सुरक्षितता, नागरीसुविधा व कायदेशीर अडचणीपासून दिलासा देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२४०.	श्री. अशोक पाटील वि .स .स.	"मुंबई जिल्ह्यातील कुर्ला तालुक्यातील मौजे भांडुप (प.) येथील सुषमा स्वराज म्युनिसिपल मॅटरनिटी होम हे परिसरातील एकमेव महानगरपालिका प्रसुतिगृह असून हजारो नागरिकांच्या आरोग्यसेवेची जबाबदारी या रुग्णालयावर असणे, मात्र प्रशासनाच्या गंभीर दुर्लक्षामुळे येथे अनेक वर्षांपासून डॉक्टर, परिचारिका, तांत्रिक व सहाय्यक कर्मचाऱ्यांची तीव्र कमतरता कायम आहे. आवश्यक वैद्यकीय उपकरणे, शस्त्रक्रिया कक्ष, औषधसाठा व आपत्कालीन सुविधा अपुऱ्या असल्याने गरोदर महिलांना उपचार नाकारून इतर रुग्णालयात पाठविण्याची वेळ येत असणे, अलीकडेच सुविधा अभावी प्रसुतीदरम्यान माता व नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली असून ही केवळ दुर्दैवी घटना नसून प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे झालेली गंभीर जीवितहानी असणे, नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेली ही कार्यपध्दत तात्काळ थांबविणे आवश्यक असणे, प्रसुतिगृहात त्वरित मनुष्यबळ भरती, अत्याधुनिक उपकरणे, औषधसाठा, सक्षम आपत्कालीन यंत्रणा व २४ × ७ प्रसुती सेवा सुरू करावी तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२४१.	श्री. सुनिल कांबळे, ॲड. राहूल कुल, श्री. भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर वि. स. स.	"युडीसीपीआर नुसार १:५ पेक्षा अधिक उतार क्षेत्रावर बांधकाम अनुज्ञेय नसणे, पुणे जिल्ह्यातील उतार जमिनीवर हिल स्लोप झोन व बीडीपी आरक्षण टाकणे, पुणे व्यतिरिक्त इतर कुठेही हा झोन अथवा आरक्षण नसणे, बापट समिती व जैन समितीने शिफारस केल्याप्रमाणे पुण्यातील ९७८.५४ हेक्टर जागेवर बीडीपी आरक्षण ठेवणे, मोबदल्यात ८% टीडीआ ची तरतूद जमीन मालकांना मान्य नसणे, त्यामुळे पुणे मनपा ८५३.०९ हेक्टर खाजगी जमिनीपैकी १% जमीनही संपादित करण्यास अयशस्वी ठरणे, शासकीय १२५.४५ हेक्टर पैकी कोणतीही जमीन सुरक्षित केलेली नसल्याची गंभीर बाब लक्षात येणे, मालकास जमीन विकसित करता न येणे अथवा योग्य मोबदलही न मिळणे, या आरक्षणातील ३०% पेक्षा अधिक जमीनीवर अतिक्रमण असणे, सीडॅक संस्थेच्या सर्वेक्षणात गंभीर त्रुट्या असल्याचे बापट समितीने मान्य करणे, वडगाव बु व इतर गावठाणावर आरक्षण व झोन टाकणे, येवलेवाडीमधील आउटर रिंग रोड करीता हिल स्लोपचे दरात जमीन देण्यास गावकऱ्यांचा असलेला विरोध, पुण्याचा प्रारूप वियो सन २००५ मध्ये शासनास सादर करणे व त्यामधील हिल स्लोपचा ईपी सुमारे वीस वर्षानंतर अद्यापही प्रलंबित ठेवणे, एप्रिल २०२५ मध्ये	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रामनाथ झा अभ्यास समिती गठीत करणे, समितीस तीन महिन्याचा कालावधी दिलेला असताना अद्याप अहवाल सादर न करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."	
२४२.	श्री. राजु तोडसाम वि .स .स.	"स्व.मंजुळा माधव तेलंग यांचे वारसा हक्काने कायदेशीर वारस श्रीमती कांता गिरीजाशांकर तेलंग यांच्या मालकीच्या न.भू.क्र.७२४/५ विलेपार्ले (पूर्व), ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर या मालमत्तेचे शासनाची दिशाभूल करीत खोटे व बनावटी कागदपत्रे बनवून श्री. मंगेश माधव तेलंग यांनी मे. एस. के. रिलेटर्स यांच्याशी करार करून गैरकायदेशीर बांधकाम करीत आहे.सदर व्यक्तीने कु. मंजुळा माधव तेलंग तसेच मंगेश माधव तेलंग यांनी तेलंग या आडनावाचा गैरफायदा घेऊन मंजुळाबेन माधव तेलंग हिच्या जामनगर येथील फलागाव (गुजरात)येथील मृत्यु दाखविले परंतु सदर चौकशी केल्यावर त्या गावी मंजुळा यांचे कोणतेही नातेवाईक नसल्याचे कळते,तसेच वडील महादेव उर्फ माधव तेलंग यांना पालघर येथील गाव विसरोळी येथील रहिवारी व तेथेच मृत झाल्याचे कळते,परंतु सदर गावात ग्रामपंचायत चौकशी केल्यावर अशा नावाचे कोणतेही व्यक्ती किंवा त्याचे नातलग या गावी राहत नसल्याचे समजणे,अशाप्रकारे मंगेश माधव तेलंग यांनी शासनाची	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		दिशाभूल करुन खोटे दस्तऐवज बनवून सदर जागा हडपण्याचा प्रयत्न करणे,जा.क्र.क्र.१२/२४ दि. १२. ०३. २०२४ कृष्णात कणषे, जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख,मुंबई उपनगर यास व जा.पत्र क्र.०६/२४ दि.०८-०८-२०२४ आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यास मे.एस.के.रिलेटर्स यांच्यावर कायदेशिर कारवाई करुन तात्काळ बांधकामास स्थगिती देण्याबाबत दिले परंतु अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसणे,मंजुळा माधव तेलंग हिचे वारसास कांता गिरीजाशंकर तेलंग या दलित महिलेला न्याय मिळवून देण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२४३.	डॉ. नितिन राऊत वि .स .स.	“राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात केंद्र व राज्य शासनाच्या मुद्रा योजना, पीएम स्वनिधी व स्टार्टअप योजनांच्या माध्यमातून अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज घेऊन फूड स्टॉल, मोबाईल फूड व्हॅन व इतर लघुउद्योग सुरू केले असणे,तथापि, पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथ विक्री नियमन) अधिनियम २०१४ लागू होऊनही नागपूर महानगरपालिकेकडून नगर विक्रेता समिती (TVC) स्थापन करणे, हॉकर्स झोन निश्चित करणे व पथविक्रेत्यांना ओळखपत्र देण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		परिणामी जरीपटका, पाचपावली, यशोधरा नगर तसेच सदर व सीताबर्डी परिसरातील पथविक्रेत्यांवर पोलीस व मनपा पथकांकडून वारंवार कारवाई करण्यात येत असून गाड्या जप्त करणे, साहित्य जप्त करणे व व्यवसाय करण्यास अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी असणे, त्यामुळे कर्जबाजारी झालेल्या तरुणांचे उपजीविकेचे साधन धोक्यात येणे, या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करून पथविक्रेता कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.”	
२४४.	श्री. विजय वडेट्टीवार वि .स .स	“मौजा बोरिवली येथील सी टी एस क्रमांक ६४२ सदर प्लॉट ६४७७ चौरस मीटर इतका होता व या ठिकाणी तीन बिल्डिंग तयार करण्यात आल्या व एक क्षेत्र यात ६४७७ चौ. मी, पैकी हे एक रिक्रेशन ग्राउंड म्हणून राखीव ठेवण्यात आले होते जे की तीनही टॉवरच्या सामायिक मालकीचे होते या ठिकाणी ओम महेश्वर निकेतन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड यांनी २०१५ मध्ये जिल्हाधिकारी यांचेकडे सामायिक प्लॉट एकत्रीकरण करण्यासाठी विनंती करणे, जिल्हाधिकारी यांनी सम प्रमाणात पब्लिक युटीलिटीचे प्लॉटच्या वितरण करत असणे, परंतु रिटा पॅलेस को. ऑ .हौ .ली यांनी शासकीय अधिकारी यांना हाताशी धरून व	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		संगनमताने पब्लिक युटीलेटी चा प्लॉट त्याच्या नावावर ती दाखवत जादाचे एफएसआय वापरून घेत सदर बिल्डिंगचे बांधकाम करून घेणे, शासनाच्या नगर भूमापनअधिकारी तसेच महानगरपालिका अधिकारी यांना हाताशी धरून या बिल्डरने जनतेला फसून बिल्डिंगचे काम करून घेणे व त्याची विक्री करून टाकणे तद्नंतर याची तक्रार शासनाकडे होत असणे, शासनातील जबाबदार अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न करणे त्यामुळे सदर रिटा बिल्डर्स शासनासोबत केलेली फसवणूक व संबंधित अधिकारींनी केलेली फसवणूक प्रथम दर्शनीय पाहता त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करून सदर बिल्डिंगला दंड सह रेगुलर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२४५.	श्री. रईस शेख वि .स .स.	“ भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेत अनेक पदांचा कार्यभार एकाच अधिकाऱ्यांवर सोपविण्यात येणे, महानगरपालिकेतील अनेक पदे दिर्घकाळापासून रिक्त असल्याने विविध शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यात मोठ्या प्रमाणात येत असलेल्या अडचणी, काही लिपिक त्या संबंधित पदाकरिता पात्र नसतांनाही त्या पदाचे काम पाहत असणे, तसेच अनेक विभागाचे प्रमुख हे लिपिक पदातून आले असणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्यामुळे विकास कामे संथगतीने सुरु असणे तर कांही कामे ठप्प् असणे, यामुळे मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार वाढत असणे, भिवंडी uनिजामपूर शहर महानगरपालिकेत मंजूर पदांपैकी अनेक पदे रिक्त असणे, पालिकेतीलअत्यंत महत्वाचे असलेली वर्ग - वर्ग -२ मधील सहाय्यक आयुक्त-८ रिक्त असणे, तसेच भिवंडी महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील १८२ भरती करण्याची प्रक्रिया झाली असणे, त्यांची मागणी मनपाने नगरविकास विभागाकडे करणे, विभागाकडून अंमलबजावणी करणे गरजेचे असणे, सदर पदे रिक्त असल्याने महानगरपालिकेकडून काम करणे अवघड होणे, सदर पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि २९ सप्टेंबर, २०२५ रोजी मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही अद्याप दखल न घेणे, त्यामुळे विकास कामांवर होत असलेला परिणाम, याबाबत शासनाने तात्काळ लक्ष घालून भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	
२४६.	श्रीमती सरोज अहिरे, डॉ. जितेंद्र आव्हाड वि .स .स.	“कल्याण (जि. ठाणे) मोहने गाळेगाव परिसरात दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास ४-५ भटक्या कुत्र्यांनी तेथील एका सात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वर्षीय खुशील शंकर वाघे या बालकावर हल्ला करुन त्याचे अक्षरशः लचके तोडल्यामुळे रुग्णालयात उपचार घेताना दुर्दैवी मृत्यू होणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर या उपनगरामध्ये एक हजार पेक्षा जास्त भटकी कुत्री असणे सदर भटकी कुत्री दररोज किमान २० ते २५ व्यक्तिचा चावा घेत असणे, आतापर्यंत एका महिन्यात ६०० व्यक्तिचा या भटक्या कुत्र्यांनी चावा घेणे, भटक्या कुत्र्यांबद्दल उल्हासनगर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, महानगरपालिकेमधील पशुवैद्यकीय विभागातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना व संबंधित यंत्रणेकडे तथा महानगरपालिका आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त कार्यालयाकडे माहे जानेवारी २०२६ मध्ये स्थानिक रहिवाशांनी किमान २० वेळा लेखी/मौखिक तक्रार करुन देखील संबंधित स्थानिक प्राधिकारी संस्थेकडे अपुरा कर्मचारी वर्ग असल्याचे कारण देवून तसेच निर्बीजीकरण/लसीकरण करण्यासाठी अजिबात कर्मचारी नसल्यामुळे कोणतीही कार्यवाही करता येणार नाही अशी सुस्पष्ट उत्तरे संबंधितांनी स्थानिक नागरिकांना देण्यात येणे, महानगरपालिका रुग्णालयांमध्ये देखील रेबीज प्रतिबंधक लसीकरण औषधे उपलब्ध नसल्यामुळे उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली मधील माहे जानेवारी व फेब्रुवारी	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		२०२६ मध्ये ८ बालकांचा गेलेला बळी, अबालवृध्दांना या भटक्या कुत्र्यांमुळे जीव मुठीत धरून वावरावे लागणे, महानगरपालिकेचा पशुवैद्यकीय विभाग व आरोग्य विभागाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेले नाराजीचे, असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२४७.	श्री. विकास ठाकरे वि .स .स.	"फेरीवाल्यांच्या उपजीविकेचे संरक्षण करणे आणि शहरात नियोजित Hawking Zones विकसित करणे नागपूर महानगरपालिकेची कायदेशीर जबाबदारी असणे, तसेच Town Vending Committee स्थापन करून फेरीवाल्यांचा सर्वेक्षण करुन त्यांना कायदेशीर जागा देणे, नागपूर शहरात पुरेशा Hawking Zones विकसित करण्यात महानगरपालिका पूर्णपणे अपयशी झाली असणे, हजारो फेरीवाले जे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी रस्त्यावर छोटा व्यवसाय करतात त्यांच्याशी गुन्हेगारांप्रमाणे वागणूक दिली जात असणे, नियोजित Hawking Zones नसल्यामुळे फेरीवाल्यांना रस्ते आणि फुटपाथवर व्यवसाय करण्याशिवाय पर्याय राहत नसणे, त्याऐवजी पोलीस आणि महानगरपालिकेचे पथक वारंवार कारवाई करून त्यांचा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		माल जप्त करुन दंड आकारत असणे, रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या गरीब फेरीवाल्यांवर सतत अन्याय आणि त्रास दिला जात असणे, नागपूर महानगरपालिकेला शहरात तातडीने पुरेशा Hawking Zones निश्चित करून विकसित करण्याचे निर्देश देऊन फेरीवाल्यांचे सर्वेक्षण पूर्ण करून त्यांना vending certificates/ ओळखपत्रे, Hawking Zones तातडीने देणे, नागपूरमध्ये Street Vendors Act ची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबत तसेच त्यांच्या उपजीविकेचे संरक्षण करणे आणि नियोजनबद्ध Hawking Zones तयार करणेबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२४८.	श्री. अमित साटम वि .स .स.	"मुंबई उपनगर जिल्ह्यातील अंधेरी (पूर्व) येथील एम.आय.डी.सी. रोड क्र.११, सुभाषनगर, भंगारवाडी या परिसरात असलेल्या अनधिकृत धार्मिकस्थळाचे बहुमजली बांधकाम कोणतीही परवानगी न घेता सुरू असणे. सदर धार्मिक स्थळाची जागा ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार शाळा तसेच सार्वजनिक बाग या प्रयोजनार्थ राखीव असणे, अशी वस्तुस्थिती असतानाही, मुंबई महानगरपालिकेच्या सदर राखीव भुखंडावर धार्मिक स्थळाचे अतिक्रमण करून, अनधिकृत	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बांधकाम टप्याटप्याने सुरू असणे, सदर अवैध बांधकामामुळे नागरिकांसाठी असलेला प्रवेशमार्ग बंद झालेला असणे, सदर धार्मिक बांधकाम हे अनधिकृत असून, ते तात्काळ थांबवावे व झालेले बांधकाम काढून घ्यावे असा आदेश मुंबई महानगरपालिका वॉर्ड के/पुर्व यांनी संबंधित संस्थेला दिनांक २०/१२/ २०२४ रोजी दिलेला असणे, परंतु आजपर्यंत सदर अनधिकृत धार्मिक स्थळाचे बांधकाम काढून घेतलेले नसणे, त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये असंतोष पसरून, धार्मिक सलोखा व शांतता धोक्यात आलेली असणे, त्याअनुषंगाने सदर प्रकरणाची उच्चस्तरीय समितीव्दारे चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, सदर धार्मिकस्थळाचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करून सदर भुखंड सार्वजनिक प्रयोजनार्थ मोकळा करणे, भविष्यात अशा प्रकारच्या धार्मिक अतिक्रमणांना प्रतिबंध करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२४९.	ॲड. श्रीजया चव्हाण,श्री .जितेश अंतापुरकर वि .स .स.	“नांदेड जिल्ह्यामध्ये ११ “क” वर्ग नगरपरिषदांसह ४ नगरपंचायती असून आताची आकडेवारी लक्षात घेता सन-२०११ च्या जनगणनेनंतर या क्षेत्रातील लोकसंख्येमध्ये लक्षणीय वाढ झालेली असणे, या स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी आणि मर्यादीत असल्यामुळे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नागरीकांना मुलभूत अत्यावश्यक सेवा सुविधा पुरविण्यामध्ये अडचणी निर्माण होणे, परिणामत: वाढत्या लोकसंख्येमुळे येणारा ताण पहाता "क" वर्ग नगरपरिषदा आणि नगरपंचायतींची आर्थिक स्थिती अधिक बिकट होणे, मात्र शासन स्तरावरुन "क" वर्ग नगरपरिषदा व नगर पंचायतींची आर्थिक क्षमता व स्त्रोत वाढविण्यासाठी कोणत्याही उपाययोजना करण्यात होणारी दिरंगाई आणि उदासीनता, परिणामी सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."	
२५०.	श्री. सुरेश धस वि .स .स.	"कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील पिडीत शेतकऱ्यांच्या काही जमिनी विकासकांना ४०-४५ टक्क्यांच्या बांधकाम करून शेतकऱ्यांना देण्याच्या मोबदल्याने विकसन करार करुन दिल्याने विकासकांनी त्यांची फसवणुक करुन त्यांचा मोबदला सुध्दा तिऱ्हाईत सदनिका धारकांना विकुन टाकलेला असणे, धारक शेतकरी व सदनिकाधारक या दोघांची फसवणुक होत असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका पोलिस विभाग हद्दीतील अनेक तक्रारी संबंधित पोलिस विभागाला मिळालेले आहेत असेच एक प्रकरण मौजे-गौरीपाडा तालुका कल्याण येथील सर्व्हे क्र. ५२/४ व इतर सर्व्हे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		क्रमांकामध्ये एका शेतकऱ्याचे मोबदला ४५ टक्के चटईक्षेत्र बांधकाम परस्पर विकासकांनी बँकेचे लोन करुन विकत घेणाऱ्या ४० सदनिका धारकांना विकुन टाकलेले असणे, विकासकाने दोघांचे फसवणुक केल्याने विकासकावरती मोक्का लावुन फसवणुक केल्याचे दिनांक २५/२/२०२६ व २७/२/२०२६ रोजी आर्थिक गुन्हे शाखा ठाणे, अपर पोलिस आयुक्त गुन्हे ठाणे सहाय्यक संचालक नगररचना कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे गैरव्यवहार, गैरप्रकार, गैरकारभाराचे तक्रार प्राप्त असुन गृहविभागाने अशा विकासकांची महानगरपालिकेत चौकशी करुन मोक्का लावण्यासाठी शासनाने करावयाची कठोर कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.”	
२५१.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	“ मुंबई महापालिकेच्या दहिसर येथील कार्यालयात धर्मराज दावणे यांनी बनावट डिप्लोमा व डिग्री प्रमाणपत्राच्या आधारे दुय्यम अभियंता पदावर बेकायदा नियुक्ती मिळवून सेवेचा लाभ घेतल्याचा नुकताच उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, सदरहू धर्मराज दावणे यांचे दहावीपर्यंत शिक्षण झाले असून बनावट डिप्लोमा व डिग्रीचे शैक्षणिक प्रमाणपत्र सादर करुन, महापालिकेच्या दुय्यम अभियंता पदावर २०१३ पासून सेवेत कार्यरत असणे, सद्य:स्थितीत सदरहू दुय्यम अभियंता हे एम पुर्व	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वार्ड गोंवडी येथून, बृहन्मुंबई महापालिका आयुक्तालय, नगर उपअभियंता (ई.बा) धोबीतलाव सीएसएमटी, मुंबई येथे सेवेत कार्यरत असणे, धर्मराज दावणे यांनी बनावट डिप्लोमा व डिग्री प्रमाणपत्र सादर करुन, १२ वर्ष महापालिकेच्या सेवेचा व सोयी-सुविधांचा लाभ घेऊन, मुंबई महापालिकेची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार घडणे, धर्मराज दावणे यांना शासनाने सेवेतून बडतर्फ व विभागीय चौकशी करुन, त्यांच्या विरुध्द फौजदारी कारवाई करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
२५२.	श्री. संजय उपाध्याय,श्री .अमित साटम वि .स .स.	"महाराष्ट्र नगर, मानखुर्द पश्चिम ते चिता कॅम्प ट्रॉम्बे या परिसरात नाला रुंदीकरण प्रक्रियेदरम्यान निर्वासित होणाऱ्या ११७९ पात्र झोपडपट्टी धारकांची पुनर्वसन योजना राबविलेली असणे, सदर पुनर्वसन योजनेदरम्यान बोगस लाभार्थ्यांना पात्र केल्याबाबतची लक्षवेधी सन २०२५ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन मध्ये लक्षवेधी सुचना क्रमांक १९९० उपस्थित केलेले असणे, सदर लक्षवेधीच्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी दिलेल्या निवेदनामध्ये १६२ झोपडीधारकांनी सादर केलेल्या सर्व पावत्या खोट्या असल्याचे सांगितले असणे, सदर प्रकरणात ४००	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		हून अधिक बोगस लाभार्थी असल्याच्या तक्रारी असणे, उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.) या कार्यालयाचे बनावट लेटरहेड, शिक्के, सह्या वापरुन बोगस पात्रता मिळवलेली असणे, सदर बनावट कागदपत्रे तयार करुन मान्यता देण्यात महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचाही सहभाग असणे, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून हेतुपरस्पर कागदपत्रांची सत्यता न तपासता अपात्र लाभार्थ्यांना पात्र करणे एका बोगस लाभार्थ्यांस लाभ मिळवून देण्यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी हे किमान ३० लाख रुपये प्रत्येकी घेत असणे, या प्रकरणाची चौकशी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चौकशी अधिकाऱ्यामार्फत करणे योग्य नसणे. सदर महाघोटाळ्याचे चौकशी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीव्दारे करणे आवश्यक असणे. या प्रकरणाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२५३.	श्री. राजन नाईक,श्रीमती स्नेहा दुबे वि. स .स.	“वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील पूर्वेकडील भागातील एक प्रचंड मोठे क्षेत्र हे मूलभूत सोयीसुविधांच्या अभावामुळे अत्यंत गलिच्छ,दाटीवाटीचे आणि अनारोग्यकारक बनलेले असणे,एकूण १०	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		लाख १६ हजार मालमत्तांपैकी आरक्षित तसेच अनारक्षित जागांवरील ४ लाख ९९ हजार मालमत्ता ह्या अनधिकृत असणे,या वसाहती खाजगी तसेच सरकारी मालकीचे भूखंड, रेल्वे,वन खाते,गुरचरण आणि आदिवासींच्या मालकीच्या अशा अनेक जमिनींवर वसलेल्या असणे,खाजगी जमीनींवरील अनधिकृत तसेच अधिकृत अशा दोन्ही प्रकारांतील घरांच्या जमीनी अजुनही मुळ मालकांच्या नावे असल्याने रहीवाशांचा कायदेशीर हक्क नसणे,या इमारती बहुमजली असणे व जागांचे भाव कमी असणे यामुळे सध्याची SRA स्कीम ची असलेली नियमावली बघता या भागाचा विकास होणे अडचणीचे असल्याचे मत अनेक तज्ञ आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून व्यक्त होणे,सन २०२० पासून लागु झालेल्या UDCPR २०२० नुसार या क्षेत्रासाठी URS योजनेचे सादरीकरण झालेले असुनही आजतागायत महापालिकेने क्लस्टर क्षेत्रांबाबत कार्यवाही न होणे,यामुळे या क्षेत्रात क्लस्टर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी महापालिका अपयशी ठरली असणे,परिणामी शासनाप्रती नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे,वसई विरार मनपा क्षेत्रात अनेक मोडकळीस आलेल्या इमारती कोसळण्याच्या घटना मागील वर्षी घडल्या असून यामध्ये अनेक निष्पाप नागरिकांचा	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मृत्यू झाला असणे,अशा प्रकारच्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी या क्षेत्रात क्लस्टर योजना प्रभावीपणे राबविण्याची नितांत आवश्यकता,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वभूमिका."	
२५४.	श्री. विलास तरे वि .स .स.	"वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात अत्यंत गंभीर स्वरूपाचे आर्थिक गैरव्यवहार व प्रशासनातील अनियमितता झाल्याची धक्कादायक बाब समोर आलेली असणे, शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया कोणतेही स्पष्ट व ठोस कारण न देता सलग २ ते ३ वेळा रद्द करण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, प्रत्येक वेळी अटी-शर्ती बदलून पुन:पुन्हा निविदा काढण्यात येत असल्यामुळे विशिष्ट ठेकेदारांना लाभ मिळावा म्हणून हेतुपुरस्सर प्रयत्न केले जात असल्याचा गंभीर संशय निर्माण झालेला असणे, या संपूर्ण प्रक्रियेमुळे महानगरपालिकेवर कोट्यवधी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडत असणे, त्यामुळे सदरचा ठेका रद्द करून पारदर्शक पद्धतीने नवीन निविदा प्रक्रिया सुरू करणे, या प्रकरणाची उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यासाठी एसआयटी चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच घनकचरा व्यवस्थापनातील निविदा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रक्रियेत पारदर्शकता व उत्तरदायित्व उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२५५.	श्री. मोहन मते वि .स .स.	“नागपूर शहरातील मानेवाडा चौक ते ओंकार नगर चौक या दरम्यान रस्त्यालगत मोठ्या प्रमाणावर चिकन विक्रेत्यांनी अनधिकृत दुकाने व बांधकामे उभारलेली असणे, संबंधित जागांवर कोणताही वैध बांधकाम परवाना घेतलेला नसून रस्त्याच्या हद्दीतच अतिक्रमण करण्यात येणे, या अतिक्रमणामुळे रस्त्याची प्रभावी रुंदी कमी झाली असणे,या मार्गावर सतत वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, परिणामी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागणे, विशेषतः आपत्कालीन सेवांना अडथळा निर्माण होत असून या परिसरात अनेक अपघात घडून जीवितहानी झाल्याच्या घटना होणे, याबाबात शासन विभागामार्फत तातडीने संयुक्त पाहणी करणे, सर्व अवैध बांधकामे व अतिक्रमण त्वरित हटवावे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	कित्ता
२५६.	श्री. मोहन मते,श्री .प्रविण दटके वि .स .स.	“नागपूर शहरात नागपूर सुधार प्रन्यास प्राधिकरण (एन.आय.टी.) सक्करदरा स्ट्रीट स्किममध्ये पार्किंग करिता भूखंड राखीव ठेवण्यात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आला असतानाही हा भूखंड भूमाफियानी अतिक्रमण करून गिळंकृत केला असणे, त्यामुळे सक्करदरा येथील खसरा सर्वे नंबर ५९६ व इतर गुरुदेव नगर नागपूर येथील रहिवाश्यांची मोठ्या प्रमाणात गैर-सोय होऊन अनेक समस्या निर्माण झालेल्या असणे, त्यामुळे येथील नागरिक नाराजी व्यक्त करत असणे, नागपूर सुधार प्रन्यास प्राधिकरणकडे स्थानिक नागरिकांनी सदर पार्किंगसाठी राखीव असलेला भूखंड खुला करण्याची मागणी केलेली असणे, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने तात्काळ दखल घेऊन दोषींवर ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, सदर पार्किंगच्या भुखंडावर झालेले अतिक्रमण दूर करण्याची मागणी स्थानिक जनतेतून व लोकप्रतिनिधी कडून सतत होत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२५७.	श्री. अमित साटम वि .स .स.	"मुंबई सारख्या महानगरांमध्ये बांधकाम व पाडकामातून निर्माण होणारा कचरा (Construction & Demolition Waste) हा एक गंभीर पर्यावरणीय आणि नागरी समस्या म्हणून पुढे येत असणे, जुनी इमारती पाडून पुनर्विकास करणे, भूमिगत पार्किंगसाठी उत्खनन, मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प, रस्ते रुंदीकरण, अतिक्रमण हटविणे तसेच घरांच्या आतील दुरुस्ती-कामांमुळे मोठ्या प्रमाणात C&D कचरा निर्माण	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		होत असणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (MPCB) सादर केलेल्या अंदाजानुसार मुंबईमध्ये दररोज सुमारे ८,००० टन C&D कचरा निर्माण होणे, मुंबईमध्ये बांधकाम परवानगी घेताना विकासकांना Debris Management Plan सादर करणे आवश्यक असणे, या योजनेनुसार निर्माण होणारा कचरा अधिकृत ठिकाणी वैज्ञानिक पद्धतीने टाकणे बंधनकारक असणे, मात्र, अलीकडे महापालिकेने केलेल्या आढाव्यात असे निदर्शनास आले आहे की बहुतांश विकासकांनी प्रत्यक्षात हा कचरा अधिकृत ठिकाणी नेलेला नसणे, यावरून असा संशय व्यक्त होत आहे की हा कचरा अनधिकृतरीत्या मोकळ्या जागांमध्ये, कांदळवन क्षेत्रांमध्ये, जंगल भागात किंवा खाडी किनारी टाकला जात असणे, अशा प्रकारच्या कचरा टाकण्यामुळे पुढील गंभीर समस्या निर्माण होत असणे, सार्वजनिक जागांमध्ये अनधिकृत कचरा टाकणे, कांदळवन व वनक्षेत्रांचे नुकसान, मोठ्या व लहान नाल्यांमध्ये गाळ साचणे, धूळप्रदूषण वाढून AQI बिघडणे, पूरस्थितीची शक्यता वाढणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
२५८.	श्री. अशोक पाटील वि .स .स.	“१) जादुटोणा करणे (मा. उच्च न्यायालयाने नोंदविलेला मुद्दा) २) गुंडगिरी करण्यासाठी भावाचा-मित्रांचा वापर करणे (मा. उच्च	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		न्यायालयाने नोंदविलेला मुद्दा) ३) मनपा सेवेतील महिलांचे लैंगिक शोषण केले आहे. (मा. उच्च न्यायालयाने नोंदविलेला मुद्दा) ४) अधिकार नसताना तसेच नियमबाह्य रितीने श्री.जगताप यांनी स्टॉलसाठी मान्यता दिली हे खरे आहे काय? चौकशी नंतर सदर सर्व स्टॉल ची मान्यता रद्द करण्यात आली. संदर्भ : दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. पुढारी २७ मार्च २०२५ ५) टॅक्स विभागाचा कार्यभार असताना अति. आयुक्त यांचे स्तरावरील अधिकार असणाऱ्या प्रकरणावर स्वत:चे सहीने कोट्यावधी रुपयांचा टॅक्स माफ करुन मनपाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान केले. ६) पर्यावरण विभागाचा कार्यभार असताना कोट्यावधी रुपयांची जलपर्णी काढणेबाबत निविदा प्रक्रिया राबविणेआधीच बिले काढली. संदर्भ : दै. पुढारी २५ नोव्हेंबर २०२३ मनपा आयुक्तांची परवानगी न घेता तसेच कोणतीही रजा न घेता ८ दिवस हाँगकाँग ट्रीप (परदेश वारी) केली. ८) आकाश चिन्ह विभागाचा कार्यभार असताना कोर्टाच्या आदेशाप्रमाणे व्होर्डींग मान्यता दिली याची चौकशी झाली आहे का ? ९) अंतर्गत तक्रार निवारण समिती पुणे महानगरपालिका यांनी श्री. माधव के. जगताप यांच्या विरोधातील गंभीर तक्रारींची नोंद घेऊन संबंधीत विभागास कळवीले होते	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		याची कार्यवाही अथवा चौकशी झाली आहे काय ? याबाबत शासनाने चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२५९.	श्री. मोहन मते वि .स .स.	"वसई-विरार महानगरपालिकेच्या डी.एम. पेटीट रुग्णालयात मोठ्या प्रमाणात मुदतबाह्य (Expired) औषधांचा साठा असल्याची धक्कादायक बाब दि. ६ मार्च, २०२६ रोजी समोर आली असणे, भाजपच्या स्थानिक नगरसेवकांनी अचानक टाकलेल्या धाडीत गोदामामध्ये ही औषधे सापडलेली असून, महापालिकेच्या आरोग्य विभागाचा गैर कारभार चव्हाट्यावर आला असणे, या प्रकरणात रुग्णालयाच्या गोदामात मुदत संपलेली औषधे साठवून ठेवून रुग्णांच्या जिवाशी खेळ खेळला जात असल्याचे दिसून येणे, रुग्णालयातील डॉक्टरांकडून विशिष्ट कंपन्यांची ब्रँडचीच औषधे लिहिली जात असल्याचे उघड झाले असून, यामध्ये मोठे आर्थिक रॅकेट असण्याची शक्यता असणे, स्थानिक वसई पोलिसांनी या गोदामाला सील लावले असून औषध साठ्याचा पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असणे, रुग्णांच्या आरोग्याशी संबंधित हे प्रकरण अतिशय संवेदनशील असून, यामध्ये केवळ कनिष्ठ कर्मचारीच नव्हे तर वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांचेही संगनमत असण्याची असलेली दाट शक्यता.	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		यास्तव या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून तात्काळ दोषी अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याबाबत, तसेच औषध खरेदी आणि वाटप प्रक्रियेतील भ्रष्टाचाराची प्रकरणे शोधून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी संपूर्ण राज्यातील महापालिका रुग्णालयांच्या औषध साठ्याची तपासणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२६०.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मुंबईतील एम पश्चिम वार्ड, वडाळा पूर्व भक्ती पार्क आणिक व्हिलेज येथील सीटीएस क्र. १A/११ आणि १A/१२ या कांदळवनापासून प्रतिबंधित ५० मीटरच्या आत प्रोकॉन कंपनीने, प्रोकॉन आरएमसी प्लॉंट बेकायदेशीररित्या उभारण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदरहू आरएमसी प्लॉंटच्या माध्यमातून प्रोकॉन कंपनी मोठ्या प्रमाणात व्यवसाय करुन कोट्यावधी रुपयांचा नफा कमावित असणे, सदरहू कंपनीने उपरोक्त प्रतिबंधित क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कांदळवन झाडांची कत्तल करुन व त्या जागी भराव टाकून, आरएमसी प्लॉंट उभारण्यात येणे, सदरहू प्लॉंटसाठी कंपनीने तहसिलदार पर्यावरण, महाराष्ट्र सागरी किनारा नियंत्रण विभाग, सीआरझेड याबाबतच्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कोणत्याही परवानग्या न घेता, कांदळवनाच्या जागेत बेकायदेशीर व अनाधिकृतपणे आरएमसी प्लाँटच्या माध्यमातून व्यवसाय सुरु करुन, शासनाची फसवणूक करण्यात येणे, प्लाँटच्या कामाकरिता मुख्य नाल्यात भराव करुन, लागणाऱ्या सामुग्रीचे वाहतुक करण्यासाठी पूर्व दृतगती महामार्गाचा, अनाधिकृतपणे वापर करण्यात येणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
२६१.	श्री. बाबाजी काळे वि .स .स.	"चाकण नगरपरिषद हद्दीत दिनांक १६ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री पुणे-नाशिक महामार्गाच्या आंबेठाण चौकाच्या जवळील उड्डाणपुलाच्या लगत सेवा रस्त्यावर शोभा विजय वाघमारे वय वर्षे ३३ या महिलेचा विवस्त्र व शरीराचे लचके भटक्या कुत्र्यांनी तोडलेला मृतदेह सापडला असणे,चाकण उत्तर पोलीस स्टेशन यांचेकडून चौकशी सुरू असणे, विविध माध्यमातून याबाबत वृत्त प्रसारित झाले असणे व कुत्रा आणि लांडगा संकर वॉल्फडॉग असल्याची चर्चा असणे,चाकण नगरपरिषद व परिसर येथे मोठ्या प्रमाणावर भटके श्वान व दंश घटना रोज घडत असणे, महापालिका हद्दीतील श्वान खेड तालुक्यातील भागात सोडले	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जात असणे,परिणामी चाकण शहरात मोठ्या प्रमाणावर भटकी कुत्री असणे, सदर मयत महिला रोजगार चाकण येथे रहिवास करत असणे व त्यांचे अपंग मुलं मुळ गावी असणे,त्यास केवळ मयत महिला म्हणजेच त्याची आई याच जबाबदार पालक असणे, त्यामुळे त्या अपंग मुलाच्या भविष्यासाठी शासनाने आर्थिक मदत सह विशेष लक्ष देणे आवश्यक असणे, व भटक्या श्वान अनुषंगाने आणि याबाबत शासनाची प्रकरणी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२६२.	कॅप्टन आर. सेल्वन वि .स .स.	"मुंबई महानगरपालिकाक्षेत्रात हजारो फेरीवाले मागील अनेक दशकांपासून अधिकृत परवाना धारक म्हणून आपला व्यवसाय करत असून नियमितपणे पालिकेचा कर भरत असणे, दुर्दैवाने, मूळ परवानाधारकाचे निधन झाल्यास, त्यांच्या वारसांकडून कर स्वीकारण्यास महापालिका प्रशासन तांत्रिक कारणास्तव नकार देणे, परवाना जोपर्यंत वारसाच्या नावे हस्तांतरित होत नाही, तोपर्यंत तो परवाना सक्रिय ठेवला जात नसणे, मुंबई महापालिकेच्या या धोरणामुळे गरीब फेरीवाल्यांवर कराचा डोंगर उभा राहत असणे, वर्षानुवर्षे कर न भरल्या गेल्यामुळे दंड आणि व्याजाची रक्कम मूळ रकमेपेक्षा जास्त होणे, अखेरीस महापालिका अशा फेरीवाल्यांना 'अनधिकृत' ठरवून	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्यांचा व्यवसाय बंद करीत असल्याची बाब अत्यंत अन्यायकारक असणे, यामुळे एका बाजूला मुंबई महानगरपालिकेच्या महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होणे तर दुसऱ्या बाजूला शेकडो कुटुंबे बेरोजगार झाल्याचे निदर्शनास येणे, पीएम स्वनिधी योजनेअंतर्गत मुंबई महानगरपालिकेने हजारो फेरीवाल्यांना कर्जासाठी शिफारस पत्रे (LoR) देऊन प्रोत्साहीत केले असताना देखील पालिकेचे अतिक्रमण विभाग सदर व्यवसायिकांचे सामान जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करीत असणे,फेरीवाला धोरणाची आणि टाऊन वेंडिंग कमिटीची अंमलबजावणी रखडल्याने,अधिकृतरीत्या व्यवसाय कुठे करावा याबद्दल स्पष्टता नसणे, मुंबई महानगरपालिका एफ/उत्तर विभाग सहाय्यक आयुक्त यांनी विभागातील फेरीवाल्यांना नोटीस न पाठवता थेट कारवाई केल्याचे निदर्शनास आले असणे,रोजनदारीवर उदरनिर्वाह करीत असलेल्या परवाना धारक फेरीवाल्यांचे संरक्षण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२६३.	श्री. सुनिल प्रभू, श्री .शंकर जगताप, श्री .नानाभाऊ पटोले, डॉ. ज्योती गायकवाड, श्री. अतुल भातखळकर, श्री .अमिन पटेल, श्री .अस्लम शेख, श्री .साजिद खान पठाण, श्री .मोहन मते,श्री .संजय मेश्राम,श्री .रईस शेख, श्री .रोहित पवार वि .स .स.	"अल्पसंख्याक व औकाफ विभागाचे कार्यभार पाहणारे राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री, अजित पवार यांचे दिनांक २८ जानेवारी,२०२६ रोजी अपघाती निधन झाले असणे, दिनांक २८ ते ३० जानेवारी, २०२६ या शासकीय दुखवटा कालावधीत अल्पसंख्याक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिल्याचा गैरप्रकार दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी उघडकीस येणे, यापुर्वी माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये तत्कालीन अल्पसंख्याक मंत्री यांनी सदरहू शाळांचा दर्जा देण्याच्या प्रस्तावांना स्थगिती देण्यात येऊन, सर्व प्रस्ताव प्रत्यक्ष शाळांची पाहणी करुनच द्यावेत असे आदेश देण्यात येणे, त्यांनतर अल्पसंख्यांक विभागाचा कार्यभार तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी स्वता:कडे घेणे, परंतु दुर्देवाने त्यांच्या निधनानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अर्थपूर्ण व्यवहार करुन, आरटीई कायदा, टीईटी सक्ती, देणग्यांची मुभा, पदोन्नती प्रक्रियेत सवलत, प्रवेशाचे स्वनिर्मित नियम आदी अधिकार संस्थाना लाभ मिळवून देण्यासाठी सदरहू ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याच्या प्रस्तांवाना बेकायदा मंजूरी दिल्याचा प्रकार घडणे, सदरहू प्रकरणी मा. मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांनी स्थगिती देऊन चौकशीचे आदेश देण्यात येणे, परंतु अद्याप यावर चौकशी होऊन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाकडून कोणतीच कारवाई न होणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२६४.	श्री. अबू आझमी वि .स .स.	"महाराष्ट्र शासनामार्फत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणे, परंतु शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची शिष्यवृत्ती अद्याप प्रलंबित असणे, तसेच २०२५-२६ ची शिष्यवृत्ती देखील प्रलंबित असणे, शिष्यवृत्तीसाठी जवळपास १०० कोटी निधीची आवश्यकता असते परंतु विभागाने फक्त रु. २० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येणे, अल्पसंख्याक विशेषतः मुस्लीम विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती बिकट असल्याने विद्यार्थी फी न भरू शकणे, त्यामुळे काही महाविद्यालये विद्यार्थ्यांना वर्गामध्ये बसण्यास मनाई करत असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, शिष्यवृत्तीसाठीचे अनुदान प्राप्त करून तात्काळ वितरित करण्याचे निर्देश सचिव अल्पसंख्याक विकास विभाग यांना देण्यात यावे अशी मागणी करण्यात येणे, सध्या विद्यार्थ्यांकडून दरवर्षी उत्पन्नाचा दाखला घेण्यात येणे, दरवर्षी तहसीलदाराकडून उत्पन्न दाखला घेताना पालकांना त्रास होणे, पालक हे आर्थिक दृष्ट्या दुर्बल असल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ होत नाही. त्यामुळे प्रथम वर्षी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विद्यार्थ्याने सादर केलेला उत्पन्नाचा दाखला शिक्षण संपेपर्यंत ग्राह्य धरण्यात यावा व त्याप्रमाणे सर्व शिष्यवृत्तींच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्यात यावी अशी मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात येणे, सदर विषयी शासनातर्फे करण्यात आलेली वा येत असलेली कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."	
२६५.	श्री. किशोर पाटील वि .स .स.	"राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व संशोधनात्मक विकासासाठी घोषित करण्यात आलेली "अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था (एमआरटीआय) दि.२२ ऑगस्ट, २०२४ रोजी शासन निर्णय क्रमांक अविवि-६५२४/प्र.क्र.१८/का.१ नुसार शासन निर्णय घेऊन स्वायत्त संस्थेची स्थापना करणे, सदर कार्यालयाकरिता ११ पदे निर्माण करण्यास मान्यता देऊन आस्थापनेवरील पदांचे वेतन, कार्यालयीन खर्च, मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी व प्रशिक्षणासाठी रु.६.२५ कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासही मान्यता देण्यात येणे, परंतु या संदर्भात अद्यापही कोणतीच कार्यवाही न झाल्याने राज्यातील हजारो अल्पसंख्याक विद्यार्थी पीएचडी फेलोशिप (अधिछात्रवृत्ती), परदेशी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शिक्षण शिष्यवृत्ती आणि यूपीएससी/एमपीएससी स्पर्धा परिक्षांच्या विनामूल्य प्रशिक्षणापासून वंचित असणे, आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरु होण्याच्या बेतात असतांनाही आर्थिक तरतूद, संस्थेसाठी जागा आणि पायाभूत सुविधांबाबत अद्याप निर्णय न होणे, याकरिता शासनाने "मार्टी" कार्यान्वित होईपर्यंत या विद्यार्थ्यांच्या योजना इतर समकक्ष संस्थामार्फत राबविण्यात यावे, परिणामी लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२६६.	श्री. राजेश पवार वि .स .स.	"हिंदु विधीज्ञ परिषदेने माहिती अधिकारांतर्गत प्राप्त केलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने सन २००८ पासून आजपर्यंत एकही लेखापरीक्षण शासनाला सादर केलेला नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असणे, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ८० नुसार दरवर्षी लेखापरीक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक असतानाही अधिनियमाचे उल्लंघन वक्फ बोर्डाकडून होत असणे, त्याबाबत कारवाई होण्याकरिता हिंदू विधीज्ञ परिषदेने मा. अल्पसंख्याक मंत्री यांना दि २०२५/०३/१८ .रोजी निवेदन दिलेले असणे, परंतु आजतागायत त्यावर कोणतीही कारवाई झालेले नसणे, वक्फ बोर्डाकडे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		राज्याची सुमारे १ लाख एकर जमीन असून, त्यांच्या कार्यालयीन खर्चासाठी आणि पगारासाठी सरकारी तिजोरीतून दरवर्षी मोठ्या प्रमाणात निधी दिला जात असणे, अहवाल सादर न केल्यामुळे या निधीचा विनियोग आणि जमिनींच्या व्यवहारांत पारदर्शकतेचा अभाव दिसून येत असून भ्रष्टाचाराची दाट शक्यता निर्माण होत असणे, वक्फ कायद्याच्या कलम ९९ अंतर्गत, कर्तव्य पालनात कसूर करणाऱ्या बोर्डाला बरखास्त करण्याचे अधिकार राज्य सरकारकडे असणे, त्यानुसार १७ वर्षे लेखापरीक्षण अहवाल न देणाऱ्या बोर्डावर सरकारने अद्याप कोणतीही कठोर कारवाई झालेली नसणे, या गंभीर बाबीवर कार्यवाही करून वक्फ कायद्याचा कलम ९९ अन्वये वक्फ बोर्ड बरखास्त करून त्याची प्रशासकीय चौकशी करण्याबाबत शासनाची भूमिका व उपाययोजना.”	
२६७.	श्री. राजेश वानखडे वि .स .स.	“महाराष्ट्राच्या मातीतील व कृषी संस्कृतीशी समरस असलेला खेळ बैलगाडा शर्यत /विदर्भात शंकरपट नावाने प्रसिद्ध असणे, संपूर्ण महाराष्ट्रभर बैलगाडा शर्यत/ शंकरपटांचे मोठ्या प्रमाणांत आयोजन होत असणे, या खेळाच्या माध्यमातून अनेक शेतकरी केवळ या खेळांमध्ये सहभागी होण्या करीत उत्तम प्रतीच्या बैलांची जोपासना करीत असणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		यावर त्यांचा मोठा आर्थिक खर्च होत असणे,अनेक संस्था व गावगड्यातील अनेक शेतकरी समूह बैलगाडा शर्यत व शंकरपटांचे आयोजन करीत असेन, या आयोजनांना मोठा लोकाश्रय असणे, शासन विविध खेळांना प्रोत्साहन देण्याकरिता शासन स्तरावरून व आमदारांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत या आयोजनांना अर्थ सहाय्य करण्याची तरतूद असणे, परंतु आपल्या मातीतल्या बैलगाडा शर्यत/ शंकरपट आयोजनाकरिता असे अर्थ सहाय्य देण्याची कोणतीही तरतूद नसणे, त्यामुळे या आयोजनांना मर्यादा येणे, आयोजकांची आर्थिक कुचंबणा होणे, परिणामी बैलगाडा शर्यत /शंकरपट या खेळांच्या प्रसाराला मर्यादा येणे , भविष्यात हा शेती-मातीतला खेळ राजाश्रया अभावी नामशेष होण्याचा धोका निर्माण होणे, या आयोजनांना शासन स्तरावरून किंवा इतर खेळांप्रमाणे आमदारांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत अर्थ सहाय्य करण्याचे दृष्टिकोनातून धोरणात्मक निर्णय घेऊन प्रोत्साहन देणे या करिता शासनाने कारवायाची कार्यवाही व उपयायोजना.”	
२६८.	श्री. धर्मरावबाबा आत्राम वि .स .स.	“चंद्रपूर जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश फुंड यांनी गेल्या साडेतीन वर्षात निविदा प्रक्रिया व कामातील अंदाजपत्रकात मोठ्या प्रमाणात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गैरप्रकार करणे,चंद्रपूर जिल्हा स्टेडीयम व जिल्ह्यातील तालुका संकुलनातील केलेल्या व करण्यात येत असलेल्या विकास कामात नियमबाह्य कामे करुन लाखो रुपयांचा गैरप्रकार करणे, स्वमर्जितील आर्किटेक सुधीर श्रीवास्तव यांच्याकडूनच सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करुन घेणे व हे अंदाजपत्रक तयात करतांना अनावश्यक कामे समाविष्ट करुन शासनाकडून करोडो रुपयाचा निधी उकळणे, स्वमार्जितील कंत्राटदार एम.आर.ढोबळे आणि त्याच्या कंपनीस जास्तीत जास्त काम मिळण्यासाठी निविदा प्रक्रियेत घोटाळा करणे, क्रीडा अधिकाऱ्याने चंद्रपूर जिल्ह्यातील काही तालुक्यात जागा उपलब्ध नसताना सुध्दा याच आर्किटेकच्या मार्फतीने अंदाजपत्रक तयार करणे व या कामाचे निविदा प्रक्रिया राबून ढोबळे या कंत्रादारासोबत अग्रीमेंट करणे, करोडो रुपयांची अनावश्यक कामे करुन याच कंत्राटदाराच्या नावे करोडो रुपयांचा देयके मंजूर करणे, जिल्हा क्रीडा अधिकारी फुंड, आर्किटेक श्रीवास्तव व ढोबळे या त्रिकुटानीं मिळून क्रीडा संकुलनातील कामात गैरप्रकार करुन शासनाची फसवणूक करुन करोडो रुपयांचा घोटाळा केले असताना सुध्दा याबाबत कोणतीही चौकशी होत नसल्याने नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष, त्यामुळे या प्रकरणी फुंड यास	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निलंबित करुन या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्यामार्फतीने चौकशी करुन संबंधित आर्किटेक व कंत्राटदारावर कारवाई होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."	
२६९.	श्री. संतोष बांगर वि .स .स.	"महाराष्ट्र राज्यातील हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील मौजे, फुटाना येथील आंतरराष्ट्रीय अंध महिला क्रिकेटपटू कुमारी गंगा कदम ही मागील सात वर्षांपासून राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी करत असणे, मागील चार वर्षांपासून महाराष्ट्र अंध महिला क्रिकेट संघाची उप कर्णधार म्हणून जबाबदारी सांभाळत असणे, गेल्या दोन वर्षांत भारतीय अंध महिला संघात निवड होऊन भारताचे प्रतिनिधित्व करत आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविणे, अलीकडेच पार पडलेल्या पहिल्या अंध महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने विजेतेपद पटकावताना तिचे मोलाचे योगदान राहिलेले असणे, तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्याचे मुख्यमंत्री तसेच विविध मान्यवरांकडून सन्मान करण्यात आलेला असणे, महाराष्ट्र राज्याच्या विद्यमान क्रीडा धोरणानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकरी व आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद असणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सदर खेळाडून नोकरी देण्याबाबत शासनाकडे क्रीडा विभागामार्फत प्रस्ताव पाठविण्यात येणे, तरीही सदर खेळाडूस अद्याप पर्यंत त्याबाबत निर्णय न होणे, त्यामुळे सदर खेळाडूस शासकीय मान-सन्मान, आर्थिक पुरस्कार व थेट शासकीय नोकरी देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२७०.	श्री. मनोज घोरपडे वि .स .स.	"महाराष्ट्राच्या मातीतील शान असलेली महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा जो पोरखेळ झाल्यामुळे महाराष्ट्रातल्या हजारो मल्लांचे भविष्य अंधारात सापडले असणे,ग्रामीण भागातील मल्लांना हक्काचे व्यासपीठ मिळावे,कुस्ती या रांगड्या आणि पारंपरिक खेळाचे संवर्धन व्हावे आणि पैलवानांच्या कष्टाला नोकरी व सन्मानाचे फळ मिळावे, या उदात्त हेतूने कुस्तीमहर्षी स्व.मामासाहेब मोहोळ यांनी १९५३ साली महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेची स्थापना केलेली असणे, ज्या स्पर्धेने राज्याला एकापेक्षा एक दिग्गज मल्ल आणि देशाच्या कुस्तीत महाराष्ट्राचा दबदबा निर्माण केला असणे, सद्यःस्थितीत राज्यात तब्बल ४ वेगवेगळ्या 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धा घेण्याची चढाओढ लागली असल्याचे निदर्शनास येणे,त्यातील (१)महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचा एक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गट, (२) राज्यकुस्तीगीर परिषदेचा दुसरा गट (३) महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ हा देखील गेली काही वर्षे स्पर्धा घेत असून आता (४) आजवर केवळ 'हिंदकेसरी' स्पर्धा घेणारी मातीतली संघटनादेखील यावर्षी 'महाराष्ट्र केसरी' घेणार म्हणून मैदानात उतरलेली असणे,या ४ पैकी नेमकी कोणती 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धा खऱ्या अर्थाने अधिकृत आणि शासकीय मान्यताप्राप्त आहे हे शासनाने तातडीने जाहीर करावे आणि हा संभ्रम कायमचा दूर करण्याची नितांत आवश्यकता, तसेच, २०२१ पासून ज्या खेळाडूंवर अन्याय व त्यांचे रखडलेले मानधन आणि शासकीय नोकरीतील क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी त्वरित पूर्ववत करण्यासाठी शासनाने तातडीने दखल घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
२७१.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"राज्य शासनाने स्थानिक स्वराज संस्थेमधील जिल्हा परिषद-केंद्र स्तरावरील क्रीडा शिक्षकांच्या १०० टक्के ४८६० जागा भरणेबाबत दि.०२.०१.२०२६ रोजी शासन निर्णय जारी करुनही, अद्याप शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब निदर्शनास येणे, शालेय शिक्षण व्यवस्थेमध्ये शालेय शिक्षण हा विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अंत्यत महत्वाचा असून, दृढ समाज निर्मिती,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बलशाली भारत व ऑलिंपिक पदाचा या विषयाच्या माध्यमातून रचला जात असल्याने, या विषयाचे उदिष्ट साध्य करण्यासाठी शासनाने प्रत्येक शाळेमध्ये क्रिडा शिक्षक नियुक्त करण्याची अत्यंत आवश्यकता असून, सदरहू केंद्रस्तरावरील ४८६० क्रिडा शिक्षक पदभरती टेट २०२५ च्या परिक्षेतून करणे, सदरहू क्रिडा शिक्षक पदभरती संदर्भात शासन निर्णय १५.०३.३०२४ नुसार पवित्र पोर्टलचे नोटिफिकेशन नुसार संबंधित शासकीय, निमशासकीय, खाजगी शाळांना प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निर्देश देण्याची आवश्यकता, शासन निर्णय जारी करुनही अद्याप क्रिडा शिक्षकांची पदे भरणेबाबत श्री. तायप्पा शेंडे, सचिव,महाराष्ट्र राज्य, युवा शारिरीक शिक्षण शिक्षक महासंघ यांनी दि.०५.०३.२०२६ रोजी मा .मंत्री महोदयांना लेखी निवेदन देऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
२७२.	श्री. अशोक पाटील वि .स .स.	“ता.दापोली, जिल्हा.रत्नागिरी येथील वक्फ बोर्डाची देवस्थान सुमारे ११ एकर इनाम जमीन बनावट कागदपत्रे बनवून मकबूल दिनवारे व त्यांच्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कुटुंबीयांनी मिळून संगनमताने फसवणूक करून बळकावली असणे, हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे असून यांनी शासनाची फसवणूक केली असणे, या प्रकरणामध्ये ही खरेदी झाली कशी यामध्ये आणखी कोणा कोणाचा सहभाग आहे याची सखोल चौकशी होणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."	
२७३.	श्री. संजय देरकर वि .स .स.	"वणी तालुक्यातील (जि.यवतमाळ) मु.पो.पुनवट येथील ग्रामपंचायतीच्या मालकीची सुमारे १५ एकर (५.९९ हे.आर.) शासकीय जमीन असंविधानिकरित्या ठराव संमत करुन ग्रामपंचायतीने डी.ए.व्ही. पब्लीक स्कूल या खासगी शिक्षण संस्थेला शाळेच्या निर्मितीसाठी दिल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच जानेवारी, २०२६ मध्ये उघडकीस येणे, शिक्षण संस्थेकडून शाळा बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्रासाठी एप्रिल, २०२५ मध्ये ग्रामपंचायतीला अर्ज प्राप्त झालेला असणे, त्यानंतर ४ महिने सरपंचानी ग्रामपंचायतीची दिशाभूल करीत दि.२५/०८/२०२५ रोजीच्या मासिक सभेत निर्णायक मताच्या आधारावर शासकीय जमिन एका खासगी शिक्षण संस्थेच्या शाळा निर्मितीसाठी देण्यात येणे, सदर प्रकरणी उपसरपंच, ग्रा.पं., पुनवट यांनी संबंधित ग्रामपंचायत, ग्रामसेवक, तहसिलदार तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वणी, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे दि.२७/०१/२०२६ रोजी व तद्पूर्वी वारंवार लेखी निवेदनाव्दारे तक्रारी केलेल्या असणे, तथापि उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी शासकीय जमिनीपोटी कोणारे कोट्यावधी रुपयांचे नुकसान, शासनाने यासर्व प्रकरणाची पारदर्शक चौकशी करुन पुनवट ग्रामपंचायतीने केलेला ठराव रद्द करुन शासकीय जमिन एका खाजगी शिक्षण संस्थेस देण्याबाबत दोषी असणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२७४.	श्री. शांताराम मोरे वि .स .स.	“औदयोगिक विकास व्हावा स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने सन १९९५ मध्ये महाराष्ट्र शासनाने “डी प्लस “धोरण जाहीर करणे, या धोरणानुसार उदयोग व खणीकर्म विभागाने वाडा तालुक्यातील (जि. पालघर) येथील चिंचघर,बिलावली व डोंगस्ते हद्दीतील प्रियदर्शनी सहकारी औदयोगिक संकुल स्थापन करणे, उक्तगावातील शेतकऱ्यांच्या शेत जमीनीवर प्रत्यक्षात आजवर कोणतेही औद्योगिक प्रकल्प सुरु नसणे, शासनाच्या नियमाप्रमाणे ठराविक कालावधीत औद्योगिकरण करणे बंधनकारक असणे, असे न झाल्यास मुळ शेतकऱ्यांना ती जमीन मूळ खरेदी किंमतीत परत घेण्याचा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अधिकार असणे, असे असतांनाही औदयोगिकरणाची सुरवातही नसल्याने मुळ शेतकरी आपल्या जमीनीपासून वंचित होणे, औदयोगिकरणासाठी जमीन घेतल्यामुळे त्यावर शेती उत्पन्न शेतकऱ्यांना घेता न येणे, रोजगारांच्या संधी नसणे, स्थानिक ग्रामपंचायतीनाही कर उत्पन्नाला मुकावे लागणे, जमीनी ओसाड पडल्याने संपूर्ण परिसराचा विकास ठप्प होणे , औदयोगिकरण होत नसल्याने शेतकऱ्यांनी महसूल अधिकारी व विविध महसूल प्राधिकरणांकडे जमीनी परत मिळण्याबाबत दाखल केलेले दावे, सदर दावे विविध कारण दाखवून फेटाळण्यात येणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची व चिडेची भावना, औदयोगिक समुहाविरोधात शेतकऱ्यांनी केलेला आंदोलनाचा निर्धार, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तात्काळ लक्ष घालून शेतकऱ्यांच्या जमीनी तात्काळ परत देण्याबाबत शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२७५.	श्री. राजेंद्र शामगोंडा पाटील (यड्रावकर) वि. स. स.	“राज्यातील बांधकाम व पायाभूत सुविधा विकासाकरिता आवश्यक खडी, दगड आदी खनिज उत्खननासाठी विविध जिल्ह्यांत खाणी मंजूर करण्यात आलेल्या असताना, कोल्हापूर जिल्ह्यामधील शिरोळ	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तालुक्यात जयसिंगपूर व धरणगुत्ती परिसरात सन १९९० ते २०१७ दरम्यान विविध गट क्रमांकांमध्ये खाणींना परवानगी देण्यात आलेली असणे, मात्र संबंधित गट नं. १२७/१/१ (२.५ एकर), ३०७ (३० एकर), ३१८ (६ एकर) व ३११ (४२ एकर) येथील उत्खनन पूर्ण होऊन सध्या खाणी बंद स्थितीत असणे, ६ मीटर खोलीपर्यंत उत्खननास परवानगी असूनही जागा संपल्याने सुमारे ६० खाणींवर अवलंबून असलेल्या अंदाजे २०,००० ते २५,००० वडार समाजातील नागरिक बेरोजगार झाल्याची बाब निदर्शनास येणे, त्यामुळे स्थानिक स्टोन क्रशर उद्योग ठप्प होऊन रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर संबंधित नागरिकांना पर्यायी रोजगार उपलब्ध होण्यासाठी नवीन Quarry Zone निश्चित करून मंजुरी देऊन वडार समाजातील नागरिकांच्या रोजगाराचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	
२७६.	श्री. अभिमन्यु पवार, श्री .आनंद तिडके, श्री .मोहन मते वि .स .स.	"मराठवाड्यातील आठ जिल्ह्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर हे एकच विभागीय आयुक्त कार्यालय असणे, लातूर, धाराशिव, नांदेड, बीड,हिंगोली, आदी जिल्ह्यातील नागरिकांना प्रशासकीय कामासाठी गैरसोयीचे होत असल्याने सदरील विभागीय	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आयुक्त कार्यालयाचे विभाजन करण्याची घोषणा शासनाने केली असणे, १९८५ पासून आजतागायत लातूर येथे शासनाच्या विविध विभागांची २५ पेक्षा अधिक विभागीय कार्यालय असून गुणवत्तेच्या दृष्टने व प्रशासकीय सोयीसाठी लातूर येथे स्वतंत्र आयुक्तालय मंजूर करण्याबाबत लातूर बीड धाराशिव जिल्ह्यातील नागरिक गेल्या १५ वर्षापासून न्यायालयाच्या व आंदोलनाच्या माध्यमातून लढा देत असणे,लातूर येथे विभागीय आयुक्तालयासाठी स्वतंत्र इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन इमारत तयार असणे, तत्कालीन व विद्यमान मुख्यमंत्री महोदय यांनी नागरिकांच्या तीव्र भावना विचारात घेऊन विभागीय आयुक्तालयासाठी योग्य ठिकाण कोणते यासाठी दांगट समिती नेमेलेली असणे,सदरील समितीने गुणवत्तेच्या आधारावर लातूर येथे विभागीय आयुक्त कार्यालय मंजूर करण्याबाबत सकारात्मक शिफारस केलेली असणे, दांगट समितीने दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी शासनास सादर केलेला विभागीय आयुक्त कार्यालयाच्या त्रिभाजनाचा अहवाल स्वीकृत करणे आणि नांदेड व लातूर येथे स्वतंत्र विभागीय आयुक्त कार्यालय किंवा अपर विभागीय आयुक्त कार्यालय मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२७७.	श्री. जयंत पाटील वि .स .स.	"सोलापूर जिल्ह्यातील एम.एस.एच. ८ हायवे टोलवेज अहमदनगर-करमाळा-टेंभुर्णी (जातेगाव ते कंदर हद्दीतील) या रस्त्याचे चौपदरीकरणाच्या कामासाठी सुप्रीम इंफ्रास्ट्रक्चर इंडिया लिमिटेड मुंबई यांनी मोठ्या प्रमाणात गौण खनिजांचे अवैद्य उत्खनन करुन त्याचे पैसे अद्यापही शासनाला दिले नसल्याबाबत ची तक्रार दि. २४/०२/२०१५ रोजी तेथील सामाजिक कार्यकर्त्यांनी आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कडे तक्रार अर्ज केलेला असणे, या संदर्भात दि. ३०/०९/२०१५ रोजी शाखा अभियंते सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभाग करमाळा, मंडळ अधिकारी करमाळा, तलाठी करमाळा, देवळाली व जातेगाव यांच्या समवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी व पंचनामा केला असणे, सुप्रीम इंफ्रास्ट्रक्चर इंडिया लिमिटेड मुंबई या कंपनीने रस्त्याच्या कामासाठी विना परवाना व अनधिकृत पणे ५७,०६० ब्रास मुरुम व ८८८९ ब्रास खडी असे एकूण ६५,९४९ ब्रास गौण खनिज उत्खनन केले असुन त्याची एकूण रॉयल्टी ४० कोटी ५ लक्ष रुपये अद्यापही शासनाकडे जमा केलेले नसणे, या संदर्भात चौकशी करुन संबंधित कंपनी विरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२७८.	श्री. विजयबापू शिवतारे वि .स .स.	"पुणे जिल्ह्यातील मिसाळवाडी (घेरा पुरंदर) ता. पुरंदर येथे आदिवासी समाजाची मोठ्या प्रमाणात जमीन असणे, खाजगी गुंतवणूकदारांनी आदिवासींची फसवणूक करून गट नं १, ४४, ५०, ६२ आणि ६३ मधील जमिनीची बेकायदा खरेदी करणे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६ अन्वये आदिवासी जमीन हस्तांतरणास बंदी असणे, सदर जमिनीमध्ये असलेले नैसर्गिक डोंगर उध्वस्त करून बालाजीधाम नावाने भूखंड विक्रीचा व्यवसाय सुरु असणे, केंद्र व राज्य सरकारने घेरापुरंदर आणि आसपासचा परिसर हा निसर्गरम्य आणि पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील (Ecologically Sensitive) क्षेत्रात समाविष्ट करणे, तरीदेखील या भागात अशा पद्धतीने बालाजीधाम प्रकल्प करून पर्यावरणाची हानी करणे, शासनाचा करोडो रुपयांचा महसुल बुडवणे, या पार्श्वभूमीवर सदरील प्रकल्प तत्काळ बंद करून महसूल वसूल करणे, आदिवासींच्या जमिनी आदिवासींना पुनर्बहाल करणे, इत्यादी बाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही.	कित्ता
२७९.	श्री. निलेश राणे वि .स .स.	"सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण, देवगड, वेंगुर्ला च्या समुद्रकिनारी मच्छीमारांनी मासे सुकवणे, खारवणे, आणि विक्रीसाठी उभारलेल्या झोपड्या काढून टाकण्याबाबत महसूल प्रशासनाकडून नोटीसा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बजावण्यात आल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये उघडकीस येणे, यापुर्वीही अनेकदा नोटीसा महसूल प्रशासनाकडून बजावण्यात आलेल्या असणे, झोपड्या काढून टाकण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून व्यवसाय करणाऱ्या स्थानिक मच्छीमारांच्या कुटुंबावर ओढावलेली उपासमारीची वेळ, सदरहू समुद्रकिनारी असलेली जागा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या मालकीची असल्याने सदर जागा भाडेतत्वावर दिल्यास शासनाने ठरवलेल्या दरानुसार व्यावसायिक मच्छीमार भरण्यास तयार असणे, मच्छीमारांनी आपला व्यवसाय आणि उदरनिर्वाह सुरक्षित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व शासनाकडे केलेली असणे, सातत्याने नोटीसा बजावण्यात येत असल्यामुळे मच्छीमारांमध्ये प्रचंड असंतोषाचे व संतापाचे वातावरण असणे, याबाबत तात्काळ तोडगा काढण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने योग्य निर्णय घेऊन शासन स्तरावर कार्यवाही करुन मच्छीमार बांधवाना दिलासा देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२८०.	श्री. रविशेठ पाटील वि .स .स.	"रायगड जिल्हयातील खारेपाट विभागातील महसूली गावातील मे.मुंबई एस.ई.झेड लि .या कंपनीने संपादित व खरेदीखताने नावे केलेल्या शेतजमिनी प्रकल्प अनेक वर्षांपासून सुरू न झाल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना परत मिळाव्या अशी मागणी करण्यात येणे, कंपनीच्या नावे ७/१२ असलेल्या या शेतजमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात असून शेतकरी कुटूंबाचे उदर निर्वाह करण्याचे अन्य साधन नसल्याने शेती करून उपजिविका चालविण्यात येणे, जमीनींचे हस्तांतरण भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ११ क व ४१ अन्वये रदद करून मे.मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि.कंपनीचे नावाची कब्जेदार सदरी झालेली नोंद रदद करून शेतकऱ्यांच्या नावे पुर्ववत करून देणेकरिता मागणी करण्यात येणे, सदर मागणीनुसार शासनाकडून अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता
२८१.	श्री. किशोर पाटील वि .स .स.	"जळगांव जिल्हयातील पाचोरा तालुक्यातील मौजे माहिजी व मौजे कुरंगी या गावातील संपूर्ण भूखंडाना/ मिळकतीना "ब-सत्ता प्रकार लागू असल्याने सदर गावांतील भूखंडाना देखील हस्तांतरणाबाबतची परवानगी व ब-सत्ता (भोगवटादार वर्ग-२) प्रकार मधून "क सत्ता	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		(भोगवटादार वर्ग-१) मध्ये रुपांतरीत करणेबाबतची परवानगी शासन अधिसूचना दि.८.३.२०१९ , शासन परित्रक दिनांक १५.३.२०२१ व शासन निर्णय दिनांक ५ जुलै, २०२३ मधील तरतूदीनुसारच देण्यात येणे, ही दोन्ही गावे पाचोरा तालुक्यातील दहिगांव बंधाऱ्यामुळे पुनर्वसित झालेली आहेत, परंतु सदरच्या दोन्ही गावांना शासनाने पुनर्वसित केलेले नाही व सदर गावातील विस्थापितांना पुनर्वसन अधिनियमातील तरतूदीनुसार भूखंड वाटप केलेले नाहीत, सदरच्या गावातील संपूर्ण भूखंड ब-सत्ता प्रकारचे असल्याने व सदर भूखंडाना शासन निर्णय दिनांक १८.५.२०१८ च्या तरतूदी लागू नसणे, ही दोन्ही गावे पुनर्वसित होऊन देखील गावातील विस्थापितांना पुनर्वसन अधिनियमातील तरतूदीनुसार भूखंड वाटप झालेले नसल्याने व त्या दोन्ही गावातील संपूर्ण भूखंडाना/ मिळकर्तींना ब-सत्ता प्रकार लागू असल्याने त्या भूखंडावरील ब-सत्ता प्रकार कमी करणेकामी अथवा सदरच्या भूखंडांना शासन निर्णय दिनांक १८.५.२०१८ मधील तरतूदी लागू करणेकामी शासन स्तरावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२८२.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"जि. ठाणे, महसूल विभागाचे कल्याण उपविभागीय अधिकारी व कार्यालयातील कर्मचारी यांच्या मार्फत भूसंपादन,तसेच सातबारा फेरफार संबंधी विविध कामे हाताळण्यात येणे, सदरहू कामे करताना या कार्यालायतील श्री. विश्वास गुजर व श्री .भाऊसाहेब नांगरे या भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून नागरिकांकडे प्रत्येक कामासाठी केली जात असलेले पैशाची मागणी, पैशांची पूर्तता न करणाऱ्या नागरिकांची कामे प्रलंबित ठेवण्यात येणे, त्यामुळे सदरहू कार्यालयात अनेक प्रकरणे न्यायासाठी प्रलंबित असल्याची बाब माहे जून २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, परिणामी सामान्य जनतेस न्याय मिळण्यात निर्माण झालेला अडसर, सदर न्यायाधिकरणातील दाव्याच्या सुनावणीस सातत्याने मिळत असलेल्या तारखा, दाव्याच्या सुनावणी जलदगतीने निर्णीत होत नसल्याने पक्षकारांच्या मनात निर्माण झालेली नाराजीची भावना, सदरहू प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी चुकीचे उत्तर पाठवून शासनाची दिशाभूल करण्यात येणे, यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना भ्रष्ट्राचार करण्यास संधी प्राप्त होणे, यास्तव संबंधित अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभारांची तातडीने सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."	
२८३.	श्री. रवी राणा वि .स .स.	"महाराष्ट्र राज्यातील आदिवासी बहुल चिखलदरा तालुक्याचे क्षेत्रफळ विस्तीर्ण व भौगोलिकदृष्ट्या डोंगराळ असल्यामुळे नागरिकांना शासकीय कामांसाठी मोठ्या अंतराचा प्रवास करावा लागतो, त्यामुळे प्रशासकीय सुविधा प्रभावीपणे पोहोचत नसणे, या पार्श्वभूमीवर चिखलदरा तालुक्याचे विभाजन करून नव्याने चुरणी तालुका निर्माण करावा व तेथे तहसील कार्यालयासह अत्यावश्यक शासकीय कार्यालयांच्या इमारतींसाठी निधी उपलब्ध करून प्रस्तावास मान्यता द्यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी अनेक वर्षांपासून करीत असणे, दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजीही विद्यमान मुख्यमंत्र्यांकडे जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या मार्फत लेखी निवेदन सादर करण्यात आले असणे, तसेच शासनाने जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून अहवाल मागविला असणे, आदिवासी नागरिकांना सुलभ प्रशासन, जलद सेवा व विकास योजनांचा लाभ मिळावा यासाठी नव्या चुरणी तहसील निर्मितीचा तातडीने सकारात्मक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निर्णय घेणे आवश्यक असणे, शासनाने याबाबत संवेदनशील व विकासाभिमुख निर्णय घेण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."	
२८४.	श्री. हिरामण खोसकर वि .स .स.	"सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या नियोजनाच्या दृष्टीने त्र्यंबकेश्वर येथे भाविकांच्या सोयीसाठी व गर्दी व्यवस्थापनासाठी विविध विकासकामे करण्याकरिता त्र्यंबकेश्वरच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे उपलब्ध जागा अत्यंत मर्यादित असणे, सद्यःस्थितीत नूतन गोदाघाट (ग्रीन बेल्ट) ११ हेक्टर (मुख्य मंदिरापासून २ किमी अंतरावर (, घाट रस्ते (२४ मी.रुंदी) नदीपात्राच्या दोन्ही बाजूनी, बाह्य रिंग रोड (३० मी.रुंदी) व अंतर्गत जोडरस्ते अशी ४० एकर जागा संपादित करण्यात येणे, परंतु मोबदल्याच्या दरामध्ये तफावत असल्याने दि.५.२.२०२६ रोजीच्या सुमारास आंदोलन सुरु करणे, या आंदोलनकर्त्यांना जिल्हाधिकारी यांना निवेदनही देण्यात येणे, या शेतकऱ्यांनी आत्मदहन करण्याचा दिलेला इशारा, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने त्र्यंबकेश्वर कुंभमेळा क्षेत्रासाठी जमिनीचा मोबदला प्रति गुंठा पाच लाख देण्याबाबत विशेष जीआर काढण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२८५.	श्री. नरेंद्र भोंडेकर,श्री . धर्मरावबाबा आत्राम वि .स .स.	"बल्लारपूर ते वर्धा (ता.भद्रावती जि.चंद्रपूर) या तिसऱ्या रेल्वे मार्गाचे काम सुरु असून यासाठी लागणारे मुरूम उत्तखननाची परवानगी पुण्यातील सोनाई इन्फ्रास्ट्रक्चरया कंपनीला देण्यात येणे,मौजा नंदोरी बु ताभद्रावती जि. चंद्रपूर येथिल सर्वे न.५८४,५८३/१/अ व २९०/२ मधून फक्त ७५०० ब्रास मुरूम उत्तखननाची तात्पुरते परवाने सोनाई इन्फ्रास्टक्चर या कंपनीस देण्यात येणे,असे असताना ही मौजा नदोरीबु ता.भद्रावती जि.चंद्रपूर येथिल सर्वे न. ५८४, ५८३/ १/अ, ५९०/२,५९०/३तसेच मौजा विसलोन येथिल सर्वेन.१२९या गटातून एकूण ९६,६३२ ब्रास मुरुमाचे अवैध उत्तखनन सोनाई इन्फ्रास्टक्चर या कंपनीकडून करण्यात येणे,मात्र तहसीलदार भद्रावती यांनी दिनांक १७/७/२०२५ च्या आदेशानुसार सर्वे न१२९ मध्ये २१०५४ ब्रास आणि सर्वे न ५९०/३ मध्ये ३५९१० दिनांक ४/८/२०२५ च्या आदेशानुसार नंदोरी सर्वे न ५८३/१ मध्ये २९८७० ब्रास च्या आदेशानुसार सर्वे न १२९ मध्ये २१०५४ ब्रास आणि सर्वे न ५८४ मध्ये ९७९८ ब्रासचे अवैध मुरूम उतखंननाबाबत जवळपास १००कोटी ४२ लाख ९९ हजार २०० रुपये सोनाई इन्फ्रास्टक्चर कंपनीवर दंड आकारणे, याच कंपनीने विसापूर ता.बल्लारपूर येथील सर्वे न. ४३३/१मधून जवळपास ११० ब्रास	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अवैधरित्या माती या गौण खनिजाचे उत्तखनन करणे, एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैधमुरुमाचे उत्तखनन होऊन सुध्दा सोनाई इन्फ्रास्टक्चर या कंपनीवरनाममात्र कागदोपत्री कार्यवाहीकरुन जवळपास१०० कोटी रुपयांचा दंड आकाराणे व ते दंड अद्यापही वसुल करण्यात आलेला नसणे, खनिकर्म विभाग चंद्रपूरव महसूल विभाग आणि कंपनी अधिका-याच्या संगनमताने करोडो रुपयांच्या महसूलाची चोरी होत असताना सुद्या नाममात्र कार्यवाही होत असल्याने नागरिकांत पसरत असलेले तीव्र असंतोष त्यामुळे या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही.	
२८६.	श्री. शिवाजी पाटील वि .स .स.	"चंदगड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय होणेबाबत स्थानिक नागरिकांकडून होत असलेली मागणी, तालुक्यातील गावापासून कोल्हापूर जिल्हा हे अंतर साधारणत: १७० ते १८० कि.मी च्या दरम्यान असल्याने त्याठिकाणी जाणे अडचणीचे होणे, चंदगड तालुका सीमावर्ती भागास लागून असून हा दुर्गम व डोंगराळ भाग असणे, त्याचप्रमाणे येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय झाल्यास, चंदगड, गडहिंग्लज व आजारा तालुक्यासह आसपास असणा-या तालुक्यांतील लोकांना मोठ्या प्रमाणात होणारा फायदा,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	
२८७.	श्री. महेंद्र दळवी वि .स .स.	“ता.वसई, जि.पालघर तहसिल कार्यालयामधील अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रिय कार्यालयामध्ये अधिकारी आणि कर्मचारी यांनी गैरव्यवहारातून अनेक गैर कारभार केल्याचे माहे, फेब्रुवारी, २०२६ च्या सूमारास निदर्शनास येणे, श्री.शशिकांत नाचन, नायब तहसिलदार यांनी कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार करुन मोठ्या प्रमाणात चुकीची कामे केली असणे, लोकप्रतिनिधीकडून श्री.नाचन नायब तहशिलदार यांच्या कार्यकाळातील सर्व कामांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, तसेच वसई तहसलिदार अंतर्गत येत असलेल्या सेतू सुविधा केंद्र चालक श्री.मोहनदास पाटील, हे सामान्य नागरिकांकडून पैश्याची मागणी करणे, नागरिकांना रहिवाशी दाखले, उत्पन्नाचे दाखले तसे जातीचे दाखले काढण्यासाठी पैसे घेत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच याबाबत तहसिलदारांकडून तक्रारी करणे, मौजे आचोळे, ता.वसई येथील तलाठी कार्यालयात खाजगी व्यक्तींना कोतवाल म्हणून नियुक्त करुन मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करुन जमिनी मालकांना फसविण्यात येणे, उपरोक्त सर्व बांबीवर आळा घालण्याबाबत व भ्रष्ट	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
२८८.	श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील वि. स. स.	“जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यात मौजे कोथळी येथील गट क्र./३८ पै क्षेत्र २ हे ३५ .आर या जमिनीवर शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीतून मुक्ताईनगर तालुका क्रीडा संकुल विकसित करण्यात आलेले असणे, असे असताना संबंधित जमीन पूर्वी चेअरमन तालुका एज्युकेशन सोसायटी, मुक्ताईनगर यांना बेकायदेशीर भाडेपट्टा कराराने देण्यात येणे, त्या काळातील माजी लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला हाताशी धरून पदाचा गैरवापर करून सन २००९ मध्ये तालुका क्रीडा संकुल, मुक्ताईनगर येथे क्रिडांगण विकसीत करण्यासाठी शासनाची भाडे पट्ट्यावर घेतलेली जमीन शासनाला करार करून देणे, यासाठी शासन निधीतून मोठ्या प्रमाणात विकासकामे करून सार्वजनिक क्रीडा संकुल उभारण्यात येणे, आणि आता सदर संस्थेकडून विकसित क्रीडांगणावर हक्क सांगण्याचा प्रयत्न होणे, त्यामुळे शासनाच्या मालमत्तेचे व जनतेच्या पैशांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण होणे, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित बेकायदेशीर भाडेपट्टा करार तात्काळ रद्द करून गट क्र./३८ पै	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जमिनीच्या कब्जेदार म्हणून तालुका क्रीडा संकुल मुक्ताईनगर अशी नोंद करण्याची आवश्यकता, याबाबत यावर शासनाने केलेली वा करावयाची ठोस कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
२८९.	श्री. कैलास घाडगे पाटील वि .स .स.	"धाराशिव-तुळजापूर-सोलापूर नवीन ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पासाठी धाराशिव व तुळजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतजमीन सरकारने सक्तीने संपादित करणे, सरकारने आधी प्रारूप अवॉर्ड जाहीर केलेला असणे ज्यामध्ये बाजारभावानुसार नोंदी धरणे, नंतर तोच अवॉर्ड जाणीवपूर्वक बदलून ज्या नोंदींमध्ये जास्त दर होते त्या अवाजवी दर म्हणून बाजूला काढणे आणि अंतिम अवॉर्डमध्ये भरपाई सरळसरळ कमी करणे, हा बदल चुकून नसून Cost Cutting साठी केलेला जाणीवपूर्वक अन्याय असणे, त्याचा फटका तुळजापूर व धाराशिव तालुक्यातील शेतकरी व शेती जमिनींना बसने, या दोन्ही तालुक्यांतील रेल्वे प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीच्या प्रारूप अवॉर्ड व अंतिम अवॉर्डमधील फरक तब्बल रुपये १६५ कोटींचा असणे, सरकारने जाणीवपूर्वक जमिनीचे दर कमी करणे, आकडे फिरवणे आणि भरपाई घटवण, जमीन गेली, योग्य मोबदला मिळाला नाही आणि आता न्यायासाठी दारोदार फिरण्याची वेळ शेतकऱ्यांवर येणे, रेल्वे, रस्ते,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उद्योगांसाठी कोट्यवधी रुपये असणे, पण शेतकऱ्यांच्या भरपाईसाठी नसणे, अंतिम अवॉर्डमधील अन्यायकारक कपात रद्द करून uअवाजवी दरर हे कारण काढून टाकून तुळजापूर व धाराशिव तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या रूपये १६५ कोटींच्या फरकाला जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
२९०.	श्री. श्याम खोडे वि .स .स.	"राज्यातील माजी सैनिक,सेवारत सैनिक, तसेचं युद्धभूमीवर लढत असतांना शहीद झालेल्या सैनिकांच्या विधवा पत्नीस शासनाने दिनांक १०.०२.२०२६ रोजी परिपत्रक निर्गमित करुन जमिनीची विल्हेवाट लावून महसूल जमा करण्याचे दृष्टीने जमिन प्रदान करण्याचे धोरण अवलंबिले असणे, शासन निर्णय - १९९२ अन्वये जमीन प्रदान करण्यापुर्वी उत्पन्नाची अटट देण्यात आलेली असणे, त्यामुळे राज्यातील एकही सैनिकांना जमीन देणे शक्य नसणे, माजी सैनिक, सेवारत सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी यांना शासकीय ई. क्लास जमिन प्रदान करण्याकरिता शासन निर्णयामध्ये शिथिलता देण्याकरिता माजी सैनिक यांच्या वतीने शासनास निवेदन देण्यात येणे, परंतु सदर निवेदनावर कुठलीही कार्यवाही न होणे, त्यामुळे राज्यातील सैनिकांना महसुलीच्या जमीन देण्यात अडचणी निर्माण होणे, माजी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सैनिकांच्या निवेदनानुसार कार्यवाही केल्यास माजी सैनिकांना जमिनी प्रदान करतेवेळी uउत्पन्नाची अटट रद्द करुन तसेच राज्यातील ग्रामपंचयातीचा ठराव देण्याचा अधिकार संपुष्टात आणल्यास जमीन देतेवेळेस कुठलीही अडचण निर्माण न होणे, उलट राज्यातील सद्यतित झालेले ई-क्लास जमीनीवरील हजारो हेक्टर अतिक्रमण हटविण्यास मदत होवून शासनाकडे अब्जो रुपये महसूल जमा होण्याकरिता मदत होणे, तरी माजी सैनिक, सेवारत सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी यांना शासकीय ई. क्लास जमिन प्रदान करण्याकरिता शासन निर्णय शिथिल करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
२९१.	श्री. सुनिल प्रभू, श्री .अशोक पाटील वि .स .स.	" जिल्हा रायगड ता. पनवेल येथील मौजे ओवे येथील स.नं. / गट नं. २४/४,१३१/१, १३१/४ ब, १३१/३ अ मधील १ हेक्टर ४ आर क्षेत्राची सिडकोच्या मालकीची ३५० कोटी रुपये किंमतीची जमीन जितेंद्र इंगळे, या अप्पर तहसिलदारांने पदाचा दुरुपयोग करुन, खाजगी व्यक्तीच्या नावे आदेश पारित केल्याचा नुकताच उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, सदरहू मिळकतीचा भूसंपादन अधिनियम १९८४ अन्वये निवाडा क्र. ५६४ (पी) अन्वये सन १९८६ साली सिडकोच्या नावे भूसंपादन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्यात येणे, उक्त सिडकोच्या मालकीची जमीन खाजगी व्यक्तीच्या नावे करण्यासाठी, अप्पर तहसिलदाराने माहे एप्रिल, मे २०२५ या वर्षात आदेश पारित केल्याचा प्रकार उघडकीस येणे, सदरहू प्रकरणी तक्रार करण्यात आल्यानंतर तक्रारी प्राप्त झाल्यानंतर, घोटाळा उघडकीस येऊ नये म्हणून माहे डिंसेबर, २०२५ मध्ये जुन्या तारखेने कागदपत्रामध्ये हेरा-फेरी करुन, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या तरतुदीनुसार वरिष्ठांची परवानगी बंधनकारक असतानांही परवानगी न घेता पुर्नआदेश पारित केल्याचा प्रकार घडणे, सदरहू प्रकरणी तहसिलदार यांनी भूमाफियांसोबत संगनमत करुन, शासनाची कोट्यावधी रुपये किमतीची जमीन त्रयस्थ व्यक्तींच्या नावे करुन, जमीन हडप करण्याचा घडलेला प्रकार, सदर प्रकरणी अप्पर तहसिलदार यांना निलंबीत करुन, त्यांचेवर तत्काळ गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
२९२.	श्री. विलास तरे, श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार वि. स. स.	“राज्यात वसई (जि. पालघर) तालुक्यात मौजे. आचोळे, जूचंद्र, कामण येथे बेसुमार माती भराव होत असल्याची बाब माहे. फेब्रुवारी २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास येणे, मौजे.	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आचोळे येथील सर्व्हे क्र. ४६ मध्ये सुमारे १ लाख ३९ हजार ६०० चौ. मी. सुमारे १४० एकर खाजण आणि सीआरझेड बाधित जमिनीवर भूमाफियांनी सुमारे ७ ते ८ फूट उंचीचा बेकायदा माती भराव केलेले असणे, मौजे. धोवली गौण खनिज उत्खनन होत असून शासनाच्या कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडवला जात असणे, त्याचबरोबर ससूनवघर, पठारपाडा मालजीपाडा येथे मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ लगद बेसुमार माती भराव केलेले असणे, मौजे. जूचंद्र व कामण परिसरात अशीच परिस्थिती निर्माण झालेली असतानाही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
२९३.	ॲड. राहुल ढिकले वि .स .स.	"नाशिक शहरातील त्रंबक रोडवर पोलीस प्रशिक्षण अकादमी समोर नाशिक शिवारातील सर्वे क्रमांक ७५०, ७५१ व ७५५ मध्ये जवळपास ६२ एकर जागा शासनाच्या मालकीची असणे,संबंधित जागा कुळ कायद्यानुसार शासन जमा होणे अपेक्षित असताना येथील कुळांची फसवणूक करून एका विशिष्ट बिल्डरने संबंधित जागा गिळंकृत करण्याचा प्रयत्न असणे, शहर विकास आराखड्यानुसार प्रस्तावित असलेली सर्वे क्रमांक ७५०, ७५१ व ७५५ मधील सहा आरक्षणापोटी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रोख मोबदला आणि टीडीआर मे. ठक्कर नावाच्या बिल्डरच्या विविध कंपन्यांमार्फत हडपल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, मे.ठक्कर यांच्याकडे शेतकरी पुरावा नसतानाही शेकडो एकर बेकायदेशीर शेती खरेदी केलेली असणे,मे.ठक्कर यांच्या विविध कंपन्यांच्या अधिकृततेविषयी जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक व जिल्हा उपनिबंधक कार्यालय मार्फत चौकशी सुरू असणे, सर्वे क्रमांक ७५०, ७५१ व ७५५ मध्ये जवळपास ६२ एकर जागा तातडीने शासन करण्याची आवश्यकता असणे,सदरील प्रकरणामध्ये प्रकरणांमध्ये जाणीवपूर्वक दप्तर दिरंगाई करणाऱ्या तत्कालीन तहसीलदार श्री.पवार यांच्यावर कडक कारवाई करणे,मे.ठक्कर यांच्या विविध कंपन्या मार्फत सर्वे.नं७५०,७५१ व ७५५ मधील विविध आरक्षणापोटी महापालिका व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिला गेलेला रोख मोबदला आणि टीडीआर व्याजासकट वसूल करण्याची गरज असणे,मे.ठक्कर यांच्या विविध कंपन्यांची एस आय टी मार्फत चौकशी होऊन कडक कारवाई करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२९४.	श्री. विजय वडेट्टीवार वि .स .स.	"मौजे कुसूर (ता. मावळ, जि. पुणे) येथील गट/सर्व्हे नं. २६३ (क्षेत्र ७ हेक्टर), सर्व्हे नं. १३३/१ (क्षेत्र ४ हेक्टर), सर्व्हे नं. १५३/१ (क्षेत्र ५ हेक्टर), सर्व्हे नं. २६२ (क्षेत्र ५ हेक्टर) सर्व्हे नं.१४६/१ (क्षेत्र १३ हेक्टर) असे वेगवेगळ्या सर्व्हे नंबर मधील एकूण ५५ हेक्टर क्षेत्र हे एकाच कुटुंबियाने बेकायदेशीरपणे खरेदी केलेले असणे, सदर जमीन भोगवटा वर्ग २ च्या (आदिवासी जमिनी/महार वतन/पाटील वतन/कुळ कायद्याच्या जमिनी) असून देखील संबंधित प्रांत, तहसिलदार यांच्या संगनमताने या जमिनीची विक्री होणे, अनेक प्रकरणात जमीन खरेदी करताना कुठल्याही सक्षम अधिकाऱ्याची पूर्व परवानगी घेतलेली नसणे, सध्या सदर जमीन मालक या जमिनीची लाखो रुपये गुंठा या दराने दुय्यम निबंधक तसेच इतर अधिकाऱ्यांच्या संगनमताने विक्री करत असणे, यामध्ये सध्याचे तहसिलदार यांचेही संगनमत असणे, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन शर्तभंगाच्या जमिनी सरकार जमा करण्याची होत असलेली मागणी, या कुटुंबाच्या मालकीच्या जमिनीबाबत प्रचलित सिलिंग ॲक्टप्रमाणे सिलिंग लिमिट ठरवून अतिरिक्त होणारे क्षेत्र सरकार जमा करण्याची देखील होत असलेली मागणी, संबंधित तहसिलदार व जमीन मालक यांच्याविरुद्ध कारवाई	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."	
२९५.	श्री. सुरेश धस वि .स .स.	"विदर्भातील भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील एका प्रमुख व्यावसायिकाच्या निवासस्थानी आणि दुकानावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) वाळू माफियांच्या बेकायदेशीर उत्खनन आणि महसूल हानीच्या संशयावरून छापे टाकले असणे तसेच या प्रकरणातील अंदाजे महसूल हानी किती आहे आणि त्यात सहभागी असलेल्या व्यावसायिक आणि अधिकाऱ्यांची तपशीलवार माहिती जाणुन बुजून लपविणे तसेच जिल्ह्यातील महसूल आणि पोलिस प्रशासनातील सहभागी अधिकाऱ्यांवर कसल्याही प्रकारची आजवर प्राप्त झालेल्या तक्रारींवर कसल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नसणे तसेच विदर्भातील वाळू उत्खनन आणि लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी आणि अशा बेकायदेशीर कामकाज रोखण्यासाठी सरकार काय उपाययोजना करत आहे, तसेच तुमसर तालुक्यातील संबंधित महसूल तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी व पोलीस निरीक्षक यांना शासन चौकशी करून निलंबित करून फौजदारी गुन्हे दाखल करणार आहे काय, या सर्व प्रकारामुळे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नागरिकांत तीव्र संताप व्यक्त होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना.”	
२९६.	श्री. गोपिचंद पडळकर वि .स .स.	“ठाणे जिल्हयातील मौजे वालशिंद, ता. भिवंडी येथील सर्व्हे क्र. ११/७/अ, १२/३/अ/३, १२/३/अ/५, १२/४, १२/५, १३/१/अ/१/अ, १३/१/अ/१/ड या जागेवर ग्रीन झोन असताना व रस्ता विकास योजनेत दाखल नसताना सदर रस्ता असल्याचे खोटे प्रमाणित करुन एमएमआरडीएने लॉजिस्टीक पार्ककरिता नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास येणे, एमएमआरडीएकडून दि. २१.४.२०२३ रोजी १८ मीटर रुंदीच्या रस्त्याच्या बांधकामास परवानगी देण्यात आली आहे. तथापि, सदर रस्ता अनधिकृत असल्याबाबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग यांनी दि. १०.९.२०२५ रोजी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले असणे, सदर परवानगी देण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर ही बाब वरिष्ठ तथा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून न देणे, सदरहू १८ मीटर रुंदीचा रस्ता अर्जदाराच्या जागेतून न जाता शेजारील जमिनी मालकाची पूर्वपरवानगी न घेता त्याच्या खाजगी जागेतून नेला असल्याचे निदर्शनास येणे, सदर रस्ता आरक्षण क्र. जी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		४४मधून जात असताना सदर आरक्षण मूळ ठिकाणाहून बाजुला सरकवुन व इतरत्र दाखवून चुकीच्या मार्गाने परवानगीचा प्रस्ताव मंजुर केला असल्याचे निदर्शनास येणे, या प्रकरणात दोषी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना.”	
२९७.	श्री. नरेंद्र भोंडेकर वि .स .स.	“भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातील बेटाळा व पवनी येथील रेतीघाटाचे व डेपोचे कंत्राट मे.केशवप्रिया इन्फ्रास्ट्रॅक्चर मालाड, मुंबई व मे.अनुजकुमार अग्रवाल रामदासपेठ नागपूर या कंपनीस देण्यात येणे, त्यांनी अवैधरित्या ३४ हजार ६०० ब्रासच्या वर रेतीचे उत्तखनन करुन शासनाचे किमान ७३ करोड रुपयांचे नुकसान करणे, ह्या प्रकरणी नागपूर हिवाळी अधिवेशन २०२५ विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून चर्चा करण्यात आले असता महसूल विभागाच्या दोन अधिकऱ्यांना निलंबीत करण्यात येणे व संबंधित कंत्राटदारावर फौजदारी कारवाई करण्यात येतअसल्याचे जाहीर करणे, पण अद्याप पर्यंत यावरती कुठलीही फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले नसणे, अद्यापपर्यंत दंडाची रक्कम सुद्धा वसूल करण्यात आली नसणे, असे असताना सुद्धा खनिकर्म व महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली वर्धा व नागपूर जिल्ह्यातील रेतीघाट देण्यात आले असणे, भंडारा जिल्ह्यातील मोहाडी वतुमसर तालुक्यातील ४२ रेतीघाटाचे व डेपोचे कंत्राटअनोजकुमार अग्रवाल यांना देण्यात येणे, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्यातील १३ रेती घाटाच्या कंत्राटासह सावली, सिंदेवाहीसह जिल्ह्यातील अनेक रेतीघाटाचे कंत्राट अनोजकुमार अग्रवाल यांना देण्यात येणे, याअग्रवाल बंधूनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने व अधिकाऱ्यांना धमकावून पूर्व विदर्भातील सर्व जिल्ह्यातील रेतीघाटातून हजारो ब्रासचे अवैधरित्या उत्तखनन करून हजारो कोटी रुपयांच्या महसूलाची चोरी करुन शासनाची फसवणूक करणे, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्यातील १३ रेती घाटातून किमान ३०० कोटी रुपयाच्या अवैधरित्या रेती उत्तखननची सविस्तर लेखी तक्रार नागपूरच्या लोकप्रतिनिधीनी मुख्यमंत्री व महसूलमंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ ला करण्यात आले असताना सुध्दा अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष त्यामुळे या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२९८.	श्री. दिलीप लांडे वि. स .स.	"भोर व राजगड तालुक्यातील फिकट लाल रंगाच्या 'पोयटा माती'च्या उत्खननावर मोठ्या प्रमाणात तस्करी सुरू असणे, माहे नोव्हेंबर ते मे-जून या कालावधीत दररोज सुमारे १० हायवा गाड्यांनी माती वाहून नेली जाणे, प्रतिगाडी सरासरी ६-७ ब्रास माती नेली जात असल्याने या काळात तब्बल २ हजार ४०० हायवा गाड्यांमधून मोठ्या प्रमाणावर मातीचा काळाबाजार चालणे आणि यामुळे सुमारे ७२ कोटी रुपयांहून अधिक उलाढाल निर्माण होणे, यामध्ये महसूल अधिकारी, उत्खनन विभाग, भोर व राजगड पोलिस तसेच आरटीओ काहींचा सहभाग असल्याचे आरोप प्राप्त होणे, जेसीबीमालक व एजंट प्रतिगाडी सुमारे दोन हजार रुपये घेत असणे, संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून हा धंदा चालवला जाणे, या प्रकारामुळे शेतकऱ्यांना नाममात्र रक्कम मिळणे व परिसरातील नैसर्गिक पर्यावरण व ग्रीन झोनचा हानिकारक वापर होणे, त्यामुळे शासनाने या तस्करीसंबंधी तातडीने सखोल चौकशी करून संबंधित महसूल अधिकारी, पोलिस व आरटीओ अधिकाऱ्यांवर निलंबनात्मक कारवाई करावी, बेकायदेशीर वाहतुकीवर दंडात्मक कारवाई करून हा धंदा ताबडतोब बंद करावा, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
२९९.	श्री. विलास तरे वि .स .स.	"मुंबई - राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर पालघर जिल्ह्यात, ता . वसई मध्ये ससूनवघर ते ता. तलासरी मध्ये आच्छाड पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा आदिवासी समाजाच्या, वनविभागाच्या, महसूल विभागाच्या राखीव जमिनी असणे, या जमिनीवर मोठ-मोठे हॉटेल, ढाबे अनधिकृत बांधकाम करून चालत असणे, आदिवासी समाजाला हाताशी धरून अनेक व्यापारी कोडीमोल भावात जमिनी भाडेतत्त्वावर घेऊन हॉटेल चालवत असणे, या आदिवासींच्या जमिनी इतर समाजाने अतिक्रमण केलेले असणे, काही हॉटेलवर अनधिकृत कृत्य घडत असणे, त्यामुळे आदिवासी समाजाची संस्कृती बिघडत असणे, तसेच, या हॉटेलला कोणतीही प्रकारची परवानगी नसणे, या हॉटेलच्या बाहेर मोठ्या प्रमाणावर वाहने वाहनतळ होत असल्याने अपघात होत असणे, उक्त प्रकरणी आदिवासी समाजाच्या जमिनी पुन्हा आदिवासी समाजाला देण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता
३००.	श्री. नानाभाऊ पटोले वि .स .स.	"गोंदिया जिल्ह्याला २०२३-२०२४ मध्ये उत्पादित झालेल्या CMR तांदळासाठी आवश्यक असलेला FRK तांदूळ सरकारकडून मिळाला नाही. तरीही, संपूर्ण तांदळाचा लॉट LD FRK तांदळाने तयार केला गेला असणे, गोंदिया येथील जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. सतीश	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आगडे म्हणून अतिरिक्त कार्यभार पाहत आहेत. ते गेल्या दहा वर्षांपासून गोंदिया जिल्ह्यात आहेत, त्याच जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यात राहतात आणि पूर्वी भात गिरणी मालक होते. चार वर्षांपूर्वी श्री. आगडे देवरीमध्ये गुणवत्ता निरीक्षक होते. त्यावेळी, देवरीमध्ये त्यांनी मंजूर केलेला तांदूळ केंद्रीय पथकाने मानवी वापरासाठी अयोग्य असल्याचे नोंदवले होते. तो तांदूळ अजूनही देवरीच्या गोदामात साठविणे, या गोदामाचे भाडे चार वर्षांपासून दिले जात असणे, यामुळे सरकारच्या तिजोरीवर अनावश्यक भार पडत आहे. गोंदियाचे डीएसओ श्री. सतीश आगाडे हे यासाठी जबाबदार असणे, गोंदिया जिल्ह्यात, सीएमआर तांदूळ जमा करण्यासाठी सरकारने १६००३८ मेट्रिक टन क्षमतेची गोदामे भाड्याने घेतली. यात पारदर्शकता नाही. काही गोदामांमध्ये ४ मिलर्स आहेत तर काहींमध्ये २५ मिलर्स आहेत तसेच गिरणी मालक त्यांच्या पसंतीच्या गोदामांमध्ये सीएमआर तांदूळ जमा करत असणे, असा अदांधुद कारभार सुरु असुनही शासन याबाबत दुर्लक्ष करित असणे , परिणामी शासनाने त्वरीत याबाबत चौकशी करुन करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३०१	श्री. विजय वडेट्टीवार वि. स .स.	“राज्यातील नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सार्वजनिक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वितरण व्यवस्थे अंतर्गत केले जात असणे, जीवनाश्यक वस्तूंच्या पुरवठ्यामध्ये पारदर्शकता यावी, आणि पात्र लाभार्थ्यांना जीवनावश्यक वस्तूंचा लाभमिळावा याकरीता स्वस्त धान्य दुकानांमध्ये वस्तूंचा पुरवठा करतेवेळी लाभार्थ्यांची ओळख व खात्री पटण्यासाठी ई-पॉस मशिनचा वापर केला जात असणे, सदरच्या ई-पॉस मशिन व अनुषंगिक सुविधा भाडे तत्वावर उपलब्ध करून देण्यासाठी विभागाने जुलै २०२२ मध्ये निविदा प्रक्रिया सुरु करून ऑक्टोंबर २०२३ मध्ये कार्यादेश दिले असणे, या कामकाजाकरीता निवड झालेल्या M/s Linklwell Telesystem Pvt.Ltd., Hyderabad व M/s OASYS Cybernatics Pvt. Ltd. यांनी खोटी माहिती सादर करून तसेच त्यांच्यांवर झालेल्या कारवाया दडवून शासनाची दिशाभूल करून फसवणूक केलेली असणे, सदर कंपन्या विविध राज्यांमध्ये काळ्या यादीत असणे, M/s OASYS Cybernatics Pvt. Ltd. या कंपनीवर सुध्दा हिमाचल प्रदेश शासनाने कारवाई केल्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP(C) No.६५३१/२०२५ मध्ये दि.२४/११/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाव्दारे स्पष्ट होत असणे, याप्रकरणी मंत्रालयातील काही अधिकारी व कर्मचारी यांचा हस्तक्षेप असणे व सदर कंपनीला काम मिळवून देण्यासाठी कार्य करत	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे,त्यामुळे या दोन्ही कंपन्यांचे कामकाज तात्काळ काढून घेण्यात यावे व संबंधित अधिकारींवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी कारवाई करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३०२.	श्री. विनोद अग्रवाल,श्री .संजय पुराम,श्री .विजय रहांगडाले,श्री . नरेंद्र भोंडेकर वि .स .स.	"राज्यामध्ये आधारभुत किंमत धान खरेदी अंतर्गत महाराष्ट्र मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळा मार्फत धानासह इतरही पिकांची खरेदी करण्यात येणे, पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये सर्वात जास्त धान पिकाची खरेदी करण्यात येणे, आधारभूत धान खरेदी अंतर्गत धान साठवणुकीकरीता गोडाऊन किरायाने घेण्यात येणे, यापैकी अनेक गोडावुन सर्वसामान्य शेतकरी सभासद असलेल्या सहकारी संस्था किरायणे घेणे, अन्न व नागरी पुरवठा विभागामध्ये मागील तीन-चार वर्षांपासुन धान गोंडाऊनच्या किरायची, धान खरेदी कमीशन, कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे सेसची कोट्यावधींची रक्कम थकित असणे, धानाचे चुकारे वेळेत मिळत नसणे, अन्न व नागरी पुरवठा विभागामध्ये गोडावुन किराया, कमीशन व सेसच्या रक्कमेकरीता काबरा नावाच्या खाजगी व्यक्तीची भेट घेण्यास सांगण्यात येत असल्याची चर्चा असणे, सधन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		खाजगी तांदुळ गोडावुनधारक विभागामध्ये टोलरुपी अर्थपूर्ण व्यवहार करीत असल्याने किरायाची रक्कम तातडीने अदा करण्यात येणे, सर्वसामान्य धान गोडावुनधारक व बाजार समिती अर्थपुर्ण व्यवहार करीत नसल्याने त्यांची मागील तीन-चार वर्षांपासुन किरायाची, कमीशनची, धानाचे चुकारे, सेसची कोट्यावधींची रक्कम थकीत असणे, यामुळे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे गैरकार्यभाराबाबत बाजार समिती व गोडावुनधारकांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण तथा शासनाची होत असलेली नाहक बदनामी, यावर शासनाने करावयाचे तातडीची कार्यवाही व उपाययोजना.”	
३०३.	श्री. गोपिचंद पडळकर वि .स .स.	“मुंबईतील दादर (प.) येथील रेशन दुकानासंदर्भात अत्यंत गंभीर व चिंताजनक घटना घडल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, परवाना क्र. १९A/१५० हा सन २०१८ पासून गोपाळ भवन, खेड गल्ली, काकासाहेब गाडगे मार्ग, दादर (प.) येथे शासनाच्या नियमानुसार रेशन धान्य वितरणाचे काम करीत असणे, दिनांक ०४ मार्च, २०२६ रोजी रेशनिंग विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुकानाची तपासणी करून स्टॉक रजिस्टर व व्हिजिट बुक ताब्यात घेतले आणि पुढील आदेश येईपर्यंत धान्य वितरण व ई-POS मशीनचा वापर थांबविण्याचे मौखिक निर्देश	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		देणे, त्यानुसार संबंधित दुकानदाराने ०५ व ०६ मार्च रोजी दुकान बंद ठेवले. मात्र दिनांक ०६ मार्च, २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजता काही रेशनिंग अधिकाऱ्यांनी ग्राइंडर मशीनने दुकानाचे कुलूप व शटर तोडून आत प्रवेश केल्याचा आरोप होणे, त्यानंतर दुकानातील धान्य, साखरेच्या १० गोण्या (प्रत्येकी ५० किलो) तसेच कॅश काउंटरमधील सुमारे रु. १०,०६,०००/- रोख रक्कम ताब्यात घेतल्याचे सांगितले जाणे, ही घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असून शासनाने याबाबत तातडीने सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३०४.	श्री. नारायण (आबा) गोविंदराव पाटील वि. स. स.	"करमाळा तालुक्यातील (जि.सोलापूर) ३० गावातील ग्रामस्थांनी आपल्या वहीत जमीनी, रहाते घरे व गाव राष्ट्रहितासाठी उजनी धरण निर्मितीसाठी दिलेले असणे, सदर गावांचे पुनर्वसन अद्यापही चांगल्या पध्दतीने झालेले नसून आजही पुनर्वसित गावे १८ नागरी सुविधांपासून वंचित असणे, प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी म्हणून पंढरपूर व मोहोळ तालुक्यात दिलेल्या जमीनी या निकृष्ट दर्जाच्या असणे, तसेच त्या परिसरातील जमीन वहीत करीत असलेल्या शेतकऱ्यांनी करमाळा तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमीन ताब्यात घेण्यास मज्जाव	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		केलेला असणे, त्यामुळे अनेक प्रकल्पग्रस्त शेतकरी बँकाकडून कर्ज काढून उजनी लाभक्षेत्रातील माळरानावर शेतजमिनी तयार करुन आपला उदर निर्वाह करीत असणे, तथापि शासनाने सदर अतिक्रमण हटवण्याची मोहिम हाती घेतल्याने त्यांच्यावर पुन्हा भूमिहीन होण्याची आलेली वेळ, उजनी जलाशयासाठी संपादीत केलेल्या जमिनीमधील अतिक्रमण हटाव मोहिम स्थगित करण्यात यावी अशी मागणी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसह स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तहसिलदार, करमाळा, मा.जलसंपदा मंत्री, मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांचेकडे केलेली असणे, तथापि अद्याप उक्त प्रकरणी कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही झालेली नसणे, परिणामी उजनी जलाशयासाठी आपल्या वहीत जमीनी, घरे देणाऱ्या प्रकल्पग्रस्तांमध्ये वाढते भितीचे व नैराश्याचे वातावरण, उजनी प्रकल्पग्रस्तांवर पुन्हा भूमिहीन होण्याची वेळ येऊ नये याकरीता शासनाने हाती घेतलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेला त्वरीत स्थगिती देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३०५.	श्री. जयंत पाटील वि .स .स.	“सातारा जिल्ह्यातील धोम धरणाच्या कालव्यांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निदर्शनास येणे, सदर कालव्यांना अनेक ठिकाणी खिंडार पडलेले असून सिंचनासाठी सोडले जाणारे पाणी मोठ्या प्रमाणात वाया जात असणे, पाटबंधारे विभागाकडून कालव्यांची दुरुस्ती, साफसफाई तसेच योग्य नियंत्रण होत नसल्याने पाणी गळतीमध्ये झालेली वाढ, तसेच पाटकऱ्याची मनमानी अद्याप सुरु असून शेतकऱ्यांना योग्य प्रमाणात पाणी मिळत नसणे, परिणामी शेती सिंचन प्रभावित होणे, पिकांचे नुकसान होणे, उत्पादन घट तसेच आर्थिक अडचणी निर्माण होत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, धोम धरणाच्या कालव्यांच्या दुरवस्थेबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून शासन स्तरावर दुरुस्तीबाबत करावयाची कार्यवाही, याकरिता निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना."	
३०६.	श्रीमती मोनिका राजळे वि. स .स	"जायकवाडी धरण १९७६ साली पुर्ण होवून पाणी साठा सुरु झाल्यापासून धरण ८५ ते १०० टक्के भरल्यावर धरणाच्या पाण्याच्या फुगवट्यामुळे शेवगांव तालुक्यातील अनेक गावातील भूसंपादन न झालेल्या जमीनीत पाणी शिरत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व शेतीचे नुकसान होत असणे, शेती उत्पन्न वाया जावून शेतजमिनीचेही	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पाणी साठल्याने नुकसान होत असणे, पिके व शेतीचे दरवर्षी पाणी शिरल्याने नुकसान झालेले शेतकरी नुकसानीच्या भरपाईची मागणी करीत असणे, पंचनामे होवूनही नुकसान भरपाई मिळत नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी पाणी शिरुन नुकसान होणाऱ्या जमिनींचे जलसंपदा विभागाने भूसंपादन करुन घ्यावे अशी मागणी सातत्याने करणे, जलसंपदा विभाग शासन निर्णय आश्वासन २०१२ / आय-बी / ३० / १२ मो.प्र. २ दि. २१/०९/२०१२ परिपत्रकानुसार शेवगांव तालुक्यातील शेतीमध्ये वारंवार पाणी साचून नुकसान होत असलेल्या जमीनी वरील शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागाने भूसंपादन प्रक्रिया करणेची तातडीची गरज असणे, या महत्वाच्या विषयाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३०७.	श्रीमती मोनिका राजळे वि. स .स.	“जायकवाडी धरणाच्या निर्मितीसाठी १९६६ मध्ये भूसंपादन प्रक्रिया सुरु झालेली असणे अद्यापपर्यंत भूसंपादन झालेल्या प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे पुर्ण मोबदले किंवा पर्यायी जमिन देण्याचे प्रस्ताव प्रलंबीत असणे, १९६६ साली पर्यायी जमीन देतांना ६५ टक्के रक्कम अनामत भरण्याचा कायदा अस्तीत्वात नसणे, १९७६ चे भूसंपादन कायद्यानुसार व परिपत्रकाच्या अटी व मा. न्यायालयाचे निर्णयानुसार मोबदले व	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जमिन देण्याचे प्रस्ताव अद्याप प्रलंबीत असणे, ज्यांना पर्यायी जमीन मंजूर केल्या त्यांना विविध कारणामुळे जमीनीचा ताबा न मिळणे, त्याऐवजी जमीन बदल करुन मिळण्याचे प्रस्ताव अद्यापही प्रलंबीत असणे, त्यामुळे प्रकल्पग्रस्त व त्यांचे वारसदारांचे आर्थिक परिस्थीती प्रचंड हालाखीची होत असणे, यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या मनात प्रचंड असंतोषाची भावना, धरणग्रस्त संघटनेमार्फत शासनाकडे व न्यायालयात न्यायासाठी पाठपुरावा करणे, या प्रकल्पग्रस्तांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३०८.	श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव वि. स. स.	"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील शिवना टाकळी मध्यम प्रकल्पासाठी गोदावरी पाटबंधारे महामंडळांतर्गत दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी कन्नड व वैजापूर तालुक्यातील उजव्या मुख्य वितरिका तसेच Closed Pipe Distribution Network आणि संलग्न कामांसाठी निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली असणे व कार्यारंभ आदेशाची प्रक्रिया सुरू असल्याचे निदर्शनास येणे, सदर निविदेतील अटी जाणीवपूर्वक जाचक ठेवून अधीक्षक अभियंता यांनी विशिष्ट कंत्राटदारांना लाभ व्हावा यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केल्याचे दिसून	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		येणे, निवड झालेल्या कंत्राटदाराने तीन संस्थांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे सहभाग घेतलेला असणे, त्यातील "अभिराज कन्स्ट्रक्शन" ही संस्था कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून काळ्या यादीत असणे, ही बाब माहीत असूनही Joint Venture च्या माध्यमातून पात्र ठरविण्यात आलेले असणे, सदरहू बाब शासनाच्या अटींचे उल्लंघन ठरणे, तसेच संबंधित कंत्राटदाराची गांधेली येथील गट क्र. १६१ व १६२ जमीन अधिक्षक अभियंता यांचा अत्यंत जवळचा नातेवाईक (भाचा) यांच्या नावावर हस्तांतरित झालेली असणे व जमीन स्वरूपात लाच स्वीकारल्याची शक्यता निर्माण होणे, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३०९.	श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके वि. स. स.	"प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना अंतर्गत उर्ध्व कुंडलिक मध्यम प्रकल्प सोन्नाखोटा ता.वडवणी जि.बीड या सिंचन प्रकल्पास प्रथम १५.१०.१९९८ रोजी प्रशासकीय मान्यता मिळणे, प्रकल्पाच्या दरात वाढ झाल्याने तृतीय सुधारीत प्र.मा. १६.०६.२०१७ रोजी मिळणे, मुख्य धरण, कालवा, वितरीका व बंद पाईप लाईनचे कामे ०७.०६.२०२३ रोजी पुर्ण केल्याचे जलसंपदा विभागाने घोषित करणे, परंतु अद्यापही	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		लाभक्षेत्रातील मोरवड, बाहेगव्हान ता. वडवणी जि.बीड या गावातील सिंचनाची वितरिकेची मूळ कामे अपुर्ण असणे, अपुर्ण कामे पुर्ण करण्याबाबत सातत्याने कार्यकारी अभियंता बीड पाटबंधारे विभाग यांच्याकडे शेतकरी व लोकप्रतिनिधीने पाठपुरावा करणे, परंतु याकडे दुर्लक्ष होणे, पर्यायाने शेतकरी सिंचनापासुन वंचित रहाणे, या बाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३१०.	श्री. अभिजीत पाटील वि .स .स.	"सोलापूर जिल्ह्यातील माढा विधानसभा मतदार संघातील माढा तालुक्यातील सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून मौजे तुळशी, बावी, परितेवाडी, अंजनगांव (खे.). कुई, अंबाड व पिंपळखुटे, या गांवातील शेतीस सिंचनाचा लाभ मिळणेसाठी संबंधित शेतकरी वारंवार मागणी करीत असणे, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडूनही वारंवार शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे तसेच विधानसभा सभागृहात विविध आयुधांच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येणे, तथापि अद्याप याबाबत ठोस निर्णयात्मक कार्यवाही न होणे, गतीवर्षीच्या पावसाळी अधिवेशनात दि.११.०७.२०२५ रोजीच्या विधानसभेच्या कामकाजात याबाबतची लक्षवेधी दर्शविण्यात येणे, त्यावेळी मा.जलसंपदा मंत्री	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		यांचेकडून यासंदर्भात सविस्तर चर्चा करुन निर्णयात्मक कार्यवाही करण्यासाठी बैठक आयोजित करण्याचे आश्वासन देणे, त्यानुषंगाने दि.१७.०७.२०२५ रोजी आयोजित बैठकी आयोजित करण्यात येणे, सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अद्यापही कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी उपरोक्त गावांना सिंचनापासून वंचित रहावे लागणे, सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून माढा तालुक्यातील मौजे तुळशी, बाबी, परितेवाडी, अंजनगांव (खे.), कुई, अंबाड व पिंपळखुटे या गावांना सिंचनाचा लाभ मिळणेसाठी फेर प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना संबंधितांना देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, शासनाने सदर प्रकरणी तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.”	
३११.	श्री. जयंत पाटील वि .स .स.	“राज्यात सुमारे १८०० सहकारी पाणी उपसा जलसिंचन संस्था कार्यरत असुन कोरडवाहू जमिनीस पाणी देण्याचे शासनाचे काम या संस्थेद्वारे करण्यात येणे, शेतकऱ्यांनी स्वत:चे जमिनीवर कर्ज घेऊन संस्थांचे काम पुर्ण केलेले असणे, यामध्ये बरेचसे शेतकरी हे अल्प व अत्यल्प	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		भुधारक असणे, या संस्था ४० वर्षांपेक्षा जास्त कालावधीच्या झाल्या असुन दुरुस्ती व देखभाल खर्च मोठ्याप्रमाणावर वाढला असुन या संस्था चालविणे अत्यंत कठीण होत चालले असणे, या संस्थांकडे बरीच रक्कम थकीत असुन शासनाने यापुर्वी पाणी पट्टीची आकारणी सरळ दराने करण्यात येत असताना आता पाणीपट्टीमध्ये दोनपट दंडाचे दराने आकारणी सुरु केली असुन विलंब शुल्काची आकारणी सुद्धा करण्यात येत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट उभे ठाकलेले असणे, ही थकीत पाणीपट्टी पुर्णपणे माफ करावी अशी मागणी तेथील शेतकऱ्यांकडुन व लोकप्रतिनिधींकडुन होत असुन शेतकऱ्यांना या संकटातून वाचवण्यासाठी थकबाकी माफ करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३१२.	श्री. संतोष दानवे वि .स .स.	“जालना जिल्ह्यातील जाफरबाद तालुक्यातील सोनखेडा साठवण तलावासाठी एकूण १६८ हेक्टर जमीन संपादित करण्यात आलेली असणे, त्यापैकी अद्यापही १५ हेक्टर जमिनीची खरेदी प्रक्रिया प्रशासकीय स्तरावर प्रलंबित राहिल्याने संबंधित अल्पभूधारक शेतकरी हक्काच्या नुकसान भरपाईपासून वंचित असणे, यावर्षी झालेल्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		समाधानकारक पावसामुळे धरणाचा पाणीसाठा क्षमतेपेक्षा अधिक वाढल्याने तलावाच्या परिसरातील अतिरिक्त ३८ हेक्टर जमीन जलमय होऊन शेतकऱ्यांच्या उभ्या खरीप पिकांचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले असणे, या नवीन बाधित झालेल्या ३८ हेक्टर जमिनीचे फेरसंपादन करण्यासाठी आणि बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मोबदला मिळवून देण्यासाठी जलसंपदा विभागाच्या वतीने संबंधित महामंडळाला प्रस्ताव व निधीची मागणी सादर करण्यात आलेली असणे, मात्र शासन स्तरावरील तांत्रिक दिरंगाईमुळे अद्यापही सदर निधी उपलब्ध न झाल्याने स्थानिक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला असणे, जमिनीचा मोबदला वेळेत न मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिकट होऊन त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येणे, ही बाब अत्यंत गंभीर असल्याने शासनाने याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असणे, तरी प्रलंबित १५ हेक्टर जमिनीची खरेदी प्रक्रिया पूर्ण करणे, वाढीव ३८ हेक्टर क्षेत्राच्या भूसंपादनासाठी लागणारा आवश्यक निधी महामंडळाकडून तात्काळ मंजूर करून घेणे आणि बाधित शेतकऱ्यांना प्रचलित कायद्यानुसार नुकसान भरपाई देण्यासाठी प्रशासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची तात्काळ अंमलबजावणी करणे अत्यंत	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३१३.	डॉ. विश्वजित कदम वि .स .स.	“वांगी ता.कडेगांव, जि.सांगली येथील ताकारी योजनेच्या वितरिका क्र. ११ बुजवून बंदिस्त वाहिनी टाकण्याचे काम अद्याप अपूर्ण असल्याचे दि. २८/२/२०२६ रोजी उघडकीस येणे, त्यामुळे यंदाही संबंधित पाटावरील शेतीला पाणी मिळणार नसल्याची भीती व्यक्त होणे, सुमारे तीन किलोमीटर लांबीच्या या वितरिकेतून गेल्या २५ वर्षापासून शेतकऱ्यांना मुबलक पाणी मिळत असणे, उघड्या वितरिकेतून पाणी वाहत असल्याने परिसरातील विहिरी व कूपनलिकांची पातळीही वाढत असणे, या योजनेचे पाणी बंद झाल्यानंतरही हे साठलेले पाणी पिकांसाठी अपयुक्त ठरत असणे, मात्र पाणी बचतीसाठी शासनाने “बंदिस्त वितरण प्रणाली” राबविण्याचा निर्णय घेवून या योजनेची वितरीका बुजवून टाकणे बंदिस्त वितरण प्रणालीचे काम सहा महिन्यांपासून सुरु असून पुढील आर्वतनापूर्वी काम करण्याचे आश्वासन देवूनही काम विहीत मर्यादेत पूर्ण न करणे, परिणामी संबंधितक्षेत्र यंदाही पाण्याअभावी राहण्याची शक्यता निर्माण होणे, त्यामुळे लाभधारक शेतकरी चिंतेत असणे, यामुळे सदर काम तातडीने पूर्ण करुन पुरेसे पाणी द्यावे, अशी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, परंतू शासन घेत नसलेली दखल परिणामी येथील शेतकऱ्यांत व्यक्त होणारा असंतोष व नाराजीची भावना, शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३१४.	ॲड. राहुल ढिकले वि .स .स.	"नाशिक पूर्व भागातील डाव्या कालव्या नजीक वज्रेश्वरी झोपडपट्टी व फुले नगर झोपडपट्टी दिंडोरी रोड,पंचवटी येथे सन १९९५ पूर्वी पासून लोक वास्तव करत असणे,सदरील ठिकाणी ८००० हजाराहून जास्त नागरिक राहत असणे,तसेच सदरील नागरिकाकडे रेशन कार्ड,लाईट बिल तसेच मनपा नाशिक यांना घरपट्टी तसेच पाणी पट्टी भरलेले सर्व दस्तऐवज उपलब्ध असणे, मा.कार्यकारी अभियंता,नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक यांच्या वतीने शाखा अभियंता,सिंचन शाखा नाशिक यांनी जा.क्र सिंचन शाखा,नाशिक/२२४/सन २०२५ दि.०५/१२/२०२५ तसेच जा.क्र.सिंचन शाखा,नाशिक/४९/सन २०२६ दि.२५/०२/२०२६ व्दारे वज्रेश्वरी झोपडपट्टी व फुले नगर झोपडपट्टी दिंडोरी रोड पंचवटी येथील नागरिकांना तातडीने घर व इतर खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आलेल्या असणे,सदरील कार्यवाही मुळे हजारो गरीब नागरिक बेघर होवून त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न निर्माण होणे,सदरील कारवाई मुळे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वास्तव्यास असलेल्या लोकामध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण होवून शासना विषयी प्रचंड संताप निर्माण झालेला असणे,सदरील अतिक्रमण कार्यवाही थांबवून वज्रेश्वरी झोपडपट्टी व फुले नगर झोपडपट्टी दिंडोरी रोड पंचवटी येथील झोपडपट्टी अधिकृत करण्यासाठी किंवा पुनर्वसन योजना लागू करण्यासाठी शासन स्तरावर तातडीने करावयाची कारवाही व उपाययोजना."	
३१५.	श्री. विजयबापू शिवतारे वि. स .स.	"पुणे जिल्ह्यातील भोर, पुरंदर आणि वेल्हा तालक्यातील सिंचनासाठी १९९३ साली गुंजवणी प्रकल्पाची शासनाने आखणी करणे, सन २०१४ पर्यंत पुनर्वसनाच्या समस्यांमुळे प्रकल्पाचे काम सतत बंद पडणे, २०१५ साली पुन्हा काम सुरु होणे, सन २०१७-१८ मध्ये धरण पूर्ण होणे, सन २०१९ मध्ये वितरणासाठी जलवाहिनी मंजूर होणे, जलवाहिनीचे काम एल अँड टी या विख्यात कंपनीला मिळणे, काही प्रमाणात जलवाहिनीचे काम झाल्यानंतर सन २०२४ पर्यंत पुन्हा ठप्प होणे, १९/०७/२०२० रोजी वितरण व्यवस्थेच्या संरचनेत बदल होणे, परिणामी शेतकरी वर्गात असंतोष होणे, अखेर २४/०७/२०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी पुन्हा मूळ संरचनेप्रमाणे जलवाहिनी करण्याचा निर्णय होणे, जलवाहिनीचे काम करणाऱ्या कंपनीला पुरेसे निधीवितरण न केल्याने	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		काम पुन्हा ठप्प होणे, जवळपास ४५० कोटी रुपये किमतीचे पाईप कंपनीने तयार करून ठेवणे, मुख्यमंत्री महोदयांनी १५/०७/२०२५ रोजी बैठक घेऊन तातडीने २०० कोटी रुपये निधी वितरण करण्याचे आदेश देणे, सदर आदेशाची जलसंपदा विभागाकडून अमलबजावणी न होणे, अर्थसंकल्पात तुटपुंजी तरतूद होणे, पुरवणी अर्थसंकल्पात देखील निधी न देणे, कृष्णा खोरे महामंडळाने १० मार्च २०२६ रोजी अपर मुख्य सचिव जलसंपदा विभाग यांच्याकडे पुनर्विनियोजनात १२५ कोटी रुपयांची मागणी प्रस्तावित करणे, सदर मागणी नुसार निधी तातडीने मिळण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."	
३१६.	डॉ. बाबासाहेब देशमुख वि. स .स.	"सांगोला तालुक्यातील आठ गावे म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत लाभ क्षेत्रात येणे,या योजनेची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येऊन लाभक्षेत्र माहे डिसेंबर २०२३ मध्ये निर्मित झाले असून, लाभक्षेत्रात पाण्याचे वितरण संथगतीने होत असणे, आगलावेवाडी कोल्हापुरी बंधारेपासून वाडेगाव पर्यंत कोरड्या नाल्यातील एकूण १५ कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये जत मुख्य कालव्यामधून थेट बंदिस्त नलिका वितरण करून पाणी सोडण्याच्या प्राथमिक अहवालाची कार्यवाही क्षेत्रीय	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		स्तरावर संथगतीने सुरू असणे, म्हैसाळ उपसासिंचन योजनेद्वारे सांगोल्यातील लाभक्षेत्रातील आठ गावातील ४००० हेक्टर क्षेत्र तसेच मौजे डिकसळ येथील ६२७ हेक्टर इतके क्षेत्र लाभ क्षेत्रात समाविष्ट असूनही सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत नसणे, नरळे हंगेरगी व पारे येथील साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी असलेल्या बंदिस्त नलिका अत्यंत छोटे असल्याने या नलिकांद्वारे हे पाणी साठवण तलाव भरण्यासाठी अधिक काळ लागत असणे, या परिसरातील शेतकऱ्यांना, जनावरांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होत नसल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागणे, सदर गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या कोरडा नदीवरील १५ कोल्हापुरी बंधारे बंदिस्त पाईपलाईनद्वारे म्हैसाळ योजनेच्या जत कालव्यावरून पाणी देण्याची तरतूद करून नरळे,हंगेरंगी,पारे येथील साठवण तलावात मुख्य कालव्यातून थेट बंदिस्त नलिकाद्वारे पाणी सोडण्याची तरतूद करून वाढीव पाईपलाईन टाकून प्रवाहामध्ये वाढ करून अधिक कार्यक्षम व समतोल पाणी वाटप करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३१७.	डॉ. किरण लहामटे वि .स .स.	“निळवंडे धरण व कालव्याच्या परिसरात कामा दरम्यान जड वाहनांच्या वाहतुकीमुळे सर्व रस्ते खराब झालेले असणे, बरेच वर्षे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्याकडे सरकारने दुर्लक्ष करणे, लोकप्रतिनिधींच्या व स्थानिकांच्या मागणीवरुन काही रस्ते मंजूर होणे व त्यातील काही रस्ते सुरु होणे, तेही लागलीच खराब होणे, झालेले जे थोडे फार काम आहे तेही निकृष्ट असणे, त्यामुळे त्या धरण व कालवे क्षेत्रात शेतकरी, येणारे-जाणारे लोक, गावकरी यांना धरण कालव्यांना जमिनी देऊनही प्रचंड त्रास दळणवळणासाठी सहन करावा लागणे, धरणातून पाणी मात्र खालच्या भागाला नेले जाणे, पण स्थानिकांच्या रस्ते, पूल,सरंक्षण कठडे याकडे सरळसरळ अक्षम्य दुर्लक्ष होणे, त्यामुळे अकोलाच्या जनतेत प्रचंड रोश तयार होणे, याबाबत शासनाने दखल घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३१८.	श्री. कैलास घाडगे पाटील, श्री .संभाजी पाटील-निलंगेकर वि .स .स.	"मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खो-यात वळवून नदीजोड प्रकल्प राबविण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेऊन प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निधी मंजूर करणे, सुरुवातीला १६७ टी.एम.सी. पाणी मिळणार असणे, मात्र आता केवळ ७८ टी.एम.सी. एवढेच पाणी मराठवाड्याला मिळणार असल्याचे जाहीर करणे, हा प्रकल्प मराठवाड्यासाठी अत्यंत महत्वाचा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे, ७८ टी.एम.सी. पाणी जायकवाडी व इतर प्रकल्पांपर्यंत पोहोचल्यास शेतकऱ्यांना फायदा होणे, या पाण्यावर मराठवाड्यातील सर्व आठ जिल्ह्यांचा अधिकार असल्याने शेती क्षेत्रफळाप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याचा हिस्सा ठरविणे, पार-गोदावरी प्रकल्पाचा अहवाल फेब्रुवारी २०१४पासून सुरू असून अद्याप स्वीकृत झालेला नसणे, त्याचा अनुभव घेऊन ७८ टी.एम.सी. पाण्याचा प्रकल्प अहवाल वेळेत पूर्ण करणे, जायकवाडी उजव्या कालव्याद्वारे माजलगाव, कुंडलिका, तांदुळवाडी, मांजरा, वाखरवाडी व तेरणा प्रकल्पांपर्यंत उपसा सिंचन व प्रवाही पद्धतीने पाणी आणल्यास बीड, धाराशिव व लातूर जिल्ह्यांना पाणी उपलब्ध होणे, मराठवाड्यासाठी असलेले संपूर्ण ७८ टी.एम.सी. पाणी मराठवाड्यातील सर्व आठ जिल्ह्यांना विशेषतः बीड, धाराशिव व लातूर या जिल्ह्यांतील शेती क्षेत्रफळाप्रमाणे पाणी वाटप न्याय्य पद्धतीने होईल असा प्रकल्प अहवाल तयार करून त्याची कालमर्यादा निश्चित करून तातडीने काम सुरू करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३१९.	श्री. काशिनाथ महादु दाते, श्री. संजय मेश्राम, श्री. नारायण कुचे, श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. मोहन मते, श्री. अबू आझमी वि. स. स.	"नवी मुंबईतील वाशी येथे वैद्यकीय पात्रता नसतानाही डॉक्टर म्हणून उपचार करणाऱ्या एका वार्डबॉयच्या निष्काळजीपणामुळे २१ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये उघडकीस आलेले असणे, संबंधित वार्डबाय अंधेरी येथील खाजगी नर्सिंग होम मध्ये काम करीत असून तो स्वतः डॉक्टर म्हणून रुग्णांवर उपचार करीत असणे, मृत्यू झालेल्या तरुणीच्या वडिलांनी तिच्या हार्मोनल आजारावर उपचार करण्यासाठी या वार्डबॉयला बोलवले असता त्याने तपासणी करून इंजेक्शन दिले मात्र इंजेक्शनच्या दुष्परिणामामुळे तरुणीला जास्त त्रास वाटू लागल्यामुळे त्याने तिला पुन्हा अजून एक इंजेक्शन दिल्याने तिची प्रकृती आणखीच खालवली जाणे व त्यातूनच पुढे तिचा दुर्देवी मृत्यू होणे, संबंधित वार्डबॉयने यापूर्वीही अनेकांवर उपचार केल्याचेही उघडकीस येणे, अशा प्रकारे राज्यात विविध ठिकाणी रुग्णालयात व लॅब मध्ये यापूर्वीही बोगस डॉक्टर व टेक्निशियन आढळल्याचे उघडकीस आलेले असणे, जामगाव (ता. बार्शी, जि. सोलापूर) येथे फिरते गर्भलिंग निदान केंद्र उघडकीस आलेले असणे, राज्यात बोगस डॉक्टर दिबवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास येणे, पदवीधारक व बोगस डॉक्टर ओळखण्यासाठी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची "नो	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		युवर डॉक्टर" मोहीम निष्प्रभ ठरणे, ग्रामीण भागात शहरी भागासारखी तातडीची आरोग्यसेवा न मिळणे, शासकीय रुग्णालयात डॉक्टर व औषधांचा अभाव असणे, बोगस डॉक्टरांची माहिती असूनही जिल्हा व तालुका आरोग्य अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई न होणे, वाशी येथील घटनेची चौकशी करण्यासह राज्यातील बोगस डॉक्टरांची विशेष मोहीम राबवून शोध घेणे, त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३२०.	ॲड. राहुल ढिकले वि .स .स.	"नाशिक येथे म्हसरूळ येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न ४३० बेडचे (सुधारित ६५० बेडचे) स्थापन करण्याबाबत दि.१०/०२/२०२१ रोजीच्या मंत्रिमंडळात मान्यता देणे, शासन निर्णय क्र.एमईडी -२०२० /प्र.क्र २१/२०/ शिक्षण-१ दि.०५ एप्रिल २०२१ नुसार इमारत बांधकामास ३८३.११ कोटी खर्चास मान्यता दिलेली असणे, म्हसरूळ येथे वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालय इमारत बांधकाम करण्याच्या नियोजित जागेत केंद्र व राज्य शासनाच्या वन विभागाने तांत्रिक मुद्द्याच्या आधारे सदरील जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक यांना देण्यास असमर्थता दर्शविणे, शासकीय वैद्यकीय	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		महाविद्यालय नाशिक या संस्थेकरिता राष्ट्रीय आयुविज्ञान आयोगाच्या मानका नुसार (मेरी) येथील भूमापन क्रंमाक व उपविभाग ११७ गटातील क्षेत्र १० हे ४७ देण्याबाबत लोकप्रतिनिधी (नाशिक पूर्व) यांनी मागणी केलेली असणे, विभागीय आयुक्त,नाशिक यांनी अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग मंत्रालय यांना दि.०५/०५/२०२५ रोजी मशा.कार्या.२/ज-२/ई-४१६५८००/२०२५ मौजे नाशिक शहर ता.जि.नाशिक येथील भूमापन क्रंमाक व उपविभाग ११७ या गटातील क्षेत्र १० हे ४७ देण्याबाबत प्रस्ताव सादर असणे, सुधारित नवीन जागा देण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप पर्यंत शासनाच्या महसूल व वनविभागाकडे प्रलंबित असणे, सदरील नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सलंग्न ४३० बेड क्षमतेचे रुग्णालय बांधकामास विलंब होत असल्याने सर्वसामान्य जनतेच्या मनात प्रचंड रोष निर्माण झाला असल्याने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
३२१.	श्री. अभिमन्यु पवार, श्री. अमित विलासराव देशमुख वि. स. स.	“लातूर येथे जिल्हा रुग्णालयासाठी जागा नसल्याने सदरील रुग्णालय कार्यान्वित नसणे, त्यामुळे लातूर जिल्ह्यातील व शेजारील जिल्ह्यातील रुग्णांचा उपचाराचा अतिरिक्त भार विलासराव देशमुख शासकीय	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय लातूर वर पडलेला असणे, सदरील वैद्यकीय महाविद्यालयात अनेक पदे रिक्त असून महाविद्यालयामध्ये ५०० रुग्ण खाटा प्रमाणे कर्मचारी वर्ग मंजूर आहे परंतु प्रत्यक्षात ८५० रुग्ण खाटा या महाविद्यालयात चालवले जाते त्यामुळे वर्ग १ ते ४ ची अतिरिक्त पदे मंजूर करून भरण्याची आवश्यकता असणे तसेच वैद्यकीय अधिकारी व परीचार्यांची रिक्त पदे भरण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, सदरील महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील MRI मशीन मागील दीड वर्षापासून बंद अवस्थेत असणे ,रुग्णालयाशेजारील रेल्वे विभागाची जागा शासनाने महाविद्यालयासाठी मंजूर केली असून सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने प्रकरण त्वरित निकाली काढण्याच्या दृष्टीने शासनाने तत्परतेने उचित कार्यवाही करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी लातूर येथील आढावा बैठकीत जिल्हाधिकारी लातूर यांना सूचना दिलेल्या असणे, सदरील महाविद्यालयातील मंजूर व प्रस्तावित बांधकामे झालेली नसणे, त्यामुळे रुग्णांच्या तत्परतेने उपचार देण्यावर परिणाम झाला असून विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय लातूर येथे रुग्णांच्या सेवेकरिता आवश्यक सुविधा	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
३२२.	श्री. रणधीर सावरकर, श्री. साजिद खान पठाण, वि. स .स.	“अकोला (जि. अकोला) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील परीचारीकांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६ रोजी काम बंद आंदोलन पुकारणे, तत्पूर्वी दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींद्वारे सदर रुग्णालयातील भेटीदरम्यान रुग्णालयीन व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळून येणे, यामुळे विसंवादाची परिस्थिती निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर रुग्णालयामध्ये कर्मचारी वर्ग अपुरा असल्याची बाब समोर येणे, विद्यमान परिस्थितीत ७७१ परीचारीकांपैकी फक्त ३१७ पदे कार्यरत असून शेष ४५४ पदांच्या भरतीचा प्रस्ताव आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांनी प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण यांना दिनांक ३ सप्टेंबर, २०२४ रोजी सादर केलेला असणे, सदर प्रस्तावानुसार वर्ग १ ते वर्ग ४ संवर्गांची पद निर्मिती करून भरती करणे, सर्वोपचार रुग्णालयात प्रतिदिन सुमारे २५०० बाह्यरुग्णांना तसेच ४०० अंतररुग्णांना सेवा पुरविणे, सदर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी व खाटांच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे निकषांप्रमाणे पद निर्मिती /भरती	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्यास शासनाची आवश्यक असलेली मंजुरी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३२३.	श्री. साजिद खान पठाण वि .स . स.	“अकोला जिल्ह्यातील शासकीय वैदयकीय महाविदयालयाशी (जीएमसी) संलग्नित जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी २,४२५ पदांचा आकृतिबंध प्रस्ताव शासनाकडे मंजुरीअभावी प्रलंबित असणे, सदर रुग्णालयात जिल्ह्यासह अमरावती, बुलढाणा, वाशिम आदि जिल्हयांतील रुग्ण मोठ्या प्रमाणात येत असून वाढती रुग्णसंख्या आणि अत्यल्प मनुष्यबळाअभावी आरोग्य सेवेवर होत असलेल परिणाम, ७१९ खाटांच्या या सर्वोपचार रुग्णालयात सध्यस्थितीत १,१०० पेक्षा अधिक रुग्ण उपचार घेत असणे, सध्यस्थितीत केवळ ७५२ पदांना मंजूरी असून त्यापैकीही फक्त ५०५ पदे भरलेली असून २४७ पदे अद्यापी रिक्त असणे, त्यामुळे डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ, औषधनिर्माते, प्रयोगशाहा, सहायक व लिपिक अशा शासकीय वैदयकीय महाविद्यालयातील सर्वच श्रेणीतील कर्मचारी कमतरतेचा फटका रुग्णसेवेवर होणे, मनुष्यबळाच्या तीव्र अभावामुळे परिचारिकेवर दोन ते तीन वॉर्डाची जबाबदारी, एका डॉक्टरवर ओपीडीसह आपत्कालीन सेवाचाही भार, सदर रुग्णालयात सोयी-सुविधांचा असलेला अभाव,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		ड्रेस कोड,स्ट्रेचर ,अस्वच्छता, खाटांचा अपुरा पुरवठा, सीटी स्कॅन मशीन, एक्स रे मशीनची आवश्यकता, आदिंचा असलेला अभाव, तसेच नियमित डायलेसीस सेवा तथा ॲन्जीओग्रापी ,ॲन्जीओप्लास्टी, करिता टेक्निशियन तथा रिक्त पदे असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून शासनाकडे मंजुरीअभावी प्रलंबित असलेल्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी देऊन रुग्णालयातील मनुष्यबळाची कमतरता भरण्याबाबत शासनस्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	
३२४.	श्री. आनंद तिडके वि .स .स.	“नांदेड जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. यशवंत राजपाल पाटील यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून पात्र कर्मचाऱ्यांना अपात्र ठरवणे व अपात्रांना पात्र ठरविणे, तसेच विविध प्रशासकीय बाबींमध्ये नियमबाह्य निर्णय घेऊन गंभीर आर्थिक व प्रशासकीय अनियमितता केल्याच्या तक्रारी समोर येणे, या संदर्भात स्थानिक आमदारांनी आयुष संचालनालयाकडे लेखी तक्रार सादर करणे, संबंधित अधिकाऱ्यांशी असलेल्या कथित लागेबांधांचा प्रभाव वापरून	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रक्रियेत हस्तक्षेप झाल्याचा आरोप होणे, डीनचा चार्ज काढला नाही तर निःपक्ष चौकशी होत नसून तो त्यांच्या निकटवर्तीयांचीच समितीत नेमणूक करून स्वतःस निर्दोष घोषित करून घेत असणे, यामुळे महाविद्यालयाची शैक्षणिक प्रतिमा व प्रशासनाची पारदर्शकता धोक्यात येणे, ही अत्यंत गंभीर बाब असून सदर प्रकरणाची दखल घेऊन मा. मंत्री वैद्यकीय शिक्षण यांनी चौकशीचे आदेश दिले असले तरी, चौकशीची व्याप्ती, कालमर्यादा व दोषींवर होणारी कारवाई याबाबत स्पष्टता नसल्याने शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत डीनचा अतिरिक्त चार्ज काढून डी.ई. (चौकशी) तात्काळ सुरू करावी आणि पर्मनंट डीनची नेमणूक करण्यात यावी, याबाबत यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
३२५.	श्री. विक्रम पाचपुते, श्री .प्रविण दटके वि .स .स.	“राज्य सरकारच्या परवानगीने २०१४ पासुन सुरू असलेला सीसीएमपी कोर्स उत्तीर्ण होऊन गेल्या दहा वर्षापासून महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल मध्ये फी व अर्ज भरून सुद्धा रजिस्ट्रेशन मिळत नसणे, सीसीएमपी रजिस्ट्रेशन देण्यासाठी दि. ५ सप्टेंबर २०२५ ला माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्रालयातर्फे लेखीपत्र महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलला देण्यात	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		येणे, तसेच दि. १७ सप्टेंबर२०२५ रोजी मा.उच्च न्यायालयाने रजिस्ट्रेशन देण्यास हरकत नसल्याबाबत अभिप्राय दिलेला असणे, राज्यातील १३ कोटी जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने होमिओपॅथिक सीसीएमपी डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन मिळणे फार गरजेचे असणे, राज्यातील शहरी, निमशहरी, ग्रामीण, दुर्गम खेडोपाडी भागात अहोरात्र रुग्णसेवा करणाऱ्या राज्यातील एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांना दिलासा मिळणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३२६.	श्री. संतोष बांगर, श्री. अमिन पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अस्लम शेख, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. नितिन राऊत, श्री. साजिद खान पठाण, डॉ. विश्वजित कदम, श्री. विकास ठाकरे,	"सर जे. जे. रुग्णालय मुंबई हे राज्यातील सर्वात मोठे व अत्यंत महत्त्वाचे शासकीय रुग्णालय असून येथे महाराष्ट्रातील तसेच देशभरातील गोरगरीब व सर्वसामान्य रुग्ण मोठ्या विश्वासाने उपचारासाठी येत असणे, दररोज हजारो रुग्णांना विविध तपासण्या, चाचण्या, एमआरआय व सीटी स्कॅनसारख्या अत्यावश्यक निदान सुविधा पुरविण्यात येत असणे, असे असताना मागील अनेक दिवसांपासून रुग्णालयातील एमआरआय व सीटी स्कॅन यंत्रणा बिघडलेल्या अवस्थेत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, त्यामुळे उपलब्ध असलेल्या एकाच यंत्रावर प्रचंड ताण येऊन रुग्णांना तपासणीसाठी अत्यंत लांबच्या तारखा देण्यात येणे, परिणामी गंभीर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	श्री. संजय मेश्राम, श्री. अमित झनक वि. स. स.	आजारांचे वेळेवर निदान न झाल्यामुळे उपचारास विलंब होत असणे व रुग्णांच्या जीवितास संभाव्य धोका निर्माण होणे, यामुळे शासनाच्या आरोग्य व्यवस्थेबाबत नागरिकांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी, सदर प्रकरणी संबंधित यंत्रसामग्रीची तात्काळ दुरुस्ती करणे, अथवा नवीन एमआरआय व सीटी स्कॅन यंत्र बसविण्याबाबत शासनामार्फत केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३२७.	श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील वि. स. स.	"मुक्ताईनगर, जि.जळगांव येथील" मुक्ताईनगर शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेने इमारतीची अदलाबदल व दिशाभूल करुन मुक्ताईनगर येथील पुनर्वसन टप्पा क्र. ३ येथील शासकीय भूखंडावर "स्व.निखिल खडसे इंग्लिश मिडियम स्कूल" ही शाळा अनेक वर्षापासून सुरु असणे, असे असतांनाही राजकीय प्रभावाने याच शाळेच्या इमारतीवरील फलक बदलून तेथे "एकनाथराव खडसे आयुर्वेद महाविद्यालय" असा फलक लावून एकाच इमारतीत दोन भिन्न शैक्षणिक प्रकल्प दाखविण्यात येणे, आयुर्वेद महाविद्यालयाची मंजूर घेताना यासंस्थेने केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करतांना या इमारतीमध्ये ग्रंथालय, प्रयोगशाळा, रुग्णालय आणि इतर पायाभूत सुविधा तसेच आवश्यक असलेला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		केवळ कागदोपत्री दाखविण्यात येणे, प्रत्यक्षात या इमारतीत कोणतेही शैक्षणिक कार्य सुरु नसतांना नॅशनल कमिशन फॉर इंडियन सिस्टम ऑफ मेडिसिन कडून मंजूरी मिळवून घेण्यात येणे, तसेच या आयुर्वेदिक महाविद्यालयास परवानगी देतांना या महाविद्यालयाची पाहणी करण्याकरिता आलेल्या समितीने कोणतीच पाहणी न करता आर्थिक हितसंबध सांभाळून टेबल रिपोर्ट तयार करुन पाठविण्यात येणे, या समितीतील सदस्यांचीही चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, आपल्या राजकीयपदाचा दबावटाकून शासकीय भूखंडावर नियमबाह्य फेरफार करुन महसूल नियमांचा भंगकरणे, याप्रकरणी शासनाने एक उच्चस्तरीय समितीमार्फत (एसआयटी) चौकशी, तसेच बनावट कागदपत्रे दाखवून राज्य शासनाची नव्हे तर केंद्रशासनाची फसवणूक केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता अंतर्गत फौजदारीगुन्हा दाखल करुन सदरील अहवाल केंद्र शासनाकडे या आयुर्वेद महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्याची शिफारस करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३२८.	श्री. संजय उपाध्याय, वि. स .स.	"वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अधिपत्याखालील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत असलेल्या राज्यातील सर्व रुग्णालयांतील रिक्त जागांवर एकुण मिळून ७२५ कर्मचारी वर्षानुवर्षे २९ दिवसांच्या बदली तत्वावर कार्यरत असणे, बदली तत्वावरील कर्मचाऱ्यांना शासनसेवेत कायमस्वरुपी करण्यासाठी 'त्याने प्रत्येक वर्षामध्ये २४० दिवस काम केलेले असावे व सलग सेवा १० वर्षे असणे आवश्यक आहे', असा शासनाचा प्रचलित नियम असणे, ह्या नियमानुसार बदली कर्मचाऱ्यांची १० वर्षे सेवा पूर्ण होईपर्यंत त्यांचे वयोमान उलटत असल्याने ते उशीराने शासनसेवेत कायम झाल्यानंतर सेवानिवृतीपर्यत त्यांच्या गाठीला तुटपुंजी शासनसेवा करण्याची संधी मिळणे, त्यामुळे सेवानिवृत्तीच्या वेळी अथवा सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या लाभाची रक्कम फारच तुटपुंजी मिळणे, अशाने त्यांचे फार आर्थिक नुकसान होणार असणे, सदर सर्व बदली कार्मचारी कोविड-१९ च्या सद्यःस्थितीत स्वतःचे जीव धोक्यात घालून व कुटुंबाची पर्वा न करता, इमानदारी-इतबारे रुग्णसेवा बजावत असणे, उपरोक्त बदली कर्मचाऱ्यांना शासनसेवेत कायम स्वरुपी करण्यासाठी शासनाच्या प्रचलित नियमानुसार त्यांच्या सेवेची सलग १० वर्षे पूर्ण	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करणे व प्रतिवर्ष २४० दिवस कामाचे भरणे, या अटींनुसार त्यांना शासनसेवेत कायम करण्यास फारच विलंब होऊन त्यांच्या आयुष्याची वर्षे वाया जातील व भविष्यात त्याचे होणारे आर्थिक नुकसान ही बाब विचारात घेणे आवश्यक असणे, तसेच हे सर्व कर्मचारी रिक्त जागांवरच काम करीत असल्याने त्यांचा अधिक आर्थिक बोजा शासनावर येणार नसणे, यास्तव त्यांच्यासाठी असलेली उपरोक्त १० वर्षे सलग सेवेची व एका वर्षामध्ये कामाचे २४० दिवस भरण्याची अट शिथिल करून त्यांना 'एक वेळची विशेष बाब म्हणुन सर्व ७२५ बदली कर्मचाऱ्यांना शासनसेवेत कायमस्वरुपी करून घेण्याबाबत शासनाने घ्यावयाचा निर्णय व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."	
३२९.	श्री. नानाभाऊ पटोले वि .स .स.	"राज्यात सीईटी परिक्षेच्या रजिस्ट्रेशन व ॲडमिशनमध्ये सीईटी सेल २०२१ घोटाळा झाला असून सीईटीसेल मध्ये एडसपार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडने खोटी व बनावट कागदपत्रे सादर करणे, दि. १९ जानेवारी, २०२३ रोजी निविदेमध्ये एडसपार्क इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडने तीच बनावट कागदपत्रे सादर केली असल्याचे माहे फेब्रुवारी २०२६ च्या सुमारास निदर्शनास आले असणे, सीईटीचे प्रशासन अधिकारी यांच्या मार्गदर्शनासाठी सीएपी (सामान्य प्रवेश प्रक्रिया) या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विद्यमान विक्रेत्यांसह सीईटी सेलच्या निविदांसाठी एक कार्टेल तयार करुन निविदामध्ये फेरफार केला असून सेल विशिष्ट कंपनीला नियुक्त केली असणे, या कंपनीमध्ये प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांचा अभाव आहे, एमबीए सारख्या परिक्षेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असतानाही अशी बनावट कंपनीची नियुक्ती करणे, या कंपनीकडे अनुभवाचे खोटी कागदपत्रे केली असणे, त्यामुळे सीईटी विद्यार्थ्यांना परिक्षा फीमध्ये जादाचे पैसे भरावे लागत असून शैक्षणिक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होत असूनही याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असणे, यामुळे नागरिक प्रामुख्याने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोष लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३३०.	डॉ. नितिन राऊत वि .स .स.	"विदर्भातील विद्यार्थ्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत स्थान मिळावे या उद्देशाने १९८६ पासून नागपूरच्या झिरो माईल येथील जुन्या मॉरिस कॉलेज परिसरात आयएएस पूर्व प्रशिक्षण केंद्र कार्यरत असणे. या केंद्रातून आतापर्यंत २०० हून अधिक उमेदवारांनी यश संपादन करून केंद्र व राज्य शासनाच्या विविध उच्च पदांवर नियुक्ती मिळवली असणे, सध्या या केंद्रात १२० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात असणे, वाढत्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		संख्येमुळे एकाच वेळी २०० विद्यार्थ्यांना अभ्यास सुविधा मिळाव्यात यासाठी नवीन लायब्ररी व १० मजली भव्य इमारत उभारण्याची योजने करिता मी नागपूर उत्तरचे विधानसभा सदस्य, नागपूरचे पालकमंत्री असतांना साधारणतः २४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असणे, त्याकरिता प्रस्ताव आणि जुने मॉरिस परिसरात पीआयटीसीच्या बाजूला असलेली वसंतराव नाईक महाविद्यालयाची पडीत जमीन मिळावी या करीता राज्याच्या उच्च शिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असणे, मात्र गेल्या चार वर्षांपासून मंत्रालयातील अधिकारी व उच्च शिक्षण मंत्र्यांकडून या प्रस्तावावर ठोस कार्यवाही झालेली नसल्याने विद्यार्थी व पालकवर्गात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३३१.	श्री. राजकुमार बडोले वि .स .स.	“मुंबई विद्यापीठात पीएचडी संशोधक विद्यार्थी भंते विमांसा याचा सुडबुध्दीने छळ करुन त्यांना विद्यापीठातून हुसकावून लावण्याचा प्रयत्न विद्यापीठ परिसरात घडणे,घटना विद्यापीठाच्या लोकशाही, सामाजिक न्यायाच्या तत्वांना काळीमा फासणारी असणे, २१ ऑगस्ट पासून	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आजपर्यंत पीएचडी संशोधक विद्यार्थी कोणताही गोंधळ,घोषणाबाजी हिंसा न करता संविधानीक मार्गाने मागण्यासाठी उपोषण करीत असणे, अभिजात भाषेचा दर्जा असलेल्या पाली भाषेच्या मुंबई विद्यापीठाच्या पाली विभागाला अनुदान व स्वतंत्र भवन निर्माण करावे, खेड्यापाड्यातून उच्चशिक्षण घेण्यासाठी येत असलेल्या गरीब अनु.जाती, जमाती व ओबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अण्णाभाऊ साठे वसतिगृहाचे नुतनीकरण करावे, या मागण्याबाबत आंदोलन करीत असलेल्या भंतेना सुरक्षा रक्षकाकडून मारहाण करणे, त्यांच्या विरोधात पोलिसात खोटी एफआयआर करणे, गंभीर अवस्थेत असतांना हॉस्पिटलमध्ये न नेता पोलिस स्टेशनमध्ये घेऊन जाणे, कोणतीही नोटीस, सुनावणी किंवा कायदेशीर प्रक्रिया न पाळता त्यांचा पीएचडी प्रवेश रद्द करणे, कुल सचिवांनी पोलिस प्रशासनास खोटी पत्रे लिहिणे, त्यांचे सामान, पुस्तके, वसतिगृहाच्या बाहेर फेकणे व खोली सील करणे, अत्यंत छोट्या रास्त मागण्यांसाठी विद्यापीठांनी घेतलेली टोकाची भूमिका,पाली भाषेच्या विकासासाठी केंद्रीय अल्पसंख्याक विभागाने मंजूर केलेला निधी आकसापोटी इतर विभागाकडे वळती करण्यात आल्याबाबत चौकशी करुन व दोषींवर कारवाई करुन पाली विभागाला	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		स्वतंत्र इमारत देण्याबाबत व अनुदान देणेबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३३२.	श्री. विजय रहांगडाले, श्री. विनोद अग्रवाल, श्री. संजय पुराम वि. स. स.	"धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ अंतर्गत खैरबंधा जलाशयात धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-१ अंतर्गत सन-२०१८ पासून पाण्याचे भरणा करुन सिंचन करण्यात येते. परंतु तेव्हापासुन आजपर्यंत ७वर्षात ११गावांना अंदाजे १५०० हेक्टर क्षेत्राला रबी/उन्हाळी हंगामात सिंचनाचे पाणी देण्यात आले नसणे, तसेच टप्पा-१ मध्ये खैरबंधा जलाशयाचे ५५९६ हेक्टर सिंचन क्षेत्रापैकी उन्हाळी हंगामात फक्त १३१५ हेक्टर क्षेत्र घेण्यात येते त्यामुळे शिर्ष भागाव्यतिरीक्त पृच्छ भागातील ११ गावांना दरवर्षी सदर हंगामात सिंचनापासून वंचित राहावे लागते, या प्रकल्पावरील डावा मुख्य कालव्याची एकुण लांबी ३२.०० कि.मी .असून सिंचनांअभावी सध्दस्थितीत सदर कालव्यावरील फक्त सा.क २७.०० .कि.मी.पर्यंतचा भाग कार्यान्वीत असणे, धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ अंतर्गत ६१८०० हेक्टर सिंचन क्षेत्र प्रकल्पात प्रस्तावित असणे परंतु त्यापैकी पिंडकेपार, बंदरचुहा व कन्हारपायली हे प्रकल्प वनमंजुरी अभावी रद्द झाल्यामुळे अंदाजे ८००० हेक्टर क्षेत्र सदर प्रकल्पातुन कमी होत असणे, याकरीता धापेवाडा उपसा सिंचन योजना	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		टप्पा-२ वरील पंपहाऊस वरून अंदाजे ८ कि.मी. ची पाईपलाईन प्रस्तावित करून डबेटोला गावाजवळ डावा मुख्य कालव्यावरील सा.क्र.१८ कि.मी.वर वितरण कुंड देवून सदर पाईपलाईन प्रस्तावित करण्यास पंपहाऊस ते डबेटोला गावापर्यंत सविस्तर सर्व्हेक्षण करण्यास व सन २०२६-२०२७ चे नियोजनात समावेश करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३३३.	श्री. नरेंद्र भोंडेकर वि .स .स.	"३५ वर्षाचा महाकालावधी आणि ३० हजार कोटी रुपयांचा निधी खर्च होऊन सुध्दा अद्यापही गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण न होणे, या प्रकल्पासाठी भंडारा जिल्ह्यातील ३४ गावाचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणे, यापैकी १८ गावातील नागरीसुविधा अपूर्ण असणे,भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील मौजा नेरला व खापरी गावाचे पुनर्वसन होणे बाकी असून यागावाचे पुनर्वसनाचा प्रस्ताव शासनाकडे ७ ऑक्टोबर २०२५ पासून प्रलंबित असणे, भंडारा जिल्ह्यातील गावांचा पुनर्वसनाचा प्रस्ताव अद्यापही विभागाकडे प्रलंबित असल्यामुळे प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीने गावाचे तातडीने पुनर्वसन करणे, भंडारा व नागपूर मधील कुटुंबवाढीमुळे २१०० लोकांनी आर्थिक पॅकेजची मागणी करणे, यासह ज्वलंत मागण्याचे निवेदन मा. मुख्यमंत्री,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मदत व पुनर्वसन मंत्री, पालकमंत्री, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी भंडारा यांना वारंवार देणे, मात्र अद्यापही याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्याने १२ डिसेंबर २०१५ रोजी वैनगंगा नदीमध्ये जलासमाधी, २६ जानेवारी २०२६ रोजी भंडारा नॅशनल हायवे रस्त्यावर चक्काजाम आंदोलन करणे, तरी सुध्दा भंडारा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तच्या मागण्याकडे शासनाकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे प्रकल्पग्रस्तामध्ये पसरलेले तीव्र असंतोष, त्यामुळे या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
३३४.	श्री. विनोद अग्रवाल वि .स .स.	“गोंदिया जिल्ह्यामध्ये उन्हाळी रब्बी हंगामांतर्गत धान पिकाचे मोठ्याप्रमाणात लागवड करण्यात येणे, उन्हाळी (रब्बी) धान लागवडीकरीता गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा, आमगाव व गोंदिया तालुक्यातील उन्हाळी रब्बीहंगामा अंतर्गत धान पिकाचे सिंचनाकरीता बाघ डाव्या कालव्यातुन पाणी उपलब्ध करण्यात येणे, गोंदिया तालुक्यातील काही क्षेत्र पुच्छ भागात असल्याने आवश्यकतेनुसार सिंचनाकरीता पाणी उपलब्ध होत नसणे, दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी मा. पालकमंत्री महोदय, गोंदिया यांचे अध्यक्षेखाली बाघ प्रकल्पा अंतर्गत कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये उन्हाळी रब्बीहंगाम	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सन २०२५-२६ करीता गोंदिया तालुका- २०४५ हेक्टर (५० टक्के), आमगाव तालुका- १२२७ हेक्टर (३० टक्के), सालेकसा तालुका-८१८ (२० टक्के) सिंचन क्षेत्राचे नियोजन करण्यात येणे. परंतु आमगाव उपविभागांतर्गत सालेकसा शाखेमध्ये नियोजीत क्षेत्रापेक्षा अनधिकृतपणे तिप्पट क्षेत्रात लागवड करण्यात आल्याने याचा विपरीत परिणाम गोंदिया तालुक्यातील पांढराबोडी शाखेतील ८४५.२६ हेक्टर क्षेत्रामध्ये लागवड होऊ शकली नसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्याप्रमाणात आर्थीक नुकसान होत असुन गोंदिया तालुक्यातील सिंचन व्यवस्थेसह पिण्याचे पाण्याच्या उपलब्धेवर सुध्दा गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होणे, त्यामुळे गोंदिया तालुक्यातील शेतकरी बांधवांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणे, मा. पालकमंत्री महोदयांचे उक्त बैठकीमध्ये सिंचन क्षेत्राचे नियोजन करण्यात आल्यावरही सालेकसा तालुक्यातील नियोजीत क्षेत्रापेक्षा जास्त करण्यात आलेली लागवडीबाबत चौकशीची मागणी करण्यात येणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना ."	
३३५.	श्री. राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील वि. स. स.	"धुळे जिल्ह्यातील मौजे बाबरे, कुंडाणे (वे), वेल्हाणे, सोंडल येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		योजनाअंतर्गत संपादित करण्यात आल्या असणे,. सदर भूसंपादन प्रक्रियेदरम्यान मोबदला निश्चित करताना अनेक अनियमितता झाल्याबाबत संबंधित शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी होणे, भूसंपादन प्रक्रियेदरम्यान जमिनीवरील झाडे, पिके व इतर मालमत्तेचे मूल्यांकन सर्व प्रकरणांमध्ये योग्य प्रकारे करण्यात न येणे,काही शेतकऱ्यांच्या जमिनीवरील फळझाडांचे मूल्यांकन संबंधित अधिकाऱ्यांकडून मान्य करण्यात आलेले असतानाही ते अंतिम निवाड्यात समाविष्ट करण्यात आलेले नसल्याचेही निदर्शनास येणे, इतर शेतकऱ्यांच्या व अन्याय झालेल्या शेतकऱ्यांच्या मोबदल्याच्या रकमेत मोठ्या प्रमाणात तफावत असणे,भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम ११ नुसार अधिसूचना प्रसिद्ध होत असताना त्या वेळी जमिनीवर अस्तित्वात असलेल्या मालमत्तेची नोंद घेऊन त्यानुसार मोबदला निश्चित करणे अपेक्षित असणे, तथापि सदर प्रकरणात या प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याची तक्रार असून त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याची भावना निर्माण होणे,राज्यातील इतर सिंचन प्रकल्पांमध्ये, विशेषतः जिगाव प्रकल्पामध्ये unमुना-डडमान्य करून निवाड्यातील मोबदल्याव्यतिरिक्त फळझाडांसाठी अतिरिक्त	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मोबदला देण्यात आलेला असणे,सदर प्रकरणात त्याप्रकारची कार्यवाही न होणे,शासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेणे,शेतकरी बांधव २०२२ पासुन आपल्या शासनाकडून न्यायाची अपेक्षा ठेऊन असणे,संबंधित शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाचे निराकरण करून त्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."	
३३६.	श्री. केवलराम काळे वि .स .स.	"अमरावती जिल्ह्यातील मेळघाट मतदारसंघातील धारणी तालुक्यातील गर्गा सिंचन प्रकल्पाचे काम अनेक वर्ष रखडले असणे, सदर प्रकल्पासाठी सन २००९ मध्ये जागा आरक्षित करण्यात आली असून त्याच वर्षी प्रशासकीय मान्यता व निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असणे, त्यानुसार FA Construction, मुंबई या कंपनीस कामाचा आदेश देण्यात आला असणे, मात्र सन २००९ ते २०२६ या कालावधीत प्रकल्पाच्या कामात कोणतीही लक्षणीय प्रगती झालेली नसून प्रकल्प दीर्घकाळ प्रलंबित राहिला असणे, हा प्रकल्प पूर्ण झाल्यास धारणी तालुक्यातील सुमारे १६ गावांना सिंचनाची सुविधा तर सुमारे २५ गावांना पिण्याच्या पाण्याची शाश्वत व्यवस्था उपलब्ध होणार असणे, त्यामुळे मेळघाटातील आदिवासी व शेतकरी बांधवांसाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असणे, परंतु प्रकल्प रखडल्यामुळे स्थानिक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नागरिकांना सिंचन व पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत असणे, सदरहू प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष देऊन संबंधित कंत्राटदारावर कारवाई करावी व आवश्यक असल्यास निविदा रद्द करून नवीन निविदा काढून प्रकल्पाचे उर्वरित काम कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३३७.	श्री. अतुल भातखळकर, श्री .हारुन खान, श्री .निलेश राणे वि .स .स.	"गेल्या काही दिवसात ठाणे, नाशिक व धुळे वनवृत्तातून अवैध खैर तस्करी करणारी कमीतकमी १०० पेक्षा जास्त वाहने जप्त केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, तसेच छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, पुणे वनवृत्त तसेच महाराष्ट्र बाहेर सुद्धा अशी कारवाई करण्यात आली असणे, त्यामध्ये खाजगी क्षेत्रातील वृक्षतोड पासचा (TP) गैरवापर करून शासकीय जंगलातील खैर झाडांची मोठ्या प्रमाणावर कत्तल होत असल्याच्या तक्रारींवर कोणतीही कारवाई होत नसणे, त्यामध्ये खैर तस्करीचा पैसा देशद्रोही कारवायांसाठी वापरला जात असल्याचे निदर्शनास येत असणे, त्यामुळे अवैध खैर तस्करी रोखण्यात अपयशी ठरणाऱ्या किंवा दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित वनवृत्तातील (कोल्हापूर व अन्य) जबाबदार अधिकाऱ्यांवर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		दंडात्मक किंवा प्रशासकीय कारवाई करण्याची गरज असणे, तसेच मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका (क्र. ०९/२०२५) नुसार, चिपळूण परिसरातील २२ अवैध कात कारखान्यांवर ठोस कारवाई करण्याची गरज असणे, त्यामुळे संपूर्ण प्रकरणांची SIT स्थापन करून सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३३८.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मागाठाणे-महेंद्र ॲण्ड महेंद्र कंपनी, लोखंडवाला क्रांती नगर-अप्पापाडा जलाशय मार्ग, मुलुंड लिंक रोडकडे जाणाऱ्या १२० फुट विकास नियोजित रस्त्यापैकी वन विभागाच्या हद्दीतील ७०० मीटर लांबीच्या रस्त्यासाठी, वन विभागाचे "ना हरकत "प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याने, अद्याप रस्त्याचे विकास काम अपूर्ण असल्याचे निदर्शनास येणे, उपअधिक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांना वन विभागाची जमीन महापालिकेला हस्तांतरीत करण्याबाबचा प्रस्ताव महापालिकेचे, प्रमुख अभियंता (रस्ते) यांनी सादर करुनही, अद्याप उपअधिक्षक, वन विभाग यांनी सदरहू प्रस्तावास मंजूरी देणेबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी लोकप्रतिनिधींना दिलेल्या अनुपालन अहवालाद्वारे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निदर्शनास येणे, यामुळे या परिसरातील स्थानिक जनतेची झालेली व होत असलेली प्रचंड गैरसोय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
३३९.	श्री. विक्रम पाचपुते, श्री .प्रविण दटके वि .स .स.	"श्रीगोंदा मतदार संघातील भौगोलिक परिस्थिती पाहता श्रीगोंदा तालुक्यातून घोड नदी भीमा नदी या पश्चिम व दक्षिण दिशेकडून वाहत असणे, कुकडी कॅनॉलचे इरिगेशन ८५ टक्के पर्यंत झालेले पहावयास मिळणे, त्यामुळे श्रीगोंदा तालुक्यामध्ये तीन सहकारी तीन साखर कारखाने मोठ्या प्रमाणात उसाचे क्षेत्र व डोंगर असून या तालुक्यांमध्ये बिबट्यांचे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात झालेली लक्षणीय वाढ व बिबट्यांनी मोठ्या प्रमाणात केलेले हल्ले यामुळे मनुष्यहानी, पशुहानी मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळणे, यासाठी मौजे बेलवंडी तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर येथील गट नंबर १५०४ मध्ये १०४ हेक्टर क्षेत्र असून सन २००४ ते २००९ या कालावधीत राज्य शासनाच्या वन विभागामार्फत बिबट सफारी पार्क होण्यासाठी परवानगी देण्यात आलेली असणे, सदर ठिकाणी निधी मंजूर झालेला असतानाही बिबट सफारी पार्कचे काम अद्याप पर्यंत सुरू झालेले नसणे, सदर पार्कचा प्रस्ताव शासनाकडे दाखल असून व त्यास मंजुरी मिळणे, सदर प्रस्तावा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बाबत शासन काही कार्यवाही करणार काय, तसेच गट नंबर १५०४ मध्ये बिबट रेस्क्यू सेंटर उभे करणार काय, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३४०.	श्री. विजय रहांगडाले,श्री .संजय पुराम,श्री .विनोद अग्रवाल वि . स .स.	"गोंदिया जिल्ह्यात तिरोडा तालुक्यामध्ये निमगाव व इंदोरा गावाजवळ स्थानिक नाल्यावर निमगाव लघु पाटबंधारे प्रकल्प स्थित असून या प्रकल्पामुळे ३.९१५ द.ल.घ.मी.पाणी साठा निर्मित होणार असून यामुळे १३ गावातील १०६२ हेक्टर जमिनीला पाणी मिळणार असणे, याप्रकल्पास दिनांक ०९.०७.१९७३ ला २३.७० लक्षची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून प्रकल्पाचे घळभरणी काम वगळता दोन्ही तीरावरील मातीकाम रोजगार हमी योजनेअंतर्गत ८० टक्के काम सांडवापूर्ण व आगमन निर्गमन नालीचे ४० टक्के काम पूर्ण झाले असणे, त्यामध्ये वनजमिनीच्या अडचणीमुळे उर्वरित काम सुरु करता आले नाही या प्रकल्पाकरिता १४१.६२ वनजमिनीच्या पर्यायी वनीकरण प्रस्तावास केंद्र शासनाने तत्वत: मान्यता दिली असून शासनातर्फे आतापर्यंत ४५ कोटी रुपये वनविभाग केंद्र शासनास भरणा केले असून केंद्र शासनाच्या दिनांक १/१०/२०२४ च्या पत्रान्वये पर्यायी वनीकरणाकरिता २७९ हेक्टर प्रस्तावित जमिनीपैकी २ हेक्टर क्षेत्र अति	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		घनदाट जंगल असून २२ हेक्टर दाट जंगल व उर्वरित भागामध्ये शेतीचे अतिक्रमन व वनीकरण असल्याने निमगाव आंबेनाला येथील वणीकरणाकरिता योग्य जागा उपलब्ध होत नसून यावर वन विभागाने अद्याप पर्यायी वन वळतीकरनाकरिता जागा उपलब्ध न केल्यामुळे सदर निमगाव प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकत नाही वन विभागाच्या दिरंगाईमुळे १३ गावातील १०६२ हेक्टर जमीन वंचित राहणार असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३४१.	श्री. अभिजीत पाटील वि .स .स.	“सोलापुर जिल्हयामधील वनक्षेत्र हे २८००० हेक्टर असुन ते जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या केवळ १.९४ टक्के ऐवढेच असणे,शासनाच्या नियमानुसार भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के असणे अपेक्षीत असणे, शासनाने ५० कोटी झाडे लावण्याची योजना राबविणे, सदर योजनेमध्ये सोलापूर वनविभागाकडून मोठ्याप्रमाणात झाडे लावण्यात येणे,सदर झाडे ही केवळ कागदावरतीच असणे,सोलापूर वनपरिक्षेत्रातील मौजे इंगळगी गट नं.१२३/१२४/१२७/१२८ ता.दक्षिण सोलापुर येथील ३० हेक्टर निर्वणीकरण झालेली महारवतनाची जमीन तत्कालीन वनअधिकारी यांनी बळजबरीने ताब्यात घेवुन त्यापैकी २०	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		हेक्टर क्षेत्रावरती सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ मध्ये २२,२२० झाडांची लागवड करणे, तसेच मौजे इंगळगी गट नं.१२३/१२४/१२७/१२८ येथील ३० हेक्टर व मौजे कंदलगांव ता.दक्षिण सोलापूर गट नं ४८ ची १२.९५ हेक्टर निर्वणीकरण झालेली महारवतनाची जमीन वन अधिकाऱ्यांनी बळजबरीने ताब्यात घेवुन त्यामध्ये कागदावरतीच डिप सीसीटी (DEEP CCT) कामे करणे, वरील दोन्ही कामासाठी ९५ लक्ष निधी खर्च करणे, सदर ठिकाणी प्रत्यक्ष कोणतेही काम किंवा झाडे आढळून न येणे, शासनाने यासर्वप्रकरणी तातडीने पारदर्शक चौकशी करुन स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनीवरती बळजबरीने ताबा मिळवुन कागदावरती झाडे दाखवुन शासनाच्या ९५ लक्ष निधीचा अपहार करणाऱ्या तत्कालीन संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची तसेच त्यांचेकडून शासनाचा अपहार केलेला निधी वसुल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया.”	
३४२.	श्री. रविशेठ पाटील वि .स .स.	“रायगड जिल्हयातील सुधागड (पाली) तालुक्यातील इको सेन्सिटिव्ह झोन मधून सुधागड (पाली) तालुक्यातील ५२ महसुली गावे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वगळण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींकडून केली जात असल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, सदरची ५२ महसुली गावे इको सेन्सिटिव्ह झोन मधुन वगळली जात नसल्याने मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ मुंबई व ठाणे या शहरात स्थलांतरित होत असणे, सदरची ५२ महसुली गावे इको सेन्सिटिव्ह झोन मधून वगळणेबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३४३.	श्री. किशोर पाटील वि .स .स.	"पहान गाव, ता.पाचोरा, जि. जळगांव या गावातील शेतकऱ्यांना फॉरेस्ट क्षेत्रातील धरणातून सिंचनासाठी पाणी उपलब्ध होत असल्याने शेतकरी पिके घेत असणे, धरण दुरूस्तीच्या कालावधीत सिंचनासाठी पाणी उपलब्ध करण्याची सोय बंद करण्यात येणे, तसेच धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाणी साठवण क्षमता खूपच कमी असणे, आधीच दुष्काळजन्य परिस्थिती त्यास धरणाचे पाणी उपलब्ध नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, याकरिता पहान गावातील ग्रामस्थांनी दि.२६.१.२०२६ रोजीच्या ग्रामसभेत पहान गावातील फॉरेस्ट क्षेत्रातील धरणातील गाळ काढून खोलीकरण व रुंदीकरणास मंजूरी, पहान गावासाठी पूर्वीप्रमाणे सिंचनाकरिता पाणी सोडण्याची व्यवस्था	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पनुर्सचयित करणे, काढण्यात येणारा गाळा शेतकऱ्यांना शेतजमिनीसाठी उपलब्ध करून देणे, असे ठराव संमत करुन शासनाकडे कळकळची मागणी करणे, परंतु अद्यापही या संदर्भात कोणतीच कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३४४.	श्रीमती सरोज अहिरे वि. स .स.	"देवळाली नाशिक विधानसभा मतदारसंघामध्ये मानव बिबट संघर्ष नियंत्रणासाठी रेस्क्यू सेंटर व सफारी पार्क स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दि.२०/१/२०२६ रोजी प्रधान सचिव, महसूल व वनविभाग यांना निवेदन देणे, सदर निवेदनावर कार्यवाही करुन अहवाल सादर करणेबाबत कार्यासन अधिकारी यांनी महसूल वनविभाग यांना प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांना कार्यवाही करुन अहवाल सादर करणेबाबत निर्देशित करणे, देवळाली मतदारसंघात देवळालीगाव अंजनेरी गणेशगाव आदि परिसरात मागील काही काळापासून वन्य प्राणी विशेषत: बिबटयांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे मानव बिबट संघर्ष तीव्र होत असणे, तसेच बिबटयांकडून पाळीव प्राण्यांसह मानवावर होणारे हल्ले नियंत्रणासाठी रेस्क्यू सेंटर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		स्थापन करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना शासनाची प्रतिक्रिया.”	
३४५.	श्री. रामदास मसराम, श्री .नानाभाऊ पटोले, श्री .विजय वडेट्टीवार, श्री .संजय मेश्राम, श्री .अस्लम शेख, श्री .अमिन पटेल, डॉ. विश्वजित कदम, डॉ. ज्योती गायकवाड वि .स .स.	“गडचिरोल जिल्हयातील देसाईगंज तालुक्यातील पिंपळगाव हलबी व कुरखेडा तालुक्यातील धमडीटोला परिसरात तसेच आरमोरी विधानसभा संपूर्ण क्षेत्रात वन्य हत्ती व बिबटयांचा वाढता वावर आढळून येत असून नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असणे, हत्तीच्या कळपाने धान, मका व इतर पिकांची मोठ्या प्रमाणावर नासधूस केल्याने शेतकऱ्यांचे गंभीर आर्थिक नुकसान होणे, अनेक शेतकऱ्यांचा हंगामी उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत बाधित होणे, तसेच बिबटयांच्या हल्ल्यात नागरीक जखमी झाल्याच्या घटना घडल्याअसून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होणे, महिला, लहान मुलांचा व ज्येष्ठ नागरीकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे, वन्य प्राण्यांच्या सततच्या वावरामुळे ग्रामस्थांमध्ये असंतोष वाढण्याची शल्य असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, रात्री शेतात जाणे, जनावरे चारणे किंवा घराबाहेर पडणे नागरीकांसाठी धोकादायक होणे, यामुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होणे, परिणामी नागरीकांचा होणारा रोष लक्षात घेता गस्त वाढविणे, पिंजरे लावणे, कॅमेरा ट्रॅप बसविणे, तज्ज्ञ पथकांची नियुक्ती	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करणे, इत्यादी उपाययोजना तातडीने राबविणे अत्यावश्यक असल्याने शासनाने यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३४६.	श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर वि .स .स.	"राज्यात अनेक ठिकाणी बिबटयांनी धुमाकूळ घातला असून माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर. २०२५ मध्ये पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व कोकण विभागातील अनेक जिल्हयात नागरिकांवर केलेले हल्ले, विशेषतः पुणे जिल्हयातील पिंपरखेड येथे तिघांचा झालेला मृत्यु, अहिल्यानगर येथील कर्जुनेखारे येथील ४ वर्षांच्या मुलीस आईसमोर बिबट्याने उचलून नेणे, ऊस तोडणी मजूराच्या ३ वर्षीय मुलीस ठार मारणे, अशा अनेक घटना नाशिक गंगापूर खेड, सातारा, रत्नागिरीसह अनेक जिल्हयात घडत असणे, पुणे जिल्हयातील आंबेगाव शिरुर, जुन्नर, खेड या तालुक्यात होत असलेला वावर, लोकांच्या व जनावरांच्या रक्ताला चटावलेले बिबटे, यामुळे ग्रामस्थ दहशतीखाली राहात असणे, काही ठिकाणी मुलांना लग्नासाठी मुली देण्यास पालकही नकार देत असणे, अनेक जिल्हयात सर्रास दिवसा-रात्री बिबटयांचा वावर गावात, शेत परिसरात होत असल्याने बिबटे-मानव संघर्ष निर्माण होऊन नागरिकांमध्ये पसरलेले भितीचे व संतापाचे वातावरण, यासर्व परिस्थितीचा विचार करुन शासनाने तात्काळ बिबटयांचा बंदोबस्त	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्यासाठी व ग्रामस्थांना सुरक्षित जीवन जगण्यासाठी तसेंच व्याघ्र प्रकल्पाच्या धर्तीवर रिसनगाव, ता.लोहा, जि.नांदेड येथे बिबट्या संवर्धन प्रकल्प उभारणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३४७.	श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर वि .स. स.	"राज्यात वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे दरवर्षी १० ते ४० हजार कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचे गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेतील शाश्वत विकास केंद्राने केलेल्या अभ्यासातून दिनांक ३ ऑक्टोंबर, २०२५ रोजी निदर्शनास आलेले असणे, सदर वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानाच्या केवळ एक ते दोन टक्केच भरपाई शेतकऱ्यांना मिळत असणे, त्यानुसार शेतकऱ्यांपैकी ५४ टक्के शेतकऱ्यांनी किमान एक पीक सोडले असून मोठ्या क्षेत्राची राखण अवघड होत असल्याने ६२ टक्के शेतकऱ्यांनी शेतीचे क्षेत्र कमी केल्याचेही या अभ्यासातून स्पष्ट होऊन, शेतकऱ्यांच्या मते दरवर्षी वन्य प्राण्यांमुळे प्रतिहेक्टरी सरासरी २७ हजाराचे नुकसान होत असणे, पिकांची राखणदारी करण्यासाठी वन्य प्राण्यांना रोखण्यासाठी बुजगावणे, काटेरी तारांचे कुंपण, सामुहिक राखण, सौर कुंपणे अशा उपायांची उपयुक्तता केवळ २५ टक्के असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे असणे, वन्य प्राण्यांमुळे शेतीचे सर्वाधिक नुकसान कोकणात होत असून	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तेथे रानडुक्कर, माकडांमुळे अनेक कुटुंबाना परसबाग बंद करुन दर आठवड्यात भाजी विकत आणावी लागते, तर मराठवाडा, खान्देशासारख्या मर्यादित जंगल असलेल्या भागातही शेतकऱ्यांना काही पिके पूर्णपणे सोडावी लागणे, त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने न्याय मिळाल्या शिवाय वन्य जीवांचे दिर्घकालीन संवर्धन शक्य नसणे, याबाबत शासनाने तातडीने कृती न केल्यास शेतकरी आणि वन्यजीव या दोन्हींना गमावण्याचा धोका, हे लक्षात घेता, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३४८.	श्री. नरेंद्र भोंडेकर वि .स .स.	"भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात उमरेड कराडला पवनी वन्यजीव अभयारण्य अंतर्गत पवनी तालुक्यातील पाहुणगाव, चिंचखेडा, मुरमाडी रिठी, आवळगाव रिठी, धामणगांव रिठी, कवडसी, गायडोंगरी, जोगीखेडा हमेशा रिठी या गावाचा समावेश करुन त्याप्रमाणे महसूल व वन महाराष्ट्र शासन दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी उमरेड कराडला पवनी विस्तारित वन्यजीव अभयारण्य असे राजपत्र प्रसिद्ध करणे,या विस्तारित अभयारण्यात पवनी तालुक्यातील आठ गावाचा समावेश करुन आज अनेक वर्ष होऊन सुध्दा या गावांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात आलेले नसणे, पुनर्वसन करण्यासाठी जमीन मोजणी,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पुनर्वसन पॅकेज, नुकसान भरपाई यासह अनेक कामे अद्यापही सुरु करण्यात आलेली नसल्यामुळे या गावांचे पुनर्वसन होणार किंवा नाही तसेच योग्य मोबदला मिळणार किंवा नाही, ज्या ठिकाणी पुनर्वसन होणार आहे त्या ठिकाणी सोईसुविधा उपलब्ध करुन देणार किंवा नाही, अश्या शंका नागरिकांत निर्माण झालेल्या असल्यामुळे नागरिकांनी लोकप्रतिनिधी भेटून निवेदन देणे, या निवेदनाच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधीनी संबंधित अधिकाऱ्यांची दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी बैठक घेऊन या आठ गावांसह अड्याळ जवळील नेरला आणि सुरबोडी याही गावांचे तातडीने पुनर्वसन करण्याचे व योग्य मोबदला देण्याचे निर्देश देणे, तरी सुध्दा प्रशासनाच्यावतीने अद्यापही कोणतीही कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३४९.	डॉ. जितेंद्र आव्हाड वि .स .स.	“अहिल्यानगर जिल्ह्यात मानव-बिबट्या यांच्यातील संघर्ष वाढलेला असल्याची गंभीर बाब वारंवार निदर्शनास आलेली असणे, जिल्ह्यातील पकडण्यात आलेल्या १९ बिबट्यांना पिंजऱ्यामध्ये ठेवण्यात येणे, त्यातील अनेक बिबट्यांचा मृत्यू झाल्याची गंभीर माहिती दि. ०६ मार्च, २०२६ रोजी उघडकीस येणे, प्रशासनाकडून योग्य पध्दतीने काळजी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		घेतली नसल्यामुळे पकडण्यात येत असलेल्या वन्य प्राण्यांचा मृत्यू होत असणे, जंगलातील वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याने वन्यजीव व बिबट्यांचा मानवी वस्तीत वावर वाढलेला असणे, बिबट्यांनी शिकारीच्या दृष्टीने मानवांवर हल्ले केले असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे, असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले असतांनाच प्रशासनाच्या हेतुपुरस्पर दुर्लक्षपणा व निष्काळजीपणामुळे पकडण्यात आलेल्या बिबट्यांचा मृत्यू होत असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची सामाजिक संघटना तसेच लोकप्रतिनिधींनी मा. वने मंत्री यांचेकडे मागणी केलेली असतांनाही कोणतीही कारवाई केली जात नसणे, बिबट्यांच्या मृत्युचे प्रमाण वाढलेले असल्याने वन्य जीव प्रेमींमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, वन्य जीव प्रेमींकडून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक उपाययोजना केली जात नसल्याने वन्यजीव संकटात सापडले असून त्यांचा हकनाक बळी जात असल्याने यांसंदर्भात तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३५०.	श्री. हिरामण खोसकर वि .स .स.	"नाशिक जिल्हयात वनीकरण च्या माध्यमातून त्र्यंबकेश्वर भागओहोळ ग्रामपंचायत हद्दीत फॉरेस्ट ग्रुप नं.१७३ येथे सुमारे २५ हेक्टर जागेवर दोन लाख झाडे लावण्याकरिता दलपतपूर नर्सरीमधून आणण्यात येणे, परंतु प्रत्यक्षात केवळ १० हेक्टर झाडे लावण्यात आली असून या झाडांची संगोपन योग्य प्रकारे न केल्यामुळे सदरील झाडे सुकून वाया जाणे, उर्वरित १५ हेक्टर झाडे लावण्यात न येणे, यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले असून उद्दिष्टही साध्य न होणे, वन विभागाचे उद्दिष्ट साध्य न होता शासनाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."	कित्ता
३५१.	श्री. सुधीर मुनगंटीवार वि .स .स.	"राज्यातील प्रत्येक शाळेत जल जीवन मिशन अंतर्गत नळाद्वारे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट शासनाने निश्चीत केले असणे, राज्यातील २४ जिल्हयांमध्ये शंभर टक्के शाळांना पाणी पुरवठा झाल्याचा दावा शासनाकडून केला जात असणे, परंतु प्रत्यक्षात राज्यातील तब्बल १० जिल्हयातील शाळांना अजुनही जल जीवन मिशन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		योजने अंतर्गत स्वच्छ पाण्याची प्रतिक्षा करावी लागणे, यामध्ये सिंधुदुर्ग, हिंगोली, वर्धा, नाशिक, सोलापूर, चंद्रपूर, नांदेड, गडचिरोली, जालना आणि नंदुरबार या जिल्हयांचा समावेश असणे, राज्यातील शाळेतील विद्यार्थ्यांना मुलभूत पाणी सुविधा उपलब्ध न होणे याचा शैक्षणिक बाबींवर गंभीर परिणाम होणे, याबाबत शासनाची कोणत्याही प्रकारची तातडीची कार्यवाही निदर्शनास न येणे, या महत्वाच्या विषयाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३५२.	डॉ. अतुलबाबा भोसले, श्री .शेखर निकम वि .स .स.	"केंद्र शासन पुरस्कृत जलजीवन मिशन हा कार्यक्रम माहे ऑगस्ट, २०१९ ते माहे मार्च, २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या एक वर्षाच्या मुदतवाढीसह राज्यात राबविण्यात आला असणे, या योजनेची मुदत संपूनदेखील पिण्याच्या पाण्याच्या योजना ग्रामीण व शहरी भागात अद्यापही अपूर्ण असणे, सदर मिशन राबविण्याच्या काळामध्ये कोविड १९ ची आलेली जागतिक साथ, त्यामुळे दीर्घकाळ लागू करण्यात आलेला लॉकडाऊन, विभागातील अपुरे मुनष्यबळ या कारणांमुळे हा कार्यक्रम वेळेत पूर्ण होऊ शकला नसणे, अशातच आता या योजनेसाठी निधी पुरवठा न करण्याचे धोरण केंद्र सरकारने स्वीकारल्याने याचा पूर्ण	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आर्थिक भार राज्य शासनावर पडणे, यामुळे राज्य शासनाने केंद्र शासनाकडे विशेष बाब म्हणून या योजनेस आणखी मुदतवाढ घेण्याची आवश्यकता अथवा राज्य शासनाने जलजीवन मिशन या योजनेसाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना ."	
३५३.	डॉ. अतुलबाबा भोसले वि .स .स.	"राज्यातील ग्रामीण भागात बहुतांश ग्रामपंचायतींकडे कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य व पुरेशा जागेची उपलब्धता नसणे, त्यामुळे निर्माण झालेला कचरा रस्त्याच्या, ओढ्याच्या अथवा नदीच्या कडेला टाकला जात असणे, अशा प्रकारे टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे भटकी कुत्री व डुकरे यांची संख्या राज्यातील ग्रामीण भागात व अर्ध नागरीकरण झालेल्या भागात प्रचंड वाढणे, या भटक्या कुत्र्यामुळे लहान मुले व ज्येष्ट नगारीकांवर हल्ले झाल्याच्या घटना निदर्शनास येणे, कचऱ्यामुळे जलप्रदूषण, हवाप्रदूषण होऊन त्यातून रोगराईच्या समस्या उद्भभवणे, ग्रामपंचायतींना कचरा व्यवस्थापनासाठी योग्य व पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने अशा ग्रामपंचायतींना त्यासाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याची अथवा खाजगी जमीन खरेदीसाठी अनुदान देण्याची आवश्यकता असणे, तसेच शहरालगतच्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विशिष्ट अंतरातील ग्रामपंचायतीच्या हद्दीमधील कचरा नगरपालिकेच्या कचऱ्यासोबतच एकत्रित हाताळला गेल्यास संबंधित ग्रामपंचायत व संबंधित नगरपालिका यांना सोयीचे ठरु शकणार असल्याने ग्रामपंचातीच्या क्षेत्रात तयार होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत राज्य शासनाने नवीन योजना राबविण्याबाबतची शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३५४.	श्री. विलास भुमरे वि .स .स.	"केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत हर घर जल योजना राज्यात राबविण्यात येत असताना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील १८८ गावांमध्ये मंजूर २७५ पाणीपुरवठा प्रकल्पांपैकी ५० टक्क्यांहून अधिक कामे अद्याप अर्धवट स्थितीत असल्याची बाब निदर्शनास येणे, ही अत्यंत चिंताजनक बाब असणे, अनेक गावांमध्ये नळजोडणी पूर्ण न होणे, जलसाठा टाक्या अपूर्ण राहणे, पाईपलाईन कामे निकृष्ट दर्जाची असणे व प्रत्यक्षात नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा सुरू न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, कामांच्या गुणवत्तेबाबत ठेकेदार व संबंधित पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांकडून कथित दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी पुढे येत असताना जिल्हास्तरावर प्रभावी चौकशी न झाल्याचेही समोर येणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		परिणामी शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा उद्देशच धोक्यात आला असून ग्रामीण भागातील नागरिकांना आजही पाण्यासाठी भटकंती करावी लागणे, याबाबत पैठण तालुक्यातील प्रलंबित कामांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करणे व सर्व प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३५५.	डॉ. किरण लहामटे वि .स .स.	"राज्यात केंद्र सरकारची जलजीवन मिशन योजनेअंतर्गत हर घर जल ही योजना सुरु केली असणे, अकोले विधानसभा मतदार संघात ९४ गावांमध्ये कामे मंजूर असणे, पैकी १६ गावांमध्ये पाणी पोचू शकले, परंतु अद्याप वितरण व्यवस्था नसणे, अद्याप अकोले मतदार संघात कामे अपूर्ण असणे, शासनाच्या निधीचा दूरुपयोग होत असणे, संबंधित ठेकेदार निकृष्ट दर्जाचे काम करत असून त्यामध्ये उदा. लहित खुर्द, गोंदोशी, माणिक ओझर, खीरविरे, आंबेवंगन अशा बहुसंख्या गावांमध्ये पाणी योजनांचे काम अद्याप पूर्ण न झाल्याने प्रशासनाने त्यावर लक्ष घालण्याची गरज असणे, परिणामी कामे पूर्ण न झाल्यामुळे जनमानसात निर्माण झालेला असंतोष व शासनाप्रती नैराश्येचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३५६.	ॲड. श्रीजया चव्हाण,श्री .जितेश अंतापुरकर वि. स .स.	"नांदेड जिल्ह्याच्या भोकर विधानसभा मतदार संघामध्ये राज्य शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठ्याची कामे सुरु असणे, ही कामे मे. मेघा इंजिनियरींग ॲन्ड इन्फ्रा. लि, हैद्राबाद या कंपनीस दिली असणे, दि. ३१/१०/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश दिलेली ही कामे मार्च २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असणे, मात्र अद्यापपर्यंत केवळ नाममात्र भौतिक प्रगती झालेली असणे, सुरु कामांमधील काही कामांच्या अंजादपत्रास अद्याप मंजूरी नसणे तर काही कामांची सुधारीत अंदाजपत्रके करण्याची आवश्यकता असणे, केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जलजीवन मिशन हा कालबद्ध कार्यक्रम असल्याने कामाची गती वाढविण्याबाबत कंपनीला वारंवार सूचित करुनही कंपनीकडून कोणताही प्रतिसाद न येणे, बऱ्याच ठिकाणी कंपनीने उपठेकेदार व कंपन्याना कामे हस्तांतरीत केली असल्याचे निदर्शनास येणे, केवळ ठेकेदार कंपनीच्या हलगर्जीमुळे केंद्र व राज्य शासनाच्या समयबद्ध जल जीवन योजनेची कामे योग्य वेळेत पूर्ण न होत असल्याने स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३५७.	श्री. हारुन खान,श्री. सुधीर मुनगंटीवार,श्री .मोहन मते वि . स .स.	"महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मंगळवार, १० फेब्रुवारी, २०२६ रोजीपासून राज्यभरात बारावीची (HSC) परीक्षा सुरू होणे, या घेण्यात येत असलेल्या बोर्डाच्या परिक्षेत पहिल्याच दिवशी राज्यभरात ४२ कॉपीचे गैरप्रकार उघडकीस येणे, एवढ्या मोठ्या प्रमाणात गैरप्रकार आढळणे ही शिक्षण व्यवस्थेसाठी अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब असल्याचे निष्पन्न होणे,राज्यातील विविध जिल्ह्यांत उघडपणे कॉपी होणे, बाहेरील व्यक्तींमार्फत उत्तरांची देवाणघेवाण होणे, मोबाईल व डिजिटल साधनांचा सर्रास वापर होत असणे, तसेच भरारी पथकांच्या हालचालींची आधीच माहिती होण्याच्या प्रकारामुळे शिक्षण व्यवस्थेची प्रतिमा मलिन होत असणे,भरारी पथके तैनात असूनही पहिल्याच दिवशी एवढी प्रकरणे सापडत असतील तर उर्वरित परीक्षाकाळात परिस्थिती किती गंभीर असू शकते अशी भावना जनमानसात निर्माण होणे,प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या या परीक्षेत असे गैरप्रकार घडणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय होत असल्याने पालकांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण,शासनाने भविष्यातील सर्व बोर्ड परीक्षांसाठी पारदर्शक व तंत्रज्ञानाधिष्ठित यंत्रणा उभारण्यासाठी निर्णयात्मक कार्यवाही करण्याची	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आवश्यकता,याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३५८.	डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री .सुधीर मुनगंटीवार, श्री .चेतन तुपे,डॉ .नितिन राऊत,श्री .अनिल पाटील, डॉ. ज्योती गायकवाड, श्री .विजय वडेट्टीवार, श्री .नानाभाऊ पटोले,श्री .अमिन पटेल,श्री .अस्लम शेख, डॉ. विश्वजित कदम,श्री . विकास ठाकरे, श्री .संजय मेश्राम, श्री .राजेश विटेकर, श्री .तानाजी मुटकुळे, श्री .राजु तोडसाम, श्री .मंगेश चव्हाण,	"महाराष्ट्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरु असतांनाच राज्यातील शासकीय शाळा मोठ्या संख्येने बंद पडत असणे,शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात खासगी शाळांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असतांनाच सरकारी शाळा मात्र बंद पडत असल्याचे विदारक परिस्थीती दिसून येणे,मागील तीन वर्षात साडेपाचशे शाळा बंद पडलेल्या असल्याची अत्यंत गंभीर तथा धक्कादायक बाब माहे फेब्रुवारी, २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस येणे,सन २०२२- २३ मध्ये शाळांची संख्या ६५ हजार ४३१ असणे, सन २०२३-२४ मध्ये शाळांची संख्या ६५ हजार १७५ एवढ्या होणे तर सन-२०२४ २५मध्ये शाळांची संख्या ६४ हजार८८४ एवढी झालेली असून यामध्ये आणखी घट झालेली असणे,सिंधुदूर्ग,सातारा,भंडारा,रत्नागिरी या जिल्ह्यातील विद्यार्थीसंख्या मोठ्या प्रमाणात घटलेली असणे, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात ७ हजार ७४२ शाळांमध्ये केवळ १ ते १० इतकीच पटसंख्या नोंदवली असणे तर ५२ हजार ७०२ शाळा ११ ते १०० पटसंख्येवर तग धरुन असणे, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, पुणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	श्री .अबू आझमी वि .स .स.	सातारा, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये अल्प पटसंख्येच्या शाळांची संख्या जास्त असून मागील वर्षाच्या तुलनेत एकूण पटसंख्येत मोठी घट नोंदली गेली असणे,सदरबाबत कार्यवाही व उपाययोजना करण्यास प्रशासनाकडून दिरंगाई व टाळाटाळ झालेली असणे,सदर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन शासकीय शाळांमध्ये सुधारणा व्हाव्यात यासाठी उपाययोजना करण्याची सामाजिक संघटना,लोकप्रतिनिधींनी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक १२फेब्रुवारी, २०२६ रोजी तसेच वारंवार पाठपुरावा केलेला असणे,शैक्षणिक संघटनांकडून दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ पासून सुरु होणाऱ्या विधिमंडळाच्या अधिवेशनकाळात तीव्र आंदोलन करण्यात येणार असणे,यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही,उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.”	
३५९.	श्री. सुधीर मुनगंटीवार वि .स .स.	“राज्य विज्ञान व तंत्रज्ञानाकडे वाटचाल करत असताना दुसरीकडे मात्र दुर्गम व मागास अशी ओळख असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये वीज जोडणी अभावी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विद्यार्थ्यांसाठी "ई लर्निंग" एक दिव्य स्वप्न ठरणे, पंचायत समिती जिवती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या १२१ शाळा असणे, त्यापैकी ४२ शाळांमध्ये वीज जोडणी नसल्याने शासनाच्या "डिजिटल इंडिया व "ई लर्निंग" उपक्रम यशस्वीरित्या राबविणे शक्य होत नसणे, पंचायत समिती जिवती अंतर्गत जिल्हा परिषदेच्या १२२ शाळांसह सहा केंद्र असून यातील गनेरी, गोंदापूर, टाटाकोहाड, हटकरगुडा, कुसुंबी, चोपनगुडा, बेलगाव, घाटराईगुडा, झालीगुडा, टिटवी, खडकी हिरापूर, कामतगुडा, राहपल्ली यांसह ४२ शाळांमध्ये वीजजोडणी नसल्याने "ई लर्निंग", एलईडी टिव्ही व संगणक संच वापराविना पडून असणे, केवळ वीजबिल न भरल्याने शाळेतील वीज जोडणी विद्युत विभागाने कापली जाणे, याबाबत चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने शाळेला पत्र पाठवून त्या पत्रात ग्रामपंचायतींनी शाळेतील वीजबिलाचा भरणा करावा असे नमूद करणे, मात्र काही ग्रामपंचायतींनी याला नकारात्मकता दर्शविली असून सध्या तरी ग्रामपंचायत स्तरावरून शाळेच्या वीजबिलाचा भरणा करण्याच्या कार्यवाही न होणे, संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र व पेसा अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींनी १५ व्या वित्त आयोग कृती आराखड्यांतर्गत २५ टक्के रक्कम मनुष्यबळ विकासावर	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		खर्च करणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३६०.	श्री. सुधीर मुनगंटीवार वि .स .स.	“चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील भामडेली येथील जिल्हा परिषद शाळेत निष्काळजीपणामुळे १९ विद्यार्थ्यांना विषबाधा होण्याची घटना दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी घडणे, व्हिटॅमिन गोळ्यांचे सेवन केल्याने या विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागणे, शाळेत दर आठवड्याला व्हिटॅमिनच्या गोळ्या दिल्या जातात. मात्र, काही आठवडे हा पुरवठा न होणे, संबंधित शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला सहा-सहा गोळ्या देण्याचे आदेश देणे, सदर शिक्षकाच्या निदेशाप्रमाणे विद्यार्थ्यांनी गोळ्यांचे सेवन करणे, काही वेळातच विद्यार्थ्यांना उलट्या, चक्कर येणे आणि तीव्र अस्वस्थता जाणवणे, शाळेतील सर्व १९ विद्यार्थ्यांना चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात येणे, यापैकी चौघांची प्रकृती अत्यंत गंभीर असणे, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व दोषींवर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी पालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३६१.	श्री. अतुल भातखळकर, श्री .राजु तोडसाम, श्री .मंगेश चव्हाण वि .स .स.	"राज्यात १० वी आणि १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना, अनेक केंद्रांवर पायाभूत सुविधांचा भीषण अभाव असल्याचे निदर्शनास येत असणे, त्यामध्ये, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील यशवंत विद्यालयातत विद्यार्थ्यांना बसण्यास जागा पुरत नाही म्हणून चक्क लग्नाच्या मांडवात बसवून परीक्षा घेत असल्याचे धक्कादायक वास्तव निदर्शनास येणे, तसेच एकीकडे शासन कॉपीमुक्त परीक्षा मोहिमेचा दावा करत असताना, दुसरीकडे १० टक्क्यांहून अधिक परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध नसणे, तसेच १२ वीच्या परीक्षेत सामूहिक कॉपीची ६ प्रकरणे उघड झाली असून, अमरावती विभागात ५३ गैरप्रकार तर पुणे, नागपूर, लातूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई व नाशिक अशा विविध ठिकाणी गैरप्रकार नोंदवले गेले असणे, त्यामध्ये परीक्षा केंद्रावरील स्थानिक प्रशासन आणि शाळांच्या मुख्याध्यापकांनी पायाभूत सुविधांची मागणी वेळेत न केल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, त्यामुळे बीडमधील मांडवामध्ये घेत असलेल्या परीक्षेसाठी जबाबदार असलेल्या केंद्र संचालकांवर आणि संबंधित शिक्षण	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची गरज असणे,तसेच, सर्व केंद्रांवर तातडीने सीसीटीव्ही आणि अन्य सुरक्षा व्यवस्था उभारण्यासाठी ठोसकार्यवाही करण्याची गरज असणे, तसेच सामूहिक कॉपी रोखण्यासाठी भरारी पथकांचे कार्य अधिक सक्षम करण्यासाठी नवीन यंत्रणा राबवण्याबाबत व भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी पूर्व नियोजन करून शाळांच्या पायाभूत सुविधांची जबाबदारी निश्चित करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.”	
३६२.	श्री. रईस शेख वि .स .स.	“महाराष्ट्र सरकारचे आर्थिक, सांस्कृतिक संबंध मजबूत करण्याच्या दृष्टीने स्टुटगार्ट, जर्मनी येथे महाराष्ट्र सरकारचे प्रतिनिधी कार्यालयाचे उद्घाटन तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री यांनी जुलै/ऑगस्ट २०२४ दरम्यान करणे, हे कार्यालय उघडण्यासाठी केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाची परवानगी न घेणे, ऑगस्ट २०२४ पासून महाराष्ट्र सरकारने सदर कार्यालय उघडण्यासाठी आणि चालवण्यासाठी शासनाने करोडो रुपये खर्च (भाडे, कर्मचाऱ्यांचे वेतन, स्थापनेचा खर्च, कंत्राट फी इत्यादी) करणे, महाराष्ट्र हाऊस हे कार्यालय सुरू झाल्यापासून कोणतेही काम अथवा कुठलेही उपक्रम हाती न घेणे, शासकीय पैशाचा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अपव्यय करणे, यासंदर्भात शासनाने लक्ष घालणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही आणि याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."	
३६३.	श्री. अतुल भातखळकर वि .स . स.	"मुंबईतील अंधेरी (पश्चिम) येथील एका खाजगी विनाअनुदानित शाळेने शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) प्रवेशासाठी रितसर जागा वाटप होऊनही सात वर्षांच्या ऑटिस्टिक जुळ्या मुलांना प्रवेश देण्यास नकार दिल्याची बाब माहे डिसेंबर २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये संबंधित शाळेने "सुविधांचा अभाव" असल्याचे कारण सांगून पालकांना स्वखर्चाने 'शॅडो टीचर्स' (Shadow Teachers) नेमण्याची सक्ती केली असणे, त्यामध्ये पीडित मातेने शिक्षण विभागाकडे याबाबत तक्रार केली असता विभागाकडून करूनही कोणतीही कारवाई झाली नसणे, त्यामुळे सर्वसमावेशक शिक्षणाचे धोरण असूनही अशा प्रकारे भेदभाव करणाऱ्या शाळेवर कठोर कारवाई करण्याची गरज असणे, तसेच सदर शाळेची मान्यता रद्द करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची गरज असणे, तसेच अशा विशेष विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये आवश्यक त्या पायाभूत सुविधा विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी नवीन नियमावली करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३६४.	श्री. नरेंद्र भोंडेकर वि .स .स.	"छत्रपती संभाजीनगर येथिल गरुडझेप अकॅडमीत १२ वी सायन्समध्ये शिकत असलेल्या १७ वर्षीय एका मुलाच्या मेसचे पैसे थकल्यामुळे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या रात्री मेसमध्ये जेवण्यासाठी गेला असता त्यास फीसबाबत विचारणा करुन त्याच्या हातावर सही घेऊन किंचित जेवण देणे मात्र या थोड्या जेवणामुळे पोट न भरल्याने पुन्हा जेवण मागण्यासाठी पुन्हा गेला असता संचालक नीलेश सोनवणे, शिक्षक स्वप्नील चव्हाण,अभिजित उर्फ बोल्ड आणि पठाण या चार शिक्षकांनी उपाशी ठेवत नाकातून रक्त येईपर्यंत बेदम मारहाण केल्याची घटना दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ च्या सुमारास निदर्शनास येणे,गरुडझेप अंतर्गत १२वी बोर्डाच्या परीक्षेचे फुलंब्री येथील जि.प.शाळेत केंद्र असणे, त्यासाठी नाशिकच्या १०० ते १५० मुलांची शरणापूर येथील गरुडझेपच्या अकॅडमीत राहण्याची व्यवस्था असणे, त्या मुलाच्या पालकांनी २०२३-२६ या काळासाठी २ लाख ७० हजारांपैकी २.१५ लाख फी भरलेली असून मेसचे साडेचार हजार रुपये नियमितपणे देत असणे,फक्त फेब्रुवारी महिन्याचे मेसचे पैसे बाकी होते मात्र, या किरकोळ थकबाकीसाठी शिक्षक स्वप्नील चव्हाण याने त्या मुलास १५ फेब्रुवारी पासून मानसिक त्रास देणे सुरू करुन दिनांक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		२३ फेब्रुवारीला तर क्रूरतेचा कळस गाठत नाश्ता आणि दुपारच्या जेवणापासून वंचित ठेवून दिवसभर उपाशी ठेऊन रात्री जेवण मागण्यासाठी गेला असताना नाकातून रक्त येईपर्यंत बेदम मारहाण करणे, या गंभीर प्रकरणाची तक्रार दौलताबाद पोलिस ठाण्यात देऊन सुध्दा अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, त्यामुळे या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावायची कार्यवाही व उपाययोजना."	
३६५.	श्री. प्रविण दटके, श्री. प्रताप अडसड, श्री. विक्रम पाचपुते वि. स. स.	"अल्पसंख्याक समाजाचा शैक्षणिक विकास होऊन शैक्षणिक दर्जा वाढावा तसेच त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ व्हावा या उद्देशाने अल्पसंख्याक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा देवुन त्यांना शासनाच्या अटी व शर्तीतून सुट देण्यात आली असणे, परंतु राज्यातील दारूल उलूम फैजाने मुजाहिद अल्पसनी मदरसा ता.आर्णी जि.यवतमाळ तसेच अन्य शैक्षणिक संस्था अल्पसंख्याक प्रमाणपत्राचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आले असणे, संस्था चालक व शिक्षण अधिकाऱ्यांच्या मदतीने संस्था चालकाकडुन बनावट पद्धतीने विद्यार्थी संख्या वाढविणे तसेच संस्थेत चुकीच्या पद्धतीने शिक्षक व शिक्षकेत्तर यांच्या नियुक्त्या करणे व शासनाच्या भ्रष्ट अधिकारी यांचेकडून	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रस्तावास मान्यता प्राप्त करून घेतल्याचे निदर्शनास येणे, उर्दू शाळेत विद्यार्थ्यांची पट संख्या जास्त दाखविणेसाठी संस्था चालकांनी धार्मीक शिक्षण देणारे मदरस्याचे विद्यार्थी यांना शाळेचे विद्यार्थी दाखवुन शाळेच्या तुकडीत विद्यार्थी पट संख्या वाढवुन याद्वारे शिक्षक व शिक्षकेत्तर यांची पदमान्यता प्राप्त केलेली असणे, संस्था चालकांनी आर्थिक लाभाच्या हेतूने अक्षम शिक्षक व शिक्षकेत्तर भरती खोट्या विद्यार्थी संख्येच्या आधारे केलेली असणे , त्या आधारे संस्था चालक शासकीय योजनांचा लाभ मिळवत असणे,याबाबत समाजसेवकांनी शासनाला वेळोवेळी दिलेली लेखी निवेदने, याबाबतचे गांभीर्य पाहून उर्दू शाळेतील विद्यार्थी संख्या तपासणेकरिता निवृत्त न्यायाधीश किंवा निवृत्त आ.ए.एस यांच्या अध्यक्षतेत चौकशी समिती नेमून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३६६.	श्री. मंगेश चव्हाण वि .स .स.	“महात्मा फुले सामाजिक व शैक्षणिक विकास मंडळ संचालित जयहिंद माध्य.व उच्च माध्य.विद्यालय व आदर्श प्राथ.विद्यालय चाळीसगाव, जि.जळगाव या संस्थेचे सचिव श्री.अशोक हरी खलाणे व जयहिंद माध्य.वउच्च माध्य.विद्यालयाचे प्रा.अभिजीत खलाणे व आदर्श प्राथ.विद्यालयाचे प्रा.संजय सोनवणे यांनी संगमताने डिसेंबर २००६	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पासून १६ शिक्षकांच्या वेतनातून दरमहा बेकायदेशीररीत्या कपात केलेली असणे, महत्त्वाच्या पदांवर कुटुंबातीलच सदस्यांची नियमबाह्यरीत्या नियुक्ती करणे, काम नकरता पगाराच्या स्वरूपातून मोबदला घेऊन शासनाची फसवणूक केलेली असणे, याप्रकरणी १६ कर्मचारी वर्गाने त्यांच्याविरोधात चाळीसगाव पोलीस स्टेशनमध्ये व शिक्षण विभागात तक्रार करणे, शिक्षण विभागाने याची दखल घेऊन चौकशी केलेलीअसणे, परंतु संस्थाचालकाने या कामी कोणतेही सहकार्य केले नसून व चौकशी समितीस सहकार्य देखील केलेले नसणे , शिक्षण विभागाने केलेल्या चौकशीमध्ये संस्थाचालक दोषी असणे व त्यांच्यावर दोषारोपसिद्ध होणे, संस्था चालकावर झालेल्या फौजदारी स्वरूपातील कार्यवाहीनुसार तीन ते साडे तीन महिने सदरील संस्थाचालक कारागृहातअसणे, चौकशी समितीनेअहवाल शासनाकडे पाठवीणे, त्याअंतर्गत शिक्षण संचालक, पुणे यांनी सुनावणी घेऊन तोच चौकशी अहवाल वअभिप्राय कायम ठेवून पुढील कार्यवाहीसाठी शिक्षणआयुक्त यांच्याकडे पाठविलाअसणे व त्यानुसार मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांच्या समोरसुद्धा सुनावणी झालेली असणे, सदर संस्थेची तक्रार शासनाकडे केली म्हणून संस्थेचे सचिव यांनी आकस व	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सूडबुद्धीने एकूण १६ कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्तीचे बेकायदेशीर आदेश काढणे, गेल्या १४ महिन्यांपासून सदरील कर्मचाऱ्यांची सेवा समाप्ती करण्यात आल्याने त्यांना वेतन मिळत नसल्याने सर्वच परिवारांच्या सदस्यांनाआर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत असणे, यासंबंधी संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबितअसणे, शासनाकडून दिरंगाई होत असल्याने सदर कर्मचारी वर्गाने आत्मदहन करण्याचा दिलेला इशारा, सदर शिक्षक कर्मचारी यांना सेवेवर कायमकरून व त्यांच्या कुटुंबाचा होतअसलेला उदरनिर्वाहचा प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी व संस्थेची मान्यता रद्द करावी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही.	
३६७.	श्री. राजु तोडसाम वि .स .स.	"मौजे. नबाबपुर ता.नेर जि .यवतमाळ येथे मिलमिली नदीच्या काठावर पुरक्षेत्रामध्ये अकृषक परवानगी, बांधकाम परवानगी न घेता एलिगंट आएएफ इंग्लिश मिडीयम हायस्कूल या शाळाची जी+२ इमारत बांधलेली असणे, सदर इमारत नदीच्या काठावर असुन इमारतीचे बांधकाम अत्यंत धोकादायक व असुरक्षीत असणे, सबब सदर इमारतीमध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये शाळा सुरु न करण्याबाबत	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तहसीलदार यांनी गटशिक्षण अधिकारी यांना कळविलेले असणे, गटशिक्षण अधिकारी यांनी संबंधित शाळेच्या प्रशासनास सदर इमारतीमध्ये शाळा भरवू नये व विद्यार्थ्यां शैक्षणिक नुकसान होणार नाही यास्तव शाळेची व्यवस्था इतर सुरक्षीत ठिकाणी करण्याबाबत सुचना दिलेल्या असणे, परंतु अद्यापपर्यंत शाळा प्रशासनाने सदरबाबतीत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, अंदाजे ५०० ते ७०० विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका असणे, त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, शाळा प्रशासनाने विद्यार्थांना इतर शाळेत प्रवेश घेण्यास बंदी केलेली असणे, विद्यार्थांचे दाखले देण्यास नकार दिलेला असणे, पालकांकडून सर्व फी आगोदरच घेतलेली असणे, या धोकादायक अनधिकृत इमारत, आर्थिक गैरव्यवहार व फसवणूकीबाबत शिक्षण अधिकारी, मुख्याधिकारी नगरपरिषद, तहसीलदार यांच्याकडे तक्रार देवूनही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही न करणे .एलिगंट आएएफ इंग्लिश मिडीयम हायस्कूल या शाळेची मान्यता तात्काळ रद्द करणे, शाळा व्यवस्थापकांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे, निष्क्रिय प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई होण्यासाठी शासनाची भुमिका व करावयाच्या उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३६८.	श्रीमती नमिता मुंदडा वि. स .स.	"राज्यातील अनेक खाजगी शाळा व्यवस्थापन समित्यांकडून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताना विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळेचा गणवेश, वह्या, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य ठराविक विक्रेत्याकडून किंवा शाळेमार्फतच खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याच्या मोठ्याप्रमाणात तक्रारी असणे, शिक्षण संस्था या व्यावसायिक केंद्र नसून शिक्षणाचे व्यापारीकरण होऊ नये यासाठी मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिलेले असतानाही काही शाळांकडून नियमांचे उल्लंघन केले जात असणे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक १६ जून २०२३ रोजी अशा सक्तीला बेकायदेशीर ठरवत दंडात्मक कारवाईचे निर्देश दिले असणे, तसेच मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागानेही पालकांना ठराविक दुकानातून खरेदीची सक्ती करण्यास मनाई केलेली असणे, तरी देखील अनेक नामांकित शाळांकडून पालकांची आर्थिक लूट सुरू असल्याचे निदर्शनास येत असणे, 'सुराज्य अभियान' सामाजिक संस्थेने या विषयावर दिनांक १७ मार्च २०२५ रोजी मा. शिक्षण मंत्र्यांना निवेदन देऊन राज्यभरात त्यावर कडक कारवाई करण्याची मागणी केलेली असणे, मा. मंत्री महोदयांकडून सचिव (शिक्षण) यांना कार्यवाही	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्याबाबतचे निर्देश दिलेले असणे, परंतू आजतागायत राज्यस्तरावर याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना झालेली नसणे, त्यामुळे या गंभीर बाबीवर शासनाने ठोस उपाययोजना करून दोषी शाळांवर कठोर कार्यवाही करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
३६९.	श्री. किशोर पाटील वि .स .स.	"जळगांव जिल्हा परिषद माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षणाधिकारी श्रीमती कल्पना चव्हाण व वेतन अधिक्षक श्री.ईजाज तडवी हे दोन्ही अधिकारी गणवेश घोटाळयात निलंबित असतांना कोर्टातून स्टे ऑर्डर घेऊन कार्यरत असल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दि.१०.१२.२०२५ रोजीच्या सुमारास दिलेल्या लेखी निवेदनानुसार दि.११.१२.२०२५ रोजी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालयाचे कक्ष अधिकारी यांनी क्र.तक्रार-२०२५/प्र.क्र.५२/प्रशा-३ अन्वये मा .शालेय शिक्षण मंत्र्यांच्या निर्देशानुसार तात्काळ चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात येणे, असे असतांनाही अद्यापही सदरील चौकशी अहवाल सादर करण्यात न येणे, तसेच शासनाच्या २६.८.२०२४ च्या आदेशानुसार करण्यात आलेल्या निलंबना विरुद्ध	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मॅट कोर्टात याचिका दाखल स्थगिती आदेश घेऊन सदर स्थगिती आदेश शासनास न देता परस्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगांव यांचेकडे आदेश सादर करुन पूर्ववत पदावर हजर होणे, कार्यालयीन कामकाजात दप्तर दिरंगाई, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन उशिराने देणे, सेवानिवृत्ती प्रकरणे व पी.एफ.ची बिले प्रलंबित ठेवणे, पदोन्नती मान्यता, अनुकंपा मान्यता, वेतनश्रेणी मान्यता आदि प्रकरणात प्रचंड विलंब होत असल्याच्या तक्रारी असणे, परिणामी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."	
३७०.	श्री. आनंद तिडके वि. स .स.	"मुंबईतील चुनाभट्टी परिसरात "ऑर्किड स्कूल" नावाची शाळा शिशुवर्ग ते इयत्ता सातवीपर्यंत सुरू असणे, सदर शाळा आवश्यक असलेल्या ओ.सी. (Occupation Certificate) तसेच अग्निशमन दलाच्या परवानगीविना राजरोसपणे सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत असणे, संबंधित शाळा व्यवस्थापनाद्वारे पालकांकडून अवाढव्य फी आकारणी करूनही आवश्यक कायदेशीर परवानग्या न घेता शाळा चालवली जात असणे, सदर शाळेमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शिक्षण घेत असल्याने भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची भीती निर्माण होणे, तसेच संबंधित मनपा 'एल' विभागातील प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येणे, काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियम डावलून शाळा सुरू ठेवली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात असणे, त्यामुळे या प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर खातेनिहाय कारवाई करावी व सदर अनधिकृत शाळेवर तात्काळ बंदीची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३७१.	श्री. प्रताप अडसड वि .स .स.	"राज्यात प्राथमिक शाळेत ठराविक विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असणे आवश्यक असणे, मात्र मेळघाटात अनेक शाळा अशा आहेत जिथे १०० विद्यार्थ्यांमागे केवळ १ किंवा २ शिक्षक कार्यरत असणे, यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे शिक्षकांसाठी अशक्य होत असणे, मेळघाटातील प्रत्येक दिवस विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा असतो कारण त्यांच्यासाठी शाळा हेच प्रगतीचे साधन असणे, परंतु जर पालकांना कळले की शाळेत शिक्षकच नाहीत तर ते मुलांना शाळेत पाठवण्याऐवजी शेतावर नाहीतर बाहेर शहरात मजूर म्हणून काम	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करायला सोबत नेण्याची शक्यता असणे, ६० ते ७० मुलांना १ च शिक्षक रहाणार ते शिकवणार की मुलांना सांभाळणर हा प्रश्न असणे, मेळघाटातील विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात जाण्यापासून वाचवायचे असेल तर तिथे पूर्णवेळ शिक्षक असणे गरजेचे असणे, जर कंत्राटी शिक्षकही तिथे नसतील, तर ही पिढी शिक्षणापासून कायमची वंचित राहणार असणे, दुसऱ्या जिल्ह्यातून मेळघाटात नियुक्ती मिळणे किंवा स्वतःच्या जिल्ह्यातून मिळाल्यावर अनेक शिक्षक तिथे जाण्यास घाबरतात किंवा बदली करून घेण्याच्या प्रयत्न करणे, यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, यामुळे रिक्त पदे भरली जात नाहीत आणि जी भरली जातात तिथे शिक्षक रजेवर जाण्याचे प्रमाण जास्त असणे, त्यामुळे शासनाने मेळघाटात कंत्राटी अथवा कायमस्वरूपी शिक्षकांची नेमणूक तातडीने करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३७२.	श्री. विक्रम पाचपुते, श्री. प्रविण दटके, श्री. मोहन मते, श्री. समाधान आवताडे,	“मृद व जलसंधारण विभागाची दिनांक ३१ मे, २०१७ रोजी निर्मिती करण्यात येणे, जलसंपदाच्या अधिकाऱ्यांकडून जलसंधारण विभागात कायमस्वरूपी समावेशना करिता दिनांक १५ जुलै, २०१७ पर्यंत विकल्प मागविण्यात येणे प्राप्त सर्व विकल्प दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	श्री. देवेंद्र कोठे, श्री. करण देवतळे, श्री. गोपिचंद पडळकर, श्रीमती श्वेता महाले वि. स. स.	च्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर करून आक्षेप असल्यास थेट शासनास १०ऑक्टोबर २०१७पर्यंत कळविण्याचे आव्हान केले असणे सात माहे जून २०१८ अंतिम समावेशन यादी प्रसिद्ध करून समावेशन प्रक्रिया पूर्ण करणे, दिनांक ४ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासननिर्णयाने समावेशन बंद होणे प्रसिद्धी पत्रकातील यादीत व अंतिम समावेशनात जलसंपदा विभागाचा विकल्प दर्शविला असताना चार वर्षांनी आठ अधिकाऱ्यांचे बेकायदेशीर समावेशन करणे जलसंपदाविभागाच्या पूर्व मान्यते शिवाय एकतर्फे समावेशन केले असल्याचे जलसंपदा विभागाने मान्य केले, आर्थिक व्यवहाराकरिता स्थापत्य अभियांत्रिकी संवर्गात यांत्रिकी संवर्गाच्या सिद्धेश्वर कंजारे यांची वर्णी लावणे या प्रक्रियेत प्रादेशिक जलसंधारण अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी चारअधिकाऱ्यांचे बनावटी विकल्प सादर केले असणे, सभागृहातील २५ पेक्षा अधिक सदस्यांनी कार्यवाही करण्याबाबत विभागास पत्राने कळविले असणे, एका पत्रावर माननीय आमदार संदीप जोशी यांचे पत्र मा.मुख्यमंत्री साहेब यांनी चुकीच्या समावेशन प्रकरणाची सामान्य प्रशासन विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिलेले असणे, या गंभीर प्रकरणाबाबत	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने तातडीने दखल घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”	
३७३.	श्री. अभिजीत पाटील वि .स .स.	“मौजे करकंब (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) या गावात पाझर तलावाचे रुपांतर साठवण तलावात करण्याचे काम महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ,छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत करण्यात येणे,सदर कामातील पाझर तलाव क्र.५ व ६ च्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झालेला असणे, पाझर तलाव हा जिल्हा परिषद,सोलापूर यांच्या मालकीचा असून त्यांची रीतसर कायदेशीर परवानगी घेणे आवश्यक असतांनाही सदर परवानगी घेण्यात न येणे,तसेच सदरच्या कामासाठी ग्राऊटिंग पायातील चरामध्ये २०० ते ३०० फूट खोलीचे बोरवेल घेण्याची कामे करण्यात आलेली नसणे, तथापि ते काम केल्याचे दाखवून १ कोटी ८८ लाख आणि २ कोटी ४६ लाख रुपये अनुक्रमे ५ व ६ या कामासाठी वाढीव दायित्वाचा बेकायदेशीरपणे प्रस्ताव पाठवणे, सदर पाझर तलावाची कामे सुरु असतांनाच कामाची देयके उचलण्यात येणे, उक्त प्रकरणी चौकशी करण्याच्या मागणीसाठी जनशक्ती शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		हजारो शेतकऱ्यांनी मुख्य अभियंता, जलसंधारण कार्यालय, पुणे येथे आंदोलन करणे, अप्पर आयुक्त,जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र,पुणे-६ यांनी प्रादेशिक्ष दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी,पुणे यांना तात्काळ कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे आदेश देणे,परंतु अद्यापही कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने उक्त कामांची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा प्रतिक्रिया."	
३७४.	श्री. किसन कथोरे वि .स .स.	"महाराष्ट्र राज्य जलनीती नुसार पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले असणे,माननीय मुख्यमंत्री यांच्या दिनांक १३.६.२५ रोजीच्या बैठकीमध्ये बदलापूर व अंबरनाथ शहरांच्या पाणीपुरवठ्यासाठी तातडीचे उपाय योजना म्हणून अंबरनाथ तालुक्यातील इंदगाव,बेंडशीळ व नंबरवाडी या योजना कार्यान्वित करणे बाबत जलसंपदा विभाग व एम एम आर डी ए यांना निर्देश देण्यात आले असुन सदरील योजना हस्तांतरित करून घेण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत जलसंधारण विभागास वारंवार मागणी करण्यात आली असून देखील नमुद योजना हस्तांतरित करण्यासाठी जलसंधारण विभागाकडून होत असणारे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणावर विलंब होत असणे,त्याचा परिणाम अंबरनाथ बदलापूर कल्याण व नजीकच्या भागांना मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाईला समोर जावं लागत असणे व भविष्यात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता असणे,सदर योजनांमुळे १००MLD पिण्याच्या पाण्याची दीर्घकालीन सोय होणार असणे,जलसंधारण विभाग शासन निर्णय ३१/५/२०१७ नुसार जलसंधारण विभागाचे कार्यक्षेत्र केवळ६०० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेले प्रकल्प राबविणे असे असुन पिण्याच्या पाण्यासाठी प्रकल्प जलसंपदा विभागामार्फतच राबविणे अपेक्षीत असणे,तसेच सदर प्रकल्प जलसंपदा व एम एम आर डी ए यांनी राबविणे बाबत मा मुख्यमंत्री यांचे निर्देश असुन देखील प्रकल्प हस्तांतरित करण्यासाठी जलसंधारण विभागाची उदासीनता, त्यामुळे निर्माण होणारी पाणीटंचाई, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही.	
३७५.	श्री. संजय उपाध्याय, श्री. अमित साटम,	"राज्यातील अनेक युवा बेरोजगारीमुळे नैराश्यग्रस्त जीवन जगत असल्याने युवकांच्या कल्याणासाठी वसमुपदेशन करण्यासाठी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	श्री. मुरजी (काका) पटेल वि. स. स.	राज्यस्तरावर "महाराष्ट्र राज्य युवा कल्याण आयोग अथवा तत्सम प्राधिकरण" स्थापना करण्याची ची आवश्यकता असणे, अनेक युवकांना योग्य वयात योग्य मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ मिळत नसल्याने दिवसेंदिवस दिशाहीन होण्याचे प्रमाण वाढणे, युवांसाठी अनेक विभागात अनेक योजना असून त्या योजना राबविण्यात समन्वयाचा अभाव असणे, परदेशी शिक्षण नोकरी यासाठी वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करण्याची आवश्यकता असणे, प्रत्येक जिल्ह्यातील पुढील दहा वर्षातील अपेक्षित प्रकल्प व त्यानुसार युवांना आवश्यक असलेले कौशल्य प्रशिक्षण तसेच दहावी-बारावी-पदवीधर शिक्षण घेतल्यानंतर पुढे काय करायचे याबाबत युवांच्या मनात निर्माण झालेला गोंधळ, कमवत्या वयात उदरनिर्वाहाचे योग्य साधन न मिळाल्याने व्यसनाधीनेतेकडे आकर्षित होणारी युवा-पिढी यामुळे गुन्हेगारीचे वाढत असलेले प्रमाण, युवकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व उपक्रम हे त्यांच्यापर्यंत पोहचवण्याची गरज, युवांना व्यक्त होत यावे त्यांचे प्रश्न मांडता यावेत, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून कौशल्य विकास विभागाच्या अंतर्गत "महाराष्ट्र राज्य युवा आर्थिककल्याण-आयोग अथवा तत्सम	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्राधिकरण" स्थापन करण्याची होत असलेली मागणी, युवांच्या हितासाठी- कल्याणासाठी उज्वल भविष्यासाठी करावयाची कार्यवाही व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अधिक सक्षम बनविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३७६.	श्री. किसन कथोरे, श्री .समाधान आवताडे वि .स .स.	"ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ व मुरबाड तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या बारवी धरणात विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे पुनर्वसन करून ज्यांची घरे बाधित झाली त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीमध्ये सामावून घेण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात येणे, यामध्ये ज्या नगरपरिषदा किंवा महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था या धरणाच्या पाण्याचा लाभ घेतात त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत निर्णय होणे, त्यानुसार या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्यात येणे, उर्वरित ज्यांच्याकडे पात्र लाभार्थी नाही अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना एकरकमी दहा लाख रुपये देण्यात येणे, परंतु नोकरीमध्ये सामावून घेतलेल्या वारसांना पदोन्नती देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात येणे, तसेच ते नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यास, मृत्यू झाल्यास, बडतर्फ झाल्यास किंवा काही अपरिहार्य कारणास्तव	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यास त्यांच्या घरातील व्यक्तींना अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून न घेणे, ही बाब त्यांच्यावर अन्यायकारक असणे, त्यामुळे याबाबतीत त्यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत शासनाने कोणतीही प्रतिक्रिया न देणे, त्यामुळे या बारवी धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या नोकरीत सामावून घेतलेल्या वारसांवर अन्याय होणे, याकरीता राज्य शासनाने त्यांच्यावर होणारा अन्याय दूर करण्याबाबत शासनाने करावयाची वा करण्यात येणारी कार्यवाही व उपाययोजना.”	
३७७.	श्री. अभिजीत पाटील वि .स .स.	“माढा विधानसभा मतदारसंघातील माढा तालुक्यातील मोडनिंब व पंढरपूर तालुक्यातील मेंढापूर, जि. सोलापूर येथे प्रस्तावित/मंजूर एम.आय.डी.सी .प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीबाबत शासन स्तरावर आवश्यक ती हालचाल होत नसल्याची बाब निदर्शनास येत असणे, मोडनिंब हे सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर व मिरज-पंढरपूर-कुर्डुवाडी रेल्वे मार्गाजवळ असल्यामुळे दळण-वळणाच्या दृष्टीने अत्यंत सोयीस्कर ठिकाण असणे, येथे मोठी बाजारपेठ उपलब्ध असून औद्योगिक विकासासाठी पोषक वातावरण असणे, सदर एम.आय.डी.सी. प्रकल्प पूर्णत्वास गेल्यास स्थानिक युवकांना मोठ्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊन माढा तालुक्याच्या आर्थिक विकासास चालना मिळेल .तसेच पंढरपूर तालुक्यातील मेंढापूर हे देखील रेल्वे मार्ग व प्रमुख रस्त्यांजवळ असल्यामुळे औद्योगिक प्रकल्पासाठी योग्य ठिकाण असणे, येथील जागेची पाहणी करून एम.आय.डी.सी. प्रकल्प उभारल्यास माढा व पंढरपूर तालुक्यांच्या औद्योगिक व आर्थिक विकासात भर पडेल, मात्र सदर दोन्ही ठिकाणच्या एम.आय.डी.सी. संदर्भातील प्रस्तावावर पुढील कार्यवाही, जागेचे संपादन, पायाभूत सुविधा उपलब्धता व निधी याबाबत ठोस निर्णय झालेला नाही, तरी, मोडनिंब व मेंढापूर येथील एम.आय.डी.सी. प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे? संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करून पुढील कार्यवाही केव्हा पूर्ण करण्यात येणार? सदर प्रकल्पासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३७८.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	“जि.ठाणे ता .भिवंडी मौजे भादाणे, आतकोली, वाशेरे व सापे या तीन गावातील स्थानिक शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या सुमारे ९९ हेक्टर जमीन, एमआयडीसी व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेतर्फे शेतकऱ्यांना कोणतीही कायदेशीर नोटीस न देता, सक्तीने भुसंपादन करण्यात येणे, सदरहू गावातील स्थानिक शेतकरी हे शेतीवरच आपली	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपजिवीका करित असून, शेती हे त्यांचे एकमेव उत्पन्नाचे साधन असतांना, त्यांना विश्वासात न घेता, शासनाने परस्पर सक्तीने चार खाजगी कंपन्याना प्रकल्प उभारण्यासाठी जमीनीची भुसंपादनाची कार्यवाही सुरु करुन शेतकऱ्यांवर अन्याय करणे, यामुळे त्यांचेवर कोसळलेले बेघर व बेदखल होण्याचे संकट, उपरोक्त तीन गावाचा पुर्व इतिहास पाहता, प्रस्तुत गावे ही मुळातच प्रकल्पबाधीत असणे, येथील शेतकऱ्यांनी शासनाच्या अनेक प्रकल्पांना गेले २५-३० वर्षापासून जमीनी दिल्याने, सदरहू शेतकऱ्यांकडे जेम-तेम उदरनिर्वाहापुर्ती जमीन शिल्लक राहणे, अशा स्थितीत शेतकऱ्यांचे पुनवर्सन न करताच पुनवर्सन न करता, त्यांची जमीन परस्पर हिरावून घेत असणे,सदर भुसंपादनास स्थानिक तीन गावातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवून दि.२८.०१.२०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, भिंवडी विभाग यांचेसह जिल्हाधिकारी ठाणे आणि एमआयडीसी कार्यालयात लेखी स्वरुपात हरकती घेऊन,कायदेशीर आक्षेप घेऊन तीव्र विरोध केला असतांनाही, अद्याप त्याची शासनाकडून दखल न घेण्यात येणे,याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३७९.	श्री. हिरामण खोसकर वि .स .स.	"इगतपुरी-त्र्यंबकेश्वर मतदार संघात इगतपुरी तालुक्यात अनेक महत्वपूर्ण व मोठमोठ्या औद्योगिक वसाहती असून सदरच्या कंपन्यांमध्ये दररोज कोटयवधी रुपयांचे स्क्रॅप मटेरियल निघणे, परंतु सदर स्क्रॅप मटेरियलचे ऑडिट होत नसल्याने शासनाचा कोटयवधींचा महसूल बुडणे, या स्क्रॅप मटेरियलकरिता निविदा काढणे आवश्यक असतानाही निविदा न काढता हे स्क्रॅप मटेरियल विकण्यात येत असणे, यासंदर्भात शासनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रार करणे तसेच दिनांक २७ जानेवारी, २०२६ रोजीच्या सुमारास मा.उद्योग मंत्री यांना लेखी निवेदनही देण्यात येणे, परंतु अद्यापही यावर कोणतीच कार्यवाही होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, शासनाचा कोटयवधींचा महसूल बुडत असल्याने या स्क्रॅप मटेरियलकरिता निविदा काढण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता
३८०.	श्री. महेश शिंदे वि .स .स.	"महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन च्या आयटी/आयटीईएस प्रकल्पातील प्लॉट नं.ए३४ हा प्लॉट मंजूर असतांना १०० टक्के बिल्डअप एरिया व्यावसायिक वापराकरिता मेरीगोल्ड मॅन्युफॅक्टचर लि.	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		या कंपनीला देण्यात येणे, अशा प्रकारे व्यावसायिक वापराकरिता सबलेट करण्याची परवानगी नियमबाह्य असणे, या निर्णयामुळे महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन च्या महसूला सुमारे ५.७४ कोटीचा तोटा होणे, तसेच राज्यामध्ये अशाच प्रकारे किती खाजगी घटकांना असे प्लॉट मंजूर केल याची माहिती सभागृहास अवगत करणे, ज्यामुळे राज्याच्या एमआयडीसी विभागाला आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. सदर प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करुन अशा खाजगी कंपनीना अनुचित आर्थिक लाभ मिळवून दिल्याप्रकरणी शासनाने स्वतंत्र उच्चस्तरीय किंवा विभागीय चौकशी करुन या प्रकरणी तसेच राज्यातील औद्योगिक भूखंडाच्या व्यवहारात अशा प्रकारचे नियमबाह्य सबलेटिंग, शुल्क माफी आणि महसूल नुकसानीची वसूली संबंधित कंपनी व अधिकाऱ्यांकडून वसूल करण्याची आवश्यकता, तसेच त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	
३८१.	श्री. चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे वि .स .स.	“कृषी उत्पन्न बाजार समिती जवळाबाजार ता.ओंढा,जि.हिंगोली येथील समितीचे सभापती व सचिव यांनी बाजार समिती जवळा बाजारच्या कामकाजामध्ये अनेक गैरप्रकार केलेले असणे, यामध्ये विभागीय	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सहनिबंधक छत्रपती संभाजीनगर यांचा स्थगिती आदेश असतांना बँक खात्यामधून ५२,५७,९०१ रुपये उचल करणे, तसेच भूखंड विक्री (लीज डीड) करुन देण्यात येणे, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीची रक्कम कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात करुन देखील कर्मचाऱ्यांच्या बँक खात्याला वर्ग न करणे, तसेच बाजार समितीचे कागदपत्रे न ठेवता ते सर्व अभिलेख समितीचे सभापती यांचेकडे खाजगी ठिकाणी ठेवणे,संचालकांनी वारंवार मागणी करुनही दाखवली न जाणे,बाजार समितीची वसुली मार्केट फीस बाजार समितीच्या बँक खात्यावर न भरता परस्पर मनमानीपध्दतीने खर्च करणे,बाजार समितीच्या आवारात बोगस कामे करुन बिले उचलणे, बाजार समित्यांमध्ये कर्मचारी भरतीला बंदी असताना बेकायदेशीरपणे कर्मचारी भरती करणे, ३५ महिन्यांचा कर्मचारी पगार थकीत असतांना पगार न करता बोगस कामे दाखवून बिल उचलणे, अशाप्रकारचे त्यांचेविरुध्द आरोप करण्यात आलेले असणे,परिणामी जवळा बाजार समितीमधील हा भ्रष्टाचार शेतकऱ्यांच्या आणि शासनाच्या हिताला बाधा आणणारा असणे, परिणामी शेतकरी व सर्वसामान्य जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व निराशेचे वातावरण,त्याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित सभापती	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		व सचिव यांचेविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."	
३८२.	श्री. शिवाजी पाटील वि .स .स.	"चंदगड तालुक्यामध्ये (जि. कोल्हापूर) काजू बोर्डाचे विभागीय कार्यालय स्थापने मिळालेली मंजूरी, काजू बोर्डाचे विभागीय कार्यालय हलकर्णी एम.आय.डी.सी ता. चंदगड येथे कार्यालय इमारतीकरिता विनामुल्य भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत होत असलेली मागणी, याठिकाणी कार्यालय झाल्यास काजु उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल, परिणमी शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोष, याबाबत शसनाने तातडीने लक्ष घालून काजू बोर्डाचे विभागीय कार्यालय हलकर्णी एम.आय.डी.सी ता .चंदगड येथे कार्यालय इमारती करिता विनामुल्य भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."	कित्ता
३८३.	श्री. अमोल जावळे वि .स .स.	"रावेर व यावल तालुक्यात सध्या केळीची आवक मोठ्या प्रमाणात वाढलेली असणे, या भागातील हजारो शेतकऱ्यांचे अर्थकारण केळी पिकावर अवलंबून असणे, सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिका,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		इस्त्राईल व इराण यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीची चर्चा होत असली तरी त्याचा केळीच्या व्यापारावर प्रत्यक्ष फारसा परिणाम होत नसणे, कारण देशातील केळीचे एकूण उत्पादन सुमारे ३८ मिलियन मेट्रिक टन असून त्यापैकी केवळ २ ते २.५ टक्के केळी निर्यात केली जाणे,तर जवळपास ९७ ते ९७.५ टक्के केळी देशांतर्गत बाजारपेठेतच वापरली जात असणे, मात्र काही व्यापारी युद्धजन्य परिस्थितीची भीती दाखवून शेतकऱ्यांकडून केळीचे दर मुद्दाम कमी देत असणे, रावेर(जि.जळगाव) मतदारसंघालगत मध्यप्रदेशातील बुरहानपूर येथील केळी बाजाराचा या परिसरावर मोठा प्रभाव असणे, सध्या त्या बाजार समितीत संचालक मंडळ नसणे, प्रशासकांमार्फत कारभार चालत असणे तेथील दर अचानक कमी-जास्त घोषित केले जातात व त्याचा थेट परिणाम रावेर-यावल तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांवर होणे, त्यामुळे या प्रकरणात शासनाने तात्काळ लक्ष घालून व्यापाऱ्यांकडून होणारी लूट थांबविणे व बाजार व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
३८४.	श्री. आनंद तिडके वि .स .स.	“राज्यातील नद्यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी राज्य नदी संवर्धन योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला असताना, नांदेड	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जिल्ह्यातील नांदेड वाघाळा (ता. नांदेड) महानगरपालिका हद्दीतून वाहणारी गोदावरी नदी ही धार्मिक, ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची नदी प्रदूषणाच्या समस्येला सामोरी जात असणे, दि. ३१.०३.२०२२ रोजी शासन निर्णयान्वये संवर्धन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असणे व त्याअनुषंगाने काही निधी वितरित होऊन कामे प्रगतीपथावर असल्याचे नमूद करण्यात येणे, तथापि, सांडपाणी अडविणे व वळविणे, मलशुद्धीकरण केंद्र उभारणी, नदीकाठ संवर्धन, जलगुणवत्ता सुधारणा, वनीकरण व प्रदूषण नियंत्रणासंदर्भातील उपाययोजनांची अंमलबजावणी अपेक्षित गतीने होत नसल्याची स्थानिक नागरिकांमध्ये भावना निर्माण होणे, परिणामी नदी प्रदूषणाचा प्रश्न कायम राहणे, आरोग्य व पर्यावरणीय परिणामांची शक्यता निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर सदर प्रकल्पाची सद्यस्थिती, कामांचा आढावा, अंमलबजावणीतील अडचणी लक्षात घेता गोदावरी नदी संवर्धनाचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता, याबाबत यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३८५.	श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके वि. स. स.	"NSL लि. (जयमहेश साखर कारखाना) लि.पवारवाडी ता. माजलगाव जि.बीड या कारखान्याच्या प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम होत असल्याबाबत माजलगाव जि.बीड माजलगाव शहरातील डॉ. शैलेश पाठक व इतर यांनी दि.२३.१२.२०२५ रोजी लोकप्रतिनिधींना निवेदन देणे, निवेदनाच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधीने उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना व जिल्हाधिकारी, बीड यांना दि. ४ जानेवारी, २०२५ रोजी ई-मेल द्वारे पत्र देणे, लोकप्रतिनिधीने दिलेल्या पत्राबाबत काहीही कार्यवाही न करणे, कुठलेही लेखी प्रतिउत्तर न मिळणे, तसेच कारखान्याने पेंन्ट वॉश पाणी हे नैसर्गिक नदी व नाल्यात सोडणे, आणि या कारखान्याच्या बॉयलर मधुन निघणाऱ्या धुरामुळे हवेतून काजळी तयार होवुन घरावर व पिकांवर पडणे, त्यामुळे कारखाना परिसरातील ३ ते ४ कि.मी. परिसरातील पाणी दुषित होणे, या दुषित पाण्यामुळे मानवी व पशुधन यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होणे, आणि ३ ते ४ कि.मी. परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांवर काजळी पडुन उत्पादनावर घट होऊन प्रचंड आर्थिक नुकसान होणे, याबाबत अनेक शेतकऱ्यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या जालना व छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयास अनेक तक्रारी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निवेदन देणे, परंतु अद्यापपर्यंत प्रदुषण नियंत्रण मंडळाने काहीही कार्यवाही न करणे, यामुळे आपतग्रस्त नागरीक व शेतकरी यांच्यामध्ये शासन विरोधी पसरलेला तिव्र असंतोष, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३८६.	श्री. सिध्दार्थ शिरोळे वि .स .स.	"मुंबईसह राज्यातील महानगरांमध्ये वाढत्या वायू प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर आणि अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होणे, अलीकडे मा. उच्च न्यायालय मुंबई मध्ये सुनावणीदरम्यान प्रदूषणाच्या आर्थिक परिणामांचा अभ्यास करण्याची गरज व्यक्त होणे, श्वसनविकार, दमा व हृदयविकारांच्या रुग्णसंख्येत वाढ होऊन नागरिकांचा वैद्यकीय खर्च वाढत असणे, कामगारांची कार्यक्षमता कमी होऊन औद्योगिक उत्पादनावर परिणाम होत असणे, World Economic Forum येथे अर्थतज्ज्ञ Gita Gopinath यांनी प्रदूषण हे आर्थिक वाढीसमोरील मोठे संकट असल्याचे नमूद करणे, न्यायालयीन प्रक्रियेत ज्येष्ठ वकील Darius Khambata यांनी परिस्थिती uMini Bhopaluसारखी असल्याची भीती व्यक्त करणे, मुंबई व पुणे शहरांमध्ये वारंवार खराब AQI नोंदवला जाणे, प्रदूषण नियंत्रणासाठी प्रशासकीय उपाययोजनांमध्ये त्रुटी असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्यामुळे आरोग्य व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने ठोस कृती आराखडा जाहीर करण्याची आवश्यकता निर्माण होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३८७.	श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री .संजय देरकर वि .स .स.	"चंद्रपूर जिल्हा हा राज्यातील प्रमुख कोळसा उत्पादन करणारा जिल्हा असून येथे विविध सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील कोलवॉशरीज कार्यरत असणे, सदर कोलवॉशरीजमध्ये मोठ्या प्रमाणावर कोळशाचे वर्गीकरण, धुलाई व वाहतूक केली जाणे, मात्र अलीकडे या कोलवॉशरीजमध्ये कोळशाची चोरी, वजनातील तफावत, दर्जा बदलून विक्री, बोगस नोंदी, वाहतुकीतील अनियमितता व संगनमताने होणारे गैरव्यवहार याबाबत गंभीर तक्रारी स्थानिक नागरिकांकडून प्राप्त होणे, कोलवॉशरीजमधून निर्माण होणारी कोळशाची धूळ, रासायनिक मिश्रित पाणी व अवशेष हे योग्य प्रक्रियेअभावी उघड्यावर साचत असून त्यामुळे हवेचे, पाण्याचे व जमिनीचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढणे, परिसरातील नागरिकांना श्वसनविकार, त्वचारोग तसेच पिण्याच्या पाण्याचे दूषित होणे अशा समस्यांना सामोरे जावे लागणे, शेतीवर परिणाम होऊन पीकउत्पादनात घट होणे,वरील प्रकारांमुळे शासनास रॉयल्टी, कर व महसूल स्वरूपात मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		होणे, संबंधित विभागांकडून नियमित तपासणी, पर्यावरणीय अटींचे पालन, सीसीटीव्ही व डिजिटल वजनकाटे यंत्रणांची प्रभावी अंमलबजावणी याबाबत शिथिलता दिसून येणे, या प्रकरणी सखोल चौकशी होण्याची व या गैर प्रकारांवर तातडीने प्रतिबंध घालण्याची नितांत आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."	
३८८.	श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके वि .स .स.	"रांजणगाव (जि.पुणे) एमआयडीसीतील महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर कंपनीतून (M.E.P.L.)प्रक्रिया न केलेले घातक रसायनमिश्रित पाणी जलवाहिन्याद्वारे नदी-नाल्यात सोडले जात असणे, यामुळे शिरुर तालुक्यातील अन्नापूर व इतर सात गावातील शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, तसेच या नागरीकांना कॅन्सरसारख्या दुर्धर आजार होण्याचे प्रमाण वाढणे, तसेच हे दुषित पाणी पिऊन शेतकऱ्यांचे पशुधनास निर्माण झालेला धोका, त्यामुळे या आठही गावातील नागरीकांनी सदरील कंपनीविरोधात वारंवार आंदोलने करावी लागणे, या प्रकरणी मा.पर्यावरण मंत्री, जिल्हाधिकारी,पुणे व तहसिल ऑफिस यांच्याकडे वारंवार तक्रार करण्यात येणे, परंतु कंपनीवर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कारवाई करण्यात आलेली नसणे, याउलट एमआयडीसीने संपादित केलेले वाढीव क्षेत्र या कंपनीला देण्यात आलेले असणे, त्यामुळे एमआयडीसीने महाराष्ट्र एनव्हायरो पॉवर कंपनीला दिलेले वाढीव क्षेत्र रद्द करावे असा आठही ग्रामपंचायतीने ठराव पारीत केलेला असणे, सदर कंपनीकडून शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान लक्षात घेता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ देखील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कळविण्यात येणे, परंतु कंपनीने तशी कारवाई अद्याप न करणे, परिणामी एमआयडीसीने दिलेले वाढीव क्षेत्र रद्द करण्याबाबत तसेच शासन तसेच कंपनीविरोधात जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भुमिका."	
३८९.	श्री. गोपिचंद पडळकर वि .स .स.	"नवी मुंबई, महापे येथील TTC MIDC औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. R-८४७/२, R-९७९, R-८४७/३, R-८४७/३/१, R-८४८ व W-३७७ वर मे. Sify Infinit Spaces Pvt. Ltd. यांनी प्रकल्प उभारताना पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अधिसूचना, २००६(EIA २००६) चे गंभीर उल्लंघन केलेले असणे, सुरुवातीला MIDC ने दि. २१.१२.२०२१	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बांधकाम परवानगी Print House (India) Pvt. Ltd. यांच्या नावे एकूण क्षेत्र ३४०५६.०५ दिलेले असणे, सदर बांधकाम करण्यापूर्वी EC घेतलेली नसणे. त्यानंतर १९.५.२०२३ भूखंड R-९७९ एकत्रित करून revised परवानगी ४३५५५.९० sq.mt क्षेत्रासाठी दिलेली असणे. पर्यावरण मंजुरी बांधकामापूर्वी न घेता ०९.०१.२०२३ व ०२.०२.२०२४ रोजी नंतर घेण्यात आलेली असणे, १६.०१.२०२४ रोजी MIDC ने OC दिली, जे पर्यावरण मंजुरीपूर्वीचे असल्याचे नमूद असणे, ०६.०२.२०२५ रोजी एकूण ५०३८९.१७ चौ.मी. क्षेत्रासाठी सुधारित (Revised) परवानगी देण्यात येणे, तर १४.१२.२०२५ रोजी पर्यावरण मंजुरी देण्यात येणे, म्हणजे मोठ्या प्रमाणावर बांधकाम मंजुरीपूर्वीच पूर्ण झालेले असणे, सदर कंपनीचे EIA नोटिफिकेशन २००६ चे प्रत्येक वेळी उल्लंघनाची माहिती असूनही SEAC-२ व SEIAA यांना EC हस्तांतर करणे, तसेच वाढीव क्षेत्रासाठी EC देण्यात आल्याचा आरोप असणे. संबंधितांनी "उल्लंघन झाले नाही" अशी खोटी प्रतिज्ञापत्रे दिल्याचे नमूद असणे, या प्रकरणाची चौकशी करून शासनाने जबाबदार अधिकाऱ्यांवर करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३९०.	श्री. शांताराम मोरे वि .स .स.	"मौजे दिनकरपाडा (कोंढले) (जि.पालघर) येथील मे.ओरसन रिजीन या केमिकल कंपनीस उत्पादन क्षमता ७०० टी पी एम वरुन ७००० टी पी एम वाढविण्यास ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांनी विरोध दर्शविणे, ग्रामस्थांनाचा तीव्र विरोध असतांनाही कल्याण पोलुशन कंट्रोल बोर्डाच्या उपप्रादेशिक अधिकारी डॉ.सीमा उदय दळवी यांनी त्यांच्या मागदर्शनाखाली पर्यावरण विषयक दिनांक २४/२/२०२६ रोजी सुनावणी लावून स्वत: सदर सुनावणीस उपस्थित न राहणे, ग्रामस्थांचा विरोध डावलून स्वत:च्या फायदयासाठी कंपनीशी संगनमत करुन उपप्रादेशिक अधिकारी डॉ.सीमा उदय दळवी यांनी केलेली कार्यवाही, सदर कंपनीस उत्पादन क्षमता ७०० टी पी एम वरुन ७००० टी पी एम वाढविण्यास गावातील जमिनीचा पोत खराब होणे, बोरवेलच्या पाण्याचा दर्जा खालावणे, तसेच आजुबाजुच्या गावातील माती व पाणी परिक्षण चाचणी केली असता चाचणीचे रिपोर्टस पॉझिटिव येणे, संपूर्ण शेती नापीक होणे, त्याचबरोबर भविष्यात ग्रामस्थांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे आदि समस्यांना सामोरे जावे लागणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, उक्त कंपनीस उत्पादन क्षमता ग्रामस्थांचा विरोध असतांना वाढवून देण्यास मदत करणाऱ्या संबंधित कल्याण पोलुशन कंट्रोल	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बोर्डाच्या उपप्रादेशिक अधिकारी डॉ.सीमा उदय दळवी यांच्यावर तसेच दोषी कंपनीवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३९१.	ॲड. राहूल कुल वि .स .स.	"महाराष्ट्रात धोकादायक कचऱ्याच्या (HazardousWaste) बेकायदेशीर विल्हेवाटीचे गंभीर संकट समोर असणे, ७,५०२ उद्योगांपैकी अनेकांकडून Manifest मध्ये खोटी नोंद करून CETP व ZLD यंत्रणा केवळ कागदावर कार्यरत असणे, Recycling Facilities चे कोणतेही Audit होत नसणे, बनावट Recycler कंपन्यांद्वारे Decoy Operations; धोकादायक कचरा LDO मध्ये मिसळून बेकायदेशीर विक्री देखील करण्यात येत असणे, UsedWasteOil, Paint Waste व Spent Solvent Recyclers यांच्या बेकायदेशीर विल्हेवाटीसाठी दुरुपयोग करण्यात येणे, दूषित PVC ड्रम्स व IBC टँक्सची ग्रामीण भागात भंगार बाजारात मोठ्याप्रमाणात उघड विक्री होत असणे, MIDC क्षेत्रांतील अनधिकृत TankerWashingFacilities, Hazardous WasteRecyclingAuthorization चा बेकायदेशीर ड्रग्ज बनविण्यासाठी वापर होत असणे, LandfillSites च्या आजूबाजूच्या परिसरातील पाण्याचे व मातीचे प्रदूषण झाल्याने जमिनीचा पोत खराब	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		झाला असणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नांवर गंभीर परिमाण होत असणे, औद्योगिक क्षेत्रांतील आसपासच्या गावात कर्करोगाच्या रुग्णसंख्येत भीषण वाढ झालेली पाहायला मिळणे, केमिकल वाहून नेणाऱ्या गाड्यांना GPS Tracking यंत्रणेचा अभाव असणे, एमपीसीबीकडून EC, PESO व ERDMP शिवाय संमतीपत्रे देण्यात येणे, सर्व रिसायकलिंग युनिट्सचे तात्काळ 'थर्ड पार्टी ऑडिट' करण्याची आवश्यकता, औद्योगिकरण करताना घातक कचऱ्याच्या प्रश्नाकडे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे लाखो नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण, सार्वजनिक सुरक्षा व भावी पिढ्यांचे जीवन धोक्यात असणे, याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपाययोजना."	
३९२.	ॲड. श्रीजया चव्हाण, श्री .जितेश अंतापुरकर वि .स .स.	"मुंबईसह संपुर्ण राज्यात वाढत्या प्रदुषणामुळे घसा दुखणे, खोकला येणे, सर्दी, ताप यासह श्वसन विकाराच्या प्रमाणात फार मोठी वाढ झाली असून, या आजारांमध्ये लहान बालके आणि ज्येष्ठ नागरिकांना अधिक त्रास होत असणे, त्यातच अलीकडे झालेल्या पाहणीनुसार हवेतील प्रदुषणाची टक्केवारी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढली असून हवेची गुणवत्ता किमान दर्जाच्या खाली घसरली असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असणे, शहरांमध्ये सुरु	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणाऱ्या विविध प्रकल्पांच्या कामांमुळे हवेत उडणारी धुळ व सिमेंट यामुळे श्वसन मार्गाशी संबंधीत अनेक तक्रारी दिसून परिणामत: फुफ्फुसाच्या आरोग्यावर परिणाम होणे आणि नागरीकांना फुफ्फुसाचे आजार होत असताना दिसणे, हवेतील प्रदुषणामुळे डोळे लाल होणे, डोळ्यातुन पाणी येणे, डोळे चुरचुरणे यासारख्या लक्षणांमध्ये वाढ होताना दिसणे, या पार्श्वभुमीवर राज्यातील आणि विशेषत: महानगरक्षेत्रांमध्ये हवेतील प्रदुषणाचा वाढता स्तर तातडीने कमी करुन हवेतील गुणवत्ता वाढविण्यासाठी करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."	
३९३.	श्री. गोपिचंद पडळकर, श्री. सत्यजित देशमुख, वि. स .स.	"महाराष्ट्र राज्यात वडार, कांचिकोरवी, शिकलकारी, वैदु, डोंबारी, कैकाडी, वाल्मिकी, टकारी इत्यादी अत्यंत मागास, भूमिहीन भटके-विमुक्त समुदायांचा 'वराह पालन' हा प्राचीन पारंपरिक व्यवसाय असणे, वराह पालन करून ते आपली उपजिविका भागवत असणे. त्यामुळे वराह कळप ही त्यांची 'फिरती बँक' असणे, मात्र राज्यात याबाबत ठोस धोरण नसल्याने सदर व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर असणे, नुकतीच अहिल्यानगर महानगरपालिकेने वराह पालकांवर अमानवी कारवाई करून त्यांची डुकरे जप्त केल्याने या समाजात तीव्र	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असंतोष निर्माण झाला असणे, तसेच सदर व्यवसायाच्या त्रासामुळे या समाजातील सुशिक्षित अशिक्षित तरुण बेरोजगार झाले असून, त्यामुळे या समाजातील गुन्हेगारीचा दर वाढला असणे, जागतिक स्तरावर वराह पालन हा किफायतशीर उद्योग असणे, चीन, डेन्मार्कने इत्यादी देशांनी आधुनिक तंत्राज्ञानाव्दारे या व्यवसायात क्रांती घडवलेली असणे,परंतु महाराष्ट्रात वराह व्यवसायाशी निगडीत आधुनिक कत्तलखाने व प्रक्रिया उद्योग नसल्याने त्याचा वराह पालन करणाऱ्या समाजाला मोठा आर्थिक फटका बसत असणे, त्यानुषंगाने राज्यात 'महाराष्ट्र वराह प्रजनन व विकास धोरण' तातडीने लागू करणे, या व्यवसायाला "कृषी व उद्योग" दर्जा देणे, वराह पालन करणाऱ्या समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, या व्यवसायाशी निगडीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कत्तलखाने व प्रक्रिया उद्योग स्थापन करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
३९४.	ॲड. पराग अळवणी वि .स .स.	"आरे दुग्ध वसाहत ही मुंबईच्या गोरेगाव (पूर्व) या भागात स्थित असणे, महाराष्ट्र राज्याच्या दुग्ध विकास विभागाकडून सन १९४९-१९५० साली सदर वसाहतीची स्थापना केलेली असणे. मुंबई शहराला आवश्यक दुध पुरवठा, किफायतशीर दरात उपलब्ध व्हावा म्हणून सदर वसाहतीची	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निर्मिती केलेली असणे. सदर वसाहत दुग्धविकास विभागाचे नियंत्रणाखाली असून, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून सदर वसाहतीचे व्यवस्थापन तसेच प्रशासन चालविले जात असणे. परंतु सदर वसाहतीमध्ये झालेली व सुरु असलेली अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे, नियमबाह्यरित्या जागेच्या वापरातील सुरु असलेला बदल, येथील अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारी कृत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ याअनुषंगाने सदर परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे तसेच अवैध धंद्यावर तात्काळ कार्यवाही करण्यासाठी सदर वसाहतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस प्रशासन तसेच शासनाचे संबंधित विविध विभाग यांच्याकडे तक्रारी करण्यात आलेल्या असणे, तरीही संबंधित विभागाचे अधिकारी यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही केली जात नसणे. त्यानुसार आरे कॉलनीत सुरू असलेले अवैध धंदे व संघटीत गुन्हेगारी कृत्ये यावर कारवाई करणे, अनधिकृत अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करणे तसेच आरे वसाहतीच्या जागेबाबत निर्णय घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३९५.	श्री. विनोद अग्रवाल,श्री .संजय पुराम,श्री .विजय रहांगडाले वि . स .स.	"राज्यातील भटके व विमुक्त जाती-जमाती समाजातील नागरिकांच्या आर्थिक स्वावलंबन, सामाजिक सबलीकरण, सर्वांगिण विकासाकरीता शासनाने वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत राजे उमाजी नाईक, पै. मारुती चव्हाण, ब्रम्हालीन आचार्य दिव्यानंद पुरीजी महाराज, श्रीकृष्ण अणि श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज अश्या पाच स्वंतत्र उपमहामंडळांची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात येणे, प्रत्येक उपमहामंडळाला रु. ५०.०० कोटींचे भागभांडवल मंजुर करणे, यामध्ये प्रत्येक उपमहामंडळाला दरवर्षी रु.५.०० कोटींचा निधी देण्याचे प्रस्तावित करण्यात आले असतांना प्रत्यक्ष निधीचे वितरण करण्यात आले नसणे, मंजुर आकृतीबंधानुसार पदभरती अद्यापही केलेली नसल्याने उपमहामंडळे कार्यान्वयीत झालेली नसणे, त्यामुळे राज्यातील भटके-विमुक्त समाजातील नागरिकांचा सर्वांगीण विकासावर विपरीत परिणाम होत असणे, त्यामुळे उक्त समाजातील नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असुन सदर उमहामंडळांना नियोजीत निधी वितरण, मंजुर आकृतीबंधानुसार पदभरती करण्याची मागणी करण्यात येणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
३९६.	श्री. सत्यजित देशमुख वि .स . स.	"राज्यात वडार समाजाच्या सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक व व्यावसायिक उन्नती होणे गरजेचे असणे, महाराष्ट्रामध्ये सदर समाजाचा विमुक्त जातीमध्ये समावेश केल्याने सदरहू समाजावर मोठा अन्याय झालेला असणे, समाजाचे उदरनिर्वाहाचे साधन दगड फोडणे, खडी करणे पारंपारिक व्यवसाय सध्याच्या आधुनिक मशिनरीमुळे पूर्णपणे बंद झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असणे, त्यांच्या पारंपारिक व्यवसायाला पुनर्जीवन देण्यासाठी विशेष योजना राबविणे, शासनाने पैलवान कै. मारूती चव्हाण वडार समाज महामंडळ स्थापना केलेली असणे, कर्जप्रकरणाच्या असलेल्या जाचक अटी शिथिल करणे, कर्जाचीही हमी शासनाने घेणे, खाणपट्टा, उत्खनन परवाना, खडी क्रशर परवाना, नवीन घरकुलासाठी अतिरिक्त रुपये १,००,०००/- अनुदान देणे, जातीचा दाखला व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी असलेली १९६१ पूर्वीच्या पुराव्याची अट रद्द करणे, प्रत्येक जिल्ह्यात मुला-मुलींसाठी किमान एक निवासी वस्तीगृह व आश्रमशाळा सुरू करणे, युवकांसाठी आयटी, एआय आणि आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण सुरु करणे, मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रोत्साहन योजना करणे, वराह पालन व्यवसाय करणाऱ्या वडार समाजासाठी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गायरान जमिनी उपलब्ध करणे, तत्कालीन ओबीसी महामंडळाला किमान रुपये ३,००० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून देणे, या वडार समाजाच्या प्रमुख मागण्यांच्या संदर्भात शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही वा उपाययोजना.”	
३९७.	श्री. किशोर पाटील वि .स .स.	“राज्यातील दिव्यांग व्यक्तीना सहायक साधनांचे वाटप प्रामुख्याने केंद्र शासनाच्या ADIP योजनेअंतर्गत व आमदार स्थानिकविकास निधीयोजना या मुख्य योजनांतून करण्यात येणे, सद्यःस्थितीत या दोन्ही योजनांमधील तरतूदींमध्ये विसंगती निर्माण झाल्याने मोठ्या संख्येने गरजू दिव्यांग व्यक्ती लाभापासून वंचित असणे, केंद्र शासनाच्या ADIP योजनेअंतर्गत ८० टक्के व त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीनाच चार्जिंग इलेक्ट्रीक तीन चाकी सायकल देण्यात येणे व ४० ते ७९ टक्के दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना दोन्ही योजनेतून हातानी चालवणारी तीनचाकी सायकल देण्यात येणे, मात्र दिव्यांग कल्याण विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र. दिव्यांग-२०२५/प्र.क्र.७९/दिव्यांग कल्याण-०२ दि.२२.९.२०२५ नुसार हाताने चालवणारी तीनचाकी सायकाल देणे बंद करण्यात येणे, आमदार निधीतून प्रति लाभार्थी साहित्य खरेदीची मर्यादा १५ हजार रुपये	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असल्याने ४० ते ७९ टक्के दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीना ४०ते ५० हजार किंमतीची चार्जिंग इलेक्ट्रिक तीनचाकी सायकल देता येत नसणे, परिणामी हा ४० ते ७९ टक्के दिव्यांग व्यक्तीवर अन्याय असणे, याकरिता शासनाने केंद्र शासनाच्या ADIP योजनेअंतर्गत व आमदार निधीतून वैद्यकिय गरज व कार्यक्षमतेच्या आधारे हाताने चालविणारी तीनचाकी सायकल देण्याची तरतूद पुन्हा सुरु करावी, तसेच आमदार निधीतून १५ हजार रुपये असलेली मर्यादा वाढवून ५० हजार रुपये करण्याची जिल्हा दिव्यांग पुनर्वसनकेंद्र, जळगांव यांनी माहे फेब्रुवारी, २०२६ च्या सुमारास केलेली मागणी, होत असलेली मागणी, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३९८.	श्री. सुनिल प्रभू, श्री .हारुन खान, डॉ .नितिन राऊत, श्री .मोहन मते वि .स .स.	“गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागाच्या भामरागड प्रकल्प कार्यालयातंर्गत येणाऱ्या लाहेरी येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील सुमारे ६० विद्यार्थ्यांना अन्नातुन विषबाधा झाल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी घडणे, आदल्या दिवशी रात्रीचे भोजन केल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी विद्यार्थ्यांना अस्वस्थ वाटुन सर्वांना मळमळ आणि तीव्र पोटदुखीचा त्रास सुरु झाल्याने या विद्यार्थ्यांना प्रथम लाहेरी प्राथमिक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आरोग्य केंद्रात नेण्यात येणे, पंरतु परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ४२ विद्यार्थ्यांना तातडीच्या उपचारासाठी भामरागड येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात येणे, त्यानंतर प्रकृती गंभीर असलेल्या दोन विद्यार्थ्यांना तातडीने अहेरी येथील महिला व बाल रुग्णालयात उपचारार्थ दाखल करणे, या घटनेमुळे आश्रम शाळेत शिकत असलेल्या पहिली ते बारावी पर्यंतचे एकुण ३०० विद्यार्थ्यामध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण होणे, येथील सर्व विद्यार्थी अतिदुर्गम भागातील असणे,कंत्राटदाराचे निकृष्ट भोजनामुळेच या विद्यार्थ्यांना अन्नातुन विषबाधा होणे, यामध्ये प्रकल्प अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांचे निकृष्ट भोजन पुरवणारे कंत्राटदाराबरोबर आर्थिक संगनमत असल्यामुळेच विद्यार्थ्यांच्या जीवितास निर्माण झालेला धोका,शासनाचे याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
३९९.	श्री. आमश्या पाडवी वि .स .स.	“धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागात सन २००४ ते २००९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सहा हजार कोटी रुपयांचा गंभीर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		न्यायालयीन नोंदींमधून स्पष्ट झालेला असून, या प्रकरणी न्यायमूर्ती एम. जी .गायकवाड चौकशी समितीने तत्कालीन मंत्री तसेच संबंधित अधिकारी यांच्यावर भ्रष्टाचाराचा ठपका ठेवत फौजदारी कारवाईची स्पष्ट शिफारस केली असता राज्य शासनाकडून अद्याप ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसणे, यामुळे आरोपींना संरक्षण देण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र निर्माण समोर येणे, या गैरव्यवहारासंदर्भात साक्री प्रकल्प कार्यालयासमोर याचिकाकर्ते गुलाब पवार यांनी सहा दिवस उपोषण करून दोषींवर कारवाई, भ्रष्टाचाराचा निधी व्याजासह वसूल करणे व तत्कालिन संबंधित मंत्र्यांना पदावरून हटविणे यासह मागण्या केलेल्या असणे, या प्रकरणी प्रशासनाने लेखी उत्तर दिल्यानंतरच उपोषण मागे घेण्यात आले, याबाबत न्यायालयानेही राज्य सरकारला प्रतिज्ञापत्राद्वारे कारवाईचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिलेले असताना शासन शिफारशीप्रमाणे अंमलबजावणी करण्यास करीत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन सदरील विषय तात्काळ निकाली काढण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४००.	श्रीमती श्वेता महाले वि. स .स.	"कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग ठाणे यांनी सेंट्रल किचन सेमी सेंट्रल किचन या नावाने दिनांक ९ मे २०२५ रोजी एकूण ९ निविदा प्रसिद्ध केलेल्या असणे, मर्जीतील संस्थांना कंत्राट देता यावे यासाठी संबंधित तत्कालीन कार्यकारी अभियंता व आदिवासी विकास विभागाचे सचिव यांनी उक्त निविदा प्रक्रियेत मोठा आर्थिक गैरव्यवहार केला असणे,श्री छत्रपती शिवाजी महाराज स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था नाशिक या संस्थेने निविदेत बनावट प्रमाणपत्रे जोडलेली असतानाही सदर संस्थेस सर्व कामांसाठी टेक्निकल बीडमध्ये पात्र ठरवणे, तसेच आदिवासी आश्रमशाळा भागदरी)ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार (या टेंडरसाठी L१ बीडर म्हणून घोषित करणे, सदर संस्थेने यापूर्वी नंदुरबार जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालयातील आहार सेवेच्या बिलामध्ये मोठा गैरव्यवहार केलेला असणे, याबाबत उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक यांचे स्तरावर चौकशी होऊन उक्त भ्रष्ट संस्थेवर कारवाई झालेली असणे, शासनाची फसवणूक करणाऱ्या संस्थेस कंत्राट देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी निविदेतील अटी व शर्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष केले असणे, याबाबत निविदा प्रक्रियेत सहभागी कंत्राटदाराने शासनाकडे दिनांक ५	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सप्टेंबर २०२५ रोजी तक्रार करूनही अद्याप काहीही कार्यवाही झालेली नसणे, उक्त प्रकरणी सखोल चौकशी होणे आवश्यक असणे, तसेच निविदा प्रक्रिया रद्द करून फेरनिविदा प्रसिद्ध करणे गरजेचे असणे,याबाबत शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कार्यवाही.	
४०१.	श्री. राजु तोडसाम, श्री .चेतन तुपे, श्री .राजकुमार बडोले,श्री .प्रतापराव पाटील चिखलीकर,श्री .अनिल पाटील,डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री .दौलत दरोडा, श्री .राजेश विटेकर, श्री .मंगेश चव्हाण वि .स .स.	"माहे जानेवारी, २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात आदिवासी जमातीच्या हक्कांच्या मागण्याकरिता अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वात नाशिक येथून मंत्रालयांवर काढण्यांत आलेला लाखो नागरिकांचा मोर्चा, आदिवासींचे वनहक्क दावे,केंद्र सरकारने कृषी कायदे रद्द करणे, कांद्यांला भाव देणे, जुनी पेन्शनयोजना लागू करणे, आदिवासीच्या जमिनी त्यांच्या नावावर करणे, शेती मालाला आधारभावाचे कायदेशीर संरक्षण देणे, नोकरभरती, शिक्षण सुविधा, शासकीय योजनांचा लाभ, वाढवण व मुरबे बंदर रद्द करण्याची मागणी, या व इतर अनेक वर्षांच्या मागण्यांबाबत शासनाकडे वारंवार होत असलेली मागणी, त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी आदिवासी जनतेत पसरलेला असंतोष व भितीचे वातावरण लक्षांत घेतां आदिवासींच्या या मागण्यांबाबत शासनाने तात्काळ करावयाची आवश्यक ती कार्यवाही व शासनाची भूमिका."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४०२.	श्री. राजु तोडसाम, श्री .मोहन मते, श्री .सुनिल प्रभू, श्री .योगेश सागर, डॉ .आशिषराव देशमुख वि .स .स.	"बनावट जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याच्या वाढत्या प्रवृत्तीला चाप लावण्यासाठी आदिवासी विकास विभागाने चालू शैक्षणिक वर्षानंतर आता २०२४-२५ या वर्षात आदिवासी कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे तपासण्याचा निर्णय घेतला असणे, त्यामुळे बोगस जातवैधता प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश मिळवलेल्या आणि यंदा अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागण्याची शक्यता असणे, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माण यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला अनुसूचित जमातीच्या (एसटी) कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्याथ्यर्थ्यांपैकी जवळपास ३२ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी बनावट जातवैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आदिवासी विभागाला छाननीत आढळून येणे, त्यामुळे विभागाने २०२४-२५ या वर्षात आदिवासी कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सादर केलेले प्रमाणपत्र विभागाकडून जारी करण्यात आले नसल्याचे आढळून येणे, तसेच काही विद्यार्थ्यांनी केवळ जातवैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाच्या पावतीच्या आधारे प्रवेश घेतल्याचे निष्पन्न होणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्यामुळे विभागाने अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याची मागणी करणारे पत्र व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेणाऱ्या सीईटी कक्षाच्या आयुक्तांना देणे, प्रमाणपत्र, कागदपत्रांची योग्य पडताळणी न करता अशा विद्यार्थ्यांना प्रवेश कसे मिळाले याची चौकशी करून संबंधित अधिकारी आणि शैक्षणिक संस्थांची जबाबदारी निश्चित करण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."	
४०३.	श्री. रवी राणा वि .स .स.	"आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे प्रणित आदिवासी कोळी महादेव, डोंगर कोळी, कोळी मल्हार, टोकरे कोळी व कोळी ढोर जमातींच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दत्ता भाऊ सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी शासनास निवेदन सादर करण्यात आले असणे, सदर निवेदन मंत्रालय, मुंबई येथील मध्यवर्ती टपाल केंद्रात अनुक्रमांक ९८२०५७८, दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी प्राप्त झालेले असणे, तसेच मा. महसूल मंत्री यांनी पत्र क्र २०२५/९० .दि .२४ जानेवारी २०२५ तसेच पत्र क्र. ४२७ व ४३० दि .१० फेब्रुवारी २०२६ अन्वये संबंधित विषयावर शासनस्तरावर तातडीने बैठक घेऊन सकारात्मक निर्णय करण्याची विनंती केली असणे, दि. २३ फेब्रुवारी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		२०२६पासून आझाद मैदान, मुंबई येथे संबंधित समाजबांधवांचे मोर्चा व उपोषण आंदोलन सुरू असून परिस्थितीची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक असणे, सामाजिक सलोखा व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी संबंधित विभागांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करून स्पष्ट व ठोस शासन निर्णय करण्याची आवश्यकता, या संबंधाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."	
४०४.	श्री. सुरेश धस,श्री .अशोक पाटील वि .स .स.	"एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे मार्फत दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी नियमितपणे पुरवण्यात आलेल्या जेवणात पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा सोमतवाडी व शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा सोनावळे आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या जेवणात आळ्या आढळणे, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगाव यांनी चौकशी समिती नेमने व अहवालात "विद्यार्थ्यांच्या जेवणामध्ये आळ्या आढळल्या असणे" असे नमूद करणे, शाळेच्या मुख्याध्यापिका यांनीही व्हिडिओद्वारे हे सत्य कबूल करणे, सर्व पुरावे असणे तरी देखील प्रकल्प अधिकारी यांनी ठाणे आयुक्तांकडे अहवालात "आळ्या नव्हत्या, राजम्यामध्ये	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		फुटलेले अंकुर होते. असे नमूद केले व खोटा पुरावा तयार करणे, तसेच खोट्या गुन्ह्यात गुंतवणे, षडयंत्र रचने, धमकी देणे, खोटी माहिती पुरवणी, महिला कर्मचाऱ्यांना लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करणे, त्रासदाय ठरतील अशा लोकांना गावातून खोट्या तक्रारी घेऊन त्यांच्यावर कारवाई करणे, अशा प्रकारच्या गैरवर्तन प्रकरणी शासनाकडे वारंवार लिखित तक्रारी करूनही त्या तक्रारींकडे करण्यात आलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे या भागातील विद्यार्थी, कर्मचारी, नागरिकांचा त्यावरील उडालेला विश्वास व निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, त्यावर शासनाने तातडीने करावयाची उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया."	
४०५.	श्री. शांताराम मोरे वि .स .स.	"आदिवासी विकास विभागातील अधिकारी संतोष ठूबे (उपायुक्त शिक्षा) आणि कपील पवार (सहसंचालक वित्त) यांनी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्याच्या निविदा प्रक्रियेत दप्तर दिरंगाई करून आदिवासी मुलांना त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवले असणे, निविदा प्रक्रियेत १६ निविदाधारकांनी भाग घेतला होता, परंतु जगदंबा महिला सहकारी उत्पादक संस्था यांनी सहभाग घेतला नव्हता. उच्च न्यायालयाने दिनांक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		२८.०७.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत, पुढील तारखे पर्यंत पुरवठा आदेश देण्यात येवू नये असा आदेश मिळवला असणे, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक येथील अधिकारी श्री.संतोष ठुबे, सहआयुक्त (शिक्षण) व श्री. कपील पवार, सहसंचालक (वित्त्) हे हेतुपुरस्सर ही बाब मा. उच्चन्यायालयाचे निदर्शनास आणुन देत नसणे, शासन धोरणातील तरतुदीनूसार विद्यार्थ्यांना दरवर्षी गणवेश देणे बंधनकारक असणे, याबाबत दोषी अधिकारी यांना निलंबित करून चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४०६.	श्री. अभिमन्यु पवार वि .स .स.	"धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात मौजे नळदुर्ग येथे साधारणत: १२६ एकर क्षेत्रावरील विस्तारलेला नळदुर्ग हा ऐतिहासिक किल्ला असणे, सदरील किल्ला ६ व्या शतकातील असून किल्ला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक भेटी देत असणे,सदरील किल्याच्या तटबंदीच्या आतील जमिनीवर अनेक व्यक्तींनी बेकायदेशीर अतिक्रमणे करून स्वत:च्या शेतीसाठी जमिनीचा वापर सुरु केला असून अतिक्रमणधारकांनी संबंधित महसूल अधिकारी यांच्याशी संगनमत करून किल्ल्याची जमीन आपल्या नावावर बेकायदेशीररित्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		केली असल्याचे व त्याचा ७/१२ ही तयार करण्यात आलेला असल्याचे निदर्शनास येणे, सदर किल्ल्याच्या प्रवेशद्वाराशेजारी अनाधिकृतपणे दर्गा व रणमंडळात कबरीचे बांधकाम केलेले असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी असणे, युनिटी मल्टीकॉन कंपनीने पुरातत्व विभागाची परवानगी न घेता परस्पर किल्ल्याच्या प्रवेशद्वारावरील दर्ग्याची डागडुजी केली असणे, सदरील किल्ल्याच्या २०० मीटर परिघात विनापरवानगी हॉटेल व मंगल कार्यालयाचे बांधकाम झाले असणे, याबाबत चौकशी व कार्यवाही होत नसल्याने नागरिकांत शासनाच्या विरुद्ध संतापाची भावना निर्माण झाली असणे, धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग किल्ल्याच्या जमिनीवरील केलेली अतिक्रमणे काढणे आणि विनापरवानगी केलेली अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत तसेच किल्ल्याच्या जमिनीचे अधिकार अभिलेखावर महाराष्ट्र शासन या नावाची नोंद घेण्याबाबत आणि युनिटी मल्टीकॉन कंपनीसोबतचा करारा रद्द करून त्यांच्या गैरकारभाराची चौकशी करून नियमानुसार कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४०७.	श्री. शिवाजी पाटील वि .स .स.	“चंदगड, गडहिंग्लज व आजरा तालुक्यांतील अनेक गावांमध्ये मोबाईल नेटवर्कची सुविधा नसल्याने येथील नागरिकांना अनेक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		समस्यांना तोंड दयावे लागणे, त्यामुळे नागरिकांना संपर्क करणे कठीण होणे, तालुक्यात नैसर्गिक आपत्ती अथवा दुर्घटना घडल्यास संपर्कच होत नसणे, संदेशवहन होत नसल्याने वैद्यकीय व इतर सुविधाही या गावांना देणे अवघड होणे यापेक्षा पावसाळयात परिस्थिती बिकट असणे, याबाबत राज्य शासनाने लक्ष घालून तात्काळ निर्णय घेऊन चंदगड, गडहिंग्लज व आजरा तालुक्यांतील गावांमध्ये मोबाईल नेटवर्क सुविधा उपलबध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."	
४०८.	श्रीमती श्वेता महाले, श्री. अमित विलासराव देशमुख, श्री .विजय देशमुख वि .स .स.	"आजच्या प्रगत युगात इंटरनेट आणि समाज माध्यम हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक बनले असणे, प्रौढांसोबतच किशोरवयीन बालकांमध्ये वाढलेला स्क्रीन टाईम व समाज माध्यमाच्या अनियंत्रित वापरामुळे देशाचे आधारस्तंभ The Anxious Generation" (चिंताग्रस्त पिढी) बनत चालले असणे, रील स्क्रोलिंगमुळे स्मरणशक्तीचा ऱ्हास होत असणे, तसेच डोळे, मान व पाठदुखीचा त्रास होत असणे, uसोशल व्हॅलेडेशननच्या हव्यासापोटी तरुण मुले नैराश्य आणि आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांकडे वळत असणे, नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो (NCRB) २०२३ च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्र	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सायबर गुन्ह्यांचे बाबतीत देशात दुसऱ्या क्रमांकावर असणे, २०२३ मध्ये ८१०३ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली असणे, महिला व तरुणींचे ऑनलाईन लैंगिक शोषण, फोटो मॉर्फिंग, पोर्नोग्राफीचा अनिर्बंध प्रसार यामुळे महिला व मुलींची सुरक्षितता धोक्यात आली असणे, ऑस्ट्रेलिया सरकारने नुकतेच १६ वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यम वापरावर बंदी घातली असणे, तसेच अमेरिका,फ्रान्स, नॉर्वे, डेन्मार्क, ब्राझील यांसह जगातील अनेक आघाडीच्या देशांनी मुलांच्या सोशल समाज माध्यम वापरावर नियंत्रणासाठी कठोर कायदे केले असणे, कर्नाटक राज्य सरकारनेही १६ वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यमाच्या वापरावर बंदी घातली असणे, महाराष्ट्रानेही समाज माध्यम धोरणण आखणी करून १६ वर्षांखालील मुलांच्या समाज माध्यम वापरावर बंदी आणणे तसेच महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी डिजिटल सुरक्षा धोरण आखणे अत्यंत गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४०९.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"महाराष्ट्र राज्यात सन २००७-२००८ या वर्षात ३ हजार ५० टन कृषी पिकांसाठी रासायनिक किटक नाशकाचा वापर करण्यात येणे तर सन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		२०२२-२०२३ या वर्षात तिप्पटीहून अधिक सुमारे १५ हजार ४६५ मेट्रीक टनापर्यंत रासायनिक किटकनाशकांचा वापर करण्यात आल्याची माहिती दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी ठपॅन इंडिया" या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातुन निदर्शनास येणे, अनेक राज्यांमध्ये रासायनिक किटक नाशकांचा वापर कमी होत असतांना महाराष्ट्रात मात्र वाढत असल्याने कृषी तंज्ञानी याबाबत चिंता व्यक्त करण्यात येणे, राज्यात ३.९६ कि.ग्रॅम प्रति हेक्टर इतक्या मोठ्या प्रमाणात किटकनाशकांचा वापर करण्यात येत असून त्या तुलनेत कृषी आयुक्तालयाच्या अहवालानुसार केवळ १५६६ मेट्रीक टन इतक्या अंत्यत कमी प्रमाणात जैविक किटकनाशकांचा वापर करण्यात येत असणे, यवतमाळ जिल्हयात सन २०२२ ते २०२५ या वर्षात करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून १४८५ शेतकऱ्यांपैकी निम्मे शेतकरी गेले दहा वर्षापासून सातत्याने या किटकनाशकांच्या संपर्कात असल्याचे आढळून येणे, तसेच रासायनिक किटकनाशकांच्या अतिवापरामुळे शेतमालास निर्माण झालेली असुरक्षितता, फवारणी दरम्यान विषबाधा व पर्यावरणीय दुष्परिणामाची जोखीम वाढल्याने शेतकऱ्यांच्या आरोग्यास निर्मान झालेला धोका,राज्य शासनाने रासयनिक किटकनाशंकाचा वापर	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कमी करुन जैविक किटक नाशकांचा वापर मोठ्या प्रमाणात करण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४१०.	श्री. रणधीर सावरकर, श्री .सुभाष देशमुख वि .स .स.	"राज्यातील चारही कृषी विद्यापीठे सध्या तांत्रिक मनुष्यबळाच्या कमतरतेला सामोरे जात असून दर महिन्याला अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने उपलब्ध मनुष्यबळावर अतिरिक्त भार वाढत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सद्य:स्थिती चारही कृषी विद्यापीठांमधील सुमारे ६० टक्के अनुदानित पदे रिक्त असून २०१६ नंतर नियमित नोकर भरती प्रक्रिया राबवण्यात आलेली नसणे, दर दहा वर्षांनी बदलणारा अभ्यासक्रमही कार्यान्वित करण्यात आला असून आधुनिक तंत्रज्ञान आधारित अभ्यासक्रम सुरू झाले असले तरी त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षित व तांत्रिक मनुष्यबळ विद्यापीठाकडे अपुरा असल्याने केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून नैसर्गिक शेती सेंद्रिय शेती काटेकोर शेती कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेतीत वापर अशा विविध योजना व उपक्रम राबवण्यास अडचणी येत असणे, शास्त्रीय संशोधन, नवीन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बियाणे वाण विकसित करणे, तांत्रिक मांडणी व शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ विद्यापीठाकडे पुरवणे आवश्यक असतानाही प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने कृषी विद्यापीठाबरोबरच शेतकऱ्यांना नवनवीन संशोधनाचा व योजनांची माहिती मिळण्यास विलंब होत असणे, त्यामुळे चार कृषी विद्यापीठात मंजूर असलेली सर्व पदे तात्काळ भरण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांकडून व लोकप्रतिनिधीकडून सतत होत असतानाही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना.”	
४११.	श्री. नरेंद्र भोंडेकर,श्री . धर्मरावबाबा आत्राम वि .स .स.	“अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील तहसील कार्यालय परिसरात कृषी विभाग आणि शहर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत बनावट रासायनिक खताने भरलेला दि. १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी MH २० DE ०९९९ क्रमांकाचा ट्रक संवत्सरा परिसरातून वैजापूरच्या दिशेने जात असून जप्त करणे, त्यामध्ये ४७७ पोत्यांमध्ये भरलेले रासायनिक बनावट खत आढळून येणे, ट्रक चालकाकडे संबंधित खताबाबत कोणतीही वैध बिले, परवाने किंवा अधिकृत कागदपत्रे नसणे, या प्रकरणी पोलिसांनी ट्रक चालकासह संबंधित चार कंपन्यांच्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		व्यवस्थापकीय संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करणे, मात्र पोलीस, कृषी विभागाकडून नाममात्र कार्यवाही होत असल्याने राज्यात मोठ्या प्रमाणात बनावट खताची विक्री होत असल्यामुळे शेतकऱ्यांसह शासनाची फसवणूक होणे, राज्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात बनावट खताचा बेकायदेशीर साठा सापडत असतानासुध्दा संबंधित विभागाकडून नाममात्र कार्यवाही होत असल्यामुळे शेतकऱ्यात पसरत असलेला तीव्र असंतोष, त्यामुळे या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४१२.	श्री. सुरेश धस वि .स .स.	“जालनाजिल्हयातील पोकरा (नानाजी देशमुख कृषी संजीवनी) योजनेच्या विभागीय चौकशीत ३,२५८ शेड नेट हाऊस तपासले सुमारे ६४,९८,५९,३८५ रुपये (सुमारे रुपये ६४.९९ कोटी) वसुली योग्य घोषित करण्यात आले असणे, एकूण अनियमितीचा अंदाज सुमारे रुपये ६८ कोटी आहे. अनधिकृत लाभ वितरण, जुने शेडनेट नवे दाखवून निधी देणे, स्थानिक प्रमाणपत्रांद्वारे प्रशिक्षण प्रमाणपत्र देणे (पुणे/बारामतीऐवजी), बनावट/अनियमित लाभार्थी नोंदी व निधीचा गैरवापर आढळला असून मराठवाड्यात शेतकरी व कृषि विभागातील अधिकारी कर्मचारी संगनमताने भ्रष्टाचाराचा संशय व्यक्त होत असणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		जालना येथील एका वर्ग दर्जाचे महिला अधिकारी यांचेवर दबाव आणून शारीरिक शोषण करून त्यांनाच दोषी ठरविले आहे परंतु सर्व दोषींवर निलंबन/चौकशी सुरू असल्याचे समजते, तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई का होत नाही, हे स्पष्ट करावे. जालना जिल्ह्यातील, तसेच विभागाचे वरिष्ठ व मुंबईतील पोकरा कार्यालयातील अधिकारी यांच्यावरही जबाबदारी निश्चित करावी. आतापर्यंत वसूल रक्कम, खात्यांवर बंधन, मालमत्ता जप्ती व FIR (ठाणे, क्रमांक, कलमे) व पोलीस तपासाची सध्यस्थिती कळवावी. राज्यस्तरीय/CAG लेखापरीक्षण करावे, केंद्रीयृत प्रमाणपत्र सत्यापन, ई पोर्टल ऑडिट ट्रेल, दोन घटक प्रमाणीकरण व स्वतंत्र क्रॉस चेक करावे, विहित दिवसांच्या मर्यादेत आराखड्याने गुन्हेगारी कारवाई, वसुली व लाभार्थी संरक्षण सुनिश्चित करावे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही.	
४१३.	श्री. सुरेश धस वि .स .स.	"अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील लेहेगांव येथील शेतकरी श्री.अरविंद पुरुषोत्तम तट्टे यांनी खरीप हंगाम २०२४ मध्ये रुची बियाणे कंपनीचे 'रुची ९००१' यावाणाचे सोयाबीन बियाणे मौजा सावरखेड या शेतात पेरले असता, सदोष बियाण्यांमुळे अत्यल्प शेंगा धरल्याने त्यांचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मोठे आर्थिक नुकसान झाले असणे,याबाबत सदरशेतकऱ्याने कृषीविभागाकडे तक्रार केल्यानंतर तालुका स्तरीय तक्रार निवारण समितीने प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी व पंचनामा केला असता बियाणे सदोष असल्याचे निष्पन्न झाले असणे,त्यानुसार तालुका समिती व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांनी संबंधित कंपनीला नुकसान भरपाई देण्याची लेखी शिफारस केली असणे,मात्र सदर कंपनीने शासकीय समितीचा अहवाल व शिफारस अमान्य करून शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यास स्पष्टपणे नकार दिला असणे,यामुळे शासनाच्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना व समितीच्या निर्णयाला कंपनीने दुर्लक्षित केले असल्याचे दिसून येत असणे,शासकीय यंत्रणेने दोष सिद्ध करूनही कंपनीकडून होणारी ही अडवणूक अत्यंत गंभीर व शेतकऱ्यांवर अन्याय करणारी असणे,अशा मुजोर कंपन्यांमुळे शेतकरी हवालदिल झाला असून अशा प्रकारच्या राज्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान झाले असणे, तरीही संबंधित कंपनीवर फौजदारी कारवाई करण्याची व व्यापार परवाना रद्द करण्याची आवश्यकता असणे, याप्रकरणी संबंधित शेतकऱ्याला तात्काळ नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आणि सदोष बियाणे विक्री	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करणाऱ्या कंपनीचा परवाना रद्द करण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची भूमिका."	
४१४.	श्री. राजेश बकाने वि .स .स.	"वायगाव निपाणी (ता. देवळी, जि. वर्धा) येथील शेतकऱ्यांनी खरीप हंगामात सोयाबीन व कापूस पिकांसाठी क्षेमा जनरल इन्शुरन्स लि. कंपनीकडून पीकविमा काढलेला असणे, अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, शेतकऱ्यांनी ऑनलाईन पद्धतीने लोकेशन फोटो व आवश्यक कागदपत्रांसह तक्रारी दाखल केलेल्या असणे, तरीदेखील संबंधित विमा कंपनीकडून "No Loss"असे संदेश पाठवून नुकसानभरपाई नाकारण्यात आलेली असणे, ही बाब गंभीर असल्याचे निदर्शनास आलेले असणे, राज्य शासनामार्फत नुकसानीचे सर्वेक्षण करून मदत जाहीर करण्यात आलेली असताना विमा कंपनी कोणत्या निकषांच्या आधारे नुकसान नसल्याचे दर्शवित आहे, याबाबत शंका निर्माण झालेली असणे, परिणामी संबंधित शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसलेला असून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत असणे, सदर प्रकरणी वायगाव निपाणी येथून नोंदविण्यात आलेल्या तक्रारींची एकूण संख्या किती आहे, त्यांची चौकशी जिल्हास्तरीय विमा तक्रार निवारण समितीमार्फत करण्यात आलेली आहे काय, तसेच	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		संबंधित शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने विमा कंपनीविरुद्ध कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, याबाबत शासनाची भूमिका."	
४१५.	श्री. सुरेश धस वि .स .स.	"कृषी विभागातील तत्कालीन विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती श्री. प्रमोद लहाळे व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर श्री. शंकर तोटावर यांच्याविरुद्ध कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी तसेच श्री .शंकर तोटावर यांच्याविरुद्ध महिलेचे लैंगिक शोषण करण्याचा प्रयत्न केल्याबाबतची गंभीर तक्रार शासनाकडे सादर करूनही संबंधितांकडून आर्थिक देवाणघेवाण करून सदर प्रकरणे दडपून टाकल्याचे दिसून येणे, श्री. शंकर तोटावर यांच्याविरुद्ध धाराशिव, लातूर, वाशिम, वर्धा, अमरावती येथील गैरकारभाराबाबत असंख्य तक्रारी प्राप्त होऊनही त्यांना निलंबित न करणे व विभागीय चौकशीत दोषी असतनाही लहाळे यांना दोषारोप न सादर करणे, श्री. प्रमोद लहाळे यांच्याविरुद्ध असंख्य तक्रारी प्राप्त होऊनही त्यांना चौकशी न करता सेवानिवृत्तीचा लाभ देण्यात आल्याचे दिसून येणे, श्री. लहाळे यांचे दोषारोप आणि चौकशीत दोषी आढळून आलेले असतानाही त्यांना दोन पदोन्नती बहाल केल्या जाणे, अशा प्रकारे गंभीर स्वरूपाच्या भ्रष्टाचार	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		व लैंगिक शोषणाच्या तक्रारी असतानाही संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करणे व त्यांना संरक्षण देणे, याबाबतीत श्री. प्रमोद लहाळे सध्या सेवानिवृत्त यांचेवर फौजदारी कारवाई व श्री .शंकर तोटावर यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्याची तसेच लैंगिक शोषणाच्या प्रकरणात महिलेची योग्य न्याय मिळवून देण्याची आवश्यकता आणि यासंदर्भात शासनाची प्रतिक्रिया."	
४१६.	श्री. सुरेश धस वि .स .स.	"राज्य शासनाच्या कृषी आयुक्तालयातर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री पीकविमा योजनेत सन २०१६ पासून मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाला असणे,कृषी आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकारी श्री. विनय आवटे व त्यांच्या मर्जीतील सहकाऱ्यांनी खासगी विमाकंपन्यांशी साटंलोटं करून टेंडर प्रक्रियेत गैरप्रकार घडवून आणणे, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांना डावलून शेतकऱ्यांसाठी किचकट अटी निर्माण करून विमाकंपन्यांना अवाजवी नफा मिळवून देणे, त्या प्रकरणी फक्त सेतू सुविधा केंद्रचालकांवर गुन्हे दाखल करून मूळ दोषी लाभार्थी,कंपनीप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना वगळणे,स्कायमेट कंपनीच्या हवामान केंद्रांचा डेटाटॅम्पर करून विमाकंपन्यांना ट्रिगरपासून	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वाचविण्याचा प्रकार,यामुळे शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळण्यास होणारा विलंब व परिणामी शेतकरी आत्महत्यांमध्ये झालेली वाढ,यासर्व गंभीर बाबी असतानाही संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करता त्यांना पुन्हा पीकविम्याचा पदभार देऊन संरक्षण देणे, प्रामाणिक अधिकाऱ्यांची छळवणूक करून त्यांची बदली करणे तर भ्रष्ट अधिकाऱ्यास बेकायदेशीरपणे मुख्यसांख्यिकीचा अतिरिक्तपदभार देऊन भ्रष्टाचारास खतपाणी घालणे,तसेच शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभकारक असलेली १ रुपयात पीकविमा योजना केवळ श्री. विनय आवटे यांच्या प्रस्तावावरून बंद करून शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेणे,अशाप्रकारे शासनाचा हजारो कोटी रुपयांचा निधी खासगी कंपन्यांकडे प्रलंबित ठेवून त्यावर व्याज कमाविण्यास परवानगी देणे व सदर याप्रकरणी कृषी विभागाच्या दुर्लक्षपणामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या उद्देशाला खिळ बसणे,याबाबत शासनाने तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत करावयाची कार्यवाही.	
४१७.	श्री. सुरेश धस वि .स .स.	“राज्य शासनाच्या कृषी आयुक्तालयातील आस्थापना शाखेत मोठ्याप्रमाणात गैरव्यवहाराचे चौकशी अहवाल चौकशी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अधिकाऱ्यांकडून वेळेत प्राप्त होऊनही सदर चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांकडून आर्थिक देवाणघेवाण करून वर्षानुवर्ष विभागीय चौकशी सुरु न करणे तसेच मंत्रालयातील आस्थापना विभागामार्फत कृषीआयुक्त कार्यालयाकडून विभागीय चौकशीचे प्रस्ताव प्राप्त होऊनही मंत्रालयात विभागीय चौकशी वेळेत प्रस्तावित न करणे कित्येक दोषी अधिकाऱ्यांना पदोन्नत्या देण्यात आल्याचे दिसून येणे,सेवानिवृत्त तत्कालीन कृषीसंचालक श्री.विकास पाटील येथील गैरव्यवहारात दोषी असताना त्यांच्याकडून सुमारे ३५.४४ लाख रुपयांची वसुली कृषी आयुक्तालयाने काढूनही शासनाने त्यांच्यावर सेवानिवृत्तीपर्यंत कोणतीही कारवाई न करता दोन पदोन्नत्या बहाल केल्यामुळे शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले असणे तसेच जलयुक्त शिवार अभियान यवतमाळ प्रकरणी २३ कोटी६० लाख रुपयांच्या नुकसानीस जबाबदार असलेले तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी श्री.नाईक,श्री.सातपुते,श्री.कळसाईत यांच्यावर आजतागायत विभागीय चौकशी सुरु न करणे त्यांना पदोन्नत्यादेण्यात येणे, गेल्या १०वर्षात प्राप्त झालेल्या चौकशी अहवालांची तारीखनिहाय माहिती नसणे,त्यापैकी किती प्रकरणांत विभागीयचौकशी सुरु न करणे वेळेत	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		चौकशी न सुरु केल्यामुळे दोषी अधिकाऱ्यांना पदोन्नत्या देण्यात येत असणे तसेच अशाप्रकारे आस्थापना शाखेतील गैरव्यवहारास जबाबदार अधिकाऱ्यांची पदोन्नती रोखून त्यांना पूर्वीच्या पदावर पदावनत करणे,चुकीच्या पद्धतीने पदोन्नत्या देणाऱ्या अधिकारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे,अशा गैरप्रकारांमुळे शासनाचे झालेले कोट्यावधी रुपयांचे नुकसान व्याजासह वसूल करणेबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही."	
४१८.	श्री. सुरेश धस वि .स .स.	"राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत यवतमाळ जिल्ह्यात नाला खोलीकरण कामांमध्ये शासन निर्णय दि.९ मे २०१३ मधील तीन मीटरपेक्षा जास्त खोलीचे काम न करणे बंधनकारक असताना व कडक मुरूम काढण्यास बंदी असताना देखील तांत्रिक मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे कामांना मान्यता देऊन शासनाचे सुमारे २३ कोटी ६० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याबाबत,कृषीआयुक्तल्याने सदर नुकसानीचा अहवाल शासनाकडे सादर केला असतानाही संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करता उलट तांत्रिक मंजुरी देणारे तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी, श्री.नाईक, तत्कालीन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अधिकारी पांढरकवडा श्री.सातपुते व तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी, दारव्हा श्री.कळसाईत यांना कृषी आयुक्तालय व मंत्रालयात पदोन्नत्या बहाल केल्याचे दिसून येणे,या भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे शासनाचे मोठे नुकसान झाले असताना त्यांच्याकडून नुकसानभरपाई न घेता त्यांना पदोन्नती देऊन बक्षीस देणे, तर अधिकाऱ्यांच्या पेन्शन अडविणे व त्यांची ना-हरकत प्रमाणपत्रे रोखून धरणे, अशा प्रकारे कृषी विभागातील भ्रष्टाचारास चालना देऊन शासकीय निधीचा अपव्यय करणे आणि शेतकऱ्यांच्या विकासावर विपरीत परिणाम घडवून आणणे,याबाबतीत श्री.नाईक,श्री.सातपुते,श्री.कळसाईत यांना दिलेली पदोन्नती तात्काळ रद्द करून त्यांना पूर्वीच्या पदावर पदस्थापित करणे,त्यांच्याकडून शासनाचे झालेले २३ कोटी ६० लाख रुपयांचे नुकसान वसूल करणे तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आणि यासंदर्भात शासनाची प्रतिक्रिया.”	
४१९.	श्री. सुरेश धस वि .स .स.	“वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथील तालुका कृषी अधिकारी श्री. सचिन सुतार हे पदोन्नतीने रुजू झाल्यापासून त्यांच्या मनमानी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कारभारामुळे कर्मचारी व शेतकरी त्रस्त असणे, सदर अधिकारी विविध शासकीय योजनांतर्गत शेतकऱ्यांचे अनुदान मंजूर करण्यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत पैशांची मागणी करत असल्याचे व पैसे न दिल्यास अनुदान रोखून धरत असल्याचे समोर आले असणे, तसेच, कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांशी अर्वाच्य भाषेत बोलणे, त्यांच्या चारित्र्यावर व कुटुंबावर विनाकारण आरोप करून त्यांचा मानसिक छळ करणे, कार्यालयीन सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज स्वतःच्या मोबाईलवर घेऊन कर्मचाऱ्यांवर सतत पाळत ठेवणे व शौचालयाकडे जातानाही कॅमेऱ्यातून लक्ष ठेवून महिला कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करणे, कर्मचाऱ्यांच्या रजेचे अर्ज किंवा इतर प्रस्ताव जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे आणि त्यांना वारंवार प्रशासकीय कारवाईची व गोपनीय अहवाल खराब करण्याची धमकी देणे, या सर्व जाचाला कंटाळून कृषी विभाग कर्मचारी समन्वय समितीने सदर अधिकाऱ्याच्या बदलीची व त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करणे, कारवाई न झाल्यास कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलनाचा इशारा दिला असल्याने शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत असणे, या गंभीर प्रकरणामुळे कर्मचारी वर्गात पसरलेला	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तीव्र असंतोष आणि भीतीचे वातावरण, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४२०.	श्री. सुरेश धस वि .स .स.	"राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या (FPCs) बळकटी-करणासाठी कृषी विभागामार्फत वितरित करण्यात आलेल्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याची धक्कादायक बाब माहे मार्च २०२६ च्या पहिल्या आठवड्यात समोर आली असणे, प्राप्त माहितीनुसार एकूण २८ कोटी रुपयांच्या निधीपैकी तब्बल २१ कंपन्यांना २० कोटी रुपयांहून अधिकची अग्रीम (Advance) रक्कम प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वीच नियमबाह्यरीत्या प्रदान करण्यात आली असणे, सदर प्रक्रियेत शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वांचे आणि वित्तीय नियमांचे उघडपणे उल्लंघन झाले असणे, कोट्यवधीचा निधी वितरित होऊनही या कंपन्यांच्या हिश्शाचे प्रत्यक्ष काम जमिनीवर अत्यंत अत्यल्प किंवा नगण्य स्वरूपात असणे, या गंभीर प्रकरणाबाबत खुद्द कृषी विभाग अनभिज्ञ असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्याने प्रशासकीय अनागोंदी चव्हाट्यावर आली असणे, एका बाजूला निधीचा अभाव असल्याचे सांगितले जात असताना दुसऱ्या बाजूला ठराविक कंपन्यांना नियमबाह्य लाभ देऊन शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचा हा प्रकार असणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		यामुळे पात्र व गरजू शेतकरी कंपन्या संधीपासून वंचित राहिल्याने राज्यातील शेतकरी वर्गामध्ये तीव्र संतापाची भावना पसरली असणे, या प्रकरणी तातडीने चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित कंपन्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आणि भविष्यात असा गैरव्यवहार टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."	
४२१.	डॉ. राहूल पाटील वि .स .स.	"राज्यातील आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना धान्यपुरवठा बंद करुन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात येणे, तथापि गेल्या वर्षभरापासून शेतकऱ्यांना सदर अनुदानाची रक्कम मिळालेली नसणे, तसेच कृषी विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म सिंचन योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, व पिक विमा योजनाअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांची गेल्या ५ वर्षाची सुमारे १२ हजार कोटी रुपयांची रक्कम थकीत असणे, शेतकऱ्यांना विविध योजनेंतर्गत अनुदानाची रक्कम वेळेवर न मिळाल्याने कर्जफेड करणे, शेती व्यवस्थापन यामध्ये अनेक अडचणीला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, कृषी विभागांतर्गत विविध योजनेंतर्गत	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शेतकऱ्यांची थकीत अनुदानाची रक्कम त्वरीत वितरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया.”	
४२२.	डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. अबू आझमी,श्री. संजय गायकवाड,श्री. विलास भुमरे,श्री. मुरजी (काका) पटेल,श्री. अमोल पाटील, श्री. प्रकाश सुर्वे,श्री. रमेश नानासाहेब बोरनारे (सर), श्री. आनंद तिडके,श्री. भास्कर जाधव,श्री. किशोर पाटील, श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील,श्री. गजानन लवटे, श्री. अमोल खताळ, श्री. मनोज जामसुतकर वि. स. स.	“राज्यात एकात्मीक बालविकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण,आदिवासी व नागरी भागात १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आलेली असून त्यातील १लाख१०हजार६२४ केंद्रे सध्या कार्यरत असणे,यापैकी तब्बल २२हजार७४३ केंद्रे भाड्याच्या इमारतीत चालवली जात असल्याची गंभीर बाब फेब्रुवारी, २०२६च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे,अंगणवाडी ही ग्रामीण व आदिवासी भागातील बालविकास आणी आरोग्य सेवांची महत्वाची पायाभूत संस्था असणे,सहा वर्षाखालील बालकांचे पोषण,आरोग्य आणी मानसीक विकास सुनिश्चीत करणे हे अंगणवाडी केंद्राचे मुख्य उद्दीष्ट असून एकात्मीक बालविकास सेवा योजनेचा हा अविभाज्य भाग असणे,शाळांच्या इमारती,समाजमंदिरे,ग्रामपंचायत इमारत किंवा इतर ठिकाणच्या भाड्याच्या जागेत चालवली जात असणे,अनेक अंगणवाडी केंद्रात वीज, पिण्याचे पाणी,शौचालय इ.सोयीसुविधांचा अभाव असल्याने लहान मुले कर्मचाऱ्यांना त्रासदायक अडचणींचा सामना	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करावा लागत असणे, सदर गंभीर प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष,परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेल तीव्र असंतोष,संताप तसेच चिडीची भावना, प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे अंगणवाडी केंद्रावर मुलभूत सोयीसुविधाअभावी मुले व कर्मचाऱ्यांना प्रतिकूल परिस्थीतीत काम करावे लागत असणे,भाडेतत्वावर सुरु असलेली अंगणवाडी केंद्रे स्वमालकीच्या जागेत सुरु करुन त्यांना मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासंदर्भात शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.”	
४२३.	श्री. आमश्या पाडवी वि .स .स.	“मौजे. रतनबारा) ता .अक्कलकुवा, जि. नंदुरबार (येथील श्रीमती जमुनाबाई प्रताप वसावे ह्या अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत असुन त्यांनी २०१४ साली मोरंबा जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवून विजय मिळविला असणे, परंतु शासन निर्णय ५ ऑगस्ट, २०१० एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत अंगणवाडी सेविका मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना सार्वत्रिक निवडणुकीत भाग	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		घेतल्यानंतर नवनिर्वाचित सदस्याचे पद स्वीकारल्यानंतर दोन्ही पदांचे कर्तव्य एकाच वेळी पार पाडता न येणे, तरीही श्रीमती. जमुनाबाई प्रताप वसावे जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्याने अंगणवाडी सेविका पदाचा राजीनामा देणे अपेक्षित असणे, परंतु त्यांनी राजीनामा न देता दोन्ही पदाचा लाभ आजपर्यंत घेत असून शासनाची दिशाभूल करत असणे, एकाच वेळी व्यक्ती दोन पदावर काम करणे शक्य नसल्याने सदरील कर्मचारी अंगणवाडी केंद्रात गैरहजर असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत श्रीमती. जमुनाताई प्रताप वसावे यांच्याकडून अंगणवाडी सेविका म्हणून सन २०१४ पासून ते आजपर्यंत एकूण १० वर्ष घेतलेला पगार वसूल करून शासनाची दिशाभूल केली म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करून अंगणवाडी सेविका पदावरून कायमस्वरूपी कमी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४२४.	श्रीमती मोनिका राजळे वि. स .स.	“पाथर्डी व शेवगांव तालुका जि.अहिल्यानगर मधून राष्ट्रीय महामार्ग ७५२ई पैठण-पंढरपूर पालखी मार्ग व राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ् खरवंडी - नवगण - राजूरी या महामार्गाचे काम अनुक्रमे २०१७ व	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		२०१८ला सुरु झालेले असणे पैठण-पंढरपूर महामार्गासाठी शेवगांव तालुक्यातील मुंगी-हातगांव-बोधेगांव-लाडजळगांव-शेकटे व पाथर्डी तालुक्यातील मिडसांगवी "भालगांव - कासाळवाडी ही गावे समाविष्ठ असणे या गावातील भूसंपादनाचे अंतीम निवाडे MORTH कार्यालयाकडून मंजूर होवून मोबदले अदा करण्यासाठी निधीची मागणी विभागाने केलेली असणे, परंतू अद्याप भूसंपादनाचे मोबदले अदा न होणे महामार्गाचे काम बंद असणे, त्यामुळे दळणवळण विस्कळीत व अपघात होणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होणे, राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ् खरवंडी-नवगण - राजूरी या रस्त्यासाठी पाथर्डी तालुक्यातील खरवंडी –मालेवाडी-मुंगुसवाडे-कासाळवाडी - भालगांव या गावांतील शेतकरी व रहिवाशांचे भूसंपादन झालेले असणे, मोबदले न मिळाल्याने रस्त्याचे काम बंद असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष असणे रस्त्याचे काम अर्धवट बंद असल्याने दळणवळण विस्कळीत झालेले असणे, या दोनही महामार्गाच्या भूसंपादनाचे मोबदले शेतकऱ्यांना तातडीने अदा करण्यासाठी शासनाने निधी देण्याची आवश्यकता उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी सदर रस्त्याचे काम पुर्ण करणेसाठी ३१ मार्च, २०२६ ची अंतीम मुदत दिलेली	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे, या तातडीच्या विषयाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४२५.	श्री. रामदास मसराम वि .स .स.	"गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविण्यात आलेल्या रस्ते व पुलांच्या कामांच्या निविदा प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे निदर्शनास येणे, एका विशिष्ट कंत्राटदार कंपनीला नियमबाह्य पद्धतीने झुकते माप देऊन, सुमारे ४.५ टक्के अधिक दराने कामे देण्यात आल्याचा गंभीर आरोप असणे, विशेष म्हणजे स्थानिक कंत्राटदारांनी अत्यंत कमी दरात आणि जोखीम पत्करून ही कामे पूर्ण करण्याची तयारी दर्शविली असतानाही त्यांना हेतुपुरस्सर डावलण्यात आले असणे, या पक्षपाती निर्णयामुळे शासकीय तिजोरीवर अंदाजे १०० कोटी रुपयांचा अतिरिक्त आणि अनावश्यक आर्थिक बोजा पडणार असल्याचे समोर येत असणे, यापूर्वी पत्रकार परिषदांमधून आणि संबंधित कार्यालयांकडे लेखी निवेदने देऊन या भ्रष्टाचाराकडे लक्ष वेधण्यात आले असूनही संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई किंवा चौकशी झालेली नसणे, सार्वजनिक निधीचा असा अपव्यय होणे हे प्रशासकीय पारदर्शकतेच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याने शासनाची प्रतिमा मलिन होत असून दुर्गम	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		भागातील विकासकामांच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झालेला असणे, या संपूर्ण निविदा प्रक्रियेची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी तातडीने करुन शासनाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या निविदांमधील अनियमितता टाळण्यासाठी शासन पारदर्शक प्रणाली राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."	
४२६.	श्री. राजु खरे वि .स .स.	"पंढरपूर तालुक्यातील सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ विधानसभा मतदारसंघातील EPC-५१ पंढरपूर देगांव चिंचोळी टाकाळी सिंकदर ते एस.एच.-२०२ MDR-६६ किमी ०/०० ते ३३/९०० या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले असणे, सदर काम सद्यस्थितीत चालू असून कामांचे स्पेशस्पिीकेशन प्रमाणे करण्यात येत नाही, कामाचे भराव करताना पुर्णपणे साईडपट्टीची काळी माती काढून भराव केला जात असणे, अर्थोवर्क करत असताना हार्ड मुरमाचा भराव करण्यात येत नसणे, रस्त्यांची लांबी साधारणता ३३/९०० किमी एवढी असून सदर रस्ता पंढरपूर शहराला जोडणारा आहे, या मार्गावरुन ऊस वाहतूक, जड वाहतूक, मोठ्या प्रमाणात होत असते, तसेच आषाढी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वारीच्या वेळी वारकरी मोठ्या प्रमाणात पायी चालत जात असतात, त्यामुळे सदर रस्ता चांगला दर्जाचा होणे आवश्यक असणे, संबंधित मक्तेदांराने चुकीच्या आणि अत्यंत निकृष्ट दर्जाचे बोगस काम करुन बिले काढत असणे, सी.डी.वर्क व पूल काम करित असताना त्यावर कॉक्रिट न करता काळ्या मातीने भराव करण्यात आला आहे, तसेच कुठल्याही ठिकाणी बाहेरुन मुरुम आणून भराव करण्यात आला नसणे, साईड पट्टीची काळी मातीने काढून भराव करण्यात आला असणे, तरी या कामांची दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या मार्फत त्वरीत चौकशी करुन कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४२७.	श्रीमती सरोज अहिरे वि. स .स.	"नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता यांना शासकीय नियमानुसार वयोमनानुसार वयोमान पूर्ण झाल्यामुळे नियत तारखेस सेवा निवृत्त होणे अपेक्षित असणे, तथापि, शासकीय सेवा नियम, सेवाशिस्त अधिनियम व निवृत्ती संबंधित शासन नियमावली यांना डावलून नियमबाह्य पध्दतीने यांना अतिरिक्त दिड (१.५) दीड वर्षांचा सेवा कालावधी वाढून देण्यांत आलेला असणे, यामध्ये गंभीर अनियमितता आढळून येत असल्याचा संशय व्यक्त होत असणे, मुख्य	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अभियंता सार्व.बांधकाम विभाग, नाशिक यांनी नियतव्यय शासकीय सेवा कालावधी एक वर्ष बाकी असल्यापूर्वीच जन्म तारखेमध्ये चूक असल्याचे दाखवून शासनाची दिशाभूल करणे, शासनाच्या यासंदर्भात निदर्शनास आणून न देता सेवानिवृत्तीच्या कालावधीच्या अगोदरच अशाप्रकारे जन्मतारखेमध्ये चूक असल्याचे भासवून वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे निश्चित नियम मोडून कालावधी वाढविण्यात आलेला असणे, अतिरिक्त सेवा कालावधी वाढविण्यासाठी कोणते शासकीय प्रस्ताव/अहवाल/मान्यता प्राप्त करुन न घेता विशिष्ट अधिकाऱ्याला अनुचित लाभ देण्यात आल्याचा दृढ संशय असणे, यामुळे प्रशासनाच्या निष्पक्षता व पारदर्शकतेस बाधा निर्माण होण्याची कृती घडणे, तसेच अन्य संबंधितांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागणे, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यांत यावी व जबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्तभंग व कायदेशीर कार्यवाही करण्यांत यावी तसेच नियमबाह्य पध्दतीने वाढविण्यात आलेला सेवा कालावधी तात्काळ रद्द करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका.”	
४२८.	श्री. रवी राणा वि .स .स.	“अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात पिकअप वाहन दरीत कोसळून ०५ जणांचा मृत्यू व १२ जण जखमी झाल्याची घटना अत्यंत	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		दुर्दैवी व चिंताजनक असणे, या अपघातात रीताबाई मंगल राठोड, सुकरही बिसराम धांडे, सीताराम पटेल सेलूकर, किसन तानु धांडे व बाबूलाल बुद्धा यांचा मृत्यू झाला असणे, संबंधित मार्गावर रस्त्याचे बांधकाम सुरू असताना आवश्यक सुरक्षाव्यवस्था, इशारा फलक व संरक्षक कठडे नसल्याची बाब नागरिकांनी निदर्शनास आणली असणे, कंत्राटदार व देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याची शक्यता व्यक्त होत असणे, दि.२५/०२/२०२६ रोजी लोकप्रतिनिधी व युवा स्वाभिमान पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन देण्यात आले असणे, या संदर्भात शासनाने तात्काळ उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी समिती नियुक्त करून दोषींवर कडक प्रशासकीय व फौजदारी कारवाई करावी, मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत जाहीर करून जखमींना शासकीय खर्चातून दर्जेदार उपचार द्यावेत, तसेच संबंधित मार्गावरील सुरक्षाव्यवस्था तातडीने पूर्ण करून भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका.”	
४२९.	श्री. करण देवतळे वि .स .स.	“घाटकोपर (पूर्व) मुंबई येथील शासकीय वसाहतीमध्ये एकूण १० इमारती असून त्यातील ७ इमारतीत शासकीय कर्मचारी व त्यांचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		परिवार राहत असून त्या ठिकाणी अनेक सोयीसुविधांचा अभाव असणे, त्याठिकाणी पुरुष/महिला कर्मचाऱ्यांनी लिफ्ट तसेच इमारती परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, तसेच इमारतीच्या पॅसेज व रुममधील खिडक्याजवळ लहान मुले जात असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून ग्रील बसविण्याची मागणी वारंवार सा.बांधकाम विभागाकडे केलेली असणे, त्यानुसार शासनाकडून यासंबंधी अहवाल प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेनुसार कामे करण्यात येईल असे लेखी निवेदनाद्वारे कळविले असणे, सदरहू ठिकाणी उपरोक्त कामांसंदर्भात अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, सा.बांधकाम विभागाकडून अक्षम्य दुर्लक्षि व टाळाटाळ होत असल्याने वसाहतीतील कर्मचाऱ्यांत प्रचंड चिडीची व नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, त्याचप्रमाणे सदर वसाहतीतून बाहेर जाण्यासाठी एकच रस्ता उपलब्ध असून तोही विकासकाने अंतर्गत रस्ता तयार केलेला असणे, सदरहू रस्ता विकासकाकडून भविष्यात बंद केला जावू शकणे, तरी डीपी प्रोजेक्ट मध्ये मंजूर असलेला मुख्य रस्ता लवकरात लवकर काम सुरू करून वापरास उपलब्ध करण्यात येण्याची आवश्यकता असणे, तरी उक्त ठिकाणच्या शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांच्या मागणीचा	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		विचार करून उपरोक्त कामांना गती देण्यासाठी त्वरीत निधी उपलब्ध होणेकामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."	
४३०.	श्री. चंद्रदीप नरके वि .स .स.	"कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ (जी) कोल्हापूर-गगनबावडा मार्गाच्या दुपदरीकरणाचे काम वेगाने सुरू असताना कोल्हापूर ते कळे या सुमारे ७५ टक्के पूर्ण झालेल्या टप्प्यात अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम झाल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होणे, कोकण व गोव्याला जोडणारा जवळचा मार्ग असल्यामुळे या रस्त्यावर अवजड वाहतूक व पर्यटनाची मोठी वर्दळ असताना अनेक ठिकाणी अर्धवट काम, खड्डे व असमतोल पृष्ठभागामुळे अपघातांचे प्रमाण वाढणे, बालिंगे गावाजवळ जुन्या पुलाशेजारी प्रस्तावित उंच नवीन पूल अद्याप अपूर्ण राहणे, पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न झाल्यास वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता निर्माण होणे, स्थानिक नागरिकांकडून आंदोलने व रस्ता रोको करण्यात येणे, या सर्व प्रकारामुळे जनतेमध्ये तीव्र नाराजी पसरलेली असणे, या पार्श्वभूमीवर संबंधित कामाची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून दर्जा सुधारणा व अपूर्ण काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४३१.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मुंबईतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील आमदार निवास उपविभागातंर्गत सन-२०१९ पासून सेवेत कायम करण्यात आलेल्या चतूर्थश्रेणी गट-ड मधील ६० कर्मचाऱ्यांना दि.०२ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार समकक्ष श्रेणी असलेल्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करणेबाबत, गेले १ वर्षापासून अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग कार्यालय यांनी सहसचिव, आस्थापना सां.बां.विभाग यांच्याकडे दि.३१.०५.२०२४ रोजी सादर केला असता, सदर वेतन त्रुटी अहवालात त्रुटी आढळून आल्याने, शासनाने सदरहू प्रस्ताव दि.१०.०६.२०२४ रोजी मुख्य अभियंता सां.बां . प्रादेशिक विभाग यांना कळविण्यात येऊनही, अद्याप मुख्य अभियंता यांनी वेतन त्रुटी अहवालातील त्रुटी दूर करुन, शासनास प्रस्ताव सादर करण्याकडे, दुर्लक्ष करण्यात येणे, यामुळे गेले २ वर्षापासून सदरहू चतुर्थश्रेणी गट-ड मधील कर्मचाऱ्यांचा वेतनश्रेणीच्या लाभापासून वंचित रहावे लागणे, यासंदर्भात सदरहू कर्मचाऱ्यांनी मा. मुख्यमंत्री, व सां.बां.मंत्री यांना दि.२५.१२.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही, अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
४३२.	श्री. हिरामण खोसकर वि .स .स.	"दिनांक ७ मार्च, २०२६ रोजी इगतपुरी तालुक्यातील (जि.नाशिक) टाके हर्ष श्री घाट येथे रस्त्यांचे काम सुरु असतांना सोनू चंदर मेरांदे- वय २५ या तरुणांचा रस्त्यांच्या खड्डयामुळे मृत्यू होणे, सदर रस्त्यांचे कंत्राटदार ठाकूर अँड सन्स यांनी केलेल्या निकृष्ट कामामुळे या रस्त्यांवर खड्डे पडले असून या रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे सूचना फलक, दिशादर्शक व रेडियम किंवा चिन्ह नसल्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात होणे, याकरिता शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी व कंत्राटदारावर कारवाई होऊन काळया यादीत टाकण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."	कित्ता
४३३.	डॉ. किरण लहामटे वि .स .स.	"HAM अंतर्गत खडकजाम ता.चांदवड ते म्हैसवळण घाट ता.अकोले असा रस्ता मंजूर असूनही सदर रस्ता खडकजाम ता.चांदवड ते ठाणगाव ता.सिन्नर पर्यंतच काम सुरु असणे, तथापि ठाणेगाव ता.सिन्नर ते म्हैसवळण घाट ता.अकोले या रस्त्याचे काम सुरु केलेले नसल्याचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निदर्शनास येणे, सदर रस्ता हा टेंभूरवाडी फाटा ता.सिन्नर ते सिन्नर या मार्गे वळविले जात असल्याचे निदर्शनास येणे, तथापि सदर मार्गे वळविलेला रस्ता हा त्वरीत बंद करुन पूर्वीच्याच मंजूरीनुसार करण्यात यावा तसेच सदर रस्ता शिवाजी महाराजांच्या पदस्पर्श भूमीतून हा रस्ता जात असून हा रस्ता होणे पर्यटनाच्या दृष्टीने फार गरजेचे असणे, शिवाजी महाराजांनी १२ दिवस वास्तव्य केलेला पट्टा किल्ला त्याच्या पायथ्याशी हारोड जात असणे, तसेच सदर रस्ता हा ठाणगाव ता.सिन्नर ते म्हाळूंगी-शिवाजीनगर-पट्टेवाडी मार्गे म्हैसवळण घाट ता.अकोले याच मार्ग करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधीनी अकोले जिल्हा अहिल्यानगर यांनी शासनास दि. ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी पत्र देऊन तशी मागणी करण्यात आलेली असणे, त्याबाबत जनतेची मागणी असून सदर रस्ता बांधकाम करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४३४.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	“जिल्हा अमरावती चांदूरबाजार तालुक्यातील राज्य महामार्ग क्र.३०३ वरील गाव खरपी ते राजूरा, बेलोरा पर्यंतच्या कामामध्ये कंत्राटदाराने, रस्ते रुंदीकरणाच्या बांधकामात मुरुमाऐवजी सर्रास मातीचा वापर करुन, रस्त्याचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व चुकीच्या पध्दतीने	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्यात येऊन, यामध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्ट्राचार झाल्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदरहू रस्ते बांधकाम घोटाळा प्रकरणात डी.जी.बेल्हेकर, पुणे या कंपनीच्या कंत्राटदाराने, महाराष्ट्र राज्य पायाभुत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) च्या संबंधित अधिकारी अभियंता यांच्याबरोबर आर्थिक संगनमत करण्यात येऊन, भ्रष्टाचार करण्यात येणे, रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे आतापर्यंत या महामार्गावर अपघात होऊन २ स्थानिक ग्रामस्थांना जीव गमवावा लागण्याची घटना घडणे, रस्त्याचे बांधकाम करतांना मोठ्या प्रमाणात कंपनीच्या वाहनामुळे, धुळीचे साम्राज्यामुळे प्रदुषण होऊन, येथील ग्रामस्थांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते धीरज राजे सातपूते यांनी सदरहू कंत्राटदार कंपनी विरुध्द दि.१९.१२.२०२५ एमएसआयडीसी सां.बां. विभाग यांना लेखी तक्रार निवेदन देऊनही, अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कारवाई करण्यात न येणे, सदरहू प्रकरणी शासनाने या प्रकरणातील दोषी अधिकारी, अभियंता आणि कंत्राटदार यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४३५.	श्री. नानाभाऊ पटोले वि .स .स.	"सन २०२३ ते २०२६ या कालावधीत जिल्हापरिषद,पालघर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता,उपअभियंता यांचेकडून जव्हार,मोखाडा,तलासरी,वाडा, विक्रमगड,डहाणू व वसई तालुक्यातील जिप रस्ते,संरक्षक भिंती,आश्रमशाळा व वसतीगृहे दुरुस्तीची कामे अपूर्ण करणे,मोठ्या प्रमाणावर टक्केवारी घेऊन कामांना मंजूरी देणे,कामांचे योग्य ते परिक्षण न करता देयके अदा करणे,एकाच रस्त्याच्या कामासाठी यापूर्वीच इतर विभागांकडून मंजूरी असतांनाही कंत्राटदारांशी संगनमत करुन पुन्हा त्याच रस्त्याकरिता निधी मंजूर करण्यात येत असल्याने पालघर जिपमधील कार्यकारीअभियंता, उपअभियंता शाखाअभियंता यांची चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.मुख्यमंत्री, ग्रामविकासमंत्री यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये केलेली असणे,पालघर जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागातील रस्त्यांच्या दुर्दशेमुळे येथील गर्भवती स्त्रिया,वयोवृध्द नागरिक व लहान बालके यांच्या अतितातडीच्या उपचारासाठी त्यांना मुंबई येथे ने-आण करणेही अवघड होत असून यात अनेक रुग्णांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडणे,मांडा वेढीडोंगरी ते दातीवरेला रस्ता, कैनाड नाईकपाडा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रस्ता,खोंडाळा तालुक्यातील मुख्य रस्ता ते पी नाग या रस्त्याच्या कामांमध्ये कंत्राटदाराने शासकीय नियमांचे उल्लंघन करुन अनियमितता केलेली असणे, सन २०२३ ते २०२६ या कालावधीत जिपच्या अनेक रस्त्यांच्या कामे,कामांचे ठेके,रस्त्यांची कामे न होता देयके मंजूर करणे या गैरव्यवहारप्रकरणी कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांची मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करण्याची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४३६.	श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार वि. स. स.	“राज्यात ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम सुरू असताना नाशिक जिल्ह्यातील कळवण व सुरगाणा तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये कोणताही शासन निर्णय अथवा वैध परिपत्रक नसताना दिनांक २१ फेब्रुवारी, २०२६ रोजी विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणे,सदर विशेष ग्रामसभा बोलाविताना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व संबंधित नियमांनुसार आवश्यक असलेली ५ ते ७ दिवसांची नोटीस, स्पष्ट अजेंडा, किमान १०% सदस्यांची लेखी मागणी, तसेच वैधानिक प्रक्रिया यांचे पालन करण्यात आले नसल्याचे निदर्शनास येत असणे, तसेच या ग्रामसभांमधून काही ठराव विशिष्ट	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		राजकीय पक्षाला लाभ होईल अशा पद्धतीने घेण्यात आल्याची तक्रार शासनाकडे माहे फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात प्राप्त झाली असणे, यामुळे दोन्ही तालुक्यांमध्ये प्रशासकीय प्रक्रियेबाबत संभ्रम व असंतोष निर्माण झाला असून, ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्पक्षतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असणे, दिनांक २१/०२/२०२६ रोजी आयोजित विशेष ग्रामसभांना शासनाची पूर्वमान्यता होती काय, संबंधित ग्रामसभांमध्ये वैधानिक प्रक्रिया पाळण्यात आली होती काय, या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्यात येणार आहे काय तसेच दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई प्रस्तावित आहे याबाबतीत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४३७.	श्री. नानाभाऊ पटोले वि .स .स.	“जिल्हा परिषद संभाजीनगर येथील शिक्षण विभागात मागील तीन वर्षांत मोठ्या प्रमाणावर अनियमितता, गैरकारभार व भ्रष्टाचार झाल्याच्या गंभीर तक्रारी प्राप्त झाल्या असणे, शिक्षकांच्या दुरुस्ती व बदली प्रक्रियेत नियमबाह्य आदेश काढणे, न्यायालयीन प्रकरणांचा चुकीचा संदर्भ देणे, आंतरजिल्हा बदलीधारकांना महिनोनमहिने प्रलंबित ठेवून आर्थिक व्यवहार करणे, पदोन्नती व निलंबन प्रक्रियेत मनमानी करणे तसेच वैद्यकीय व दिव्यांग प्रमाणपत्रांद्वारे बोगस लाभ घेण्याचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रकार समोर येणे,तसेच विविध शासकीय योजनांच्या अनुदानात, सीसीटीव्ही बसविणे, पुरवणी देयके व सेवानिवृत्ती प्रस्तावांमध्येही कोट्यवधी रुपयांची आर्थिक अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त केला जात असणे, या सर्व प्रकरणांमुळे शिक्षण व्यवस्थेची प्रतिमा मलिन होत असून प्रामाणिक शिक्षकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी समितीमार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.”	
४३८.	श्री. अनुपभैय्या अग्रवाल वि .स .स.	“धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील वकवाड हे गाव शंभर टक्के आदिवासी बहुल असणे. येथे हिंदू बांधवांची मोठी वस्ती असणे .येथील सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असलेल्या मालमत्ता क्रमांक ३६८ या १५,००० स्क्वेअर फूट शासकीय जागेवर बलसिंग रामलाल पावरा या व्यक्तीने पूर्णपणे बेकायदेशीर आणि अनधिकृतरीत्या चर्चचे बांधकाम केलेले असणे, ही जागा मुळात सरकारी असून तिथे आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी जिल्हा परिषदेने अंगणवाडी मंजूर केलेली असणे, मात्र धर्मांध मानसिकतेतून या अतिक्रमणकर्त्याने अंगणवाडीचे पवित्र काम बळजबरीने बंद पाडलेले असणे आणि त्या ठिकाणी ख्रिश्चन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रार्थना स्थळाचे बांधकाम सुरू केलेले असणे, हा थेट आदिवासी हिंदूंच्या हक्कांवर आणि श्रद्धेवर केलेला आघात असणे, या गावात ख्रिश्चन समुदायाचे अस्तित्व नसतानाही केवळ बळजबरीने धर्मप्रसार करण्याच्या उद्देशाने हे अनधिकृत चर्च उभारले जात असणे, शासकीय दप्तरी नमुना ८ मध्ये 'बेशेबा प्रार्थना भवन' आणि 'प्रधान भवन' अशा विसंगत नोंदी करून प्रशासनाची दिशाभूल करण्यात आलेली असणे, ग्रामपंचायतीने नोटीस देऊनही हे बांधकाम सुरूच ठेवणे, हा कायद्याचा आणि प्रशासनाचा अपमान असणे, हे अतिक्रमण म्हणजे आदिवासींची संस्कृती, परंपरा आणि मूळ ओळख नष्ट करण्याचा जाणीवपूर्वक केलेला कट असणे, याबाबत शासनाची भूमिका व उपाययोजना."	
४३९.	श्री. अमोल खताळ वि .स .स.	"जिल्हा अहिल्यानगर, ता.जामखेड स्थित फक्राबादमध्ये अर्धा मग पॅराफिन केमिकल वापरून पाण्यापासून सुमारे २० लिटर दूध तयार करणाऱ्या फक्राबाद दूध संकलन केंद्रावर दि.१६ फेब्रुवारी, २०२६ रोजी पोलिसांनी छापा टाकला असून या केंद्राने आतापर्यंत हजारो लिटर भेसळयुक्त दुधाची विक्री केली असणे, दूध संकलन केंद्रावर सहा ड्रममध्ये दोन लाख ३९ हजार ६०० रुपये किमतीचे एक हजार १९८	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		लिटर पॅराफिन केमिकल, ८१ हजार रुपये किमतीची तीनशे किलो पांढऱ्या रंगाची पावडर, ३२० लिटर भेसळयुक्त दूध, १४ लाखांची दोन पिकअप वाहने असा एकूण १७ लाख ३२ हजार ८१६ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असणे, दूध संकलन केंद्रावर दररोज साडेनऊशे ते एक हजार लिटर दुधाचे संकलन होत असणे, या दुधात पॅराफिन वापरून तयार केलेले दीडशे लिटर दूध मिसळले जात होते. हा प्रकार लक्षात येऊ नये, यासाठी दररोज केवळ दीडशे लिटर दूध तयार करण्याचे काम आरोपीद्वारे केले जाणे, अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, १९५४ अंतर्गत आरोपीला अजामीनपात्र अथवा कठोर शिक्षेची तरतूद करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित आरोपी विरोधात कठोर कारवाई करावी, याकरिता शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४४०.	श्री. संतोष बांगर वि .स .स.	"मुंबई शहरात "CLASSY BLUES"या नावाने बिसलेरी ब्रँडच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरची विक्री होत असल्याची बाब समोर येणे, माहिती अधिकार अंतर्गत दिनांक १३/०८/२०२५ रोजी मागविलेल्या माहितीनुसार सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पालघर यांनी दिनांक २८/१०/२०२५ रोजी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		लेखी उत्तराद्वारे 'CLASSY BLUES' या नावास FSSAI अंतर्गत कोणताही राज्य परवाना दिलेला नसल्याचे स्पष्ट करणे, यावरून संबंधित कंपनीकडून अवैधरित्या पॅकेज्ड पाणी विक्री होत असल्याचे उघड होणे, त्यानंतर दिनांक १८/११/२०२५ रोजी पेमन येथील D&D Beverages LLP या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने छापा टाकून ६१६ पाण्याच्या बाटल्या जप्त करून नमुने तपासणीसाठी पाठविणे व वैध परवाना मिळेपर्यंत व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात येणे, असे असताना सुमारे चार महिन्यांनंतरही संबंधित कंपनीविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे की नाही, जप्त नमुन्यांचा प्रयोगशाळा अहवाल काय आहे व अवैध विक्रीतून किती महसूल मिळविण्यात आला याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसणे, पिण्याचे पाणी हे नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित अत्यंत संवेदनशील विषय असताना अशा बेकायदेशीर प्रकारांमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४४१	श्री. प्रशांत बंब वि .स .स.	"अन्न व औषध विभागातील सहायक आयुक्त(अन्न) उल्हास इंगवले वादाच्या भोवऱ्यात असणे, माजी मंत्र्यांकडे ओएसडी म्हणून २०१० ते २०१४ या कालावधीत कार्यरत असणे, एफडीएच्या दक्षता पथकाचे सहायक आयुक्त (अन्न) कार्यक्षेत्र संपूर्ण राज्य म्हणून कामकज पाहणे, मुख्यालयात राहून सह.आयुक्त मुख्यालय पदाचा अतिरीक्त कार्यभार धारण करणे, या सर्व पदांचा गैरवापर करुन अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये भ्रष्टाचार, जवळचे अधिकारी मोक्याच्या ठिकाणी बसविणे, भेसळखोरांना गुटखा माफियांना संरक्षण देणे, यातून करोडो रुपयांची माया जमविणे, पैशाचा वापर करुन वरीष्ठ अधिकारी यांना हप्ते देणे, त्यामुळे मंत्री महोदयांनी सभागृहात वेळोवेळी चौकशी करुन कारवाई करतो असे उत्तर देणे,पण वरील अधिकाऱ्यांनी त्यांना पाठीशी घालुन त्यांची अद्याप चौकशीही न करणे,एवढेच नाही तर सभागृहामध्ये पावसाळी अधिवेशनात मागणी केल्यावर त्यांचा अतिरीक्त कार्यभार काढून घोषणा करणे, सभागृहाने काढलेला अतिरीक्त कार्यभार आयुक्त डुबे पाटील सभागृहाचा अवमान करुन परत त्यांच्याचकडे सोपविणे, गुटखा प्रतिबंध कारवायांमध्ये अडथळा निर्माण करणे, जुलै, २०२३ मध्ये सपट चहा नमुन्यांमध्ये पेस्टीसाईड सापडणे त्यात ९० लाखांचा भ्रष्टाचार	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करुन क्लीन चीट देणे व जनतेच्या आरोग्यास धोका निर्माण करणे, या अधिकाऱ्याला वरीष्ठ अधिकारी पाठीशी घालत असल्याने त्यास तात्काळ निलंबित करुन अँटी करप्शन ब्युरोकडून चौकशी करण्याची आवश्यकता, तसेच पाठीशी घालणारे वरिष्ठ अधिकारी,आयुक्त व सचिव एफडीए यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४४२.	श्री. अशोकराव माने (बापू) वि. स. स.	“राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्र हे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणारे आणि ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देणे, मात्र राज्यातील अनेक वस्त्रोद्योग उद्योजकांचे भांडवली अनुदान तसेच इतर विविध प्रोत्साहनपर अनुदानाचे प्रस्ताव शासन स्ततरावर प्रलंबित असणे, उद्योजकांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागणे, या योजनांचा प्रत्यक्ष लाभ उद्योजकांना वेळेत मिळत नसल्याने उद्योगांच्या वाढीवर आणि रोजगारनिर्मितीवर विपरीत परिणाम होणे, शासन स्तरावर प्रलंबित असलेले सर्व प्रस्ताव तातडीने निकाली काढून त्यांना मंजुरी देऊन आवश्यक ते शासन निर्णय त्वरित निर्गमित करण्याची आवश्यकता असणे, तसेच उपलब्धतेनुसार आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करून देऊन वस्त्रोद्योग उद्योजकांना देय असलेले भांडवली	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अनुदान व इतर अनुदान लवकरात लवकर वितरित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."	
४४३.	श्री. संदिप क्षीरसागर, श्री. रोहित पवार, श्री. अभिजीत पाटील वि. स. स.	"महाराष्ट्राची जीवनवाहिणी असलेल्या एस टी महामंडळात, ३० रुपयांत नास्त्याची योजना गुंडाळून ठेवून प्रवाशांना घाणेरडे खाद्यपदार्थ देऊन लुटणाऱ्या हॉटेल मालकांना थांबा देऊन हव्या तेवढ्या बसेस हॉटेलवर थांबविण्यासाठी प्रचंड आर्थिक उलाढाल होणे, जयेश बामणेला ह्याकरिता नियमबाह्यरित्या महाव्यवस्थापक करणे, बामणेने भ्रष्टाचाराच्या पैशातून मिळविलेल्या बेहिशोबी मालमत्तेची चार वर्षापासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चौकशी करीत असणे, बामणे विरोधात बार्शीच्या कार्यकर्त्यांने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांकडे दि. ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी तक्रार केलेली असणे, महामंडळाने यामिनी जोशी व इतरांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलम १७-अ नुसार चौकशीची परवानगी दिलेली असणे, जोशीचीच अकार्यकारी पदावर बदली होणे, नाशिक विभाग नियंत्रक असताना ठक्कर बिल्डरचा फायदा व महामंडळाचे नुकसान यामिनी जोशीने केल्याचे सिध्द होऊनही जोशीला बडतर्फी ऐवजी ताकिद देऊन सोडणे, महामंडळातील भ्रष्टाचाराच्या एसआयटी चौकशीची तसेच	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		वेगवेगळ्या कारणास्तव एसीबी चौकशी चालू असलेल्यांना अकार्यकारी पदावर बदलून त्यांची बढती रोखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४४४.	श्री. उमेश ऊर्फ चंदु यावलकर वि .स .स.	“अमरावती जिल्ह्यातील ता. वरुड येथील मौजा. राजुरा बाजार येथे दि. १८/०२/२०२६ रोजी शिवाई ई बस व ऑटो यांच्या भीषण अपघात होऊन यामध्ये ऑटोरिक्षामधील ४ जणांचा जागीच मृत्यू होणे तर ३ जण गंभीर जखमी झाले असणे, सदर बस ही खाजगी कंपनीची असल्यास संबंधित वाहन चालकास केवळ ०८ ते १० दिवसांचे अल्पकालीन प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे समजणे, तसेच या चालकांच्या प्रशिक्षणाची पडताळणी कोणत्या यंत्रणेमार्फत करण्यात आलेली नसणे, त्यामुळे सदरहू अपघाताची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असणे, भविष्यात अशा प्रकारचे अपघात टाळण्यासाठी परिवहन विभागाने ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज, तसेच या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबाना शासनाकडुन किमान २० ते २५ लक्ष रुपये आर्थिक मदत देण्याबाबत मागणी होत असणे, रस्त्यावरील सुरक्षा व्यवस्था, वेग मर्यादा व वाहतुक नियंत्रण व चालकास हेडफोन बंदी, (गाडी चालवतांना हेडफोन वापरुन गाणे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		ऐकणे) मद्यप्राशन करत असल्यास चाचणी करणे याबाबत स्थानिक प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून सदर शिवाई खाजगी बस भरती प्रक्रियेची पूर्ण चौकशी करून यात दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यावर व चालकांवर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४४५.	श्री. मनोज घोरपडे वि .स .स.	"ग्रामीण भागातील दळणवळणाचे मुख्य साधन ST बस असणे. अपुऱ्या ST बस मुळे शालेय विद्यार्थी/विद्यार्थीनी यांचे शैक्षणिक नुकसान होत असणे, लाडक्या बहिणींना प्रवासाचा त्रास होत असणे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (ST महामंडळ) यांच्यामार्फत राज्यामध्ये वाहन चालकांची भरती करणे आवश्यक असणे, जेणेकरून ग्रामीण भागातील नागरिकांना याचा लाभ होणे, विद्यार्थी तसेच जेष्ठ नागरिक महिलांना दिव्यांगांना ५० टक्के सवलतीची स्कीम लागू केली असून वाहन चालकांच्या अभावामुळे गाड्यांच्या फेऱ्या कमी होणे व याचा लाभ पर्यायाने नागरिकांना न मिळणे ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट असणे, सोबतच राज्यामध्ये महामंडळाकडे वाहने जास्त असणे, परंतु ग्रामीण भागामध्ये प्रवासाचे मुख्य साधन एस. टी असणे, परंतु शहरांमध्ये न चालणाऱ्या गाड्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		ग्रामीण भागात लावल्याने त्या वारंवार बंद पडत असणे, त्यामुळे ग्रामीण भागासाठी नवीन एसटी बसची सोय होणे गरजेचे असणे, वाहन चालकांची संख्या कमी असणे, तरी तात्काळ शासनाने भरती करण्याबाबत करावयास व नवीन ST बस देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."	
४४४.	ॲड. राहूल कुल वि .स .स.	"राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये वाहनधारकांकडून आवडीचे 'व्हीआयपी' वाहन क्रमांक आरक्षित केले जात असणे, मात्र सध्याच्या नियमानुसार ६ महिन्यांच्या विहित मुदतीत प्रक्रिया पूर्ण न झाल्यास किंवा तांत्रिक कारणास्तव शुल्क भरण्यास विलंब झाल्यास तो क्रमांक 'बाद' ठरवला जात असणे, धक्कादायक बाब अशी की, एकदा बाद झालेला वाहन क्रमांक प्रणालीमध्ये पुन्हा सक्रिय होत नसणे, तो क्रमांक कोणालाही दिलेला नसतानाही सिस्टीममध्ये 'Not Available' दिसत असणे, अनेक नागरिक जादा पैसे देऊन नंबर घेण्यास तयार असून देखील या तांत्रिक त्रुटीमुळे आजमितीस हजारो 'व्हीआयपी' वाहन क्रमांक प्रणालीत अडकून पडले असणे, नवीन वाहनधारकांना ते उपलब्ध होत नसणे, परिणामी, राज्य शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असणे, इतर राज्यांत 'नंबर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		पोर्टेबिलिटी, सेवा उपलब्ध असताना महाराष्ट्रात मात्र ही प्रक्रिया क्लिष्ट असणे, आरक्षित क्रमांक रक्ताच्या नात्यातील व्यक्तीला किंवा संबंधित कंपनीला हस्तांतरित करण्याची तरतूद करण्याची नागरिकांची मागणी असणे, या हजारो बाद क्रमांकांसाठी 'वेटलिस्ट' पद्धत सुरू करणे किंवा ठराविक काळानंतर ते क्रमांक पुन्हा लिलावासाठी उपलब्ध करून देणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४४७.	ॲड. श्रीजया चव्हाण, श्री .जितेश अंतापुरकर वि .स .स.	"लातूर पासून नांदेड पर्यंतच्या क्षेत्रातील स्थानिक जनतेच्या सुविधेसाठी लातुर ते नांदेड पर्यंत ब्रॉडगेज विद्युतीकरणासह नविन रेल्वे प्रकल्पाचा सविस्तर व्यवहार्यता अहवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी दि. १७-०१-२०२२ रोजी राज्य शासनास सादर केलेला असणे, मात्र सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या सहमतीची आवश्यकता असणे, या करीता व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या व्यवहार्यता अहवालाच्या अनुषंगाने आवश्यक तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे सहमती करीता सादर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करणे मात्र असे असूनही राज्य शासनाकडून केंद्र	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		शासनाकडे सहमतीसाठीचा प्रस्ताव पाठविण्याकरीता होणारी टाळाटाळ व दिरंगाई यामुळे जनतेची होणारी हेळसांड आणि गैरसोय, परिणामत: स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाकडून करण्यात यावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."	
४४८.	श्री. राजेश वानखडे वि .स .स.	"संपूर्ण महाराष्ट्रासह अमरावती जिल्ह्यातील अनेक तालुका स्तरावरील तालुक्याचे ठिकाण असलेल्या ग्रामपंचायतींचे नगरपंचायत मध्ये रूपांतरण करण्यात येणे, या मध्ये अमरावती जिल्ह्यातील तिवसा,भातकुली,नांदगाव खंडेश्वर व धारणी या नगरपंचाय तीनचचा देखील समावेश असणे, या सर्व नगरपंचायत या मूलतः ग्रामीण भाग असल्याने येथील ७० % लोकसंख्या शेतीवर निर्भर असून शेतकरी असल्याने येथील अर्थव्यवस्था ही शेती आधारितच असणे, ग्रामपंचायतचे नगरपंचायत मध्ये रुपांतर झाल्याने येथे रोजगार हमी योजने अंतर्गत जॉब कार्ड तयार होत नसल्याने शासनाच्या रोहयो योजने अंतर्गत कृषी विभागाच्या योजना उदा. सिंचन विहीर,शेततळे,पांदन रस्ते या पासून स्थानिक शेतकरी वंचित होणे, यामुळे शेतकरी हिताच्या अनेक योजनांना या नगरपंचायत क्षेत्रामध्ये खीळ बसणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती रोष उत्पन होणे, संपूर्ण राज्यभर अशा अनेक	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नगर पंचायती असणे, या बाबत शासना द्वारे धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, यामुळे या ग्रामीण भागातील नगरपंचायत क्षेत्रांमध्ये जॉब कार्ड उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४४९.	श्री. विजयसिंह पंडित वि .स .स.	"महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील मजुरांना रोजगाराची हमी देणे आणि त्यातून शाश्वत विकासकामे पूर्ण करणे हे राज्याचे मुख्य धोरण असणे, परंतु अलीकडे केंद्र शासनाने 'नरेगा सॉफ्ट' या प्रणालीमध्ये एका ग्रामपंचायतीसाठी सार्वजनिक व वैयक्तिक अशा एकूण कामांच्या संख्येवर '२० कामांचे लॉक' लावले असल्याचे अलीकडेच दिसून येणे, सदर तांत्रिक निर्बंधामुळे, जोपर्यंत सुरू असलेल्या कामांपैकी जुनी कामे पूर्ण होऊन त्यांचे 'क्लोजर रिपोर्ट' प्रणालीत भरले जात नाहीत,तोपर्यंत नवीन एकाही कामाला प्रशासकीय मान्यता मिळणे किंवा मस्टर काढणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य झाले असणे, यामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्यातील हजारो ग्रामपंचायतींमध्ये सिंचन विहिरी, फळबाग लागवड, घरकुल यांसारखी महत्त्वाची वैयक्तिक कामे आणि ग्रामविकासाची सार्वजनिक कामे मोठ्या प्रमाणावर रखडली	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे, ग्रामीण भागात मजुरांकडून कामाची मोठी मागणी होत असतानाही, केवळ या तांत्रिक 'लॉक'मुळे नवीन मस्टर उपलब्ध होत नसल्याने मजुरांना काम नाकारले जात असणे,यामुळे मजुरांच्या हाताला काम नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे व ग्रामीण अर्थव्यवस्थेवर याचे गंभीर परिणाम होत असणे,राज्यातील भौगोलिक परिस्थिती आणि कामांची निकड लक्षात घेता केंद्राचे हे निर्बंध राज्यासाठी जाचक ठरत असणे,यावर तातडीने उपाययोजना म्हणून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून हे '२० कामांचे लॉक' त्वरित हटवणे किंवा कामांची मर्यादा वाढवून मिळणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४५०.	श्री. किशोर पाटील, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. राजेश वानखडे, श्रीमती श्वेता महाले, श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), श्री. नारायण कुचे,	"राज्यातील ग्रामरोजगार सहायकांना दरमहा फिक्स पेमेंट देण्यासंदर्भात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्राम रोजगार सेवकांचे मानधनात सुधारणा करण्याबाबत नियोजना (रोहयो) विभाग यांनी शासन निर्णय क्रमांक मग्रारो-२०२४/प्र.क्र.६३/रोहयो-१०-अ दि.३.१०.२०२४ रोजीच्या सुमारास शासन निर्णय काढण्यात येणे, परंतु आजपावेतो या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात न येणे, परिणामी राज्यातील ग्रामसेवकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	श्री. अमोल पाटील वि. स. स.	संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	
४५१.	श्री. अमोल जावळे, श्री. सुरेश (राजूमामा) भोळे वि. स. स.	“जळगाव जिल्हा देशात केळी उत्पादनासाठी अग्रस्थानी असून हजारो शेतकरी पूर्णपणे या पिकावर अवलंबून असणे. मात्र जिल्ह्यातील १३ गावांत पनामा रोग (Fusarium Wilt-Tropical Race ४) आढळून येणे, हा जमिनीतून पसरणारा अत्यंत घातक रोग असून त्यामुळे संपूर्ण केळी बागा नष्ट होत असणे, एकदा प्रादुर्भाव झाल्यास अनेक वर्षे त्या जमिनीत केळी लागवड करणे अशक्य होणे, बाधित शेतकऱ्यांना पिकविमा संरक्षण नसल्यामुळे बँक कर्जाचा ताण वाढत जाणे आणि शासनाकडून थेट आर्थिक मदत उपलब्ध नसणे, बायो-फेन्सिंग, सॅनिटेशन प्रोटोकॉल व रोगप्रतिबंधक रोपे याबाबत ठोस योजना नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर होत जाणे, जळगावची अर्थव्यवस्था, निर्यात आणि रोजगार साखळी मोठ्या प्रमाणावर केळीवर आधारित असल्याने हे संकट संपूर्ण जिल्ह्याच्या आर्थिक अस्तित्वावर परिणाम करणारे ठरत आहे त्यामुळे तात्काळ सर्वेक्षण करून बाधित क्षेत्र जाहीर करणे, TR४ प्रजातिकारक जातींची रोपे मोफत किंवा अनुदानित दराने	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपलब्ध करणे, विशेष निधी व नुकसानभरपाई योजना जाहीर करणे तसेच जनजागृती मोहीम राबविणे अत्यावश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४५२.	श्री. करण देवतळे,श्री .देवराव भोंगळे वि .स .स.	“ मौजा कुनाड, ता.भद्रावती, जि.चंद्रपूर येथील कुनाड गावाचे पुनर्वसन होऊन १५ वर्ष पूर्ण झाले असले तरी अजूनपर्यंत गावठाण घोषित नसल्याने गावाचा विकास खुंटला असणे, मौजा कुनाड, ता.भद्रावती, जि.चंद्रपूर येथील कुनाड गावाची गावठाण मंजूर करून आबादी घोषित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (वरोरा) यांनी वारंवार मागणीही केली असणे, कुनाडा या गावाचे दोन वेळ पुनर्वसन करण्यात आले असणे, पहिल्यांदा सन १९९० साली राज्य सरकारने वेकोली ला कोळसा खाणीकरिता ४१० एकर जागा देऊन कुनाडा गावाचे पुनर्वसन चारगाव शिव लगत करण्यात येणे व परत २०१० साली वेकोली ने माजरी क्षेत्राअंतर्गत येत असलेल्या नविन कुनाडा गावाचे पुनर्वसन मौजा विजासन लगतच्या परिसरात करण्यात आले असणे, यामध्ये वेकोलिने गावाकरिता एकूण १३.५६ हेक्टर जमीन अधिगृहित करून गावातील पुनर्वसित नागरिकांना ३६५ प्लॉट देण्यात येणे, मौजा कुनाडा गावाचे पुनर्वसन करतांना ध्येय धोरणानुसार नियोजित जागेचे अकृषक करणे,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गावठाण घोषित करणे आणि गावाला आबादी घोषित करणे ई बाबींची पुर्तता नकरता कुनाडा गावाचे पुनर्वसन केले असणे, आज गावाचे पुनर्वसन होऊन १५ वर्षे पूर्ण झाली परंतु अजूनपर्यंत कुनाडा हे गाव गावठाण म्हणून घोषित झालेले नसणे, शासनाने नागरिकांच्या मागणीचा विचार करून कुनाडा गावाची गावठाण मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४५३.	श्री. संजय मेश्राम वि .स .स.	"नागपूर येथील वैनगंगा नदीवरील गोसेखुर्द धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्याने बॅकवाटरचे पाणी आवरमारा, कुजगा, चिचघाट (चापेगडी) येथील शेकडो एकर शेतात शिरल्याने गहू, चना यासारखी रब्बी पिके सडून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असल्याचे दि.१९/१/२०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, येथे गावाला पाणीपुरवठा करणारी यंत्रणाही २० फूट पाण्याखाली गेल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर होणे, येथील ग्रामस्थ मागील दोन दशकांपासून या आपत्तीचा सामना करीत असणे, त्यामुळे बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, पाण्याखाली गेलेली सर्व शेतजमीन बुडीत क्षेत्र म्हणून जाहिर करुन कायमस्वरुपी मोबदला द्यावा, वाढीव कुटूंबांच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक २ हजार चौरस फुटांचे प्लॉट	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		देऊन पुनर्वसन प्रक्रिया राबवावी, गावाला कायमस्वरुपी आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आदी येथील ग्रामस्थांच्या मागण्या असतानाही त्यावर शासन कार्यवाही करीत असलेला विलंब, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."	
४५४.	डॉ. बाबासाहेब देशमुख, श्री .अभिजीत पाटील, श्री .समाधान आवताडे, श्री .सुधीर मुनगंटीवार वि .स .स.	"सांगोला तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्याच्या प्रलंबित अनुदानाबाबत दि.११.१०.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत तत्कालीन मंत्री मदत व पुनर्वसन यांनी चारछावणी चालकांच्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटींची पूर्तता करण्याकरिता विभागीय आयुक्त कार्यालयातील किमान उपायुक्त यांच्या स्तरावरील अधिकाऱ्यांकडे संबंधित चाराछावणी चालकांची सुनावणी घेऊन राज्यकार्यकारी समितीच्या निर्णयानुसार पात्र चाराछावणीच्या सुधारित प्रस्ताव शासनास दि.२८.६.२०२४ रोजी सादर करण्यात येणे, सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील चारा छावणीधारकांचे प्रलंबित देयकाबाबत अनुक्रमे रु. २०,८६,९०,५९३/- व रु.१२,०७,५०,७३१/- इतक्या सुधारित अनुदान मागणीचा प्रस्ताव सादर करून या प्रस्तावास मा. मंत्री मंडळ	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		उपसमितीच्या दि.१.७.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूरी देऊन प्रस्ताव राज्यकार्यकारी समितीसमोर सादर करणे, परंतु प्रस्तावासंबंधित त्रुटींची पुर्तता करणे, प्रस्ताव तपासून पुन्हा फेरसादर करणे, पुर्वी पाठवलेल्या प्रस्तावावर सध्याच्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय मागविणे इ.कारणांमुळे प्रस्तावावर राज्य कार्यकारी समितीत अंतिम निर्णय अद्याप घेण्यात न येणे, राज्य कार्यकारी समितीने यापुढे लेखी पत्रव्यवहार न करता या प्रस्तावाबाबतची सर्व कागदपत्रे घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना समक्ष बैठकीस निमंत्रित करुन योग्य तो निर्णय १ महिन्याच्या आत म्हणजेच दिनांक १२.१.२०२६ पूर्वी करण्यात याव्यात असे आश्वासन दि.१२.१२.२५ च्या लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांनी देऊनही या प्रस्तावावर राज्य कार्यकारिणी समितीने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४५५.	श्री. संजय मेश्राम वि .स .स.	“नगरपंचायत कुही (जि. नागपूर) येथील अध्यक्षा व त्यांचे पती यांची शेती नसताना त्यांनी शेतपीक नुकसानीचे अनुदान घेऊन शासनाची फसवणूक केली असल्याचे दि.४/२/२०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांना	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नगराध्यक्षा पदावरुन बडतर्फ करण्याबाबतचा तक्रार अर्ज सहसचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, नागपूर विभाग यांना ९/१/२०२६ रोजी दाखल होणे, यासंदर्भात तहसिलदार, कुही यांना चौकशी अहवाल सादर केला असतानाही त्या अनुषंगाने कारवाईस शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी त्यांना शासन पाठीशी घालीत असल्याची येथील जनतेची भावना, व्यक्त होत असलेला असंतोष, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."	
४५६.	डॉ. किरण लहामटे वि .स .स.	"मौजे कोदणी,ता.अकोले,जि.अहिल्यानगर येथील कास्तकरी श्री.मारुती सोमा बांबेरे यांचेसह अनेक शेतकऱ्यांची जमीन निळवंडे धरण प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने संपादित करण्यात आलेली असणे,त्याबदल्यात अप्पर जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन,अहिल्यानगर यांच्या आदेश क्र.२६/५३१/२०१३ दि.१४/०६/२०१३ अन्वये मौजे आश्वी बु.ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर येथील गट नं.११७/७/१ मधील २ हेक्टर आर क्षेत्र श्री.मारुती सोमा बांबेरे यांना पुनर्वसन म्हणून मंजूर करण्यात आलेली असणे,तसेच सदर जमिनीचा ताबा मंडळाधिकारी शिबलापूर यांनी पंचांसमक्ष दि.०६/०७/२०२० रोजी चतु:सीमेनुसार	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		लेखी पंचनामा करुन श्री.मारुती सोमा बांबेरे यांना देण्यात आलेला असणे,परंतु त्यानंतर तेथील स्थानिक वस्तीतील काही शेतकऱ्यांनी सदर जमिनीच्या हद्दीतील कायम केलेले चिरे उपटून फेकून देऊन पुन्हा बेकादेशीर अतिक्रमण करुन जमिनीवर ताबा घेण्यात आलेला असणे, सदर शेतकरी हे जमीन कसण्यासाठी दिली न जाणे, यासंदर्भात प्रकरणार्थीनी तहसिलदार,जिल्हाधिकारी, महसूल मंत्री, प्रांताधिकारी आदि सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने देऊन पत्रव्यवहार केला असून भूमी अभिलेख अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येणे, त्याउलट अधिकाऱ्यांनी कास्तकारास केवळ ताबा दिला असल्याचे सांगण्यात येणे मात्र प्रत्यक्ष अतिक्रमण काढून न टाकणे, गेल्या सात वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा करुनही संबंधित शेतकऱ्यास न्याय मिळालेला नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आलेली असणे, परिणामी सदर जमिनीवरील अतिक्रमण काढून संबंधितांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४५७.	श्री. सुनिल प्रभू, श्री. योगेश सागर वि. स. स.	“मुंबईतील गोरेगाव पूर्व दादा साहेब फाळके चित्र नगरीसह राज्यातील चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार/ज्युनियर	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कलाकारांवर मालक/निर्माते यांच्याकडून सातत्याने अन्याय होत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, या कामगारांना चित्री करणासाठी मुंबईसह महाराष्ट्रात विविध ठिकाणी कामासाठी जावे लागत असणे, कामाची ८ ते १२ वेळ निश्चित करणे, निकृष्ट दर्जाचे भोजन न देता सकस आहाराचे भोजन देऊन दुपारी भोजनाची १ वा.वेळ निश्चित करणे, कामाचे वेतन कंत्राटदारा ऐवजी थेट चित्रपट निर्मात्याकडून देण्यात यावे, कामगार चांगले रहावे याकरिता निर्मात्यांनी स्टुडिओ अथवा चित्र करणाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्याची सतर्कता घेणे, ज्युनिअर महिला कलाकांराना कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र सुविधा करणे, चित्रपट, सिरीअलचे चित्रीकरण रात्री/अपरात्री सुरु असल्याने, घरी जाण्यासाठी गैरसोय होऊ नये यासाठी चित्रिकरणास रात्री १० वा. पर्यंत परवानगी देणे, शासनाच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २०२४ च्या कामगार कलाकारांना कल्याणकरी योजनांचा लाभ मिळण्याकरिता मानक कार्यप्रणाली (SOP) या शासन निर्णयातील तरतूदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, तसेच दादा साहेब फाळके, चित्र नगरी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकांनी, चित्र नगरीतील सर्व निर्मिती संस्थाना कलाकार	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कामगारांना सुविधा देण्याबाबत दिनांक.१७.०१.२०२५ रोजी लेखी पत्र देऊनही अद्याप, यावर कोणतीच कार्यवाही न होणे, मुंबईसह राज्यातील किमान ५ लाख कामगारांवर झालेला व होत असलेला अन्याय, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४५८.	श्री. नरेंद्र भोंडेकर वि .स .स.	"आलिशान कापड्यांचो जोरदार मार्केटिंग करणाऱ्या नागपूर येथिल इतवारी परिसरातील आलिशान कापडयांच्या प्रतिष्ठानाशी संबंधित नाशिर क्रिएशन्समध्ये मोठ्या प्रमाणात रेडिमेट कपडे तयार करण्यात येणे, या कापड्याच्या दुकानात व त्यांच्या फॅक्टरीमध्ये मोठ्या प्रमाणात परप्रांतीय बाल मजुराकडून डाबून कमी वेतणावर काम करवून घेणे, १० ते १६ वयोगटातील परप्रांतीय मजुरांना डाबून कमी वेतनावर वेठबीगारासारखे त्यांच्याकडून १८-१८ तास जबरदस्तीने काम करून घेणे, परप्रांतीय बाल मजुरांना जास्त वेतनाचे लालूच देऊन तसेच खोटे स्वप्न दाखवून त्यांची फसवणूक करून नागपूर येथे आणून त्यांना डाबून ठेऊन जबरदस्तीने वेठबिगारी सारखे काम करून घेतल्या जात असून याबाबत तक्रार होऊन सुध्दा अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे नागरिकांत पसरलेले तीव्र असंतोष,	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्यामुळे या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
४५९.	श्री. श्याम खोडे वि .स .स.	"वाशिम जिल्ह्यातील असलेल्या कामगारांची व औद्योगिक कामगारांची प्रकरणे कामगार न्यायालय अकोला येथे न्यायप्रविष्ठ असणे, वाशिम जिल्ह्यातील कामगारांना व औद्योगिक कामांना त्यांची पकडणे हाताळण्याकरता अकोला येथे जाणे येण्याचा त्रास होत असणे, विधी व न्याय विभागाच्या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे सदर सर्वप्रथम चालण्याचा अधिकार व कार्यक्षेत्र वाशिम येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर वाशिम यांना असणे, वाशीम येथील सर्व कामगारांचे अडचणीत लक्षात घेता अकोला येथे सुरू असलेल्या वाशिम जिल्ह्यातील सर्व प्रकरणे दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर वाशिम यांच्या न्यायालयात हस्तांतरित करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला नसल्याने समाजात प्रचंड रोष व्यक्त होणे, यावर शासनाने तातडीने करायची कार्यवाही व प्रतिक्रिया."	कित्ता
४६०.	श्री. विलास तरे, श्री. अमिन पटेल,	"पालघर जिल्ह्यातील बोईसर -तारापूर एमआयडीसीमध्ये वारंवार होत असलेल्या वायूगळती, स्फोट व आगीच्या घटनांनी गंभीर व	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
	श्री. विजय वडेट्टीवार, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अस्लम शेख, डॉ. ज्योती गायकवाड, श्री. रामदास मसराम, डॉ. विश्वजित कदम, श्री. विकास ठाकरे, श्री. संजय मेश्राम, श्री. मोहन मते वि. स. स.	धोकादायक स्वरूप धारण केले असून कामगार व स्थानिक नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झालेला असणे, सन १९६७ साली स्थापन झालेल्या या देशातील प्रमुख रासायनिक औद्योगिक क्षेत्रात सुमारे १२३६ कारखाने असून त्यापैकी ५०१ रासायनिक उद्योग कारखाने कार्यरत असणे, बोईसर -तारापूर एमआयडीसीमध्ये वारंवार होणाऱ्या दुर्घटनांमुळे नागरिकांना श्वसनाचे त्रास, डोळ्यांची जळजळ व आरोग्याच्या गंभीर समस्या भेडसावत असताना देखील प्रदूषण नियंत्रण मंडळ व औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय तसेच, संबंधित यंत्रणांचे उघड दुर्लक्ष दिसून येत असणे, दि. १७ मार्च, २०२६ रोजी शिव इंडस्ट्रीज प्लॉट क्र. J - १६२/१६३ कंपनीला भीषण आग लावून गोदाम ओईल टँक जाळून खाक झालेले असणे, सदर घटना ही कंपनीच्या निष्क्रियतेचे ज्वलंत उदाहरण असणे, त्यामुळे सर्व उद्योगांचे तात्काळ फायर ऑडिट, आपत्कालीन यंत्रणा सक्षम करणे, अग्निशमन दलाची क्षमता वाढविणे व शासनाने त्वरित ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४६१.	श्री. जयंत पाटील वि .स .स.	“राज्यातील शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आणि कर्जमाफीचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या उच्चस्तरीय परदेशी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		समिती स्थापन होऊन तीन महिन्याचा कालावधी उलटूनही अद्याप समितीने कर्जमाफीचे निकष निश्चित केलेले नसणे, फक्त बँकाना सूचना देणे, थकीत कर्जाची माहिती गोळा करणे, पुनर्गठन किंवा माफीचा आराखडा तयार करणे याबाबत कोणतीच कार्यवाही झालेली दिसत नसणे, परिणामी आजच्या स्थितीला शेतकरी अजुनच कर्जाच्या ओझ्याखाली दबला जाणे, शेतकऱ्यांकडे आत्महत्याशिवाय पर्याय नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, समितीने अद्याप अहवाल सादर न करण्याची मागणी कारणे काय आहेत याबाबत खुलासा करण्याची आवश्यकता, याबाबत शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४६२.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	“ मुंबईतील सांताक्रुज (प.) जुहू येथील जेव्हीपीडीस मधील सीएस क्र. १२७ मधील स्टर्लिंग सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रकरणात कार्यकारणी समिती अस्तित्वात नसतांना व गृहनिर्माण संस्थेवर प्रशासक नियुक्त असतांना तत्कालिन उपनिबंधक सहकार संस्था, म्हाडा यांनी पदाचा दुरुपयोग करुन व अर्थिक संगनमत करुन, हिरेन्द्र	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गांधी या त्रयस्थ सदस्य व्यक्तीला गृहनिर्माण संस्थेचे सदस्यत्व पद बेकादेशीररित्या दिल्याचा गंभीर प्रकार नुकताच उघडकीस येणे, याआधी सदरहू गृहनिर्माण संस्थेच्या प्रशासकाकडे सदस्यत्व मिळण्याकरिता हिरेन्द्र गांधी यांनी केलेला अर्ज दि.१७.०७.२०२३ रोजी प्रशासकाने फेटाळण्यात आला असतांनाही, प्रशासकाच्या निर्णयाकडे हेतूपुर्वक दुर्लक्ष करुन व पदाचा दुरुपयोग करुन आणि प्रचलित कायद्याचा भ्रष्टाचार करण्यासाठी सोयीस्कर अर्थ लावून हिरेन्द्र गांधी यांना सोसायटी अस्त्विात नसतांनाही, बरखास्त सोसायटीचे अधिकार स्वता:कडे घेऊन, संस्थेचे सदस्यपद दिल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास येणे, यामध्ये लाखो रुपयाचा अर्थिक गैरव्यवहार झाला असून, या संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा. सहकार मंत्री यांना दि.१२.११.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही यावर शासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही न करणे, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन व तत्कालिन उपनिबंधकाना, सेवेतून तत्काळ बडतर्फ करुन, बेकायदा बहाल केलेले सदस्यपद तत्काळ रद्द करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४६३.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मुंबईतील सांताक्रुज (प.) जुहू येथील जेव्हीपीडी मधील सीएस क्र. १२७ मधील स्टर्लिंग सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रकरणात म्हाडाच्या भ्रष्ट तत्कालिन उपनिबंधकांनी २००८ च्या म्हाडाच्या ठरावातील तरतूदीकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करुन तसेच म्हाडाच्या परवानगीची आवश्यकता नसतानांही, संस्थेचे मुळ सदस्य असलेल्या योगेश शेट्टी यांचेसह, सहा सदस्यांचे समिती सदस्यपद,अर्थिक संगनमताने रद्द करण्याचा दि.१३.०१.२०२३ रोजी बेकायदा आदेश जारी केल्याचा प्रकार उघडकीस येणे,सदरहू उपनिबंधकांनी पदाचा दुरुपयोग करुन, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अ (१) (ब) हे कलम लागू होत नसतांनाही, या कलमाचा सोयीनुसार अर्थ लावून चुकीचा आदेश काढून सहा सदस्यावर अन्याय करणे, सदरहू तत्कालिन उपनिबंधकानी,हिरेन्द्र गांधी हे संस्थेचे मुळ सदस्य नसतांनाही अर्थपूर्ण व्यवहार करुन,त्यांना सदस्यत्व देऊन त्यांना विरोध करणारे वरील सहा सदस्यांचे रद्द करणे, म्हाडामध्ये कार्यरत असतांना,अनेक चुकीचे निर्णय घेऊन, भ्रष्टाचार करणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी दि. १२.११.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री, मा. सहकार मंत्री यांना लेखी निवेदन देऊनही, अद्याप यावर शासनाने कार्यवाही न करणे, तक्रार	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नसतांना दि.१३.११.२०२३ रोजी बेकायदा आदेश काढून, व्यवस्थापन समिती बरखास्त करण्याचा आदेश जारी करणे, सदरहू समिती बरखास्त करण्याचा आदेश शासनाने तात्काळ रद्द करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."	
४६४.	श्री. सुनिल प्रभू वि .स .स.	"मुंबईतील बांद्रा येथील गृहनिर्माण भवनमधील सहकार विभागातून नियुक्त करण्यात आलेले, म्हाडाचे तत्कालिन उपनिबंधक, आदिनाथ दगडे यांनी शासकीय सेवेत रुजू होताना जातीचे बनावट प्रमाणपत्र आणि दिव्यांग असल्याचे बनावट प्रमाणपत्र जोडून, शासकीय सेवेचा बेकायदा लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदरहू अधिकाऱ्यांनी म्हाडामध्ये पदावर कार्यरत असतांना अनेक बेकायदा नियमबाह्य निर्णय घेऊन, कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात येणे, सांताक्रुज प. जुहू येथील सीएस क.१२७ मधील स्टर्लिंग को.ऑप.सोसायटीचे मुळ सदस्य योगेश शेट्टी यांचे सह सहा सदस्यांचे संस्थेचे समिती सदस्यत्व पद, पदाचा दुरुपयोग करुन व अर्थिक संगनमत करुन, रद्द केल्याचा दि.१३.०१.२०२३ रोजी आदेश जारी करणे, उपनिबंधकानी म्हाडाचा दि.०६.०५.२०१० चा ठराव क्र. ६४८०	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		मधील तरतूदीकडे दुर्लक्ष करुन, निर्णय जारी केल्याने संस्थेच्या सहा सदस्यावर अन्याय होणे, अशा प्रकारे म्हाडामध्ये कार्यरत असतांना मंजूरी दिलेल्या सर्व निर्णयाची चौकशी केल्यास कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार केल्याचा प्रकार उघडकीस येण्याची शक्यता असणे, तसेच बोगस जात व दिव्यांग प्रमाणपत्र जोडून शासकीय सेवेचा बेकायदा लाभ घेतल्याप्रकरणी त्यांना तत्काळ सेवेतून बडतर्फ करुन, शासकीय आर्थिक लाभाची रक्कम वसूल करण्यासाठी, शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	
४६५.	श्री. नरेंद्र मेहता वि .स .स.	“ मिरा भाईंदर शहरात अरुण मिश्रा नामक व्यक्ती इस्टेट एजंट म्हणून मागील चार ते पाच वर्षापासून काम करत असणे, या इसमाद्वारे शहरातील नागरिकांकडुन मोठ्या प्रमाणावर फी आकारुन रहिवास आणि वाणिज्य वापराच्या इमारतीचे कन्व्हेन्स करून देण्याचा काम करत असणे, यामध्ये सदर व्यक्तीने कन्व्हेन्स करताना प्रत्यक्षात असलेल्या मंजूर नकाशामध्ये बदल, प्रत्यक्ष बांधकाम क्षेत्रात बदल, अनधिकृत इमारतींना खोटे भोगवटा दाखले, वास्तुविशारदाचे खोटे हमीपत्र अशी अनेक बनावट कागदपत्रे बनवून संबंधित अधिकारी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		म्हणजेच जिल्हा उपनिबंधक ठाणे यांच्याशी आर्थिक संगनमत करून अनेक नागरीकांची फसवणुक करणे,संबंधित जिल्हा उपनिबंधक ठाणे यांनी देखिल त्याची शहानिशा न करता केवळ आर्थिक हितासाठी अरुण मिश्रा नामक व्यक्ती सोबत नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक केलेली असणे, सदर मिश्रा व अधिकारी हे नागरीकांकडून खोटी कामे करण्यासाठी म्हणजेच अनधिकृत बांधकामांचे कन्व्हेन्स करण्यासाठी प्रत्येकी २००० रुपये रक्कम वसुल करत असणे,याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार दाखल करुन देखिल अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे,यामुळे येथिल फसवणुक झालेल्या जनतेमध्ये संबंधित अधिकारी व अरुण मिश्रा नामक व्यक्ती विरुद्ध असंतोष व चिडीची भावना निर्माण झालेली असणे,यामध्ये शासनाने संबंधित उप जिल्हानिबंधक ठाणे यांचे निलंबन करुन त्यांची आणि अरुण मिश्रा नामक व्यक्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४६६.	श्री. रवी राणा वि .स .स.	“अमरावती जिल्ह्यातील बहुल क्षेत्र, मेळघाट अंतर्गत चुरणी चिखलदरा, जिल्हा अमरावती येथील आदिवासी भागातील शेतकऱ्यांना	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कृषी माल विक्रीसाठी जवळपास बाजारपेठ उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असणे, वाहतूक खर्च, मध्यस्थांची साखळी आणि दरातील अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसणे, या पार्श्वभूमीवर संबंधित ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करून आवश्यक पायाभूत सुविधा, उपलब्ध करून देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी विद्यमान मुख्यमंत्र्यांकडे जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या मार्फत लेखी स्वरूपात केली असणे, तसेच विद्यमान सहकार मंत्र्यांनीही शासकीय यंत्रणेकडून अहवाल मागवून मुख्यमंत्री यांच्याकडे विनंती सादर केली असणे, तरी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन बाजार समिती स्थापन करण्यास मान्यता देण्याची आवश्यकता, जेणेकरून आदिवासी शेतकऱ्यांना न्याय्य बाजारपेठ व आर्थिक स्थैर्य मिळेल, या संबंधाने निर्णय घेण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका.”	
४६७.	श्री. रत्नाकर गुट्टे वि .स .स.	“महाराष्ट्र व केंद्र शासनाने विविध कार्यकारी सेवा सोसायटींचे संगणीकरण करण्याचा निर्णय घेणे,सदरचे कामकाज करण्याकरिता गटसचिव हा मुख्य भाग असणे,तथापि राज्यातील सुमारे २,४०० गटसचिवांचे १ ते ३ वर्षांपर्यंत अंदाजे २०० कोटी रुपये वेतन थकित	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		असणे, शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याज योजनेमुळे सहकारी संस्थांचा व्याज गाळा कमी झाल्यामुळे गटसचिवांच्या वेतनात तुट निर्माण होणे,गटसचिव यांची ग्रामविकास, कर्जवाटप, नाबार्ड योजना इत्यादींमध्ये महत्त्वाची भूमिका असणे, त्यामुळे त्यांना लोकसेवकाचा दर्जा देऊन स्वतंत्र आर्थिक महामंडळ स्थापन करण्याची होत असलेली मागणी, औद्योगिक न्यायालय व गडाख समिती यांच्या अहवालानुसार गटसचिवांना व ग्रामसेवक समान वेतनमान लागू करण्याची शिफारस असूनही अद्याप ती लागू झालेली नसणे, दि. ०६/०९/२०१४ मधील सक्षमीकरण अर्थसहाय्याच्या अटी शिथिल करून संस्थांना निधी देऊन गटसचिवांचे वेतन सुरळीत करण्याची त्याचप्रमाणे ग्रामसेवकाचे "ग्रामविकास अधिकारी" व कृषी सहाय्यकचे सहाय्यक कृषी अधिकारी असे पदनाम देण्यात आले असून त्याच धर्तीवर गटसचिव यांना "ग्राम सहकार अधिकारी" असे पदनाम देण्याची होत असलेली मागणी, तसेच कलम ६९(अ), नियम ५३, पोटनियम व कर्मचारी सेवाशर्ती या कायदेशीर तरतुदी अस्तित्वात असूनही गटसचिवांच्या सेवा-वेतनाबाबतची अंमलबजावणी प्रलंबित असणे,अंमलबजावणीस विलंब करणाऱ्यांवर संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची तसेच	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		गटसचिवांच्या मागणीच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."	
४६८.	श्री. शांताराम मोरे, श्री. विलास तरे वि .स .स.	"राज्यात माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये कोकणासह अवकाळी व अतिवृष्टी पावसाने थैमान घालून लाखो हेक्टर क्षेत्रावरील भात पिंकाचे प्रचंड प्रमाणात नुकसान होऊन शेतकरी हवालदिल होणे, सदरहू शेतकऱ्यांनी शेती लागवडीसाठी बि-बियाणे रासायनिक खते व औषधांकरीता जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेच्या माध्यमातून तसेच अन्य काही बँकेतून कर्ज घेतल्याने त्याची परत फेड करण्यास शेतकऱ्यांवर ओढलेले आर्थिक संकट, सदर नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना कृषि अधिकारी ठाणे यांच्याकडे बाधीत क्षेत्राचे पंचनामे दि. ७ ऑक्टोंबर, २०२५ रोजी सादर करूनही, वरील घटनेला चार माहिन्याचा कालावधी लोटूनही शासनातर्फे कवडीची मदत शेतीग्रस्तांना न मिळाल्याने परिणामी शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण होऊन मदतीच्या प्रतिक्षित असणे, किसान प्रधान मंत्री योजने अंतर्गत शेतकऱ्यांनी इफको विमा कंपनी ता. भिवंडी सह .संस्थेकडून खाजगी रूपाने शेतकऱ्यांच विमा उतरविण्यात आलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ ओळख व सत्यता	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		फार्मर आयडी तसेच आर्थिक ग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी रुपये ५० मिळण्याबाबत शासनानकडे मागणी करण्यात आली असून महाराष्ट्राच्या वतीने तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि. ३० जून, २०२५ पर्यंत कर्जमाफीची घोषना करण्यात आलेली असणे, तसेच सहकारी संस्था तोट्यात जाऊ नये याबाबत शासनाने त्यावर तात्काळ निर्णय घेऊन कर्जमाफीची घोषणा जाहीर करणेबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४६९.	श्री. महेंद्र दळवी वि .स .स.	“वसई प्रगती को.ऑप. क्रेडिट सोसायटी, वसई यामध्ये कर्ज वाटपात व कर्ज वसूलीमध्ये सोसायटीच्या संचलकांनी व संबंधित अधिकारी यांच्या संघमताने मोठ्याप्रमाणात अर्थिक गैरव्यवहार करुन भ्रष्टाचार केल्याबाबत माहे, जानेवारी, २०२६ च्या सुमारस निर्दशनास येणे, याबाबत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था वसई यांच्याकडे तक्रार देणे, परंतू जिल्हा उप निबंधक, वसई यांनी जे या प्रकरणात संशयीत आहेत)संचालक मंडळ (त्यांनाच चौकशी करुन अहवाल देण्याबाबत दिनांक २२ जानेवारी, २०२६ च्या त्यांच्या पत्राद्वारे आदेश दिले असणे, तसेच पतसंस्थेची स्टेशनरी विभागात कर्मचारी यांनी स्टेशनरी चार ते पाच पट भावात खरेदी करुन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		निदर्शनास येणे, या सर्व प्रकरणाबाबत प्रशासक नेमून चौकशी करावी व जबाबदार संचालक व अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत तसेच ठेविदारांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४७०.	श्री. राजेश वानखडे वि .स .स.	“अमरावती जिल्ह्यातील तिवसा विधानसभा मतदार संघातील जास्त लोकसंख्या असलेले व मोठ्या संख्येने लगतची लहान गावातील नागरिक आरोग्य सुविधेकरीता अवलंबून असलेले माहुली जहागीर, वलगाव ता.अमरावती, नेर पिंगळाई ता.मोर्शी, कुऱ्हा ता. तिवसा व खोलापूर ता. भातकुली या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्ण संख्या जास्त आरोग्य सेवा अपुरी पडणे, त्यामुळे नागरिकांना नाईलाजाने उपचारा करिता तालुक्याच्या ठिकाणी जावे लागणे, तेथे चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा पुरवण्या करिता या आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणी वर्धन करण्याबाब सातत्याने नागरिकांद्वारे मागणी असणे,सदर आरोग्य केंद्रांचे श्रेणीवर्धन करण्याबाबतची मागणी तिवसा मतदारसंघाचे विधानसभा सदस्य यांनी पत्राद्वारे मा. आरोग्य मंत्री यांच्याकडे करणे, सदर प्रस्ताव उपसंचालक कार्यालय अकोला द्वारे शासनास अनेक महिन्यासून सादर करण्यात आलेले असणे, अद्यापही	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		यावर मान्यतेची कार्यवाही न होणे, यामुळे रुग्णांना अनावश्यक त्रास होऊन जनतेमध्ये शासनाप्रति रोष निर्माण होणे, या प्राथमिक आरोग्य केंद्रांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची तातडीची गरज, यावर शासनाने करावयची उपाययोजना व कारवाई."	
४७१.	श्री. राजेश विटेकर, श्री. मुरजी पटेल, श्री. अमोल पाटील, श्री. संजय गायकवाड, श्री. चंद्रकांत निंबाजी पाटील, श्री. राजु तोडसाम, श्री. रोहित पवार,श्री. अमोल खताळ, श्री.सुधीर मुनगंटीवार, श्री. प्रविण दटके, श्री. प्रताप अडसड, श्री. करण देवतळे, श्री. मोहन मते, वि. स. स.	"एटापल्ली (जि. गडचिरोली) तालुक्यातील मौ. आलदंडी टोला या गावात प्रसुतीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा स्थानिक रुग्णालयांची कोणतीही सुविधा नसल्यामुळे आशा संतोष किरंगा या ९ महिन्यांच्या गर्भवती महिलेस दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी आपल्या पोटातील बाळास वाचविण्यासाठी डॉक्टरांकडे पतीसह वैद्यकीय उपचारार्थ सहा किलोमीटरची पायपीट करावी लागल्याचे निदर्शनास येणे, सदर गर्भवती महिलेस वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे अगोदर तिच्या बाळाचा पोटातच मृत्यु झाल्याचे व त्यानंतर काही वेळातच गर्भवती महिलेचाही मृत्यू झाल्याची घटना घडणे, शवविच्छेदन व मृतांच्या प्रमाणपत्रासाठी मृतदेह एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले मात्र तिथे स्त्रीरोगतज्ज्ञ नसल्याचे कारण पुढे करत त्यांना पुन्हा ४० किलोमीटर अहेरीला अतिरिक्त अतंर पार करावे लागणे, गडचिरोलीसारख्या "स्टील हब" म्हणून नावारुपास येत असलेल्या परंतु अपुऱ्या पायाभूत	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		सुविधेचे विदारक रुप पहावे लागल्याचा प्रसंग गावंकरी, नातेवाईक व हितसंबंधितांवर आला असल्याचे निदर्शनास येणे, या घटनेची चौकशी करुन चौकशीतील निष्कर्षानुसार संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता, सदर प्रकरण गडचिरोलीसह राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील मूलभूत आरोग्य सुविधांच्या गंभीर अभावाचे भयानक उदाहरण ठरते, यासाठी राज्यातील अशा घटना रोखण्यासाठी व आदिवासी दुर्गम भागात जीवनावश्यक सोयी-सुविधा पुरवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	
४७२.	श्री. अबू आझमी वि .स .स.	"मुंबई मध्ये जानेवारी २०२६ मध्ये २ वर्षीय चिमुरडीचा (इरम फातिमा) रेबीजमुळे मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुलीला कुत्र्याने चावा घेतल्यानंतर सुरुवातीला ज्या रुग्णालयात नेण्यात आले, तिथे नियमानुसार "इम्युनोग्लोब्युलिन" (RIG) हे अत्यावश्यक इंजेक्शन देण्यात आले नसल्याचेही निदर्शनास येणे, प्रकृती गंभीर असताना सुद्धा मुंबईतील मोठ्या सरकारी रुग्णालयांनी (उदा. वाडिया, केईएम) आयसीयू बेड उपलब्ध नसल्याचे सांगून उपचार नाकारल्याने या मुलीचा जीव गेला असल्याचे ही निदर्शनास येणे, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सरकारी	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		रुग्णालयांत रेबीज लसींचा साठा आणि आपत्कालीन बेड व्यवस्थापन सुधारण्यासाठी शासनातर्फे उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात येणे, सदर प्रकरणातील दोषी डॉक्टरांवर आणि प्रशासनावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."	
४७३.	डॉ. तुषार राठोड वि .स .स.	" सार्वजनिक रुग्णालयांमध्ये आजारांचे निदान योग्य प्रकारे होऊन रुग्णांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी निदानात्मक चाचण्या (Diagnostic tests) बाह्य यंत्रणेद्वारे करण्याचा निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र यांनी सन २०१६ मध्ये घेतला असणे, या निर्णयानुसार एचएलएल लाईफकेअर लिमिटेड या संस्थेच्या कंपनीमार्फत सार्वजनिक रुग्णालयांमध्ये विविध चाचण्या करण्याची जबाबदारी देण्यात आली असणे, सदर संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या सेवांबाबत अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या असणे, सन २०२१ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या निविदेत पूर्वीच्या दरापेक्षा सुमारे ३० टक्के अधिक दराने बिल सादर करण्यात येत असून त्यामुळे शासनावर दरवर्षी अंदाजे रुपये ५८ ते १०० कोटींचा अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे करारानुसार सेवा दिल्या जात नसून निदानात्मक चाचण्यांची गुणवत्ता योग्य नसणे, चाचण्यांचे अहवाल वेळेत मिळत नसून, गुणवत्ता	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नियंत्रणाची कार्यवाही न होणे, प्रयोगशाळांना एनएबीएल मान्यता नसणे, डॉक्टरांनी सुचविलेल्या चाचण्यांव्यतिरिक्त इतर चाचण्या दाखवून बिलात वाढ करणे, कर्मचारी अपूर्ण प्रशिक्षित असणे अशा गंभीर बाबी राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र, पुणे यांच्या तपासणीत निदर्शनास आल्या आहेत या सर्व प्रकारामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची गुणवत्ता खालावत असून सर्वसामान्य रुग्ण, गर्भवती माता व नवजात बालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”	
४७४.	श्री. मोहन मते, श्री. भास्कर जाधव,श्री. प्रविण दटके, श्री. प्रताप अडसड, श्री. विक्रम पाचपुते, श्री. करण देवतळे, श्री. राजु तोडसाम, श्री. मंगेश चव्हाण वि. स. स.	“ नागपूर उपराजधानीतील प्रादेशिक मनोरुग्णालयात राज्यातील गरीब रुग्णालयांसाठी मागील दीड वर्षांपासून आरोग्य विभागामार्फत औषधांचा पुरवठा करण्यात आला नसल्याचेदिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी वा त्यासुमारास धक्कादायक बाब समोर येणे, परिणामी विदर्भासह लगतच्या मनोरुग्णालयात दाखल असलेल्या सुमारे ४३५ रुग्णांचा जीव धोक्यात आला असल्याने रुग्णालय प्रशासनाला विदर्भातील विविध शासकीय रुग्णालयातून उधारीवर औषधे घेण्याची वेळ येणे, सार्वजनिक आरोग्य विभागाचा गलथान कारभार व अपुऱ्या निधीमुळे	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		बहुसंख्य औषधांचा साठा यांच्या तुटवट्यामुळे विशेषत: तीव्र नैराश्यासाठी आवश्यक ओलान्झापाइन, ॲमिट्रिप्टिलीनसारखी औषधे अचानकपणे बंद केल्याने रुग्णालयामध्ये रुग्णांचे मानसिक संतुलन अधिक बिघडवून स्वत:ला तसेच इतरांना इजा पोहचूण किंवा आत्महत्या सारखे पाऊल उचलण्याच्या घटनांचे धक्कादायक वास्तव समोर आले असतांनाही सुमारे २५० बाह्यरुग्णांवर उपचार करण्यास मनोरुग्णालय प्रशासनाला अडचणी निर्माण होणे, मनोरुग्णालयात ओलान्झापाइन पासून ते रिस्पेरिडोन यासारखी महत्त्वाची औषधे नसल्याने रुग्णांचा आजार कमी होण्याऐवजी तो वाढत जाण्याने रुग्णालयातील डॉक्टर हतबल होणे, परिणामी संतप्त रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने मनोरुग्णांवर उपचारासाठी औषधांचा पुरवठा करणेबाबत शासनाने वेळीच केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.”	
४७५.	श्री. दौलत दरोडा वि .स .स.	“ राज्यातील ठाणे, पालघर, नंदूरबार, गडचिरोली, भंडारा आणि चंद्रपूर या सहा जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हत्तीरोगाचा	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		प्रादुर्भाव झाला असून या रोगाच्या निर्मुलनासाठी राज्य शासनाने माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबविण्याचा घेतलेला निर्णय, हत्तीरोग हा संक्रमित डास चावल्यामुळे पसरणारा आणि दिर्घकालीन अपंगत्व निर्माण करणारा आजार असून बहुतेकदा बालवयातच हा संसर्ग होणे, मात्र त्याची लक्षणे प्रामुख्याने प्रौढांवस्थेत दिसून येत असणे, या आजारामुळे शरीररातील रोगप्रतिकार शक्तीचा एक भाग असलेल्या लसिका संस्थेचे (लिस्फटिक सिस्टीम) नुकसान होऊन त्याचा वेळीच प्रतिबंध न केल्यास शरीराच्या विविध भागामध्ये असामान्य अशी सूज येणे, तसेच या आजारावर कायमस्वरुपी उपचार उपलब्ध नसून प्रतिबंध हाच उपाय असणे, याकरिता दरवर्षी हत्तीरोगाविरोधी औषधाचे सेवन करणे हाच एकमेव प्रभावी उपाय असणे, शासनाकडून हा आजार होऊ नये याकरिता कायमस्वरुपी हत्तीरोग प्रतिबंध उपाययोजना राबविण्याकरिता पाहिजे त्या प्रमाणात उपाय केले जात नसणे, राज्यातील १६ तालुक्यांव्यतिरिक्त अन्य तालुक्यांमध्ये देखील रोगाचा संसर्ग होण्याची निर्माण झालेली शक्यता, यामुळे लोकांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण लक्षात घेता राज्यातील हत्तीरोग निर्मूलन उपायोजना कायमस्वरुपी करण्यासाठी शासनाने	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
४७६.	श्री. मुरजी (काका) पटेल वि. स. स.	"मुंबईमधील अंधेरी पूर्व येथे एकमेव मोठी औद्योगिक वसाहत असून मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी वसाहत आहे, परंतु अंधेरी पूर्व परिसरात एकही सुसज्ज असे महापालिका किंबहुना शासनाचे रुग्णालय नसणे,त्यामुळे खाजगी रुग्णालयातील उपचाराचा खर्च सर्वसामान्य नागरिकांना परवडत नसल्याने नागरिकांची आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात गैरसोय होणे, येथील कामगार, कर्मचारी व मजुरांची संख्या व झोपडपट्टी लक्षात घेऊन भारत सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालय अंतर्गत येत असलेल्या राज्य विमा योजनेचे (ESIC) हॉस्पिटलची स्थापना करणे, परंतु सन २०१८ मध्ये सदरहू हॉस्पिटलला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत जवळपास १० व्यक्तीचा मृत्यू झाला, तेव्हापासून सदरचे हॉस्पिटल बंद असणे, सदरचे हॉस्पिटल पूर्णपणे चालू करण्याबाबत २०२५ या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दि. ११ मार्च २०२५रोजी झालेल्या चर्चेत मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री यांनी लवकरच हॉस्पिटल सुरू करण्याचे अश्वासन देवून हॉस्पिटलची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्याची संयुक्त बैठक घेणे, परंतु अद्याप हॉस्पिटल सुरू न होणे, नागरिकांची हॉस्पिटलअभावी होणारी गैरसोय लक्षात घेवुन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."	
४७७.	श्री. नरेंद्र भोंडेकर, श्री .सुधीर मुनगंटीवार, श्री .विजय वडेट्टीवार वि .स .स.	" गोंदीयातील रामनगर परिसरात असलेले डॉ नितेश वाजपेयी याचे न्यू बालाजी हॉस्पिटल अँड सोनोग्राफी सेंटर हॉस्पिटल मध्ये डॉक्टरानी दहा दिवसाच्या बाळाची दहा लाख रुपयांनी विक्री केल्याची धक्कादायक घटना माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये निदर्शनास येणे, या बाळ विक्री प्रकरणात पाचच्यावर जणांचा समावेश असून ही टोळी गरीब लोकांना हेरून लाखो रुपायांच्या पैशाचा लालूच दाखवून अनेक बाळाची विक्री केली असणे, बाळाची विक्री करणाऱ्या गोंदियातील डॉ. नितेश वाजपेयी याच्या टोळीने यापूर्वी डिसेंबरमध्ये देखील एका बाळाची अशाच पद्धतीने दोन ते तीन लाख रुपयांनी विक्री करणे, गरीब आणि अधिक अपत्ये असणाऱ्या कुटुंबांचा शोध घेऊन त्यांना यासाठी प्रवृत्त करण्यासाठी या टोळीने काही एजंट ठेवून त्यांच्या मार्फतीने बाळाची विक्री करणे, या गंभीर प्रकरणी तक्रार होऊन सुध्दा पोलिसाकडून संथगतीने तपास सुरु असल्याने नागरिकांत पसरत असलेला असंतोष, त्यामुळे या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४७८.	श्री. रोहित पवार वि .स .स.	"माहे डिसेंबर २०२५ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील श्रीपतपिंपरी येथे माहेरी आलेल्या वृशाली वैभव मोरे या गरोदर महिलेची बेकायदेशीरपणे सोनोग्राफी केली असणे व त्यानंतर तिला गर्भपाताच्या गोळ्या देण्यात येणे,व गर्भपातामुळे अतिरक्तस्त्रव झाल्याने तिचा मृत्यू होणे, सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील जामगाव (आ.)शिवारातील वाणेवाडी गावात अवैध गर्भलिंग निदान करून फिरते गर्भपात केंद्र चालवले जात असणे, बार्शी ग्रामीण पोलिसांनी कारवाई केली असता तिथे सुमारे १८ लाख रुपयांचा मुद्देमाल, पोर्टेबल सोनोग्राफी मशीन आणि गर्भपाताचे किट जप्त करण्यात आले असणे, या रॅकेटने आतापर्यंत ५० हून अधिक बेकायदा गर्भपात केले असून प्रत्येक केससाठी सुमारे ४० हजार रुपये आकारले असणे, तसेच राज्यातील कोल्हापूर, जालना, नागपुर, अहिल्यानगर जिल्ह्यात देखील अवैध गर्भलिंग निदान चालवले जात असून, अवैधरित्या गर्भपात करणे, महिलांच्या आरोग्याची हेळसांड होत असणे, परिणामी राज्यातिल मुलींच्या जन्मदरात घट होत असणे, अवैध गर्भलिंग निदान रॅकेट चालवणाऱ्यांवर व गर्भलिंग निदान कायद्याच्या	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		अमलबजावणीबाबत शासनाने तत्काळ करावयाची कारवाई आणि अवैध गर्भपात रॅकेट रोखण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना."	
४७९.	श्री. प्रविण दटके, श्री. करण देवतळे, श्री. योगेश सागर वि. स. स.	"राज्यात कर्करोगाचा विळखा घट्ट होत असून नागपुरात सर्वाधिक कर्क रुग्णांची नोंद होत असल्याची धक्कादायक माहिती इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च या संस्थेच्या अहवालानुसार प्राप्त झाली असणे, या अहवालानुसार नागपुरात दर एक लाख लोकसंख्येमागे ९० पुरुष कर्करोगाशी झुंज देत असून महिलांमध्ये पुरुषांपेक्षा ही जास्त प्रमाण होत असल्याचे निदर्शनास आले असणे, २०२४ मधील आकडेवारीनुसार पुरुषांमध्ये कर्करोगामुळे सर्वाधिक मृत्यू तर महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगामुळे महिलांना जीव गमवावा लागलेला असणे, राज्यात नागपूर विभागात कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक असणे, आरोग्य विभागाच्या माध्यमातून कर्करोगावर नियंत्रण मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्क्रीनिंग होणे आवश्यक असणे , शासनाने कर्करोग निवारणासाठी आणि अर्ली डिटेक्शन करून सार्वजनिक आरोग्य विभागाकडून व्यापक मोहीम राबवणे तसेच जनजागृती करणेकामी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४८०.	श्री. रवी राणा वि .स .स.	"राज्यातील अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात पल्लवी भूषण गुडदे या नवविवाहितेचा कथित वैद्यकीय हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर व संतापजनक असणे, दि. १६ जानेवारी, २०२६ रोजी ऑपरेशनदरम्यान भूल दिल्यानंतर त्या कोमात गेल्याचा आरोप असून संबंधित वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी व भूलतज्ञ यांनी आवश्यक दक्षता घेतली नसणे, असे नातेवाईकांचे म्हणणे आहे.मृतक पल्लवीचे वडील श्री. विनायक संपतराव मोहने यांनी दि. १९/०२/२०२६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींना लेखी निवेदन दिले असून लोकप्रतिनिधींनीही त्याच दिवशी विद्यमान मुख्यमंत्र्यांकडे तातडीने कारवाईची मागणी केली असणे, सदर प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन शासनाने तात्काळ स्वतंत्र व निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याची आवश्यकता, चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी व डॉक्टरांवर मनुष्यवधासह लागू असलेल्या कलमान्वये गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याने रुग्णालयातील वैद्यकीय प्रक्रियेचे पुनरावलोकन करून जबाबदारी निश्चित करणे व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कडक मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याबाबत शासनाने करावयाची	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		कार्यवाही व उपाययोजना.”	
४८१.	श्री. विक्रम पाचपुते, श्री. अतुल भातखळकर, श्री. हारुन खान वि. स. स.	“बदलापूर परिसरात बेकायदेशीर पद्धतीने महिलांचे स्त्रीबीज काढून त्यांची विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये उघडकीस येणे, त्यामध्ये आतापर्यंत सुमारे ४० हून अधिक महिलांचे स्त्री बीज काढल्याचे निदर्शनास आले असणे, त्यामध्ये आरोपी महिलांच्या मोबाईलमध्ये गर्भधारणेसाठी लागणारी इंजेक्शन्स, सोनोग्राफी अहवाल, महिलांच्या खोट्या नावांची प्रतिज्ञापत्रे आणि आर्थिक व्यवहारांची छायाचित्रे आढळून येणे, तसेच या प्रकरणाचे धागेदोरे कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि केरळ या राज्यांपर्यंत तसेच नाशिक शहरापर्यंत जोडलेले असून बनावट पॅन कार्ड, आधार कार्ड आणि वैद्यकीय कागदपत्रांच्या आधारे हे रॅकेट चालवले जात असणे, त्यामुळे या रॅकेटमध्ये अनेक नामवंत डॉक्टर, नामांकित रुग्णालये आणि आयव्हीएफ (IVF) सेंटर्सचा सहभाग असल्याची शक्यता लक्षात घेता या प्रकरणाचा सखोल तपास करण्याची गरज असणे, तसेच विशेष तपास पथक (SIT) नेमून दोषींवर कठोर कारवाई करून अशा प्रकारच्या स्त्री बीज तस्करीला आळा घालण्याबाबत व सर्व संशयित आयव्हीएफ (IVF) सेंटर्सचे तातडीने ऑडिट	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."	
४८२.	श्री. राजकुमार बडोले वि .स .स.	"गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील फुटाळा गावातील तलावात दि. ०३.०३.२०२६ रोजी सागर आणिक गहाणे व प्रणय गोवर्धन गहाणे हे तलावात बुडणे, त्यांना लगतच्या सौंदड ग्रामीण रुग्णालयात तातडीने उपचारासाठी हलविणे, परंतु, रुग्णालयात ऑक्सीजन सिलेंडर उपलब्ध नसणे, रुग्णांना वेळीच जिल्हा रुग्णालयात हलविण्यासाठी ॲब्युलन्स उपलब्ध न झाल्यामुळे मुलांचा मृत्यू झाल्याचा गावकऱ्यांचा आरोप असल्याने ३०० ते ४०० लोकांनी ग्रामीण रुग्णालयात जाऊन घेराव करणे, रुग्णालयात अपुरे डॉक्टर वर्ग व शवविच्छेदन गृह सुरु नसणे, एक्स रे टेक्नीशीयन नसल्यामुळे एक्स रे बंद असणे, रुग्णालयात योग्य पाणी पुरवठा सोयी नसणे, मृतांच्या कुटूंबाला प्रत्येकी १० लक्ष रुपये देण्यात यावे व संबंधीत वैद्यकीय अधिक्षकांचे निलंबन करण्यात यावे या मागणीसाठी लोकांनी आंदोलन करणे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र चिखली, प्राथमिक आरोग्य केंद्र इळदा अशा अनेक ठिकाणी असलेला अपुरा कर्मचारी व अपुऱ्या सोयी सुविधा, उपजिल्हा रुग्णालय सडक-अर्जुनी व अर्जुनी मोर मंजूर होऊन	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		त्यावर संथगतीने होणारी कार्यवाही व गोंदिया जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील ग्रामीण रुग्णालये व प्रा.आ.केंद्र व उपकेंद्रातील अपुरा कर्मचारी व सोयी सुविधांचा अभाव, परिणामी जनतेत पसरलेला असंतोष लक्षात घेता आरोग्य केंद्रात कर्मचारी व सोयीसुविधा तत्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका."	
४८३.	श्री. रईस शेख वि .स .स.	"स्व.इंदिरागांधी स्मृती उपजिल्हारुग्णालय व महिला व बाल रुगणालय यांचे २.७० एकर उपलब्ध जागेमध्ये असणे, सदर उपजिल्हारुग्णालयास १०० वरून २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यात येणे, असे असतांनाही या रुग्णालयात अदयाप यंत्रसामुग्री,उपकरणे व साधनसामुग्रीचा असलेला तुटवडा, त्यामुळे रुग्णांना अत्यावश्यक सोयी-सुविधा,मशिनरी उपलब्ध होत नसल्याने अन्य खाजगी रुग्णालयात जाण्याची आलेली वेळ, त्यामुळे त्यांना बसत असलेला आर्थिक भुर्दंड, रुग्णालयास तात्काळ यंत्रसामुग्री, उपकरणे व साधनसामुग्री पुरविणेबाबत तसेच नवीन रुग्णवाहिका देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी केलेला पत्रव्यवहार, अदयाप पत्राची दखल न घेणे, सावर्जनिक आरोग्य विभागयांनी श्रेणीवर्धन करुन २०० खाटांचे करण्यात आलेले असून	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		आवश्यक यंत्रसामुग्री, उपकरणे व साधन सामुग्री खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता देणे, परंतु अदयाप एकही निविदा उपलब्ध न झाल्याने फेरनिविदा काढण्याची प्रक्रीया सुरु असणे व तात्काळ मंजूर २५७ पदे भरती करण्याची आवश्यकता, तसेच २०० खाटांचे महिला व बाल रुग्णालयचे आकृतीबंधानुसार १८९ पदनिर्मिती प्रस्ताव शासनाकडे सादर होणे, सदर प्रस्ताव अदयाप मंजूरी न मिळणे, उपरोक्त दोन्ही रुग्णालये एकाच जागेत / परिसरात असल्याने रुग्णांना एकाच ठिकाणी सर्व उपचार मिळणे सोईस्कर होणे, त्याचबरोबर रुग्णालयातील कर्मचाऱ्याकरिता निवासस्थानाची असलेली आवश्यकता, आपात्कालीन परिस्थितीत डॉक्टर, कर्मचारी,परिचारिका यांची गरज भासल्यास उपलब्ध व्हावेत याकरिता रुग्णालयानजीक कर्मचारी निवासस्थान उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, सध्याची भिवंडी शहराची वाढती लोकसंख्या पाहता सदरहू दोन्ही रुग्णालयांची असलेली महत्वाची गरज पाहता या रुग्णालयास तात्काळ सोयी-सुविधा, पदभरती, कर्मचारी, डॉक्टर निवासस्थान, तसेच यंत्रसामुग्री, उपकरणे व साधनसामुग्रीचा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.”	

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४८४.	ॲड. श्रीजया चव्हाण, श्री .जितेश अंतापुरकर वि .स .स.	"मालेगांव ता, अर्धापूर, जि. नांदेड येथील अस्तित्वात असलेल्या ट्रॉमा केअर सेंटरचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेणे, सदर निर्णयाच्या अनुषंगाने ट्रॉमा केअर सेंटरचे ग्रामीण रुग्णालयात रुपांतर करण्यासंबंधीचे आदेश शासनाने दि. ०४/०२/ २०२१ रोजी निर्गमित करणे, त्याबरोबरच सदर ग्रामीण रुग्णालयाकरीता आवश्यक असणारी वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्यासही दि. २३/०६/२०२२ रोजीच्या शासन आदेशाने मान्यता देण्यात आलेली असणे, या मुळे ग्रामीण रुग्णालय तातडीने सुरु करुन मंजूर पदांवर अधिकारी/कर्मचाऱ्यांची तातडीने नियुक्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनीधींनी शासनाकडे पाठपुरावा करणे, मात्र असे असूनही शासनाकडून मंजूर झालेल्या पदावर अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती न केल्यामुळे ग्रामीण रुग्णालय अद्यापही सुरु न होणे परिणामत: जनतेच्या आरोग्य सेवांची होणारी हेळसांड आणि गैरसोय यामुळे स्थानिक जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाकडून करण्यात यावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
४८५.	ॲड. श्रीजया चव्हाण,श्री .जितेश अंतापुरकर वि .स .स.	"नांदेड जिल्ह्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रासह महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रुग्णालये तसेच वैद्यकिय महाविद्यालये असूनही सदर रुग्णालयांची असणारी दुरावस्था, तेथील यंत्रसामुग्रीची वेळीच न होणारी दुरुस्ती, अस्वच्छता, असमाधानकारक वैद्यकीय सुविधा यासह, नांदेड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदे अंतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांपासून आरोग्य सेवका पर्यंत मंजूर पदांपैकी मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असणे, त्यापैकी काही रिक्त पदे ही वरिष्ठ स्तरावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांची असणे, वैद्यकीय अधिकारी तसेच परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह सहाय्यक वैद्यकीय सेवांमधील कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे गंभीर आजारी असलेल्या रुग्णांना नाईलाजाने खाजगी रुग्णालयांमध्ये अधिक खर्चासह वैद्यकीय उपचार करुन घेणे अपरिहार्य ठरल्यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची भूमिका."	कित्ता
४८६.	श्री. अमोल जावळे वि .स .स.	"जळगांव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील गारखेडा परिसरात वैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्यामुळे नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीस निदर्शनास येणे,परंतु गारखेडा येथील आरोग्य उपकेंद्रात वैद्यकीय अधिकारी, परिचारिका तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध	कित्ता

अ.क्र.	सदस्यांचे नाव	थोडक्यात विषय	सभागृहात चर्चेचा दिनांक
		नसणे, त्यामुळे एका गर्भवती महिलेची प्रसूती आशा सेविकेमार्फत करावी लागणे, प्रसूतीनंतर नवजात बालकाची प्रकृती गंभीर झाल्याने आई व बालकाला पाल ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात येणे, परंतु तेथेही वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व रुग्णवाहिका उपलब्ध नसणे, त्यांना खाजगी वाहनाने फैजपूर येथे नेत असताना रस्त्यातच नवजात बालकाचा मृत्यू होणे, ही घटना ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी दर्शवणारी असणे, परिसरात ANM च्या सुमारे ६५ जागा तसेच CHO च्याही अनेक जागा रिक्त असणे, अलीकडे ४० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असल्या तरी केवळ ३ अधिकारी रुजू होणे, ग्रामीण रुग्णालयात MBBS डॉक्टरची आवश्यकता असणे, परंतु MBBS डॉक्टर पूर्णवेळ उपलब्ध नसल्याने रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसणे, त्यामुळे, सदर घटनेची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करणे व गारखेडा व परिसरात तातडीने वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.”	

लक्षवेधी सूचनेवरील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवणे

(म.वि.स. नियम १०५ अन्वये)

अ.क्र.	विषय	उत्तरीत झालेल्या सूचनेचा दिनांक व सदस्यांचे नांव	शेरा
(१)	(२)	(३)	(४)
१.	"हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाड्याचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे.	श्री. दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.	दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी प्रगती अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

****

विवरण क्रमांक - ३९

लक्षवेधी सूचनेवर अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

(म.वि.स. नियम १०५ अन्वये)

अ.क्र. (१)	विषय (२)	उत्तरीत झालेल्या सूचनेचा दिनांक व सदस्यांचे नांव (३)	शेरा (४)
१.	"नागपूर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी अधिकार नसताना स्मार्ट सिटी अंतर्गत केलेला आर्थिक गैरव्यवहार."	श्री. कृष्णा खोपडे व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या म. वि. स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.	दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.
२.	"नगरपंचायत, केज, जि. बीड येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), अंतर्गत ३.६२ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत."	श्रीमती नमिता मुंदडा व इतर वि.स.स. यांच्या दिनांक ५ मार्च, २०२६ रोजी झालेल्या म.वि.स. नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.	दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

विवरण क्रमांक -४०

शासकीय ठराव

(म.वि.स. नियम ११० अन्वये)

निरंक

***

विवरण क्रमांक - ४१

अशासकीय ठराव

(म.वि.स. नियम १०६ अन्वये)

(१) एकूण आलेले ठराव - २३५

(२) अमान्य झालेले ठराव - ०८२

(३) मान्य झालेले ठराव - १५३

अ.क्र.	प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव	सदस्यांचे नांव	चर्चेचा दिनांक	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१.	" राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."	श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.	२८ फेब्रुवारी, १३, १८ व २५ मार्च, २०२६	दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र.	प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव	सदस्यांचे नांव	चर्चेचा दिनांक	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२.	"पुणे शहरातील मुळा-मुठा नद्या आणि इतर जलस्त्रोत गंभीर प्रदूषित असणे, अपुरी सांडपाणी प्रक्रिया क्षमता, अनधिकृत बांधकामांमुळे नद्यांमध्ये सांडपाणी मिसळणे, पाणीपुरवठयाचे असमान वितरण (काही भागात ६०० लिटर तर काहीत १०० लिटर प्रति व्यक्ती), खडकवासला आणि इतर धरणांमधील प्रदूषण वाढणे, यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता धोक्यात येणे आणि आरोग्य समस्या निर्माण होणे, नद्यांचे पुनरुज्जीवन आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना (जसे JICA) गती देणे आवश्यक असणे, तरी शासनाने पुणे शहर आणि जिल्ह्यातील नदी प्रदूषण रोखण्यासाठी आणि पाणीपुरवठा समान व न्यायपूर्ण करण्यासाठी तातडीने कालबद्ध योजना राबवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."	श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.	२८ फेब्रुवारी, १३, १८ व २५ मार्च, २०२६	दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही.
३.	" राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील	श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स.	२८ फेब्रुवारी, १३, १८ व २५ मार्च, २०२६	दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र.	प्राथम्यक्रमानुसार चर्चेला आलेले ठराव	सदस्यांचे नांव	चर्चेचा दिनांक	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)
	कार्यालयांमध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमीपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”			
४.	"देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देऊन त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतीकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर "भारतरत्न" प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे.”	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.	२७ फेब्रुवारी व ५ मार्च, २०२६	५ मार्च, २०२६ रोजी चर्चा झाली

****

विवरण क्रमांक - ४२

समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव

(म.वि.स. नियम १९४ अन्वये).

निरंक

****

विवरण क्रमांक -४३

समिती नियुक्त करण्याबाबत प्रस्ताव (सर्वसाधारण)

(म.वि.स. नियम १६३ अन्वये).

निरंक

***

विवरण क्रमांक -४४

महाराष्ट्र विधानसभा

विधानसभेच्या सन २०२६ मधील प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये विधानसभा विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनांचे विवरणपत्र.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	३६	श्री. संजय मेश्राम, वि.स.स. दि. १७ डिसेंबर, २०२५	**श्री. राजेश कुमार, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (MRIDC) यांचेविरूध्द...** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य प्रतिनिधीत्व करीत असलेल्या उमरेड विधानसभा मतदारसंघामध्ये उमरेड शहरात (MRIDC) मार्फत राबविण्यात येणाऱ्या रेल्वे विकासकामामध्ये अत्यंत निकृष्ट दर्जा, गंभीर अनियमितता व सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण झाल्याबाबत सन्माननीय		सूचना पुढील कार्यवाहीसाठी समितीकडे सुपूर्द करण्यात आली.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			सदस्यांनी वेळोवेळी अधिकृत निवेदने व तक्रारी संबंधित यंत्रणांकडे सादर केल्या असता त्याच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले तसेच सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात श्री. राजेश कुमार जयस्वाल, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड महारेल (MRIDC) यांना अनेकदा संपर्क साधला असता त्यांनी सन्माननीय सदस्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच त्यांना अनेकदा मोबाईल वरून कॉल केला असता त्यालाही कोणताही प्रतिसाद न दिल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		
२	३७	श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. दि. २५ फेब्रुवारी, २०२६	**श्री. देवेंद्र वाणी व श्री. उत्तम राऊत, आदिवासी विकास सहाय्यक प्रकल्प अधिकारी तळोदा (जि. नंदूरबार), श्री. राहूल पवार शाखा अभियंता व श्री. दिपक राठोड शाखा उपअभियंता स्थानिक स्तरावरील लघुपाटबंधारे अक्कलकुवा - धडगांव (जि. नंदूरबार) व श्री. ललित**		सूचना नाकरण्यात आली.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			गवळी वनपरिक्षेत्र अधिकारी खापर अक्कलकुवा (जि. नंदूरबार) यांचेविरूध्द... सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी अक्कलकुवा, जिल्हा नंदूरबार व दिनांक ८ मे, २०२५ रोजी ता.धडगांव, जिल्हा नंदूरबार येथे स्थानिक लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली आमसभा पार पाडली सदर आमसभेत एकात्मिक आदिवासी विभाग प्रकल्प तळोदा अंतर्गत लाभार्थ्यांना शेळया-मेंढया, दुधाळ गायी, भजन साहित्य, क्रिकेट आर्दी साहित्यांचे अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वाटप करण्यात आल्याबाबत लाभार्थ्यांनी केलेल्या तक्रारी संदर्भात प्रकल्प अधिकारी श्री. देवेंद्र वाणी व उत्तम राऊत यांना सन्माननीय सदस्यांनी आमसभेत विचारणा केली असता त्यांना या संदर्भात माहिती देता आली नाही तसेच दिनांक १७ मे, २०२५ रोजी मा. पालकमंत्री ना.श्री. माणिकराव कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली नंदुरबार जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या नियोजन समितीच्या		

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			बैठकीत श्री. अनय नावंदर, प्रकल्प अधिकारी, तळोदा यांना संबंधित योजनांसंदर्भात विचारणा केली असता त्यांनी तेथे देखील माहिती देण्यास टाळाटाळ केली तसेच दिनांक १६ मे, २०२५ रोजी तहसिल कार्यालय अक्कलकुवा येथे आयोजित बैठकीस कोणतीही पुर्वसूचना न देता अनुपस्थित राहिले. दिनांक २५ जून, २०२५ रोजी शबरी घरकुल योजनेचा आढावा संदर्भात आयोजित बैठकीत प्रकल्प अधिकारी तळोदा हे अनुपस्थित राहिले व सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांना बैठकीस पाठविले. तसेच श्री. राहुल राजेंद्र पवार, शाखा अभियंता व श्री. दिपक संतोष राठोड, शाखा उप अभियंता अक्कलकुवा-धडगांव यांच्याकडून स्थानिक स्तरावरच्या कामांच्या उद्घाटनांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता परस्पर उद्घाटन करत असल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा झालेला अवमान व विशेषाधिकारभंग हा होय"		

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
३	३८	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. दि. २७ फेब्रुवारी, २०२६	**श्री. एम. देवेंद्रसिंग, सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेविरूध्द.....** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी विधानसभेत चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा विधानसभा मतदारसंघातील प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नासंदर्भात अर्धातास चर्चा घेण्यात आली. सदरहू प्रकरणी मा. पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांना संबंधित विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना ब्रिफिंगसाठी बोलाविले असता, "आमची मिटिंग आहे, येऊ शकणार नाही" असे उत्तर देऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव यांनी मा. मंत्री महोदयांना ब्रिफिंग करण्यासाठी उपस्थित राहण्यास नकार दिल्यामुळे सन्माननीय सदस्य व सभगृहाचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		सूचना नाकरण्यात आली.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
४	३९	श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. दि. २७ फेब्रुवारी, २०२६	**महिला व बालविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य, बालविकास प्रकल्प अधिकारी आणि पर्यवेक्षिका यांचेविरूध्द....** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, राज्यात मा. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना राबविण्यात येत असून त्या माध्यमातून राज्यातील महिलांच्या बँक खात्यात दरमहा रुपये १५०० इतकी रक्कम भरण्यात येत आहे. महिलांच्या बँक खात्यात रक्कम भरताना डीबीटी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यात आय. सी.आय.सी.आय. बँकेमार्फत भरण्यात येत असल्याबाबत माहिती सन्माननीय सदस्यांना मिळाली आहे. ही प्रक्रिया राबविताना मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्यामुळे याबाबत संपूर्ण व स्पष्ट माहिती मिळण्याबात सन्माननीय सदस्यांनी प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे ७ वेळा पत्रान्वये विनंती करून सुध्दा प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी सदरहू माहिती सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करून दिली नसल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		सूचना नाकरण्यात आली.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
५	४०	श्री. योगेश सागर, वि.स.स. दि. २६ फेब्रुवारी, २०२६	**श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचेविरूध्द...** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, विधानसभेच्या विद्यमान सत्रात बुधवार, दिनांक २५/०२/२०२६ रोजी श्री. अतूल भातखळकर व इतर वि.स.स. यांच्या "चंद्रपूर जिल्हयातील नागभीड तालुक्यातील निंथुर येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्यांला खाजगी सावकाराने कर्जांच्या विळख्यात ओढून कंबोडियात जाऊन त्यांची किडनी विकण्यास भाग पाडल्याबाबत" या विषयावरील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी सहभाग घेतला असता त्यांच्या भाषणात त्यांनी महाराष्ट्रातील १९ कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या शेतकऱ्यांनी कंबोडियात जाऊन किडन्या विकल्या असल्याचे तसेच, या प्रकरणात सहभागी असलेले डॉक्टर "पद्मश्री" पुरस्कार प्राप्त असल्याचे वक्तव्य केले ही बाब वस्तुस्थितीला धरुन नसून या वक्तव्यामुळे विधानसभा सभागृहाची दिशाभूल केल्याने सन्माननीय सदस्यांचा व सभागृहाचा झालेल्या विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		खुलासा मागविण्याबाबत स्मरणपत्र-१ पाठविण्यात आले.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
६	४१	श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स. दि. ०२ मार्च, २०२६	**संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेविरूध्द...** सूचनेत उपस्थित करण्यात आलेला मुख्य मुद्दा म्हणजे, श्री. अभिजित वंजारी हे पदवीधर मतदार संघातून विधान परिषदेचे सदस्य असून त्यांनी सन्माननीय सदस्य यांच्या पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्रात आंबेडकर चौक येथे आपल्या कार्यालयावर श्री. अभिजीत वंजारी आमदार पूर्व नागपूर विधानसभा क्षेत्र असे नमूद केल्यामुळे यासंदर्भात लकडगंज पो.स्टे. नागपूर येथे तक्रार दाखल केली असता पोलीस निरीक्षक यांनी सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना दिनांक २/०९/२०२५ रोजी अभिप्राय मागितले त्यानुषंगाने श्री. अशोक एस. सुतार सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी अभिप्राय सादर करताना कलम १७५, २०१, २०४, ३१८, ३१९, ३३५, ३३६ (२) भारतीय न्याय संहिता २००३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात यावा, असा अभिप्राय दिला परंतु श्रीमती मैथिली मिलिंद कळवीट,		खुलासा प्राप्त.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता यांनी सुतार यांच्या अभिप्रायावर कोणत्याही प्रकारची कारवाई करु नये, त्यांचा अभिप्राय परत पाठवा मी स्वतः अभिप्राय पाठवीत आहे तसेच अभिप्राय पाठविताना हा अभिप्राय गोपनीय स्वरुपाचा असून आपला कुठल्याही दस्तावेज सोबत जोडण्यात येऊ नये असे नमूद करून श्री. सुतार यांनी पाठविलेला अभिप्राय अमान्य केला. यासंदर्भात मा. पोलीस आयुक्त, मा.उपायुक्त झोन क्र.३ पोलीस निरीक्षक लकडगंज यांच्याकडे तक्रार दाखल केली असता कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन प्रकरण १९६/पोल क्रं. १०, दिनांक ३१/१०/२०२५ संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई यांना तपासून अभिप्राय मुद्याबाबत अहवाल शासनास सादर करण्यासाठी विनंती केली असता संचालक यांनी ४ महिन्यापासून त्यावर कोणतीही कार्यवाही न केल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय.”		

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
७	४२	श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स. दि. ०२ मार्च, २०२६	१) उमेश अलोने (ए.बी.पी.माझा) प्रतिनिधी २)श्री. अक्षय गवळी (साम टि.व्ही.) अकोला प्रतिनिधी ३)रविराज मोरे (वाचक लोकशाही वृत्तपत्र) अकोट प्रतिनिधी ४)संजय आठवले (महाव्हाईज चॅनेल) अकोट प्रतिनिधी यांचेविरूध्द... सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्य यांच्या अकोट मतदार संघात दिनांक १९ फेब्रुवारी, २०२६ रोजी श्री. अक्षय गवळी, पत्रकार, साम टि.व्ही, अकोला प्रतिनिधी व श्री. उमेश अलोने, पत्रकार, ए.बी.पी. माझा, अकोला प्रतिनिधी यांनी अकोट शहरातील भाजपा शहर अध्यक्ष श्री. हरिष टावरी यांना बिश्नोई गँगचे श्री. शुभम लोणकर यांनी २ कोटी रुपये खंडणी मागितल्या बाबतची बातमी आपल्या टि.व्ही चॅनल मार्फत प्रसारीत केली. ज्यामध्ये सन्माननीय सदस्य यांचा कोणताही संबंध नसताना भाजपा शहर अध्यक्ष श्री. हरिष टावरी यांनी सन्माननीय सदस्यांकडून २ कोटी रुपये निधी वसुल करून देण्याबाबतची खोटी बातमी प्रसारीत केली. तसेच श्री. रविराज मोरे, पत्रकार,		खुलासा मागविण्याबाबत स्मरणपत्र पाठविण्यात आले.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			वचक लोकशाही, वृत्तपत्र, अटोक प्रतिनिधी यांनी "वचक लोकशाही" या वृत्तपत्रामध्ये दिनांक २० फेबुवारी, २०२६ रोजी कॅनडातून बिश्नोई गँगच्या डॉनचा कॉल सन्माननीय सदस्यांना आला व सदर खंडणी ही भाजपा शहर अध्यक्ष श्री. हरिष टावरी यांच्या मार्फत २ कोटी रुपये मागणी केली असत्याचे वृतपत्रात प्रकाशीत केले. तसेच सन्माननीय सदस्य यांनी बिश्नोई गँगचे श्री. शुभम लोणकर यांना छुप्या मार्गाने २ कोटी रुपये खंडणी पोहचून दिल्याची बातमी वृत्तपत्रात प्रकाशित केली तसेच दिनांक ३ मार्च २०२६ रोजीच्या बातमीमध्ये सन्माननीय सदस्य यांनी एम.आय.एम. बरोबर अभद्र युती केल्यामुळे भाजपा पक्षातून सन्माननीय सदस्यांना निलंबित केल्याची बातमी प्रकाशीत केली. त्यांचप्रमाणे श्री. संजय आठवले, पत्रकार, महाव्हाईज चॅनेल, अकोट प्रतिनिधी यांनी दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी "आमदार भारसाकळे उडाले भूर" बिशनोई टोळीकडून खंडणीची धमकी मिळाल्याने आमदार भारसाकळे सार्वजनिक जिवनातून		

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			अलिप्त "धरती खा गयी या आसमान निगल गया" अशा बातम्या प्रसारीत केल्या तसेच दिनांक २ मार्च, २०२६ रोजीच्या बातमीद्वारे मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मा.मुख्यमंत्री यांनी सन्माननीय सदस्यांना पक्षातून निलंबीत केल्याची बातमी प्रसारीत केली. सन्माननीय सदस्यांसंदर्भात अशा प्रकारच्या खोट्या बातम्या प्रसारीत करून सन्माननीय सदस्यांची प्रतीमा जनमानसात मलीन केल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		
८	४३	श्री. सुरेश धस, वि.स.स. दि. ०९ मार्च, २०२६	**अपर मुख्य सचिव (कृषी), महसूल व कृषी विभाग, आयुक्त (कृषी) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेविरूध्द....** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्यांनी १)दिनांक २६/०१/२०२५ एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ मूल्य साखळी विकास कार्यक्रम सन २०२४-२५ या योजने विषयी सविस्तर		खुलासा प्राप्त.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			महिती मिळणे बाबत.२) दिनांक १५/०२/२०२५ रोजी सन२०२३-२०२४ व २०२४-२०२५ मध्ये कापूस सोयाबिन व इतर तेलबिया पिकांची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकाससाठी विशेष कृती योजने मधील कापूस साठवणूक बँक खरेदी संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती बाबत. ३)दिनांक १५/०४/२०२५ तत्कालीन कृषि मंत्री श्री. धनंजय मुंडे व यंत्रमाग महामंडळातील अधिकाऱ्यांनी संगनमताने निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप / रिंग करून एकाच घरातील आपसातील नातेवाईकांच्या कंपन्यांना निविदा मंजूर करून सर्वच निविदा धारकांना पुरवठा आदेश देऊन कापूस साठवणूक बँक खरेदी ४९.४४ रुपयाचा भ्रष्टाचार केल्याने त्यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करणे बाबत.४) दिनांक २६/०५/२०२५ श्री. धनंजय मुंढे तत्कालीन कृषी मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी पदाचा गैरवापर करून कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस सोयाबीन आणि इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ मूल्य साखळी विकास योजने मध्ये अधिकाऱ्यांच्या संगनमताने नॅनो		

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			युरीया, नॅनो डीएपी, मेटाल्डिहाईट किटकनाशक, बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप, कापुस साठवणूक बॅग खरेदीमध्ये केलेल्या कोट्यवधी रकमेच्या भ्रष्टाचाराची चौकशी स्वतंत्र SIT नेमून संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत. ५)दिनांक ०१/०७/२०२५ श्री. विनय आवटे, संचालक कृषी व त्यांचे वरिष्ठ अधिकारी तसेच तत्कालीन मंत्री यांनी पंतप्रधान पिक विमा योजनेमध्ये केलेल्या हजारो कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराची, गैरकारभाराची चौकशी ED व CBI मार्फत करून दोषीवर फौजदारी करावाई करणे बाबत. ६) दिनांक २८/०७/२०२५ पिक विमा योजने बाबात माहिती मिळण्यबाबत उपरोक्त पत्रान्वये १) अपर मुख्य सचिव (कृषी), महसूल व कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व २) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र शासन, पुणे यांना वारवार अधिकृत माहिती देण्याबाबत विनंती करून सुध्दा सन्माननीय सदस्यांना सदरहू माहिती जाणिवपूर्वक दिली नसल्याने सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय.”		

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
९	४४	श्री. राजन नाईक, वि.स.स. दि. १२ मार्च, २०२६	**श्री. मनोजकुमार सुर्यवंशी, आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांचेविरूध्द.....** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२६ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असून सन्माननीय सदस्य सदरहू अधिवेशन कामकाजामध्ये व्यस्त आहेत याची कल्पना असतानासुद्धा श्री. मनोजकुमार सुर्यवंशी, आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रभाग समिती (ए) च्या नवीन कार्यालयाचा लोकार्पण सोहळा सन्माननीय सदस्यांना पूर्वकल्पना न देता त्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय शुक्रवार दिनांक १३/०३/२०२६ रोजी आयोजित केला. तसेच सन्माननीय सदस्य स्थानीक लोकप्रतीनिधी असून सुध्दा त्यांचे नाव निमंत्रण पत्रिकेत शेवटी दर्शविण्यात आल्याने सन्माननीय सदस्य यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		सूचना नाकरण्यात आली.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१०	४५	श्री. सुहास बाबर, वि.स.स. दि. २३ मार्च, २०२६	**श्रीमती निताताई केळकर, संचालिका, MSEB Holding Company, श्री. विनायक इदाते, कार्यकारी अभियंता, महावितरण विटा विभाग, श्री. राजेश डावरे, उप कार्यकारी अभियंता, महावितरण आटपाडी उपविभाग, श्री. द्वारकेश बाबर, सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय करगणी व श्री. महबुब हुबाले, सहाय्यक अभियंता, महावितरण शाखा कार्यालय, दिघंची यांचेविरूध्द.....** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "दिनांक १४ मार्च, २०२६ रोजी सन्माननीय सदस्य यांच्या खानापूर मतदारसंघातील आटपाडी तालुक्यात महावितरणाच्या हिवतड, शेटफळे व दिघंची या तीन उपकेंद्रांचे लोकार्पण कार्यक्रमास स्थानीय लोकप्रतिनिधी म्हणुन सन्माननीय सदस्यांना निमंत्रित न करता दुसऱ्या मतदारसंघाचे आमदार श्री. गोपीचंद पडळकर यांना निमंत्रित करून त्यांच्या हस्ते उद्घाटन केल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		खुलासा प्राप्त.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
११	४६	श्री.अर्जून खोतकर, वि.स.स. दि.२४ मार्च, २०२६	**आयुक्त, जालना महानगरपालिका यांचेविरुध्द.....** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी जालना शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये सुमारे ४६ लाख रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आले असून उक्त कार्यक्रमामध्ये राजशिष्टाचार नियमांचे उल्लंघन करून विद्यमान लोकप्रतिनिधींना हेतुपुरस्सर वगळण्यात आले असल्याने झालेला सभागृहाचा विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		सूचना पुढील कार्यवाहीसाठी समितीकडे सुपूर्द करण्यात आली.
१२	४७	श्रीमती स्नेहा दुबे, वि.स.स. दि. १२ मार्च, २०२६	**श्री. मनोजकुमार सुर्यवंशी, आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांचेविरूध्द.....** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२६ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असून सन्माननीय सदस्य सदरहू अधिवेशन कामकाजामध्ये व्यस्त आहेत याची कल्पना असताना सुद्धा श्री. मनोजकुमार सुर्यवंशी, आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी वसई-विरार		खुलासा अप्राप्त. स्मरणपत्र-१ पाठविण्यात आले.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रभाग समिती (ए) च्या नवीन कार्यालयाचा लोकार्पण सोहळा सन्माननीय सदस्यांना पूर्वकल्पना न देता त्यांच्या पुर्वपरवानगी शिवाय शुक्रवार दिनांक १३/०३/२०२६ रोजी आयोजित केला. तसेच सन्माननीय सदस्य स्थानीक लोकप्रतीनिधी असून सुध्दा त्यांचे नाव निमंत्रण पत्रिकेत शेवटी दर्शविण्यात आल्याने सन्माननीय सदस्य यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		
१३	४८	श्री. अनंत नर, वि.स.स. दि. २३ मार्च, २०२६	**कार्यकारी अभियंता, श्री.धुमाळे, सहाय्यक अभियंता, के/उत्तर विभाग, कार्यकारी अभियंता, श्री. कुलकर्णी, सहाय्यक अभियंता, पी/दक्षिण विभाग, श्री. रामटेके, कार्यकारी अभियंता (पश्चिम) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, म्हाडा यांचेविरूध्द....** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य यांच्या जोगेश्वरी (पूर्व) विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील नागरी जन सोयीसुविधा, स्थानिक विकास कामे व नागरिकांच्या मागणीप्रमाणे स्थानिक आमदार निधी मधून किंवा उपलब्ध		खुलासा अप्राप्त.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			निधीमधून नवीन कामे सन्माननीय सदस्यांनी सूचविली असताना संबंधित विभागाचे अधिकारी व प्राधिकरणाचे अधिकारी यांनी त्या कामांना कोणताही प्रतिसाद न देता कामे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवल्यामुळे सन्माननीय सदस्यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		

***

विवरण क्रमांक - ४५

सांविधिक प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९० अन्वये)

निरंक

****

विवरण क्रमांक - ४६

अंतिम आठवडा प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१.	सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील,	राज्य सरकारच्या २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे मुंबईसह राज्यात १००० शाळा बंद पडण्याचा धोका निर्माण होणे, सीबीएसई, आयसीएसई, आयबी बोर्डाच्या शाळा व विद्यार्थ्यांची संख्या वाढत जाणे, गोदावरी, चंद्रभागा, नागनदी व पंचगंगा नद्या प्रदुषण मुक्त करण्याचा शासनाचा कृती आराखडा, वृक्षतोड, वाहतूक कोंडी, बेसुमार बांधकामे यामुळे एमएमआरडीए क्षेत्र, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर इत्यादी शहरात वाढलेले प्रदुषण, पर्यावरणाचा ऱ्हास, एमआयडीसी विकसित करीत असलेल्या शिळ-महापे (जि.ठाणे) हा वन विभागाचा रस्ता रुंदीकरणासाठी केंद्र शासनाच्या वन विभागाची अंतिम मान्यता न घेणे व वनीकरणासाठी राखीव असलेले क्षेत्र खाजगी विकासकाला परस्पर वितरीत करणे, सदर प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डातील कंत्राटी कामगारांच्या सेवा नियमित करण्याबाबत, पालघर	२४ व २५ मार्च, २०२६ रोजी चर्चा होऊन उत्तर देण्यात आले.

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स.	व ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या मुलभूत प्रश्नांबाबत प्रशासकीय अनास्था, मराठवाडा, विदर्भ व उर्वरीत महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळांना मार्च, २०२० नंतर मुदतवाढ देण्यात न येणे, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांवर वाढलेले अत्याचार, मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्स याचे प्रमाण नवयुवकांमध्ये वाढत असल्याची बाब समोर येणे, राज्यात भोंदुबाबांचे प्रकार वाढले असून त्यामुळे महिला व सर्वसामान्य जनता त्याला बळी पडत असणे, नाशिक येथील अशोक खरात या भोंदुबाबाने अनेक महिलांचे शोषण केल्याचा प्रकार उघड होणे, राज्यात मोठ्या प्रमाणात पैसे डबल करून देत असल्याचे सांगून फसवणूक केल्याची बाब समोर येणे, राज्यातील सीमावर्ती भागात परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून मनमानी वसुली होत असल्याची बाब निदर्शनास येणे, शासकीय नोकरीचे आमिष दाखवून तरुण व तरुणींची होत असलेली फसवणूक, राज्यातील विविध विभागात सुरू असलेल्या शासकीय कर्मचारी भरतीमध्ये होत असलेले भ्रष्टाचार, राज्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे होत असलेले गैरव्यवहार, CAG ने दिलेले अहवाल, शासकीय जमिनींची होत असलेली लूट, राज्यातील नगर परिषदेमध्ये व नगरपालिका अंतर्गत स्वच्छतेच्या कामांमध्ये होत	

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		असलेली अनियमितता, राज्यामध्ये शुद्ध पाण्याच्या नावाखाली प्रत्येक ठिकाणी RO प्लांट टाकून स्वच्छ पाण्याची होत असलेली विक्री, राज्यात होत असलेला शालार्थ आयडी भ्रष्टाचार व त्यामुळे शिक्षकांवरती अतिरिक्त कार्यभार वाढत असणे, शालेय शिक्षण विभाग अंतर्गत प्रधानमंत्री पोषण आहारामध्ये होत असलेला भ्रष्टाचार, राज्यातून केजी टू पीजी सर्व शिक्षण व्यवस्था, शाळांची दयनीय परिस्थिती निर्माण होणे व शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, वाढती फी यामुळे विद्यार्थी पालक बेजार होणे, सामाजिक न्याय विभागाच्या विविध आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये काही ठराविक विविध निविदा धारकांना सहाय्य करण्यासाठी झालेला भ्रष्टाचार, दिव्यांग विभागामध्ये खोटे प्रमाणपत्र देऊन शासनाच्या घेतलेल्या नोकरीमध्ये फसवणूक झाल्याबाबत, रस्त्यांची झालेली दुरवस्था, ग्रामीण भागामध्ये प्रामुख्याने रस्त्यांची दुरवस्था झालेली असणे, लहान व मोठे पुलांचे बांधकामासाठी निधीची उपलब्धता न होणे, गेल्या दोन वर्षापासून राज्यातील विविध कंत्राटदारांची मोठ्या प्रमाणात देयके शासनाकडे प्रलंबित असणे, त्यामुळे विकास कामे अपुरी	

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		असल्याची बाब समोर येणे, सार्वजनिक बांधकामांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, अन्न नागरी पुरवठा विभागात, प्रामुख्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील निविदा प्रक्रियेमध्ये झालेला घोळ तसेच POS मशीनच्या निविदा प्रक्रियेत झालेले भ्रष्टाचार, महसूल विभागामध्ये मोठ्या प्रमाणात टीडीआर घोटाळा समोर येणे, जलसंधारण विभागातील घोटाळा, वैद्यकीय उपकरणे/ औषधे खरेदी गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागातील गैरव्यवहार, राज्यात विविध भूसंपादन प्रकरणात होत असलेला घोटाळा, विरार अलिबाग कॉरिडॉर कामाच्या भूसंपादनामध्ये कुंडेवहाळ, ता.पनवेल येथील जमिनीसंदर्भात झालेला ५६ कोटीचा घोटाळा, यावर न्यायालयाने आदेश देऊन देखील संबंधित अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करता पाठराखण करण्याची शासनाची भूमिका, आदिवासी, विविध इनाम जमिनी हडपण्याचे राज्यात वाढलेले प्रमाण, एकंदरीतच महसूल विभागात वाढलेला भ्रष्टाचार व त्यावर नियंत्रण आणण्यास शासनाला आलेले अपयश, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात तीव्र पाणी टंचाई जाणवत असतानाही मा.उच्च न्यायालयाकडे मुबलक पाणी असल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र	

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		महापालिकेने सादर करणे, महापालिकेच्या शहरविकास विभागामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, रतनशी प्रेमजी ट्रस्टने ठाणे येथील जमिनीच्या विक्रीमध्ये केलेला गैरव्यवहार, येऊर येथील आदिवासी जमीनी धनदांडग्यांनी बळकावणे, आदिवासींवर होणारा अन्याय, अत्याचार, ठाणे येथील वनजमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	

****

विवरण क्रमांक - ४७

अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेसंबंधातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

निरंक

****

विवरण क्रमांक -४८

सार्वजनिक हितसंबंधातील इतर बाबतीतील प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९३ अन्वये)

(१) प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या - ०७

(२) मान्य सूचनांची संख्या - ०७

(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - ०६

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१..	सर्वश्री रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, मनोज कायंदे, प्रशांत बंब, दिपक केसरकर, चेतन तुपे, सुरेश धस, तानाजी सावंत, शेखर निकम, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री रमेश बोरनारे, प्रताप पाटील-चिखलीकर, चैनसुख संचेती,	"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri २०२६' ही परिषद शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाअॅग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतकऱ्यांच्या आयुष्यात	२४, २८ फेब्रुवारी, ४ मार्च, २०२६ रोजी चर्चा होऊन १३ मार्च, २०२६ रोजी सत्तारुढ व विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर एकत्रित उत्तर देण्यात आले.

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रकाश भारसाकळे, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, श्रीमती श्वेता महाले, श्री. प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. उमेश यावलकर, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, बबनराव लोणीकर, विलास तरे, सुनिल शेळके, संभाजी निलंगेकर-पाटील, अतुल भातखळकर, संजय उपाध्याय, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. चंद्रदिप नरके, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री मंगेश चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रवीण दटके,	क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांमधून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ, माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्रण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांना शेडयूल १ मधून शेडयूल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्यप्रण्यांच्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा	

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, गोपीचंद पडळकर, किशोर पाटील, राजकुमार बडोले, सुरेश भोळे, शांताराम मोरे, नारायण कुचे, प्रकाश सुर्वे, हरिष पिंपळे, निलेश राणे, राजू तोडसाम, तुकाराम काते, अभिमन्यू पवार, अशोक पाटील, देवराव भोंगळे, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, योगेश सागर, समीर कुणावार, सुहास कांदे, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री संजय गायकवाड, सत्यजित देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री विक्रम पाचपुते, महेंद्र थोरवे, सुमित वानखेडे,	फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, या विषयासंदर्भात शासनाने करावयाची अधिकची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."	

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	महेंद्र दळवी, सुभाष देशमुख, चंद्रकांत पाटील, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री संतोष बांगर, सुनिल कांबळे, राजेश बकाने, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री दिलीप लांडे, किशोर जोरगेवार, महेश शिंदे, राजेश पवार, आमश्या पाडवी, संतोष दानवे, हिकमत उढाण, राम कदम, संजय केळकर, मिहिर कोटेचा, केवलराम काळे, ॲड.श्रीजया चव्हाण, सर्वश्री बाबुराव कदम-कोहळीकर, राणाजगजितसिंह पाटील, अमोल खताळ, ॲड. राहुल कुल, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, डॉ. मिलिंद नरोटे,		

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	सर्वश्री मुरजी पटेल, राघवेंद्र पाटील, अमोल पाटील, समाधान आवताडे, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री सुहास बाबर, राजेश पाडवी, विलास भुमरे, काशिराम पावरा, राजेश मोरे, दिलीप बोरसे, विठ्ठल लंघे, प्रताप अडसड, किरण सांमत, श्रीमती सई डहाके, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री मोहन मते, राजेंद्र यड्रावकर-पाटील, कृष्णा खोपडे, शरद सोनवणे, विनोद अग्रवाल, शिवाजी पाटील, जितेश अंतापुरकर, किर्तीकुमार भांगडीया, सर्वश्रीमती अनुराधा चव्हाण, नमिता मुंदडा, सर्वश्री रमेश कराड, संजय पुराम,		

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	विजय रहांगडाले, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, करण देवतळे, भीमराव केराम, तुषार राठोड, तानाजी मुटकुळे, अनुपभैय्या अग्रवाल, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री श्याम खोडे, प्रविण तायडे, शंकर जगताप, सिध्दार्थ शिरोळे, देवेंद्र कोठे, विजय देशमुख, हेमंत रासने, भिमराव तापकीर, अमल महाडिक, सुरेश खाडे, राहुल आवाडे, मनोज घोरपडे, सुधीर गाडगीळ, महेश लांडगे, वि.स.स.		
२.	सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत,	माहे जानेवारी, २०२५ आणि जानेवारी, २०२६ मध्ये दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० लाख कोटी आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उद्योग राज्यात	४ व ५ मार्च, २०२६ रोजी चर्चा होऊन १३ मार्च, २०२६ रोजी सत्तारुढ व विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर एकत्रित उत्तर देण्यातआले.

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण,	उभारला न जाणे, राज्यातील टाटा एअरबस, वेदांता फॉक्सकॉन, सॅफ्रेन, बल्कड्रग पार्क, पाणबुडी इत्यादी अनेक प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीवर आलेली मर्यादा, कौशल्य विकास केंद्राच्या आकडेवारीनुसार राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची असलेली नोंद, राज्यात विविध योजनांचा निधी रखडलेला असून त्यामुळे राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिक व लाभार्थी यांच्यावर त्याचा थेट परिणाम होत असणे, शेतकरी सन्मान योजना, संजय गांधी निराधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना, ग्रामीण रोजगार योजना, जलजीवन मिशन, राष्ट्रीय आरोग्य अभियान, शिक्षण अभियान, रुग्णवाहीका अनुदान, रमाई आवास योजना, श्रावणबाळ योजना, महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना, इत्यादी योजनांचा निधी रखडल्याने कंत्राटदार व कामगार यांच्यावर आर्थिक ताण निर्माण होत असणे, ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांची देणी वाढणे, राज्यातील विविध महामंडळांना अर्थसहाय्य न मिळणे,	

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स.	परिणामी राज्यातील विकास कामांचा वेग मंदावलेला असणे, राज्यातील विकास योजनांना निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, राज्यातील नगरपालिका महानगरपालिकेचा कारभार मागील अनेक वर्षापासून प्रशासकाच्या मार्फत चालू असल्याने प्रशासनावर नसलेला वचक त्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार आणि नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विविध मेट्रो प्रकल्पांत झालेल्या आणि होत असलेल्या नित्कृष्ट बांधकामामुळे होत असलेले अपघात, MMRDA, CIDCO यासारख्या महामंडळाची ढासळलेली आर्थिक परिस्थिती, विविध शहरांचे रखडलेले हद्दवाढीचे प्रस्ताव, विकास आराखड्याचे प्रस्ताव यामुळे कुंठित झालेला शहरांचा विकास, अमृत योजनेतर्गत निधी नसल्यामुळे रखडलेले पाणीपुरवठा व इतर विकास कामांचे प्रकल्प, पुणे विमानतळा शेजारुन जाणारा रस्ता भविष्यात बंद होण्याची शक्यता असल्याने ५०९ चौक ते कलवड मार्गे धानोरी-लोहगाव रस्त्याला जोडणारा कलम २०५ अंतर्गतचा रस्ता प्रलंबित असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
३.	सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. सुनिल प्रभू, रोहित पवार, अमीन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षिरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, श्री रोहित पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनिल राऊत, नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम,	राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २०२६ पासून 'मोफत उपचार' सेवा बंद होऊन केसपेपर व शस्त्रक्रियांसाठी शुल्क आकारणी सुरू झाल्याने गरीब रुग्णांचे हाल होत असणे, त्यातच औषधांचा, विशेषतः प्रतिजैविके आणि मनोरुग्णांच्या गोळ्यांचा १.५ वर्षांपासून असलेला तुटवडा चिंतेचा विषय असणे, १,४०० हून अधिक डॉक्टरांची रिक्त पदे आणि भूलतज्ज्ञांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना शेजारील राज्यांत उपचारार्थ जावे लागत असणे, अनेक ग्रामीण रुग्णालयांची गळकी छते, अस्वच्छता आणि फायर एनओसीचा अभाव यामुळे रुग्णांची सुरक्षा धोक्यात आली असणे, राज्यातील औषधी पुरवठ्यामध्ये होत असलेली अनियमितता, प्राथमिक आरोग्यकेंद्र, उपकेंद्र यांची झालेली बिकट परिस्थिती, काही ठराविक औषधांसाठी खरेदी होणे, १०८ वरील रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न होणे, पुण्यातील बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय	५, १८, २३ मार्च, २०२६ रोजी चार प्रस्तावांवर एकत्रित चर्चा होऊन २५ मार्च, २०२६ रोजी उत्तर देण्यात आले.

अ.क.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
